॥ उद्धरेदात्म[illegible] ॥

राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा प्रश्न !

शेतकरी-ऋणविमोचन




लेखक
महादेव दत्तात्रेय वाघ

किंमत १॥ रु.

राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

शेतकरी-ऋणविमोचन



लेखक—महादेव दत्तात्रय वाघ
रा. नांदगिरी, जि. सातारा.

मूल्य १॥ रुपया.

समर्पण

सत्य, अहिंसा, परोपकार, इंद्रियदमन व
त्यागी वृत्ति या तत्वांनीं गौतमबुद्धासही मागें
टाकणारे **महात्मा गांधी**, स्वामी विवेकानंदांप्रमाणें
धार्मिक वृत्ति आणि राष्ट्रासाठीं वाटेल त्या हालअपेष्टा सोसून
शुद्ध सोनें ठरलेले राष्ट्रपति **सुभाषचंद्र बोस**, कार्ल मार्क्सच्या
तत्त्वज्ञानाचें रहस्य समजून घेऊन हिंदुस्थानांतील कोट्यवधि
गांजलेल्या जनतेचें दुःख कमी करण्याचा चंग बांधलेले
पं. जवाहिरलाल नेहरू, वशिष्ठ—वामदेवां-
प्रमाणें अध्यात्म व राजकारण यांत अग्रेसर
असे **पं. मदनमोहन मालवीय**,
सात्विकतेचा केवळ अवतार
असे मगधांतील लोकप्रिय अग्रणी
बाबूराजेंद्र प्रसाद, यांनीं, राष्ट्रीय तप-
श्चर्येनें लोकमान्य टिळकांच्या मागें राष्ट्रांत चैतन्य
तेवत ठेवल्याकारणानें आज हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसूर्या-
चा अरुणोदय होऊं पहात आहे. त्यांनीं घालून दिलेल्या सामा-
जिक, राजकीय, आद्योगिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक प्रणालींची
परंपरा उज्वल करूनच हिंदुस्थानाला आपला पुढील
स्वातंत्र्यसंपादनाचा आणि स्वसंरक्षणाचा मार्ग
आक्रमावयाचा आहे. याच जाणिवेनें सदर
राष्ट्रीय पंचायतनास मीं हें माझें
पुस्तक कृतज्ञतापूर्वक समर्पण
करीत आहें.

— ग्रंथकर्ता —

राष्ट्रपंचायतन



राष्ट्राध्यक्ष-सुभाषचंद्र बोस



पं. जवाहिरलाल नेहरू



महात्मा गांधी

महात्मा गांधी



पं. मालवीय



बाबू राजेंद्रप्रसाद

लोकमान्यांचा इषारा

" ताकाकरितां भीक
मागण्यास जावयाचें तर
भांडें लपविण्यांत कांहीं अर्थ
नाहीं. तुम्हांस काय पाहिजे तें उघड
सांगा. त्याकरितां इतर राष्ट्रांनीं प्रयत्न
केले तसे करा; भिऊं नका; भित्यापाठीं ब्रम्ह-
राक्षस, हें ध्यानांत ठेवा; संकटें आलीं तर डगमगूं
नका; संकटांखेरीज स्वातंत्र्य नाहीं आणि रात्रीखेरीज
सकाळ नाहीं. तुम्हांस मिळवावयाचें असेल तर
तें तुमच्या निश्चयानें, उद्योगानें आणि
धैर्यानें मिळेल. सरकार बलिष्ठ असलें
तर तें तुमच्या मदतीनें बलिष्ठ
झालेलें आहे ...... तुम्ही
ओळखाल तर
सर्व तुमचेंच
आहे. "

—लो. टिळक (केसरी)

आत्म-निवेदन

राष्ट्रीय स्वातंत्र्य हें सर्व प्रकारचें सुख, समृद्धि व वैभव यांचें उत्पत्तिस्थान असून पारतंत्र्य हें सर्व प्रकारचें दुःख, विपत्ति व दुर्गुण यांचें उगमस्थान होय ! गेल्या १५० वर्षांत हिंदी राष्ट्राचा स्वातंत्र्यरवि अस्ताचलास गेल्यामुळें उद्योगधंद्यांचा व संपत्तीचा अपरिमित नाश होऊन राष्ट्रावर दारिद्र्य, दुःख व बेकारी यांची निबिड छाया पसरली ! इंग्रजी अमदानींतील हें वाढतें दैन्य पाहून, राष्ट्रीय थोरथोर पुढाऱ्यांनीं गेलीं ५० वर्षें, राष्ट्रीय सभेमार्फत परकीय इंग्रज सत्तेशीं झगडून व अनंत क्लेश सहन करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला आहे. ' प्रयत्नांतीं परमेश्वर ' या न्यायानें त्यांच्या भगीरथ प्रयत्नांना थोडेंफार यश आलें असून, प्रांतिक स्वायत्ततेच्या रूपानें त्या स्वातंत्र्यरवीचा अरुणोदय झाला आहे ! त्यामुळें राष्ट्रांतील विद्यमान पुढाऱ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला असून, दारिद्र्य, दुःख व विपत्ति यांचें समूळ उच्छेदन करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे, ही अत्यंत आशाजनक गोष्ट आहे.

प्रांतिक स्वायत्ततेच्या अरुणोदयकालांत, कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं, लोकहिताच्या ज्या अनेक बहुमोल गोष्टी करावयाच्या आरंभिल्या आहेत, त्यांत शेतकरी-ऋणविमोचनाची अवघड बाब त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभी आहे ! शतकानुशतकें दारिद्र्यपंकांत रुतलेला शेतकरी कसा ऋणमुक्त करावा, हा अवघड प्रश्न त्यांना व जनतेला भेडसावीत आहे ! तो वेळींच न सोडविल्यास, त्याचे राष्ट्रीय दुष्परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाहींत ! म्हणून हें भावी संकट टाळण्यासाठीं

समाजांतील सर्व जाणत्या लोकांनीं, पुढाऱ्यांनीं व सर्व प्रांतिक सरकारांनीं या बाबतींत अत्यंत उदार धोरण आंखून हा राष्ट्रव्यापी प्रश्न सोडविला पाहिजे. या बाबतींत राष्ट्रांतील कर्त्या पुरुषांचे जे विचार बाहेर पडत आहेत, ते परिपूर्ण व परिणामीं यशस्वीच होणारे असे नसल्यामुळें, या बाबतींत दूरवर विचार करून, समाजव्यवस्थेस स्थैर्य आणणारी व समाजाचें योग्य धारणपोषण करण्यास समर्थ अशी स्वयंविकसित योजना तयार करून, ती राष्ट्रापुढें ठेविली पाहिजे. या योजनेंत ऋणको, धनको, जमीनदार, कूळ व सरकार या सर्वांची परस्परांना इष्टफलदायी मदत कशी मिळवितां येईल व त्यायोगें जनतेंतील असंतोष व दारिद्र्य कसें कमी करितां येईल, या दृष्टीनें प्रामुख्यानें विचार केला पाहिजे.

शेतकऱ्यांचें कर्ज.

या देशांतील सर्व शेतकरीसमाज भयंकर कर्जाच्या व भारी व्याजाच्या भारानें दडपला गेला असून त्यांतून त्याची ‘ सहीसलामत ’ सुटका करणें अत्यंत अवघड होऊन बसलें आहे ! “ प्रथम ज्या वेळीं १८८० मध्यें दुष्काळ-कमिशन नेमण्यांत आलें, त्या वेळीं असें दिसून आलें कीं, शेंकडा ५६ ते ७८ कृषिजीवि लोक कर्जांत डुबले आहेत ! १९१६ सालीं को-ऑपरेटिव्ह चळवळीचा आढावा घेण्याकरितां जी एक कमेटी नेमण्यांत आली, तिच्या रिपोर्टावरून असें दिसून येतें कीं, शेतकऱ्यांचें कर्ज सुमारें ३०० कोटि रुपयांचें होतें ! यानंतर १९२५ सालीं हा आंकडा ६०० कोटीवर गेला ! याचें कारण दुष्काळ व भयंकर महर्घता हें होय ! पुढें १९३१ सालीं झालेल्या बँकिंग एन्क्वायरी कमिटीच्या रिपोर्टावरून दिसून येतें कीं, हा आंकडा ९०० कोटीपर्यंत गेला आहे ! अलिकडे तर सार्वत्रिक मंदी व धान्याच्या भावाची बेसुमार घसरण यामुळें हा आंकडा १२०० कोटीपर्यंत गेला असेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे ! या तर्काला थोडासा आधार पाहिजे असल्यास, असें सांगतां येईल कीं, खाजगी व्यापाराची निर्गत १९३०–३१ सालीं जी सुमारें २२६ कोटि रु. होती, ती १९३१–३२ सालीं १६०॥ कोटीवर आली व १९३२--३३ मध्यें ती आणखी घसरून सुमारें १३५॥ कोटीवर आली आहे ! यावरून आमच्या शेतकऱ्यांची स्थिति किती हलाखीची झाली असली पाहिजे हें सिद्ध होतें. अशा भीषण परिस्थितींत शेतकरी कोणत्या आपत्तीच्या गर्तेंत लोटला जात असेल,

-याची वाचकच कल्पना करूं शकतील !" (केसरी–टिळक अंक, १९३४.)

वरील तज्ज्ञांच्या उताऱ्यावरून आमच्या कर्जबाजारीपणाचें नागवें स्वरूप उघडें होईल ! एवढ्या प्रचंड कर्जाचें व्याज सहज १५० ते २०० कोटि रु. होईल ! पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल व मद्रास या सुपीक प्रांतांतील शेतकरी दरसाल प्रत्येकीं २० कोटि रुपये व्याज भरीत असावा असा सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे ! वरीलसारख्या सुपीक व संपन्न प्रांतांची ही स्थिति ! मग त्या मानानें नापीक व निर्धन अशा आपल्या मुंबई प्रांताची काय स्थिति असेल, हें न सांगतांही कळण्यासारखें आहे. तज्ज्ञांच्या मतें या प्रांतांतील शेतकऱ्यास निदान १०० कोटींचें तरी कर्ज असावें व त्याचें व्याज दरसाल १२।१५ कोटि रुपये तरी भरलें जात असावें ! ही झाली शेतकऱ्यांची दिवाळखोरी ! तिकडून नजर काढून हिंदुस्थान सरकारकडे जों पहावें, तों तेथेंही असाच राष्ट्रीय कर्जाचा डोंगर शेतकऱ्यांच्या डोक्यावर करून ठेविलेला दिसतो ! हें कर्ज १९३५ अखेर १२१५ कोटि रुपये झालें असून त्याचें व्याज सुमारें ५० कोटि रुपये सरकाराला भरावें लागतें ! अर्थात् ह्या प्रचंड व्याजाचा भार बहुसंख्याक अशा शेतकऱ्यांच्याच डोक्यावर करग्रहणयोजनेनें बसतो हें न सांगतांही कळून येण्यासारखें आहे !

एवढा हा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न सर्व प्रांतिक सरकारांनीं पुढाकार घेऊन व स्वतःवर सर्व प्रकारची जबाबदारी घेऊन सोडविला पाहिजे. निवळ आपल्या हुकमी बहुमतावर, मनांत येतील त्या विचारांची घाई करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केल्यास समाजांत भयंकर असंतोष उत्पन्न होईल, व त्यामुळें समाजाची आर्थिक घडी विसकटून जाईल. आणि तसें झाल्यास आर्थिक व नैतिक पायावर उभारलेली समाजरचनाच ढासळून पडेल व परिणामीं शेतकरी वर्गच जास्त कंगाल व दीन बनेल ! त्याची पत नष्ट होईल ! त्याच्या गरजा संपन्न समाजाकडून भागविल्या जाणार नाहींत ! त्यामुळें त्यास जरूरीच्या प्रसंगीं लागणारी मदत वेळेवर न झाल्यामुळें, त्याचे सर्व व्यवहार अडून पडून तो दीन व दुबळा होईल, किंवा प्रसंगविशेषीं आपलें उग्र स्वरूप प्रगट करून तो नारसिंहावतार धारण कराल ! म्हणून या बाबतींतलें प्रत्येक पाऊल विचारपूर्वकच

पुढें टाकिलें पाहिजे व त्याची सर्व जबाबदारी शासनसंस्थेनें अथपासून इतिपर्यंत घेतली पाहिजे, इतका हा राष्ट्रीय जिव्हाळ्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे !

रोगाचें निदान बरोबर झालें पाहिजे.

रोग्यावर औषधयोजना करण्यापूर्वीं त्यास झालेल्या रोगाचें जसें अगोदर निदान करावें लागतें, त्याप्रमाणेंच शेतकरी–ऋणविमोचनाचा कायदा करण्यापूर्वीं त्याच्या कर्जबाजारीपणाच्या रोगाचें निदान केलें पाहिजे. हें निदान बरोबर केलें गेलें, तरच कर्जनिवारणरूपी कायद्याचें औषध त्यावर बरोबर लागू पडेल व रोगनिवारण होईल. नाहींतर रोग एक आणि औषध दुसरेंच होऊन, शेतकरी-समाजरूपी वृक्षास लागलेली कीड नाहींशी होणार नाहीं. रक्तदूषित झालेल्या रोग्याची, त्याच्या शरीरावर ठिकठिकाणीं उठणारीं गळवें जशीं वरवरच्या मलमपट्ट्यांनीं बरीं होत नाहींत, तर त्यांची अंतर्गत सुधारणा होण्यासाठीं त्यास रक्त-शुद्धीचें औषध द्यावें लागतें; त्याप्रमाणेंच कर्जनिवारणाचा कायदा करतांना त्याचीं मूळ कारणें शाबूत ठेवून निव्वळ व्याजाचा दर थोडा कमी करून किंवा कांहीं कर्ज माफ करून किंवा प्रसंगविशेषीं सर्व कर्ज माफ करूनही भागणार नाहीं ! पिकलेलीं गळवें फोडून कितीहि निचर केलीं किंवा त्यांचें कितीही उत्तम ड्रेसिंग केलें, तरी जोंपर्यंत शरिरांतील रक्त नासण्याची क्रिया थांबविली जात नाहीं, तोंपर्यंत वरील सर्व मेहनत फुकट आहे ! तोच दाखला कर्जग्रस्त शेतकऱ्यांच्या बाबतींत बरोबर लागू पडतो ! नाना प्रकारच्या सतत येणाऱ्या आर्थिक आपत्तींनीं त्याचा आर्थिक देह ऋणग्रस्त झाला आहे. त्या आपत्ति दूर न करितां जर निव्वळ कर्जतहकुबी, व्याजांत सूट किंवा मुदलांत कांहीं भाग माफ करण्याचा कायदा केला, तर तो या राष्ट्रपुरुषाच्या देहास लागलेली कीड नाहींशी करण्यास समर्थ होणार नाहीं. म्हणून कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं वरवरच्या दिखाऊ सुधारणा न करितां भरीव योजनाच आंखून पार पाडिली पाहिजे. त्या दृष्टीनें योजनेचें स्वरूप कसें असावें व ती यशस्वी कशी करावी, याबद्दल उपयुक्त विधायक योजना तयार करून ती आज प्रस्तुत पुस्तकरूपानें मंत्रिमंडळापुढें व जनतेपुढें ठेविली आहे.

'कर्जबाजारीपणाचीं मूलभूत कारणें' या प्रकरणांत वाढत्या डोईजड शेतसाऱ्या-

पेक्षांही आम्ही शेतकरी दुसऱ्या अन्य मार्गांनीं त्याच्या किती तरी पट रकमेस बुडत आहोंत, हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; ते मार्ग बंद न करितां निव्वळ शेतसारा कमी केल्यास बचत झालेली रक्कम, त्या बकासुराच्या घशांत पडल्याशिवाय राहणार नाहीं ! म्हणून त्या बाबी ठळक स्वरूपांत पुढें मांडल्या आहेत. शेतसारा डोईजड झाला आहे, तो आकारण्याची पद्धत सदोष आहे.दर तीस वर्षांनीं तो निष्कारण वाढविण्याची प्रथा पडून गेली आहे. याबद्दल आतां कोणाचेंच दुमत राहिलेलें नाहीं. या बाबतींत 'महाराष्ट्र—राष्ट्रसभा' ह्या लोकशक्तीच्या १९३६ च्या खास अंकांतील पुढील उतारा आपणांस उद्बोधक होणारा आहे, म्हणून तो येथें उधृत करीत आहें—

शांततेचा फायदा सरकारनें व सावकारांनीं लाटला !

"पेशवाईच्या अखेरची अंदाधुंदी बंद होऊन कायद्याचें राज्य सुरू झाल्यामुळें जमिनींचें उत्पन्न वाढणें साहाजिक होतें. पण १८३६ सालापासून उत्तरोत्तर जेथें जेथें नवीन पहाणी होऊन नवीन धारा आकारला जाऊं लागला, तेथें तेथें ३० ते ३५ टक्क्यांपर्यंतही सरकारदेणें वाढून, सार्वजनिक शांततेमुळें शेतीच्या उत्पन्नांत जी वाढ झाली असेल, तिच्यापेक्षांही सरकारी उत्पन्नाची वाढ अधिक होऊं लागली. अशा प्रकारें शांततेचा फायदा शेतकऱ्यास न मिळतां सरकारास मिळाला. सरकारपेक्षां सावकारास या शांततेचा फायदा अधिक मिळाला ! सरकारधारा जोईजड झाला व तो भरणें अशक्य झालें, म्हणजे शेत सरकारजमा न व्हावें, म्हणून शेतकऱ्यास सावकाराचें घर पाहावें लागे. लग्नकार्यें वगैरेसाठीं वेळेवर पैसा नसल्यास, शेतकऱ्यास सावकाराचा आश्रय करावा लागे. ब्रिटिश अमलापूर्वीं कायद्याची कदर बेताचीच असल्यामुळें खेड्यांतील सावकारास, ऋणको शेतकऱ्यास फाजील व्याजानें अथवा खोट्या व्यवहारानें पिळून काढणें फारसें शक्य नसे. आपल्या विरुद्ध गांवांत असंतोष माजल्यास सरकार आपलें रक्षण करूं शकणार नाहीं, हें त्यास माहीत असे. आणि वहातुकीचीं मोठीं साधनें व सुरक्षितता बेताची असल्यामुळें, पैसा ह्या धनसंचयसाधनाचें आजच्यासारखें महत्व त्या काळीं नसे. जोंधळे, डाळ, तांदूळ हेंच प्रत्यक्ष धन सांचवावें लागे व तें विनाशी असल्यामुळें साऱ्या गांवास उपाशीं मारूनही धन सांचविण्याची सोय त्या काळीं नव्हती ! ब्रिटिश अमलांत हें सर्व पालटलें; कायद्या-

ची कदर कडवी होऊन कायदेशीर करार अमलांत आणण्यास बलिष्ठ सरकारच्या कायद्याची मदत मिळूं लागली. तसेंच सुरक्षितता व दूरचा व्यापार यांची वाढ होऊन चिरंतन धनसंचयाचें साधन जो पैसा, त्यास महत्व आलें; यामुळें सावकारास खेड्याच्या असंतोषाची मुर्वत राहिली नाहीं व गांठीस पैसा लावावा किती, याच्या लोभास मर्यादा राहिली नाहीं! महाराष्ट्रांत खडकाळ व नापीक जमीन फार, पाऊस कमी, गवत–चाऱ्याचा अभाव आणि शेतकऱ्याचें मूळचें भांडवल कमी; त्यांतच पेशवाईंत मुलुखगिरी करून मिळणारें धन आतां मिळेनासें झालें; यामुळें उपाशीं मरणारा शेतकरी, पोटासाठीं, सरकारधाऱ्यासाठीं, लग्नासाठीं, नाहींतर उत्तरक्रियेसाठीं सावकाराच्या जाळ्यांत–कोंडवाड्यांत अगर खाटिकखान्यांत अडकला व अज्ञानामुळें आणि सावकाराच्या कपटामुळें सावकाराकडून शोषला जाऊन कफल्लक होऊं शकला! १८३६ नंतर नवीन मोजणी, नवीन धारा, कायद्याची कदर हा सगळा संच जसजसा अधिकाधिक क्षेत्रावर पसरत चालला, तसतसा त्या त्या क्षेत्रांतील शेतकरी अधिकाधिक दरिद्री झाला."

कृत्रिम भरभराटीचा फुगा फुटला.

"१८३६ नंतर तीस वर्षांनीं म्हणजे १८६६ सालीं नवी मोजणी, दुसरी साराआकारणी होऊं लागली. या सुमारास जमिनीच्या उत्पन्नाची भयंकर वाढ कृत्रिमपणें झाली होती. अमेरिकेंत त्या वेळीं यादवी होऊन कापसाचें पीक बुडालें व त्यामुळें लँकेशायरला कापसाची तूट पडून हिंदी कापसास भरमसाट भाव आला. अमेरिकेंतील ही यादवी कांहीं ३० वर्षे टिकणारी नव्हती! ती एक वर्षांत संपली! पण कापसाचा भाव वाढल्यानें जमिनीच्या उत्पन्नाची वाढ होऊन तीवर जो नवीन सारा आकारला गेला तो मात्र कायम राहिला! इंदापूर तालुक्यांत ९० टक्के, हवेली तालुक्यांत १०८ टक्के आणि भिमथडी तालुक्यांत १९९ टक्के ही सारावाढ झाली! यावरून सारावाढ दुसऱ्या आकारणीस किती भयंकर प्रमाणांत झाली याची कांहींशीं कल्पना येईल. अमेरिकेचें युद्ध संपून अमेरिकेचा कापूस इंग्लंडला येऊं लागतांच हिंदी कापसाचा भाव एकदम उतरून शेतकऱ्यांचें वैभव, स्पिरिट हवेंत उडून जावें तसें, उडून गेलें! आणि वाढलेला सारा व सावकारदेणें या चरकांत शेतकरी उंसाप्रमाणें पिळला जाऊन

चिपाड बनला! तेव्हां जमीनधारापद्धतीबद्दल जोराची तक्रार सुरू झाली. १८७३ सालीं हिंदुस्थानचे पहिले राजकीय पुढारी दादाभाई नौरोजी, यांनीं हौस ऑफ कॉमन्स सभेच्या कमेटीपुढें साक्ष देतांना मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यास तोंड पाडून लटक्या व अल्पकालीन बाजारभावावर आधारलेली ही साराआकारणी अन्याय्य व जुलमी आहे, असें आपलें मत दिलें. पण सरकारनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. यामुळें व पुढें १८८५ सालीं दुष्काळ पडला त्याचें निमित्त होऊन शेतकऱ्यांत इतका असंतोष भयंकरपणें भडकला कीं, चोहोंकडे दंगे, लुटालूट, जाळपोळ यांना ऊत आला, दरोडे पडून सावकारांची चीजवस्त लुटली गेली; कर्जाच्या दस्तऐवजांची सावकारांच्या देखत होळी झाली व ज्यांनीं विरोध केला त्यांचीं नाकेंही दरवडेखोरांनीं कापिलीं! या दुःखास राजकीय पारतंत्र्य कारण आहे, असें समजून वासुदेव बळवंत फडक्यांनीं त्यांत बंडाचें निशाण फडकावलें!"

अन्याय्य सारावाढ व २५।३० कोटींची बुडवणूक!

सरकारच्या अन्याय्य सारावाढीचा परिणाम काय झाला त्याची स्पष्ट कल्पना ह्या लोकशक्तीमधील उताऱ्यावरून आपल्या लक्षांत येईल. पण त्यावरून सरकारनें बोध न घेतां आपला सारावाढीचा क्रम तसाच बिनदिक्कत चालू ठेविला आहे. १८९६ सालीं पुन्हा साराआकारणी होऊन तरम आकार शें. ३३ टक्कयांनीं वाढला व पुढें महायुद्धानंतर वाढलेल्या बाजारभावाचा आधार घेऊन १९२६ सालीं पुन्हा सारावाढ शें. $33\frac{1}{3}$ टक्कयांनीं केली व वाढलेल्या ऐन साऱ्यावर रुपयास दोन आणे लोकलफंड बसविला, त्यामुळें ही वाढ शें. ५० टक्के झाली! अशा तऱ्हेनें १८९६ पूर्वींच्या साऱ्याची बरोबर शें. १०० टक्कयांनीं वाढ होऊन शेतसारा दुप्पट झाला! आजचा हा डोईजड सारा १८६६ पूर्वींच्या साऱ्याच्या बरोबर तिप्पट झाला आहे! आजचे बाजारभाव १८६६ सालचेच असून सारा मात्र त्याच्या तिप्पट झालेला! अशा परिस्थितींत शेतकरी ऋणग्रस्त कां होणार नाहीं? १९२६।२७ सालीं जमीनसारा दीडपट वाढून दोन वर्षें पुरीं होण्यापूर्वींच मंदीची भयंकर लाट आली. त्यामुळें डोईजड सारा भरणें अशक्य होऊन शेतकरी कर्जसागरांत बुडूं लागला! अशा तऱ्हेनें

वाढलेल्या शेतसाऱ्याचा गेल्या १२ वर्षांतील हिशेब केल्यास तो १५ कोटि रुपये होतो ! हा वाढलेला सारा सावकारांचीं घरें उपसून भरलेला असल्यामुळें, ह्या वाढलेल्या शेतसाऱ्यापायीं या प्रांतांतील शेतकरी व्याजमुद्दलासह २५ ते ३० कोटीच्या कर्जात रुतले गेले आहेत असें म्हटल्यास, तें वस्तुस्थितीस सोडून होईल का ? भाव घटले पण वाढलेला शेतसारा कोठें कमी झाला ?

बिकट प्रश्न

१८९१ सालीं या प्रांताची लोकसंख्या १,५९,८५,२७२ होती, ती १९३१ सालीं २,१८,०८,७५६ झाली, म्हणजे ६० लाखांनीं वाढली ! लोकसंख्या शें. ४० टक्कयांनीं वाढली ! शेतसारा शें. १०० टक्कयांनीं वाढला ! व कर्जबाजारीपणाची वाढ शें. ४०० टक्कयांनीं झाली ! तर बाजारभाव शें. १०० टक्कयांनीं घटून १८९१ सालच्या पातळींत येऊन बसले ! तेव्हां शेतकरीजीवनाचा हा मेळ कसा बसवावा ! कोणत्याही प्रांतिक सरकारला हा मेळ घालणें आज अशक्य होऊन बसलें आहे ! तरम आकार शेंकडा १० टक्कयांपेक्षां कमी करणें अशक्य आहे, असें आमचे काँग्रेस प्रधानदेखील चक्क सांगू लागले ! मग प्रांतिक स्वायत्तता मिळून तरी उपयोग काय ? डोईजड कर जर कमी होत नाहींत, तर शेतकरी जीवन सुखी होणें शक्य नाहीं. याचें पर्यवसान शेवटीं कशांत होणार तें एक परमेश्वरच जाणे ! इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतात, त्याप्रमाणें ह्या दुर्दैवी घटनेंत फक्त दुष्काळाचीच ठिणगी पडण्याचा आज अवकाश आहे ! मग सर्वत्र असंतोषाच्या ज्वाळा भडकण्यास कितीसा वेळ लागेल ? आणि तशी इतिहासाची दुर्दैवी घटना पुन्हां घडून आल्यास !—पण नको ! तो दुःखदायक विचार नको ! अजूनही वेळ गेली नाहीं, तोंच आम्हांला ह्या परिस्थितींत खात्रीनें सुधारणा करतां येईल. वाढलेला $\frac{1}{2}$ सरकारी सारा कमी करितां येईल. डोईजड कर्जभार हलका करितां येईल ! इतकेंच नव्हे तर उद्योगधंद्याचें जाळें अल्प काळांत सर्वत्र पसरवून, वाढत्या लोकसंख्येच्या व बुडत्या जनतेच्या जीवनाचा प्रश्न, सोडविणें अशक्य नाहीं, अशी आपली या पुस्तकाच्या वाचनानें पुरेपूर खात्री होईल. म्हणून वाचकांचें लक्ष मी पुढील भागाकडे आकर्षितों !

योजनेंतील वैशिष्टय !

(१) ' आमचें दारिद्य व ऋणग्रस्तता ' ह्या भागांत स्वातंत्र्यनाशाच्या पोटीं आमच्या पुरातन उद्योगधंद्यांचा झालेला नाश व परदेशीं चाललेल्या द्रव्याचा अखंड सनदशीर ओघ हाच कसा कारणीभूत आहे, याचें विवेचन केलें असून, उद्योगधंद्यांचें ' पुनरुज्जीवन ' कसें करावें हें ' औद्योगिक क्रांति व राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य' या प्रकरणांत स्पष्ट केलें आहे. ती योजना अभिनव असल्यामुळें व परिणामीं चिरंतर यश देणारी असल्यामुळें जनतेनें तिचा सूक्ष्म अभ्यास करावा व प्रांतिक सरकारला आपलें कर्तव्य पार पाडण्यास मदत करावी अशी विनंती आहे. सतराव्या शतकांत इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या शेंकडों व्यापारी कंपन्या एक करून, इंग्लंडनें ' ईस्ट इंडिया कंपनीची ' स्थापना केली व तिच्या द्वारा अलोट पैसा व राज्यलक्ष्मी खेचून नेली, त्याप्रमाणें प्रांतिक सरकारनें वसाहतीच्या द्वारा औद्योगिक क्रांतीचा अखंड ओघ निर्माण करून या भरतभूमीचें ऋण फेडावें व जगानें लुटून नेलेली आजपर्यंतची दौलत पुनरपि खेचून आणावी, अशी ग्रंथकर्त्याची आग्रहाची विनंती आहे. तिकडे प्रांतिक राष्ट्रीय सरकार लक्ष देईल काय ?

(२) ' कर्जबाजारीपणाचीं मूलभूत कारणें ' या प्रकरणांत अशीं मूलभूत कारणें कोणतीं व त्यांवरील तांतडीचे उपाय कोणते याचे अनुभविक बोल उघड केले आहेत. कर्ज देण्याघेण्याच्या बाबतींत कोर्टकचेऱ्यांचें समूळ उच्चाटण कां व कसें करावें तें स्पष्ट केलें आहे. दारूबाजीप्रमाणेंच इंग्रजी अमदानींत कोर्टबाजीचें विष समाजाच्या रोमरंध्रांत भिनून गेलें आहे, तें नाहींसें केल्याशिवाय खेडेगांवांचें शुद्धीकरण वा उद्धार होणें शक्य नाहीं ! ग्रामोद्धार यशस्वी होण्यास समाजांतील कोर्टबाजी अजिबात नष्ट झाली पाहिजे, त्याशिवाय तो होणें शक्य नाहीं. याची खूणगांठ पुढाऱ्यांनीं व कार्यकर्त्यांनीं आपल्या मनाशीं पक्की बांधून ठेविली पाहिजे. या बाबतींत प्रकरण २ मधील विधायक योजना सर्वांनीं जरूर अभ्यासावी व त्यांत इष्ट ते फरक सुचवावेत अशी आग्रहाची विनंती आहे.

(३) 'उत्पन्नांतील गळत्या व त्या बंद करण्याचा मार्ग' हा शेतकरी जीवनांतील अत्यंत महत्वाचा भाग कसा सोडवावा तें स्पष्ट केलें आहे. या कामीं

प्रांतिक सरकारचें कर्तव्य स्पष्ट केलें आहे. दुष्काळाची वाट पाहात न बसतां, तो पडल्यास त्याच्या बंदोबस्ताचे उपाय आगाऊच कसे योजिले पाहिजेत तें साधार दाखवून दिलें आहे. कापूस, ज्यूट, शेंगदाणा यांचें जरूरीपेक्षां जास्ती क्षेत्र कमी करून, तर प्रसंगीं त्या क्षेत्रांत धान्याची निपज वाढवून, तसेंच सुधारलेल्या पद्धतीनें शेतीचें उत्पन्न वाढवून धान्याच्या खंडोगणती राशि निर्माण केल्या पाहिजेत. हें जास्त झालेलें धान्य प्रांतिक सरकारांनीं ठिकठिकाणीं खरेदी करून, गांवच्या धान्यकोठारांत भरून ठेवण्याचा व लोकांच्या गरजेच्या वेळीं त्यांना तें वाढीनें घालण्याचा उपक्रम सुरू केला पाहिजे. या योजनेनें दुष्काळाचें उग्र स्वरूप पालटेल व मृत्यूच्या तडाख्यांतून प्रजा वाचवितां येईल ! शेतकऱ्यांच्या आर्थिक बजेटास कांहीं तरी स्थिरपणा येणें आवश्यक आहे. त्याकरितां कच्च्या मालाचे भाव त्याला परवडतील असे निश्चित करून देणें, कायद्यानें क्रमप्राप्त झालें आहे. जर आंतरराष्ट्रीय बाजारभाव नियंत्रित होत नसतील, व बाजारांतील मंदीची लाट कमी होत नसेल, तर कच्च्या मालाची निपज कमी करून, तर शेतीस जोडधंदे देऊन त्यास पक्क्या मालाचें स्वरूप देण्याचा—प्रचंड उद्योग—प्रांतिक सरकारनीं करावयास पाहिजे. त्या दृष्टीनें जोडधंद्यांची उभारणी कशी करावी व त्यांचा प्रसार झपाट्यानें कसा करावा याचें साधार विवेचन केलें आहे. या कामीं आंखलेली योजना मंत्रिमंडळास मार्गदर्शक झाल्याशिवाय राहाणार नाहीं. देशांतील शें. ८० लोक — ३० कोटि प्रजा निवळ शेतकरी बनली असून, नुसत्या शेतीवर अवलंबून आहे ! त्यामुळें अनिश्चित शेतीप्रमाणें त्यांचें जीवनही अनिश्चित बनलें आहे ! त्यांत निश्चितपणा आणणेसाठीं त्यास जोडधंद्यांची मदत देणें जरूर आहे. या प्रकरणांतील योजनेनें शेतकरी सुखी व संपन्न होईल. त्यामुळें राष्ट्रीय उद्योगधंद्यांचा प्रश्न आपोआप सुटेल. ही योजना पूर्ण व्यावहारिक स्वरूपाची असल्यामुळें मंत्रिमंडळास ती अमलांत आणण्यास सुलभ जाणार आहे.

(४) 'ऋणविमोचनाचा कायदा' हा या योजनेंतील मुख्य घटक भाग होय ! ही योजना ग्रामपंचायतींच्या द्वारें सर्वस्वी पार पाडावयाची असल्यामुळें, ग्रामपंचायतीची घटना कशी असावी तें अत्यंत विचारपूर्वक स्पष्ट केलें आहे. ग्रामसंस्था हें महाराष्ट्रांतील प्राचीन लोकसत्तेचें बीज होय ! खेड्यांतील ही

लोकशाही पेशवाईअखेर चांगल्या प्रकारें अस्तित्वांत होती ! तें खेड्यापुरतें स्वराज्य होतें ! कितीही राज्यक्रांत्या होवोत, कसलाही दुर्जन राजा येवो, त्याची झळ ह्या लोकसत्ताक स्वराज्यनगरास–खेड्यास लागत नसे ! राजाचा खंड भागविण्यापुरता तिचा संबंध मुख्य सत्तेशीं यावयाचा ! त्यांच्या दैनंदिन कारभाराशीं राजसत्तेचा संबंध क्वचितच यावयाचा ! बारा बलुते निर्माण करून, तसेंच प्रत्येक जातीस विवक्षित धंदा देऊन संपत्तीचा प्रवाह समाजाच्या सर्व थराथरांतून समप्रमाणांत खेळविला जात असे ! जातीजातींतील कर्ते पुरुष एकत्र होऊन त्यांच्या पंचायती बनत. गांवांतील न्यायनिवाड्याचीं कामें करणें व गांवाचें संरक्षण व संवर्धन करणें हीं महत्त्वाचीं कामें ह्या पंचायती करीत होत्या. परंतु इंग्रज राज्यकर्त्यांनीं ह्या ग्रामसंस्था मोडून टाकून सर्व राज्यकारभार आपल्या लोकांच्या हातांत घेतले. त्यामुळें खेडयांतील कर्तृत्वशक्ति पार लयास गेली ! उद्योगधंद्यांचा नाश झाला ! कोर्टबाजीनें त्यांच्यांत बजबजपुरी माजवून त्यांचें दैनंदिन जीवन गढूळ–पापमय करून सोडलें ! खेडयांत शास्ता कोणीच राहिला नाहीं ! गावगुंडीस ऊत आला ! सामाजिक निर्बंध ढिले झाले ! कोणी कोणास जुमानीसा झाला ! अशा तऱ्हेनें हजारों वर्षें सुखासमाधानानें व पूर्ण स्वातंत्र्यानें तळपणाऱ्या खेडेगांवांचें पूर्ण तळपट उडालें ! समाजाचीं शकलें शकलें उडालीं ! प्रत्येक गांवागांवांतून, पेठेपेठेंतून, बोळाबोळांतून तट, पार्ट्या निर्माण झाल्या ! बेकीचें साम्राज्य निर्माण झालें ! व नैतिकदृष्ट्या समाज घसरगुंडीस लागला ! समाजांतील नीतिमत्ता नष्ट झाल्यास त्या समाजाच्या ठिकऱ्याठिकऱ्या उडण्यास कितीसा वेळ लागेल ?

प्राचीन सम्राटांच्या काळांतील ग्रामपंचायती.

" पूर्वींचा इतिहास पाहातां आपल्या देशांत ह्या संस्था चांगल्या प्रकारें चालल्या होत्या. मौर्य घराण्यांतील चंद्रगुप्त, अशोक, बिंदुसागर वगैरे सम्राटांच्या कारकीर्दींत स्थानिक संस्था योग्य प्रकारें काम करीत होत्या. त्या संस्थेकडे आरोग्य, सडका, विहिरी बांधणें, शिक्षणाचा प्रसार करणें, एवढेंच नव्हे, तर धंद्याच्या रक्षणाकरितां औद्योगिक खातें, जनतेच्या रक्षणाकरितां पोलिस खातें, परदेशी लोकांचें रक्षण करणें वगैरे महत्त्वाचीं व राष्ट्रोपयोगीं कामें असत ! हीं कामें व्यवस्थितपणें वल्हविलीं जात असत, असा दाखला पाहावयास सांपडतो.

ब्रिटिश अम्मल सुरू होण्याच्या आधींसुद्धां हेंच आढळून येतें. एलफिस्टन-साहेबांसारख्या जबाबदार ब्रिटिश अधिकाऱ्यांनींसुद्धां ग्रामपंचायतीसंबंधीं प्रसंशोद्गार काढिले आहेत. यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं, ह्या संस्था आपल्याला नव्या नाहींत. असें असतां ब्रिटिश अमलांतच हे अधिकार सांभाळण्यास आम्ही नालायक कसे ठरलों ?"
(महाराष्ट्र सांवत्सरिक, १९३४.)

शेतकऱ्यांच्या स्वराज्याचा अंत ! इंग्रज मुत्सद्यांचा अभिप्राय.

"पेशवाई बुडाल्यानें पुण्यांतलें पेशव्यांचें राज्य गेलें, त्यापेक्षां खेडयांतलें शेतकऱ्यांचें स्वराज्य गेलें, ही गोष्ट शेतकऱ्यांच्या दृष्टीनें विशेष नुकसानीची झाली. हें खेडयांतलें स्वराज्य म्हणजे प्राचीन कालापासून येथें रूढ असलेल्या ग्रामसंस्था होत ! पेशव्यांपासून महाराष्ट्र जिंकणारा प्रख्यात सेनापति व ब्रिटिश मुत्सद्दी एलफिस्टन लिहितो, 'या ग्रामसंस्थांत लहान प्रमाणांत राज्यसंस्थेचीं (लोकशाहीचीं) सर्व साधनें विद्यमान असून, इतर सर्व प्रकारचा बाहेरचा राजकीय अंमल जरी नष्ट झाला तरी या साधनांनीं या छोट्या राज्यांतील नागरिकांचें संरक्षण सहज होऊं शकें."

कॅप्टन राबर्टसन् हा पुण्याचा एक अधिकारी लिहितो—

"खेड्याचा प्रमुख म्हणजे पाटील. हा सरकारी नेमणुकीनें तसाच लोकमतानुसारही गांवचा मॅजिस्ट्रेट असतो. गांवचा प्रमुख या नात्यानें आपला दर्जा सांभाळण्यासाठीं व ग्रामसंस्थेचा कारभार चालावा यासाठीं तो पूर्वीं कर उभारी, ग्रामसंस्थेच्या सुधारणेचे उपाय तो सुचवी व सार्वजनिक शांतता ठेवण्यासाठीं खेड्यांतील खेडुतांवर हुकमत गाजवी. पंच म्हणून त्याच्याकडे कोणी मुलकी दावे घेऊन गेल्यास, कुटुंबांतील वडील माणसाप्रमाणें तो तंटे तोडी."

ब्रिटिश अमलांत ग्रामपंचायतीची इतिश्री !

"ब्रिटिश अम्मल सुरू झाल्यानंतरच्या पहिल्याच पिढींत सरकारनें या ग्रामसंस्थांचे सर्व अधिकार रद्द करून न्याय व राज्यकारभार हीं खातीं सरकाराकडे घेतली व स्वायत्ततेचें हें बीज भाजून टाकिलें ! सरकारचा हेतु यांत उघड होता. जी पेशवाई जिंकली त्या पेशवाईचें बोट खेड्यांतील ग्रामसंस्थांच्या स्वायत्ततेंत फारसें कधींच शिरलें नव्हतें. त्यामुळें नुकतेंच पुण्यांतलें पेशव्यांचें राज्य जिंकल्या-

नें सगळा महाराष्ट्र जिंकला असें होत नव्हतें ! महाराष्ट्रांतलें सारें धन पुण्यांत नसून खेड्यांत होतें. खेडीं जिंकल्यावांचून राजकीय अम्मल रद्द करणें व आर्थिक पिळवणूक शिस्तशीर व सतत चालू ठेवणें शक्य नव्हतें. खेडीं जिंकण्याचा एकच मार्ग म्हणजे ग्रामसंस्था मोडून टाकून प्रत्येक खेडुताचें जीवित प्रत्यक्ष परकीय सरकारच्या अम्मलदारांच्या हातीं देणें हाच होता ! तो ब्रिटिश सरकारनें अनुसरला व ग्रामसंस्थांची इतिश्री झाली ! त्या वेळेपासून खेडीं हीं फुटीर व तंट्याबखेड्यांचीं माहेरें झालीं असून, त्यामुळें न्यायकोर्टाचें उत्पन्नहि वाढलें आहे, व सरकारी अधिकाऱ्यांची खुशामत करून गांवगुंडी करणारांचें प्रस्थ खेड्यांत अधिक झालें! स्वायत्त संघटना मोडण्यानें खेड्यांचा हा जो नैतिक ऱ्हास झाला तो फार भयंकर असून, या स्वायत्त संघटना पुन्हा सुरू करण्यावांचून तो कशानेंही भरून निघणार नाहीं; ग्रामसंस्था नष्ट करून महाराष्ट्रीय शेतकऱ्यांचा जसा राजकीय मृत्यु ओढवला, तसाच शेतकऱ्यांचा जमिनीवरील मिराशी हक्क बुडवून ब्रिटिश अमलानें शेतकऱ्यांचा आर्थिक मृत्यु घडवून आणिला आहे." (लोकशक्ति—राष्ट्रसभा अंक, १९३६)

"इकडील शेतकरी इतर प्रांतांच्या तुलनेनें पाहातां आपल्या गांवांत राजाप्रमाणें नांदत होते. त्यांचीं ग्रामराज्यें म्हणजे लोकशाहीचीं छोटीं राज्यें होतीं ! तीं मोडण्याची युक्ति इंग्रजांपूर्वींच्या सम्राटांना लाभली नव्हती. इंग्रजांनीं या शेतकरी राज्यांचा आर्थिक व राजकीय पायाच उखडून काढला ! आपल्या राज्ययंत्रांत ग्रामपंचायतीला त्यांनीं स्थानच उरूं दिलें नाहीं ! याच्याहीपेक्षां दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे खुल्या व्यापाराचें नवें व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि यंत्रनिर्मित विलायती मालाची अनिर्बंध आयात यांच्या योगानें—

शेतकरी राज्याचा पायाच उखडला गेला !

वाटेल त्या लुटारूनें यावें आणि मोहक मालाचें दुकान मांडून शेतकऱ्यांच्या द्रव्याचा अपहार करावा, असला खुला व्यापार पूर्वींच्या ग्रामसंस्थेच्या अमदानींत नव्हता. तो आतां सुरू झाल्यानें स्वदेशी साम्राज्याच्या व सरंजामी पद्धतीच्या युगांतही, जो मराठा शेतकरी वर्ग आपलें राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य कायम टिकवून होता, तोच शेतकरी वर्ग आज दुकानदार, सावकार व जमीन-

मालक यांच्या आर्थिक दास्यांत जाऊन परकीय साम्राज्यशाहीच्या व भांडवलशाहीच्या हस्तकांचा सर्वस्वी गुलाम बनला ! ”

अशा तऱ्हेनें आमची स्वराज्यसंस्था मोडून उणींपुरीं शंभर वर्षे झाल्यामुळें त्या पद्धतीचा आम्हांस विसर पडला आहे. ग्रामपंचायतीच्या हातीं सत्ता देण्यास समाज साशंक बनला आहे ! ग्रामपंचायतीच्या पुनर्घटनेबद्दल सर्व प्रांतिक सरकारांचा प्रयत्न चालला असल्यामुळें, त्यांना ही पुढील योजना मार्गदर्शक झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

ग्रामपंचायत ही खेडेगांवाच्या उद्धाराची प्रेरक शक्ति आहे !

म्हणून तिचा कौशल्यानें कसा उपयोग करून घ्यावा, हें ह्या योजनेंत स्पष्ट केलें आहे ! ग्रामपंचायती ह्या आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे बालेकिल्ले होत ! ह्या देशांतील ३० कोटि लोक ७॥ लक्ष खेड्यांतून राहात असल्यामुळें, ह्या किल्ल्यांची उत्तम तऱ्हेनें डागडुगी करण्यावरच पूर्ण स्वातंत्र्याची वेळ नजीक आणली जाणार आहे. म्हणून ह्या पंचायतींची रचना निर्दोष करून त्या बलिष्ठ करण्याचा प्रयत्न कांग्रेस मंत्रिमंडळानें केल्यास देशाचा भाग्यकाल दूर नाहीं.

आज प्रांतिक स्वायत्ततेच्या रूपानें बरीचशी सत्ता आपले हातीं आली आहे, तिचा सदुपयोग कसा करून घ्यावा ह्या दृष्टीनें रात्रंदिवस विचार करून हें विचारामृत जनताजनार्दनापुढें ठेविलें आहे. तें परीक्षून घेण्याचें काम ती करील यांत बिलकूल शंका नाहीं.

वादग्रस्त टेनन्सी बिल

(५) आज कौन्सिलांत कॉंग्रेस पक्षातर्फें पुढें आलेल्या जमीनदार व खंडकरी यांच्या हक्कसंबंधांत फेरफार करण्यासाठीं ह्या बिलाचा जन्म झाला आहे. ह्या बिलावर इतका भयंकर वाद माजला आहे कीं, तो पाहून मति गुंग होऊन जाते ! जो उठतो, तो बिलाची तरफदारी वा चिरफाड करीत आहे ! परंतु सर्वसंमत सुधारणेचा मसुदा कोणीच पुढें ठेवीत नाहीं. त्यामुळें अधिकाधिकच गोंधळ माजत चालला आहे ! म्हणून सावकार, जमीनदार व खंडकरी यांचे संबन्ध कसे असावेत, हें ऋणविमोचनाच्या कायद्यांत स्पष्ट केलें आहे. त्यामधील तत्वें हींच समाजधारणेस कशीं उपयुक्त आहेत, तें कळून येईल. या

कायद्यानें शेतकऱ्यास हवें असलेलें दीर्घ मुदतीचें (एका पिढीचें) संरक्षण मिळणार असून, जमीनदारांचा जमिनीवरील पुरातन हक्क कायम ठेविला आहे. तसेंच जमीन सुधारणेसंबंधीं न्याय्य बोजा परस्परांवर ठेवला असून, तिच्या भर-भराटीसाठीं प्रत्येकास भरपूर वाव ठेविला आहे. त्यामुळें जमीनदार व त्यांचीं कुळें यांची दिलजमाई होऊन आर्थिक भरभराटीस उत्तेजन मिळणार आहे ! म्हणून त्या बहुलाभदायी घटनेकडे मंत्रिमंडळाचें व सिलेक्ट कमेटीचें लक्ष मी वेधूं इच्छितों !

लोकमान्यांच्या केसरीचे खडे बोल

टेनन्सी बिलासंबंधीं केसरीचे विद्वान् देशभक्त संपादक श्रीयुत तात्यासाहेब करंदीकर आपल्या दिवाळीच्या खास अंकांतील अग्रलेखांत म्हणतात कीं, " शेतकऱ्यांच्या दुःखनिवारणाचे चालू प्रयत्न हे केवळ मलमपट्टीसारखे वर-वरचे उपाय होत ! त्यायोगानें रोगाचें समूळ उच्चाटन होणार नाहीं शेतांत पीक अधिक येणें आणि त्या पिकाला भाव अधिक येऊन, त्यांतली अधिकांत अधिक रक्कम शेतकऱ्यांच्या हातांत पडणें, हाच शेतीच्या भरभराटीचा निकष होय ! परंतु मुंबई प्रांतिक सरकारनें खोती बुडवा, जमीनदारी नष्ट करा, माल-कांचा हक्क संपुष्टांत आणून कुळांना कायमचा भाडेपट्टा द्या, इत्यादि जे विचार चालविले आहेत, त्या योगानें शेतीची सुधारणा होणें शक्य दिसत नाहीं ! या योगानें शेतजमीनीला खत अधिक मिळणार नाहीं. गुरांची अवलाद सुधारणार नाहीं. जमिनीची मेहनत अधिक कसोशीनें होणार नाहीं आणि पिकाला चढता भाव येण्याचा तर यांत संभवच दिसत नाहीं ! मात्र या नव्या योजनेनें, दत्तक दिलेल्या लहान मुलाची जशी आबाळ होते, तशी शेतीची आबाळ होईल ! शेतांचे मालक हे यापुढें नुसते नांवाचेच धनी राहाणार असल्यामुळें, त्यांना आपल्या जमिनींत भांडवल गुंतवून सुधारणा करण्याइतकी आपुलकी वाटणार नाहीं; आणि कुळें कायम राहिलीं तरी तीं कुळेंच ! त्यांना आपलेपणाचें प्रेम येणें शक्य नाहीं ! सुधारणा करावयाला स्वतःचें भांडवल नाहीं, आणि कुळा-कुळांतील चढाओढ नष्ट झाल्यानें अधिक परिश्रम करण्याविषयीं कशाचीहि टोचणी नाहीं ! अशा स्थितींत शेतीची उन्नति होईल का अवनति होईल, हें कल्पनाशक्तीनें आजही सांगतां येईल आणि पांच दहा वर्षांत अनुभवानेंही तेंच

सिद्ध होईल आणि मग

पुनश्च दुसरा एखादा नवा प्रयोग सुरू होईल!

अशा प्रकारें स्वतःला ठेंच लागेपर्यंत सावध व्हावयाचें नाहीं, असली आंधळी वृत्ति न स्वीकारतां पुढारलेल्या राष्ट्रांनीं शेतीच्या सुधारणेसाठीं केवढे आटोकाट प्रयत्न चालविले आहेत, त्याची माहिती करून घेऊन त्या दिशेनें जमीनदार, मालक व खंडकरी या सर्वांनाच त्यांच्या त्यांच्या परीनें प्रोत्साहन देऊन सर्वांच्या सहकारितेनें शेतीची सुधारणा करण्याची तजवीज केल्यास, ती श्रेयस्कर होणार नाहीं काय? जमीनदार व खंडकरी हे परस्परांचे शत्रु मानून त्यांच्यांत कायमचा विरोध वाढविल्यानें शेतीची उन्नति होणार नसून, उभयतांचे संबन्ध प्रेमाचे राखून शेतसुधारणेचा लाभ उभयतांना सारखाच मिळेल अशीं संयुक्त योजना केल्यास ती हितप्रद होईल. याकरितां परस्परांत अशी सहकार्याची भावना वाढीस लावणें हाच खरा उन्नतीचा मार्ग होय."

(केसरी, दिवाळी अंक १९३८)

महाराष्ट्रांतील एका अत्यंत वजनदार व प्रथितयश पत्रांत—केसरींत—अपेक्षा केल्याप्रमाणेंच, मीं प्रस्तुत पुस्तकांत दिलेलें बिल आहे, अशी सर्व वाचकवर्गाची पूर्ण खात्री होईल.

सावकारनियंत्रण बिलाचें स्वरूप

(६) सावकारनियंत्रण बिल अजून गर्भांतच आहे! त्याच्या प्रसूतीची वेळ जवळ आली असल्यामुळें सर्व जनता मंत्रमुग्ध झाली आहे! हें बिलही असेंच भयंकर वादग्रस्त असल्याचीं चिन्हें प्रांतिक सरकारच्या हालचालींवरून दिसत आहेत! प्रत्यक्ष शेतींत राबणारालाच शेतकरी समजून त्याला या बिलाचा फायदा देण्याचा सरकारचा हेतु दिसतो! निव्वळ शेतीवर पोट भरणें दुर्घट झाल्यामुळें पुष्कळ शेतकरी वर्गांतील माणसें शहरांत जाऊन गिरणींत, खाणींत अगर नोकरी पेशांत काम करीत आहेत. हा वर्गही कर्जबाजारी आहे! त्यास या बिलाचा फायदा होऊं नये असा सरकारचा हेतु दिसतो. उद्यां एखाद्या शेतकऱ्याचा एखादा मुलगा नोकरींत शिरला, दुसरा व्यापारांत शिरला, तिसरा खाणींत अगर गिरणींत काम करूं लागला तर त्यांचें शेतकरीत्व नष्ट करावयाचें

काय ? सरकारला सारा भरणाऱ्या जमीनमालकाला कायद्याचा फायदा देतांना तो प्रत्यक्ष जमीन कसणारा आहे कीं न कसणारा आहे, हा भेद ठेवण्याचा हेतु कोणता ? प्रत्यक्ष जमीन कसणारा हा सरकारला जास्त सारा देत असतो का ? असा सापत्नभाव ठेवणें, राष्ट्रीय सरकारास लांछनास्पद नाहीं का ? अशा विषम वागणुकीमुळेंच राष्ट्रांत बेकीचें बीज निर्माण होतें व केलेल्या सुधारणा निर्माल्यवत् ठरतात. १८८९ सालीं डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट नांवाचा कायदा करून सावकारीवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला, पण तो कितीसा साधला ? त्यामुळें योग्य तारणावांचून सावकार व्यवहार करीनासे झाले व कागदोपत्रीं व्यवहार पक्के करूं लागले. त्यामुळें सावकाराचा चाप शेतकऱ्यास घट्ट होऊन, ह्या कायद्याचा उपयोग त्यानंतरच्या काळांत शेतकऱ्यास फारसा कधींच होऊं शकला नाहीं ! म्हणून प्रधानमंडळांनीं असा पंक्तिप्रपंच करूं नये. नाहीं तर

‘ धन्याला धत्तुरा व चाकराला मलिदा ’

मिळून कर भरणारा वर्ग नेहमींच सरकारवर असंतुष्ट राहावयाचा ! ऋणविमोचनाच्या पुढें दिलेल्या कायद्यांत हा दोष काढून टाकला असून, जमीन धारण करणारा व ती कसणारा यांची सोय उत्तम तऱ्हेनें लावून दिली आहे. जमीन धारण करणाराला समाजांत जें कर्ज मिळतें, तें तो जमीन प्रत्यक्ष कसतो किंवा नाहीं, हा विचार करून दिलें जात नाहीं. तर जमीनीचा मगदूर व तरम आकार पाहून तिच्या तारणावर जबाबदारीनें दिलें जातें. जमिनीवर पोट भरेना म्हणून आपली जमीन दुसऱ्यास खंडानें लावून अन्य व्यवसाय केला तर तो दोष होईल का ? पण राष्ट्रीय सरकारची वृत्ति सुद्धां विपरीतच झालेली दिसते ! शेतकऱ्यांचा मोठा कळवळा आणून असा जमीनदार वर्ग तसाच कर्जांत मरूं देण्याचा प्रधानमंडळाचा हेतु दिसतो ! पण ही गोष्ट समता व बंधुभाव धारण करणाऱ्या राष्ट्रीय प्रधानमंडळास मुळींच शोभत नाहीं ! त्यामुळें कॉंग्रेस आपलें वजन व बहुमत गमावून बसेल असें मला नम्रभावानें सुचवावेंसें वाटतें !

(७) ‘ऋणविमोचनाचें राष्ट्रीय स्वरूप’ या चौथ्या प्रकरणांत ह्या कर्जांची सर्व जबाबदारी सरकारनें शिरावर घेऊन पार पाडणें कसें जरूर आहे तें स्पष्ट

केलें आहे. ऋणविमोचनाचीं दहा तत्त्वें प्रधानमंडळांनीं जरूर विचारांत घ्यावींत, म्हणजे हा प्रश्न त्यांना सुलभतेनें सोडवितां येईल. सर्व राष्ट्र कर्जातून मुक्त होईल असा व्यापक कायदा केल्याशिवाय राष्ट्रीय स्वातंत्र्याची वेळ जवळ आणली जाणार नाहीं. म्हणून राष्ट्रीय सरकारनें संकुचित भावना न धरतां व्यापक तत्त्वावर आपल्या कार्याची उभारणी करावी अशी विनंती आहे.

अभिनव मार्ग !

(८) 'औद्योगिक क्रांति व राष्ट्रीय सरकारचें परम कर्तव्य' हा भाग अभिनव असल्याचें दिसून येईल. त्यायोगें बेकार तरुणांच्या मार्फत कोट्यवधि रुपयांचें धन अल्प काळांत जमा होऊन, धंद्यांची उभारणी होईल. अशा धंद्यांतून काम करणारा वर्ग स्वावलंबी, स्वतंत्र व कार्यक्षम राहील. अशा औद्योगिक वसाहतीच जगाच्या चढाओढींत टिकाव धरूं शकतील. अशा हजारों वसाहतींना एकजूट करून आपल्या स्वतःच्या आगबोटी ठेवून, आयातानिर्गतीच्या व्यापाराची वाहतुक करतां येईल. त्यामुळें बाहेरदेशीं जाणारें ४०।५० कोटींचें धन—भाडें—संपादन करतां येईल. म्हणून या चिरंतन यशाच्या मार्गाचा अवलंब प्रांतिक सरकारांनीं केल्यास पुढील १०।१५ वर्षांतच आम्ही जगाच्या औद्योगिक क्रांतींत पुढें आल्याशिवाय कसे राहूं ? जपानचा औद्योगिक उत्कर्ष गेल्या ५०।६० वर्षांतीलच आहे. वसाहतींच्या द्वारा आमची औद्योगिक संघटना झाल्यास, औद्योगिक उन्नतीचें शिखर गांठण्यास आम्हांस तितकाही अवकाश लागणार नाहीं. अशा वसाहतींमधून कोट्यवधि रुपयांचें राष्ट्रीय धन निर्माण होईल. आणि तसें घडून आल्यास—आणल्यास—आम्ही सुवर्णभूमीचे सुपुत्र आहोंत असें जगास बाहु उभारून दाखवितां येईल !

' क्रांतिकारक बजेट '

(९) या सहाव्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें करयोजना आकारल्यास शें. ८० इतका बहुजनसमाज कॉंग्रेसचा निस्सीम भक्त बनेल. दारिद्र्यांतल्या दरिद्री खोपट्यांतूनसुद्धां कॉंग्रेसचा जयजयकार होऊं लागेल ! राष्ट्रसंवर्धक बाबीस लागणारें कोट्यवधि रुपयांचें धन विनाकष्ट (श्रीमंतांच्या भावना न दुखवितां) हातीं येऊं लागेल. श्रीमंतांवर भरमसाट कर बसवून कॉंग्रेस त्या वर्गाचें पाठबळ

गमावीत आहे, त्या आपत्तींतून तिची मुक्तता होईल. ह्या करयोजनेनें राष्ट्रांतील प्रत्येक घटक बलवान, सुखी व संपन्न होईल. त्यामुळें कॉंग्रेसविषयींचा आदर शतगुणित होऊन ती संस्था अत्यंत बलिष्ठ होईल. अशा बलिष्ठ संस्थेस पारतंत्र्याचें कवच फेकून देण्यास कितीसा वेळ लागेल ? राष्ट्रीय प्रधानमंडळ, देशांतील कर्तबगार पुढारी, विद्वान वाचकवर्ग, कौन्सिलांतील आमदार व नामदारसाहेब, ह्या बहुलाभदायी घटनेकडे आपुलकीच्या व स्वोन्नतीच्या भावनेनें पाहातील काय ?

माझ्या या विचाराला प्रथम केसरीचे विद्वान देशभक्त संपादक श्री. तात्यासाहेब करंदीकर व बाबुराव गोखले यांनीं आपल्या दिवाळीच्या खास अंकांत विस्तृत स्थान देऊन प्रकाशांत आणिलें—नव्हे गौरविलें, याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. लोकमान्यांच्या प्रथितयश केसरींत मिळालेल्या या विस्तृत स्थानामुळें ते विचार पुस्तकरूपानें पुढें आणण्याची स्फूर्ति उत्पन्न झाली. हें केसरीनें केलेलें कार्य फार मोठें असल्यामुळें, त्या पत्राचा येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं.

'चित्रमय जगत्' या मासिकाचे विद्वान देशभक्त संपादक श्रीयुत देवगिरीकर, यांनीं सन १९३० मध्यें ' चित्रमय जगत्चा खास औद्योगिक अंक ' काढून केलेलें राष्ट्रकार्य फार मोठें आहे. आमच्या पूर्वजांचा औद्योगिक उत्कर्ष कंपनी सरकारला कसा सहन झाला नाहीं व त्यामुळें येथील धंद्यांचा नाश त्यांनीं कोणकोणत्या मार्गांनीं केला याचें साधार सुबोध केलेलें वर्णन वाचून, वाचकांचीं मनें पिळवटून निघाल्याशिवाय राहात नाहींत. तरुणांच्या अंतःकरणांत खळबळ उडवून देणारें व त्यांचें लक्ष नोकरी पेशावरून औद्योगिक बाबीकडे वळविणारें असें हें लिखाण असल्यामुळें, तें पुस्तकरूपानें छापून, त्याच्या लाखों प्रती आम्हां तरुणांच्या हातांत कशा पडतील याचा विचार सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं केल्यास ' औद्योगिक क्रांतींत ' सर्व सुशिक्षित तरुण वर्ग ओढल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून तशा तऱ्हेचा व्यापक प्रयत्न करून पाहावा अशी संपादकमहाशयांस माझी विनंती आहे.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं आचार्य, काकासाहेब कालेलकर यांचें ' हिंद-

लग्याचा प्रसाद ' हें पुस्तक फार उपयोगी पडलें. त्याच्या वाचनानें माझ्या सुप्त मनोवृत्ति जागृत झाल्या व त्याला महाराष्ट्रांतील केसरी, लोकशक्ति, नवाकाळ, ज्ञानप्रकाश, चित्रमय जगत्, किर्लोस्कर इत्यादि पत्रांतील विचारांचें खतपाणी मिळून, ते विचार पुस्तकरूपानें आज पुढें येत आहेत. त्यांत माझें स्वतःचें असें कांहीं नाहीं. राष्ट्रकार्याकरितां वाहून घेतलेल्या असंख्य देशभक्तांनीं व संपादक महाशयांनीं आजपर्यंत लोकजागृतीचें केलेलें कार्य फार मोठें असल्यामुळें त्यांच्या कार्याचें व विचारजागृतीचेंच प्रतिबिंब ह्या पुस्तकांत सर्वत्र उमटलेलें दिसेल ! म्हणून महाराष्ट्रांतील सर्व दैनिकें, साप्ताहिकें व मासिकें इत्यादि सर्व वृत्तपत्र-व्यवसायी लोकांचा व ग्रंथकारांचा लेखक अत्यंत ऋणी आहे !

महत्वमापन.

या ग्रंथाचें तात्विक नि व्यावहारिक समालोचन ऊर्फ ' महत्त्वमापन ' कऱ्हाड येथील सुप्रसिद्ध कॉंग्रेस देशभक्त श्री. पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबुराव गोखले यांनीं केलें आहे. तें किती मार्मिक व वस्तुस्थितिनिदर्शक झालें आहे, तें सुज्ञ वाचक ठरवितीलच ! श्री. बाबुराव गोखले ह्यांची ओळख महाराष्ट्राला—निदान सातारा जिल्ह्याला तरी करून देण्याची आवश्यकता नाहीं, इतके ते सर्व-विश्रुत आहेत. विश्वविद्यालयाचे पदवीधर, सरस्वतीचे आजन्म निस्सीम उपासक, उज्वल ध्येयनिष्ठा, नितांत कार्यतत्परता, शुद्ध चारित्र्य, अमोघ वक्तृत्व व देशासाठीं प्रसंगीं सर्वस्व अर्पण करण्याची अनुपमेय धडाडी इत्यादि उच्च गुण-समुच्चयांनीं, आज ते या जिल्ह्यांतील तरुणांचे कलिजे बनले आहेत, ही गोष्ट आतां सर्वांच्या पुरेपूर अनुभवास येऊन गेलीच आहे. श्रीयुत नामदार भाऊसाहेब सोमण यांच्या ' लोकसेवा संस्थेचे ' ते प्रचारक असून, गेल्या दोन वर्षांत प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाशीं समरस होण्याची त्यांना जी संधि मिळाली, त्यामुळें ' प्रत्यक्षानुभवाची कसोटी ' त्यांना आली असल्यामुळें, ' शेतकरी ऋण-विमोचनाच्या ' अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर अधिकारवाणीनें दोन शब्द लिहिण्याची त्यांची योग्यता किती थोर आहे, हें सुज्ञ वाचकांस निराळें सांगावयास नकोच ! श्री. बाबुराव गोखले हे आम्हां तरुणांस गुरुस्थानीं होत. कारण त्यांच्या निकट सहवासांत जरी थोडा वेळ राहण्याचा योग आला, तरी तेवढ्या थोड्या वेळांतही ते साक्रेटिसाप्रमाणें, तरुणांचीं मनें भारल्याशिवाय कधीं राहात

नाहींत, याचा अनुभव माझ्याप्रमाणें इतरांनाही येऊन गेलेलाच असेल! तेव्हां अशा थोर व्यक्तीकडून 'महत्त्वमापन' ठरवून घेण्याचा सुयोग प्रस्तुत लेखकाला आला, याबद्दल आनंद वाटत आहे. त्याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावेत तें कळत नाहीं.

श्रीयुत गोखले यांनीं, गेल्या १००–१२५ वर्षांतील सातारा जिल्ह्यांतील चळवळींचा लिहिलेला इतिहास—जागृत सातारा—माझ्या म्हणण्याची साक्ष देईल. त्यांनीं सार्वजनिक आयुष्यक्रमांत पदार्पण केल्यास उणींपुरीं १२ वर्षें झालीं असल्यामुळें, **तपश्चर्येचें बळ** त्यांच्या पाठीशीं आज उभें आहे! **त्यांची वैचारिक भूमिका**, त्यांनीं गेल्या १२ वर्षांत ठिकठिकाणीं दिलेल्या व्याख्यानांवरून—'**बोलबाला**' ह्या त्यांच्या व्याख्यानपत्तिशीवरून कळून येईल. इतिहासप्रसिद्ध **बापू गोखल्यांच्या घराण्यांत**, आज महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं चमकणारी व चमकून गेलेली **गोखले मंडळी** पाहिली, म्हणजे कृतज्ञतेच्या जाणिवेनें अंतःकरण भरून येतें! **अशा नामवंत घराण्यांतील** एका प्रसिद्ध व्यक्तीकडून सदर पुस्तकाचें '**महत्त्वमापन**' करून घेण्यांत लेखकाला धन्यता वाटत आहे.

राष्ट्रपंचायतनाचें विभूतित्व.

राष्ट्राच्या जिव्हाळ्याचे अनेक प्रश्न सोडविण्याचा यथामति प्रयत्न मीं या पुस्तकांत केला असल्यामुळें, सदर पुस्तक राष्ट्रांतील थोरथोर पुढाऱ्यांस अर्पण करावें असें मनांत आलें. त्या दृष्टीनें मानसिक संशोधन चालू असतां राष्ट्रपंचायतनाची कल्पना येऊन गेली. **ग्रामपंचायतन** ही जशी खेड्यांच्या उद्धाराची **प्रेरकशक्ति** आहे, त्याप्रमाणें '**राष्ट्रपंचायतन**' ही आमच्या पतित राष्ट्राची **उद्धारकशक्ति** आहे. त्या दृष्टीनें आजचें विद्यमान **राष्ट्रपंचायतन कोण ?** असा प्रश्न मनांत येतांच—सत्य, अहिंसा, परोपकार, इंद्रियदमन, त्यागवृत्ति इत्यादि गुणांनीं प्रति **गौतमबुद्ध असे महात्माजी; स्वामी विवेकानंदांचें** धार्मिक जीवन, त्यांची निस्सीम देशसेवा व कडकडीत ब्रह्मचर्य यांचें केवळ प्रतीक असे **सुभाषचंद्र बोस; कॉर्ल मार्क्स, लेनीन** यांच्या तत्त्वज्ञानाचें रहस्य समजून घेऊन हिंदुस्थानांतील लाखों—कोट्यवधि, उपाशी, नग्न, पिळलेल्या व गांजलेल्या लोकांचें दुःख कमी करण्याचा चंग बांधलेले पंडित **जवाहिरलाल नेहरू; वसिष्ठ—वाम-**

लग्याचा प्रसाद ' हें पुस्तक फार उपयोगी पडलें. त्याच्या वाचनानें माझ्या सुप्त मनोवृत्ति जागृत झाल्या व त्याला महाराष्ट्रांतील केसरी, लोकशक्ति, नवाकाळ, ज्ञानप्रकाश, चित्रमय जगत्, किर्लोस्कर इत्यादि पत्रांतील विचारांचें खतपाणी मिळून, ते विचार पुस्तकरूपानें आज पुढें येत आहेत. त्यांत माझें स्वतःचें असें कांहीं नाहीं. राष्ट्रकार्याकरितां वाहून घेतलेल्या असंख्य देशभक्तांनीं व संपादक महाशयांनीं आजपर्यंत लोकजागृतीचें केलेलें कार्य फार मोठें असल्यामुळें त्यांच्या कार्याचें व विचारजागृतीचेंच प्रतिबिंब ह्या पुस्तकांत सर्वत्र उमटलेलें दिसेल! म्हणून महाराष्ट्रांतील सर्व दैनिकें, साप्ताहिकें व मासिकें इत्यादि सर्व वृत्तपत्र-व्यवसायी लोकांचा व ग्रंथकारांचा लेखक अत्यंत ऋणी आहे!

महत्वमापन.

या ग्रंथाचें तात्विक नि व्यावहारिक समालोचन ऊर्फ 'महत्त्वमापन' कऱ्हाड येथील सुप्रसिद्ध काँग्रेस देशभक्त श्री. पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ **बाबुराव गोखले** यांनीं केलें आहे. तें किती मार्मिक व वस्तुस्थितिनिदर्शक झालें आहे, तें सुज्ञ वाचक ठरवितीलच! श्री. बाबुराव गोखले ह्यांची ओळख महाराष्ट्राला—निदान सातारा जिल्ह्याला तरी करून देण्याची आवश्यकता नाहीं, इतके ते सर्व-विश्रुत आहेत. विश्वविद्यालयाचे पदवीधर, सरस्वतीचे आजन्म निस्सीम उपासक, उज्वल ध्येयनिष्ठा, नितांत कार्यतत्परता, शुद्ध चारित्र्य, अमोघ वक्तृत्व व देशासाठीं प्रसंगीं सर्वस्व अर्पण करण्याची अनुपमेय धडाडी इत्यादि उच्च गुण-समुच्चयांनीं, आज ते या जिल्ह्यांतील **तरुणांचे कलिजे** बनले आहेत, ही गोष्ट आतां सर्वांच्या पुरेपूर अनुभवास येऊन गेलीच आहे. श्रीयुत **नामदार भाऊसाहेब सोमण** यांच्या '**लोकसेवा संस्थेचे**' ते प्रचारक असून, गेल्या दोन वर्षांत प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाशीं समरस होण्याची त्यांना जी संधि मिळाली, त्यामुळें '**प्रत्यक्षानुभवाची कसोटी**' त्यांना आली असल्यामुळें, '**शेतकरी ऋण-विमोचनाच्या**' अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर **अधिकारवाणीनें** दोन शब्द लिहिण्याची त्यांची योग्यता किती थोर आहे, हें सुज्ञ वाचकांस निराळें सांगावयास नकोच! श्री. **बाबुराव गोखले** हे आम्हां तरुणांस **गुरुस्थानीं** होत. कारण त्यांच्या निकट सहवासांत जरी थोडा वेळ राहण्याचा योग आला, तरी तेवढ्या थोड्या वेळांतही ते **साक्रेटिसाप्रमाणें**, तरुणांचीं मनें भारल्याशिवाय कधीं राहात

नाहींत, याचा अनुभव माझ्याप्रमाणें इतरांनाही येऊन गेलेलाच असेल ! तेव्हां अशा थोर व्यक्तीकडून ' **महत्त्वमापन** ' ठरवून घेण्याचा सुयोग प्रस्तुत लेखकाला आला, याबद्दल आनंद वाटत आहे. त्याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावेत तें कळत नाहीं.

श्रीयुत गोखले यांनीं, गेल्या १००–१२५ वर्षांतील सातारा जिल्ह्यांतील चळवळींचा लिहिलेला इतिहास–जागृत सातारा–माझ्या म्हणण्याची साक्ष देईल. त्यांनीं सार्वजनिक आयुष्यक्रमांत पदार्पण केल्यास उणींपुरीं १२ वर्षें झालीं असल्यामुळें, **तपश्चर्येचें बळ** त्यांच्या पाठीशीं आज उभें आहे ! **त्यांची वैचारिक भूमिका,** त्यांनीं गेल्या १२ वर्षांत ठिकठिकाणीं दिलेल्या व्याख्यानांवरून–'**बोल-बाला** ' ह्या त्यांच्या व्याख्यानपत्तिशीवरून कळून येईल. इतिहासप्रसिद्ध **बापू गोखल्यांच्या घराण्यांत,** आज महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं चमकणारी व चमकून गेलेली **गोखले मंडळी** पाहिली, म्हणजे कृतज्ञतेच्या जाणिवेनें अंतःकरण भरून येतें ! **अशा नामवंत घराण्यांतील** एका प्रसिद्ध व्यक्तीकडून सदर पुस्तकाचें ' **महत्त्वमापन** ' करून घेण्यांत लेखकाला धन्यता वाटत आहे.

राष्ट्रपंचायतनाचें विभूतित्व.

राष्ट्राच्या जिव्हाळ्याचे अनेक प्रश्न सोडविण्याचा यथामति प्रयत्न मीं या पुस्तकांत केला असल्यामुळें, सदर पुस्तक राष्ट्रांतील थोरथोर पुढाऱ्यांस अर्पण करावें असें मनांत आलें. त्या दृष्टीनें मानसिक संशोधन चालू असतां राष्ट्रपंचायतनाची कल्पना येऊन गेली. **ग्रामपंचायतन** ही जशी खेड्यांच्या उद्धाराची प्रेरकशक्ति आहे, त्याप्रमाणें ' **राष्ट्रपंचायतन** ' ही आमच्या पतित राष्ट्राची उद्धारकशक्ति आहे. त्या दृष्टीनें आजचें विद्यमान **राष्ट्रपंचायतन कोण ?** असा प्रश्न मनांत येतांच—सत्य, अहिंसा, परोपकार, इंद्रियदमन, त्यागवृत्ति इत्यादि गुणांनीं प्रति **गौतमबुद्ध असे महात्माजी; स्वामी विवेकानंदांचें** धार्मिक जीवन, त्यांची निस्सीम देशसेवा व कडकडीत ब्रह्मचर्य यांचें केवळ प्रतीक असे **सुभाष-चंद्र बोस; कॉर्ल मार्क्स, लेनीन** यांच्या तत्त्वज्ञानाचें रहस्य समजून घेऊन हिंदुस्थानांतील लाखों–कोट्यवधि, उपाशी, नग्न, पिळलेल्या व गांजलेल्या लोकांचें दुःख कमी करण्याचा चंग बांधलेले पंडित **जवाहिरलाल नेहरू; वसिष्ठ–वाम-**

देवांप्रमाणें अध्यात्म व राजकारण यांत अग्रणी असे **पंडित मालवीय**; **चंद्रगुप्त, अशोक** यांसारख्या सम्राटांना जन्म देणाऱ्या भाग्यशाली मगधांतील प्रति लोकमान्यच असे **बाबू राजेंद्रप्रसाद**, हेंच आमचें **विद्यमान राष्ट्पंचायतन होय !** या सर्व भारतवंद्य विभूतींनीं राष्ट्राकरितां अपूर्व स्वार्थत्याग, उज्वल देशभक्ति व अनंत क्लेश सहन केले असल्यामुळें, त्यांच्या चरणकमलीं मी माझी ही अल्पशी विचारप्रणाली भक्तिभावपुरस्सर अर्पण करीत आहें. तिचा ते सादर, सकौतुक स्वीकार करतील अशी दृढ आशा आहे.

आतां एक महत्त्वाचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. हिंदुस्थानांतील ७०० संस्थानिकांत, आपल्या प्रजेस आपण होऊन स्वातंत्र्य दान देणारे, व लोकादरास अखिल भरतखंडांत पात्र झालेले औंध संस्थानचे प्रगमनशील राजे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि हे होत ! ह्यांनीं नुकताच दरबार भरवून, आपल्या प्रजेस स्वातंत्र्यदान केलें ! ह्या स्वातंत्र्यमंदिराची उभारणी साक्षरता व ग्रामपंचायती ह्यांच्या अधिष्ठानावर केली असल्यामुळें, न्यायदान, खेड्यांचें संरक्षण व संवर्धन ह्या महत्त्वाच्या खऱ्याखुऱ्या बाबी लोकांच्या पदरांत पडल्या आहेत ! श्रीमंतांचे अत्यंत हुषार व कर्तव्यदक्ष असे चिरंजीव **युवराज अप्पासाहेब** हे अत्यंत प्रगमनशील मताचे भोक्ते आहेत. ते माझ्या या पुस्तकांतील जो उपयुक्त अंश असेल, तो घेतल्याशिवाय कधीं राहाणार नाहींत. म्हणून त्यांना विनम्रभावानें मला अशी विनंति करावीशी वाटते कीं, माझ्या ह्या अल्पस्वल्प कृतींत ' **हंसक्षीरन्यायानें** ' जें कांहीं आपणांस घेतां येण्यासारखें असेल, तें घेऊन आपली प्रजा सुखी व संपन्न करावी व ' **आदर्शसंस्थानिक** ' म्हणून भरतखंडांत गाजलेलें आपलें–**आपल्या ज्ञानसंपन्न राजरत्न वृद्ध पिताजींचें** नांव सार्थ करावें. त्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतील सर्व **संस्थानिकांनीं आपली प्रजा सुखी व संपन्न करण्यासाठीं** ह्या पुस्तकांतील विचारप्रणालीचा उपयोग करून घ्यावा, अशीहि नम्र विनंती आहे.

शेवटीं आमच्या प्रांतांतील कर्तव्यदक्ष अशा **प्रधानसप्तकांना–अग्रेसर अशा नामदार बाळासाहेब खेर ह्या पंतप्रधानांना**–अशी विनम्रभावानें विनंती करावीशी वाटते कीं, आपणांपुढें आज जे **बिकट राष्ट्रीय प्रश्न** आहेत व ज्यां-

करितां आपण रात्रंदिवस श्रम घेत आहां, ते प्रश्न सोडविण्याचा यथामति प्रयत्न मीं आपल्या या **शेतकरीऋणविमोचन** पुस्तकांत केला आहे. त्यांतील उपयुक्त तो अंश आपण घेतल्यास, **लेखकाच्या श्रमाचें चीज** झालें असें होईल.

सदर पुस्तकाचें हस्तलिखित लिखाण तपासण्याच्या कामीं व थोड्या वेळांत सुंदर छपाई करून देण्याच्या कामीं पुणें येथील ज्ञानविलास प्रेसचे मालक श्रीयुत **बाळकृष्ण भाऊ जोशी**, यांची फार फार मदत झाली, याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे.

शेवटीं सर्व महाराष्ट्रीय **ज्ञाताज्ञात सुबुद्ध वाचकवर्गास** अशी विनंती करावीशी वाटते कीं, ह्या पुस्तकांतील विचारांत आपणांस जे इष्ट फरक सुचवावेसे वाटत असतील, ते लेखकाकडे पत्ररूपानें कळविल्यास लेखक त्यांचा **ऋणी** होईल. या सर्व महत्तम विचारांचा **दृढभाजक** **काढून**, पुढील **आवृत्तीचा** प्रयोग आल्यास, त्यांत तो ग्रथित केला जाईल असें आश्वासन देऊन हें **आत्म**-निवेदन येथेंच पुरें करितों.

ता. १२।३।३९ ग्रंथकर्ता.

वंदेमातरम्—

महत्त्व-मापन

" अभ्यासोंचि प्रगट व्हावें "

महाराष्ट्राच्या राजकीय संताचें हें वचन आहे. पण हा रामदासी रिवाज आजकाल कितीसा आढळतो ? वचन–वाचन–लेखनापासून जेवण–जीवन–साध्य–साधनापर्यंत आपले सारे व्यवहार बहुशः प्रवाहपतितासारखे चाललेले आढळतात. भूतकाळाचा इतिहास जमेस धरावा, वर्तमानकाळाची घडण खंबीर करावी आणि उज्वल भविष्यकाळाची शास्त्रशुद्ध तयारी साधीत असावें, असा जाणिवेचा व्यवहार कितीसा आढळतो ? उद्यांच्या जगांत नांदावयास लायक अशी आपली संतति सुसंस्कृत व कर्तबगार व्हावी म्हणून कितीशी मनःपूर्व काळजी घेतली जाते ? पुढच्या पिढीचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक असे हरएक व्यवहार सहकाराचे, सुखाचे नि सवाई प्रतिष्ठेचे व्हावे असे कोठें आराखडे काढलेले आढळतात काय ? आपलें प्रियतम राष्ट्र जगाच्या दरबारांत मानानें व तेजानें नांदावें म्हणून कितीसे आडाखे बसविलेले दिसतात ? काळ–कांम–वेग यांचीं उदाहरणें सोडविण्यांत वाकबगार असणारांनीं देखील जेथें आपल्या एखाद्या वर्षाचें त्रैराशिक मांडून त्याचा व्यवहार करण्याचा प्रयत्न केल्याचें सहसा सांपडत नाहीं, तेथें सार्वजनिक कार्यप्रणालींचें गुणोत्तर काढीत बसण्याची तसदी घेतांना कोण आढळणार ? आणि हें सर्व, निश्चित ध्येयानें, निश्चित काळांत निश्चित कार्यक्रम आंखून तो परिणामकारक रीतीनें यशस्वी करीत राहाण्याचा परिपाठ इतर राष्ट्रांनीं पाडलेला असतांना. असें होऊन कसें चालेल ! जीवनाच्या ओघांत " होईल तसें होऊं द्या " आणि " जाईल तिकडे जाऊं द्या " अशी बेफिकीर वृत्ति काय कामाची ? इतकी का आपली अवस्था अचल आहे ? खास, खासच नाहीं. उलट जागतिक जीवनाच्या ओघांत होणारे आघात-प्रत्याघात जागरूक प्रयत्नाशिवाय अटळ ठरतात. तेव्हां जागतिक ओघ कसा वाहतो आहे याच्याकडे लक्ष ठेवून आपल्या हालचाली शिस्तीनें नकोत का व्हायला ? जागतिक ओघांत पोहलें हें पाहिजेच. माणसाला व राष्ट्राला त्याविना गत्यंतरच नाहीं, जर जिवंतपणा दाखवावयाचा असेल तर. आणि हें जर खरें,

तर पोहावयाचें धोरणही हवें. आपल्या ध्येयास, धोरणास आणि धारणेस जागतिक ओघ अनुकूल असेल तर ओघाबरोबर, अनुकूल नसल्यास ओघाविरुद्ध, तें नच साधेल तर निदान ओघाच्या पृष्ठावर, तरत हात मारीत राहिलेंच पाहिजे, ओघाखालीं दडपलें जातांच कामा नये, कीं ओघ रेटीत नेईल तिकडे मुकाट्यानें हातपाय गाळून रेटलें जातां कामा नये. आणि असें करावयाचें तर डोळे उघडे ठेवून आपले हात मारावे लागतात. वेळप्रसंगीं पाणी तोडण्यासाठीं हात मारण्याची रूढ पद्धति देखील क्वचित् आमूलाग्र बदलावी लागते. असें बिनचूक करीत राहण्याला 'अभ्यासें प्रगट होणें' असें म्हणावयास सामान्यतः हरकत नाहीं.

माणसाच्या काय किंवा राष्ट्राच्या काय, किंबहुना सर्व मानवतेच्या सुखासाठीं वा उद्धारासाठीं आजपर्यंत ज्या तत्त्वप्रणाली अथवा साधनसंहिता पुढें आल्या, त्या वेगवेगळ्या चेहऱ्यामोहऱ्याच्या आहेत. याचें कारण त्या परिस्थितिसापेक्ष आहेत. अर्थातच त्या अभ्यासाच्या योगेंच तशा बनल्या आहेत. प्रारंभीं परिस्थितीच्या पकडींत असलेला पुरुष पराक्रमानें परिस्थितीलाच पकडींत धरतो, मनासारखी वाकवितो आणि ध्येयसाधना करून स्वतां पुरुषोत्तम बनतो. जी गोष्ट व्यक्तीची तीच राष्ट्राचीहि होऊं शकते. व्यक्तीची आणि राष्ट्राची तशी प्रतिष्ठा जोपासण्यास उघड्या डोळ्यांचा अभ्यासच समर्थ होतो. हिंदुस्थानच्याही स्वातंत्र्याबाबत आजवर जीं राजकीय व विशेषत: आर्थिक क्रांतीचीं साधनें पुरस्कारण्यांत आलीं, त्यांतही जे बदल होत आले, ते सूक्ष्म, मार्मिक आणि भविष्यभेदक अभ्यासामुळेंच. ब्रिटिशांनीं आणि त्यांच्या भुलभलाईनें भारलेल्या भाटांनीं " **हिंदी अर्थशास्त्र** " असा विषयच जगांत नाहीं असा भ्रम निर्माण केला होता. तो लयाला नेऊन " **हिंदी अर्थशास्त्र** " हा एक ऐतिहासिक आधाराचा स्वयंपूर्ण विषय आहे, हें श्री. रमेशचंद्र दत्त, न्या. रानडे, श्री. ग. व्यं. जोशी, प्रो. वामनराव काळे, नि शहा–प्रभृति अर्थशास्त्रनिष्णातांनीं सिद्ध करून दाखविलें तें अभ्यासाच्याच जोरावर. फार काय, ब्रिटिश राजवटीच्या प्रसाददीक्षेनें हिंदी उद्योगधंद्यांचीं बोटें तुटून पडल्यामुळें, हिंदुस्थानला पुन्हां आर्थिकदृष्ट्या सर्वसमर्थ करण्याकरतां जे जे प्रयत्न झाले, तेही अभ्यासाच्या जोरावरच. हां ! या सर्व प्रयत्नांवर पाश्चात्य अर्थशास्त्रीय सिद्धांतांची नि साधनांची गडद छाया होतीच होती. आणि तें अपरिहार्यच नव्हतें काय ? मानवी मेंदूनें निसर्गालासुद्धां सुखकर

सेवक करण्यासाठीं लावलेल्या शास्त्रीय शोधांमुळें देशादेशांतील दूरपणा दुरावत गेला आणि हितसंबंध निकटवर्ती झाले.

सत्तेशिवाय शहाणपण व्यर्थ ठरतें !

पाश्चिमात्यांची सुधारणा, जाहिरातकला, बनियागिरी आणि उत्कट स्वदेशी पूर्वेकडील जपानसारख्या टीचभर देशानें हरएक उपायांनीं आत्मसात् केली, आपला उत्कर्ष साधला व जगांत स्पृहणीय प्रतिष्ठा मिळवली. शेजारचें हें नामांकित उदाहरण पाहून हिंदुस्थानांतही तसे प्रयत्न झाले. श्रीमंतांनीं वैयक्तिक जबाबदारीवर भांडवलें गुंतवून कोठें कारखाने उभारले, कोठें बुद्धिमंतांनीं मध्यम नि श्रीमंत वर्गांच्या साहाय्यानें भागीदारीच्या मंडळ्या स्थापून रोजच्या गरजांचें उत्पादन सुरू केलें, तर कोठें पैसाफंडासारख्या कारखान्यांनीं गोरगरीबांच्या पैशापैशावर स्वदेशी उत्पादनें साधण्याचे चंग बांधले. पण सत्तेशिवाय शहाणपण 'शेणसडा' होऊन पडतें, हा अनुभव हिंदुस्थानच्या कपाळीं यावयाचा तो आलाच ! अभिजात असो, उसनवार आणलेलें असो, पैसा देऊन सेवाधर्मानें विकत घेतलेलें असो अगर कचाप्रमाणें जीवावर बेतणाऱ्या कष्टांनीं संपादन केलेलें असो, सारें हिंदी शहाणपण सत्तेच्या कुचंबणीनें कुजलेलें आणि सत्तेनें उत्तेजित केलेल्या परक्यांच्या अन्याय्य चढाओढीसाठीं 'चाऊमिऊ' करीत कसें वरी जीव धरून राहिलें. त्यायोगें पाश्चात्य वळणें हिंदी जीवनाच्या वर्तुळांत समरस करून घेतां येतील तितकीं व तशीं घेऊन पचनीं पाडावयाचीं, आणि नव्या काळाला साजेल असें नवें आर्थिक स्वावलंबन हिंदुस्थानांत साधावयाचें, ही महत्वाकांक्षा मातीमोल होत गेली, आणि यंत्रयुगाचे जे दुष्परिणाम इतर देशांत जोरावले, ते येथेंही मूळ धरूं लागले. साध्या साधनांनीं खेड्याखेड्यांत केवळ हातोहात होणारे आणि जीवनाच्या दैनंदिन गरजा भागवणारे धंदे ठार बुडाले, माणसांचीं यंत्रें झालीं आणि आनुवंशिक वा परिपाठांतील उद्योग हातोहात गमावल्यामुळें जो उठला तो शेतीला हात घालूं लागला, वा कोठेंतरी मजूर म्हणून पैसेवाल्यांचा गुलाम झाला ! पण एवढ्यानेंच काय झालें ? नफेबाजीच्या हव्यासानें मजुरांचीं हाडें बाहेर काढलीं, तर अवाच्यासवा धारा, दुष्काळ, व्यसनें, अज्ञान, रूढ शेतीभातींतील खोटी प्रतिष्ठा यांच्यापायीं मजुराबरोबर शेतकरीही चेंगरला गेल्यामुळें सावकारी पाशांत—कर्जबाजारींत—ऋणांत गाडला गेला. आणि

खेड्यापाड्यांच्या हिंदुस्थानचा शेतकरी तर केवळ प्राण. तो आणि त्याच्या समवेत सारे गरीब, दलित, माणुसकीलाच यंत्रयुगानें पारखे झाल्यावर, राजकीय चळवळीचीं आंदोलनें उठवलीं, तरी ती कणा मोडलेल्या गाड्यासारखींच चाललीं, तर नवल कसलें ? तेव्हां **अन्नवस्त्र, आश्रय, उपकरणें, आराम, जिज्ञासा** या मानवी जीवनांतील आवश्यक गोष्टींचा जिवंतपणापुरता तरी पुरवठा शेतकऱ्यांच्या बाबतींत साधल्याशिवाय राष्ट्राचें आर्थिक आणि सामाजिक जीवन राजकीयदृष्ट्या समर्थ होऊं शकणार नाहीं, हें गांधींना दोन तपांपूर्वी प्रतीत झालें, तेंही तत्कालीन हिंदी जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करूनच !

ग्रामीण जीवनाचें जणूं सुदर्शनचक्र !

सदर अभ्यासाच्या दिग्दर्शनाप्रमाणें चरख्याचें पुनरुज्जीवन करून महात्माजींनीं शेतकऱ्यांना एक जोडधंदा जरूर दिला. इतकेंच नव्हे तर खादीचा पुरस्कार स्वतः राष्ट्रीय सभेकडून करवून अशी एक तत्त्वप्रणाली नि आचारप्रणाली घालून दिली, कीं ज्यायोगें सगळ्या जगाचें लक्ष्य हिंदुस्थानकडे लागले ! ‘ दरिद्रीनारायणाच्या सेवेच्या ’ महात्मागांधीप्रणित योगसाधनांचा प्रतिष्ठापूर्वक पुरस्कार, प्रचार, प्रसार राष्ट्रीयसभेनें दोन एक तपें केलाच केला. त्यायोगें ‘ बहुजनसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीला, कार्यक्षमतेला व प्रतिष्ठेला सर्वथैव निर्वेध क्षेत्र निर्माण करील, तेंच खरें हिंदुस्थानचें लोकशाहीप्रधान स्वातंत्र्य ’ ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होऊन, **देशभक्तीचें स्मृतिवचन** होऊन राहिली. **ग्रामीण जीवनाचें जणूं ‘ सुदर्शनचक्र ’** एवढी योग्यता **महात्माजींनीं ‘ चरख्याला ’** प्राप्त करून दिली. माणुसकीच्या जोपासनेमुळें स्वतंत्रवृत्ति शाबूत राहते, हस्तव्यवसायामुळें बुद्धिदृष्ट व्यहार उत्पादनकलेंत निर्माण होण्यास भरपूर वाव सांपडतो आणि स्वकष्टार्जितामुळें स्वाभिमानाचें नि स्वातंत्र्याचें समाधान अखंड लाभतें. महात्माजींच्या चरख्यानें हें ठसविलें. पण यंत्रयुगानें जीवनाला जी विविधता आणि बहुजिनसीपणा आणला, त्यायोगें एकंदर राहणी महागली. यंत्राचें उत्पादन झपाट्याचें व बहुसंख्य असल्यामुळें प्रत्येक वस्तु स्वतंत्रपणें स्वस्त दिसली, तरी यंत्रयुगांत मनुष्याच्या गरजाच गरजा वाढल्या. ‘साधी राहणी नि उच्च विचारसरणी ’ हा बीजमंत्र अभ्यासकांच्या डोळ्यांपुढून चळला नसला, तरी ‘ साधी राहणी ’च यंत्रयुगानें अशी उंचावून ठेवली, कीं चरख्याला साध्याच

पण शीघ्रोत्पादनाच्या यंत्राचें सुटसुटीत स्वरूप दिल्याशिवाय, त्या चरख्याच्या साहाय्यानें केवळ जीवनवेतनही सुटणार नाहीं, याची जाणीव महात्माजींनाही झाली, आणि त्यांचे तसे प्रयत्नही झाले ! महात्माजींच्या साधनप्रणालीवरील ही यंत्रयुगाची छाप घटकाभर नजरेआड केली, तर चरखा आदिकरून जी योग-साधना राष्ट्राला गांधींनीं दिली, तिला कारणीभूत असलेला प्रसंग व तिचें प्रयोजन अजूनही नाहींसें झालेलें नाहीं, हें कबूल करावें लागेल. किंबहुना राजकीय पारतंत्र्याचें जूं थोडें तरी हिंदुस्थानच्या मानेवर आहे, तोंपर्यंत आर्थिक स्वातंत्र्य संपादितां व सांभाळतां येईल, अशी खरोखर आशाही नाहीं. त्यासाठीं अगोदर वैचारिक आणि नंतर राजकीय क्रांति साधून, मगच आर्थिक नि सामाजिक पुनर्घटनेचे उपाय योजले पाहिजेत असेंही कित्येक राजकारणपटूंचें मत आहे.

समाजसत्तावादाचा जन्म.

तसा जगाच्या इतिहासांत दाखला आहे. रशिया आदिकरून राष्ट्रांनीं तो प्रयोग केला आणि यंत्रयुगानें माणुसकीचें मातेरें केलें होतें, तें निपटून काढण्याकरितां समाजसत्तावाद निर्माण केला. त्याचे वारे हिंदुस्थानापर्यंत आले आणि वाहूंहि लागले. उत्पादनाच्या कारखान्यापासून सर्व मालमत्ता राष्ट्रीय सत्तेची करावयाची आणि एकंदर राष्ट्राची सरणी अशी राखावयाची कीं, व्यक्तीला उणें कांहीं पडूं नये, पण व्यक्तीचें उत्तमोत्तम असेल तें राष्ट्रकार्यीं रुजू व्हावें. पश्चिमेकडे जे राजकीय धर्म आज नव्या कर्तबगारीनें प्रतिष्ठित झाले आहेत, आणि ज्यांनीं यंत्रयुगाच्या नी सरंजामशाहीच्या दुष्परिणामाचा बीमोड करावयास घातला आहे, त्यांचा **बीजमंत्र** वरीलप्रमाणें आहे. तेंच धोरण आपल्या हिन्दी परंपरेस नी स्वभावेतिहासास धरून साधावें म्हणून “ **स्वराज्य–स्वदेशी–बहिष्कार-राष्ट्रीयशिक्षण** ” ही चतुःसूत्री राष्ट्राला लोकमान्यांनीं दिली होती. फार काय “ **मजुरांच्या मालकीची गिरणी** ” मुंबईत व्हावयासच पाहिजे, असा जोराचा पुरस्कार **अच्युतराव कोल्हटकरांनीं** केला होता. पण ज्या राजकीय सत्तेच्या क्रांतीवर या गोष्टी सुतराम् साधावयाच्या, ती राजकीय सत्ता हातांत घेऊन टिकवण्याचें सामर्थ्य बहुजनसमाजांत म्हणजेच हिन्दी शेतकऱ्यांत निर्माण करावयाचें तर असतील नसतील त्या सत्ता–संपत्ति–साधनसामुग्रीचा जास्तींत जास्त सदुपयोग त्याच एका दिशेनें नको का करावयाला ? तसा तो

केला नाहीं तर हिंदुस्थानचा प्राण जो शेतकरी–जो हिंदुस्थानचा खरा अन्नदाता तोच कस्पटासमान लेखल्यासारखें होईल, नव्हे का ? आणि शेतकऱ्याला तसा लेखून हिन्दुस्थानांतील राजकीय, सामाजिक वा आर्थिक क्रांति अगर राष्ट्रीय उत्कर्षाचे कसलेहि प्रयोग आजच्या जगाच्या ओघांत फलदायी होतील काय ?

भावी कार्यक्रमाचे निश्चित आराखडे.

त्यासाठीं शेतकऱ्यांच्या जीवनाची उत्तरोत्तर स्पृहणीय उत्क्रांति होत जाईल, असे निश्चित काळांत निश्चित गोष्टी घडविणारे आराखडे आंखून ते यशस्वी करण्याकरतां प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. " **प्रांतिक स्वायत्तता** " या नांवाची जी पुढच्या बाजूस राजमुद्रा व मागचे बाजूस सनाचा अंक नसलेली अशी **राजकीय सत्तेची गुळगुळीत चवली** हिन्दुस्थानास " **१९३५ च्या सुधारणां**–" खालीं मिळाली आहे, त्या ' **गुळगुळीत चवलीच्या सत्तेचा** ' **सशर्त उपयोग काँग्रेसनें** करावा, असें जें कित्येकांचें म्हणणें होतें तें, **शेतकरी–जीवनोन्नतीच्या दृष्टीनेंच** ! अर्थात ती सत्ता वापरणारांच्या नजरेपुढें जागतिक ओघांत टिकून राहाणारे आराखडे आवश्यकच होते. असे आराखडे एक तर ती सत्ता राबविणारांचे स्वतांचे हवेत, अगर दुसऱ्यांनीं अभ्यासपूर्वक सादर केलेले हवेत. **मात्र त्या आराखड्यांतून शेतकरी जीवनाचा दैनंदिन अनुभव प्रतीत व्हावयास हवा.** आणि आज हिन्दी शेतकऱ्यांच्या जीवनाचा विचार करून आराखडा आखणारानें शेतकऱ्यांच्या डोक्यावर जो " **ऋणाचा डोंबाळा** " आहे, त्याचाच मुख्यतः विचार करून, शेतकरी त्या ऋणांतून मुक्त कसा होईल, पुन्हा ऋणाच्या चक्रांत तो कसा सांपडणार नाहीं आणि जगाच्या बाजारांतील पूर्वीपेक्षां उंचावलेलें साधेंच का होईना जें जीवन जगणें त्याला अपरिहार्य आहे, तें तो समर्थपणें कसें जगूं शकेल, याचीच **हुकमी पत्त्यासारखी** परिणामकारक **योजना** करावयास हवी. अशी एक स्वयंपूर्ण, साधार आणि सामर्थ्योत्पादक योजना माझे मित्र रा. **महादेव दत्तात्रय** वाघ यांनीं आंखली असून, तीच प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारें त्यांनीं विचारवंतांस सादर केली आहे. नांदगिरीसारख्या सातारा जिल्ह्यांतील सामान्य खेड्यांत राहणी, स्वतःच्या शेतीचा आणि शेजाऱ्या शेतकरी जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव, ग्रामीणजीवन नी त्याच्या गरजा यांसंबंधीं केलेले निरनिराळे प्रयोग नि त्यांचीं प्रत्यक्ष फळें, अभ्यासूवृत्तीचें निरी-

क्षण आणि ' इंग्रजी पांडित्य ' पाठमोरें असतांही केवळ मायभाषेच्या प्रसादानें मिळेल तेवढ्या सर्व ज्ञानाची सूक्ष्म चाळणी यांच्या जोरावर रा. वाघ यांनीं सदर पुस्तक लिहिलें आहे. यासाठीं त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होईल.

हिन्दी शेतकऱ्यांच्या जीवनाचा आणि म्हणूनच ऋणविमोचनाचा प्रश्न एकरंगी नाहीं. हिन्दी शेतकऱ्याला आपल्या प्राचीन संस्कृतीप्रमाणें सबलत्वानें वागतां येतें, तर तो ऋणी राहताच ना. " अनृणी मरण " हें हिंदुस्थानांतील प्राचीन संस्कृतीचें तर ब्रीद. पण " प्रज्ञाहत " असा हिन्दुस्थानच पारतंत्र्याच्या पाशांत कायमचा राहूं शकेल अशी मनाशीं खूणगांठ बांधून ठेवणाऱ्या राज्यकर्त्यांनीं शेतकऱ्याला आपल्या संस्कृतीचें ब्रीद आचरूं दिलें तर काय उपयोग ? तेव्हां शेतकऱ्याच्या हितासाठीं म्हणून जें जें बाह्यतः करण्यांत आलें, तें तें देखील शेतकऱ्याला अधिकाधिक तोंडघशी पाडणारेंच ठरलें. तथापि वाहून गेलेल्या गंगेबद्दल अश्रु गाळण्यांत अर्थ नाहीं. आतां शेतकऱ्याच्या ऋणविमोचनाचा प्रश्न केन्द्रीभूत करून त्याचे अनुषंगानें एकंदर शेतकरीजीवनच निकोप केलें पाहिजे. आणि त्यासाठीं हातीं असलेली सर्व सत्ता, अशीच संकलित होऊं शकणारी सर्व संपत्ति संयोजिली पाहिजे, अशी रा. वाघ यांची योजना आहे.

योजनेंतील वैशिष्ट्य

त्या योजनेनुसार सावकारनियंत्रणादि कायदे करावे लागतीलच, पण ग्रामपंचायतीहि इतक्या सत्तासंपन्न कराव्या लागतील, कीं गांवांत वर्गविग्रहापेक्षां वर्गसहकार साधून " गांव करील तें राव काय करील ? " ही म्हण आचरणशुद्ध व्हावी. फार कशाला, शेतीचें शास्त्रशुद्धज्ञान पुरवून साधेल तेवढी सहकारीपद्धतीची किफायतशीर शेती होऊं लागावी; जोडधंदे सहजसाध्य नि श्रमांचा भरपूर मोबदला देणारे असावे; उत्पादनाची किंमत भरंवशानें मिळावीच मिळावी अशी पेठेंत व्यवस्था व्हावी आणि मोठ्याछोट्या कारखान्यांला विम्याकंपन्या आदिकरून ज्या संस्थांचे पैसे रोख्यांत गुंतून पडतात ते भांडवलासाठीं मिळावेत वगैरे कायदेशीर योजना व्हाव्यात, असें रा. वाघ यांचें म्हणणें आहे. सर्व बाजूंनीं असे कायदेच कायदे निर्माण करून इष्ट अशा राष्ट्रीय सुधारणा करीत असण्यास **हितकर हुकूमशाही** जशी समर्थ ठरते, तशी " जो तो बुद्धीच सांगतो " अशी अवस्था असलेली **लोकशाही** ठरत नाहीं ! पण लोकशाहींत

तरी बहुमताचा जुलूम होत नाहीं असें थोडेंच आहे ? **तेव्हां बहुमताचा फायदा राष्ट्रीयसंवर्धनाला कां होऊं नये ?** अशी रा. वाघ यांची विचारणा आहे. तथापि कायद्यानें होणारी सुधारणा ही चिरपरिणामी होत नाहीं; लोकांची लोकांनींच सुधारणा करावयास हवी, असा कोणाचा आक्षेप असेल, तर आजकाल होणाऱ्या अर्धबोबड्या कायद्याचें समर्थन तरी अंधश्रद्धेवांचून कशानें होणार ?

तथापि असे कांहीं मतभेदाचे प्रश्न रा. वाघ यांच्या योजनेवरून कोणाला सुचतीलही. किंबहुना, उत्पादनांतील नव्या नव्या न्यहारीबहारी निर्माण होण्यासाठीं, हस्तकौशल्य व हस्तव्यवसाय यांचा परिपोष झालाच पाहिजे; पण सामान्य माणसांच्या बहुसंख्य गरजा स्वस्ताईनें भागावयाच्या **तर यंत्रशक्तीचा सदुपयोग झालाच पाहिजे**; कारण दैनंदिन गरजांचे जिन्नस भलत्याच प्रमाणांत परदेशांतून येथें येत असतात, वगैरे गोष्टी रा. वाघ यांनीं आंकडे व तज्ज्ञांचीं मतें देऊन प्रतिपादिल्या असल्या, तरी कोणाला त्यांचे आधार सर्वस्वी ग्राह्य वाटणार नाहींत, तर कोणाला त्यांचीं सर्वच अनुमानें पटणार नाहींत, तसेंच कोणाला **आपल्या गुरुप्रणीत तत्त्वप्रणालींतील एखाद्या तत्त्वाला वा त्याच्या तपशिलाला धक्का लागल्यामुळें वैतागल्यासारखेंही होईल ! पण असें कांहीं होण्यांतदेखील रा. वाघांच्या योजनेचें महत्त्वच आहे !** ग्रामीण जीवनाच्या आस्थापूर्वक अभ्यासानें रा. वाघ यांनीं आपली एक **स्वयंपूर्ण योजना** आंखली, आणि ती शब्दांकित केली, तेव्हां त्यांनाही आपल्या योजनेला **मतमतांतरांचे धकेचपेटे सोसावे लागतील**, याची जाणीव झाली. त्यामुळेंच आपल्या पुस्तकांत '**आक्षेप आणि खंडन**' हें प्रकरण त्यांनीं घालून आपल्या योजनेची व्यवहार्य निर्दोषता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. फार काय, सामुदायिक सहकारी तत्त्वावर उद्योधंद्यांची वाढ राष्ट्रीयदृष्ट्या कशी करतां येईल याची रूपरेखा '**औद्योगिक क्रांति**' या प्रकरणांत दाखवून रा. वाघ यांनीं आजच्या जागतिक ओघांत हिंदुस्थानचा बहुजनसमाज कसा समर्थपणें टिकाव धरूं शकेल याचें स्पष्टीकरण केलें आहे. याउप्परही 'प्रांतिक स्वायत्तता' राबविणाऱ्या लोकपक्षानें मनांत आणलें तर रा. वाघांच्या सर्वगामी योजनेसाठीं लागणारा पैसा कसा उभारतां येईल, आणि त्याप्रीत्यर्थ मध्यवर्ति सत्तेशीं वेळप्रसंगीं पेचप्रसंग निर्माण झाले तर वाट कशी काढतां येईल, याची पायाशुद्ध

भरीव योजनाही रा. वाघांच्या **'क्रांतिकारक बजेट'** या प्रकरणांत बारीक बघणारांना आढळेल ! हीं प्रकरणें आणि एकंदर सर्व पुस्तकही विचारप्रवर्तक झालें असून, हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाची व तदनुषंगिक निकोप उन्नतीची जबाबदारी, जणूं आपल्या शिरावर पडली, तर आपण ती कशी पार पाडूं, याचें दिग्दर्शन आत्मविश्वासपूर्ण असें रा. वाघांनीं केलें आहे.

अशा योजना पुढें येऊन त्यांच्या मंथनानें जो दृढभाजक निघेल, तोच कदाचित राष्ट्रोपकारक ठरेल. म्हणून अशा योजनांपैकी एकीचेंही महत्व यत्किंचित् कमी होत नाहीं. रा. वाघांनीं मांडलेली सदर पुस्तकांतील योजना ही अशा स्वयंपूर्ण योजनांपैकीं पहिलीच आहे, ही गोष्ट रा. वाघ यांना जशी अभिमानास्पद, तशीच अखिल महाराष्ट्रालाहि गौरवास्पदच नाहीं काय ? अशा योजना वस्तुस्थितीवर आधारून ध्येयाकडे नेणाऱ्या असल्यामुळें त्यांचा वाङ्मयसंसार हा वास्तववादी–ध्येयवादी असतो. यांत **कलेकरतां कला नसून वास्तवांतून ध्येयाचा विकास** कसा करावा, हें वाचकाला **कलाचतुराईनें** सांगावें लागतें. अर्थातच अंतःकरणांतील त्या विषयाचा जिव्हाळा ज्या मानानें जोराचा, त्या मानानें प्रतिपादनाचें वाङ्मय वाचकाला गुंगविणारें ठरतें. रा. वाघ यांचें पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचण्याचा मोह अनावर होतो, तो त्यांतील जिव्हाळ्यामुळेंच. पण त्यामुळेंच थोडासा दोष डोकावला आहे तो असा कीं, पुस्तकांत ग्रंथभाषेचें कांटेकोर गांभीर्य सांभाळलें न जातां, वर्तमानपत्री वळण दरवळलें आहे. पण कांट्याशिवाय गुलाब नाहीं, आणि रा. वाघांच्या आर्थिक नि सामाजिक प्रश्नासारख्या एरवीं निरस वाटणाऱ्या विषयाचा गुलाब फुलवण्याकरतां, वापरावी लागलेली वर्तमानपत्री वळणाची भाषा, म्हणजे केवळ गुलाबी थंडीचा कांटा ! तो कितीसा बोंचक होणार ? उलट तो रा. वाघांच्या लेखनाचें महत्वच वाढविणारा ठरेल !

ग्रामीण जीवनाचा सखोल अनुभव, विचारपूर्वक आंखणीचें धोरण, आस्थेवाईकपणें आर्थिक घडामोडींचा स्वदेशी अभ्यास, आणि जबाबदारीच्या कर्तव्यदक्ष जाणीवेनें केलेली नीटस योजना, हेंच रा. वाघ यांच्या पुस्तकाचें 'महत्त्वमापन', शेतकऱ्यांच्या हितचिंतकांना, ग्रामीण लोकसेवकांना, आणि कारभारकुशलांनाही उपयुक्त होईल, अशी माझी खात्री आहे.

'धूलिवंदन' ता. ६।३।३९] पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कऱ्हाड.

अनुक्रमणिका

प्रकरण १ लें, पृष्ठें १ ते ७८

भरीव योजनाही रा. वाघांच्या ‘ **क्रांतिकारक बजेट** ’ या प्रकरणांत बारीक बघणारांना आढळेल ! हीं प्रकरणें आणि एकंदर सर्व पुस्तकही विचारप्रवर्तक झालें असून, हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाची व तदनुषंगिक निकोप उन्नतीची जबाबदारी, जणूं आपल्या शिरावर पडली, तर आपण ती कशी पार पाडूं, याचें दिग्दर्शन आत्मविश्वासपूर्ण असें रा. वाघांनीं केलें आहे.

अशा योजना पुढें येऊन त्यांच्या मंथनानें जो दृढभाजक निघेल, तोच कदाचित राष्ट्रोपकारक ठरेल. म्हणून अशा योजनांपैकीं एकींचेंही महत्व यत्किंचित् कमी होत नाहीं. रा. वाघांनीं मांडलेली सदर पुस्तकांतील योजना ही अशा स्वयंपूर्ण योजनांपैकीं पहिलीच आहे, ही गोष्ट रा. वाघ यांना जशी अभिमानास्पद, तशीच अखिल महाराष्ट्रालाहि गौरवास्पदच नाहीं काय ? अशा योजना वस्तुस्थितीवर आधारून ध्येयाकडे नेणाऱ्या असल्यामुळें त्यांचा वाङ्मयसंसार हा वास्तववादी—ध्येयवादी असतो. यांत **कलेकरतां कला नसून वास्तवांतून ध्येयाचा विकास** कसा करावा, हें वाचकाला **कलाचतुराईनें** सांगावें लागतें. अर्थातच अंतःकरणांतील त्या विषयाचा जिव्हाळा ज्या मानानें जोराचा, त्या मानानें प्रतिपादनाचें वाङ्मय वाचकाला गुंगविणारें ठरतें. रा. वाघ यांचें पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचण्याचा मोह अनावर होतो, तो त्यांतील जिव्हाळ्यामुळेंच. पण त्यामुळेंच थोडासा दोष डोकावला आहे तो असा कीं, पुस्तकांत ग्रंथभाषेचें कांटेकोर गांभीर्य सांभाळलें न जातां, वर्तमानपत्री वळण दरवळलें आहे. पण कांट्याशिवाय गुलाब नाहीं, आणि रा. वाघांच्या आर्थिक नि सामाजिक प्रश्नासारख्या एरवीं निरस वाटणाऱ्या विषयाचा गुलाब फुलवण्याकरतां, वापरावी लागलेली वर्तमानपत्री वळणाची भाषा, म्हणजे केवळ गुलाबी थंडीचा कांटा ! तो कितीसा बोंचक होणार ? उलट तो रा. वाघांच्या लेखनाचें महत्वच वाढविणारा ठरेल !

ग्रामीण जीवनाचा सखोल अनुभव, विचारपूर्वक आंखणीचें धोरण, आस्थेवाईकपणें आर्थिक घडामोडींचा स्वदेशी अभ्यास, आणि जबाबदारीच्या कर्तव्यदक्ष जाणीवेनें केलेली नीटस योजना, हेंच रा. वाघ यांच्या पुस्तकाचें ‘ महत्त्वमापन ’, शेतकऱ्यांच्या हितचिंतकांना, ग्रामीण लोकसेवकांना, आणि कारभारकुशलांनाही उपयुक्त होईल, अशी माझी खात्री आहे.

‘ धूलिवंदन ’ ता. ६।३।३९] **पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कऱ्हाड.**

अनुक्रमणिका

प्रकरण १ लें, पृष्ठें १ ते ७८

प्रकरण २ रें, पृष्ठें ७९ ते १२२

शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा.

भाग १ ला, पृष्ठें ७९ ते ९६

भाग २ रा, पृष्ठें १५५ ते १७०

शंकासमाधान

प्रकरण ४ थें, पृष्ठें १७१ ते १८५

ऋणविमोचनाचें राष्ट्रीय स्वरूप व अखिल भारतीय स्थान !

प्रकरण ५ वें, पृष्ठें १८६ ते २३४

औद्योगिक क्रांति व राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य !

औद्योगिक क्रांति, भाग २ रा.

॥ वंदेमातरम् ॥

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
३	२७	कराल	करील
७	६	१८८५	१८७५
१४	१९	६	६ ३/४
२८	२१	लोकमान्मांनीं	लोकमान्यांनीं
९९	१०	आंतल्या	आलेल्या
१०४	१०	वाऱ्याचे	वाटपाचे
१०४	१४	वाऱ्याची	वाटगाची
११३	२२	२० ते ४० रु.	२० ते ५० रु.
२२०	२७	५०० कोटि	५००० कोटि
२४६	१९	वस्तु–विकय	वस्तु–विक्रय
२५४	९	जनतार्जनादनास	जनताजनार्दनास



शेतकरी-ऋणविमोचन

प्रकरण १ लें

आमचें दारिद्र्य व ऋणग्रस्तता.

इंग्रजी अमदानींतील ' आजचा हिंदुस्थान ' म्हणजे अठरा विश्वे दारिद्र्याचें मूर्तिमंत प्रतीक होय. दोनशें वर्षांपूर्वीं सुवर्णभूमि म्हणून त्रिखंडांत गाजलेला आमचा देश आज ' नांव सोनूबाई, हातीं कथलाचा वाळा ' या स्थितीप्रत आलेला पाहून पुढाऱ्यांचीं अंतःकरणें दुःखानें पिळवटून निघत आहेत. इंग्रजी अमदानीपूर्वीं पांच-सहाशें वर्षे हिंदुस्थान यावनी अमलाखालीं असतां जें दैन्य प्राप्त झालें नाहीं, तें इंग्रजी अमदानींत आलेलें पाहून, ' कालाय तस्मै नमः ' म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं. अरब, तुर्क, पठाण, मोंगल इत्यादि परकीय राज्यकर्त्यांनीं हा देश जिंकल्यानंतर या भरतभूमीस आपली मायभूमि समजून तिच्या अभिवृद्धीसाठीं सतत प्रयत्न केले; इतकेंच नव्हे तर आपल्या मूळच्या मायदेशाकडून वेळोवेळीं होणाऱ्या हल्ल्या प्रतिहल्ल्यास तोंड देऊन हिंदुस्थानची होणारी लूट थांबवून धरली ! त्यामुळें देश पारतंत्र्यांत असूनसुद्धां या सुवर्णभूमीचा सुवर्णकस कमी न होतां तो वाढतच गेला. पण इंग्रज राज्यकर्त्यांची राज्य करण्याची तऱ्हाच न्यारी ! ते सहा हजार मैलांवरून साता समुद्रांपलीकडे राहून आपल्या गोऱ्या नोकरशाहीकडून येथील राज्यकारभार पाहाणार ! हिंदुस्थान म्हणजे सोन्याचीं अंडीं प्रसवणारी हंसी ! हिंदुस्थान म्हणजे भरगच्च चारा मिळण्याचें राखीव कुरण ! हिंदुस्थान म्हणजे कच्च्या मालाची खाण ! व पक्क्या मालाची गिऱ्हाइकी ! इत्यादि स्वार्थी कल्पनांनीं इंग्रज समाज व राज्यकर्ते भार-
त्यामुळें आज आम्हांला दैन्य प्राप्त झालें आहे. इंग्रजी अमदानींत परदेशीं जाणाऱ्या द्रव्याचा अखंड ओघ पाहिला म्हणजे काळीज चर्र होऊन जातें !

हिंदुस्थानांतून दरवर्षी २२० कोट रुपये इंग्लंडला जात आहेत! हे पैसे जाण्याचे पद्धतशीर मार्ग चारपांच आहेत—(१) पहिला मार्ग म्हणजे होम-चार्जेसचा! इंग्लंडनें कधींकाळीं हिंदुस्थानला पोष्ट, पाटबंधारे बांधण्याकरितां कर्ज दिलें होतें असें म्हणतात. या कर्जावर त्यांना व्याज पोंचविणें भाग आहे. वास्तविक इंग्लंडनें मूळ रकमेच्या किती तरी पट रक्कम आतांपर्यंत वसूल केली असेल! पण त्यांचें मुद्दल मात्र कायम आहे! याशिवाय इकडील नोकर लोकांच्या पगारांतील व मिळकतींतील शिल्लक रकमा, त्यांचीं पेन्शनें इत्यादि-पायीं जाणारा पैसा.

(२) पैसे जाण्याचा दुसरा मार्ग म्हणजे जहाजाच्या वाहतुकीचे पैसे, बँका व विमाकंपन्यांचें देणें.

(३) पैसे जाण्याचा तिसरा मार्ग, तिकडील लोकांनीं इकडे गुंतविलेल्या कर्जाची फेड. ही कर्जफेड सरकारी व खाजगी भांडवलाची, अशी दुहेरी असते.

(४) इंग्रजी कंपन्यांनीं कोट्यवधि रुपयांचें भांडवल गुंतवून इकडे उभार-लेल्या उद्योगधंद्यांतील अलोट नफा, हा पैसे जाण्याचा चौथा मार्ग होय! या चारहि मार्गांनीं दरवर्षीं सुमारें २२० कोटी रुपये परदेशीं जातात असें प्रो० शहा व खंबाटा म्हणतात. या आकड्यांचा निर्वाळा देण्यासाठीं त्यांनीं पुढील-प्रमाणें हिशोब दिला आहे.

पैसे जाण्याचे राजमार्ग	कोटी रुपये
(१) होमचार्जेस	५०—०
(२) परक्या भांडवलावरील व्याज	६०—०
(३) जहाजांची वाहतूक	४१-६३
(४) बँकेचें कमिशन	१५—०
(५) व्यापारांतील नगदी नफा	५३-२५
एकूण	२१९-८८

या हिशोबानें आजपर्यंत हिंदुस्थान गेल्या दीडदोनशें वर्षांत किती लुटला गेला असेल, याचा हिशेब करण्याचें धाडस ज्याला करवत असेल त्यानें खुशाल करावें!

हिंदुस्थानच्या आर्थिक पारतंत्र्याची कल्पना चित्रमय जगतनें १९३० च्या खास अंकांत पुढीलप्रमाणें केली आहे, ती वस्तुस्थितीची बरोबर निदर्शक ठरते. " पैसा हा उद्योगधंद्याचा व व्यापाराचा प्राण आहे. तो प्राण सर्वस्वीं राज्यकर्त्यांच्या हातांत गेल्यापासून त्यांना हिंदुस्थानांत अनेक चमत्कार करून दाखवितां आले व ते त्यांनीं दाखविले. हिंदुस्थानचा उद्योगधंदा या पैशांनीं (हिंदुस्थानांत स्थापन केलेल्या बँकांनीं) मारला, आपले उद्योगधंदे चांगले भरभराटीस आणिले आणि यापुढें केव्हांही जोंपर्यंत त्यांच्या हातीं पैसा आहे, तोंपर्यंत आमचे उद्योगधंदे सुधारणें शक्य नाहीं, अशी परिस्थिति निर्माण करून ठेविली. बँका हा त्यांपैकीं एक मार्ग आहे. हुंडणावळीची जादुगिरी, आमच्या इंग्लंडमधील गंगाजळीचा इंग्रज व्यापारी करीत आलेला वाटेल तसा उपयोग, रिझर्व बँकेसारखे अचूक मारक उपाय, सोनेरी चलनाविरुद्ध त्यांचें धोरण इत्यादि अनेक कारणें आमच्या उद्योगधंद्याच्या परावलंबनाला, नव्हे दारिद्रयाला कारणीभूत झालीं आहेत, हें विसरतां कामा नये. कित्येक लोक म्हणतात कीं, हिंदुस्थानचे उद्योगधंदे नव्या यांत्रिक शोधांपुढें टिकले नसते. पण हा आरोप अत्यंत दुष्टपणाचा आहे. आमच्याकडे कारागीर होते, कुशलता होती, पैसे होते, बुद्धिमत्ता होती, पण सत्ता नव्हती ! त्या सत्तेचा उपयोग क्रूरपणें केला गेला आणि त्यायोगानें आमच्यांतील एकेक गुण नष्ट करण्यांत आला. "

" इतक्या प्रकारें जरी हिंदुस्थान धुतला गेला, तरी त्यांचें कर्ज आमच्या डोक्यावर आहे तें आहेच ! ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार जेव्हां संपला, तेव्हां त्यांनीं आमचे डोक्यावर १०५ कोटींचें कर्ज लादलें होतें. तें कर्ज कशाकरितां, तर आम्हांला जिंकण्याकरितां ! हिंदुस्थान जिंकण्याकरितां त्यांना ज्या लढाया कराव्या लागल्या त्या अर्थात आमच्याच कल्याणाकरितां होत्या व त्यांचें कर्ज देणें आमचें कर्तव्यच होतें ! या कर्जावर व्याज देतां देतां हिंदुस्थानची कंबर मोडून गेली. १८३८ पर्यंत हिंदुस्थानांतून १२००० कोटी रुपये नेले होते, तरी कंपनीचें कर्ज कायमच होतें. कंपनीनें अफगाणिस्थानांत व चीनमध्यें जीं युद्धें केलीं, त्यांचा खर्च हिंदुस्थानचे डोक्यावर लादला. हिंदुस्थानचें करांपासून होणारें उत्पन्न हें कंपनीच्या राज्यांतच काय, पण त्यानंतरसुद्धां खर्चापेक्षां अधिक होतें. खर्चापेक्षां उत्पन्न जास्त असून, कर्जाचा बोजा डोक्यावर असलेलें राज्य

हिंदुस्थानशिवाय जगांत दुसरें कोणतेंही नसेल ! असें असतांना हिंदुस्थान कर्ज-बाजारी कसा ? कंपनी सरकारचे वेळीं व नंतरही ते इंग्लंडमध्यें जो पैसा खर्च करीत, तोहि खर्चाचे सदरांत घालीत. जगांतील कोठल्याही न्यायासनापुढें ही परिस्थिति मांडिली असती तर त्यानें आम्हांला कर्ज नाहीं, एवढेंच नव्हे तर इंग्लंड आमचें कर्ज लागतें, असा निकाल दिला असता. पण ' होमचार्जेस ' या नांवाखालीं त्यांनीं इंग्लंडांत पैसा खर्चावा व तो आमचे खातीं वजा घालावा, असा जो पायंडा घातला गेला तो अजूनही संपला नाहीं. एखादें युद्ध झालें, अगर एखादें बंड झालें तरी त्याचा खर्च आम्हांला सोसावा लागतो. जणुं काय इंग्लंडला हिंदुस्थानची जरुरीच नसे ! असा बिनभांडवली धंदा करणाऱ्या इंग्रजांची धन्य होय ! तेव्हां हिंदुस्थानचें कर्ज म्हणजे इंग्रजांनीं हिंदुस्थानांत ओतलेला पैसा नसून, आमच्या बोकांडीं इंग्रजांना पोसण्याकरितां व त्यांचें राज्य टिकविण्याकरितां लादलेलें कर्ज होय ! अशा प्रकारचें भयंकर कर्ज आमच्यावर लादण्यांत येतें; त्याचें व्याज आम्हांला द्यावें लागतें. शिवाय दर वर्षी इंग्लंडला ईस्ट इंडिया कंपनीच्या मुदलावर व्याज, इंग्लंडमध्यें पेन्शन घेऊन बसणाऱ्यांना पैसे, तेथील हायकमिशनरचा खर्च इत्यादि अनेक प्रकारें आम्ही लुबाडले जातों. पैशाचा व उद्योगधंद्यांचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळें ईस्टइंडिया कंपनीनें पहिल्या-पासून अशी खबरदारी घेतली कीं, येथील पैसा नेतां येईल त्या मार्गानें न्यावा, लोकांवर कर्जाचा बोजा बसवावा, म्हणजे त्या बोजाखालीं आमचें राष्ट्र चिर-डून जाऊन पुन्हा केव्हांही त्यांतून मुक्त होणार नाहीं. त्यांचें धोरण किती यशस्वी झालें हें आपण पाहात आहोंतच. इंग्रज सरकारच्या हातून आमचे हातीं राज्य येईल, तेव्हां त्यांचीं कर्जें व त्यांचे जावईहक्क पुरवितां पुरवितां आमचा प्राण कंठास येईल, आणि तेव्हांच कंपनीच्या कुटिल कारस्थानाची बरोबर कल्पना येईल. स्वराज्य मिळाल्यानन्तरसुद्धां या देशाला औद्योगिक दृष्ट्या किती स्वतंत्र होतां येईल हा प्रश्नच आहे. आज अशी परिस्थिति व हें आर्थिक पारतंत्र्य आम्हांला दिसत असूनसुद्धां त्यांतून मार्ग काढणें अशक्य झालें आहे. हिंदु-स्थानाला कंगाल करण्याकरितां काय काय उपाय योजण्यांत आले आहेत, हें वरील हकीगतीवरून दिसतें. बँका, रेलवे वगैरे साधनें फार सुंदर दिसतात, पण यांचा उपयोग राज्यकर्त्यांना आपली भांडवलशाही वाढविण्याकरितां कसा होतो

हें यावरून समजून येतें. राजकीय पारतंत्र्यापेक्षां हिंदुस्थानचें आर्थिक पारतंत्र्य–नव्हे मूर्तिमंत दारिद्र्य अधिक भयंकर आहे. त्या पारतंत्र्यांतील एकही दुवा अद्याप निखळला नाहीं. त्यामुळें हिंदुस्थान दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल बनत चालला आहे; आणि हें द्रव्यशोषण जर लौकर थांबलें नाहीं तर स्वराज्य अगर स्वातंत्र्य मिळालें तरी त्याचा उपयोग होणें शक्य नाहीं."

आमच्या दारिद्र्याची खरी कारणमीमांसा वर लिहिल्याप्रमाणें आहे. त्यामुळें आमचें दारिद्र्य वाढत जाऊन तें आज पराकोटीला जाऊन पोंचलें आहे. परकीय लोकांच्या उत्पन्नाशीं आमची तुलना केली असतां आमच्या दारिद्र्याची कल्पना पुढील उताऱ्यावरून लक्ष्यांत येईल. "हिंदुस्थान अत्यंत श्रीमंत आहे, अशी फार दिवसांपासून प्रचलित समजूत होती. इंग्रजी अमलांत हीच समजूत ठेवणें इंग्रजांच्या हिताचें होतें. पण चोहोंकडे दारिद्र्य व खाण्यापिण्याचे हाल दिसूं लागल्यामुळें कांहीं विचारी लोकांना आंकडेमोड करून हिंदुस्थानची डोईप्राप्ति काढणें इष्ट वाटलें. या आंकडेमोडीनंतर जो प्रकार दिसून आला तो फारच भयंकर असा होता. कै. दादाभाई नौरोजी यांनीं प्रथम ही आंकडेमोड करून माणशीं उत्पन्न २० रुपये पडतें असें सिद्ध केलें. त्यांनीं १८७० चें गणित केलें. त्यांत त्यांनीं खालीलप्रमाणें आंकडे धरले.

"(१) शेतीचें उत्पन्न २६० कोटी रुपये; (२) मीठ, अफू, कोळसा व धंद्यांतील नफा १७ कोट रु. (३) उत्पादक धंदे १५ कोट रु. (४) मांस, मासळी व दूध १५ कोट रु. (५) इतर ३३ कोट रु.; एकूण ३४० कोटी रुपये. त्या वेळीं त्यांनीं ब्रिटिश हिंदुस्थानची लोकसंख्या १७॥ कोटी धरली व माणशीं उत्पन्न २० रुपये म्हणजे दरमहा रु. १–१०–८ पै म्हणजे दररोज पाऊण आणा पडतें असें दाखविलें. त्यानंतर सन १८८२ सालची मोजदाद सर बार्नर यांनीं केली. बिगर शेतीचें उत्पन्न त्यांनीं शेतीच्या निम्पट धरलें व हिशोब केला तो असा—(१) शेतीचें उत्पन्न ३५० कोटी रु. (२) बिगर शेतीचें उत्पन्न १७५ कोटी रुपये. त्यांनीं धरलेली लोकसंख्या १९$\frac{1}{2}$ कोटी होती व त्यांच्या हिशोबानें माणशीं उत्पन्न वार्षिक २७ रुपये पडलें. यानंतर डिग्बी साहेबांनीं तिसरा प्रयत्न केला. त्यांनीं सरकार-सारा मोजला व त्यावरून एकंदर

उत्पन्न काढलें. त्यांनीं केलेली मोजदाद १८९९ सालची होती. त्यांच्या हिशोबानें माणशीं उत्पन्न खालीलप्रमाणें भरलें—

"(१) शेतीचें उत्पन्न २८५ कोटी रु. (२) बिगर शेतीचें उत्पन्न १४३ कोटी रु.; एकूण ४२८ कोटी रु.; त्यांनीं लोकसंख्या २४॥ कोटी धरली व माणशीं उत्पन्न रु. १७—८—५ पै पडतें असें ठरविलें. त्यानंतर हिंदुस्थानचे व्हॉइसराय लॉर्ड कर्झनसाहेब यांनीं पुढीलप्रमाणें प्रयत्न केला. त्यांनीं (१) शेतकीचें उत्पन्न ४५० कोटी रुपये, (२) बिगर शेतीचें उत्पन्न २२५ कोटी रुपये, एकूण ६७५ कोटी रुपये धरलें. त्यांनीं त्या वेळेस लोकसंख्या २२॥ कोटी धरली व माणशीं उत्पन्न ३० रुपये पडतें असा शोध लावला. यानंतर १९११ सालीं सर फिंडले शिरास यांनीं आंकडेमोड करून ५० रुपये माणशीं उत्पन्न ठरविलें. हे आंकडे कमीअधिक धरले तरी ५० रुपयांवर उत्पन्न जाऊं शकत नाहीं हें निश्चित आहे. यावरून आमची स्थिति किती भयंकर आहे हें लक्षांत येतें. त्यानंतर प्रो. शहा व प्रो. खंबाटा या लेखकांनीं गणित करून आपल्या पुस्तकांत हें उत्पन्न वार्षिक ६० रुपये म्हणजे दरमहा ५ रुपये पडतें असें दाखविलें. या ६० रुपयांतून, परदेशीं जाणाऱ्या २२० कोटी रुपयांचा माणशीं कर ७ रुपये वजा केल्यास खरें उत्पन्न ५३ रुपयेच पडतें असें दाखविलें आहे. त्यांनीं विचारांत घेतलेले आंकडे १९२०—२१ च्या अत्यंत महागाईतले असल्यामुळें, आज त्या उत्पन्नाची उतरत्या बाजारभावानें किंमत ३० रुपयेसुद्धां होईल किंवा नाहीं याची शंका वाटते." (चित्रमय जगत् १९३०.)

सन १९२१—२२ सालीं जगांतील मुख्य मुख्य देशांतील माणशीं उत्पन्न खालीलप्रमाणें होतें.—"(१) इंग्लंड ७५० रु. (२) अमेरिका १०८० रुपये, (३) जर्मनी ४५० रु. (४) फ्रान्स ५७० रुपये, (५) इटली ३४५ रु. (६) ऑस्ट्रेलिया ८१० रुपये, (७) कानडा ६०० रुपये, (८) हिंदुस्थान ५३ रुपये." (चित्रमय जगत् १९३०)

हिंदुस्थानच्या प्रत्येक माणसाचें वार्षिक उत्पन्न ५३ रुपये धरलें आहे. त्यांत सरकारी सर्व प्रकारच्या करांचें माणशीं प्रमाण १२॥ रुपये पडतें. कराची विभागणी—(१) सरकारी कर २९० कोटी रुपये, (२) स्थानिक सरकारी

कर २५ कोटी रुपये, (३) संस्थानिक कर ७५ कोटी रुपये. एकूण ४०० कोटी रुपये. सरासरी कर १२॥ रुपये माणशीं पडत आहे. तो ५३ रुपये उत्पन्नांतून वजा केल्यास ४०$\frac{1}{2}$ रुपये उरतात. या उत्पन्नांत पोट भरणारे लोक भाग्यशाली होत. याशिवाय या देशांतील शेतकऱ्यांचा सुमारें एक हजार कोट रुपयांचा कर्जबाजारीपणा व त्यावरील १०० ते १५० कोटी रुपये व्याज लक्षांत घेतल्यास हिंदुस्थान जगत नसून मृत्यूचे दिवस मोजीत आहे असेंच म्हणावें लागतें.

" हिंदुस्थानांतील इंग्रज माणूस किती पैसे मिळवीत असेल, हें पाहिलें म्हणजे आश्चर्य वाटतें. प्रत्येक माणसाचें उत्पन्न काढण्याचें साधन नाहीं. पण येथील ७००० सरकारी नोकर, डॉक्टर, वकील वगैरे वर्षाला ४॥ कोट रुपये इंग्लंडला आपले पैसे पाठवितात. त्यांचें सरासरी उत्पन्न १०००० रुपये धरावयास हरकत नाहीं. कोठें ४० रुपये तर कोठें १०००० रुपये !"

(चित्रमय जगत् १९३०)

" ब्रिटनची ४२० लक्ष प्रजा जितका पैसा, अन्न, पेय व दारू वगैरेंत खर्च करिते, तितकी हिंदुस्थानच्या ३३ कोटी प्रजेची वार्षिक कमाई आहे ! १८५० सालीं दरमाणशीं सुमारें २ आणे उत्पन्न होतें. १८८० सालीं तें १॥ आणा झालें व १९०० सालीं $\frac{3}{4}$ आण्यावर आलें, असें डिग्बी साहेबांनीं सरकारी कागदपत्रांवरून सिद्ध केलें आहे. लॉर्ड कर्झन यांनीं दर माणशीं वार्षिक उत्पन्न २३ शिलिंग म्हणजे १७। रुपये आहे, असें अनुमान काढलें. लॉर्ड रिपन यांचे कारकीर्दींत तें २७ रु. ठरविण्यांत आलें, मोर्ले साहेबांनीं हिंदुस्थान श्रीमंत आहे हें सिद्ध करण्याकरितां एक सुंदर चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात, ' हिंदुस्थानच्या बायका पूर्वीं मातीच्या घागरी डोकीवर घेऊन जात असत, पण हल्लीं त्या तांब्याच्या घेतात. ' यावरून आमची श्रीमंती दिसावी हें आमचें दुर्भाग्य होय ! उकिरडा फुंकून राहणाऱ्या भारवाहकाचेपेक्षां आमची स्थिति चांगली आहे व आमच्यापेक्षां जास्त दुःखी लोक जगांत आहेत, हें सांगण्यास आम्हांस मोर्ले साहेबांची जरूरी नाहीं. " (केसरीप्रबोध)

खेड्यांतील मजूर वर्ग व शेतकरी यांच्याकडे दृष्टि फेकली तर आमच्या दारिद्रयाची व निर्धनतेची पूर्ण कल्पना येते. दक्षिणेंतील शेतकऱ्यांना फक्त १४ रु.

दरवर्षी खर्च करण्यास मिळतात, असें स्पेन्ससाहेब म्हणतात. अशा स्थितींत त्यांनीं काय खावें व काय शिल्लक टाकावें हें एक ईश्वरच जाणे! यांतच दैवी कोप होऊन दुष्काळ पडल्यास साराच ग्रंथ आटोपला म्हणून समजावें. सन १८५४ ते १९०० पर्यंतच्या दुष्काळानें २,८८,२५,००० लोक मेले, असें डिग्बी-साहेब म्हणतात! सन १८७५ सालच्या दुष्काळांत एकट्या महाराष्ट्रांतील ६०,००,००० लोक मृत्यूमुखीं पडले, तर १८६६च्या ओढ्या प्रांतांतील दुष्काळांत ३० लाख लोक मेले असें इतिहास टाहो फोडून सांगत आहे.

या साऱ्या आपत्तीचें मूळ कारण आमच्या उद्योगधंद्यांचा क्रूरपणें झालेला नाश व परदेशीं जाणाऱ्या द्रव्याची सनदशीर अखंड लूट हीच होय!

अशा प्रकारें कोट्यवधि लोक जर इंग्लंडमध्यें अन्नपाण्यावांचून तडफडून मेले असते, तर त्यांनीं ही परिस्थिति सहन केली असती का? पण आम्ही पारतंत्र्यांत अडकल्यामुळें दारिद्र्यांत मरून चूर झालों, त्या आमची करुण हाक कोणास ऐकूं येणार? व ती कोण ऐकणार? त्या काळीं अन्नपाण्यावांचून पटपटा मेलेल्या लोकांचीं हृदयद्रावक वर्णनें वाचून कोणालाही संताप आल्यावांचून रहाणार नाहीं. प्रेतांचे खचच्या खच तडफडत, तळमळत, मृत्यूची वाट पाहात व त्याची प्रार्थना करीत रस्तोरस्तीं पडले होते. तो ५० वर्षांपूर्वीचा मागील काळ सोडून सन १९१८च्या अलीकडच्या सुधारणेच्या काळांतील एन्फ्ल्युएंझाच्या सांथीच्या तापांत मृत्युमुखीं पडलेल्या लोकांचा सरकारी आंकडा पाहिल्यास तो ७० लाखांच्या पुढें जातो! आणि हा सर्व खेळ अवघ्या ४।६ महिन्यांत हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत घडून येतो. इंग्रजी अमदानींतील हिंदुस्थानचें हें भयानक दृश्य पाहिल्यास आमचें जिणें तृणवत् कसें झालें आहे, याची स्पष्ट कल्पना येईल! कोठूनही दुष्काळ, रोगराई यांची ठिणगी पडण्याचा अवकाश, कीं त्या मृत्यूच्या होमकुंडांत आमच्या आहुत्या पडल्याच म्हणून समजावें! इंग्लंड वैभवाच्या व सुधारणेच्या पराकोटीस पोंचलें असतां त्यांच्या अमलाखालीं शेंदीडशें वर्षांतच हिंदवासीयांचें जीवन तृणतुच्छ व्हावें, हा दैवदुर्विलासच नव्हे तर काय? जगाच्या इतिहासांत इंग्रजी अमदानींतील हिंदुस्थानच्या परिस्थितीस तोड सांपडणार नाहीं!.........

" तुरुंगांतील कैद्याला किती अन्न देतात तें पाहूं, म्हणजे यावरून आमच्या जीवनाची कल्पना होईल. मुंबईच्या तुरुंगांत कणिक, डाळ, तांदूळ, पीठ वगैरे मिळून प्रत्येक कैद्याला ३९॥ औंस मिळतात, बंगाल्यांत ४०¾, बहार ५६½, मद्रास ४.३¾, पंजाब ३९¼ व मध्यप्रांत ३९ औंस इतकें अन्न देतात. याची किंमत अदमासें रोज ४ आणे होते. म्हणजे तुरुंगांतल्या कैद्याला वर्षाला ९० रु. पडतात. लष्करांतल्या माणसाला किंवा दुष्काळी माणसाला हिंदी माणसापेक्षां अधिक उत्पन्न असतें. तेव्हां खरा तुरुंग कोणता ? हिंदुस्थान का कैदखाना ? या दोहोंत सुखी कोण ?

" या परिस्थितीला हिंदुस्थानांतून जाणारा पैसाच कारणीभूत आहे. याशिवाय या देशांत सर्व प्रकारच्या वसूल होणाऱ्या ४०० कोटी रुपये करापैकीं, २०० कोटी येथें पगार वगैरेकडे खर्च होतात, ५० कोटी होमचार्जेस म्हणून जातात, १० कोटी संस्थानिकांच्या तैनातीला व प्रवासाला खर्ची पडतात आणि बाकीचे १४० कोटी रु. आम्ही जिंकले गेलों आहोंत, म्हणून इंग्रजांना द्यावे लागतात."

(चित्रमय जगत् १९३०)

आमच्या कर्जबाजारीपणास तर सीमाच राहिली नाहीं. कोणीं किती कर्ज काढावें, यास तर मापच नाहीं ! हिंदुस्थान दारिद्र्याच्या अंतिम टोंकास जात असतां, सालोसाल राष्ट्रीय कर्जाचा भार आमच्या डोक्यावर सारखा फुगतच चालला आहे. कंपनीसरकारकडून सरकारच्या हातीं सत्ता गेली, तेव्हां राष्ट्रीय कर्ज १०५ कोटी रुपये होतें. तें वाढतां वाढतां १९२७ सालीं ९७५ कोटी रुपये झालें, व आज हा आंकडा १२०० कोटीच्यावर गेल्याचें सरकारी रिपोर्टावरून दिसतें. यांतील कांहीं कर्ज रेल्वे, पाटबंधारे यांसारख्या लोकोपयोगि कामांसाठीं असलें, तरी अनवश्यक कर्जाचा भार कल्पनातीत वाढला आहे. या कर्जाच्या व्याजापायीं आमची तिजोरी सालोसाल रिती होत असून, राष्ट्रसंवर्धक बाबींकडे खर्चावयास पैसा नाहीं म्हणून आम्ही हताश झालों आहोंत. त्यामुळें आमची व आमच्या उद्योगधंद्यांची उपासमार सारखी सुरूच आहे. त्यांत शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा पाहिला म्हणजे तर छाती फाटूनच जाते. तज्ज्ञांच्या मतें या देशांतील शेतकऱ्यांवर सुमारें १००० कोटी रुपयांचें कर्ज असावें. आपल्या मुंबई इलाख्यांतील

शेतकऱ्यांवर हा कर्जाचा बोजा सुमारें १०० कोटी रुपये असून पंजाबसारख्या सुपीक व समृद्ध शेतकऱ्यांवर तो १३५ कोटी रुपये आहे, असें सरकारी वृत्त मागें प्रसिद्ध झालें होतें. यावरून आपल्या हलाखीचें आणखी कोणतें माप घ्यावयाचें राहिलें आहे ?

इंग्रजी अम्मल सुरू होण्यापूर्वीं या देशांत अनेक प्रकारचे कारखाने सुरू होते. परदेशचे व्यापारी येथील अत्यंत बहुमोल असा माल खरेदी करीत असत. त्या वेळीं जगांतील सारे रुपेरी झरे, समुद्रास नद्या वाहात जाव्यात त्याप्रमाणें हिंदुस्थानकडे वाहात जात होते. परंतु इंग्रजांचे पाय आमच्या देशास लागल्यापासून हें सर्व गाडें उलटलें गेलें ! त्या वेळच्या आमच्या वैभवाचें वर्णन करितांना चित्रमयजगतकार म्हणतात कीं, " हिंदुस्थानांत औद्योगिक संपत्तीचा झरा अखंड वाहात असल्यामुळें शहरांप्रमाणेंच खेडींहि चांगलीं भरभराटलेलीं होतीं. खेडोपाडीं स्वतःचे उद्योगधंदे व शेती असल्यामुळें लोकांना कोणत्याहि प्रकारची उणीव भासत नसे. सारे लोक सुखांत, समाधानांत आणि आनंदांत विहरत होते. पुढें पाश्चात्य व्यापाररूपी राक्षस हिंदुस्थानांत येईल आणि आमच्या सौख्याला वणवा लावील, अशी कल्पनाहि कोणाला चुकून करवली नसेल ! पण सुंदर स्त्रीचें सौंदर्य जसें तिच्या नाशास कारणीभूत होतें, तशी स्थिति हिंदुस्थानची झाली. आमचा तयार माल नेण्याकरितां आलेले पाहुणे, आमचा व्यापार मारून कसा टाकतां येईल, याचा विचार करूं लागले. हिंदुस्थानचा व्यापार बुडवून इंग्लंडचा व्यापार कसा उभारतां येईल, याची त्यांना काळजी लागली व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न सुरू झाले. औद्योगिक दृष्ट्या अत्यंत भक्कम पायावर उभ्या असलेल्या हिंदुस्थानला पादाक्रांत करणें इंग्लंडला कठीण गेलें. व राक्षसी कायदे करून व बेसुमार लूट नेऊनच त्यांनीं आमचा व्यापार बुडवून टाकिला, असें इतिहास सांगतो. हिंदुस्थान त्या काळीं संपन्न होता आणि आज कंगाल बनला आहे. हिंदुस्थानच्या त्या काळच्या ऐश्वर्यसंपन्न राहणीचा हेवा आजच्या संपन्न राष्ट्रालासुद्धां वाटावा इतकें ऐश्वर्य त्या काळीं येथें नांदत होतें. आजच्याप्रमाणें अन्नाकरितां कष्टी होणें हें तेव्हां कोणालाही ठाऊकच नव्हतें. मनुष्यमात्राच्या जीवनाला अवश्य असणाऱ्या वस्तूंची तेव्हां रेलचेल असे, व रुपायासव्वारुपायांत प्रत्येकजण आपला संसार अत्यंत सुखानें हाकीत असे. अन्न आणि

वस्त्र यांची कमतरता कोणाला पडे, असें पाहूं गेलें असतांहि आढळावयाचें नाहीं. स्वस्तता तर इतकी होती कीं, विचारावयास नको. त्या वेळीं विजयानगर हें जगांतील अत्यंत मोठें व श्रीमान राज्य होतें व तेथें स्वस्ततांहि तशीच होती. एक युरोपियन इकडील देशांत फक्त ५० शिलिंगांत प्रवास करून गेला! तो दहा महिने येथें होता. या दहा महिन्यांत त्याला फक्त २ आणेच रोजचे खर्चावे लागत. बंगाल, गुजराथ, पंजाब वगैरे प्रांतांतही अशीच कमालीची स्वस्तता असे. ज्यांचें उत्पन्न मोठें असे, ते तर अक्षरशः श्रीमंतींत लोळत असत. अंगाला अत्तरें लावणारे व रेशमी कपड्यांशिवाय दुसरे कपडे न वापरणारे असे तेव्हांचे श्रीमंत लोक असत. आज इंग्लंडमध्यें जितक्या श्रीमंतीनें लोक राहातात, तितक्याच श्रीमंतींत त्या वेळीं आम्ही राहात होतों. पण इंग्रजांच्या सत्तेचा प्रभाव जसजसा पडूं लागला व येथील संपत्ति जशी जशी परप्रांतीं जाऊं लागली, तसतशी आमच्या वैभवाला उतरती कळा लागली आणि अन्नवस्त्राविना उपाशी व चिंध्या घालणारीं माणसें दिसूं लागलीं. ही परिस्थिति येण्यास आमच्या उद्योगधंद्यांचा नाश कारणीभूत झाला. हिंदुस्थानच्यामागें लागलेला दुष्काळ व इतर अनेक आपत्ति, यांला आमचें उद्योगधंद्यांतून झालेलें पूर्ण उच्चाटण हेंच कारण आहे. खेडोपाडीं व गांवोगांवीं असलेले दुय्यम धंदे युरोपीयनांच्या स्वार्थ साधण्याच्या खाईत जळून खाक झाले. पूर्वीं शेतकरी जो उत्तम प्रकारें जगत असे, त्याला कारण दुय्यम धंद्याची असणारी जोड असे. आज या धंद्याविना तो उघडा पडला आहे. ह्या परिस्थितींत सुधारणा न केल्यास पुढच्या भयंकर काळांत हिंदुस्थानचा स्वाहा होऊन आम्ही चहूं बाजूंनीं गुलाम बनल्यावांचून राहाणार नाहीं."

(चित्रमय जगत् १९३०)

अशा तऱ्हेच्या भीषण परिस्थितींत प्रांतिक स्वायत्ततेच्या राज्यकारभाराच्या किल्ल्या काँग्रेस प्रधानमंडळांकडे आलेल्या आहेत. त्यांतून ते कसा मार्ग काढतात यावरच त्यांची लोकप्रियता कसास लागणार आहे. म्हणून या खडतर परिस्थितींतून शेतकरी जीवनाचें तारू सुखरूपपणें पैलतीरास नेण्यासाठीं करावयाची योजना आर्थिक व नैतिक पायावर भक्कम उभारली पाहिजे. त्या दृष्टीनें प्रस्तुत लेखकानें सर्वत्र व्यावहारिक उपाययोजना सुचविल्या असून, ह्या कार्याची धुरा काँग्रेस प्रधानमंडळांनीं आपल्या खांद्यावर घ्यावी अशी विनंति केली आहे. तिचा

ते अवलंब करतील अशी आशा आहे.

हिंदुस्थान हें पक्क्या मालाचें गिऱ्हाईक होण्यासाठीं व सतत तें तसें राहावें म्हणून राज्यकर्त्यांचे आजपर्यंत सतत प्रयत्न चालले होते व आहेत. म्हणून प्रधानमंडळांनीं हा प्रश्न लोकांवर सर्वस्वी सोपवून कार्यभाग होणार नाहीं. मोठ-मोठ्या उद्योगधंद्यांच्या योजनेचें विचारचक्र काँग्रेसच्या गोटांत सुरू झालें असून त्यास लवकरच मूर्तस्वरूप आणण्याचे प्रयत्न राष्ट्राध्यक्ष बाबू सुभाषचंद्र बोस व पंडित जवाहिरलाल नेहरू ह्या लोकाग्रणींनीं सुरू केलें असून, नऊ प्रांतांतील काँग्रेस प्रधानमंडळांच्या हुकमी शक्तीचा ते उपयोग करून घेणार आहेत; ही अत्यंत आशाजनक गोष्ट होय. मोठमोठ्या उद्योगधंद्यांप्रमाणेंच शेतकरी जीवनांत लहान जोडधंद्यांचें महत्त्व फार मोठें आहे. कारण हे धंदे घरच्याघरीं होणार असून, त्यांत कुटुंबांतील सर्व माणसें कामास गुंतलीं जातील व अल्प खर्चांत स्वस्त मालाची निपज करून, परकीय मालाशीं टक्कर देणें सुलभ जाईल. हे जोडधंदे सरकारी नियंत्रणाखालीं सुरू करून त्यांची जोपासना व वाढ व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीनें मांडलेली येथील योजना मंत्रिमंडळास मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

उद्योगधंद्यांची वाढ झाली, शेती भरभराटीस आली, कर्जबाजारीपणावर नियंत्रण पडलें, व्यसनें व उधळपट्टीचे मार्ग नेस्तनाबूद झाले, कोर्टबाजीचें व कर्जदलालीचें निर्मूलन झालें, तरच ह्या परिस्थितींत रुपयांत आठ आणे सुधारणा झाली असें म्हणतां येईल. आज इतकी धडाडी प्रांतिक सरकारला मिळालेल्या मर्यादित क्षेत्रांत दाखवितां येईल, याची प्रस्तुत लेखकाला खात्री वाटते. परदेशीं जाणाऱ्या द्रव्याचा ओघ पूर्ण स्वातंत्र्याशिवाय थांबणें शक्य नाहीं ! तें पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यास, खेड्यांतील कोट्यवधि जनता कार्यक्षम केल्याशिवाय मार्ग नाहीं. खेड्यांतील जनता दारिद्र्यानें पिळून निघाली असून, रोजच्या जगण्याच्या विवंचनेंत गुरफटून गेली आहे ! शहरी वातावरणांत होणाऱ्या चळवळींचें लोण खेड्यापाड्यांतून—प्रत्येक घरांतून—पोंचल्याशिवाय राष्ट्रीय सामुदायिक चळवळ सतत तेवत राहणार नाहीं. या सामुदायिक चळवळीचे एकसारखे चटके बसल्याशिवाय, पारतंत्र्याची पकड ढिली होणार नाहीं. म्हणून प्रत्येक खेडेगांव

संघटित, संपन्न व बलवान केल्याशिवाय हा दारिद्याचा अर्थात् स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणार नाहीं, याची जाणीव मंत्रिमंडळानें सतत ठेविली पाहिजे.

खेडेगांव संघटित व संपन्न होण्यास तेथील सर्व कारभार तेथील हुषार व कार्यदक्ष पुढाऱ्यांच्या हातीं दिला पाहिजे. त्या दृष्टीनें विचार करून पुढें ग्रामपंचायतीची निवडणूक व कामें हा भाग लिहिला आहे. त्याचा बारकाईनें विचार केल्यास हा प्रश्न वाटतो तितका अवघड नाहीं अशी सर्वांची खात्री होईल.

कर्जबाजारीपणाचीं मूलभूत कारणें.

(१) व्याजाचा भारी दर.

शेतकऱ्यांस कर्ज देणाऱ्या शेतकरी सोसायट्यांपासून तों तहत मारवाडी-पठाणापर्यंतच्या सर्व सावकारांचे व्याजाचे दर पाहिले, तर द. द. ९॥ पासून १५० रु. पर्यंत चढत गेलेले दिसतील ! अगदीं भारी दर सोडून दिला, तरी द. द. शेंकडा १२ रु.पासून तों १८॥१२ पर्यंतच्या मध्यम दरानेंसुद्धां सर्व शेतकरीसमाज व्याज भरतां भरतां अगदीं टेकीस येऊन गेला आहे. एवढें जबर व्याज सावकारांस अगर पेढ्यांस शेतकऱ्यांव्यतिरिक्त कुठेंच मिळत नाहीं. दरिद्री शेतकरीसमाज हें त्यांचें अगदीं राखीव कुरण बनलें आहे ! या इलाख्यांतील शेतकऱ्यांवर सुमारें १०० कोटी रुपये कर्ज असून त्याचें वरील दरानें सरासरी व्याज काढल्यास तें पंधरा कोट रुपये होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. म्हणजे या इलाख्याचा राज्यकारभार चालविण्यास प्रांतिक सरकार सर्व मार्गांनीं जेवढा कर गोळा करितें, त्याच्या सव्वापट रक्कम सर्व सावकारवर्ग आपल्या पद्धतशीर पिळवणुकीच्या मार्गांनीं शेतकरी समाजाकडून गोळा करीत आहे, व त्यांत खंड पडल्यास त्यास न्यायासनापुढें खेंचून जादा भुर्दंड भरावयास भाग पाडीत आहे. ही व्याजाची रक्कम या इलाख्यांतील जमीनमहसुलाच्या चौपटीपेक्षां थोडी जास्तच आहे. हा विचार केल्यास जनतेवर खरी आर्थिक सत्ता सरकारची नसून सावकारांची आहे, असें सकृद्दर्शनीं वाटल्याशिवाय राहात नाहीं. तरम आकार वाढल्यामुळें जनतांत जितकी रंजीस आली आहे, त्यापेक्षां ह्या जबर व्याजापायीं ती जास्त मेटाकुटीस

आली आहे ! समाजांतील शें. ९० शेतकरी तरी आजच्या परिस्थितींत कर्ज-बाजारी आहेत व त्या कर्जाचें व्याज तरम आकाराच्या किती तरी पट भरीत आहेत. ही गोष्ट या समाजाकडे नजर टाकल्यास सहज लक्षांत येण्यासारखी आहे. म्हणून आज खरा प्रश्न सरकारी तरम आकार जसा कमी करण्याचा आहे, त्यापेक्षांही सावकारी व्याजाचा दर कमी करण्याचा आहे.

हल्लीं देशांतील सर्व धनिक लोकांच्या सर्व शिलकी रकमा पाहूं गेल्यास, त्या पोस्टल सेव्हिंग्ज बँका, कॅश सर्टिफिकिटें, सरकारी रोखे, प्रामेसरी नोटा, शेअर्स, बँकेंतील ठेवी, गहाण जिनसा, विमे, प्राव्हिडंट फंड इत्यादि रूपानें द. द. शेंकडा १ रुपयापासून जास्तींत जास्त पांच रुपये शेंकडयापर्यंत गुंतून पडलेल्या दिसतील. त्यांतील बराचसा पैसा शेतकरी कर्ज-सोसायट्या, लँड मार्गेज बँका, सरकारी तगाई इत्यादि रूपानें पुढें येऊन शेतकऱ्यांच्या पदरांत भारी दरानें बांधला जात आहे.

शेतकऱ्याचें उत्पन्न अनिश्चित म्हणून त्याची पत खोटी ठरते. म्हणून सावकार त्याच्याशीं सरळ व्यवहार करण्यास तयार असत नाहीं. दिढीदुणीचे दस्तऐवज करून घेऊन, मुदतखरेदीच्या जाचक अटी घालून, कबजेगहाण स्वरूपांत जमिनी ताब्यांत घेऊन वा प्रसंगविशेषीं त्या घशांत उतरवून, जबर व्याजाच्या प्रामेसरी नोटा लिहून घेऊन, इत्यादि भल्याबुऱ्या मार्गांनीं त्यास कैचींत धरून सरकारी चरकांतून पिळून काढीत आहे ! म्हणून कायद्यानेंच हा व्याजाचा दर कमी करून तो दरसाल दरशेंकडा ६ पेक्षां जास्त नाहीं इतका ठेवणें व त्याचें उत्पन्न वाढवून त्याच्या आर्थिक परिस्थितीस निश्चित स्वरूप देणें व तेणेंकरून त्याची पत वाढविणें आज अत्यंत आवश्यक झालें आहे. सावकारी व्याजाचा दर कमी करण्याबरोबरच व्याज व मुद्दल ह्या रकमा सतत वसूल करून देण्याची विनामोबदला बिनखर्ची व्यवस्था झाली पाहिजे, तरच हा सावकारीच्या देवघेवीचा गाडा सुरळीत चालेल.

(२) कर्जाच्या देवघेवीची अत्यंत अन्यायी पद्धत !

शेतकऱ्यास दिलेल्या कर्जापैकीं सुमारें $\frac{4}{5}$ कर्ज त्याची जमीन, घर अगर जंगम माल यांवरच प्रायः दिलेलें असतें. हें देतांना त्याची वरील स्थावर मिळकत

रजिस्टर दस्त करून तारणगहाण अगर कबजेगहाण स्वरूपांत लावून घेतलेली असते. हें दस्त नोंदणीचें काम तालुक्याच्या ठिकाणीं जाऊन रजिस्टर कचेरींत रजिस्टर ‘ समोर ’ म्हणून करावयाचें असतें.

त्याकरितां कर्जदारानें आपल्या मिळकतीचे रेकार्ड ऑफ राईटचे उतारे काढणें, ओळखीसाठीं गांवाहून निघतांना पाटील, तलाठी व इतर चारदोन मंडळी बरोबर घेऊन जाणें, त्यांचा भाडेखर्च, चहापाणी, पानसुपारी इत्यादि खर्च सढळ हातानें करणें, स्टँप विकत घेणें, रजिस्ट्रेशन फी भरणें, त्या कामीं संबंध येणाऱ्या सरकारी कामगारांची नाइलाज म्हणून गुप्त संभावना करणें, इत्यादि जरूर ते सर्व संस्कार करून मग रक्कम पदरांत घ्यावयाची असते ! त्यांतही दिढीदुणीच्या बोलीचे दस्तऐवज असले, म्हणजे घरीं तयार करून घेतलेल्या विसारचिठ्या व लिहून ठेवलेलीं साठेखतें पुढें करणें, हेंहि त्यास करावें लागतें. कारण तो गरजू असतो. तो नडलेला असतो. तो दारिद्र्यामुळें दीन झालेला असतो. तो अनिश्चित उत्पन्नामळें बेभरंवशी झालेला असतो ! गरजवंताला अक्कल नसते म्हणतात, त्याचीं लाखों उदाहरणें पाहण्याचें ठिकाण म्हणजे सरकारमान्य रजिस्टर कचेऱ्या होत ! बरें, एवढेंहि करून सरकारी शिक्कामोर्तब झालेला भरपाई दस्त पुन्हा खरा करून घेण्यासाठीं सावकारास कोर्टांत जाऊन न्यायाची याचना करावी लागते, ती निराळीच ! इंग्रजी राज्यांतील न्यायाचा हा असा अजब नमुना आहे ! आणि हें सर्व अज्ञ जनतेच्या हितासाठींच आहे असा पद्धतशीर, नव्हे सनदशीर राज्यकारभाराचा पुकारा केला जातो. त्याबद्दल कोणीही तोंडांतून ‘ब्र’ काढीत नाहीं, याचें आश्चर्य वाटतें !

सरकारमान्य बँका लोकांच्या लाखों रुपयांच्या ठेवी ठेवून घेतांना एक पैसुद्धां खर्चीत नाहींत, किंवा आपल्या सभासदाला कर्ज देतांना त्याची एक आण्याच्या तिकिटावर सही घेण्यापलीकडे कसलाही खर्च अगर व्याप करीत नाहींत. तो व्यवहार मात्र सरकारमान्य ठरतो ! त्याच्यावर राजमान्यतेचा शिक्का ताबडतोब बसतो ! अशा बँकांनीं शेतकऱ्यास दिलेलीं कर्जें, कोर्टकचेऱ्यांचीं दर्शनें न घेतां परस्पर सरकारी राजदंडाखालीं बिनबोभाट वसूल करून दिलीं जातात. कारण काय म्हणे, तर बँकांच्या सोईसाठीं सरकारनें त्यांना तसा सोईस्कर कायदा करून

ठेविला आहे! नुकत्याच स्थापन झालेल्या लँड मार्गेज बँकासुद्धां ह्याच तत्त्वावर आपला कारभार बिनबोभाट उरकून घेतात. सरकारसुद्धां आपल्या शेतकरी रय-तेस तगाईरूपानें दिलें घेतलेलें कर्जही असेंच 'चटावरच्या श्राद्धाप्रमाणें' उर-कून घेतें! मग तोच न्याय, आणि तीच पद्धत, त्याच समाजांतील कूळ आणि सावकार यांना कां लागू नसावी? दोघेहि अप्रामाणिक असतात काय? सरकारी रजिस्ट्रार समोर रकमेची पोंच घेऊन, ऐकूं येईल एवढ्या मोठ्यानें वाचून घेऊन लिहून दिलेले राजचिन्हांकित दस्तऐवज खोटे असतात काय? त्याकरितां ते खरे करून घेण्यासाठीं सावकारावर कोर्टांत जाण्याची पाळी कां यावी? देशांतला शें. ८० टक्के समाज शेतकरी असून त्याच्या कररूपी शक्तीवर हा राज्ययंत्राचा गाडा चालला असतां, त्याच्याशीं सहानुभूतीनें व सहकारितेनें वागण्याचें हेंच इंग्रजी न्यायतत्त्व आहे काय? आज शेंकडों वर्षें (पेशवाईनंतर) याच न्यायतंत्रानें समाजाची आर्थिक गळचेपी उर्फ पिळवणूक कशी चाललेली आहे, याचें उत्तम उदाहरण म्हणजे हल्लींच्या कोर्ट-कचेऱ्या होत! कोर्टकचेऱ्या ह्या समाजाची नीतिमत्ता ऊर्फ माणुसकी टिक-विणाऱ्या खरोखरी न्यायसंस्था आहेत काय, याचा जनतेनें आपल्या मनाशीं विचार करावा. तो प्रश्न मी वाचकांच्या सदसद्विवेकबुद्धीवरच सोंपवितों.

अशा तऱ्हेनें सनदशीर मार्गानें कर्ज काढावयाचें झाल्यास कर्जदार शेतकरी कुळास सुमारें शेंकडा ५ रुपये तरी खर्च येतो, असा स्वानुभव आहे! बरें, हें जबर व्याजाचें व भरमसाट घेतलेलें कर्ज न फिटल्यास (बहुतेक उत्पन्नांतून फिटत नाहींच.) शेंकडा ५० कुळांवर तरी कोर्टमार्फत दावे केले जातात. त्या वेळेस शेंकडा ७॥ रुपये कोर्ट फीचा स्टँप, पांच रुपये वकील फी, आठ आणे वकीलपत्र, साक्षीसमन्सें, भत्ते, प्रोसेस, वारंटें इत्यादि खर्च, याशिवाय मोटार व रेल्वे भाडें, शहरांतील हाटेलें व गुत्ते या ठिकाणीं उडणारा पैसा, खानावळीचीं बिलें, साक्षीदारांची व मधल्या दलालांची पानसुपारी, वकीलांचा बयाणा व बक्षिसें, प्रतिपक्षाच्या साक्षीदाराला फितुरीचा कानमंत्र देतांना खिशाला लाग-लेली सोनेरी कात्री इत्यादि अनेकविध मार्गांनीं पाण्यासारखा पैसा खर्च होत असतो. हा बाह्य खटाटोप उरकून कोर्टाची पायरी चढून आंत जातांच पुन्हां त्यास आपल्या पैशाच्या थैलीचें तोंड मोकळें सोडावें लागतें तें निराळेंच!

" कोर्टांत पाऊल टाकतांच दीडदमडीचा शिपाई, मुजरा ठोकी, तो परत बाहेर पडतांना दुसरा मुजरा करून चार आठ आणे तरी ज्याला मुजरा करावयाचा, त्याच्याकडून काढल्याशिवाय सोडावयाचा नाहीं. दाव्यावर दाखल तारीख व कोर्टाची सही घेणारा क्लार्क ऑफ दि कोर्ट, बरोबर दाव्याचे नंबर पडले आहेत किंवा नाहींत, व सर्वांवर कोर्टाच्या सह्या झाल्या आहेत कीं नाहींत, हें पाहणारा त्याच्या हाताखालचा कारकून, त्यानंतर बारनिशी कारकून, त्याच्याकडून जो दाव्याचें प्रोसेस लिहितो तो कारकून, ह्या राजेश्रींच्या हातून निसटल्यावर समन्स तयार करणारे दिवाणजी, या दिवाणजीसाहेबांच्या तावडींतून सुटल्यानंतर बेलिफबहाद्दरांची पायधरणी—या यंत्रांतून आपल्या कज्जाचा कागद, रीतसर बाहेर पडावयाचा झाला तर शंभरांपैकीं शंभर टक्कयांनीं ' युगें अठ्ठावीस ' तिष्ठत बसण्याखेरीज गत्यंतरच नाहीं. हें नको असेल व दरेक ठिकाणीं ' स्पेशल केस ' म्हणून पिच्छा पुरवावयाचा असेल, तर यंत्राच्या प्रत्येक दात्याला भरपूर ओंगण हें केलेंच पाहिजे ! आणि असें ओंगण पुरवायला सज्ज होणें म्हणजे कुबेराच्या भांडारालाही हां हां म्हणतां रिकामें करण्याची हमी घेण्यासारखें असतें ! आणि म्हणूनच दिवाणी दावा करणाराला दिवाणा बनवून हातीं नारळाची मातुश्री दिल्याखेरीज दिवाणी कोर्ट सोडीत नाहीं म्हणतात तें केवळ एवढयासाठींच ! " —(न्याय)

कोर्टांत दाखल केलेल्या दाव्याचा निकाल एका तारखेस झाला, असें कधींच घडून येत नाहीं. चौकशीला नंबर पडला म्हणजे साक्षिदारांचें लटांबर बरोबर घेऊन कोर्टाच्या महायात्रा व प्रत्येक वेळचा स्पेशल खर्च किती करावा लागेल तें एक परमेश्वरालाच माहीत ! त्यास दया येऊन कोर्ट चांगलें असल्यास त्याची लवकर सुटका होते, नाहींतर महिनेन् महिने त्यास त्या ' पंढरीच्या वाऱ्या ' कराव्या लागतात !

बरें, एवढयानेंही भागत नाहीं. ही भांडणाची आग अपिलाच्या रूपानें पुन्हां वरिष्ठ कोर्टापर्यंत जाऊन भिडते, नव्हे भिडविली जाते, व तेथेंही पुन्हां खर्च होऊन प्रकरण थांबलें म्हणावें, तर तेंही थांबत नाहीं ! त्यानंतर कोर्टाच्या हुकुमनाम्याची नक्कल रीतसर लिखाई भरून घेणें, त्याच्या आधारें पुन्हां वकिलांची पायधरणी करून दरखास्त देणें, त्याकरितां जरूर ती वकील फी, स्टँप, प्रोसेस व भत्ते भरणें इत्यादि जरूर तें जातक सावकारास करावें लागतें तें निराळेंच !

त्यानंतर जप्तीवारंट मिळविणें, बेलिफास खूष करून अचानक घेऊन जाणें, माल दाखविणें इत्यादि सोपस्कार करावे लागतातच. मिळकतीचा लिलाव व्हावयाचा असल्यास पुन्हां त्या ठिकाणीं हजर राहून मामलेदार व त्यांचा परिवार यांची तैनात ठेवावी लागते ती निराळीच ! त्यांत कूळ विशेष सावध असल्यास किंवा त्याच्या वकिलाकडून बहुधा त्याला कानमंत्र दिलेला असल्यास इतका व्याप करून 'डोंगर पोखरून उंदीर' काढल्याप्रमाणें सावकारास फजीत होऊन जावें लागतें ! हातावरचा हुकुमनामा म्हणजे सावकाराचें मरणच असतें ! देणें खरें असूनही शेतकरी ॲक्टाचा फायदा कुळासच देण्याची सरकारी नीति पाहिली, म्हणजे हा न्याय नसून न्यायाची विटंबनाच चालविली आहे असें वाटतें ! हुकुमनामा मुदतींतून जाऊं नये म्हणून दर तीन वर्षांनीं पुन्हापुन्हा दरखास्ती देऊन तो बारा वर्षेपर्यंत जिवंत ठेवण्याची ही रंगित तालीम सावकारास करावी लागते ती वेगळीच. अशा तऱ्हेनें शेंकडों लबाड्या करण्यास कुळास ती एक अप्रत्यक्ष फूसच असते ! या प्रकरणाची दुहेरी जबाबदारी शेवटीं कुळाच्याच माथीं मारिली जात असल्यामुळें सावकाराच्या झालेल्या खर्चास तोच जबाबदार धरला जातो. प्रथम गरजू म्हणून कागदाच्या वेळेचा खर्च त्यालाच करावा लागतो, व पुन्हा त्याच्या हातून पत सांभाळली गेली नाहीं, म्हणून कोर्टकज्जाचा खर्च त्याच्याच माथीं मारला जातो. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, हा सर्व खर्च मूळ मुद्दल रकमेवर न आकारितां, व्याजमुद्दलासह झालेल्या रकमेवर आकारला जातो ! सावकार प्रायः दामदुप्पट होईपर्यंत थांबतो, त्याला एकदम रक्कम पाहिजे असते. रकमेचा बोजा फुगल्यामुळें व तो फिटण्याची आशा कुळाकडून दिसत नसल्यामुळें त्याला त्याच्या इष्टेटीचें चित्र डोळ्यांपुढें दिसूं लागतें ! या कामीं कुळाकडून त्याची इच्छा तृप्त न झाल्यास तो आपलीं विषारी नखें बरोबर बाहेर काढतो व पवित्र न्यायाच्या मदतीनें तो आपल्या कर्जदार कुळाची नैतिक व आर्थिक चिरफाड करून त्याची माणुसकी पणास लावितो. त्या सर्व गोष्टींची नैतिक जबाबदारी शासनसंस्थेवरच पडत नाहीं का ? समाजाच्या विटंबनेची ही रंगित तालीम, शासनसंस्थेच्या पद्धतशीर मार्गांनींच होत नाहीं का ? यास जबाबदार कोण ? सावकार, सरकार, का कूळ ? वाचकहो ! या गोष्टीचा विचार विर्विकार व समतोल बुद्धीनें तुम्हीच करा.

शंभर रुपये कर्ज काढणाऱ्या शेतकऱ्यास, व्याजमुदलासह २०० रुपयांला जबाबदार धरून वरील सर्व खर्चाचा हिशोब केल्यास, त्याला सुमारें १०० रुपये खर्च येऊन, एकाचे तीन रुपये भरावे लागतात. आणि हें अवघें ८।१० वर्षांच्या अवधींत !

इतका जबरदस्त भुर्दंड सोसून पुन्हा त्यास कोर्टाकडून व सावकाराकडून ' लुच्चा व लबाड ' असें प्रशस्तिपत्र मिळतें तें निराळेंच !

" आणि म्हणूनच दिवाणी दावा करणाराला दिवाणा बनवून हातीं नारळाची मातुश्री दिल्याखेरीज दिवाणी कोर्ट सोडीत नाहीं म्हणतात तें केवळ ग्खवळ्यासाठींच !"

" पण प्रथम हें कुणाला माहित असणार ? दुसऱ्यानें सांगितलें, तरी पटणार कुणाला ? स्वतः अनुभव पाहिजेना ! घ्या तर ! सुरवातीला शक्य तितका सुंदर, मोहक, आकर्षक तो देखावा असतो, पण निस्तारावयाच्या प्रसंगीं, तोच देखावा इतका भेसूर, विद्रूप व मारेकऱ्यासारखा दिसतो, नव्हे असतो. असा अनुभव पटूं लागतो कीं वा !"

" न्यायाच्या बाजारांतले सगळे कामापुरते मामा ! रामराम ठोकला, रुपाया आठ आणे लुंगावले कीं संपलें ! मग कोण कुणाचा ? मग कोणीं कोणाला ओळखावयाचें, व कां ओळखावयाचें ?"

" एकदां कोर्टाच्या खोड्यांत पाय अडकला कीं संपलें, जन्मभर तो पाय बाहेर म्हणून निघावयाचा नाहीं. उलट जसजशी धडपड करावी, तसतसा जास्त जास्त अडकतच जावयाचा असें मोठें तें त्रांगडें असतें !"

" कोर्ट म्हणजे बुभुक्षित भुतांचा उघडाउघड बाजार ! या बाजारांत कोण कोणाला विचारणार ? कोण कुणाची ओळखदेख-कदर राखणार ? त्यांच्या चक्रांत अडकलें कीं, कायमचे कोर्टाचे तुम्ही ! कोर्ट तुमचें नव्हे ! कोर्ट तुमचें नोकर नव्हे ! कोर्टाचे व कोर्टाच्या अव्वल अखेर संबंधी लोकांच्या सत्तेचे गुलाम पक्षकार असतात यांत लवमात्र खोटें नाहीं."

" या कोर्टाच्या तारखा म्हणजे मनुष्याला द्रव्य, वेळ, शक्ति व बुद्धि या

सर्वांना सरळ संसारांतून ओढून पिळून काढणारा चरक असतो. अशा पुष्कळशा बाबी असतात कीं, खरोखरच कोर्टांत जाण्याचें कांहीं कारण नसतें. सहज, थोड्याशा समजुतीच्या वागण्यानें, आपला आपणच न्याय बरोबर देऊं घेऊं शकतो. परंतु तो फुकटांतला सहज मिळणारा न्याय सहसा कोणाला नको असतो! कोर्टांतल्या कायदेशीर बाजारी न्यायाची किंमत कांहीं और वाटते! कोर्ट आपल्या-करितां असतें, आपण कोर्टाकरितां नव्हे, हें कितीहि खरें असलें, तरी अशा बाबतींत आपणच कोर्टाचे उत्तम तऱ्हेनें सत्तेचे गुलाम होऊन बसतों."

—('न्याय' कादंबरी.)

अशा तऱ्हेनें न्यायाच्या पवित्र नांवाखालीं, ब्रिटिश अमलांत शेतकरी बहुजन-समाज कोर्टाचा व बुद्धिमान सुशिक्षित लोकांचा गुलाम बनला आहे. ह्या गुलाम-गिरींतून त्याची सुटका झाल्याशिवाय राष्ट्रीय स्वातंत्र्याकडे लक्ष देण्यास त्यास कदापि अवसर मिळणार नाहीं. म्हणून ही कोर्टबाजी मुळांतच समूळ खणून काढिली पाहिजे. त्या दृष्टीनें प्रस्तुत लेखकानें ऋणविमोचनाच्या कायद्याची येथें मांडलेली घटना मंत्रिमंडळानें व जनतेनें जरूर अभ्यासून पाहावी, म्हणजे या अवघड पेंचांतून निसटण्याचा साधासुधा मार्ग त्यांना बरोबर दिसूं लागेल.

रजिस्ट्रेशन फी, स्टँप, कोर्टफीचीं तिकिटें व न्यायासनाकडून आकारिलेली दंडयोजना इत्यादि रूपानें येथील प्रांतिक सरकाराला दरसाल सुमारें १,७५,००,००० रुपये मिळतात व ह्या खात्यांचा सर्व खर्च सुमारें ७५,००,००० रुपये होऊन निव्वळ नफा एक कोट रुपये होतो. या सरकारी उत्पन्नावरून जनतेच्या खर्चाचा विचार केल्यास ती रक्कम कमींतकमी याच्या ५ ते ६ पट म्हणजे १० ते १२ कोट रुपये होत असावी, असें अनुमान काढल्यास तें चुकीचें ठरेल का? या इलाख्यांतील शेतकरी सरकारला दरसाल ३,२९,००,००० रुपये जमीनसारा भरतात. त्याच्या तिपटीपेक्षां ही रक्कम थोडी जास्तच होते. कोर्टकज्जाच्या खर्चाचा अनुभव ज्याला असेल, त्यांनीं हुकुमनाम्यांत आकारून आलेला खर्च व आपला झालेला प्रत्यक्ष खर्च याची तुलना केल्यास, माझ्या म्हणण्यांतील सत्यांश पुरेपूर लक्षांत येईल! दाव्याच्या कामीं शेंकडों नव्हे, तर हजारों—लाखों रुपयांस बुडाल्याचीं उदाहरणें नजरेसमोर

आणल्यास मी केलेला अंदाज, म्हणजे अगदींच थोडा आहे, याची आपणांला साक्ष पटेल. सरकारी तिजोरी भरण्यासाठीं, समाजास मादक पदार्थांचें राजमान्य व्यसन लावून, व्यसनी समाज जसा नादान व पागल बनला, त्याप्रमाणेंच, न्यायाच्या नांवाखालीं कोर्टबाजीचें व्यसन समाजास जडलें असून, तें विष समाजाच्या अंतरंगांत पुरेपूर भिनूं लागलें आहे. त्याचे राष्ट्रीय दुष्परिणाम समाजाचीं शकलें शकलें होण्यांत झालें आहेत. हिंदुस्थानांत आज असें एक खेडें नाहीं कीं, त्या ठिकाणचीं भांडणें तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणीं लढविलीं जात नाहींत! खेडेगांवांतील भांडणें, आपसांतील मारामाऱ्या, भाऊबंदकी, पार्टी स्पिरीट, व त्यांचे पडलेले तट पाहिले, म्हणजे कोर्टाच्या जादुगिरीची बरोबर कल्पना येते! हिंदुस्थानची लोकसंख्या १९३७ अखेरीस ३७ कोटी ५० लक्ष असूनसुद्धां परक्यांच्या दास्यांतून तिची सुटका कां होत नाहीं, याची बरोबर कल्पना होते. म्हणून राष्ट्रीय हिताचें कंकण बांधणाऱ्या मंत्रिमंडळास हा प्रश्न दृष्टीआड करून कदापि चालणार नाहीं.

मुंबई इलाख्यांतील या न्यायदानाचा सरकारी अहवाल पाहिल्यास, या न्यायाच्या गोड नांवाखालीं डोंगर पोखरून कसा उंदीर काढला जातो तें पाहाण्यासारखें आहे. सन १९३६–३७ चा मुंबई सरकारचा न्यायखात्याचा अहवाल जो प्रसिद्ध झाला आहे त्यांतील पुढील माहिती मोठी उद्बोधक ठरते.

" मुंबई इलाख्यांतील दिवाणी कोर्टांतून अहवालाच्या सालीं एकंदर ४,७३,०९,७४९ रुपयांचे १,५२,७८५ दावे दाखल झाले. आदल्या वर्षापेक्षां ही संख्या ५,९५५ नें अधिक आहे. त्यापैकीं सर्वांत जास्त १६,०६० दावे एकट्या पुणें जिल्ह्यांतील कोर्टांत दाखल झाले! यावरून कर्जदलालीचें पीक पुणें प्रांतांत जास्त वाढतें असें दिसेल! (कारण सुशिक्षितांचा भरणा जास्त!) अहवालाच्या सालांत एकंदर २,३०,४८० दावे फैलावर असून, त्यांतील १,५७,३४५ दावे निकालांत काढले. त्यांपैकीं १८,४३६ म्हणजे शें. ११·०८ दावे चौकशीशिवाय व ३२,०७७ म्हणजे शें. २०·४ दावे एकतर्फी निकालांत निघाले. ३८,०७५ म्हणजे शें. २४·२ दाव्यांत तडजोड करण्यांत आली व ४७,७३६ म्हणजे शें. ३०·३ दाव्याची पूर्ण चौकशी

होऊन निकाल करण्यांत आला. या निकालांत ४३,०२० म्हणजे शें. ९०·१ दाव्यांचा निकाल वादीच्या तर्फेनें व ४७१६ म्हणजे शें. ९·८ दाव्यांचा निकाल प्रतिवादीच्या तर्फेनें करण्यांत आला. अहवालाच्या वर्षी कोर्टांतील दाव्यांची रक्कम ६,९६,०९,९८० रुपये असून त्याच्या आदल्या वर्षी सदर रक्कम ६,९७,९१,१९० रु. होती. अहवालाच्या सालीं मुंबई हायकोर्टांत कनिष्ट दिवाणी कोर्टाच्या निकालाविरुद्ध एकंदर ४३११ अपिलें करण्यांत आलीं.

या अहवालावरून काय अनुमान निघतें ? दीडलाखापेक्षां जास्त दावे दाखल होऊन त्यांपैकीं सुमारें चार हजार दावेच काय ते प्रतिवादीतर्फे झाले. यांपैकीं अपिलांतून फिरणारे दावे त्यांतून वजा केल्यास तीन हजार दाव्यांचा म्हणजे शें. फक्त दोन दावेच प्रतिवादीतर्फे झाल्याचें दिसून येईल. व त्याकरितां हा एवढा प्रचंड खटाटोप झाल्याचें दिसेल. त्याकरितां गरीब शेतकरी समाजास सालोसाल १०।१२ कोटी रुपयांस बुडवून त्यांच्या वेळेची व शीलाची जी नासाडी होते ती थांबवितां येणार नाहीं का ? आपल्या पूर्वजांची न्यायनिवाडा करण्याची पद्धति बंद करून, त्या ठिकाणीं इंग्रजी न्यायाची केलेली योजना समाजाच्या उत्कर्षास कारणीभूत झाली आहे, कीं त्याच्या नाशास कारणीभूत झाली आहे, ह्याचा विचार निर्विकार व समतोल बुद्धीनें करावयास नको काय ? ब्रिटीश लोकांना त्यांच्या न्यायाबद्दल नेहमीं अभिमान वाटतो. व त्या न्यायप्रियतेची मुक्तकंठानें स्तुति करणारेही पुष्कळ हरीचे लाल भेटतात. पण त्यांच्या त्या स्तुतिप्रियतेंत खरोखरी सत्यांश असतो काय ? या बाबतींत देशभक्त काकासाहेब कालेलकरांचेंच मत मी आपल्यापुढें मांडतों, म्हणजे झालेला समाजाचा भ्रम दूर होईल.

‘ हिंडलग्याचा प्रसाद ’ या पुस्तकांतील ‘ कोर्टबाजी ’ या प्रकरणांत काकासाहेब म्हणतात, कीं “ ब्रिटिश न्याय कितीहि काटेतोल असला, तरी तो फार खर्चाळ आहे, सोपा नाहीं. त्याचें शेपूट लवकर संपत नाहीं, आणि कोर्टांत जाणाऱ्या लोकांची नीतिमत्ता वाढते असा अनुभव नाहीं. त्यामुळें धोपटमार्गी न्यायानें स्वतःचा व्यवहार चालविणाऱ्या प्रपंचसुख प्रजेला त्याची भीति वाटणें साहजिक आहे. ब्रिटिश न्यायकोर्टांमध्यें कायद्याच्या तत्वाची जी छाननी केली आहे, ती खरोखर प्रशंसेस पात्र आहे. पण त्याच्या मुळाशीं ज्या प्रकारचा सामा-

जिक स्वभाव कल्पिलेला आहे, तसला स्वभाव आपल्या लोकांचा नाहीं. हा केवळ संस्कृतिभेदाचा प्रश्न आहे. आपलें जीवन अधिक सामाजिक आहे. लहानशा वर्तुळांत का होईना, आपले लोक परस्परावलंबनानें राहातात व ज्या समाजांतील व्यवहाराचा झगडा असेल त्याच समाजांतील शहाण्यासुरत्या व दोन्ही पक्षांना ओळखणाऱ्या अशा पंचांमार्फत न्याय मिळविण्याची आपल्याला पूर्वीपासूनची संवय आहे. व या न्यायांत तराजू घेऊन बसलेल्या व डोळे बांधून तलवार उपसणाऱ्या न्यायदेवतेला संतुष्ट करावयाचा विचार नसून, व्यवहार सुरळीत चालेल, सामाजिक संबंध पाळले जातील आणि लफंग्या लोकांस गुन्हा करण्यास उत्तेजन मिळणार नाहीं, एवढीच बाळबोध दृष्टि ठेवण्यांत येते. प्रेम आणि सहकार यांना विसरून जाणारा तागडीचा न्याय आपल्या लोकांनीं मानलेला नाहीं. हा संस्कृतीचा मोठा फरक आहे."

"ज्याप्रमाणें लहान व्यापाऱ्यांना भांडवल व्याजीं देऊन सावकार त्यांच्या धंद्यांतील बहुतेक सगळा कस चोखून घेतो, त्याचप्रमाणें कोर्ट आणि कोर्टाच्या दरबारांत बसलेले वकील हे भांडणाऱ्या लोकांना न्याय मिळवून देतां देतां अगदीं सोलून काढितात, आणि या न्यायाचें विधि-विधान इतकें लांबलचक असतें कीं, कोर्टाच्या चक्रांत मनुष्य एकदां सांपडला, म्हणजे त्याला नित्याच्या व्यवहाराकडे लक्ष देणेंहि जवळजवळ दुरापास्त होतें. खेडेगांवांतील लोकांना तर फिरत्या कोर्टाच्या मागोमाग जातां जातां नाकीं नऊ येतात, आणि आजारांत चांगला डॉक्टर मिळविणें हें जसें धनवंताच्याच भाग्यांत लिहिलेलें असतें, त्याचप्रमाणें चांगला वकील मिळविणें हें देखील मोठ्या थैलीचेंच भाग्य आहे !"

"पुष्कळदां असें होतें कीं, चालत्या स्थितीविषयीं ज्यांच्या हृदयांत असंतोष आहे, चालू पद्धतीचे दोष ज्यांना बरोबर समजले आहेत, आणि नवं वडी कोणत्या पद्धतीची असली पाहिजे याचीहि ज्यांना थोडीफार कल्पना आहे; अशा लोकांमध्यें जुनें बदलून नवें चालू करण्याइतकें बुद्धिसामर्थ्य नसतें; तशी धमक नसते. अशा लोकांत आपापसांत सूक्ष्म मतभेद असल्यानें त्यांचें संघटनहि होऊं शकत नाहीं. आणि जुनी पद्धति तर संघटित, दृढमूळ व प्रतिष्ठित असते. अशा स्थितींत सुधारकांची ओरड खरी असूनहि तिचा परिणाम होत नाहीं. आणि

अशांनीं केलेला दुर्बळ विरोध जुन्या पद्धतीचें नुकसान करण्याऐवजीं तिला मजबूत बनवितो. शिक्षण, वैद्यकी व न्याय या तिन्ही क्षेत्रांत असें झालेलें आहे. ”

“ एकदोन पिढ्या होऊन गेल्या, आपण म्हणत आलों आहोंत कीं, कोर्टाच्या ऐवजीं लवाद पंचायतीची स्थापना व्हावी; पण मांजराच्या गळ्यांत अजून घाट बांधिली गेली नाहीं. खरोखर पाहातां पंचायतीची स्थापना होण्यास समाजांतील व्यवहारच अधिक शुद्ध व म्हणून मर्यादित होण्याची आवश्यकता आहे. खेडेगांवांतील व्यवहार सोपे व साधे असल्यानें आणि परस्पर संबंध केवळ कराराचे नसून जीवनसंबंध असल्यानें वरील सुधारणा खेडेगांवांतून सहज होईल. ”

वरील विवेचनावरून कर्ज देण्याघेण्याच्या बाबतींत आमूलाग्र सुधारणा झाल्याशिवाय शेतकरी जीवन सुखी व समृद्ध होणार नाहीं !

पावसाचा अनिश्चितपणा, पिकावरील रोगराई, बाजारभावाची मंदी, दुष्काळ व साथी यांचे घाले, सावकार व सरकार यांची कैची, यामुळें हाडाचा सच्चा व दिलदार शेतकरी जगांत नादान बनून दारिद्र्यपंकांत रुतला आहे; परराज्यांत वाली नसल्यामुळें, हीनदीन बनून शतकानुशतकें मरून चूर झाला आहे ! म्हणून त्याच्या उद्धारासाठीं कॉंग्रेसच्या राजवटींत अत्यंत भरीव व भक्कम प्रयत्न व्हावयास पाहिजेत. कर्ज मिळणें व वसूल करणें ह्या पद्धतींत आमूलाग्र क्रांति करून शेतकरीजीवन सुखी व समृद्ध केलें पाहिजे. तर जनताजनार्दनाची कॉंग्रेस !

(३) व्यसनें व उधळपट्टी.

शेतकरीऋणविमोचनाचा कायदा करण्यापूर्वीं समाजांतील व्यसनें व उधळपट्टी ह्या गोष्टींचा प्रामुख्यानें विचार करावयास पाहिजे, व ही गोष्ट पटल्यामुळेंच कॉंग्रेसच्या राजवटीच्या प्रथमारंभींच, कॉंग्रेस प्रधानांनीं आपल्या साती प्रांतांतून मादक पदार्थांच्या व्यसनाचें उच्चाटन करावयाचें ठरविलें आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय. या इलाख्यापुरता जरी विचार केला, तरी अबकारी खात्याचें उत्पन्न जमीनमहसुलाच्या अगदीं खालोखाल आहे ! हल्लींच्या मंदीच्या भावांत सुद्धां हें उत्पन्न या इलाख्यांत ३ ते ३। कोटी रुपये येतें. तितकाच खर्च मालनिर्मितीस तरी होत असावा. याशिवाय दुकानदारांचा नफा, वाहातुकीचा खर्च,

किनाऱ्यावरील सरकारी कर, एजंटांचें कमिशन, जाहिरातीचा खर्च वगैरे हिशोब विचारांत घेतल्यास या इलाख्यांतील जनता दरसाल सुमारें १० कोट रुपयांस बुडत असावी, अशा तऱ्हेचे उद्गार आरोग्यमंत्री ना. गिल्डरसाहेब यांनीं नुकतेच काढिले आहेत.

हें व्यसन बहुतेक दोन पैसे मिळविणाऱ्या शेतकरी, कामकरी व कांहीं लब्ध-प्रतिष्ठित सरकारी बड्या नोकरदार वर्गांतून फैलावलें आहे. याशिवाय जुगार, रेसेस, लाटऱ्या, कोडीं, साखळ्या, आकडे, पत्ते, ज्योतिषी, मांत्रिक, देवऋषि इत्यादिकांच्या रूपानें लाखों रुपये दरसाल दीनदुबळ्या शेतकऱ्यांच्या खिशांतून हिरावून घेतले जात आहेत ! याकरितां कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं कर्जविमोचनाच्या सुरवातीसच कायद्यानें हीं सर्व व्यसनें व व्यसनांचे अड्डे नेस्तनाबूद केले पाहिजेत, तरच योजना यशस्वी होईल. यासाठीं ग्रामसंस्थेचें पुनरुज्जीवन केल्यास पंचायत–मंडळें सरकारास साह्य करण्यास धावून येतील.

"मुंबईत व पुण्यांत तर 'रेस'नें कहर करून सोडला आहे. गरिबांनासुद्धां त्याचा 'लाभ' घेतां यावा म्हणून, 'रेस'मध्यें थर्डक्लासची सोय केली असून, रेस-साठीं सरकार स्पेशल गाड्या सोडीत असतें."

"कापसाचे सट्टेबाजीनें मनुष्य लक्षाधीश होतो, या कल्पनेनें तेजीमंदीचे आंकडे लावणारे लोक मुंबईत निदान ८० टक्के व पुण्यांत कॉलेजचे विद्यार्थी शें. ५० टक्के तरी खास आढळतील ! राजकारणाचा अभ्यास करण्यासाठीं, किंवा जगांतील बातम्या कळण्यासाठीं लोक वर्तमानपत्रें वाचीत नसून, 'आज आंकडा कोणता आला' हें पाहाण्यासाठींच सकाळीं 'पेपर' चाळतांना आढळ-तात ! मुंबईतील सर्व दैनिकें हे तेजीमंदीचे आंकडे व 'अंदाज' देत असतात. व जर दिले नाहींत, तर तीं वर्तमानपत्रें चालणार नाहींत असें वाटूनच कीं काय तें प्रसिद्ध करण्याची धडपड व निरनिराळ्या ज्योतिर्विदांचा 'धारणा' देण्याचा प्रयत्न चालू असतो. एक रुपयाला नऊ रुपये मिळविण्याचा हा विनासायासाचा मार्ग मोकळा असतांना, लोकांनीं श्रम काय म्हणून करावेत ? जमीनसुद्धां इतक्या पटींनीं पिकत नाहीं; कोणतीही बँक इतकें उत्पन्न देत नाहीं. महाराष्ट्रांतील यशस्वी कारखानदार किर्लोस्करसुद्धां घातलेल्या रकमेवर इतकें समाधानकारक

डिव्हिडंड देऊं शकणार नाहींत ! तेव्हां इतकें भरमसाट पीक देणारें ‘बागाईत’ करण्याचा मोह मजुरापासून तों श्रीमंत माणसापर्यंत सर्वांना पडावा यांत आश्चर्य तें कोणतें ! अशा रीतीनें दरएक जुगारी ‘लखपती’ कुबेर होण्याचा संभव असतां तो कोण लाथाडील ? अहमदाबादेहून भुसावळपर्यंत व खालीं बेळगांव-पर्यंत आंकडे कळण्यासाठीं मुंबईशीं रोज तारा व पत्रव्यवहार होत असतो. अनेक बैरागी, साधु, ज्योतिषी यांना ‘अंतर्ज्ञान’ होऊन त्यामुळें शेंकडों लोक धुळीस मिळाले तर तें आश्चर्य कोणतें ? सरकार याला कडक उपाय योजीत नाहीं. ‘तेजीमंदीच्या आंकड्याचें बिल’ कौन्सिलांत आलें असतां गेल्या सालीं तें बहुमतानें फेटाळलें गेलें व ‘हा व्यवहार बंद केला तर शहरांत चोऱ्या जास्त होतील’ असें मत पोलिस कमिशनर यांनीं व्यक्त केलें, यांत कांहीं नवल नाहीं. या बिलाचे वेळीं ‘लोकांत व्यसनांचा फैलाव न करितां त्यांना आळा घालण्या-कडे सरकारची प्रवृत्ति असावी, तें बाजूला राहून उलट व्यसनांचा फैलाव कर-ण्यांत सरकार गुंतलें आहे, हें ठीक नाहीं’ असें सर रफीउद्दीन अहंमद यांनीं सरकारला बजाविलें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. व्यसनांच्या पायीं लोक कंगाल झाले, त्यांची हलाखी वाढली, कीं त्यांच्यांत सघटना होणें अवघड जातें व त्याचे परिणाम राष्ट्राला भोगावे लागतात. सरकार या कामीं उदासीन व बेफिकीर, आणि लोकशिक्षणाचें काम करणारीं वर्तमानपत्रें या धंद्याला प्रोत्साहन देणारीं, मग अशा स्थितींत ही आपत्ति टळावी कशी ? तरुणांच्या बेकारीला व आळशी वृत्तीला उत्तेजन देण्यासाठींच हा ‘तेजीमंदीचा’, ‘छक्या-पंज्याचा’ व्यवहार सर्व शहरांतून धूमधडाक्यानें चालू आहे, असा त्यावर आरोप केल्यास तो चुकीचा आहे असें कोण म्हणेल ?”

“आयाबाहेर खर्च करण्याची सर्वांना संवय लागली आहे. लग्नासाठीं काढलेलीं कर्जें मुलाचे लग्नापर्यंतसुद्धां फिटत नाहींत. डामडौलानें लग्न करण्या-साठीं, खोट्या इभ्रतीला बळी पडून अनेक कुटुंबें कर्जबाजारी बनलीं आहेत. मध्यम स्थितींतला एखादा मुलगा आपल्या कॉलेजच्या शिक्षणासाठीं आपल्या आईबापांवर दीड-दोन हजारांचा कर्जाचा बोजा लादीत असतो. पुढें त्याला नोकरी लागल्यानन्तरही त्याच्या शिक्षणाचें कर्ज पुढें १०।१५ वर्षें त्याला फेडितां येत नाहीं.”

—(‘बेकारी’)

आपल्या उधळपट्टीचें, व सरकारच्या बेफिकीरीचें आणखी कोणतें वर्णन ग्रंथकारानें करावयाचें ठेविलें आहे ? खेड्यांतून निव्वळ शेतीवर पोट भरणें अशक्य झाल्यामुळें, शहराकडे धांव घेणारा शेतकरी, या प्रतिष्ठित राजमान्य व्यसनांत ताबडतोब गुरफटला जातो. त्यामुळें शेंकडों रुपयांची कमाई करूनही शेवटीं त्याला हात हलवीतच देशाला परत यावें लागतें. शहरांतून सावकारी करणाऱ्या पठाण सावकारांचा सुळसुळाट पाहिला म्हणजे या गोरगरीब व्यसनी समाजाची कींव येऊन जाते. दारूबंदीचें उच्चाटण करणाऱ्या काँग्रेस सरकारला हीं राजमान्य व्यसनें दिसत नाहींत का ? या व्यसनांना मूठमाती दिल्याशिवाय काँग्रेसचा लौकिक वाढणार नाहीं व ती गरिबांची वाली आहे असें ठरणार नाहीं. म्हणून या कामीं सरकारनें पुढीलप्रमाणें कायदेशीर योजना करावी—

(१) कापसाच्या व्यापारांतील सट्टे--पद्धतीस बंदी करणें. त्याचें उल्लंघन करणारास कायद्यानें एक वर्षाची शिक्षा देणें. याचे योगानें व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघणार नाहींत व जनता बुडणार नाहीं.

(२) वर्तमानपत्रांतून छापल्या जाणाऱ्या कोडीं, साखळ्या, आंकडे इत्यादि जुगारस्वरूपाच्या जाहिरातींस प्रतिबंध करणें. अशा जाहिराती छापणारास कायद्यानें ६ महिन्यांची शिक्षा देणें.

(३) लाटऱ्या उघडण्यास व चालविण्यास कायद्यानें बंदी करणें. व बाहेरून येणाऱ्या लॉटरीच्या तिकीटांस व येथून त्या कामीं रवाना होणाऱ्या पैशास मज्जाव करणें. या कामीं गुन्हा करणारास शंभर रुपये दंडाची शिक्षा करण्याचा अधिकार असावा.

(४) सरकारनें स्वतः ' प्रसिद्धिखातें ' उघडावें व वर्तमानपत्रांतून दिल्या जाणाऱ्या भल्याबुऱ्या जाहिरातींचा खरेखोटेपणा ताडून पहावा. व मग त्या प्रसिद्ध करण्यास परवानगी द्यावी. या कामीं परवानगी देतांना प्रत्येक प्रकारच्या जाहिरातीमागें एक रुपया फी आकारावी. मंजुरीवांचून जाहिराती छापणाऱ्या संपादकास १०० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा ठेवावी. यांत पुस्तकांच्या जाहिरातीं-खेरीज बाकी सर्व प्रकारच्या मालाच्या जाहिरातींचा फक्त समावेश व्हावा.)

(५) सर्व रेसेस बंद कराव्यात. निदान त्यांच्यावर पैसे लावण्याची बंदी

करावी. सर्कसप्रमाणें त्यांनीं घोडयांच्या शर्यतीचे खेळ करून दाखवावेत व त्या कामीं तिकिटविक्रीचें उत्पन्न घ्यावें. म्हणजे उत्तम घोड्याच्या पैदाशीचा धंदा चालेल. इतकेंही करावयाची इच्छा नसेल तर निदान मजूर व मध्यम वर्गांची--कीं ज्यांचें पोट निव्वळ रोजच्या मजुरीवर आहे, त्या बहुजनसमाजाची—या रेस-पासून फारकत करावी. या कामीं पुढील अटी घालाव्यात—

१. दरमहा शंभर रुपयांपेक्षां जास्त पगार मिळविणारा माणूस,

२. सालीं १५० रु. पेक्षां जास्त तरम आकार देणारा शेतकरी,

३. दरसाल १०० रुपयांपेक्षां जास्त इन्कमटॅक्स देणारा व्यापारी,

या माणसांव्यतिरिक्त कोणालाहि रेसवर पैसे लावतां येऊं नयेत. अशा माणसांनीं रीतसर परवानगी मागितल्यास त्यांस परवानगीचीं ‘ पासबुकें ’ देण्यांत यावींत. त्यांवर त्याचा फोटो छापण्यांत यावा. व रेसवर वेळोवेळीं लाविलेले पैसे व मिळालेले पैसे याचा हिशेब नोंदला जावा (रेस कारकुनाकडून). म्हणजे ‘रेस’ ची मिळकत त्यांच्या लक्षांत येईल.

४. रेस पाहावयास जाणाऱ्या कोणाही माणसास चार आण्यांपेक्षां जास्त तिकिटाचा आकार नसावा.

५. पैसे लावून खेळल्या जाणाऱ्या सर्व जुगारींस कायद्यानें ६ महिन्यांची शिक्षा ठेवावी.

वरील प्रकारच्या कायद्यानें समाजाच्या रोमरंध्रांत भिनून गेलेला हा रोग बरा होऊं लागेल. व असा निरोगी झालेला समाजच राष्ट्रांत कांहींतरी कर्तबगारी करूं शकेल !

आज प्रांतिक स्वायत्ततेचें मर्यादित उदक आमच्या हातावर सुटलें आहे, तोंच वरील उधळपट्टीचे सर्व मार्ग आम्हीं नेस्तनाबूत केले नाहींत, तर आमच्या-सारखे करंटे व दरिद्री लोक जगांत सांपडणार नाहींत ! म्हणून कॉंग्रेस मंत्रिमंड-ळाचें लक्ष मी इकडे वेधूं इच्छितों.

ह्या सर्व राजमान्य व्यसनांपासून सरकारी खजिन्यांत जरी कोटयवधि रुपये पडत असले, तरी ही संपत्ति, शेतकरी-कामकरी वर्गाच्या थडग्यांतून निर्माण होत असल्यामुळें, अपवित्र समजून त्याज्य केली पाहिजे. राज्यव्यवस्थेचें असलें हिडीस

स्वरूप नाहींसें करण्याचा प्रयत्न कॉंग्रेस आमदारांनीं व प्रधानांनीं स्वतः पुढाकार घेऊन कायदेशीर मार्गांनींच केला पाहिजे. तरच ते शेतकऱ्यांचे कैवारी ठरतील !

दारू व इतर मादक पदार्थांच्या व्यसनांपासून सरकारी खजिन्यांत सुमारें तीन कोटि रुपयांची तूट पडेल. ती भरून काढण्यासाठीं लोकांच्या क्रयविक्रय शक्तीवर शें. आठ आणे म्हणजे रुपयास एक पै इतका अल्प कर बसविल्यास, ही येणारी तूट भरून निघून तिजोरी रिती पडणार नाहीं. शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी-विक्री करणें, परदेशांतून किंवा स्वदेशी कारखान्यांतून तयार झालेला माल घेऊन विकणें इत्यादि रूपानें ह्या इलाख्यांतील अंतर्गत व्यापारी घडामोड सुमारें ६०० कोटि रुपये असावी, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या प्रचंड घडामोडींतील खरा नफा व्यापाऱ्यांच्या पदरांत पडत असल्यामुळें, व्यापाऱ्यांच्या दुकानांत होणाऱ्या विक्रीवर हा कर बसविल्यास त्याची विभागणी सर्व जनतेवर सारखी होऊन वरील तीन कोटि रुपयांची तूट भरून निघेल. आपल्या इलाख्यांतील सर्व लहानमोठ्या व्यापाऱ्यांच्या दुकानीं गेल्या सालीं विकलेल्या मालाच्या किंमतीचे आंकडे गोळा केल्यास माझ्या म्हणण्याची सत्यता पुरेपूर लक्षांत येईल. व्यापाऱ्यांच्या विक्रीवर शेंकडा आठ आणे कर ठेवल्यास (म्हणजे रुपयाला फक्त एक पै), व्यापारी आपल्या मालाचे भाव शेंकडा आठ आण्यांनीं वाढवून सांगतील. त्यामुळें त्यांचें प्रत्यक्ष कांहीं नुकसान होणार नाहीं. तसेंच व्यापारी आपला माल विकतांना रुपयाला आणा दोन आणे किंवा प्रसंगविशेषीं त्यापेक्षांही जास्त नफा खातो, तेथें सरकारनें आणखी रुपयागणिक एक पै घेण्याचें ठरविलें, तर जनतेकडून मुळींच विरोध होणार नाहीं. इन्कमटॅक्स हा नफ्यावर आकारला जात असल्यामुळें तो भरतांना व्यापाऱ्यांची घासाघीस सारखी सुरू असते. पण हा कर नफ्यावर नसून वस्तूंच्या विक्रीवर व अल्पसा असल्यामुळें तो आपल्या विक्रीची किंमत शें. ०८ नें चढवून सांगेल. म्हणून हा कर बसविण्याच्या कामीं मंत्रिमंडळानें जरूर विचार करावा. ह्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें असावें.

(१) जमाखर्च न ठेवणाऱ्या लहानसहान दुकानदाराकडून खेड्यांत वार्षिक ३ रुपये व शहरांत वार्षिक ५ रु. घ्यावेत.

(२) जमाखर्च ठेवणाऱ्या व्यापाऱ्यांची वार्षिक विक्री पाहून तीवर शेंकडा

८ आणे कर आकारणी व्हावी.

(३) हा कर गोळा करण्याचा अधिकार इन्कमटॅक्स ऑफिसरास देण्यांत यावा.

याप्रमाणें तिजोरींत येणारी तूट भरून निघेल व त्यामुळें व्यसनांचें समूळ उच्चाटन करणें फार थोड्या कालांत घडून येईल. आणि तसें झाल्यास शेतकरी-ऋणविमोचनाची अर्धीअधिक आघाडी मारल्याचें यश मिळवितां येईल.

(४) भांडणाची वाढती खुमखुमी व द्रव्यनाश.

न्यायनिवाडा करण्याची पूर्वीच्या पंचायतीची पद्धत कायद्यानें नष्ट केल्यामुळें अगोदरच गांजलेला शेतकरी, न्यायाच्या मृगजळामागें लागून पुरता लुंगविला जात आहे. मामलेदारी व फौजदारी कायद्यांच्या कचाट्यांत सांपडलेला शेतकरी, द्रव्यदृष्ट्या निखाऱ्यांतून भाजून निघालेल्या कांद्याप्रमाणें सोलून निघत आहे ! भांडणें हीं सर्वकालीं, सर्व समाजांत व सर्व राष्ट्रांत असतातच. त्यास हिंदुस्थान कोठून अपवाद सांपडेल ? पण येथील न्यायदानाची पद्धत इतकी गुंतागुंतीची केली आहे कीं, त्या जाळ्यांत सांपडलेलें भोळेभाबडें शेतकरी—सावज अर्धेमुर्धे भाजल्याशिवाय कधींच बाहेर पडत नाहीं ! म्हणून बहुजनसमाजास हा न्याय ग्रामपंचायतीद्वारा अल्प मोलांत मिळवून देणें व कोर्टकचेऱ्यांपासून गरीब शेतकरी समाज चार पावलें दूर ठेवणें, हें महत्त्वाचें काम आहे. नाहीं तर अन्य मार्गांनीं बचत झालेलें द्रव्य ह्या बकासुराच्या घशांत पडल्याशिवाय राहणार नाहीं !

भांडणतंटे उत्पन्न होण्याच्या मुख्य बाबी म्हणजे कर्जाऊ पैशाच्या देवघेवी, वारसा हक्काचे व वाट्याचे प्रश्न, मृत्युपत्र, दत्तकपत्र, बक्षिसपत्र इत्यादि कामीं होत असलेल्या लबाड्या, जमिनीच्या बांधफोडी व अतिक्रमणें व अनीतिकारक वागणूक इत्यादि होत. यांमधूनच तंटे निर्माण होऊन प्रकरण मारामारीवर येतें. व त्यामुळें इतरांचें बरोबर साधतें. म्हणून या बाबतींत आमूलाग्र सुधारणा झाल्याविना ही भांडणाची वाढती आग कमी होणार नाहीं. ही आग सतत तेवत ठेवण्याचीं कारणें शाबूद ठेविल्यास, ग्रामपंचायतींनासुद्धां, न्यायदानाचें पवित्र काम पार पाडतां येणार नाहीं व कोर्टकचेऱ्यांप्रमाणेंच त्याही संस्था हिणकस ठरतील ! म्हणून कर्जविमोचनाच्या व्यापक कायद्यांतच ह्या सर्व घोटा-

ळ्याचें समूळ निराकरण केलें पाहिजे. त्या दृष्टीनें ऋणविमोचनाचा तयार केलेला येथील कायदा सर्वांनीं जरूर अभ्यासून, त्यांतील योजनेचा दूरदर्शीपणा आपल्या अनुभवाशीं ताडून पहावा.

समाजांतील तंट्याच्या जागा बरोबर हुडकून काढणें व त्या मुळांतच कायद्यानें नेस्तनाबूद करणें, हें राजशासनसंस्थेचें प्रमुख कार्य होय. नाहींतर ह्या न्यायदानाच्या पद्धतीनें दिवसेंदिवस समाज भांडणाच्या खाईत ओढला जाऊन तेणेंकरून त्याच्या शीलाचा व द्रव्याचा नाश होऊन तो कंगाल व पागल बनेल. अशा अधोगतीच्या पंथास लागलेल्या समाजास—देशास—सप्तजन्मांतही स्वातंत्र्याचा किमपिहि लाभ होणार नाहीं. म्हणून स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेतलेल्या कॉंग्रेस प्रधानांना, आपल्या पाठीशीं घेतलेल्या जनतेंत, भांडणें, मारामाऱ्या, घातपात, जाळपोळी इत्यादि स्वातंत्र्यविघातक गोष्टी ठेवून कसें चालेल ? या गोष्टींचें समूळ निराकरण केल्याशिवाय, अभेद्य अशा संघटित जनतेचें बळ, हा स्वातंत्र्यसंग्राम यशस्वीपणें लढविण्याच्या कामीं त्यांच्या कसें उपयोगीं पडेल ? म्हणून ऋणविमोचनाच्या कायद्यांत अंतर्भूत केलेल्या व्यावहारिक व नैतिक योजनांचा सूक्ष्म विचार केल्यास, आपल्या हातून हीं अवघड बाब पार पडत आहे याबद्दल त्यांना स्वतःला धन्यता वाटूं लागेल व आपल्या हातून बहुजनसमाजाचें राष्ट्रीय हित केल्याचें महत्पुण्य संपादन करितां येईल.

(५) जोडधंद्यांचा नाश व त्याची पुनर्घटना.

यांत्रिक युगानें श्रमजीवि वर्गाचे सर्व घरगुती धंदे हिरावून घेतले गेल्यामुळें या सर्व वर्गांचा भार शेतीवर येऊन पडला आहे. लोकसंख्या वाढली, उत्पन्नाचीं साधनें मूठभर धनिकांच्या हातांत एकवटलीं, येथील उद्योगधंद्यांचा नाश झाला; दुष्काळ, रोगराई व कसाईखाने यांनीं गुरांचा संहार चालविला; उपजीविकेचें मुख्य साधन जी शेती, ती सालोसाल पिकें काढल्यामुळें निकस होत चालली; जमिनीची धूप दख्खनच्या उतरत्या पठारामुळें सतत होत राहून एकतृतीयांश जमिनी मुरमाड माळरानाच्या बनल्या, इत्यादि कारणानें शेतकऱ्याचें पोट निव्वळ शेतीवर भरणें दुर्घट झालें. त्यामुळें तो पिढ्यान् पिढ्या कर्जाच्या गर्तेत लोळत आहे. त्यांतून तो वर निघण्यास त्यास व त्याच्या मुलाबाळांस दुसऱ्या अनेक जोड-

धंद्यांचें शिक्षण व आर्थिक साह्य दिलें पाहिजे, तरच तो ऋणमुक्त होईल. प्राप्ति वाढली, व्यसनें नष्ट झालीं, वाह्यात खर्चाचे सर्व मार्ग नष्ट झाले, तरच दोन पैसे शिल्लक टाकूत तो कर्जमुक्त होईल व पुन्हा कर्जाच्या जंजाळांत अडकला जाणार नाहीं.

आमच्या उद्योगधंद्यांच्या नाशाची कारणमीमांसा चित्रमयजगतनें सन १९३० च्या खास औद्योगिक अंकांत पुढीलप्रमाणें केली आहे:—"पुष्कळ वेळां असें सांगितलें जातें कीं, हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास वाफेच्या व यांत्रिक शोधांच्या अभावामुळें झाला. हेंही कारण नव्हतें असें आम्ही म्हणत नाहीं, पण यंत्रसामुग्री ही ब्रिटिशांची मत्ता नव्हती कीं, तिचा उपयोग आमच्या देशाला करतां आला नसता. जगांतलीं कोठलींहीं राष्ट्रें आपल्या देशांत यांत्रिक शोध लागले नाहींत, म्हणून खुंटून बसलीं नाहींत. मग हिंदुस्थानच यांत्रिक साधनांच्या अभावीं मागें रेंगाळला असें बोलण्यांत अर्थ कोणता ! जपानांत किंवा अमेरिकेंत वाफेचा शोध लागला नव्हता, किंवा मागाचे आणि जिनिंगचे शोध त्या देशांत लागले नाहींत. असें असतां तीं राष्ट्रें उद्योगधंद्यांत पुढें गेलीं आणि हिंदुस्थान मागें पडला. याला कारण म्हणजे ब्रिटिशसरकारनें आम्हांला चहूंकडून अशा रीतीनें अडकवून टाकलें कीं, बाहेरचे तर नाहींच नाहीं, पण आमचे स्वतःचे धंदे आम्हांला परके झाले. आज उद्योगधंद्यांची प्रगति कुंठित होण्यास बाहेरून यंत्रसामुग्री आणण्यास पैसे नाहींत, येथें करूं म्हटलें तर यांत्रिकविद्येचें ज्ञान नाहीं. अशा प्रकारें ज्ञानाच्या, पैशाच्या व साधनाच्या अभावीं आम्ही सर्वस्वीं परावलंबी बनलों. बौद्धिक शिक्षणाच्या निरुपयोगी शाळा—कॉलेजें काढण्याकरितां सरकारची तयारी असते. पण धंदेशिक्षणाच्या शाळा काढावयास एखादाहि गव्हर्नर किंवा व्हाइसरॉय तयार होत नाहीं. याचें कारण त्यांत त्यांच्या देशबांधवांचें मरण आहे हेंच होय. पण आमच्या देशांतील विद्वानांना आपण हातपाय हालवावेत असें वाटत नाहीं. यांत्रिक साधनांचा आम्हांला फायदा मिळूं नये, याविषयीं ब्रिटिश-सरकारनें जें पहिल्यापासून डोळ्यांत तेल घातलें होतें, तें अद्याप काढलें नाहीं. त्या वेळीं आम्ही यांत्रिक सामुग्री परदेशांतून मागविली असती, तर आमच्या व्यापाऱ्यांना फाशीचीच शिक्षा फर्माविण्यांत आली असती ! ज्या कंपनीसरकारला हातानें काम करणारे कुशल कारागीर सहन झाले नाहींत, त्या ब्रिटिशांनीं येथें

यंत्रें आणूं दिलीं नसतीं. मग पुढल्या गोष्टी कशाला ? आई जेवूं घालीना व बाप भीक मागूं देईना, या म्हणीप्रमाणें त्यांनीं आमचे धंदे बुडवून टाकिले. ”

“ यांत्रिक सामुग्रीची मदत ब्रिटिशांच्या व परदेशच्या व्यापाऱ्यांना मिळाल्यामुळें त्यांना मोठ्या प्रमाणावर मालाची निपज करणें परवडे आणि हा माल स्वस्तांतही निघूं शके. त्यामुळें इकडील उद्योगधंद्याला टिकाव धरणें शक्य झालें नाहीं. परदेशच्या स्पर्धेपुढें देशी उद्योगधंदे पटापट मरून गेले. यंत्रशक्तीशिवाय चालणारे धंदे स्पर्धेपुढें टिकत नाहींत, एवढेंच नव्हे, तर या देशांत यंत्रशक्तीवर चालणारे धंदेसुद्धां परदेशांच्या चढाओढींत टिकाव धरूं शकत नाहींत असा अनुभव आहे. परदेशचा व्यापारी आपल्या प्रतिस्पर्ध्याचा धंदा ठार करण्याकरितां वाटेल तेवढें नुकसान सोसून मातीमोलानें माल विकूं शकतो. कारण एकदां आपला प्रतिस्पर्धी मारला गेला म्हणजे आपण मागील नुकसान भरून काढूं, ही त्याला खात्री असते. सरकार आमच्या उद्योगधंद्याला उत्तेजन देण्यास बांधलें गेलें नसल्यामुळें, त्यांना परस्पर आमचें तोंड कधींहि वर निघालें नाहीं, तर त्यांत खेद नसतो. स्वतंत्र देशांत आपला माल स्वस्त दरानें विकतां यावा, म्हणून जकातीच्या किंवा इतर बाबतींत सवलती दिल्या जातात. येथें अशा सवलती नाहींत, आणि ज्या कांहीं थोड्या सवलती दिल्या जातात, त्यांचा फायदा येथें येऊन राहिलेल्या परक्या व्यापाऱ्यांनाच हमखास मिळतो. अशा स्थितींत यांत्रिक चढाओढींत आम्ही परक्यांपुढें आजच काय पण स्वराज्य मिळाल्यानंतरसुद्धां टिकूं अशी आशा नाहीं. ”

इंग्लंडमधील मॉर्निंग पोस्ट पत्र म्हणतें कीं, “ इंग्लंड हें जगलें पाहिजे. इंग्लंडला जगावयास उद्योग व व्यापाराशिवाय दुसरा मार्ग नाहीं. हिंदुस्थान ही चांगली बाजारपेठ आहे. ती आमची आहे. आम्ही त्यांचें संरक्षण करितों, तेव्हां त्यांनीं आमचा पक्का माल घेतलाच पाहिजे. हिंदुस्थान आम्हीं सोडला तर लँकेशायरचे १२० लाख लोक उपाशीं मरतील ! तेव्हां हिंदुस्थानला पारतंत्र्यांत ठेवण्यावांचून व भल्याबुऱ्या मार्गांनीं त्याच्या गळ्यांत आमचा पक्का माल बांधण्यावांचून दुसरें गत्यंतरच नाहीं. हिंदुस्थानच्या पारतंत्र्यावर इंग्लंडचें जीवन अवलंबून आहे. ” —(चित्रमय जगत् १९३०)

वरील सर्वांचें कारण आमचें पारतंत्र्य आहे. पण पारतंत्र्यमुक्तता म्हणजे औद्योगिक स्वातंत्र्य नव्हे. स्वातंत्र्याचा प्रश्न औद्योगिक प्रश्नांतून सुटका झाल्याशिवाय सुटतच नाहीं. म्हणून औद्योगिक अभिवृद्धीच्या दृष्टीनें आज देशांतील थोर थोर देशभक्तांच्या हालचाली हल्लीं सुरू आहेत, ही आशेची गोष्ट होय.

वर्धा येथील महात्माजींची योजना, झकीर हुसेन कमेटी, जोशी-समिति यांच्या शिफारशी लक्षांत घेतल्यास राष्ट्राला स्वावलंबी शिक्षण देऊन कार्यक्षम करण्याचें घाटत आहे. अन्ननिर्मितीबरोबरच वस्त्रनिर्मितीचा जोडधंदा शेतकऱ्यास शिकविला पाहिजे. शाळांमधून सूत कांतून हा प्रश्न सुटणार नाहीं. जगाची फॅशन बदलत चालली, लोकांच्या आवडीनिवडी बेसुमार वाढल्या, यंत्रांनीं मालाचे प्रचंड ढीग निर्माण करून स्वस्ताईची कमाल केली, अशा वेळीं मुलांकडून चरक्यांवर जाडेभरडें सूत काढून विणलेलें कापड जगाच्या बाजारपेठेंत कितीसा टिकाव धरूं शकेल ? आज राष्ट्रीय तत्त्वासाठीं पुष्कळ लोक खादी वापरीत असले, तरी बहुजनसमाजाच्या गळ्यांत जेव्हां हजारों शाळांनीं तयार केलेला माल बांधण्याचा पद्धतशीर सरकारी प्रयत्न होईल, त्या वेळेस त्यांना आपल्या मालाचा दर्जा बरोबर कळून चुकेल, व लाखों रुपये उधळून कळलेली चूक आंखलेल्या योजनेचा फोलपणा सिद्ध करील ! म्हणून यांत्रिक चरके निर्माण होईपर्यंत या चरक्यांच मुळींच उपयोग करूं नये. त्याकरितां राष्ट्रीय सरकारनें जिल्ह्याच्या अगर मध्यवर्ति ठिकाणीं स्वदेशी गिरण्या काढून अत्यंत स्वस्त दरानें सर्व प्रकारच्या नंबरचें सूत अशा शाळांना पुरवावें. सुधारलेले लांकडी सट्ल माग, ताणा तयार करणारीं व पांजण लावणारीं सुधारलेलीं यंत्रें यांनीं सज्ज अशीं शाळागृहें व वरील पद्धतीचें निरनिराळ्या नंबरचें पिळदार रंगित व कोरें सूत यांचा संयोग घडवून आणिल्यास या एकाच धंद्यावर शें. ९० शाळा तरी पूर्ण स्वावलंबी होतील व कोट्यवधि रुपयांचें कापड निर्माण करून परदेशी कापडाचें पूर्ण उच्चाटन करतील !

पण महात्माजींची मुख्य मदार चरका व टकळी यांवरच आहे. अठराव्या शतकांत वाफेच्या शक्तीचा शोध लागून, यंत्रयुगाला सुरुवात झाली, तोंपर्यंत ह्याच साधनानें हिंदुस्थानचा कापडाचा धंदा जगांत उच्च कोटीस नेला होता. हिंदुस्थानइतकें उत्कृष्ट व विशेषतः स्वस्त कापड जगांतील कोणताच देश

पैदा करूं शकत नव्हता. इंग्लंडमध्यें तयार होणाऱ्या मालाच्या तिप्पट किंवा पांचपट स्वस्ताईनें हा माल तेथें जाऊन विकतां येत असे. याचें कारण येथील कमी मजुरी, साधी राहाणी, आनुवंशिक परंपरेनें राखलेले धंदे व माल खपविण्यास अनुकूल अशीं साधनें हें होय, असें थॉमस म्हणतो. मालही भरपूर निघे. त्या वेळीं हिंदुस्थान साऱ्या जगाला झाकण्याइतकें वस्त्र पुरवूं शकत होतें. त्याच्या सुंदरपणाचें वर्णन करण्याचें कारण नाहींच ! मध्ययुगांत मच्छलीपट्टणाच्या कापडाइतकें सुबक कापड जगांत कोठेंच निघत नसे, असें मार्कोपोलो म्हणतो. " या वस्त्रांची कारागिरी मानवी प्राण्यांची आहे असें म्हणण्यापेक्षां ती देवतांची किंवा अन्य जीवांची आहे असें म्हणणें बरें " या शब्दांत त्याचें वर्णन केलेलें आढळतें. डाक्याच्या मलमलीचें वर्णन तर सर्वविश्रुत आहेच. तेव्हां अशा प्रकारचें जगाला आश्चर्यचकित करणारें कापड-कौशल्य १८५० सालापर्यंत आमच्या लोकांत होतें. पण त्या सर्व धंद्यांचा व साधनांचा नाश निष्ठुरपणें केला गेला. आज तीं सर्व यांत्रिक साधनें आमच्या डोळ्यांपुढून नाहींशीं झालीं असून, सूत कातण्याच्या यंत्राऐवजीं, कांड्या भरण्याच्या चरक्यावरच आज आम्हांला ती पूर्वस्थिति प्राप्त करून देण्याचा महात्माजींचा प्रयत्न चालू आहे ! पण या चरक्याचा गेलीं २० वर्षें सतत उपयोग करूनही, त्यावर डाक्याच्या मलमलीइतकें सुंदर व तलम सूत निघाल्याचें कोणीं सिद्ध केलें नाहीं. या चरक्यानें हिंदुस्थानच्या विपन्न स्थितींत हजारों देशबांधवांस रोज एक वेळचें जेवण दिलें असेल, नाहीं असें नाहीं. पण त्याच्या शेंकडोपट शक्तीचीं नवीं नवीं साधनें निर्माण करून जग उत्कर्षाच्या शिखराकडे चाललें असतां, त्या चरक्यावरच आपण आपली दृष्टि खिळवूं पहाणें म्हणजे राष्ट्राची प्रगति थोपवून धरण्यासारखें आहे ! हा लाकडी चरका किंवा ही टकळी रोज आठ तास सतत कष्ट करूनही पोटाला रोज सहा दिडक्या देण्यास समर्थ नाहीं, याची जाणीव सर्व लोकांस अनुभवानें पुरी होऊन गेली आहे. आज जगांत असें एकही राष्ट्र नाहीं, कीं जें या महात्माजींच्या टकळीचा व चरक्याचा रोज उपयोग करीत आहे ! जगाच्या प्रगतींत हें साधन निकामी ठरल्यास आज उणींपुरीं शंभर वर्षें होऊन गेलीं. चरक्याचें व टकळीचें युग संपून शंभर वर्षें झालीं असतां, त्याच साधनाचा हट्ट धरणें म्हणजे प्रगतीचें बीज न उकलण्यासारखें

आहे. जगांतील कापडाच्या गिरण्यांच्या शर्यतींत हें साधन हातीं घेऊन उतरणें, म्हणजे पांगुळगाडा घेऊन विमानें व मोटारी यांच्या शर्यती जिंकण्यासारखें हास्यास्पद होणार आहे ! किंवा शिवकालीन हत्यारें घेऊन, सर्व प्रकारच्या आधुनिक युद्धसाहित्यांनीं सजलेल्या जर्मनीच्या हिटलरचा पराभव करण्यासारखें आहे ! रामायणकाळीं किंवा पांडवांच्या काळांत राम आणि अर्जुन बाणांच्या लढाया खेळून विजयी झाले म्हणून आज कोणी हिंदी वीर, स्वातंत्र्यासाठीं त्यांचा उपयोग करूं लागेल तर तें किती हास्यास्पद होईल ! म्हणून या बाबतींतला प्रामाणिक मतभेद स्पष्ट करून मला महात्माजींना अशी सविनय विनंती करावयाची आहे कीं, जगाच्या कापडाच्या चढाओढींत ह्या साधनानें हिंदुस्थानचा टिकाव लागावयाचा नाहीं. जगाच्या बाजारपेठेंत चरक्यावर कातलेल्या सुताच्या कापडास भाव यावयाचा नाहीं, इतकेंच नव्हे, तर स्वदेशांतील गिरण्यांच्या चढाओढींत हें कापड टिकाव धरणार नाहीं. म्हणून हा चरखा बहुकार्यक्षम होईपर्यंत, त्यांत भरपूर यांत्रिक सुधारणा होईपर्यंत, त्याच्या प्रसारांत शक्तीचा व कालाचा अपव्यय करूं नये.

" इंग्लंडच्या आजच्या विशाल वैभवाचा पाया अठराव्या शतकांतील 'सॅम्युएल् क्रांपटन ' च्या सूतयंत्रानें घातला. त्यानें आपलें बुद्धिकौशल्य खर्च करून चांगलें बारीक व पिळदार सूत कातण्याचें एक यंत्र तयार केलें. त्या वेळेस हिंदुस्थानमधून इंग्लंडला जात असे इतकें बारीक व पिळदार, तितकेंच टिकाऊ व सुंदर सूत हें ' क्रांपटन् ' चें यंत्र बिनचूक व एकसारखें कातूं लागलें. ' क्रांपटन् ' च्या ह्या सूतयंत्रानें जगाच्या उद्योगधंद्यांत एकदम विलक्षण क्रांति घडवून आणिली. हिंदुस्थानचा पोटापाण्याचा प्रमुख धंदा इंग्लंडनें हिरावून नेला. हिंदुस्थानची सारी संपत्ति इंग्लिश घरांमधून अप्रतिहत प्रकाशूं लागली. हिंदुस्थान शरिरानें, मनोबुद्धीनें व पैशानें दुर्बल झाला, आणि इंग्लंड सर्वसमर्थ होऊन त्यानें जगाच्या अग्रणित्त्वाचा मान गुणानें व खंबीरपणें पटकावला. क्रांपटनच्या ह्या सूतयंत्रानें लँकाशायरचें केवळ नव्हे तर साऱ्या इंग्लंडच्या संयुक्त साम्राज्याचें जन्मोजन्मींचें कल्याण करून टाकिलें. थोड्यक्याच अवधींत आपल्या साध्या सूतयंत्रावर मोठ्या उत्साहानें सूत कांतणाऱ्या आणि कुटुंबांच्या व पोराबाळांच्या पोटापाण्याला समाधानानें मिळविणाऱ्या ६॥ लाख लोकांना पाहून ' क्रांपटनला' किती धन्यता वाटली असेल ! क्रांपटनसारखे पुरुष खरे महात्मे व खरे लोकाग्रणी

होत. इंग्लंडच्या विशाल वैभवाचा पाया दरिद्री पण दृढव्यवसायी क्रांपटननें घातला. हिंदुस्थानांतील गेल्या दहावीस वर्षांच्या तीव्र राजकीय आणि सामाजिक व औद्योगिक चळवळींनीं आणि जमविलेल्या कोट्यवधि रुपयांच्या फंडांनीं एकही ‘ हिंदी क्रांपटन् ’ उत्पन्न केला नाहीं ! मूळ सूत कातण्याची विद्या हिंदी. कित्येक शतकें हिंदी लोकांनीं ती उत्तम प्रकारें उपयोजिलेली आणि इतका उत्साह व इतकी बुद्धिमत्ता आणि कळकळ हीं सर्व जगभर इतकीं वाजलीं गाजलीं असतांना देखील ३० कोटि हिंदी डोक्यांतून व ६० कोटि हिंदी हातांमधून एका तंतूचे ठिकाणीं शंभर तंतु आणि एका शेराचे ठिकाणीं १०० शेर सूत कातणारें एकही सूतयंत्र गेल्या किंवा चालू चळवळींत अखिल हिंदुस्थानांत उत्पन्न होऊं नये हें आश्चर्य म्हणावें कीं दुर्दैव म्हणावें ? ”

—(मोहिनीराज मुळे; चित्रमय जगत्.)

वरील उताऱ्यावरून, महात्माजींनीं हातीं धरिलेल्या ‘ चरक्यांत ’ इष्ट त्या सुधारणा झाल्याशिवाय तो बहुकार्यक्षम होणार नाहीं हें स्पष्ट होतें. या बाबतींत महात्माजींनीं ‘ अखिल भारतीय चरखा सूतसंघातर्फे ’ एक लाख रुपयांचें बक्षीस जाहीर करूनही तो बहुकार्यक्षम झाला नाहीं. यावरून हल्लींच्या चरख्यांतील वैगुण्य त्यांच्या दृष्टीनेंही उघड झालें आहे. म्हणून त्या चरख्याची खानगी संशोधन खात्याकडे करून तो बहुकार्यक्षम होऊन बाहेर पडेपर्यंत, महात्माजींनीं आपल्या उर्वरित आयुष्यांतील अत्यंत महत्वाचा एकही क्षण त्याच्या प्रसारासाठीं खर्ची घालूं नये. क्रांपटनच्या सूतयंत्राप्रमाणें जेव्हां तो प्रयोगशाळेंतून बहुकार्यक्षम होऊन बाहेर पडेल, तेव्हां न सांगतांही तो गरिबांचें आश्रयस्थान होईल व मग त्याचें उच्चाटण करणें कोणत्याही राज्ययंत्राला शक्य होणार नाहीं.

आज विमानें, मोटारी, रेल्वे, आगबोटी, सब्मरीन, रेडियो, तारायंत्र, टेलिफोन, सिनेमा, कॅमेरा, फोनोग्राफ, विद्युद्दीप, सिंगर मशीन, ऑईल इंजीन, प्रेस, दुर्बिणी इत्यादि बहुविध यंत्रें जगाच्या सुधारणेंत झपाट्यानें प्रगति करीत असतां तिकडे पूर्ण डोळेझांक करून, निव्वळ ‘ चरका व टकळी ’ यांवरच महात्माजींनीं आपली विशाल दृष्टि खेळविणें इष्ट नाहीं. जगाच्या इतिहासांत एका अद्वितीय महात्म्यानें हा केलेला काळाचा ‘ अपव्यय ’ म्हणून त्याची नोंद

होईल अशी साधार भीति वाटते ! हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति यच्चयावत् जपान-जर्मनीच्या धर्तीवर झाल्याशिवाय, 'स्वतंत्र राष्ट्र' म्हणून आपणांस एक क्षणही जगतां येणार नाहीं ! आज अबीसिनीया किंवा चीन यांची काय अवस्था झाली ? जगाच्या सुधारणेंत मागें पडणें म्हणजे 'स्वातंत्र्यनाश' करून घेणें असाच यांतून कर्णकर्कश ध्वनि निघत नाहीं का ? म्हणून महात्माजींनीं आपली दृष्टि अंतर्मुख करून, प्रांतिक स्वायत्ततेच्या सुवर्णसंधींत हिंदी राष्ट्राला औद्योगिकदृष्ट्या जगांत मानाचें स्थान कसें मिळेल याचाच प्रामुख्यानें विचार करावयास नको काय ?

अखिल भारतीय चरखा सूतसंघातर्फे महात्माजींनीं ही चळवळ सुरू केल्यास उणींपुरीं २० वर्षे होत आलीं. या दीर्घ कालावधींत 'चरखा व टकळी' या साधनांनीं भारताचा नष्ट झालेला हा कापडाचा धंदा ऊर्जितावस्थेस आणण्यासाठीं महात्माजींनीं आजपर्यंत अनेक भगीरथ प्रयत्न केले असल्यामुळें, त्यासंबंधीं लिहिणें हें मोठें पाप होय, असें लेखकालासुद्धां वाटतें. परंतु आर्थिकदृष्ट्या त्याच्या उपयुक्ततेसंबंधीं आजपर्यंत जे अनेक प्रयोग करण्यांत आले, त्यांतील कटु सत्य उघड केल्याशिवाय स्वस्थ बसणें हें 'सत्य आणि अहिंसा' या तत्त्वास सोडून असल्यामुळें मीं आपलें प्रांजल मत उघड केलें आहे. असें करण्यांत या चळवळीवर किंवा धंद्यावर आघात करण्याचा लेखकाचा कोणताही हेतु नाहीं. त्या राष्ट्रीय धंद्याबद्दल इतरांप्रमाणेंच प्रस्तुत लेखकालाहि पूर्ण आदर व अभिमान वाटत आहे. परंतु ह्या साधनानें लाखों दीनदुबळ्या प्रजेला दोन वेळचें पोटभर अन्न मिळवून देतां येत नाहीं, असा स्वानुभव असल्यामुळें ह्या साधनाच्या बाबतींत पूर्ण मतभेद आहे. या म्हणण्याच्या सिद्धतेसाठीं नाइलाजास्तव पुढील उतारा घ्यावा लागत आहे. त्यावरून वाचकांची पूर्ण खात्री पटेल.

पुण्यांतील खादीभांडाराचे लोकप्रिय चालक श्री. भोगीलाल जैनी यांनीं सन १९३६ च्या डिसेंबर महिन्यांतील 'महाराष्ट्र राष्ट्रसभा' या लोकशक्तीच्या खास अंकांत 'खादींत काँग्रेसच्या ध्येयाची उत्क्रांति' या नांवाचा एक अत्यंत माहितीपूर्ण लेख दिला आहे. त्या लेखांत ते म्हणतात कीं, "कंपनी सरकारच्या दलालांनीं बारीक सूत कातणारांचे अंगठे कापले व पुढें ब्रिटिश गिरण्यांतील

कापडानें हिंदुस्थानांतील चरखे बंद पाडिले, ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. अशी परिस्थिति असतांना महात्मा गांधीजींनीं हातमागावरील हातसुताच्या कापडाचा पुरस्कार करून, चरखे पुन्हा फिरावयास लाविले व अवघ्या १५ वर्षांत विलक्षण क्रांति घडवून आणिली. भारतीय चरखासंघ स्थापन होऊन सोळा वर्षें झालीं. पण एवढ्या अवधींतही त्यानें केलेली प्रगति १९३५ सालच्या खालील आंकड्यांवरून स्पष्ट दिसून येणारी आहे.

(टीप—कोष्टक पृ. ४० वर पहावें.)

" वरील आंकड्यांवरून ही गोष्ट कोणाच्याही ध्यानांत येईल कीं, भारतीय चरखासंघानें साडेतेरा हजार विणकऱ्यांना काम पुरवून पांच लाख, अकरा हजार रुपये त्यांच्या पदरांत टाकिले. एकलक्ष सत्तर हजार उत्तम कातणारे निर्माण करून त्यांना साडे चार लाख रुपयांवर रक्कम दिली. व बेकारी माजत चाललेल्या मध्यम वर्गांतील तरुणांना खादीसेवक बनवून, त्यांनाही पावणेतीन लाख रुपये मोबदला दिला. मध्यम वर्गांत बेकारी बरीच माजली असतां एक हजारावर नवशिक्षितांना चरखासंघानें विधायक कार्यांत गुंतविलें ही अभिनंदनीय गोष्ट होय. ग्रामोद्योगसंघ सर्वत्र धंद्याचे बाबतींत हीच गोष्ट मोठ्या प्रमाणावर करीत आहे......" इ. —(श्री. भोगीलाल जैनी.)

वरील लेखावरून आपणांस किती तरी उद्बोधक माहिती मिळत आहे. ती लक्षांत घेतल्यास आपणांस काय दिसून येईल ? (१) प्रत्येक विणकऱ्यास सालीना सुमारें ३८ रुपये म्हणजे महिन्यास ३॥ किंवा दररोज सात पैसे मिळाले. (२) चरख्यावर सूत कातणारास वार्षिक २ रु. ११ आणे ४ पै म्हणजे महिन्यास ॥३॥६ किंवा दररोज फक्त १॥ पै पडली. (३) खादीसेवकास (खादीचा प्रचार करणारे किंवा विक्री करणारे यांस) वार्षिक २५३ रु. ८ आणे किंवा महिन्यास २१॥ रु.; किंवा दररोज सुमारें १२ आणे वेतन मिळालें. (४) महात्माजींच्या गुजराथप्रांतांत अवघे चारच विणकरी, २३ कातणारे व खादीसेवक फक्त दोनच, गेल्या १६ वर्षांत निर्माण झाले ! त्यांपैकीं सूत कातणारास वार्षिक ३॥ रुपये तर खादीसेवकास प्रत्येकीं ४६६ रु. मिळाले ! (५) अमदाबादच्या सेंट्रल ऑफिसांतील प्रत्येक खादीसेवकास

प्रांत	विणकरांची संख्या	मिळालेली रक्कम	कातणारांची संख्या	मिळालेली रक्कम	खादीसेवक	मिळालेला पगार
आंध्र	११८८	५७५७३	१७३६६	६१६००	१०४	२९७७३
आसाम	७९	१६०	७	८	८	२३०
बंगाल	४८८	३०२६८	७१२२	४५०६७	३४	७६०५
गुजराथ—काठेवाड	४	१३४	२३	८१	२	९३२
कर्नाटक	२६६	६६८९	५३१७	६९१९	५०	१२८९३
काश्मीर	२३५		१६४५		४२	११४३२
केरळ	७६	६२९२	६९२	५०९९	१५	३९४१
महाराष्ट्र	४२४१	७४८८९	१२७७८	५७६८८	१४०	३२३११
पंजाब	१३४९	५५९८७	७२४६०	५०३८८	४५	१४९८२
राजस्थान	२०००	५२७७०	१००००	४७९७०	४०	१११८४
सिंध	४०	३५३३	१४९२	४३१०	६	२६२२
तामीलनाड	१५८०	११२३०५	२७१६४	९९५२९	१७८	३५०२३
संयुक्तप्रांत	१८२२	११०२६७	१४७३५	७९२८१	२१०	५४१८०
उत्कल	१०३	३९२१	४०७	३१५२	२२	५१६०
बिहार		.....			१५०	२७५२०
मुंबई					३८	१७२१०
ब्रह्मदेश					३	२०३०
अहमदाबाद					१०	९००७
एकूण	१३४७१	५२०९८९	१७०२०८	४६१०९२	१०९७	२७८१२३

वार्षिक ९०० रुपये किंवा मासिक ७५ रु. किंवा दररोज २॥ रुपये वेतन मिळालें. (६) पंजाबांतील पाऊण लाख सूत कातणारांना वार्षिक पन्नास हजार रुपये म्हणजे प्रत्येकीं वर्षाला अवघे १२ आणे किंवा मासिक १ आणा किंवा दररोज $\frac{1}{3}$ पै मिळाली. (७) बिहार, मुंबई व ब्रह्मदेश येथें एकही विणकर किंवा सूत कातणारा गेल्या २० वर्षांत जन्मास आला नाहीं !

वरील सारांश लक्षांत घेतां श्री. भोगीलाल जैनी म्हणतात त्याप्रमाणें ह्या चळवळीनें मध्यम वर्गांतील ११०० बेकारांच्या पोटापाण्याची सोय उत्तम प्रकारें लागली ! पण सूत कातणाराला आणि विणकराला काय मिळालें तें पाहिल्यास हे लोक जगले कसे तेंच कळत नाहीं. उत्तम सूत कातणारांचाच यांत समावेश केला असल्यामुळें, ह्या चरखासंघानें त्यांना वार्षिक २॥। रु. मिळवून दिले, ही काय थोडी गोष्ट केली ? अशा लोकांनीं निदान रोज एक तास तरी सूत कातलें असें धरल्यास त्यांना १॥ पै मजुरी मिळाली, असेंच सिद्ध होत नाहीं का ? प्रिय महात्माजी ! आपल्या साधनावर अढळ विश्वास ठेवून सूत कातणाराला एवढेंच वेतन आपण मिळवून दिलें असें होत नाहीं का ? या वेतनांत त्यानें आपला चरितार्थ कसा चालवावा तें स्पष्ट केल्यास त्या पोटार्थी दीन, दुबळ्या, कंगाल कुटुंबावर आपले महत् उपकार होतील ? लाखों सूत कातणारे वार्षिक २॥। रु. घेत असतां अहमदाबादच्या खादी सेवकांनीं वर्षाला ९०० रु. पगार घेतला, ही गोष्ट महात्माजींच्या कशी लक्ष्यांत आली नाहीं ?

मीं स्वतः कित्येक महिने हा चरखा रोजीं ७।८ तास चालवून पाहिला. पण मला ४।६ पैशांपेक्षां त्यांत रोजमजुरा पडला नाहीं. आज मुंबईला गिरणींत काम करणाऱ्या विणकऱ्यास महिन्यास ४०—५० रुपये पगार मिळतो, तर या विणकऱ्यांस अवघे मासिक ३ रुपये मिळाले ! सुताच्या चात्या चालविणाऱ्या प्रत्येक बाईस ३० रु. मिळतात तर चरख्यावर सूत कातणाऱ्या बाईस वर्षाला अवघे २॥। रु. मिळाले ! धन्य त्या चरख्याची, कीं ज्यानें आमच्या जीवनाचा प्रश्न अशा तऱ्हेनें सोडवून दाखविला ! धन्य त्या भोगीलाल जैनीची, कीं ज्यानें असा स्फूर्तिदायक संदेश आम्हांला दिला ! आणि धन्य त्या खादीसेवकांची, कीं ज्यांनीं आपला प्रपंच व्यवस्थित चालविण्यासाठीं ह्या खादीचा उदोउदो चालविला !

वाचकहो ! हेंच तें कटु सत्यना ? तें सत्य लपवून जर आपण ह्याच साधनाच्या मागें लागलों तर आपली सत जन्मांत तरी आर्थिक उन्नति होईल का ? म्हणून हें साधन आमच्या आर्थिक उन्नतीच्या कामीं कोणत्याही तऱ्हेनें उपयोगी पडणार नाहीं अशी सर्वांची खात्री होईल. गेल्या २० वर्षांत जर महात्माजींनीं औद्योगिक चळवळ हातीं घेतली असती, तर आजच्यासारखी चरखा फिरवूनही उपाशी मरण्याची पाळी आमचेवर कधींच आली नसती ! म्हणून महात्माजींनीं आपली दृष्टि विशाल करून, भारताचा अभ्युदय करण्याचे अनेक औद्योगिक मार्ग शोधावयास नकोत का ?

राष्ट्राध्यक्ष सुभाषचन्द्र बोस यांनीं याच दृष्टीनें 'आर्थिक नियोजन' मंडळाची केलेली स्थापना व तद्द्वारा राष्ट्रीय उद्योगधंद्यांचें चालविलेलें पुनरुज्जीवन, हें आपल्या भाग्योदयास कारणीभूत झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

मोठमोठ्या उद्योगधंद्यांच्या योजनेबरोबरच देशांतील कोटयवधि शेतकरी-समाजाला कोणते जोडधंदे देतां येतील व टिकवून धरितां येईल याचा प्रामुख्यानें विचार व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीनें पुढील योजना सर्वांना मार्गदर्शक होईल म्हणून मांडीत आहें.

जोडधंद्यांची निवड.

शेतकऱ्यांना द्यावयाच्या जोडधंद्यांत पुढील धंद्यांचा समावेश करितां येईल--

(१) शास्त्रीय पद्धतीवर ठिकठिकाणीं फळबागांची मोठ्या प्रमाणावर लागवड करणें व त्यांची शास्त्रीयपद्धतीनें निगा राखणें.

(२) भाजीपाला, फळफळावळ व फळांचे मुरंबे दीर्घकाळ टिकविण्यासाठीं अशा प्रत्येक गांवीं शीतसंग्राहकाची व आधणपात्राची योजना करून, असा माल डब्यांतून पॅकबंद करून बाहेरदेशीं किंवा देशाच्या अंतर्भागांत पाठविण्याची व्यवस्था करणें.

(३) रेशमाच्या किडयांची जोपासना व वाढ करून तो धंदा सार्वत्रिक करणें.

(४) आस्ट्रियन जातीच्या, तसेंच अंगोरा व अल्पाका जातीच्या तलम व मऊ लोंकर देणाऱ्या परदेशी मेंढ्यांच्या जाती आणून त्यांचा हवामानानुसार

प्रसार करणें व लोंकरीची निपज वाढवून शास्त्रीय पद्धतीवर त्या धंद्याची पुनर्घटना करणें.

(५) देशी व विदेशी कोंबडयांच्या निवडक जाती घेऊन त्यांचा सार्वत्रिक प्रसार करणें व त्यांची निगा कशी राखावी तें शिकविणें.

(६) महाराष्ट्रांतील दूधदुभत्याच्या धंद्याची शास्त्रीय तत्वावर पुनर्घटना करून त्याचा पुरवठा शहरोशहरीं करणें. यासाठीं येथील गाईम्हशींच्या जातीची सुधारणा करण्यासाठीं उत्तम जातीच्या वळूंचा प्रसार करून त्यांच्या संकरानें येथील जाती सुधारणें किंवा उत्तम दुधाळ जाती आणून त्यांचा प्रसार करणें.

(७) लोंकर व कापूस पिंजणें व त्यापासून लहानलहान यंत्रांवर सूत काढणें

(८) सुधारलेल्या हातमागांचा सर्वत्र प्रसार करणें व त्यांवर कापूस, लोंकर व रेशीम यांचें कापड विणणें.

(९) माग तयार करणें, मागांस लागणाऱ्या वया, फण्या व बॉबिन्स तयार करणें.

(१०) लाकडी फर्निचर तयार करणें.

(११) लोखंडी तयार माल घेऊन स्प्रिंगचे व साधे पलंग तयार करणें, पाळणे बनविणें, कपाटें व सामान ठेवण्याचीं फडताळें तयार करणें, इत्यादि.

(१२) कमावलेल्या कातडयापासून यांत्रिक साह्यानें हरएक प्रकारच्या उपयुक्त वस्तु तयार करणें.

(१३) बांबू व वेत यापासून चटया, टोपली व इतर उपयुक्त शोभिवंत फर्निचर तयार करणें.

(१४) घायाळ, आंबाडी, ताग, जवस इत्यादिकांपासून वाख तयार करणें, व यांत्रिक साधनानें त्याचे दोर वळणें.

(१५) काथ्या तयार करणें, दोर वळणें वगैरे.

(१६) मेणबत्त्या व साबण तयार करणें.

(१७) औषधी वनस्पतींची लागवड करून त्यांचा पुरवठा रसशाळेला करणें.

(१८) लाकडी व रबरी अशीं लहान मुलांचीं खेळणीं तयार करणें.

(१९) निरनिराळ्या प्रकारचे ब्रश तयार करणें.

(२०) निरनिराळीं मलमें, औषधी चूर्णें, पावडरी, दंतमंजन, मेंथाल व व्हॅसलीन तयार करणें.

(२१) लहानसहान हातयंत्रांवर शेंगा फोडणें, हळद चोळणें, सुंठ तयार करणें.

(२२) सेंट्रिफ्यूगल यंत्रानें उसाच्या रसापासून साखर तयार करणें.

(२३) पाव, बिस्किटें, चाकोलेट, पेपरमिंट तयार करणें.

(२४) उदबत्त्या, बुक्का, कुंकू, तपकीर, दांतवण इत्यादि माल तयार करणें.

(२५) तंबाखूचा जर्दा, सिगारेट व विडया तयार करणें.

(२६) नीळ पिकविणें व तीपासून रंग तयार करणें.

(२७) निरनिराळ्या प्रकारची शाई व रंग तयार करणें.

(२८) चाकू, कात्र्या व निरनिराळ्या प्रकारचीं कुलपें तयार करणें.

(२९) कागद तयार करणें.

(३०) बांगडया बनविणें.

(३१) शोभेची दारू तयार करणें. (फटाके, चंद्रज्योती, भुईनळे, तारगोळे वगैरे.)

(३२) फुलांच्या बागा लावणें, सुवासिक अत्तरें व उटणीं तयार करणें. तसेंच गुलकंद तयार करणें.

(३३) कापडाच्या टोप्या तयार करणें.

(३४) कांचेस पारा बसाविणें, आरसे तयार करणें, फ्रेमी बनविणें.

(३५) छत्र्या तयार करणें.

(३६) लोखंडी पत्र्याच्या ट्रंका व बॅगा तयार करणें. तसेंच घमेलीं, बादल्या, घागरी, मोटा इत्यादि माल जरूर तीं लहानसहान यंत्रें घेऊन तयार करणें.

(३७) वर्तमानपत्रांचे खिळे जुळवून मजकूर तयार करणें, छापणें, बुकबाइंडिंग करणें.

(३८) सतारी, तंबोरे व हार्मोनियम तयार करणें.

(३९) गालीचे व सतरंज्या तयार करणें, नवार विणणें.

(४०) कापडावर खडी काढणें, भरतकाम व जरीचें काम करणें.

(४१) कापूस पिंजणें, गाद्या व गिरद्या भरणें व त्यांचा शहरांस पुरवठा करणें.

(४२) लाख गोळा करणें, तीपासून वॉरनिश तयार करणें, खळी तयार करून त्यांच्या बाटल्या भरणें.

(४३) बैलांकडून तेल गाळणें व मालाच्या वाहतुकीचा धंदा सुरू करणें.

(४४) शिंदी व ताडीच्या रसापासून गूळ तयार करणें.

(४५) हिरडा, बेहडा, आवळा, रिठा, शिकेकाई, करंज, एरंड इत्यादि उपयुक्त झाडांची लागवड करणें व त्यांपासून उपयुक्त माल तयार करणें.

(४६) हिरड्यापासून रंग तयार करणें, करंज व एरंड यांच्या बीजापासून तेल गाळणें.

(४७) कपडे शिवणें व रेडीमेडसारखीं दुकानें खेडोपाडीं उघडून त्यांमधून त्यांचा खप करणें.

(४८) हाडांची पूड तयार करणें, निरनिराळीं खतें बनविणें.

(४९) बटणें तयार करणें.

(५०) कंदिलाच्या वाती, रेशमी गोफ, तारेचीं शिंकीं, स्टोव्हचे आकडे व पिन्स, पत्र्याच्या व तारेच्या चाळण्या, सांपळे, कागदाचीं व कापडाचीं शोभिवंत फुलें तयार करणें, पंखे बनविणें, वाळ्याचे पडदे व पंखे तयार करणें, भांड्यांस कल्हई करणें, भांड्यांवर मोलामा चढविणें, कागदी व कापडी पिशव्या तयार करणें, भात सडणें, पोहे कांडणें वगैरे किरकोळ धंदे करणें.

(५१) हिंदुस्थान हा गळितधान्यप्रधान देश आहे. ह्या देशांत ह्या पिकाखालीं सुमारें दीड कोटि एकर जमीन लागवडीखालीं आहे. सन १९२६–२७ सालीं हिंदुस्थानांतून सुमारें वीस कोटि रुपयांचीं गळिताचीं धान्यें परदेशीं रवाना झालीं. हें गळित गाळण्याचें काम हा शेतकरी जीवनांतील महत्वाचा राष्ट्रीय धंदा झाला पाहिजे. त्याकरितां हल्लींच्या देशी लाकडी घाण्यांत जरूर त्या सुधारणा करून, ते बैलाच्या साह्यानें चालविण्याची योजना तयार करावी. भुइमूग, करडी, तीळ, जवस, सरकी, करंजी, एरंडी, सोयाबीन इत्यादि गळित धान्यें त्यांतून गाळून घेतल्यास शेतकऱ्यांचा फार फायदा होईल. जनावराला व शेतीला उपयुक्त अशी

पेंड त्यांच्या पदरांत पडेल. हें गाळलेलें तेल सरकारनें खरेदी करून तें अतिशुद्ध करण्याची व्यवस्था करावी. म्हणजे त्या तेलाचा उपयोग साबण व मेणबत्त्या ह्या धंद्यास होईल. तसेंच दिव्याकरितां हें तेल उपयोगांत आणतां येईल. त्यामुळें दर साल कोट्यवधि रुपयांची बचत होईल. राकेल तेलासाठीं हिंदुस्थानमधून दर-साल ५–६ कोटी रुपये परदेशी जातात, त्यास पायबंद बसेल.

" चीन देशांत हा धंदा राष्ट्रीय स्वरूपाचा झाला आहे. चीनचा तरुण संशोधक ' चंगलीन ' यानें हें अतिशुद्ध केलेलें तेल जाळण्यासाठीं, नवीन प्रकारच्या दिव्यांचा शोध लावला आहे. ह्या नवीन प्रकारच्या दिव्यांत चीनच्या कोट्यवधि शेतकऱ्यांनीं राबून वाढविलेल्या वनस्पतीच्या तेलाचा उपयोग करण्यांत येतो. न धुरकटणारे, भरपूर प्रकाश देणारे, कांचेच्या चिमण्या घातलेले हे असंख्य दिवें आज चीनमध्यें प्रकाशतांना पाहून कोणीही चंगचें कौतुकच करील ! हा दिवा इतका बेमालूम तयार केला आहे कीं, औद्योगिक क्षेत्रांत सदैव वावरणाऱ्या तज्ज्ञालाहि राकेलच्या दिव्याशीं तुलना करून यांत खोड काढतां यावयाची नाहीं."

" चिनी सरकारानें ह्या दिव्यांचा खप वाढविण्याची शक्य ती खटपट केली असून, या धंद्याला निम-सरकारी धंद्याचें स्वरूप देण्यांत आलें आहे. या दिव्याचे कारखानदार दरसाल चार लाख दिवे तयार करीत असून मागणी आणि पुरवठा यांची तोंडमिळवणी होत नाहीं. ह्या दिव्यांची ज्योत रॉकेलच्या दिव्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक तेजस्वी आणि सोईची असून, त्यांत खुद्द चीनमध्यें निर्माण होणाऱ्या सरकी, सोयाबीन इत्यादि पदार्थांपासून मिळणारें तेल असल्यानें चीनच्या शेतीला उत्तेजन मिळत आहे."

" अल्लाउद्दिनाच्या अद्भुत दिव्याप्रमाणें या नवीन दिव्यानें चीनमध्यें चमत्कार घडवून आणले आहेत. परदेशाकडे धावणाऱ्या पैशाचा ओघ या दिव्यानें चीनच्या तिजोरीकडे वळविला आहे. चीनच्या शेतकऱ्यांत व ग्रामिणांच्या आर्थिक जीवनांत ह्या दिव्यानें नवचैतन्य निर्माण केलें आहे. ह्या दिव्याच्या ज्योतीनें राष्ट्रीय-उद्योगधंद्याला उत्तेजन देण्याची भावना चीनच्या हृदयांत प्रज्वलित केली असून, परक्यांच्या आक्रमणाला खीळ घालण्याचें एक नवीन साधन आपणांस उपलब्ध

झाल्याप्रमाणें त्यांस वाटत आहे. चिनी सरकार आणि उद्योगतज्ञ खेड्यांच्या दिवाळखोरीचा प्रश्न सोडविण्यास आज कित्येक वर्षे झटत असूनही त्यांना या बाबतींत म्हणावें तसें यश आलें नव्हतें, आणि त्यामुळें चिनी शेतकऱ्यांवर पसरलेली औदासीन्याची छाया कांहीं केल्या कमी होत नव्हती. चिनी शेतकऱ्यांचें औदासिन्य आणि परकीय व्यापाऱ्यांची टोळधाड यामुळें चीनची आयात वाढून निर्यात घटत गेली व त्यामुळें यांतील फरक भरून काढण्यासाठीं चीनचे कोट्यवधि डालर्स परदेशीं जाऊं लागले. बाहेर जाणाऱ्या चीनच्या संपत्तीचा एक पंचमांश म्हणजे सुमारें १२ कोटि डॉलर्स निव्वळ तेलाचे पायीं परदेशीं जात असत. पण वरील राष्ट्रीय सरकारच्या प्रयत्नानें त्यांतील दरसाल १० कोटि डॉलर्सची बचत होऊं लागली आहे." "किर्लोस्कर–मासिक"

वरील उतारा किर्लोस्कर मासिकांतील श्री. आपटे यांच्या लेखांतील आहे. त्यांत ते म्हणतात कीं, "तेल हा पदार्थ जीवनाच्या नित्य गरजांतील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. राष्ट्र स्वतंत्र असो वा परतंत्र असो, खनिज तेलाच्या व्यापारावर निर्बंध घालून त्यास चालत नाहीं. जगाच्या राजकारणाचीं चक्रें गतिमान करण्याची अगर स्थिर करण्याची शक्ति या तेलामध्यें आहे, आणि म्हणूनच जगांतील सर्व मुत्सद्यांचें लक्ष या एकाच खनिज द्रव्यावर स्थिर झालेलें दिसतें."

तेव्हां चीनच्या राष्ट्रीय सरकारनें आपल्या शेतकऱ्यांच्या उद्धारासाठीं जो मार्ग पत्करला त्याचाच अवलंब येथील प्रांतिक सरकारांनीं केल्याशिवाय शेतकरीजीवन सुखी होणार नाहीं. गळिताच्या धान्यांशिवाय तेलें व पेंड मिळून दरसाल तीन कोटीची निर्यात परदेशीं होत असून सर्व प्रकारच्या तेलाची आयात सुमारें ९ कोटि रुपयांची आहे. म्हणून हा धंदा राष्ट्रीय स्वरूपाचा करण्याचा आटोकाट प्रयत्न राष्ट्रीय कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं जरूर करावा. यासाठीं ह्या धंद्यास पुढीलप्रमाणें सरकारी संरक्षण द्यावें—

१. गिरणींतील तेलाच्या यांत्रिक घाण्यावर लोकांचें गळित गाळून देण्यास, किंवा गळित घेऊन तेल व पेंड उक्ती देण्यास प्रतिबंध करणें. अशा गिरणीमालकास स्वतःच्या मालकीचें गळित गाळण्यास कोणत्याही तऱ्हेचा प्रतिबंध नसणें.

२. तेल गाळण्याच्या लाकडी घाण्यांत जरूर त्या यांत्रिक सुधारणा करून

शक्य तितकें जास्त तेल पडण्याची व ते घाणे बैलाच्या शक्तीनें चालण्याची योजना करून त्यांचा प्रसार सर्व शेतकऱ्यांमधून करणें.

३. असें गाळलेलें तेल विकत घेण्याची व तें शुद्ध करून दिव्यासाठीं किंवा साबण, मेणबत्त्या वगैरे जरूर त्या धंद्यासाठीं मिळण्याची सरकारी योजना करणें. या मार्गानें हा धंदा सार्वत्रिक होऊन, त्याची वाढ झपाट्यानें होईल.

(९२) हल्लीं मालाच्या वाहतुकीसाठीं सर्वत्र मालमोटारींचा सुळसुळाट झाला असल्यामुळें बैलांच्या वाहतुकीचा जोडधंदा नष्ट होत आला आहे. त्यामुळें शेती सांभाळून रिकाम्या वेळीं दोन पैसे मिळविण्याचें साधन नष्ट झाल्यामुळें शेतकऱ्यांची व बैलांची उपासमार मोठ्या प्रमाणांत सुरू आहे. याकरितां ह्या धंद्यास पुढीलप्रमाणें संरक्षण देऊन हा धंदा कायम टिकवून धरावा.

१. कोणत्याही रेल्वेस्टेशनपासून किंवा व्यापारी पेठेपासून १० मैलांच्या आंतील कोणत्याही गांवांतील मालाची वाहतुक करण्यास, मालाच्या मोटारमालकास कायद्यानें बंदी करणें.

२. १० मैलांपुढील व्यापारी वाहतुकींत मालाच्या मोटारींस उत्तेजन देणें. त्याबरोबरच अशा मोटारींस लागणारा माल स्वदेशी कारखान्यांत तयार करून पुरविणें.

या योजनेपासून शेतकऱ्यांस आपली शेती सांभाळून आपल्या भोंवतालच्या पंचक्रोशींत हा धंदा करून दोन पैसे मिळवितां येतील. याकरितां हल्लींच्या बैलगाड्यांत सुधारणा करणें, वाहतुकीचे दर निश्चित करून देणें व बैलांच्या जोपासनेची पूर्ण जबाबदारी मालकावर टाकणें जरूर आहे. अशा गाड्या वरिष्ठ पंचायत मंडळांनीं दरसाल पास कराव्यात. तसेंच बैल पास करून निकामी झालेल्या बैलांस सोडचिठी द्यावी.

वर नमूद केलेल्या जोडधंद्यांपैकीं पुष्कळसे धंदे हल्लीं आपल्या देशांत सुरू आहेत. पण परदेशी चढाओढीपुढें त्यांचा टिकाव लागत नाहीं. दरसाल कोट्यवधि रुपयांच्या मालाची आयात आपल्या देशांत अखंड सुरू आहे. या बाबतींत सन १९२६-२७ चे आंकडे आपणांस उद्बोधक व मार्गदर्शक वाटतील म्हणून ते देत आहे.

परदेशांतून आलेला माल.

मालाचें नांव	किंमत रु.
(१) सुती कापड	६५,०४,७३,९७६
(२) रेशमी कापड	३,४५,०९,५८४
(३) लोकरीचें कापड	४,१४,३८,१३२
(४) इतर जातीचें कापड	५,७१,०५,७२८
(५) साबण	१,५२,४१,२७८
(६) सिगारेट्स व तंबाखू	२,५६,१०,६६९
(७) छत्र्या	५२,५७,१६९
(८) खेळणीं	६२,२१,१७८
(९) टॉयलेट	५७,०२,१६३
(१०) दूध गोठीव	७५,७५,१८५
(११) दुधाचीं अन्नें	१,०१,३५,६०४
(१२) बिस्किटें	४९,१५,६१८
(१३) कापडाच्या पेट्या व साहित्य	७५,७७,१९३
(१४) चामड्याच्या वस्तु	५९,७२,८२९
(१५) दिवे धातूचे	८४,०६,१२६
(१६) पॉलिश	२०,७८,४५५
(१७) चाकू, कात्र्या	४१,३७,५४१
(१८) बांगड्या	८४,८५,८१०
(१९) मणी	३०,९४,९७२
(२०) इतर कांचसामान	१,३७,०७,४५७
(२१) दोर	१२,७९,६५८
(२२) काथ्या व काथ्याचें सामान	६,१५,२४५
(२३) बटनें	३७,०६,२६०
(२४) मेणबत्त्या	२,२०,९०६
(२५) बूट	५७,१३,१६४
(२६) लाख	८,१६,९१५

(२७) तेलें (रॉकेल वगैरे सर्व)	९,५८,७८,४८६
(२८) पेन्सिली	८१,९६,२८१
(२९) सुपारी	२,५०,१३,४५७
(३०) भाजी व फळें	१,६१,७६,४९६
(३१) शोभेची दारू	२०,८१,७५३
(३२) खतें	३५,३९,८७०
(३३) बॉबिन्स	३४,७५,५७१
(३४) वाद्न (हार्मोनियम, फोनो वगैरे)	२६,६३,०८३
(३५) ब्रश व केरसुण्या	१२,९३,५४४
(३६) टोप्या, कलाबतू वगैरे	१,७७,८६,८०२
(३७) कागद वगैरे	३,४३,१९,१६३
(३८) किरकोळ लोखंडी सामान	३,९५,१२,५१७
(३९) रंगाचें सामान	२,१३,२२,७७२
(४०) चिनी मातीचीं भांडीं	८२,८२,१११
एकूण	१,२०,६३,२९,७४१

आयात होणाऱ्या परदेशी मालापैकीं जो माल शेतकऱ्यांस जोडधंद्यांच्या रूपानें तयार करतां येईल त्यांचीच फक्त यादी वर दिली आहे. एवढी ही राष्ट्रीय संपत्ति, शेतकऱ्यांस जोडधंदे देऊन त्यांच्या घरांत खेळविल्यास ऋण-विमोचनाचा प्रश्न सोडविणें कितीसें अवघड आहे ? या धंद्याच्या प्रसारासाठीं कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं पुढील योजना आंखून पार पाडावी.

धंद्यांची जुळणी.

(१) वरील जोडधंद्यांचें शिक्षण देण्यासाठीं लायक तज्ज्ञांची निवड करणें.

(२) त्या त्या धंद्यास लागणारी आधुनिक यंत्रसामुग्री कोठें मिळते त्याचा तपास करणें. त्यापैकीं येथें कोणती तयार करतां येईल तें पहाणें व ती जमविणें.

(३) संशोधकखातें स्थापन करून, त्याकरवीं जुन्या यांत्रिक सामुग्रींत सुधारणा करणें व नवीन यंत्रसामुग्री तयार करणें.

(४) देशांत चालू असलेल्या सर्व कारखान्यांतून व फॅक्टऱ्यांमधून औद्यो-

गिक शाळा उघडून त्या त्या धंद्याचें शिक्षण तीन वर्षांत देण्याची व्यवस्था करणें.

(५) अशा शाळांचें शिक्षण मोफत करून, प्रत्येक विद्यार्थ्यामागें कारखान्यास ५० रु. पर्यंत वार्षिक बोनस देणें.

प्रत्येक जिल्हानिहाय औद्योगिक शाळा उघडणें.

(१) वरील जोडधंद्यांचें शिक्षण देणारे लायक शिक्षक तयार होण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्यास एक औद्योगिक शाळा उघडावी. या शाळेंत निरनिराळ्या धंद्यांचें प्रत्यक्ष प्रायोगिक शिक्षण देऊन शिक्षकवर्ग तयार करावा.

(२) या वर्गांत १८ वर्षांपेक्षां जास्त वयाचे, अत्यंत हुषार, तरतरीत व कष्टाळू असे १०० विद्यार्थी दरसाल निवडून घ्यावेत.

(३) या विद्यार्थ्यांचें शिक्षण मराठी सात किंवा मॅट्रिक परीक्षेइतकें तरी झालेलें असावें.

(४) या वर्गांतील अभ्यासक्रम दोन वर्षांचा असावा व तेवढ्या मुदतींत निदान दोनतीन धंद्यांचें शिक्षण त्याला देण्यांत यावें.

(५) अशा शिक्षकाला जादा शिक्षण देण्यासाठीं दर दोन वर्षांनीं एक महिन्याचा कोर्स उघडून अधिक शिक्षणाची व्यवस्था करावी.

(६) प्रथम प्रत्येक तालुक्यास सोईस्कर अशा ठिकाणीं दोन औद्योगिक केंद्रें उघडावींत. व त्या प्रत्येक ठिकाणीं शंभर विद्यार्थ्यांस शिक्षण देतां येईल इतकी साधनसामुग्री ठेवावी. अशा विद्यार्थ्यांच्या दोन तुकड्या करून शिक्षण ७ ते ११ व १ ते ५ अशा चार तासांचें प्रत्येक तुकडीस देण्यांत यावें. म्हणजे ५० विद्यार्थ्यांच्या साधनसामुग्रींत १०० विद्यार्थ्यांस एकाच वेळीं शिक्षण देतां येईल.

(७) शिक्षकांची संख्या दरसाल जसजशी वाढत जाईल, तसतशीं प्रत्येक तालुक्यांत नवीन नवीन केंद्रें उघडून हें औद्योगिक शिक्षणाचें कार्य झपाट्यानें वाढविण्यांत यावें.

(८) औद्योगिक शिक्षण मोफत देण्यांत यावें. शेंकडा २५ विद्यार्थ्यांस तरी दरमहा पांच रुपयांच्या शिष्यवृत्त्या येण्यांत याव्या.

(९) या शाळा स्वावलंबी असाव्यात. म्हणजे विद्यार्थ्याला शिक्षण देतांना

तयार होणाऱ्या मालाच्या किंमतींतून (नफ्यांतून) त्या शाळांचा खर्च चालावा.

(१०) या शाळांत प्रवेश होणाऱ्या विद्यार्थ्याचें पूर्ण वय १४ असावें व त्याचें शिक्षण निदान प्राथमिक पांच इयत्ता झालेलें असावें.

(११) औद्योगिक शिक्षणाचा हा कोर्स एक वर्षाचा असावा व त्या मुदतींत त्याच्या आवडीच्या कोणत्याही एका धंद्याचें कामचलाऊ ज्ञान त्यास देण्यांत यावें.

(१२) अशा विद्यार्थ्यांस आपल्या धंद्यांत नवीन नवीन सुधारणा करतां येण्यासाठीं, दरसाल एक महिन्याचें जादा ट्रेनिंग देण्यांत यावें. ही सोय प्रत्येक केंद्रांत करण्यांत यावी.

भांडवलाची मदत.

(१) असा जोडधंदा करणाऱ्या शेतकऱ्यास त्याच्या खात्यावरील तरम आकाराच्या २५ पटीपर्यंत कर्ज देण्यांत यावें.

(२) जमीन नसल्यास घराच्या त्या वेळच्या किंमतीच्या $\frac{1}{3}$ इतकें कर्ज देण्यांत यावें.

(३) हें कर्ज पुढील स्वरूपांत द्यावें—१. त्यास लागणारी जरूर ती यंत्रसामुग्री; २. जरूर तो कच्चा माल; व ३. आवश्यक तेवढें खेळतें भांडवल.

(४) हें कर्ज शेंकडा ६$\frac{1}{4}$ टक्के दराचें व दहा वर्षें मुदतीचें असावें.

(५) अशा धंद्यांवर सरकारी नियंत्रण ठेवून, त्यांत उत्तरोत्तर सुधारणा घडवून आणणें; जगाच्या चढाओढींत टिकेल असा उत्तम दर्जाचा माल तयार करणें; धंद्याचा जमाखर्च ठेवणें वगैरे आवश्यक त्या अटी लादाव्यात.

मालाची खरेदीविक्री.

(१) प्रत्येक प्रांतिक सरकारनें आपल्या प्रांतांत व्यापारी खातें उघडावें व त्यावर एका उद्योगमंत्र्याची नेमणूक करावी. हा मंत्री धंद्यांतील तज्ज्ञ असावा. अशा मंत्र्याच्या मदतीस लोकनियुक्त अशा चार तज्ज्ञांचें सल्लागारमंडळ द्यावें. त्यांनीं बहुमतानें आपलें काम चालवावें.

(२) सोईस्कर अशा प्रत्येक ठिकाणीं माल खरेदीचे स्टोअर्स (सरकारी

दुकानें) उघडावेत.

(३) या स्टोअर्समधून, त्या त्या केन्द्रांत तयार होणारा शेतकऱ्यांचा पक्का माल विकत घ्यावा व त्यांना लागणारा जरूर तो कच्चा माल व यंत्रसामुग्री पुरवावी.

(४) कर्जाऊ पैशाच्या हप्त्याचे दोन भाग पाडून, ते दर सहामाहीस एक याप्रमाणें वर्षांतून दोन वेळां त्यांच्या पक्क्या मालाच्या किंमतींत वळीत करून घ्यावेत.

(५) सरकारी डेपोनें हा खरेदी केलेला माल लोकांना परत विकण्यासाठीं, प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक व्यापाऱ्यांची 'व्यापारी असोसिएशन' स्थापन करावी व त्यांच्यामार्फत ह्या मालाची उठावणी करावी.

(६) आपल्या प्रांतांत तयार होणाऱ्या मालाच्या प्रसिद्धीसाठीं एक वर्तमानपत्र सुरू करावें.

(७) व्यापारी असोसिएशनचे सभासद असणाऱ्या व्यापाऱ्यास त्याच्या पतीवर माल उधार देण्याघेण्याची सोय ह्या स्टोअर्सकडून व्हावी.

(८) अशा व्यापाऱ्याची पत, त्याची स्थावर प्रापर्टी व त्यानें दिलेले योग्य जामीन यांवरून ठरविण्यांत यावी.

(९) उधार दिलेल्या मालावर, माल दिल्या तारखेपासून ६$\frac{१}{४}$ टक्याचें व्याज आकारावें व दरमहाचे दरमहा मिळतील ते पैसे जमा करून घ्यावेत.

(१०) अशा दुकानदाराकडे वर्षाअखेरीस $\frac{१}{४}$ पेक्षां जास्त बाकी ठेवूं नये.

भांडवलाची उभारणी.

प्रांतिकसरकारनें अशा जोडधंद्यांस लागणारें भांडवल पुढील मार्गांनीं उभारावें.

(१) आपल्या सर्व खात्यांतील नोकरांचा प्राव्हिडंट फंड व पेन्शन फंड, शेंकडा ४॥ टक्के व्याजानें इकडे कर्जाऊ म्हणून घ्यावा.

(२) आपल्या प्रांतांत काम करणाऱ्या सर्व विमा कंपन्यांच्या वार्षिक प्रीमियमच्या रकमा द. द. शेंकडा ४॥ टक्के दरानें कर्जाऊ घ्याव्यात व त्यांना लागतील तसतसे पैसे आपल्या सहामाही हप्त्यांतून परत करावेत.

(३) ४½ टक्के दराचें दहा वर्षे मुदतीचें दरसाल दोन कोटीचें नवीन कर्ज उभारावें.

वरील योजनेपासून या इलाख्यांतील प्रांतिक सरकारांना दरसाल नवीन पांच कोटि रुपयांचें भांडवल उभारतां येईल व या भांडवलाच्या जोरावर दरसाल हजारों शेतकऱ्यांस जोडधंद्यांचें शिक्षण व भांडवल पुरवितां येईल. प्रांतिक सरकारांनीं दशवार्षिक योजना आंखून हा कार्यक्रम पार पाडावा व त्या मुदतींत प्रत्येक शेतकऱ्यास जोडधंदा देऊन त्याची आर्थिक सुधारणा घडवून आणावी.

प्राव्हिडंट फंड, पेन्शन फंड व विमाकंपन्या यांमधून या इलाख्यांतील लोकांचें दरसाल सुमारें तीन कोटि रुपये भांडवल गुंतून पडत आहे. या पैशाचा उपयोग त्यांच्या रोजच्या जीवनाला किंवा कुटुंबांत उत्पन्न होणाऱ्या बेकारीला आळा घालण्यास कोणत्याहि तऱ्हेनें होत नाहीं. ही मध्यम व गरीब वर्गांतून कोटयवधि रुपयांनीं सालोसाल ओढिली जाणारी राष्ट्रीय संपत्ति, सरकारी तिजोरींत किंवा कर्जरोख्यांत गुंतून पडत असल्यामुळें मध्यम वर्गांतून धंद्याला आवश्यक तें भांडवल आज मिळेनासें झालें आहे. ह्या पैशावर बहुजनसमाजाचा हक्क आहे. तो त्यांच्या निढळाच्या घामांतून उत्पन्न झालेला पैसा आहे. हा पैसा सरकारी संरक्षणाखालीं त्यांच्या उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं पुन्हां बाहेर आला पाहिजे. विमा कंपन्यांचे निधि हे राष्ट्रीय आर्थिक जीवनाचे वाहते झरे म्हणून समजले जात असल्यामुळें त्यांचा उपयोग त्यांच्या उद्योगधंद्यांच्या वाढीसाठींच प्रामुख्यानें व्हावयास पाहिजे. विमाकंपन्यांच्या निधींची प्रतिवार्षिक होणाऱ्या नवीन कामांमुळें भूमितिश्रेढीनें वाढ होत असल्यामुळें ह्या अवाढव्य निधींचा राष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या उन्नतीसाठीं उपयोग करून घेणें हें प्रांतिक सरकारचें परम कर्तव्य आहे. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची वाढ ही ब्रिटिश व्यापाऱ्यांना व कारखानदारांना मारक होत असल्यामुळें कोणत्याहि गव्हर्नरनें किंवा व्हाइसरायनें त्यासाठीं यत्किंचितही प्रयत्न केलेला नाहीं. उलट विमाकंपन्यांचा कोटयवधि रुपयांचा निधि सालोसाल आपल्या तिजोरींत कसा पडेल याची काळजी घेतल्यामुळें कोट्यवधि रुपयांची ही राष्ट्रीय संपत्ति आज निष्क्रिय स्थितींत पडून आहे. व इकडे तर उद्योगधंद्यांस लागणारें जरूर तें भांडवल मिळत नाहीं, म्हणून आहे त्या धंद्यांची

आर्थिक उपासमार सुरू आहे व नवीन धंदे निघणें अशक्य झालें आहे.

या विमाकंपन्यांचा वाढता व्याप लक्षांत घेतला म्हणजे माझ्या म्हणण्याची सत्यता वाचकांच्या लक्षांत येईल. सन १९३७ सालच्या इन्शुअरन्स कंपन्यांच्या सरकारी रिपोर्टावरून मोठी उद्‌बोधक माहिती मिळते. अहवालाच्या सालीं या देशांत देशी व विदेशी मिळून १६० विमाकंपन्या काम करीत होत्या. त्यांनीं आतांपर्यंत सुमारें १७५ कोटि रुपयांचें विम्याचें काम केलें असून त्यांचा वार्षिक प्रिमियमचा हप्ता सुमारें १० कोटि रुपयांच्या घरास जाऊन पोहोंचला आहे. १९३६ सालीं या सर्व विमाकंपन्यांनीं मिळून नवीन काम ३८ कोटींचें मिळविलें असून आपल्या वार्षिक उत्पन्नांत–विम्याच्या हप्त्यांत–सुमारें २ कोटि रुपयांची वाढ करून दाखविली आहे. या सर्व विमाकंपन्यांत ओरिएंटल गव्हर्मेंट अॅस्युअरन्स कंपनी ही फार मोठी आहे. या कंपनीचें अहवालाच्या सालीं देशी व विदेशी मिळून सुमारें ६४ कोटि रुपयांचें विम्याचें काम झालें असून तिच्या वार्षिक प्रिमियमचें–हप्त्याचें उत्पन्न २¾ कोटीच्या पुढें गेलेलें दिसून येतें. त्यानंतर गेल्या दोन वर्षांत या कंपनीनें एवढें अवाढव्य काम मिळविलें आहे कीं, तें पाहून मन आश्चर्यचकित होऊन जातें! १९३८ साल अखेरीस या कंपनीनें एकंदर ७३ कोटि ३७ लक्ष रुपयांचें काम केलें असून प्रिमियमच्या रूपानें ३,२७,००,००० रुपये गोळा केले आहेत! विमाक्षेत्रांत काम करणाऱ्या चारपांच महत्त्वाच्या कंपन्यांच्या कामांचे आंकडे पाहिले म्हणजे, हिंदी लोकांच्या द्रव्याचें केवढें मोठें शोषण सुरू आहे, त्याची बरोबर कल्पना होते.

१९३६ चा रिपोर्ट.

विमा कंपन्या	एकंदर विमे	प्रिमियमची रक्कम
(१) ओरिएंटल	६१,६१,११,०००	२,७५,१४,०००
(२) हिंदुस्थान	११,८७,६०,०००	५१,७५,०००
(३) एम्पायर	११,९८,००,०००	५२,५१,०००
(४) नॅशनल	१०,८८,९९,०००	४७,३९,०००
(५) वेस्टर्न	३,२०,२०,०००	१६,०६,०००
एकूण	१,०१,५५,७०,०००	४,४२,८५,०००

या पांच कंपन्यांनींच १०० कोटींपेक्षां जास्त काम केलेलें दिसून येईल. तेव्हां हा राष्ट्रीय संपत्तीचा प्रचंड नद, सर्व प्रांतिक सरकारांनीं ४॥ टक्क्याच्या कर्जरोख्याच्या रूपानें हिंदी औद्योगिक क्षेत्रांत आणून सोडिल्यास जोडधंद्यांस लागणारें भांडवल उभारणें कितीसें अवघड जाईल! जोडधंद्यांचें जीवनामृत शेतकरी समाजास मिळाल्याशिवाय तो यापुढें जगणें शक्य नाहीं. शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेची परमावधि झाली आहे. त्याचा अंत पाहाणें म्हणजे राष्ट्राचा भयंकर अधःपात करणें होय. म्हणून कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं क्षणाचाही विलंब न करितां, उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं या प्रचंड संपत्तीचा उपयोग करून घेतला पाहिजे. विमा कंपन्यांप्रमाणेंच मोठमोठ्या बँकांतील ठेवींचा उपयोगही सरकारला शेंकडा ४॥ टक्क्यांचे कर्जरोखे उभारून करतां येईल. बँका व विमाकंपन्या यांच्या ठिकाणीं औद्योगिक धडाडी नसल्यामुळें त्यांच्या हातून भारताचा औद्योगिक उत्कर्ष होणें शक्य नाहीं. उलट समाजांतील धन गोळा करून, तें सरकारी कर्जरोख्यांत गुंतवून ठेवण्याचें पाप मात्र त्या पुरेपूर करतील! जर बँका व विमा कंपन्या यांतील संपत्तीचा उपयोग आमचे औद्योगिक अभिवृद्धी-साठीं करतां येत नसेल, तर आमच्यासारखे हतभागी व करंटे लोक साऱ्या दुनियेंत आम्हीच ठरूं. म्हणून हातीं सत्ता आली आहे तोंच कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं, आपल्या शेतकऱ्यांस जोडधंदे देण्याच्या कामीं या पैशाचा उपयोग जरूर करून घ्यावा.

शेतकऱ्यांचा मुख्य धंदा जो शेती, तो हल्लीं निकृष्ट स्थितीला जाऊन पोंचला आहे. त्यांत सुधारणा केल्यास राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट तिप्पट तरी वाढेल. ही उद्भिज्ज संपत्ति वाढल्याशिवाय, वाढत्या लोकसंख्येची सोय लागणार नाहीं. कोंकणच्या भातशेतींत पिकणारा तांदूळ किंवा पंजाब व संयुक्त प्रांत येथील शेतींत पिकणारा गहूं यांची परदेशांतील तेवढ्याच क्षेत्रांत पिकणाऱ्या उत्पन्नाशीं तुलना केल्यास आपण आश्चर्यानें थक्कच होऊन जाऊं! कोंकणचा शेतकरी एकरीं जेवढें भात पिकवितो, त्याच्या तिप्पट इतकें भात, जपानचा आधुनिक सुधारलेला शेतकरी तेवढ्याच क्षेत्रांत पिकवितो, ही गोष्ट जगास महशूर झालेलीच आहे! त्याचप्रमाणें अमेरिकन व रशियन शेतकरी पंजाबच्या गव्हाच्या तिप्पट गहूं एकरीं पिकवितो. म्हणून शाळांतून सुधारलेल्या शेतीचें प्रत्यक्ष ज्ञान

विद्यार्थ्यांस सक्तीनें करून दिल्यास शेतकरीजीवन सुखी झाल्याशिवाय कसें राहील ? अर्थात् पुढील प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें राष्ट्रीय प्रयत्न झाल्यास कौटुंबिक धन वाढून शेतकरी ऋणमुक्त होईल. नाहींतर व्याजाचे दर कमी करून किंवा कांहीं कर्ज माफ करून किंवा सावकारांवर कांहीं निर्बंध घालून हृ ऋणग्रस्ततेचा आजार बरा होणार नाहीं. म्हणून कर्ज निवारण्याच्या योजनेंत जोडधंद्यांचें शिक्षण व शेतीसुधारणा ह्या गोष्टी दृष्टीआड करून कशा चालतील ?

वरील जोडधंद्यांच्या योजनेपासून पुढीलप्रमाणें फायदे होतील.

(१) जोडधंद्यांचा प्रसार अल्प काळांत सर्वत्र होऊन सरकारी संरक्षणाखालीं व मदतीखालीं ते धंदे जोमानें वाढीस लागतील व शेतकऱ्यांचे हातांत रोज ताजा पैसा खेळूं लागेल.

(२) सरकारी स्टोअर्समुळें अशा मालास हुकमी गिऱ्हाईक मिळेल, होणारी फसगत वांचेल व मालाचा दाम ताबडतोब मिळून वेळेची बचत होईल.

(३) बेकारीस आळा बसेल. मुख्य कर्त्या पुरुषावर अवलंबून असणारीं घरांतील रिकामी माणसें उद्योगास लागतील. त्यामुळें मालाची निर्मिति मोठ्या प्रमाणावर होऊन कौटुंबिक धनाची वाढ होईल.

(४) स्वदेशीच्या कल्पना जोरानें प्रसृत होतील. त्यामुळें परदेशी मालास त्या मानानें आळा बसेल.

(५) व्यापारी संघटनेमुळें परकीय मालाच्या आयातीस पद्धतशीर पायबंद बसून कोट्यवधि रुपयांचें बाहेरदेशीं जाणारें धन येथेंच राखलें जाईल. उलट बाहेरील देशांकडून पैशाचा प्रवाह शेतकऱ्यांच्या घरांत खेळवितां येईल.

(६) व्यापाराची भरभराट होईल व देशांतील सर्व कारखाने जोमानें चालूं लागतील.

(७) शेतकरी ऋणमुक्त होईल.

(८) शेतीच्या अभिवृद्धीसाठीं लागणारा पैसा त्याचे हातीं येत राहिल्यामुळें शेतीच्या उत्पन्नाची वाढ मोठ्या प्रमाणांत होत राहील.

(९) शेतीची शास्त्रीय पद्धतीवर पुनर्घटना होऊन मालाची निपज वाढेल. त्यामुळें शेतकरी सुखी व संपन्न होईल.

(१०) अशा संपन्न जनतेचीच राष्ट्रीय संघटना लवकर होईल. त्यामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्याची वेळ जवळ आणिली जाईल.

वर दर्शविल्याप्रमाणें ह्या योजनेपासून फायदे होणार असल्यामुळें, राष्ट्रीय सरकारनें पुढाकार घेऊन वरील कार्याची धुरा आपले खांद्यावर घ्यावी व ती पार पाडावी. सतराव्या शतकांत इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया नामक व्यापारी कंपनीनेंच हिंदुस्थानांत, इंग्लंडच्या पक्क्या मालाचा प्रसार केला. व या देशांतून कोट्यवधि रुपयांची संपत्ति सालोसाल नेली. इकडील कला शिकून आपल्या देशीं ती प्रसृत केली व लोक शहाणे करून सोडिले. या कंपनीस इंग्लंडच्या राजाचा व पार्लमेंट सभेचा आश्रय होता. त्यामुळें तेथील राष्ट्रीय सरकारनें वेळोवेळीं ह्या कंपनीस भांडवलाची मदत केली. व्यापाराच्या सर्व सोई व सवलती उपलब्ध करून दिल्या. जबर जकातीचीं संरक्षणें मिळवून दिलीं व शेवटीं तर सैन्य व आरमार यांची मदत देऊन व्यापारी वर्चस्व टिकविण्यासाठीं येथील राजसत्ता हस्तगत करून दिली. तेव्हां हा राजकर्त्यांचा इतिहास सतत डोळ्यापुढें ठेवून मिळालेल्या मर्यादित अधिकारक्षेत्रांत, व्यापारवृद्धीसाठीं जेवढें कांहीं करितां येईल तेवढें करण्याचा कसून प्रयत्न, येथील प्रांतिक सरकारनीं केल्याशिवाय राहूं नये.

उत्पन्नांतील आकस्मिक गळत्या.

(१) पिकावरील रोगराई व उत्पन्नाचा नाश.

शेतकरी जीवनांत, पिकावरील रोगराईचें भय रात्रंदिवस त्याला भेडसावीत असतें. पाऊसपाणी वेळेवर पडूनही अनेक प्रकारच्या किडीनें व रोगानें पिकांचा संहार मोठ्या प्रमाणावर दरसाल होत असतो. हिंदुस्थान सरकारनें सन १९३७ सालीं नेमलेल्या सर जान रसेल साहेबांच्या रिपोर्टांत, " पिकावरील किडीनें या देशांतील शेतीचें दरसाल २०० कोटि रुपयांचें नुकसान होत असावें " असें साधारण वर्णन केलेलें असून आधुनिक शोधांनीं हें नुकसान टाळणें कसें शक्य आहे, तें दाखविलें होतें. सन १९२१-२२ सालीं सबंध हिंदुस्थानचें शेतीचें उत्पन्न २१२९ कोटि रुपयांचें धरलें होतें. हल्लीं बाजारभाव फार उतरले

असल्यामुळें हें उत्पन्न १५०० कोटींच्या आंतबाहेर असावें. त्या दृष्टीनें वरील अंदाज हा उत्पन्नाच्या $\frac{१}{८}$ केलेला असावा. दरसाल निरनिराळ्या पिकांवर पडणाऱ्या किडीमुळें झालेल्या नुकसानीचा अंदाज केल्यास तो यापेक्षां केव्हांही कमी भरणार नाहीं. तेव्हां अशा तऱ्हेनें सालोसाल एवढ्या प्रचंड उद्भिज्ज संपत्तीचा नाश करणें म्हणजे राष्ट्र उपाशीं मारण्यासारखें नाहीं का ? आजच हिंदी जनता अन्नाला मोताद झाली आहे हें खालील तज्ज्ञांच्या आंकड्यांवरून दिसून येईल.

" हिंदुस्थानांत— ९,९८,३२,०९६ पुरुष
९,४६,५७,०७७ स्त्रिया
व १२,४४,५३,३०७ मुलें (१५ वर्षांचे आंतील)

आहेत. त्यांना दररोज कमींत कमी किती अन्न लागतें तें पाहूं.

२ पौंड दररोज प्रत्येक पुरुष	३३,२७७,३७५ टन	वार्षिक अन्न
१॥ पौंड दररोज प्रत्येक स्त्री	२७,०४४,८७९ टन	
१ पौंड दररोज प्रत्येक मूल	२०,७४२,२१८ टन	
	८१,०६४,४६२ टन.	

इतकें अन्न कमींत कमी वर्षाला लागेल. यांत दूध, तूप वगैरेचा विचार नाहीं. यापैकीं हिंदुस्थानांत ७.६ कोटि टन धान्य उत्पन्न होतें. त्यापैकीं ५५ लाख टन इंग्लंड नेतें. ७६ लाख टनाची नासधूस होते, १२२ लाख टन गुरांकरितां खर्ची पडतें, २० लाख टन बियांकरितां राखून ठेवावें लागतें. एकूण २.७३ कोटि जाऊन शिल्लक फक्त ४.८७ कोटि टन धान्य राहातें. यावरून सारा हिंदुस्थान अर्धपोटी आहे, हें सांगावयास नको." (चित्रमय जगत् १९३०)

अशा अर्धपोटी स्थितींत दुष्काळाची तीव्रता भासूं लागतांच लोक अन्नपाण्यावांचून कसे मृत्युमुखीं पडतात तें कळून येईल. याकरितां प्रांतिक सरकारांनीं आपलें सर्व बळ एकवटून ही उद्भिज्ज संपत्ति नष्ट न होतां, शेतकऱ्यांच्या पदरांत पडण्यासाठीं गांवोगांव सामुदायिकरीत्या मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले पाहिजेत.

शेतकी खात्याकडून पिकांच्या बाबतींत जें दरसाल संशोधन होतें, त्याचा संदेश खेड्यापाड्यांत जाऊन पोंचत नाहीं. हल्लींच्या प्रचाराची मुख्य दिशा

म्हणजे निरनिराळीं सरकारी हस्तपत्रकें काढणें; शेतकी मासिकांतून व वर्तमानपत्रांतून ते प्रयोग जाहीर करणें, शेतकी प्रदर्शनें भरविणें व तालुक्याच्या शेतकी डेव्हलपमेंट असोसिएशनमधून थोडेंबहुत बींबियाणें आणून ठेवणें व त्याचा थोड्याफार प्रमाणांत प्रसार करणें ही होय. खेड्यांतील जनता निरक्षर व अज्ञ असल्यामुळें, तसेंच ‘ जुनें तें सोनें ’ ह्या पुराणप्रिय तत्त्वाची असल्यामुळें, शेतकी खात्यानें केलेल्या संशोधनाचा प्रसार पुस्तकें छापण्यापलीकडे फारसा झालेला नाहीं. तालुक्याच्या शेतकी असोसिएशनमध्यें जरूर त्या बेण्याचा पुरवठा नसतो, यंत्रसामुग्री अत्यंत तोकडी व तुटपुंजी असते व असल्यास बहुतेक ती नादुरुस्त स्थितींत पडून असते, व किडीवरील औषधांचा तर ‘ सँपल नमुन्या-’ शिवाय सांठा नसतो ! प्रत्येक खेडोपाडीं आपल्या देखरेखीखालीं, तेथील उत्साही माणसांस हाताशीं धरून, प्रयोग केले जात नाहींत; त्यांना लागणारी माहिती दिली जात नाहीं, व जरूर त्या यंत्रसामुग्रीचा परिचय करून दिला जात नाहीं, कांहीं नाहीं. सगळीकडे सामसूम दिसतें. सरकारी हस्तपत्रकें वाचून, काय चारदोन माणसें कुठें कांहीं सुधारणा करीत असतील, तेवढेंच काय तें लोकांना दिसावयाचें. बाकी सर्वत्र अंधारच असतो, असें म्हटल्यास तें वावगें होईल काय ? म्हणून ही स्थिति पालटण्यासाठीं सरकारनें पुढीलप्रमाणें उपाययोजना करावी व त्याची अम्मलबजावणी ग्रामपंचायतीद्वारा सर्वत्र जारीनें करावी. तरच आजपर्यंतच्या संशोधनाचें चीज केलेंसें होईल.

उत्पन्नाची वाढ व रोगांचें निर्मूलन.

(१) दर तालुक्यास सोईस्कर अशा दोन ठिकाणीं शेतीचें प्रात्यक्षिक शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन कराव्यात. या शाळांमधून बागाईत व जिराईत शेतीचें सप्रयोग शिक्षण देण्यांत यावें.

(२) दरसाल प्रत्येक खेड्यांतून १ तें २ होतकरू तरुण शेतकरी निवडून काढावेत व त्यांना वरील शाळांतून १ वर्षांत जरूर तें सर्व शिक्षण देण्यांत यावें.

(३) असें शिक्षण घेऊन आपल्या शेतींत इष्ट ती सुधारणा करणाऱ्या शेतकऱ्यास, पहिलीं दोन वर्षें दरसाल २५ रुपये बोनस म्हणून देण्यांत यावा. अशा शेतकऱ्यानें जिराईत व बागाईत मिळून ५ एकर तरी शेती सुधारलेल्या

पद्धतीनें करून दाखवावी.

(४) अशा उत्साही शेतकऱ्यास योग्य वेळीं सुधारलेलें सर्व प्रकारचें बीं-बियाणें व खतें वगैरे रूपानें तालुका असोसिएशननें प्रत्यक्ष मदत करावी. व आपल्या फील्डमनच्या देखरेखीखालीं शास्त्रीय पद्धतीनें पिकाची वाढ करून दाखवावी; व त्याचें हंगामशीर जाहीर प्रदर्शन करावें. या कामीं होणारा सर्व खर्च ज़मीनमालकानेंच करावा व निघणारें उत्पन्न घ्यावें.

(५) उत्तम पीक काढणाऱ्या शेतकऱ्यास उत्तेजनार्थ प्रत्येक गांवीं २५ रु. चीं रोख बक्षिसें दरसाल वाटण्यांत यावींत.

(६) प्रत्येक ठिकाणच्या पंचायतीजवळ जरूर ती यंत्रसामुग्री कायमची ठेवून देण्यांत यावी व जरूर त्या औषधी द्रव्यांचा पुरवठा मागणी येतांच करण्यांत यावा. या यंत्रसामुग्रीचा व औषधांचा उपयोग कसा करावा याचें शिक्षण दरसाल सात दिवसांचा एक कोर्स उघडून पंचायतीच्या सभासदांस करून देण्यांत यावें.

(७) पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्याचें दिसतांच, पंचायतींनीं त्या त्या क्षेत्रांतील शेतकरी वर्गास हाताशीं धरून, किडीवर औषधी मारा करावा व तिचें पूर्ण निर्मूलन करावें.

(८) फळबागांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यानें, निदान तीन महिने तरी तें शिक्षण घेतलेलें असावें. त्याशिवाय त्यास परवानगी देण्यांत येऊं नये. अशा शेतकऱ्यानें शेतकी खात्याकडून वेळोवेळीं येणाऱ्या सूचनांप्रमाणें फळबागांची व्यवस्था ठेवावी व त्यांवर पंचायतींनीं देखरेख ठेवावी.

(९) शेतकी खात्यानें पंचायतीस लागणारीं जरूर तीं औषधें पुरवावींत व त्यांची किंमत तरम आकाराच्या वेळीं वसूल करून घ्यावी.

(१०) यंत्रसामुग्रीसाठीं पंचायतींनीं $\frac{३}{४}$- रक्कम व सरकारनें $\frac{१}{४}$- रक्कम घालून, ती विकत घेण्यांत यावी.

(११) आपआपल्या भागांतील पिकावरील रोगराईचा नायनाट करण्याची सत्ता पंचायतीस देण्यांत यावी व त्या कामीं हलगरज दाखविणारास १० रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार पंचायतीस देण्यांत यावा.

वरील पद्धतीनें पिकांवर पडणाऱ्या रोगांचें निर्मूलन करतां येईल. तसेंच सुधारलेल्या पद्धतीनें पिकांची वाढ करून दाखवितां येईल. प्रत्येक गांवीं अशा सुधारलेल्या शेतीचें प्रदर्शन लोकांच्या पुढें करून शेतीची सुधारणा झटपट करून दाखवितां येईल. तसेंच बक्षिसांच्या रूपानें त्यांच्यांत इष्ट ती चढाओढ उत्पन्न करितां येईल. ह्या बहुलाभदायी सुधारणा न झाल्यास निव्वळ शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असलेला शेतकरी, रोगराईनें त्याचें पीकच फस्त करून टाकिल्यावर कसा जगूं शकेल ? व आपली पत तरी कशी टिकवूं शकेल ? किंवा सरकारदेणें व जमिनदार व सावकार यांचा बोजा वेळच्या वेळीं कसा फेडूं शकेल ?

जोंधळ्यावरील काणी, बाजरीवरील हिंगा, गव्हावरील तांबेरा, चवळी, वाटाणा, मूग, उडीद इत्यादि कडधान्यांवरील मावा व भुरी, बटाट्यावरील चक्री किंवा बांगडी, आंबे व द्राक्षें यांवरील भुरी व करपा, मोसंबीवरील डिंक्या व खोडकिडा, उसावरील टोळ व गाभकिडा, भेंडी, कापूस व वाटाणा यांवरील आळ्या, पानवेलीवरील टिबा, आंब्याच्या खोडांतील भिरूड, कपाशीच्या बोंडावरील लाल ढेकण्या, डाळिंबावरील आळी, संत्रीवरील पतंग, नारळी, पोफळी वगैरेवरील भुंगेरे, शेतांतील वाळवी इत्यादि अनेक प्रकारच्या रोगांनीं व किडींनीं दरसाल कोट्यवधि रुपयांचें शेतीचें नुकसान होऊन शेतकरी बुडत आहे. या सर्व रोगांचें संशोधन झालें असून त्यांवरील परिणामकारक औषधें व यंत्रसामुग्री हल्लीं मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली आहे. आज ह्या साधनांचा सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत मोठ्या प्रमाणांत उपयोग केला जातो. परंतु इकडील शेतकऱ्यांत त्या साधनांचा प्रसार फार अल्प प्रमाणांत झाला असल्यामुळें सामुदायिकरीत्या त्याचें जें फळ मिळावयाचें तें मुळींच मिळत नाहीं. म्हणून या कामीं येथील प्रांतिक सरकारांनीं जातीनें लक्ष घालून व पुढाकार घेऊन वरील योजनेच्या रूपानें हें जीवनामृत आपल्या शेतकरी बांधवांस पाजिलें पाहिजे.

या इलाख्यांतील शेतीचें उत्पन्न सन १९२७–२८ सालीं १२० कोटींचें होतें. हल्लींच्या बाजारभावाच्या मंदीनें तें अत्यंत घटून आज सुमारें ७५ कोटि रुपयांच्या आसपास असावें, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्यांतच पिकावरील रोगराईमुळें येणारी १०–१२ कोटि रुपयांची तूट लक्षांत घेतल्यास हा प्रश्न

शेतकऱ्यांच्या दृष्टीनें किती महत्वाचा आहे तें लक्षांत येईल. येथील प्रांतिक सरकारचें सर्व प्रकारच्या करांचें उत्पन्न पाहिल्यास तें सुमारें १२ कोटि रुपये भरतें. त्या दृष्टीनें वरील नुकसान पाहिल्यास छाती फाटून जाते ! पण ती विचार करणारांचीच ! आज शेतकऱ्यांच्या सुदैवानें कॉंग्रेसच्या हातीं राज्यसूत्रें आलीं असल्यामुळें, सर्व जनता कॉंग्रेसच्या भरीव कार्यक्रमाची आतुरतेनें वाट पहात आहे. वरील सर्व उपायांनीं एवढी राष्ट्रीय संपत्ति वांचवितां आल्यास, शेतकरी ऋणविमोचनाचा प्रश्न सोडविण्यास कितीसा वेळ लागेल ? पण ह्या अंतर्गत सुधारणा न करितां, वरवर केलेल्या दिखाऊ सुधारणांपासून ऋणविमोचन कसें शक्य होईल ?

(२) अनिश्चित पाऊस व दुष्काळ.

मुंबई इलाख्यापुरता विचार केल्यास (सिंध वगळून) खुद्द पिकाखालीं जमीन २,७५,१०,००० एकर आहे. यापैकीं फक्त ९,३८,००० एकर जमीन बागाईत असून बाकीचें क्षेत्र, कोरडवाहू म्हणून आहे. म्हणजे एकंदर पिकाखालील क्षेत्रापैकीं फक्त शेंकडा ३·२ च बागायत व शेंकडा ९६·८ एकर जमीन केवळ पावसावरच अवलंबून आहे. यावरून या इलाख्यांतील शेती पावसाच्या मेहेरबानीवर किती अवलंबून आहे हें लक्षांत येईल.

अलीकडे आपल्या देशांत इंग्रजी अमदानींतच लहानमोठे असे २५ दुष्काळ पडले असल्यामुळें, त्या वेळीं शेतीच्या उपन्नांत किती भयंकर खोट आली असेल याची आपणांस थोडीफार कल्पना होईल. दुष्काळ पडला; पीक बुडालें म्हणून लोकांचे प्रपंच थोडेच बंद होते ? कर्जासाठीं सावकारांचीं घरें उपसून किंवा त्यापायीं स्वतःची मिळकत गहाण टाकून किंवा खरेदी देऊन त्यांना आपली गुजारणा करावी लागली. सालबेगमीपुरतें नेहमीं उत्पन्न येणारे शेतकरी अशा वेळीं कर्जबाजारी बनून पिढ्यान्‌पिढ्या कर्जांत रुतत जातात व शेवटीं आपल्या अन्नदात्या जमिनीस मुकून कंगाल बनतात. म्हणून शेतीस निश्चित स्वरूप आणणेसाठीं व ह्या उद्भिज्ज संपत्तीचा नाश वांचविण्यासाठीं प्रांतिक सरकारांनीं पुढील उपाय-योजना अमलांत आणावी.

दुष्काळनिवारणार्थ पाटबंधाऱ्यांची योजना.

(१) पिकाचा अनिश्चितपणा घालवितां येण्यासाठीं ठिकठिकाणच्या सू-

पृष्ठाची तज्ज्ञांकडून पहाणी करावी व शक्य तितक्या जास्त ठिकाणीं लहान-मोठे ओहोळ, ओढे व लहानसहान नद्या यांना बंधारे घालून पावसाचें पडणारें पाणी शक्य तितक्या जास्त भागांत खेळविण्याची योजना करावी.

(२) ज्यांच्या जमिनी अशा पाण्याखालीं भिजणार असतील त्यांचें मनुष्य बळ वा आर्थिक बळ उपयोगांत आणावें व त्याबद्दल त्यांना पहिलीं तीन वर्षें मोफत पाणी द्यावें, व पुढील दोन वर्षें पाणीआकार निम्मा घेण्याचें जाहीर करावें. हें मनुष्यबळ वा आर्थिक बळ क्षेत्राच्या प्रमाणांत घेतलें जावें.

(३) अशा बंधाऱ्याखालीं पाण्यांत बुडणाऱ्या जमिनींवर त्यांच्या मालकांस रोख पैशाच्या रूपानें नुकसानभरपाई न देतां तरम आकाराच्या पांच पटीपर्यंत जमिनीचा मगदूर पाहून रोख वार्षिक नक्त नेमणुका करून द्याव्यात व त्या वंशपरंपरा चालू ठेवाव्यात.

(४) बंधाऱ्याच्या कामांस लागणारा हरएक प्रकारचा माल, सरकारनें पुरवावा व आपल्या तज्ज्ञ इंजिनीयरच्या देखरेखीखालीं वरील मनुष्यबळ हाताशीं घेऊन, प्रचंड खर्चाचीं बंधाऱ्याचीं कामें थोड्याफार पैशांत करून घ्यावींत.

या योजनेनें ज्या त्या भागांतील हजारों शेतकरी शरीरकष्ट करण्यासाठीं घरच्या भाकरी बांधून कामावर येत राहतील व हा राष्ट्रीय जिव्हाळ्याचा प्रश्न हां हां म्हणतां सोडवून दाखवितील ! याकरितां प्रांतिक सरकारनें (कॉंग्रेस प्रधान-मंडळांनीं) ह्या कामीं राष्ट्रीय कर्ज उभारून या योजनेस हातभार लावावा व शेतकरी सुखी व संपन्न करावा.

हल्लींच्या मंदीच्या दिवसांत कर्ज उभारणें व बांधबंधाऱ्यांचीं कामें करून घेणें सुलभ जाणार आहे. मालपुरवठा सरकारचा व अंगमेहनत जनतेची, अशी ही योग्य सांगड घातली गेल्यास पावसावरील अनिश्चित शेतीचा टापू सालोसाल पुष्कळच कमी होत जाईल. आपली अन्नदाती जमीन कायमची सुपीक होत असेल व दुष्काळासारख्या आपत्तींत देखील ती आपणास जगविणार असेल, तर तिच्या अभिवृद्धीसाठीं कोण प्रयत्न करणार नाहीं ? ऐन वेळीं एका पावसानें ताण दिल्यामुळें, लाखों शेतकऱ्यांचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान होत असतें,

त्यांना वरील योजनेनें हुकमी पाणी मिळण्याची सोय झाल्यास तो सुखी कां होणार नाहीं ? व अशा शाश्वत सुखासाठीं प्रसंगविशेषीं त्याग करावा लागल्यास तो कां माघार घेईल ?

ज्या भागांत असे जलप्रवाह खेळविणें भूपृष्ठाच्या रचनेमुळें किंवा पावसाच्या कमतरतेमुळें शक्य होणार नाहीं, त्या भागांत ' दुर्जल शेतीचे ' प्रयोग अमलांत आणावेत. आज खेड्यांतील बहुजन शेतकरी समाज अज्ञ आहे. शेतीच्या शास्त्रीय ज्ञानाची व त्याची उभ्या आयुष्यांत गांठ पडत नाहीं. शेतीचें शास्त्रीय संशोधन होऊनही, तें त्याच्या डोळ्यांस, डोळे असूनही, निरक्षरतेमुळें दिसत नाहीं; असा केविलवाणा कठोर प्रसंग इंग्रजी अमदानींत त्याचेवर गुदरला आहे ! म्हणून या कामीं त्वरित सुधारणा होण्यासाठीं ग्रामपंचायतीद्वारा, पुढील मार्गाचा अवलंब प्रांतिक सरकारला करतां येईल.

पंचायती व शेतीची किफायतशीर योजना.

(१) सर्व पंचायतींनीं, आपल्या कार्यक्षेत्रांतील भूपृष्ठाची पाहाणी सरकारी तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं करावी. दीड दोन फूट उंचीचे बंधारे घालणारे, बैलाच्या शक्तीनें चालणारे मोठ्या शक्तीचे नांगर हल्लीं उपलब्ध झाले आहेत, ते घेऊन, त्यांच्या साहाय्यानें जमिनीचा उतार लक्षांत घेऊन हें बंधाऱ्यांचें काम सर्व शेतांतून करून घ्यावें व पाणी निचरण्यासाठीं योग्य त्या ठिकाणीं दगडाच्या कच्च्या सांडी ठेवाव्यात. हें काम बिनखर्चानें प्रत्येक शेतकऱ्यास करतां येईल. म्हणून पंचायतीनें या मार्गाचा अवलंब करावा.

(२) एकपंखी नांगरानें नऊ इंचाचा वरंबा घालतां येत असल्यामुळें असे वरंबे घालून प्रत्येक एकराचे दोन भाग पाडावेत. त्यामुळें पावसाचें पडणारें सर्व पाणी जेथल्या तेथें मुरवितां येईल व पिकाचा अनिश्चितपणा घालवितां येईल.

(३) कोळपणीचें शास्त्रीय महत्व आतां प्रयोगांतीं सिद्ध झालें असल्यामुळें तें आपल्या शेतकरी बंधूंच्या मनांवर बिंबवणें व अमलांत आणणें पंचायतीच्या सभासदांस कठीण जाणार नाहीं. म्हणून शक्य तितक्या जास्त कोळपण्या देऊन अंतर्गत ओल कायम ठेवितां येईल.

(४) ज्वारीचे बियांस गंधक चोळणें; सर्व प्रकारचें बीं, बीं चाळण्याच्या

चाळणींतून चाळून घेणें, सुधारलेल्या पावारींचा व कोळप्यांचा उपयोग करणें, तांबेरा न पडणारा पुसा नं. ४ चा गहू, भरदार पीक देणारी अकोला व आफ्रिकन बाजरी किंवा लांब धागा देणारा अमेरिकन कापूस, यासारख्या बहुविध सुधारणा पंचायतीला आपल्या कार्यक्षेत्रांत सहज करून दाखवितां येतील.

(९) दहापांच ठिकाणच्या पंचायतींना आपलें आर्थिक बळ एकवटून, खोल नांगरट करणारा व हरळी, कुंदा यांसारख्या बहुवर्षायु हट्टी तणांचा नायनाट करणारा ' ट्रॅक्टर ' नांगर विकत घेतां येईल व त्याच्या साहाय्यानें अल्प खर्चांत, आपल्या क्षेत्रांतून ह्या तणांचा बीमोड करतां येईल. ' तन खाई धन ' ही म्हण सर्वश्रुत आहेच. म्हणून त्या कामीं सामुदायिक व संघटित प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

वरीलसारख्या बिनखर्ची पण निश्चित उत्पन्न देणाऱ्या सुधारणा पंचायतींना आपल्या क्षेत्रांत घडवून आणतां येतील. म्हणून शेती सुधारणेचे जरूर ते अधिकार पंचायत मंडळ्यांस देऊन, कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं शेतकरीजीवन सुखी व समृद्ध करावें.

अनिश्चित पावसावरील शेती म्हणजे एक प्रकारची जुगारच होय ! कर्मावर हवाला ठेवून दैववादी बनणें म्हणजे आत्मनाश करून घेणें होय ! या गोष्टीचा अनुभव या देशांतील लोकांना वेळीं अवेळीं चांगलाच आलेला आहे. आजपर्यंत दुष्काळ इतके सतत पडत गेले कीं, लोक त्या दुष्काळांना तोंड देऊं शकले नाहींत. हल्लीं आमच्या देशांत दररोजच दुष्काळ आहे, व लोक अर्धपोटीं राहत आहेत व मरत आहेत. पण हल्लीं रोजच्या दुष्काळामुळें किती लोक मेले याचें गणित करणें कठीण झालें आहे. इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून रेल्वे व आगबोटी यांच्या प्रसारानें या देशांतील अन्न मुख्यतः परदेशीं गेलें आणि दुष्काळाच्या भयंकर राक्षसानें आमचा देश व्यापून टाकिला. हे दुष्काळ १८०० ते १८२५ पर्यंत पांच पडले. आणि १८७६ ते १९०० पर्यंत १८ दुष्काळ पडले. १८२५ ते १८५० पर्यंत दोन दुष्काळ पडले. १८५१ ते १८७५ पर्यंत सहा पडले. १८५४ ते १९०० पर्यंतच्या दुष्काळांनीं २,८८,२५,००० लोक मेले, असें डिग्बी साहेब सरकारी कागदोपत्रावरून म्हणतात. स. १९००

नंतरची स्थिति आपण अनुभवीत आहोंतच! अशा प्रकारें कोटयवधि लोक जर अन्नपाण्यावांचून तडफडत मेले तर कोणत्या सरकारनें ही स्थिति सहन केली असती? आम्ही सोशिक आहों, म्हणूनच असले दुष्काळ सहन करूं शकतों! आम्ही दैववादी असल्यामुळें नशिबावर हवाला ठेवून बिनतक्रार गाजा-वाजा न करितां सरळ मृत्यूच्या आधीन होतों. म्हणून सर्वत्र 'आबादीआबाद' आहे असें समजावयाचें काय? प्राण हा अन्नमय आहे. तें अन्नच जर कमीकमी होत गेलें किंवा परदेशीं भरमसाट जाऊं लागलें, किंवा दुष्काळाच्या सालीं तें पावसाच्या अभावीं नष्ट झालें, तर प्रसंग 'प्राणाशीं' आहे, साक्षात् 'मृत्यूशीं' आहे, ही गोष्ट कोणीच कशी लक्षांत घेत नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. शेंकडों संरक्षक बंधनांनीं जखडलेल्या राज्यघटनेंत राष्ट्रीय सरकारला (प्रांतिक कॉंग्रेससरकारांना) जरी विशेष कांहीं करून दाखवितां आलें नाहीं तरी एकपरी चालेल, पण जीवितावर अचानक झडप घालावयास सोकलेले दुष्काळ जर त्यांना थोपवितां आले नाहींत, तर त्यांची कामगिरी शून्यवत् ठरेल! ज्यूट, कापूस किंवा भुईमूग पेरल्यामुळें शेतकऱ्याला पैसा दिसतो खरा, पण हा पैसा देशाचें पोट उपाशीं ठेवून हातीं येत असल्यामुळें त्या पैशाची तितकीशी मातब्बरी नाहीं. परक्यांचें कोटकल्याण करण्यासाठीं किंवा त्यांचे कारखाने अहोरात्र सुरू राहण्यासाठीं आज सर्व हिंदुस्थान अर्धपोटीं राहून कोट्यवधि रुपयांचा कापूस, ज्यूट व शेंगदाणा पिकवीत आहे व हीं पिकें करून आपणाबरोबरच आपल्या जनावरांस वैरणीच्या अभावीं उपाशीं मारीत आहे! म्हणून या बाबतींत अजून अधिक विचार कर-ण्याची वेळ आली नाहीं असें प्रांतिक सरकारास वाटतें काय! ब्रिटिशांच्या राजवटींत स्वकीयत्व नष्ट झाल्यामुळें आमच्या सर्व आशांचा चक्काचूर झाला व राष्ट्रावर 'नाउमेद' होण्याची पाळी आली. पण प्रांतिक स्वायत्ततेचें अर्धवट उदक आमचे हातावर पडतांच त्या आशांना पालवी फुटूं लागली आहे. त्या आशेचे नूतन कोंब नवचैतन्यानें डोकें वर काढूं लागले आहेत. अशा वेळीं त्यांस प्रांतिक सरकारांनीं आपल्या सद्बुद्धीचें व सत्कृतीचें खतपाणी घातलें तर ते पुन्हा पूर्ववत् बहरणार नाहींत का? रोगराई व दुष्काळ यांनीं हिंदी माणसाचें जीवित क्षणभंगुर झालें आहे, त्यांत शाश्वतपणा आणल्याशिवाय राष्ट्रीय सरकारची कामगिरी लोकादरास पात्र होणार नाहीं. म्हणून या कामीं सर्व प्रांतिक सरकारांनीं

पुढील उपाययोजना अमलांत आणावी.

दुष्काळी हल्ले व त्यांपासून बचाव.

(१) कापूस, ज्यूट व शेंगदाणा यांचें जरूरीपेक्षां जास्त क्षेत्र कायद्यानें कमी करणें व त्यांऐवजीं धान्याची निपज करणें.

(२) गांवोगांव ' गांवकोठारांची ' योजना करून जास्त उत्पन्न झालेलें धान्य खरेदी करून त्याचा सांठा करणें.

(३) हें धान्य सांठविण्यासाठीं सिमेंटकांक्रीटचीं नव्या पद्धतीचीं कोठारें बांधून त्यांतील धान्याचें किडीपासून संरक्षण करणें.

(४) ह्या कोठारांतील धान्याचा सांठा दुष्काळ पडल्यास तेथील लोकांना दोन वर्षें पुरेल इतका करून ठेवणें. ही योजना पुढील १० वर्षांत सिद्धीस जाईल अशी योजना तयार करणें.

(५) दरसाल जरूरीच्या प्रसंगीं ह्यांतील धान्य शेतकऱ्यांस मणास २ पायली या भावानें वाढीनें घालणें व तें सुगीच्या वेळीं गोळा करून सांठविणें.

(६) धान्याप्रमाणेंच वैरणीचा सांठा करून तो पावसापासून व आगीपासून संरक्षण करून ठेवणें.

(७) दुष्काळ सुरू होतांच अशा भागांतील शेतकऱ्यांस पुढील पीक पदरांत पडेपर्यंत लागणारें धान्य वाढीनें घालणें. ही वाढ मणास एक पायली इतकी कमी ठेवण्यांत यावी.

(८) दुष्काळांत घातलेलें धान्य, पुढें तीन वर्षांत वसूल करून घेण्यांत यावें.

(९) वाढीच्या रूपानें जुनें धान्य काढणें व नवीन धान्य भरणें ही क्रिया सतत चालू ठेवावी.

(१०) प्रथम दुष्काळी भागांत ही योजना सुरू करावी व पुढें क्रमाक्रमानें सुकाळी भागांत ती अमलांत आणावी.

(११) या कामासाठीं पैसा पुढील मार्गांनीं उभारावा.

दुष्काळाची आगाऊ तरतूद.

[१] दरमहा ६० रुपयांपेक्षां जास्त पगार मिळविणाऱ्या सर्व नोकरांच्या पगारांतून शेंकडा ५ रुपयेप्रमाणें कपात करण्यांत यावी.

[२] वार्षिक १००० ते २००० रुपये उत्पन्न असणाऱ्या लोकांवर रुपयास ३ पै इतका दुष्काळनिवारक ' कर ' बसवावा. वरील कपात होणारा नोकरवर्ग ह्यांतून गाळला जावा.

[३] माल खरेदीविक्रीच्या सरकारी स्टोअर पद्धतीमुळें जो फायदा होईल, तो दुष्काळनिवारक फंडांत सामील करण्यांत यावा.

[४] धान्याची येणारी वाढ, खर्च जाऊन शिल्लक राहील, ती यांत सामील करण्यांत यावी.

[५] ' पेन्शनदार ' मयत होतांच त्याच्या खातीं जमा असलेला ' पेन्शन-फंड ' दुष्काळनिवारक फंडांत सामील करून घेण्यांत यावा.

[६] व्यापारी पेठांतून जमा होणारे सर्व धर्मादाय ह्या फंडांत सामील करून घेण्यांत यावेत.

[७] पोस्टांतील ' बेवारशी रकमा ' यांत जमा करून घ्याव्यात.

[८] सर्व ठिकाणीं भरणाऱ्या यात्रेंत यात्रेकरूकडून प्रत्येकीं ०२ याप्रमाणें कर घेण्यांत यावा. याकरितां हल्लीं बसविलेले कर निम्मे करण्यांत यावेत.

[९] करमणुकीवरील करांचें सर्व उत्पन्न त्या फंडांत सामील करून घ्यावें.

वरील सर्व मार्गांनीं जमा होणारा पैसा परदेशीं जाणारें सर्व धान्य खरेदी करून व प्रसंगविशेषीं परदेशांतून धान्य आणून त्या रूपानें सांठवून ठेवण्याचा प्रयत्न करावा. गोवधबंदीचा कायदा करून व बंदीचीं कुरणें अशा वेळीं खुलीं करून गुरांचा संहार वांचवितां येईल, मग व्यापारी पेठांतून जमणारा धर्मादाय फंड घेण्यास हरकत पडणार नाहीं. वरील सर्व मार्गांनीं प्रांतिक सरकारांस दर-साल २ कोटि रुपये जमतील असा अंदाज आहे.

इंग्रजी अम्मल सुरू होऊन उणींपुरीं १५० वर्षें होत आलीं, तरी देखील नुसतें जगावें कसें हें जर आम्हांस समजलें नाहीं, तर त्यांची ती विद्या व त्यांची ती आधिभौतिक सुधारणा आमची उन्नति कशी करूं शकेल ? म्हणून प्रांतिक सरकारनें दुष्काळ पडल्यास त्या वेळीं आपण आपली प्रजा कशी जगवूं शकूं याचाच आधींपासूनच विचार करावयास नको का ? तहान लागल्यावर आड खांदावयास सुरुवात करून तृषार्तांची तहान भागवितां येईल का ? त्या-

प्रमाणें दुष्काळ पडल्यावर मग दुष्काळनिवारणाचे प्रयत्न करून प्राणहानि वांचवितां येईल का ? राज्यकारभाराचे भरमसाट खर्च वाढवून, जमाखर्चाची तोंडमिळवणी करतां करतां सालोसाल रडकुंडीस येणारें सरकार, सन १८७५-१८७६ च्या भीषण प्रसंगाची पुन्हा पुनरावृत्ति होऊं नये म्हणून आज काय तजवीज करीत आहे ? त्या १८७५ सालच्या उभ्या महाराष्ट्रभर थैमान घालणाऱ्या दुष्काळरूपी नरहिंसक कसाईखान्याची--कीं ज्यांत आमच्या पूर्वजांच्या अन्न नाहीं म्हणून ६० लक्ष प्राणाहुति पडल्या !—त्या भीषणप्रसंगाचीच तें बेगुमानपणें मार्गप्रतीक्षा करीत आहे असें कोणीं म्हटल्यास त्यांत काय गैर आहे ? इतकी भयंकर प्राणहानि होऊनही जें सरकार त्याच्या प्रतिकाराची आगाऊ तजवीज करून ठेवीत नाहीं, तें आपल्या प्रजेचा सांभाळ मुळींच करीत नाहीं, असें म्हटल्यास तें तरी वस्तुस्थितीस सोडून होईल का ?

सन १७६१ सालीं पानिपतच्या समरभूमीवर आमच्या महाराष्ट्राची एक कर्तबगार पिढी धारातीर्थीं पतन पावली.—दोन लक्ष सैनिक शत्रूशीं झुंज देत देवाघरीं निघून गेले--म्हणून सर्व महाराष्ट्र त्या काळीं दुःखसागरांत बुडून गेला. त्या काळीं एक घर असें सुनें सांपडलें नाहीं, कीं ज्या घरांतून दुःखाच्या भेसूर किंकाळ्या निघाल्या नाहींत ! पण त्या प्रसंगाच्या सवाई आवृत्या दुष्काळरूपानें पुढील १००-१५० वर्षांत इंग्रजी राज्यांत पूर्ण शांतता नांदत असतां आम्हीं पूर्ण अनुभविल्या ! भारतीय युद्धाच्या वेळीं कुरुक्षेत्रावर ५२ लक्ष सैनिकांच्या प्राणाहुति पडल्या असें इतिहासकार सांगतात. पण त्याचीच सुधारून वाढविलेली निराळी आवृत्ति दुष्काळाच्या रूपानें वेळोवेळीं आम्हीं अनुभवावी हें राज्यकर्त्यांस भूषणावह आहे काय ? इंग्रजी अमलाच्या सुरवातीपासून ह्या देशाला दुष्काळाचे भयंकर चटके बसले आहेत ! १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर बंगाल प्रांत इंग्रजांच्या अमलाखालीं प्रथम येतांच १७७१-७२ सालीं त्या प्रांतांत भयंकर दुष्काळ पडून सबंध एक तृतीयांश लोकसंख्येचा—१ कोटि लोकांचा !—बळी त्यांत पडला असें इतिहास सांगतो ! " त्या वेळीं कंपनीच्या लोकांनीं दुष्काळग्रस्तांना अन्न तर पुरविलें नाहींच, पण ज्यांच्याजवळ धान्य होतें, त्यांच्याजवळचें धान्य जुलमानें काढून घेतलें व वाटेल त्या नफ्यानें विकलें. असंख्य लोक मेले, उपन्न बुडालें, दुष्काळ पेटला तरी कंपनीनें आपल्या

उत्पन्नांत भर टाकलीच ! वारन हेस्टिंग्ज म्हणतो कीं, ‘ दुष्काळानें एक तृतीयांश लोक मेले, तरी जुलमानें आम्हीं आपला वसूल कमी होऊं दिला नाहीं !’ धन्य त्या कंपनीची व त्यांच्या वृत्तीची ! —(चित्रमय जगत् १९३०)

अशा तऱ्हेनें पावसानें झोडलें आणि राजानें सोडलें तर प्रजा कशी जगावी ?

१९१४ ते १९१८ पर्यंतच्या महायुद्धांत १,२०,००,००० लोकांचा बळी रणदेवतेनें घेतला, म्हणून सर्व युरोपखंड छाती पिटून धायधाय रडत होतें ! तो प्रसंग त्यांनीं आपल्या आसुरी वृत्तीनें तरी आपल्यावर ओढवून घेतला होता; पण तसें कोणतें पाप आम्ही इंग्रजी अमलांत करीत होतों, म्हणून आमचा असा संहार चालला होता ? १८५४ ते १९०० पर्यंतच्या ४६ वर्षांतील दुष्काळा हल्ल्यांपासून ह्या देशांत लाखों पोटार्थी लोकांचे प्रेतांचे खच प्रत्यहीं पडत होते ! ह्या होमकुंडांत, ह्या अभागी देशांतील २,८८,२५,००० लोकांच्या प्राणाहुत्या पडल्या, असें ‘ डिग्बी ’ साहेब सांगतात ! अशा तऱ्हेची स्मशानशांतता आम्हीं उपभोगीत आहोंत ! ‘आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनिया.’ या साधु तुकारामाच्या दुबळ्या मनोवृत्तीची छाप आमच्या मनांवर पक्की बसलेली असल्यामुळेंच आम्ही शांत–थंड– राहिलों ! धार्मिक भावनांचा पगडा जर आमचे मनांवर नसता, तर भुकेच्या यातनांनीं आमच्या क्षोभाचा केवढा भडका उडविला असता तें देव जाणे. इतका तो प्रसंग दारुण होता !

दुष्काळाच्या भयंकर तावडींतून आम्ही कसेबसे सुटत आहों, तोंच १८९६ सालीं ‘ प्लेगचा ’ भयंकर राक्षस आमच्या पुढें दत्त म्हणून उभा राहिला ! या राक्षसानें गेल्या ४० वर्षांत उभ्या देशांत थैमान माजवून येथील ३०००००० लोकांचा बळी घेतला असें सरकारी आंकडा सांगतो ! सार्वभौम सम्राटाच्या अमलाखालीं असले दारुण प्रसंग उघड्या व मिटल्या डोळ्यांनीं आम्हांवर पाहाण्याचे नित्य प्रसंग यावेत ही गोष्ट राज्यकर्त्यांस भूषणावह आहे का ? ‘ इंग्रजी अमदानींत प्रथम द्रव्य गेलें, नंतर अन्न गेलें आणि शेवटीं तर मनुष्यबळ खर्ची पडूं लागलें !’ असें एखादा भावी इतिहासकार म्हणूं लागला, तर त्याचें समाधान करण्यास आज आपणांस काय आधार आहे ?

मधूनमधून पडणारे दुष्काळ हा शेतकरी जीवनाला लागलेला हृद्रोग होय !

या रोगाचें रूपांतर आज ऋणग्रस्ततेंत झालें असून, अठरा विश्वे दारिद्र्यानें तें मूर्तिमंत आपल्या डोळ्यापुढें उभें आहे! दारिद्र्यानें गांजलेल्या या हतभागी देशांतील लोकांना ' दारिद्र्य–मरण यांतुनि, मरण बरें बा, दरिद्रता खोटी; मरणांत दुःख थोडें, दारिद्र्यांत व्यथा असे मोठी !' असें वाटून आपलें रोजचें जीवन तृणतुच्छ वाटत असेल तर ही स्थिति मोठी स्पृहणीय समजावयाची काय? दारिद्र्याच्याच पोटीं मरणाला कवटाळण्याचा हा अतिप्रसंग झाला असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होईल काय?

या सर्व विवेचनावरून दुष्काळाचें उच्चाटण करण्याची आगाऊ योजना केल्याशिवाय, शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाचा भेसूर प्रश्न सुटणार नाहीं! देशाच्या संरक्षणासाठीं पूर्वी ज्याप्रमाणें शस्त्रास्त्रांनीं व दारुगोळ्यांनीं सज्ज असे किल्ले राखिले जात असत, त्याप्रमाणेंच दुष्काळी हल्ल्यांपासून जनतेचें संरक्षण करण्यासाठीं आज गांवकोठाररूपी धान्यांच्या किल्ल्यांची ठिकठिकाणीं जरूरी आहे. कित्येक जण असा आक्षेप घेतील कीं, रेल्वे व बोटी यांनीं जग जवळ आलें असतां हा एवढा खटाटोप करण्याची जरूरी ती काय? ह्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, अशा वेळीं धान्य घेण्यास लागणारा पैसा, पीक बुडाल्यामुळें, लोकांचे हातीं नसतो; परिस्थितीचा फायदा घेऊन धान्याचे भाव भरमसाट वाढविले जातात; रेल्वे, आगबोटी इत्यादि वाहतुकीच्या साधनांनीं खर्च फार येऊन धान्य महाग होतें; त्यांतच व्यापाऱ्यांची कमाई व दलाली ही भरतीला येऊन महर्घतेचा कळस होतो, व बहुजन शेतकरीसमाज द्रव्यदृष्ट्या पूर्ण नागविला जातो. पण ह्या गांवकोठाराच्या योजनेपासून पुढीलप्रमाणें फायदे होतील!

स्थानिक धान्यकोठारापासून होणारे फायदे

(१) दुष्काळ पडल्यास, प्रत्येक कुटुंबास अल्प वाढीनें जरूर तितकें धान्य घरबैठें मिळूं लागेल. त्यामुळें गांठीचा पैसा सोडण्याची जरूरी भासणार नाहीं किंवा सावकारांचीं घरें पुजावीं लागणार नाहींत!

(२) धान्याचा पुरवठा मुबलक असल्यामुळें बाजारभाव मजबूत राहतील.

(३) जगण्यासाठीं गांव सोडून परागंदा होणाचा भीषण प्रसंग येणार नाहीं.

(४) जीवित आणि वित्त यांची हानि वांचेल.

(५) जनावरांचा मोठ्या प्रमाणावर होणारा संहार वांचवितां येईल.

(६) लुटालूट, दरोडे, चोऱ्यामाऱ्या, घातपात, जाळपोळ इत्यादि अनन्वित कृत्यें उत्पन्न न होतां जनतेंत शांतता राहील. त्यामुळें राज्यकर्त्यांस विशेष धांवपळ करावी लागणार नाहीं.

(७) शेतीचें काम थांबल्यामुळें, जोडधंद्यांकडे अधिक लक्ष देण्यास अवसर मिळेल. त्यामुळें मालाची निर्मिति मोठ्या प्रमाणावर होऊन, अशा काळांतही शेतकरी सुखी राहील व आपली जीवितनौका सुखरूपपणें पैलतीरास नेईल.

(८) शेतकरी रिकामा राहिल्यामुळें, मोठमोठे तलाव बांधणें, घरणें धरणें, रस्ते तयार करून घेणें या कामीं लागणारें मनुष्यबळ मुबलक मिळेल.

अशा तऱ्हेनें गांवकोठारांत धान्य भरून ठेवणें, म्हणजे जनतेचे प्राण जतन करून ठेवणें होय ! रेल्वे येण्यापूर्वी आपल्या देशांत घरोघर धान्य सांठविण्याचीं ' पेवें ' होतीं. जो तो पुढील वर्षाच्या बेगमीइतकें धान्य व वैरण सांठवून ठेवीत असे. परंतु इंग्रजी अमदानींत रेल्वे आल्यापासून हा सर्व मनु पालटून गेला ! इंग्लंडची लोकसंख्या वाढत गेली, तसतशी त्यांना धान्याची टंचाई भासूं लागली. हें धान्य देशाच्या अंतर्भागांतून वाहून आणण्याचें कार्य आगगाडी करूं लागली. जोडधंद्यांचा नाश झाल्यामुळें जीवनाच्या हरएक वस्तूसाठीं—पक्क्या मालासाठीं—धान्य विकण्याशिवाय शेतकऱ्यास दुसरा कोणताच मार्ग शिल्लक राहिला नाहीं. या देशच्या शेतकऱ्यांनीं कच्चा माल पिकवावा व इंग्लंडनें तो घेऊन, त्यांना पक्का माल पुरवावा, हें घातुक तत्व अमलांत आल्यामुळें सालबेगमीपुरतें धान्यहि त्यांच्याजवळ शिल्लक राहीना ! त्यामुळें लाखों पेवें भूमातेच्या उदरांत आज सताड मोकळीं पडलीं आहेत. अशा तऱ्हेची चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाल्यामुळें आमच्याजवळ धान्य राहीना ! मग दुष्काळी आपत्तींत आम्हीं कसें जगावें ?

१९१६ ते १९२८ मधील बारा वर्षांचा काळ लक्षांत घेतल्यास महर्घतेचे बसलेले चटके किती प्रखर होते, याची कल्पना होईल. १९१९ साल हें इंग्रजी अमदानींतील उत्कर्षाचें परमोच्च स्थान होय ! सर्व बलिष्ठ अशा जर्मनांचा पराभव करून ब्रिटिश राज्यकर्ते सर्व जगांत अजिंक्य ठरले होते ! आरमारी वर्चस्वा-

मुळें सर्व समुद्रावर त्यांची सत्ता अप्रतिहत गाजत होती ! पन्नास हजार मैल लांबीचा लोहमार्ग बांधून त्यावरून अष्टौप्रहर आगगाडीची वाहतुक सारखी सुरू होती ! मालाच्या वाहातुकीच्या असंख्य बोटी आमच्या सेवेसाठीं बंदरोबंदरीं नांगरून पडल्या होत्या ! चतुरंग सेनासागर आमच्या देशांत पूर्ण शांतता ठेवीत होता ! इतकी कडेकोट तयारी असूनही अन्नासाठीं दाही दिशा फिरण्याचा प्रसंग आमचेवर आला होता ! सरकारनें तर ह्या वेळीं आपल्या व्यापाऱ्यांना धान्याचीं 'लायसेन्सें' बहाल केलीं ! या लायसेन्सवाल्यांनीं आपलें उखळ चांगलेंच पांढरें करून घेतलें होतें. कां घेणार नाहींत ? धान्याचें कंट्रोल करून दोन पैसे मिळविण्याचें सरकारनेंच स्वतः ठरविल्यावर त्यांच्या प्रभावळींतील भांडवलवाल्यांनीं या सुवर्ण लुटीचा लाभ कां घेऊं नये ! गरीब बिचारे आम्ही अन्नासाठीं दीन होऊन, ह्या लायसेन्सवाल्या व्यापाऱ्यांचे दारीं कडोसरीस पैसा बांधून धान्यासाठीं बारी धरून बसत असूं ! पंढरीचे वारकरी चंद्रभागेच्या वाळवंटांत जवळच्या दशम्या खाऊन तरी दर्शनासाठीं बारीला जाऊन बसत, पण अन्नाला मोताद झालेल्या ह्या आम्हां बारीदारांच्या नशिबीं तेवढेंहि समाधान नव्हतें ! रुपया आठ आण्या-पेक्षां एकदम धान्य जास्त मिळत नसे ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत अर्धपोटीं वा उपाशीपोटीं असें तिष्ठत बसण्याचे व प्रसंगविशेषीं धान्य संपून गेल्यास, हात हालवीतच परत येण्याचे करुण प्रसंग पुष्कळांवर येत असत ! इकडे तर भुके-मुळें घरोघर मुलाबाळांचा कल्लोळ उडून गेलेला असे ! वाचकहो ! हा १९१९ चा अगदीं ताजा प्रसंग आठवा, म्हणजे माझ्या म्हणण्यांतील सत्यता तुमचे लक्षांत येईल. बरें, तेव्हां धान्य तरी स्वस्त होतें म्हणावें, तर तें रुपयाला अवघे २॥ ते ३ शेर ! यांत मनुष्यानें घ्यावें तरी काय ? आणि खावें तरी काय ? सरकारनें तर हा पोटार्थी लोकांचा कंगालखाना पोसण्यासाठीं दुष्काळी कामें काढून ठिकठिकाणीं ह्या पोटार्थी लोकांच्या छावण्या--छपऱ्या--उभारल्या होत्या ! त्या ठिकाणीं काम करणाऱ्या मजुरास रोज पांच आणे, म्हणजे १ शेर धान्य घेतां येईल इतकी मजुरी दिली जात होती ! त्यांतच त्यानें आपल्या कच्च्या-बच्च्यांचें गुजरण करावयाचें होतें ! अशा तऱ्हेचा भीषण झगडा, राज्यकर्ते वैभवाच्या समृद्धींत लोळत असतां आमचे बळिराजे (शेतकरी) यमाजी भास्कराबरोबर (मृत्यूशीं) खेळत होते ! ह्या स्थितीस तुम्हांला स्पृहणीय

स्थिति असें म्हणावयाचें आहे काय ? म्हणून हा प्रश्न वरील मार्गांनीं सोडविल्याशिवाय सुटणार नाहीं, अशी सर्वांची खात्री पटेल. काँग्रेस आमदार व प्रधानमंडळ या राष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे अधिक तत्परतेनें लक्ष देईल काय ?

(३) भावांतील मंदी व ती कमी करण्याचे उपाय.

शेतकरी जीवनांतील दुसरा मोठा प्रश्न म्हणजे भावांतील मंदी हा होय. रात्रंदिवस उन्हातान्हांत खपून व थंडी, वारा, पाऊस यांचा मारा सहन करून, पिकाकडे डोळे लावून आशेच्या किरणाकडे पाहणारा शेतकरी, बाजारमंदी होतांच कंबर खचून अर्धमेला होऊन जातो. गेल्यासालीं ३० रु. खंडी भावानें शेंगा विकणारा शेतकरी चालू सालीं शेंगांचा भाव १५।१६ रुपये खंडी झालेवर आपली पत किती सांभाळूं शकेल ? कॅनाल भागांत उसाची लागवड मोठ्या प्रमाणांत करणारा शेतकरी गेल्या ५।६ वर्षांतील गुळाच्या भावांतील भयंकर मंदीमुळें कर्जबाजारी होऊन, आपल्या अन्नदात्या जमिनीस पारखा होत चालला आहे. खानदेश—वऱ्हाडकडील कापूस पिकवणारा शेतकरी कापसाच्या भावांतील भयंकर मंदीनें हैराण होऊन ऋणग्रस्त झाला आहे ! अशा तऱ्हेनें भावांतील मंदी शेतकऱ्यांच्या हातांतील कोट्यवधि रुपयांचा घास हिरावून घेत असल्यामुळें मोठा आर्थिक पेंच शेतकऱ्यावर येऊन पडला आहे. ह्या पेंचांतून त्यास काढल्याशिवाय त्याचा ऋणग्रस्त आजार बरा होणार नाहीं.

पण भावांतील मंदी दूर करण्याचे राष्ट्रीय प्रयत्न दूरच राहून उलट हुंडणावळीच्या १८ पेन्सच्या भावानें शेतकऱ्यांच्या भोंवतालचा मंदीचा फास सरकार जास्तच आवळीत आहे, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय ! हिंदुस्थान हा आज कृषिप्रधान देश झाला असून त्यामधून दरसाल २०० कोटींचा कच्चा मालच परदेशीं रवाना होतो. वरील हुंडणावळीच्या सरकारमान्य भावामुळें शेतकऱ्यांचें दरसाल २० ते २५ कोटि रुपयांचें प्रत्यक्ष नुकसान होत आहे. हा क्रम गेलीं ७।८ वर्षें सारखा सुरू आहे. या बाबतींत राष्ट्रीय थोर पुढाऱ्यांनीं आटोकाट प्रयत्न करूनही कांहीं उपयोग झाला नाहीं. वरिष्ठ कौन्सिलांत हा प्रश्न अनेक वेळां बिलाच्या रूपानें पुढें आला असतां कांहीं फितुरांनीं सरकारच्या बाजूनें

मतें देऊन शेतकऱ्यांचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान केलें आहे. इंग्लंड हा कारखानदारप्रधान देश असल्यामुळें आपल्या वसाहतींमधून व अंकित देशांतून सत्तेच्या जोरावर स्वस्त कच्च्या मालाची पैदास तो करीत असल्यामुळें शेतकरी आर्थिकदृष्ट्या खालावत चालला आहे. परदेशाहून इकडे येणाऱ्या पक्क्या मालाचें गिऱ्हाईक शेतकऱ्यांव्यतिरिक्त जो बहुजन संपन्न वर्ग आहे, तोच असल्यामुळें, या व्यापारी देवघेवींत हुंडणावळीच्या भावाचा फायदा शेतकऱ्यांच्या पदरांत मुळींच पडत नाहीं. नुकसान एकाचें व फायदा दुसऱ्याचा, ही इंग्रजी राजनीति आहे! कच्च्या व पक्क्या मालाच्या भावांत महदंतर असल्यामुळें, हुंडणावळीच्या भावापासून त्यांनाही खरा फायदा विशेष म्हणण्यासारखा होत नाहीं. पण ब्रिटिश व्यापाऱ्यांस मात्र जगाच्या व्यापारी चढाओढींत १८ पेन्सच्या भावानें स्वस्त मालाची पैदास करून, आपलें आसन स्थिर ठेवितां येतें. म्हणून या बाबतींत प्रधानमंडळांनीं सतत प्रयत्न सुरू ठेविले पाहिजेत.

(१) भावांतील मंदी कमी होण्यासाठीं प्रांतिक सरकारनीं पीक-नियंत्रणाचा कायदा करावा. कपाशीच्या भावांतील मंदी कमी होण्यासाठीं, असा कायदा नुकताच अमेरिकन सरकारनें केला असून, ठरविलेल्या क्षेत्राबाहेर तेथील शेतकऱ्यास जास्त लागवड करण्याचा अधिकार नाहीं. त्यामुळें मालाची निपज कमी होऊन भावांत सुधारणा होते. म्हणून कॉंग्रेस प्रधानमंडळांनीं, ज्या मालाचे भाव जगाच्या बाजारपेठेंत फार घसरले असतील, त्या पिकाच्या लागवडीचें क्षेत्र कायद्यानेंच कमी करावें व त्याची अम्मलबजावणी ग्रामपंचायतीमार्फत करावी.

(२) सर्व प्रांतिक प्रधानमंडळांनीं एकत्र जमून, हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें निरनिराळ्या देशांतील (कच्चा माल मोठ्या प्रमाणांत पिकविणाऱ्या) सरकारांशीं विचारविनिमय करून, शेतकऱ्यांना परवडतील असे निरनिराळ्या उद्भिज्ज पदार्थांचे भाव ठरवून घेण्याचा व्यापारी करार करावा. असा हा आंतरराष्ट्रीय बाजारभाव ठरविण्याचा कायदा दर तीन वर्षांनीं पुन्हा फेरविचारांत घ्यावा. ह्या भावांस कमाल व किमान मर्यादा घालावी. उदाहरणार्थ, कपाशीचा भाव २०० ते २२५ रु. खंडी किंवा शेंगांचा भाव २० ते २५ रु. खंडी किंवा गुळाचा भाव ३५ ते ४० रु. खंडी असा फरक ठेवून

काढावा. म्हणजे पीक कमी येवो अगर जास्त येवो, कमाल व किमान भावांच्या बाहेर त्यांचे भाव जातां कामा नये. असा फरक ठेवण्याचा हेतु एवढाच कीं, जगाच्या बाजारपेठेंत ह्या मालाची देवघेव होतांना मालाचा बरेवाईटपणा व वाहातुकीचा खर्च विचारांत घेऊन त्यांना व्यापारी देवघेव परवडावी. अर्थात् भावनियंत्रणाबरोबरच ह्या उद्भिज्ज संपत्तीवरील (कच्च्या मालावरील) जकाती सर्व राष्ट्रांनीं सारख्याच ठेवण्याचें बंधन त्यांत नमूद करून घ्यावें. ह्या पद्धतीनें व्यापारी वायदे बंद पडतील, तसेंच सट्टेबाजी मरेल व शेतकऱ्यांच्या पदरांत निश्चित भावाचें माप पडूं लागेल. तेणेंकरून तो खरा सुखी होईल.

(३) जो माल बाहेरदेशीं जात नसेल, अशा धान्याचे भाव थोड्याफार फरकानें निश्चित करावेत. हे भाव ठरवितांना शेतीचें उत्पन्न, खर्च व शेतकऱ्यांचे श्रम व वेळ, ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या जाव्यात.

(४) ज्या भागांत दुष्काळ पडेल, त्या भागांत वरील ठराविक दरानें धान्य जाऊन पडण्यासाठीं रेल्वेच्या विशेष सवलती मिळवाव्यात, म्हणजे भावाची अंतर्गत घडी विस्कटणार नाहीं व दुष्काळाची जाणीव भासणार नाहीं.

(५) जर आंतरराष्ट्रीय बाजारभावाचे दर निश्चित होत नसतील, तर सरकारनें कापूस, ज्यूट, गहू, शेंगदाणा वगैरे जरूर त्या मालाचें क्षेत्र कायद्यानें कमी करावें, किंवा त्या क्षेत्रांत उत्पन्न होणाऱ्या प्रचंड मालास पक्क्या मालाचें रूप देऊन जगाच्या बाजारपेठेंतून दोन पैसे मिळवून द्यावेत; किंवा देशाच्या ज्या भागांत त्याची जरूरी असेल तिकडे त्याचा पुरवठा करावा. बाहेरदेशीं जाणारें सर्व धान्य प्रांतिक सरकारांनीं खरेदी करून भावास मजबुती आणावी.

वरील उपायांनीं मंदी कमी करितां येईल व शेतकऱ्यांच्या गळ्यास लागणारा मंदीचा फास काढतां येईल. हल्लीं कित्येक देशांतील सरकारांनीं जबर जकातीच्या भिंती उभारून, आपल्या देशांतील शेतकऱ्यांचें मंदीपासून संरक्षण चालविलें आहे, तर कित्येक सरकारांनीं सुवर्णचलन सोडून देऊन व नाण्यांचे भाव घटवून आपल्या शेतकऱ्यांची पत टिकवून धरली आहे ! पण येथें सगळाच अंधार असल्यामुळें शेतकरी दुःखसागरांत गटांगळ्या खात आहे ! म्हणून शेत-

करी ऋणविमोचनाच्या प्रसंगीं, शेतकऱ्यांच्या आर्थिक बजेटास लागलेल्या ह्या असंख्य गळत्या जर बंद करण्याचा प्रयत्न केला गेला नाहीं, तर ऋणविमोचन न होतां, ऋणयोग मात्र संभवेल ! मग शेतकऱ्यांच्या दुःस्थितीस पारावार राहणार नाहीं !

" हिंदुस्थानांतील शेती किफायतशीर नाहीं, एवढेंच नव्हे, तर शेतकऱ्याला जोडधंदा मिळाल्याशिवाय तो शेतीवर जगणें शक्य नाहीं, असें सरकारी अधिकारीसुद्धां म्हणत असतात. अशा प्रकारच्या बिनकिफायतशीर शेतीला सरकारचा सारा जबर वाटतो आणि त्यामुळें शेतकरी त्रासून जातो. त्यांत पावसाची अनिश्चितता, बाजारभावाची मंदी, सावकार, पठाण वगैरेंचा त्रास, शहरोशहरीं जाण्याचा मोह व आधुनिक सुखसोईचा सुळसुळाट इत्यादि गोष्टी असल्यामुळें आज शेतीसंबंधीं बोलणेंही कठीण झालें आहे. पण आहे या परिस्थितींत जर आम्ही आमच्या प्रयत्नांची शिकस्त केली नाहीं, तर उद्यांचा दिवस उजाडणेंही कठीण होईल. आजकाल शेतकरी आपल्या जमिनीवर राबावा तितका राबत नाहीं व जमिनीची करावी तितकी मेहनत करीत नाहीं. सुगीचे ५।६ महिने लोटले कीं तो मुंबई, पुणें किंवा अशींच दुसरीं शहरें गांठतो. तेथें मजुरी करितो, रेल्वेवर ओझीं उचलतो अगर दुसरीं कामें करितो, आणि पाऊसकाळ सुरू झाला कीं परत येतो. दरम्यानचा काळ तो आपली जमीन पावसाचा प्रत्येक थेंबन् थेंब शोषून घेण्याइतकी सपाट करील व आजूबाजूला बंधारे घालील तर, आहे या परिस्थितींतसुद्धां तो अधिक उत्पन्न काढूं शकेल ! शेतकरी शहरोशहरीं जाऊन पैसा मिळवितो खरा, पण पैशाबरोबर नवीं व्यसनें घेऊन येतो व मिळविलेला पैसा जेथल्या तेथेंच संपवून टाकतो ! "

(चित्रमय जगत् १९३०)

एकंदरींत शेतकरी कोठेंच सुखी होत नाहीं. याकरितां शेतकरी आपल्या राहत्या गांवीं व नांदत्या घरीं सुखी कसा होईल याचा विचार केल्याशिवाय हा कठीण प्रश्न सुटणार नाहीं.

प्रकरण २ रें

शेतकरी ऋणविमोचनाच्या कायद्याचें स्वरूप.

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या सर्व गोष्टींचा, शेतकरी जीवनाशीं अत्यंत निकट संबंध येत असल्यामुळें, त्या बाबींकडे दुर्लक्ष करून किंवा डोळेझांक करून शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा यशस्वी करतां यावयाचा नाहीं. हल्लीं घाटत असलेल्या योजनेप्रमाणें नुसतें सावकारावर कायदेशीर नियंत्रण घालून किंवा त्यास बुडवून शेतकरी ऋणमुक्त होणार नाहीं. त्याकरितां त्यांत आमूलाग्र सुधारणा केली पाहिजे. देशांतील सावकारवर्ग न मरतां तो वाढीस लागून त्याचा शेतकरी जीवनाशीं जास्त चांगला संबंध कसा घडवून आणतां येईल व त्याच्या भांडवलाच्या साहाय्यानें त्यास आपली सांपत्तिक स्थिति कशी सुधारतां येईल, या दृष्टीनें शेतकरी ऋणविमोचनाच्या कायद्याची घटना तयार व्हावयास पाहिजे. आज कॉंग्रेसचें धोरण सर्व वर्गांशीं सलोख्याचें आहे. एका वर्गाचा नाश करून दुसऱ्या वर्गाला गबर केल्यानें देशाचें हित होणार नाहीं, ह्याची जाणीव प्रधानमंडळास पुरेपूर आहे म्हणून हा कायदा समाजांतील सर्व वर्गांचें हित करणारा, व त्यांचें योग्य धारणपोषण करणारा व राज्यव्यवस्थेस पूर्णपणें स्थैर्य प्राप्त करून देणारा असा स्वयंविकसित पाहिजे. त्या दृष्टीनें कायद्याचें स्वरूप कोणतें असावें, तें आपण ठरवूं.

शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा

भाग १ ला.

(१) उद्देश—राष्ट्राच्या जीवनाचा आधारस्तंभ जो शेतकरी वर्ग तो कर्जमुक्त करून त्याची सर्वांगीण उन्नति घडवून आणणें व तद्द्वारा राष्ट्रीय बळ वृद्धिंगत करणें हें ह्या कायद्याचें ध्येय राहील.

(१) शेतकऱ्याची व्याख्या.

(१) मालकी हक्कानें जमीन धारण करणारा व लागणदार कूळ या नात्यानें

तिची प्रत्यक्ष वहिवाट करणारा अशा उभयतांचा या कायद्यांत समावेश होईल. जमिनीची खरेदी, विक्री, त्यावरील बोजे, वाटपें, वारसाहक्क व सुधारणा ह्या गोष्टींचा प्रत्यक्ष संबंध जमीन धारण करणाराशीं येत असल्यामुळें व जमिनदारांचे खंड व भागवाटे या दृष्टीनें कुळांचा संबंध त्यांत अंतर्भूत होत असल्यामुळें ह्या कायद्याची व्यापकता वाढविली आहे. ह्या दोन्ही वर्गांचें अंतिम हित साधण्यासाठीं त्यांचा शेतकरी ह्या शब्दांत समावेश करण्यांत येत आहे. म्हणून शेती धारण करणारानें दुसरे कोणतेही धंदे केले तरी त्याचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम त्याच्या शेतसुधारणेवर होणार असल्यामुळें, त्याच्या शेतकारित्वास यापुढें कोणत्याही प्रकारें बाध येणार नाहीं.

(२) सावकारीची कायदेशीर नोंद.

(१) सावकारी करणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्या सावकाराची नोंद प्रत्येक गांवच्या सावकार–लिस्टांत करण्यांत येईल. या लिस्टांत नोंदल्या जाणाऱ्या सावकारांस सावकारी करण्याचा ‘ परवाना ’ देण्यांत येईल. व त्याकरितां एकदाच प्रथमारंभीं त्यांचेकडून एक रुपया ‘ लायसेन्स फी ’ म्हणून घेण्यांत येईल. लायसेन्सशिवाय केलेली सावकारी रद्द समजण्यांत येईल.

(२) हा कायदा मंजूर झाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत प्रत्येक गांवांतील सावकारांनीं आपल्या सावकारीची सर्व प्रकारची माहिती कागदपत्रांनिशीं किंवा कुळांची समक्ष रुजवात घालून गांवच्या सावकारलिस्टांत नोंदून दिली पाहिजे. नवीन सावकारी सुरू करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अगर पेढीस किंवा बँकेस वरील फी भरून व नांव नोंदून केव्हांहि ‘ परवाना ’ काढतां येईल. हें काम करण्याचा अधिकार पंचायतीच्या अध्यक्षास देण्यांत येईल.

(३) वरील नोंदी करण्यासाठीं प्रत्येक गांवाला सहीशिक्क्याचीं सरकारी बुकें देण्यांत येतील. या बुकांत प्रत्येक सावकाराचें खातें स्वतंत्र घालून त्यामध्यें त्याचें नांव, राहण्याचें ठिकाण, जात, सावकारींत गुंतविलेल्या रकमा, कुळांचीं नांवें, त्यांस दिलेलें कर्ज, बांधलेलें व्याज, मुदलाचे हप्ते, वसुली रक्कम, वसुलाच्या तारखा व सालअखेर निघणारी बाकी इत्यादि जरूर तीं सदरें घालून, माहिती भरण्तांत येईल व अशीं बुकें दर पांच वर्षांनीं बदलण्यांत येतील.

(३) दस्तऐवजपद्धति बंद करणें.

(१) प्रत्येक सावकारास बँकेप्रमाणें ‘ कॅशबुक ’ देण्यांत येईल. या बुकांत त्याला सावकारींत गुंतविलेली रक्कम जमेकडे मांडून दिली जाईल, व वर्षाअखेर कुळाकडून आलेला व्याजमुदलाचा वसूल नांवेकडे मांडून सहीशिक्का मारून दिला जाईल.

(२) यापुढें सावकारास कुळाकडून दस्तऐवज करून घेण्याचें काम पडणार नाहीं. किंवा आपल्या सावकारीचा हिशोब निराळा ठेवण्याचें कारण पडणार नाहीं.

(३) सावकार व कूळ यांचे परस्पर देवघेवीचे व्यवहार होतांच त्यांची नोंद करून त्यांना सहीशिक्याच्या सरकारी पावत्या देण्यांत येतील.

(४) सावकारलिस्ट कोणासही पाहतां येईल व सावकारास आपल्या खात्याचा खातेउतारा मागतां येईल.

(५) सावकार व कूळ यांच्या देवघेवीच्या व्यवहारांत सावकार हा ठेवीदार, सरकार ही बँक व कूळ हें कर्जदार असें नातें राहील. ज्या त्या गांवांतील खातेदार हे त्या बँकेचे सभासद राहतील. यामुळें सावकारांस त्यांच्या रकमा ठराविक वेळीं वसूल करून देणें, हें ह्या स्थानिक ग्रामपंचायतरूपी बँकेचें म्हणजे सरकारचें कर्तव्य राहील.

(४) कर्ज देणें.

(१) कर्ज काढणाऱ्या शेतकऱ्याकडून कर्जमागणीचे छापील फार्म भरून घेण्यांत येबील. हें काम पंचायतीचा सेक्रेटरी करील.

(२) दिल्या जाणाऱ्या कर्जाची नोंद स्वतंत्र कर्जबुकांत केली जाईल. त्याकरितां प्रत्येक गांवास स्वतंत्र कर्जबुक ठेवण्यांत येईल. या बुकांत कर्जदारांचीं स्वतंत्र खातीं घालण्यांत येतील व त्यांच्याशीं होणारा सर्व व्यवहार ज्या त्या खातीं स्वतंत्र नोंदला जाईल.

(३) या बुकांत कर्जदाराचें नांव, त्याच्या उत्पन्नाचीं ठिकाणें, तेथील जमिनींचे सर्वे नंबर, क्षेत्र, तरम आकार, कर्ज काढलेली रक्कम, सावकारांचीं नांवें, व्याजमुदलासह बांधलेले हप्ते, कर्ज घेतल्यावर सही अगर आंगठा हीं सदरें घालून पुढील अर्ध्या पानांत कर्जदाराकडून आलेलें व्याज, हप्ते व सालअखेर

निघणारी बाकी इत्यादि जरूर तीं सदरें घालून हिशेब चोख ठेविला जाईल. हें काम ज्या वेळचें त्या वेळीं समक्ष करण्यांत येईल.

(४) एखाद्या इसमास अनेक गांवांत जमिनीचें अगर घराचें उत्पन्न असेल, तर ज्या गांवीं तो कायम वस्ती करून राहात असेल त्या गांवच्या कर्जबुकांत व सावकार लिस्टांत त्याच्या नांवापुढें त्याची नोंद होईल व त्यास तेथील खात्यावर कर्ज काढतां येईल.

(५) कोणतेंही कर्ज काढतांना यापुढें सावकारास रजिस्टर अगर कसलाच दस्त करून देण्याची जरूरी राहणार नाहीं. घेतलेलें कर्ज हें त्याच्या खातीं नोंदलेल्या सर्व इस्टेटीस जबाबदार धरलें जाईल. यापुढें कबजेगहाणाचा प्रकार रद्द समजण्यांत येईल.

(६) कर्ज हें राहत्या गांवींच पंचायतीच्या ऑफिसांत सावकाराकडून घेतां येईल. या वेळेस पंचायतीचा अध्यक्ष अगर सभासद ह्यांच्या देखरेखीखालीं व्यवहाराची देवघेव होईल व कर्जबुकांत व सावकार लिस्टांत त्यांच्या सह्या घेतल्या जातील.

(५) कर्ज देण्याच्या मर्यादा

(१) कर्ज काढण्याच्या बाबतींत यापुढें कुळास कसल्याही प्रकारचा खर्च पडणार नाहीं. या कामीं लांच देणारास व घेणारास कायद्यानें एक वर्षापर्यंत शिक्षा देण्याचा अधिकार राहील, लांच खाणाऱ्या पंचायतीच्या सभासदाचें सभासदत्व बेमुदत रद्द केलें जाईल.

(२) कोणत्याही खातेदार शेतकऱ्यास त्याच्या तरम आकाराच्या दसपटीपेक्षां जास्त कर्ज कसल्याही प्रसंगीं काढतां येणार नाहीं.

(३) इनामदार किंवा सनदी शेतकरीवर्ग यांच्या नांवांपुढें त्यांचा तरम आकार लिहून त्यापुढें भर आकाराचा आंकडा नोंदला जाईल, व त्याच्या दसपटीइतकें कर्ज त्यांना काढतां येईल. म्हणजे एखाद्या इनामदारास ५०० रुपये भर साऱ्याची जमीन असल्यास त्यास आपल्या जमिनीच्या तारणावर ५००० रु. पर्यंत कर्ज कोणत्याही सावकाराकडून किंवा बँकेकडून काढतां येईल.

(४) ज्यांना जमीन नसून निव्वळ घरच असेल, अशा इसमांस घराच्या

त्या वेळच्या किंमतीच्या $\frac{1}{2}$ इतकें कर्ज काढतां येईल.

(५) घराची किंमत वेळोवेळीं पंचायतीचे सभासद ठरवितील.

(६) लागणदार कुळास, तो जेवढ्या तरम आकाराची जमीन कशीत असेल, त्याच्या चौपटीइतकें कर्ज काढण्याचा अधिकार राहील. अशा इसमाकडून जमीन निघाल्यास सदर कर्ज हें त्याच्या स्वतःच्या स्थावरजंगम प्रापर्टीवर किंवा जातीवर जबाबदार म्हणून धरलें जाईल.

(७) यापुढें सोन्याचांदीचे अगर मोत्यांचे दागदागिने व धातूंचीं भांडीं यांच्या गहाणावर सावकारी करणारास बंदी करण्यांत येईल. कर्जदाराची ही इस्टेट व्याजापायीं डुलत असल्यामुळें, त्यानें आपल्या गरजेच्या वेळीं त्यांची विक्री करून गरज भागवावी. जरूरीपेक्षां हातांत जास्त पडणारा पैसा सरकार-मान्य बँकेंत अगर घरीं ठेवावा किंवा कर्ज असल्यास हप्त्यासाठीं सावकारास आदा करावा. अशा रकमा केव्हांही कुळास सावकाराकडे आदा करतां येतील. गहाणावर पैसे काढणें म्हणजे स्वतःच्या पैशावर आपण श्रम करून उलटें साव-कारास व्याज देणें होय ! या योजनेनें भरमसाट कर्ज काढण्याचें बंद होईल. तसेंच दागदागिन्यांत रकमा गुंतवून ठेवण्याचें वेड कमी होईल व उधळपट्टीस आळा बसेल.

(८) जुन्या कर्जाची फेड जसजशी होत जाईल, तसतसें त्याला इष्ट मर्यादेपर्यंत पुनः केव्हांहि कर्ज काढतां येईल.

(९) कर्जफेड ज्या सालीं थकेल, त्या सालीं पंचायतीच्या परवानगी-शिवाय कर्ज काढतां यावयाचें नाहीं.

(१०) कर्जाचा व्यवहार, स्थानिक अगर बाहेरचे सावकार, बँका, पत-पेढ्या ह्यांना गांवांतील शेतकरी समाजाशीं करतां येईल. तो करतांना त्याचें खातें पाहून इष्ट मर्यादेपर्यंतच त्यास कर्ज घेतां येईल.

(६) उधारीचा व्यवहार.

(१) वैयक्तिक पतीवर कोणाहि माणसास दुकानदाराकडून किंवा संस्थे-कडून उधार माल घेतां येईल. ही पत ५० रुपयेपर्यंत तरम आकार भरणाराची २५ रुपये, व त्यापेक्षां जास्त आकार भरणाराची ५० रुपये ठरविण्यांत येईल.

एवढ्या पतीपर्यंत त्यास सबंध वर्षांत केव्हांही कोणाशींही व्यवहार करतां येईल. मात्र तो दुकानदाराच्या मर्जीचा प्रश्न राहील.

(२) अशा माणसास कॅशबुकाप्रमाणें २५ रुपयांचीं व ५० रुपयांचीं पत-बुकें देण्यांत येतील. या बुकांत त्यानें इतरांशीं होणारा वेळोवेळचा व्यवहार नोंदून घेतला पाहिजे. याव्यतिरिक्त केलेला व्यवहार ग्राह्य धरला जाणार नाहीं.

(३) साल अखेरीस, ज्या त्या दुकानदारांनीं आपल्या खात्यांवरील शेतकऱ्यांकडील येणें रकमा वसूल न झाल्यास तो ज्या गांवचा राहाणारा असेल, तेथील पंचायतीकडे खातेंबाकीपत्रें पाठविल्यास त्या रकमा वसूल करून दिल्या जातील.

(४) अशीं बुकें दरसाल पंचायतीच्या ऑफिसांतून सहीशिक्का मारून देण्याची व्यवस्था होईल. ज्यांचे सालअखेरीस खातेबाकीचे व्यवहार पूर्ण झाले असतील त्यांनाच तीं बुकें मिळतील. त्याकरितां दोन आणे किंमत आकारली जाईल.

(५) खंडानें अगर भागवाट्यानें जमीन करणारास हीं बुकें अनुक्रमें २५ व २० रुपयांचीं दिलीं जातील.

(६) ज्यास जमीन अगर घर नसून निव्वळ हातावर पोट असेल अशा इसमास कर्ज देतांना स्थानिक पंचमंडळ त्याची पत ठरवील व तो आंकडा त्यास स्वतंत्र पुस्तक देऊन त्यांत नोंदविला जाईल. तेवढ्या पतीपर्यंत त्याच्याशीं कोणालाहि व्यवहार करतां येईल. पण तो लोकांच्या खुशीचा प्रश्न राहील. त्याच्याशीं संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीनें आपल्या व्यवहाराची नोंद सदर बुकांत केली पाहिजे. अशा इसमानें थकविलेलें कर्ज सावकाराकडून मागणी होतांच एक महिन्याची मुदत देऊन त्याचा जंगम माल जप्त करून विकून देतां येईल. हा अधिकार स्थानिक पंचमंडळास राहील. असा जप्ती करून वसूल करून देण्याचा प्रसंग आल्यास त्याची पत नष्ट करण्याचा अधिकार पंचायतीस राहील.

(७) खाजगी अगर सरकारी नोकरी करणारास त्याच्या एक महिन्याच्या पगाराइतकी रक्कम, त्यास दिल्या जाणाऱ्या पतबुकांत नोंदून दिली जाईल. अशा इसमाकडील बाकी थकल्यास तो जेथें नोकरीस असेल तेथील मालकास अगर

सरकारास त्याच्या दोन महिन्यांच्या पगारांतून कापून घेऊन ती देण्याचा अधिकार राहील.

किरकोळ देवघेवींत लोकांचे व्यवहार सुरळीत चालावे, परंतु त्यांसही मर्यादा असावी व प्रसंगविशेषीं असें घेतलेलें कर्ज वसूल करून देणें पंचायतीस सोपें जावें म्हणून सर्व साधकबाधक गोष्टींचा विचार करून कायद्यांत वरील कलमें घातलीं आहेत. त्यांचे योगानें शेतकऱ्याच्या योग्य त्या गरजा भागविल्या जातील व त्याची पत वाढेल, तो भरमसाट कर्जाच्या तडाक्यांत सांपडणार नाहीं किंवा त्यास उधळपट्टी करून समाजांत दिवाळखोरी निर्माण करतां येणार नाहीं.

(७) कर्ज निश्चित करणें.

सावकार व कूळ यांच्यामधील कर्जबाकीचा प्रश्न पुष्कळ ठिकाणीं वादग्रस्त झाला असल्यामुळें त्या बाबतींत कायद्याचीं कलमें पुढीलप्रमाणें असतील—

(१) सावकार व कूळ यांच्यामधील जुन्या कर्जाचा निवाडा करून नक्की कर्जाचा आंकडा ठरविण्यासाठीं गांवोगांव लवादमंडळें निवडण्यांत येतील. ह्या लवादमंडळांचें काम निर्दोष होण्यासाठीं दर जिल्ह्यास एक वरिष्ठ लवादकोर्ट तात्पुरतें सहा महिने उघडण्यांत येईल. त्या कोर्टाकडे अपील करतां येईल. हें कर्ज निश्चित करण्याचे कामीं पुढील तत्त्वें लागू केलीं जातील.

(२) ज्या सावकारांनीं आजपर्यंत मुद्दलाच्या दुप्पट व्याज घेतलें असेल, त्या सावकारांचें तें सर्व कर्ज फिटलें असें समजून रद्द ठरविण्यांत येईल. याकरितां कुळाकडील पावत्या, सावकारी वह्या, दस्त वगैरे पाहून विचार केला जाईल.

(३) ज्या सावकारांनीं मुद्दलापेक्षां जेवढें व्याज जास्त घेतलें असेल, तेवढी रक्कम फिटली असें समजून मूळ मुद्दलांतून ती कमी केली जाईल.

(४) व्यापारी लोकांच्या खात्यावरील शेतकऱ्यांच्या खातेबाक्या तपासल्या जातील व त्याकरितां मागील १०–१५ वर्षांचे हिशोब पाहून हा आंकडा निश्चित केला जाईल.

(५) हा कर्जाचा आंकडा निश्चित करतांना त्यानें वेळोवेळीं घेतलेला माल (रोकड बहुतेक नसतेच) व रोकड रक्कम ह्यांवर द. सा. द. शेंकडा ९ टक्याचें सरळव्याज हिशोबांत धरलें जाईल.

(६) थकलेल्या व्याजाची रक्कम व मूळ कर्जावरील व्याज हीं प्रथम फेडून घेतलीं जातील. त्याकरितां मूळ कर्ज व त्यावरील थकलेलें व्याज अशीं दोन सदरें घातलीं जातील.

(७) व्यापारी लोकांच्या खात्यावर निघणारी बाकी दामदुपटीपेक्षां जास्त धरली जाणार नाहीं. अशी बाकी कायम ठरवून ती त्याच्या खातीं कर्जबुकांत व सावकारलिस्टांत नोंदण्यांत येईल, व त्याचे हप्ते ठरवून ते व्यापाऱ्यांस वसूल करून दिले जातील.

(८) एखाद्या इसमानें दिवाळें काढण्यापूर्वीं आपली स्थावर प्रापर्टी आपल्या जवळच्या नातलगाच्या किंवा स्नेह्याच्या नांवावर गहाण अगर खरेदी अगर बक्षीस वगैरे करून ठेविली असेल, तर ती जप्त करण्यांत येईल. अशांचीं नांवें सावकारांच्या यादींत घालून सर्वांना हिस्सेरशीप्रमाणें त्याच्या विक्रींतील रकमा दिल्या जातील. असा लबाडीचा व्यवहार मागें १० वर्षांपर्यंतचा देखील पाहण्याचा अधिकार लवादमंडळास राहील.

(९) दिवाळें जाहीर करून आपल्या कर्माचें प्रायश्चित इतरांस भोगावयास लावणाऱ्या व्यक्तीस दोन वर्षेपर्यंत कैदेची शिक्षा सांगण्याचा अधिकार लवादमंडळास व कोर्टास राहील. हा कायदा अमलांत येतांच मागील पांच वर्षांतील दिवाळखोरांचा विचार केला जाईल.

(१०) सर्व गहाण जिनसांच्या रकमांचा हिशोब द. सा. द. शें. ९ दरानें करून गहाण उलगडा करून घ्यावा लागेल. याकरितां कुळानें अशी निघालेली रक्कम भरावी किंवा डागाची किंमत करून वजावाट करावी व येणें-देणें भागवावें.

समाजांतील दिवाळखोरी कमी व्हावी व लोकांचें शील बिघडूं नये, म्हणून हल्लींच्या कायद्यांत कोणत्याही तऱ्हेचें संरक्षण नाहीं. त्यामुळें लबाड लोकांस (व्यापारी, सावकार, सराफ व पेढ्या इत्यादिकांस) कायद्यांतील पळवाटेचा बरोबर फायदा मिळतो. त्यामुळें अशांशीं व्यवहार करणारे हजारों शेतकरी नाहक बुडतात व वरील संभावित दिवाळखोर चोर मात्र उजळ माथ्यानें आपलें भावी आयुष्य ' हात मारलेल्या संपत्तीवर ' सुखानें काढीत असतात. अशा धूर्तांचा बंदोबस्त वरील कायद्यानें होईल.

(८) जुनी कर्जफेड.

(१) सोळा वर्षांवरील सर्व कबजे-गहाणाचे दस्त, त्यांच्या व्याजांत (आजपर्यंत उपभोगिलेल्या उत्पन्नांत) भरपाई झाले असें समजून रद्द ठरविण्यांत येतील व अशा जमिनीचा कबजा सावकाराकडून त्याच्या कुळाकडे ताबडतोब देण्यांत येईल.

(२) आठ वर्षांवरील कबजे गहाणाच्या दस्तांतील मुद्दल रक्कम दरसाल $\frac{१}{८}$ प्रमाणें कमी झाली असें समजून मूळ मुद्दलांतून कमी केली जाईल व बाकीची रक्कम कुळाच्या खातीं कर्जबुकास नोंदली जाईल व अशा जमिनीचा कबजा कुळास लगेंच देण्यांत जाईल.

(३) ज्या कबजेगहाण जमिनी सावकाराकडे २० वर्षांपेक्षां जास्त मुदत असतील, त्या जमिनींच्या बांधबंधाऱ्यांचें नुकसान झालें असल्यास, किंवा तिचा कस कमी झाला असल्यास, किंवा ती जमीन फार वाहात असल्यास तिच्या नुकसानभरपाईचा बोजा कायद्यानें सावकारावर लादला जाईल. हा बोजा ठरविण्याचें काम स्थानिक पंचमंडळ करील. ह्या बोजाची रक्कम तरम--आकाराच्या दुप्पट इतकी दरसाल धरून, त्यानें जितकीं वर्षें जादा भोगिली असेल, त्या प्रमाणांत आकारली जाईल, जास्त आकारली जाणार नाहीं.

(४) तरम आकाराच्या दसपटीपेक्षां जें कर्ज जादा निघेल, तें फेडण्यासाठीं, त्याच्या जमिनीपैकीं जरूर तेवढी जमीन त्याच्या सावकाराच्या नांवें वर्ग करून दिली जाईल.

(५) अशा जमिनीच्या विक्रीची किंमत तरम आकाराच्या ५० ते ७५ पट ठरविण्यांत येईल. ही किंमत नक्की करण्याचें काम गांवच्या स्थानिक पंचायतीकडून होईल.

(६) अशी सावकाराच्या नांवें वर्ग करून दिलेली जमीन तें कूळ जर स्वतः जमीन कसणारें असेल तर त्याच्याकडे कायमची ठेवून देण्यांत येईल. अशा जमिनीचा खंड जास्तींतजास्त तरम आकाराच्या चौप्पट किंवा मूळ रकमेवरील द.सा.द. शें. ६$\frac{१}{४}$ व्याजाइतका कमाल ठरवितां येईल. हा खंड ठरविण्याचें काम स्थानिक पंचमंडळ करील.

(७) हा खंड कुळानें थकविल्यास त्या जमीनीचा लागणलिलाव होऊन दुसऱ्या कुळास ती लागणीस दिली जाईल. मात्र वरील कुळानें ती थकबाकी केव्हांहि भागविल्यास ती जमीन त्याच्याकडे पुनः देण्यांत येईल.

(८) अशा सावकाराकडे वर्ग करून दिलेल्या जमिनीवरील कर्जबाकी, त्यानें २५ वर्षांत केव्हांही भागविल्यास ती जमीन सावकाराच्या खात्याकडून त्याच्या खातीं वर्ग करून देण्यांत येईल व त्या वेळीं खंडाचा हप्ता रद्द ठरविण्यांत येईल. त्या मुदतीपुढें ती जमीन सावकाराकडून काढतां यावयाची नाहीं. अशा जमिनीची विक्री सावकारास करतां येईल, पण घेणारास पूर्वी ठरलेला खंडच मिळत राहील.

(९) अशा जमिनींत जर कांहीं निरंतरच्या (विहिरी, आंब्याचीं झाडें वगैरे) सुधारणा सावकारानें केल्या असतील, तर त्यांची त्या वेळेस होणारी किंमत मागण्याचा सावकारास अधिकार राहील. ही किंमत स्थानिक पंचमंडळ त्या वेळची एकंदर परिस्थिति पाहून ठरवील.

(१०) कोणत्याही कर्जदार इसमास अशी सावकाराच्या नांवें वर्ग करून गेलेली आपली जमीन २५ वर्षांत मूळ रक्कम भरून परत सोडवून घेण्याचा हक्क केव्हांही राहील.

(९) चालू कर्जाची फेड (वसुलीबाब)

(१) कर्जाच्या वसुलीचें काम स्थानिक सरकारी संस्था (पंचायती) करतील. हें काम करण्याचा अधिकार कायद्यानें पंचायतमंडळ्यांस देण्यांत येईल.

(२) कर्जवसुलीसाठीं यापुढें कुळाकडे तगादा करण्याचें काम सावकारास पडणार नाहीं.

(३) कर्जवसुलीचें काम हप्ते बांधून वर्षातून दोन वेळां ठराविक वेळीं सुरू करून १५ दिवसांत उलगडा करून दिला जाईल.

(४) शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारण्यासाठीं घेतलेल्या कर्जाचे दहा हप्ते पाडून, व्याजमुदलासह हप्ते वसूल करून दिले जातील. दरम्यान कुळाची स्थिति सुधारल्यास त्याला पुढील सर्व हप्ते किंवा कांहीं हप्ते भरणा करण्याचा अधिकार राहील. असे भरणा झालेले हप्ते सावकारास लगेच आदा करण्यांत येतील.

(५) पन्नास रुपयांपर्यंतच्या किरकोळ कर्जाचे हप्ते पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येतील:-१० रुपयांपर्यंत एक हप्ता, १० ते २५ रुपयांपर्यंत तीन हप्ते व २५ ते ५० रुपयांपर्यंत पांच हप्ते व पुढें दहा हप्ते करून कर्ज वसूल करून दिलें जाईल.

(६) कर्जाचा वार्षिक हप्ता (व्याजमुद्दलासह) तरम आकाराच्या दीड पटीपेक्षां सहसा जास्त आकारला जाणार नाहीं.

(७) रोगराई, दुष्काळ, जलप्रलय, टोळधाड, युद्ध, भूकंप वगैरे आकस्मिक प्रसंगीं कुळांस कायद्यानें हप्ता व व्याज यास तहकुबी देण्यांत येईल.

(८) असा तहकूब झालेला हप्ता त्याच्या मूळ हप्त्यांत वाढ करून दिला जाईल. मात्र तहकूब झालेलें व्याज पुढीलसालीं वसूल करून दिलें जाईल.

(९) आठ आण्यांपेक्षां पीक कमी आल्यास फक्त हप्त्यास तहकुबी मिळेल. पण ८४ पेक्षां पीक कमी आल्यास हप्त्याबरोबर व्याजास तहकुबी मिळेल.

(१०) लागोपाठ दोन वर्षें दुष्काळाचीं गेल्यास एक वर्षाचें व्याज त्यास सूट म्हणून दिलें जाईल.

(११) घेतलेल्या कर्जास त्याच्या खात्यावरील सर्व जमीनजुमला व घर जबाबदार धरलें जाईल.

(१२) अशा जमिनींतील कांहीं जमीन विकणें झाल्यास, प्रथम त्याच्या खातीं असलेल्या सर्व कर्जाची रक्कम वळित करून, मग त्यास बाकीचे पैसे देण्यांत येतील.

(१३) खरेदी विक्रीचे व्यवहार स्थानिक ठिकाणीं पंचमंडळापुढें केले जातील. त्या वेळीं त्याच्या खात्यावर असलेली कर्जबाकी वसूल करून ती त्याचे सावकारास आदा केली जाईल.

(१४) कर्जाचा हप्ता थकल्यास, तेवढ्या हप्त्यापुरता त्याच्या जमिनीचा जरूर तेवढा भाग लागण-लिलाव करून दुसऱ्यास वर्षअखेर देण्यांत येईल.

(१५) अशी थकलेली रक्कम केव्हांही भरून त्यास आपली जमीन पुढील सालीं आपल्या ताब्यांत घेतां येईल.

(१६) पुढील सालच्या लागणलिलावाची रक्कम सुरवातीस घेऊन ती

सावकारास दिली जाईल.

(१७) सरकारसारा, जमिनीचा खंड अगर कर्जाचा हप्ता थकविल्यास, त्याबद्दल त्याची जमीन कायमची विक्री करून दुसऱ्यास दिली जाणार नाहीं.

(१८) वरील रकमा थकतांच सालअखेरीस (फाल्गुनअखेर—एप्रीलमध्यें) जरूर तेवढी वाटेल ती जमीन लागण—लिलावास काढण्याचा अधिकार कायद्यानें पंचायतीच्या अध्यक्षाला देण्यांत येईल. असे लिलाव वर्ष संपतांच दुसऱ्या दिवशीं (चैत्र शु. २) होतील.

(१९) कोणत्याही खातेदारास योग्य कारणें दाखविल्याशिवाय आपली जमीन अगर घर विक्री करण्याची परवानगी दिली जाणार नाहीं. वरील कारणांत अनुत्पादक व बुडित (धार्मिक कृत्यें, आजारपण वगैरे) कर्जाला गौण स्थान देण्यांत येईल. तथापि परिस्थितीनुरूप त्याही गोष्टीचा साधकबाधक विचार केला जाईल. अशा विक्री केलेल्या रकमेचा विनियोग योग्य कामींच केला किंवा नाहीं तें पाहिलें जाईल. त्यांत लबाडी दिसून आल्यास, बाकीच्या जमिनींतील कांहीं भाग विक्री करण्याचा हक्क पुढें १२ वर्षेपर्यंत रद्द केला जाईल.

(२०) कोणत्याहि खातेदारास आपल्या हयातींत आपल्या जमिनीच्या निम्म्यापेक्षां जास्त जमीन विकतां येणार नाहीं.

(२१) कर्जाचें वसुली व्याज व हप्ते ज्या त्या सावकारास लगेच आदा केले जातील. सरकारी-सारावसुलीचें काम संपतांच हें वसुलीकाम सुरू होईल किंवा दोन्हीही कामें एकदमच सुरू केलीं जातील.

(१०) कर्जावरील व्याजाचा दर.

(१) कर्जदार कुळास द. सा. द शें. ६$\frac{1}{4}$ टक्केप्रमाणें व्याज भरावें लागेल.

(२) या व्याजापैकीं शेंकडा १$\frac{1}{4}$ टक्का व्याज कापून घेऊन बाकीचें ५ टक्के व्याज सावकारास आदा केलें जाईल.

(३) कोणत्याहि परिस्थितींत व्याजाचा दर वाढविला जाणार नाहीं.

(४) तहकूब झालेलें व्याज पुढील सालीं वसूल करून दिलें जाईल.

(५) सावकारी व्याजांतील कापलेला शें. १$\frac{1}{4}$ टक्का व्याज हें सरकारी उत्पन्न समजलें जाईल.

(११) सावकार, जमीनदार व कूळ यांच्या हिताच्या बाबी व खंडवसुली.

(१) सावकारांचे खंड किंवा जमीनदारांचा खंड वसूल करून देण्याचें काम सरकारी संस्था करील. हें काम करण्याचा अधिकार पंचायतमंडळ यास देण्यांत येईल. जमीनदारांचे व सावकारांचे खंड वसूल करून देतांना शें. ३ इतकी फी, वसुलांतून कापून घेतली जाईल. सदर फी हें सरकारी उत्पन्न समजण्यांत येईल.

(२) यापुढें कुळानें भरावयाचे खंड पंचायतीच्या ऑफिसांतच भरले पाहिजेत. सदर रक्कम जमा होतांच ती ज्याची त्यास लगेंच समक्ष अगर पोस्टल म. आ. नें आदा केली जाईल.

(३) यापुढें जमीनदारांना अगर सावकारांना, आपला खंड वसूल करून देण्याची कुळास तसदी लावण्याचें किंवा पंचायतीकडे अर्ज करण्याचें कारण पडणार नाहीं. खंड-रजिस्टरावरून तक्ता तयार करून, हें वसुलाचें काम पंच-मंडळ करील. यापुढें कोणासही आपला खंड वसूल करणेसाठीं मामलेदाराकडे मदती करण्याची जरूरी नाहीं.

(४) खंड ठरविण्याचें काम जमीनदार व कूळ ह्यांनीं आपसांत करावें. अशा खंडाची रक्कम जिराइतांत तरम आकाराच्या चौप्पट व बागाइतांत तरम आकाराच्या पांच ते सातपटीपर्यंत जास्तींतजास्त मागतां येईल. हे कमाल मर्या-देचे आंकडे आहेत. त्याच्या आंत परस्परांच्या विचारानें ठरवावी. तसें आप-सांत न ठरल्यास पंचायतीचा निकाल मान्य करावा लागेल. एकदां खंडाची रक्कम ठरल्यानन्तर त्यांत विशेष सुधारणा केल्याशिवाय (विहिरी खोदणें, कॅनॉ-लचें किंवा धरणाचें पाणी सुरू होणें, फळबागा लावणें, पानमळा करणें वगैरे.) किंवा विशेष परिस्थिति निर्माण झाल्याशिवाय (भावाची महर्घता, फळझाडें बह-रास येणें वगैरे) पंचवीस वर्षेपर्यंत त्यांत बदल होणार नाहीं; व त्या मुदती-पर्यंत त्यांतून कुळास काढतां येणार नाहीं.

(५) जमीन पड पाडणें, त्यांत भयंकर तन माजविणें, बंधाऱ्यांकडे दुर्लक्ष करणें, खत न घालणें, योग्य वेळीं जमिनीची मेहनत न करणें वगैरे विघातक गोष्टी

कुळाकडून होत असल्याबद्दल पंचायतीकडे कळविल्यास पंचमंडळ समक्ष जाऊन त्याचा विचार करील व कुळास ताकीद देईल. त्याचा उपयोग न झाल्यास अशा कुळास पुढचे खेपेस १० रुपयांपर्यंत दंड करण्याचा अधिकार पंचायतीस राहील.

(६) फळबागांचा खंड ठरवितांना तरम आकाराची मर्यादा घातली जाणार नाहीं. तो प्रश्न दोघांच्या परस्पर समजुतीनें मिटवावा. न मिटल्यास पंचायतीचा निकाल मान्य करावा लागेल.

(७) जमिनीच्या बांधबंधाऱ्यांसाठीं जरूर तो खर्च जमीनमालकानें करावा. तसा त्यानें न केल्यास त्याच्या वार्षिक खंडांतून $\frac{1}{4}$ खंड दरसाल कापून घेऊन तो करण्यांत येईल. खर्चाचा आकार पंचमंडळ ठरवील. अशी दुरुस्तीची नोटीस मालकास अगोदर २ महिने दिली जाईल.

(८) भागवांट्यानें दिलेल्या जमिनींतील वाटा मालकानें समक्ष हजर राहून वसूल करून घ्यावा. तो त्यानें न दिल्यास किंवा त्यांत अफरातफर केल्यास पंच मंडळ त्याचा निवाडा करील. या कामीं कुळास जास्तींत जास्त १० रु. दंड करण्याचा किंवा प्रसंगीं त्यास त्यांतून काढून टाकण्याचा अधिकार पंचायतीस राहील.

(९) अशा जमिनीच्या कबुलायतीची मुदत सामान्यतः १२ वर्षांपेक्षां कमी असणार नाहीं.

(१०) अशा जमिनीच्या बांधबंधाऱ्यांचीं कामें जमीनमालकानें न केल्यास त्याच्या भागवांट्यांतील $\frac{1}{4}$ उत्पन्न दरसाल कापून घेण्याचा अधिकार पंचमंडळास राहील. जमीन दुरुस्त होतांच वरील कपात थांबेल.

(११) तसेंच जमीन सुधारणेसाठीं जरूर त्या गोष्टी (खत घालणें, बेणें पुरविणें, मशागतींतील योग्य खर्च देणें वगैरे) जमीनमालकांकडून न झाल्यास त्यांना १० रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार पंचायतीस राहील. याचा हेतु मालकानें चुकारपणा करून किंवा उदासीन राहून आपल्या कुळाचें व आपले जमिनीचें नुकसान करून घेऊं नये.

(१२) अशी दुसऱ्यास खंडानें दिलेली जमीन जेव्हां त्याला घरीं ठेवाव-

याची असेल, तेव्हां ती १० वर्षांनंतर परत मागतां येईल. अशी जमीन मागणें- पूर्वीं एक वर्ष कुळास अगोदर नोटीस द्यावी लागेल. अशा जमिनींत कुळानें फळझाडांची बाग लाविली असल्यास ती मुदत संपेपर्यंत मागतां येणार नाहीं. अशी घेतलेली जमीन पुन्हां देतांना पहिल्या कुळास द्यावी. त्याला नको असल्यास किंवा त्याच्या घरांत कोणी कर्ते नसल्यास सोडचिठी द्यावी व मग दुसऱ्यास लागणीस द्यावी.

(१३) खंडानें दिलेल्या जमिनीचा खंड कुळानें वेळेवर न दिल्यास वर्ष संपतांच ती जमीन दुसऱ्यास लागण-लिलावानें दिली जाईल. अशी दुसऱ्याकडे लागणीस गेलेली जमीन खंडाची थकबाकी केव्हांही भरून पुढील सालीं आपले कबज्यांत घेतां येईल. लागण–लिलावाच्या रकमा लिलाव-तारखेस वसूल करून त्या जमीनदारांस आदा केल्या जातील.

(१४) इष्ट मुदतीपर्यंत कुळाकडून जमिनीचा खंड न थकतां सालोसाल पंचायतीस वसूल करतां आला व त्या मुदतींत सदर जमीन लागणदार कुळानें चांगल्या स्थितींत ठेविली असली, तर मुदतीनंतर पुन्हा त्याच कुळाकडे जमीन लागणीस ठेवण्याची शिफारस पंचायतमंडळ मालकास करील. त्या वेळेस जमीनीचा मगदूर व बाजारभावाची स्थिति लक्षांत घेऊन खंडाच्या रकमेंत फेरफार करतां येतील. ही गोष्ट मालक व कूळ यांच्या परस्पर समजुतीनें व सलोख्यानें व्हावी. हा खंड कमालमर्यादेच्या बाहेर ठेवतां येणार नाहीं. दोघांमधील करार होत नसल्यास पंचमंडळाचा निकाल मान्य करावा लागेल. पंचवीस वर्षांच्या मुदतींत थकबाकी तीन वेळेपेक्षां जास्त असल्यास अशा इसमाबद्दल पंचायतमंडळ शिफारस करणार नाहीं.

(१५) दुष्काळ, अवर्षण, रोगराई, टोळधाड, युद्ध, भूकंप इत्यादि आपद्-प्रसंगीं कुळास खंडाच्या रकमेंत योग्य ती सूट घालण्याचा हक्क सरकारास राहील. त्याबद्दल पंचायत मंडळ्यांनीं अशा इसमाबद्दल वरिष्ठ पंचायत मंडळाकडे शिफारशीचे ठराव केल्यास त्यांवर सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल व कुळास कायद्यानें सूट मिळेल.

(१६) आठ आण्यांपेक्षां पीक कमी आल्यास खंडाच्या रकमेची तीन

हप्त्यांत विभागणी करून, ती पुढील दोन हप्त्यांबरोबर वसूल करून दिली जाईल.

(१७) सहा आण्यांपेक्षां पीक कमी आल्यास खंडाच्या रकमेंत $\frac{1}{2}$ खंडाची सूट मिळेल. पीक चार आण्यांपेक्षां कमी आल्यास खंडाच्या रकमेंत शेंकडा ७५ टक्के सूट घेण्याचा हक्क कुळास राहील. ही आणेवारी वरिष्ठ पंचायतमंडळानें निश्चित करावी.

(१८) जमीनदारास अशा खंडाच्या जमिनींत योग्य त्या सुधारणा केव्हांहि करितां येतील. त्या सुधारणेमुळें जमिनीचें उत्पन्न वाढत आहे असें दिसल्यास पूर्वीच्या खंडांत वाढ करून घेण्याचा हक्क त्यास राहील. मात्र कमाल मर्यादेच्या बाहेर तो वाढविला जाणार नाहीं. अशा सुधारणा ह्या दीर्घकाल टिकणाऱ्या असाव्या लागतील. विहीर काढणें, आंबे, फणस, काजू इत्यादि उपयुक्त झाडें लावणें, संत्रें, मोसंबी, केळीं, पेरू, डाळिंबें इत्यादिकांच्या बागा लावणें, इत्यादि कामीं मालकानें कुळाच्या मदतीनें स्वखर्चानें विशेष गोष्टी करावयाच्या ठरविल्यास त्याच्या हक्कास बाध येणार नाहीं. वरील सुधारणेमुळें कुळाचें हितच होत असल्यामुळें, वाढत्या उत्पन्नाबरोबर वाढता खंड देणें त्यास परवडेल. त्यामुळें मालकासही आपण केलेल्या खर्चावर कांहीं व्याज निघून, आपली मिळकत सुधारतां येईल.

(१९) कुळानें खंडानें लागणीस घेतलेल्या जमिनींत विहिरीशिवाय वरील सुधारणा आपल्या खर्चानें व मेहनतीनें केलेल्या असल्यास त्यांचा उपभोग त्यास त्या मुदतीपर्यंतच घेतां येईल. (२५ वर्षेंपर्यंत.)

(२०) कुळानें आपल्या खर्चानें विहिर काढिली असल्यास खंडाच्या रकमेंत वाढ होऊन मालकास मिळणार नाहीं. मात्र सरकारी व्यवस्थेमुळें अशा जमिनीस धरणाचें पाणी मिळण्याची व्यवस्था झाल्यास, त्या जमिनीचें रूपांतर बागायत जमिनींत होईल व मग त्या परिस्थितीचा फायदा खंडांत योग्य ती वाढ करून मालकास घेतां येईल.

(२१) विहिरीकरितां केलेला खर्च, मालकाच्या संमतीनें व विचारानें केलेला असावा. अशी खर्च झालेली रक्कम दोघांच्या संमतीनें त्या कुळाच्या नांवें

जमा केली जावी. मुदतीअखेर अशी मूळ रक्कम कुळास देऊन त्यावर मालकास हक्क सांगतां येईल. मध्यंतरीं कुळानें आपण होऊन मागितल्यास व ती त्यास दिली गेल्यास, मालकास त्या जमिनीचा खंड वाढवून मागण्याचा हक्क राहील. अशा व्यवस्थेनें मालक व कूळ यांपैकीं कोणासही हातीं घेतलेल्या जमिनींत सुधारणा करतां येतील व उत्पन्नाची वाढ करून दाखवितां येईल. मुदतीनंतर विहिरीचा खर्च मिळेपर्यंत ती जमीन कुळाकडे राहील. पण खंडांत वाढ करून मागतां येईल. वरील व्यवस्थेमुळें जमीनदार व कूळ यांचे संबंध सलोख्याचे व उत्कर्षाचे राहातील. वसूल बाब सरकारनें आपल्या हातीं घेतल्यामुळें दोघांच्या प्रेमांत व सहकार्यांत वितुष्ट उत्पन्न होणार नाहीं. दोघेही कर्तव्यदक्ष राहातील. त्यामुळें राष्ट्रीय उत्पन्न वाढेल.

(१२) टेनन्सी बिलावरील आक्षेप.

कुळाच्या हिताच्या दृष्टीनें कॉंग्रेस सरकारनें हल्लीं टेनन्सी बिल कौन्सिलांत आणिलें आहे. सरकारचा हेतु शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारणें व त्याला शाश्वत संरक्षण देणें असा पवित्र व उदात्त आहे. पण त्या बिलाची घटना पाहतां तो कितीसा साध्य होईल ? त्या बिलानें आपल्या जमीनीवरील आपला हक्क उडविला जात असल्यामुळें जमीनदारवर्ग पूर्ण नाराज व कष्टी झाला आहे, तर जमीन दीर्घकाल कसण्यास मिळेल यापलीकडे कुळास तरी त्यांत दुसऱ्या कोणत्या सवलती मिळाल्या आहेत ? खंडाच्या रकमेची दुधारी तलवार त्याच्या मानेवर मुदतीच्या बाहेर खंड जातांच बसणार असल्यामुळें, ती भीति रात्रंदिवस त्याला बेचैन करीत राहील. ह्या संधीचा फायदा घेऊन कुळाकडून अशा जमिनी कशा निघतील, याचा मालक रात्रंदिवस विचार करीत राहतील व भल्याबुऱ्या वाममार्गांचा वेळींअवेळीं उपयोग करतील. कुळाकडून अशी जमीन केव्हांही स्वतांसाठीं घरीं करण्यास मागण्याचा हक्क मालकास असल्यामुळें मालक केव्हां कुळाच्या काळजास हात घालील याचा नेम नसल्यामुळें तो अशा जमिनींत सुधारणा करणार नाहीं. मग अशा स्थितींत गांवभर जमिनी पदरीं बाळगून त्यास काय उपयोग ? उलट अशा जमिनींचे खंड भागविणें अशक्य होऊन त्यापासून त्या हिरावल्या जातील. जमिनीचे बांधबंधारे दुरुस्त करणें, त्यांत पाण्याची व्यवस्था करून देणें, त्यांतील

पडिक भाग दुरुस्त करणें, झाडांची वचप व मुळ्या काढून टाकणें, घायाळाच्या वचपीपासून पिकाची सोडवणूक करणें, कुंदा-हरळी यांसारखीं बहुवर्षायु तणें खांदून नाहींशीं करणें, ह्या कामीं कोणत्याही प्रकारची जबाबदारी मालकावर ह्या कायद्यानें पडत नसल्यामुळें अशा रुष्ट व उदासीन स्थितींत तो आपली जमीन सुधारणार नाहीं. मग अशा जमिनी पदरीं बाळगून कुळास काय उपयोग ? कुळाची सांपत्तिक स्थिति अगदीं बेताची असते. तो बहुधा कर्जांत रुतलेला असतो. वरील सुधारणा करण्यास त्याला स्वतःचा घाम गाळावा लागेल, कष्ट करकर करून रक्त ओकावें लागेल, आणि इतकें करून मालकास लहर लागतांच दुरुस्त केलेली जमीन त्यास सोडून द्यावी लागेल. आणि त्या वेळेस झालेला खर्च भरून मागण्यासाठीं त्यास न्यायासनाकडे जावें लागेल, आणि त्या वेळेस चांगला वकील मिळविणें हें मोठ्या थैलींचेंच भाग्य असल्यामुळें, जवळ कांहीं असेल नसेल तें आणखी वकिलाच्या व कोर्टाच्या भरतीस घालून बसावें लागेल ! तेव्हां इतकें सव्यापसव्य, मूर्खाशिवाय कोणीही करण्यास धजणार नाहीं! घरचें खाऊन व पदरचें देऊन, लष्करच्या भाकरी भाजण्यापैकींच हा 'उलटा व्यवहार' होणार नाहीं का? मालकाचा कायम हक्क नष्ट होत असतां तो सुधारणा कां व कशी करील ? आणि अशा रुष्ट व दुष्ट स्थितींत शेतकऱ्यांची परिस्थिति कशी सुधारतां येईल ? या भांडणांत तिसऱ्याचा फायदा होईल. जमिनीची धूप थांबविली जाणार नाहीं; खताच्या अभावीं तिचा कस उत्तरोत्तर कमी होत जाईल व बहुवर्षायु तणांचा जोर वाढून जमिनींतील धन तेच खाऊन बसतील ! मग अशा जमिनीचा उपयोग मालकास तरी काय होणार ? ह्या कायद्यानें पुढील १०।१२ वर्षांतच जमिनीचें पूर्णपणें वाटोळें होईल. कूळ व मालक यांचीं भांडणें विकोपास जाऊन कोर्टबाजीस चांगलाच रंग चढेल, आणि त्यांत परिणामीं शेतकरी वर्गच कंगाल व बेकार बनेल ! मग असा कायदा करण्यापासून राष्ट्रीय सरकारनें काय मिळविलें ? स्वतांचें राज्य नाहीं म्हणून रात्रंदिवस दुःखाश्रु गाळणाऱ्या प्रजेस, हातीं सत्ता येऊन तरी पदरांत काय पाडून घेतलें असें दाखवितां येईल ? सरकारचा हेतु स्तुत्य आहे, पण त्यांचे मार्ग चुकीचे आहेत. शेतकरी व जमीनदार यांच्या मनःस्थितींचें त्यांना बरोबर आकलन झालेलें दिसत नाहीं. मनुष्यस्वभावाचें यांत बरोबर परीक्षण केलेलें

दिसत नाहीं. म्हणून काँग्रेस प्रधानमंडळांनीं हें बील मागें घेऊन त्याऐवजीं वरील सुधारणेचा मसुदा कौन्सिलपुढें ठेवून पास करून घ्यावा. तरच काँग्रेस ही बहुजन अशा शेतकऱ्यांची वाली आहे असें ठरेल व तिचा लौकिक वाढेल.

शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा.

भाग २ रा,

परिस्थितीचें निरीक्षण.

कर्जाची देवघेव व जमीनदारांचे खंड यांची व्यवस्था कशी लावावी हें मागील भागांत विशद करून सांगितलें आहे. या भागांत स्थावर मिळकतीचे फेरफारासंबंधीं महत्वाचा भाग कायद्यांत कोणता असावा व ती घटना खेडें-गांवच्या वातावरणांत सुलभतेनें अमलांत आणण्याजोगी सोपी, स्पष्ट व सुटसुटीत कशी असावी; त्यांतील गुंतागुंतीच्या घोटाळ्यांचें मुळांतच कसें निर्मूलन केलेलें असावें वगैरे महत्वाच्या बाबी लक्षांत घेऊन ह्या कायद्याची घटना केली आहे. स्थावर मिळकतीचे फेरफारासंबंधीं व्यवस्था करण्याकरितां सरकारनें दर तालुक्यास रजिस्टर कचेऱ्या उघडलेल्या आहेत, त्या ठिकाणीं जमीनमालकास व त्याच्याशीं संबंध येणाऱ्या इतर माणसांस जावें लागतें; रेकार्ड ऑफ राइटचे उतारे बरोबर न्यावे लागतात; स्टँप व रजिस्ट्रेशन फी भरावी लागते; ओळख घालणारास पैसे द्यावे लागतात; भाड्यातोड्याचा खर्च करावा लागतो; हॉटेलें, खाणावळी यांचीं बिलें भरावीं लागतात; चहापाणी, दारू वगैरे कामी खर्च करणें ' शिष्टाचार ' म्हणून भाग पडतें; याशिवाय रजिस्ट्रारसाहेब, हाताखालचे कारकून, ओळख घालणारे पाटील-तलाठी, यांची गुप्त संभावना करण्याचें कटु कर्तव्य ' व्यवहारधर्म ' म्हणून पाळावें लागतें ! या कामीं लांच घेऊं नये म्हणून कितीही कडक कायदे केले तरी मूळ दुःख कमी होणार नाहीं. फक्त त्याची तीव्रता कमी केली जाईल. राजरोसपणा जाऊन त्याऐवजीं आडपडद्याचे मार्ग अनुसरले जातील. या व्यवहाराशीं संबंध येणाऱ्या सर्व तिऱ्हाइतांचा हेतु आपले हात ओले करून घेणें हाच प्रायः असल्यामुळें, त्यांचें सहमत होऊन गरजू मनुष्य बरोबर

नाडला जातो. याचा दोष व्यक्तीकडे नसून उत्पन्न केलेल्या परिस्थितीकडेच शेंकडा ९० टक्के जातो. याचा कोणीही विचार केलेला दिसत नाहीं. यामुळें केलेल्या सुधारणा ह्या वरवरच्या मलमपट्ट्यांप्रमाणें होतात. जखमेवर बांधलेल्या मलमपट्ट्यांनीं जखमेचें भीषण स्वरूप झांकलें जाऊन, आजाऱ्यास थोडें मनस्वास्थ्य लाभतें, पण पू होण्याची क्रिया थांबविल्याशिवाय जखम बरी होत नाहीं. त्याप्रमाणें लांचनिर्बंधाच्या कडक कायद्यानें ह्या व्यवहारांतील राजरोसपणा व ताठरपणा कमी होईल; मालकाच्या मनोधर्माशीं जुळतें घेण्याचा प्रयत्न होईल; बेपर्वाईची भाषा कमी होऊन वाणींतून साखर पेरलेली गोड मोहक भाषा निघेल, व ती आपलें ' खाबूपणाचें ' कार्य बरोबर करून घेईल. तत्त्व तेंच, पण मार्ग बदलतील; एवढाच ' दगडापेक्षां वीट मऊ ' असा प्रकार घडून येईल, पण मूळ दुःख कमी होणार नाहीं. बरें, ह्या खाबूपणावर नियंत्रण घालतां आलें तरी बाकीचे इतर खर्च कसे कमी करतां येतील ? रेल्वे व मोटारी ह्यांतील प्रवास कसे मोफत होतील ? बरोबर नेलेल्या मंडळींचें तोंड गोड करण्याच्या ' शिष्टाचारापासून ' त्यास कसें परावृत्त करितां येईल ? रजिस्ट्रेशन फी, स्टँप, नोंदणावळ व दस्त पाठविण्याचा पोस्टाकडील रजिस्टर खर्च, हा त्यास कसा माफ करितां येईल ? मग हें सर्व शाबूत ठेवून फक्त कचेरींतील व्यवहारांत कितीही ' सोवळेपणा ' उत्पन्न केला तरी त्यांतील पावित्र्य दिखाऊ ठरेल ! दुःखाचा सूर पालटेल, पण रडें थांबणार नाहीं ! तें कसें थांबावें ? रेकॉर्ड ऑफ राइटच्या नकला काढण्यापासून, तों रक्कम पदरांत पाडून घेईपर्यंत, त्याला दुसऱ्याच्याच हातानें जेवण्याचा प्रसंग येतो. लोकांनीं आपलीं हातांतील कामें बाजूस ठेवून, त्याच्या कामासाठीं फुकट धावाधांव कां करावी ? हल्लींचा काळच असा आहे कीं, कोणी कोणाचा फुकट कांटा काढीत नाहीं ! मालकास उताऱ्याची घाई आहे म्हणून तलाठ्यानें आपल्या हातांतलें सरकारी काम बाजूस ठेवून त्यास ताबडतोब उतारे काय म्हणून करून द्यावेत ? तसें त्यावर काय बंधन आहे ? आणि घालून तरी तें कसें पाळलें जाईल ? जमिनीचा मालक व रजिस्ट्रार ह्या उभयतांस पुरा ' ओळखणारा ' पाटील व तलाठी ह्यांनीं ह्या ओळखीसाठीं आपलें हातांतील काम बाजूस सारून, त्याचेबरोबर तालुक्याचे ठिकाणीं फुकट कां जावें ? त्यानें गेलें पाहिजे, असें त्यावर कांहीं बंधन आहे काय ? त्या वेळचा भाडेंखर्च त्यानें कां

करावा ? भुकेच्या वेळीं, त्यानें चहापाणी मिळण्याची सदिच्छा प्रगट केली तर ती वावगी ठरेल का ? बरें, रजिस्ट्रारनें तरी अशा अनोळखी माणसाबरोबर व्यवहार कसा करावा ? त्यांत फसगत झाल्यास त्याची नालायकी सिद्ध होणार नाहीं का ? म्हणून त्यानें पाटीलतलाठ्यांवर ओळखीसाठीं कां विसबूं नये ? या व्यवहारांत ' व्यवहाराच्या सुलभतेसाठीं ' त्यानें पाटीलतलाठ्यांस सहभागीदार बनविलें तर तें व्यवहारास सोडून होईल का ? दस्तनोंदणीसाठीं रजिस्टर-कचेरींत भरलेल्या बाजारांत, आपली वर्दी अगोदर लागावी म्हणून प्रत्येकजण प्रयत्न करूं लागल्यास तो वावगा ठरेल का ? रजिस्ट्रारनें तरी ह्या घाईत, असा प्रत्येकाचा ' कानमंत्र ' फुकटाफुकट कां ऐकावा ? दस्त नोंदणें हें जरी त्याचें कर्तव्य असलें, तरी त्यानें ऑफिस-टाईमबाहेर, आंतल्या सर्व लोकांचे दस्त, रात्रीचा दिवस करून, रात्रीं १० वाजेपर्यंत रजिस्टर कचेरींत बसून कां करावे ? बरें, कुळानें तरी घाई कां करूं नये ? सर्व लवाजम्यानिशीं तो परक्या ठिकाणीं आलेला असतो. त्या दिवशीं काम न झाल्यास ह्या लोकांची ' बडदास्त ' ठेवतां ठेवतां त्याच्या नाकीं नव येऊन जातात. फुकटचें पाणी देखील त्याला महाग होतें ! तें पिण्यासाठीं हॉटेलांत जाऊन त्याला दोन पैशाचें घेऊन खावें लागतें ! इतका व्यवहार बिकट झालेला असतो. ' घर सोडलें म्हणजे आंगण पारखें होतें ' म्हणतात तें असें ! ह्याचा अनुभव तो पुरेपूर घेत असतो ! त्यांत व्यवहार जमिनीच्या खरेदीचे, बक्षीसपत्राचे, किंवा दत्तकपत्राचे असले म्हणजे तर दस्त होऊन जाईपर्यंत त्याच्या जिवांत जीव नसतो ! ऐन वेळीं कोणी दुधांत मिठाचा खडा टाकला, तर सर्व व्यवहार नासून जावयाचा ही भीति त्याच्या पोटांत सारखी धस्स करीत असते ! ' शुभस्य शीघ्रं, अशुभस्य कालहरणं ' या तत्त्वाप्रमाणें ह्या भरलेल्या बाजारांत जो तो तत्वास गांठ घालण्यासाठीं सारखा धडपडत असतो ! न जाणों, वेळ लागल्यास जमवून आणलेली शिकार हातची जावयाची ! बरें, इंग्रजी राज्यांतील हा रजिस्ट्रार तरी सहस्रार्जुनी आहे ? म्हणून त्यानें हें काम लगेंच उरकावें ! तो बिचारा इतरांसारखाच दोन हातांचा पडला ! तो आपल्याकडून शिकस्त करतो. पण त्यानें तरी काय करावें ? तालुक्याच्या छप्पन गांवांतून येणाऱ्या भक्तांना तुम्ही एकदम येऊं नका असें त्यानें कसें सांगावें ? त्याबद्दल कोणत्याही राज्ययंत्रास तरी कसे नियम करतां येतील ?

वाचकहो ! ह्या परिस्थितीच्या चक्रांत सांपडलेल्या बिचाऱ्या शेतकऱ्यानें अशा वेळीं काय करावें तें तुम्हीच सांगा. मार्ग सुचवा ! यंत्राच्या प्रत्येक दात्यास भरपूर ओंगण केल्याशिवाय तें यंत्र कसें चालेल ? यंत्राच्या दात्याचा करकर आवाज होऊं नये म्हणून त्यास ओंगण न देतां तें सुरळीत चालावें अशी कांहीं 'किमया' तुम्हांस सांपडली आहे का ? प्रधानमंडळाजवळ अशी कांहीं 'जादू' आहे का ? दिसत नाहीं. आणि त्यामुळेंच आज शेतकरी समाज दर-रोज हजारों रुपयांस बुडत आहे. त्यांतून त्यास तुम्ही कसे वांचविणार ? वांच-विण्यास मार्ग दिसत नाहीं म्हणून, त्यास ह्या 'डोहांत' बुडूं देणार काय ? हातीं सत्ता आल्यावर जर ह्यांत सुधारणा करतां येत नसेल, तर त्या सत्तेसाठीं एवढी धडपड कां ? सत्याग्रह कां ? कायदेभंग कां ? आणि जिवाचा 'तुरुंग' तरी का ?

या इलाख्यांतील रजिस्ट्रेशनचें उत्पन्न दरसाल १५ लाख रुपयांचें आहे. वरील सर्व खर्चांचा हिशेब केल्यास, शेतकरी समाज याच्या ५।६ पट तरी रक-मेस बुडत असेल, असा अंदाज केल्यास तो चुकीचा ठरेल का ? प्रत्येकानें आपला अनुभव ताडून पाहिल्यास माझ्या म्हणण्याची कल्पना त्याला बरोबर येईल. हा खर्च तरम आकाराच्या $\frac{1}{3}$ इतका होतो. तेव्हां हा प्रश्न शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा ठरत नाहीं कां ? जर ठरत असेल, आणि 'शेतकरी तारावा' असें मनापासून वाटत असेल, तर उपाय हे शोधलेच पाहिजेत. नाहींतर 'ऋण-विमोचन' हा कोशांतील शब्द ठरेल ! तो व्यवहाराच्या भूमिकेवर कधींच अवतरणार नाहीं ! म्हणून विचार करा आणि इतरांस करावयास लावा, म्हणजे मार्ग दिसूं लागतील.

अनंत अंतराळांतून पक्ष्यांप्रमाणें घिरट्या घालतां येण्यासाठीं ज्या मानवी बुद्धींतून 'विमान' निर्माण झालें, हजारों मैलांचें अंतर निमिषार्धांत तोडून, निसर्गावर मात करून, प्रेमी जनांचे संदेश एकमेकांना कळण्यासाठीं ज्या बुद्धींतून बिनतारी तारायंत्र, रेडियो निर्माण झाला; शेंकडों खंडी गोण्या पाठीवर लादून घेऊन भरधांव वेगानें धावणारी आगगाडी, ज्या मानवी बुद्धीनें पाण्याच्या वाफेवर चालू केली, त्या मानवी बुद्धीस हा पेंच उलगडतां येणार नाहीं का ?

येईल ! खास येईल ! हा रजिस्टर कचेरींत मांडलेला सर्व पट गुंडाळून ठेवा, आणि आपआपल्या खेडेगांवांत चला. पंचायतीच्या ऑफिसांत जमा ! मी तुमचा व्यवहार बरोबर करून देतों. यासाठीं पुढील योजना वाचा, म्हणजे तुम्हांला याची बरोबर किल्ली सांपडलेली दिसेल !

पंचायतीचे सभासद हे त्यांचे ग्रामबंधु असतील. त्यांचीं आढीं यांच्या आढ्यांशीं मिळालेलीं असतील. त्यांचे आणि इतरांचे संबंध हे एकच असतील. लोकांच्या मतदानाच्या मेहरबानीवर त्यांची बैठक मांडलेली असेल ! अशा लोकांना दुखवून त्यांच्यापासून लांच खाण्याची इच्छा करणें म्हणजे जळांत राहून माशाशीं वैर करणें आहे, ह्याची त्यांना पुरेपूर कल्पना आलेली असेल. आपलें आसन स्थिर राखण्यासाठीं, अन्यायाचा निखारा त्यांना मांडीखालतीं घालतां येणार नाहीं ! पंचायतीच्या सेक्रेटरीस हक्कनोंदणी बुक, कर्जबुक, सावकारलिस्ट, वंशावळ बुक यांतील पानें उघडीं ठेवून, छापील फार्मांत अगदीं जरूर ठेवढी माहिती भरणें अवघड जाणार नाहीं. व त्याच्या नोंदी वरील बुकांत करणें सोपें जाईल. कधीं तरी चारदोन दिवसांनीं असा एखादा व्यवहार निघेल, त्या वेळेस ' वेळ नाहीं ' असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक दस्ताचे छापील फार्म दप्तरीं ठेवावयाचे असल्यामुळें, त्याची निराळी नोंद करीत बसण्यांत वेळेचा अपव्यय करावा लागणार नाहीं. ' ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी ' असल्यामुळें ओळखीचें नाटक करण्याचा प्रसंग येणार नाहीं. पंचायतीच्या ऑफिसांत अशा वेळीं, शेजारीपाजारी, आप्तस्वकीय जमत असल्यामुळें व्यवहार उघडा आणि उजळमाथ्याचा होऊन लबाडीस अवसर राहणार नाहीं ! लांच खाणें हें पाप आहे, अशी मनोभूमिका निर्माण होईल. पंचायतीचे सभासद हे मतदानामुळें ' उपकृत ' झालेले असतील ! उपकृत हा उपकारकर्त्यांजवळ लांच कशी खाईल ? मानवी स्वभावांतील ' कृतज्ञताबुद्धि ' लक्षांत घेतल्यास हा लांचलुचपतीचा राक्षस खेडेगांवांतील पंचायतीच्या ऑफिसांत गाडलेला दिसेल ! त्याच्या चौथऱ्यावर पंचाचें आसन अधिष्ठित झालेलें दिसेल ! घराच्या उंबरठ्यावर उभे राहून पंचायतीचें ऑफिस नजरेच्या टप्प्यांत दिसूं लागेल ! मग तेथपर्यंत पायघड्या घालण्याची यातायात त्यास करावी लागेल का !

बिचाऱ्या रेल्वे, मोटारी, टांगे, हॉटेलें, खाणावळी, गुत्ते, रजिस्टरकचेऱ्या, फेरीवाले, व्यापारी पेठा इकडे मात्र शुकशुकाट दिसेल ! हा बहिष्कार, हरताळ त्यांना जाणवेल; त्यांच्या पोटावर पाय आलेले दिसतील ! त्यांचे व्यवहार पूर्ववत् चालावेत म्हणून शेतकऱ्यांनीं आपल्या घरादारावर ' निखारा ' ठेवावा अशी कोणी अपेक्षा करील का ? म्हणून त्यांचा विचार करण्याचें सोडून देऊन आपण ही बहुलाभदायी घटना समजून घेऊं या !

या घटनेंत स्थावरजंगम मिळकतीचें खरेदीपत्र, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, दत्तकपत्र, भाडेपट्टे, मुखत्यारपत्रें, वारसाहक्क इत्यादि बाबींचा समावेश होतो. तसेंच पंचायतींची निवडणूक व कार्यक्षेत्र, त्यांची लायकी, कामें वगैरे गोष्टींचाही यांत प्रामुख्यानें समावेश होतो. म्हणून या बाबीसंबंधीं पुढीलप्रमाणें नियम करण्यांत येत आहेत—

(१) खरेदीपत्र.

(१) खरेदीपत्राच्या नोंदी गांवींच पंचायतीच्या ऑफिसांत होतील.

(२) खरेदी देणारा व घेणारा ह्यांच्या सह्या एका छापील फॉर्मवर घेण्यांत येतील. ह्या फॉर्मांत मिळकतीचें वर्णन व खरेदीची रक्कम दाखल केली जाईल. तसेंच जमीन खरेदी देण्याचें कारण नमूद केलें जाईल. बाकीचा सर्व मजकूर छापील असेल.

(३) जमीन दुसऱ्यास विकण्यापूर्वीं, पंचायतीकडून विक्रीला मान्यता घ्यावी लागेल. ही अट घालण्याचा हेतु, कोणाही मूर्ख व उधळ्या किंवा छांदिष्ट माणसास आपली इस्टेट उडवितां येऊं नये. त्यावर समाजाचें नियंत्रण असावें. योग्य कारणासाठीं कोणासही आपली स्थावर मिळकत विकण्यास प्रत्यवाय नाहीं.

(४) ही मान्यता मिळविण्यासाठीं, मान्यतेचा छापील फार्म भरून द्यावा लागेल व त्यावर कोणाहि सभ्य प्रतिष्ठित माणसाची, त्यांत नमूद केलेल्या कारणाची खात्री असल्याबद्दल सही घेतलेली असेल. हा फार्म म्हणजे एक प्रतिज्ञापत्रच समजलें जाईल. त्या मान्यतापत्रकावरच पंचायतीच्या ' परवानगीचा ' शिक्कामोर्तब होईल. त्याकरितां त्यास कोणताहि खर्च पडणार नाहीं.

(५) खरेदी देणारा व घेणारा या प्रत्येकाकडून फक्त एक रुपया फी

घेतली जाईल. त्याबद्दल त्यांना छापील पावत्या मिळतील. खरेदीची रक्कम कितीहि असली तरी फीमध्यें वाढ होणार नाहीं.

(६) हें काम पंचायतीचा अध्यक्ष व निदान एक तरी सभासद यांच्या समोर होईल. त्या छापील खरेदीपत्राच्या फार्मवर त्यांच्या सह्या घेतल्या जातील. लेखी काम सेक्रेटरी करील. रक्कम मोजून देणें व त्यावर शिक्कामोर्तब करणें हें काम अध्यक्ष करील.

(७) त्या कामीं कोणाहि व्यक्तीस लांच घेण्याची किंवा देण्याची सक्त मनाई आहे, अशा अर्थाचा बोर्ड पंचायतीच्या ऑफिसांत मोठ्या अक्षरांत लाविला जाईल. त्याविरुद्ध वर्तन झाल्याचें सिद्ध होतांच पंचायतीचा अध्यक्ष, सभासद व सेक्रेटरी यांना बेमुदत बडतर्फ करण्यांत येईल.

(८) हक्क नोंदणीच्या बुकांत केलेले फरक कर्जबुक व सावकार लिस्ट यांत नोंदण्यांत येतील.

(९) जमिनीची विक्री होतांच, त्याच्या खात्यावरील कर्जाची सर्व बाकी प्रथम कापून घेतली जाईल व बाकीची रक्कम त्यास आदा केली जाईल.

(१०) अशा व्यवहाराची नोंद कर्जबुकास ताबडतोब होईल. त्याबद्दल कुळास लगेच पावती मिळेल. अशा वसूल झालेल्या रकमा सावकारांस ताबडतोब आदा केल्या जातील व त्यांची नोंद सावकारलिस्ट व त्यांचे जवळील 'कॅशबुक' यास करण्यात येईल.

(२) बक्षिसपत्र

(१) औरस अगर दत्तक संततीचा वंश नसल्यास, कोणासही आपली स्थावरजंगम मिळकत दुसऱ्यास बक्षीस अगर धर्मादाय करून देतां येईल.

(२) बक्षिसपत्राच्या छापील फार्मात मिळकतीचें वर्णन लिहून त्यावर दोघांच्या सह्या घेतल्या जातील.

(३) बक्षिसपत्र करून घेणाराकडून पांच रुपये फी घेण्यांत येईल.

(४) बक्षिसपत्राच्या फॉर्मवर पंचायतीचे सभासद व अध्यक्ष यांच्या सह्या घेतल्या जातील व त्या बक्षिसपत्राची नोंद जरूर त्या कागदपत्रास करण्यांत येईल. बक्षिसपत्राच्या वेळीं अध्यक्षासह निदान तीन सभासद तरी हजर

असावे लागतील.

(५) निष्कर्जी खातेदारासच आपल्या मिळकतीचें बक्षिसपत्र करून देतां येईल. बक्षिसपत्रापूर्वी खात्यावरील सर्व बाकी भरली पाहिजे.

(६) एकदां बक्षिसपत्र करून दिल्यावर त्यांत फरक होणर नाहीं. मात्र जर त्यांत लिहिलेल्या अटी पाळण्यांत आल्या नाहींत, तर त्यांसंबंधीं त्यांत हात घालतां येईल. बक्षिसपत्र करून देण्यापूर्वी त्यास तो अधिकार आहे अशी खात्री करून घेऊन मग संमति दिली जाईल.

(३) वारसा-हक्काच्या नोंदी

(१) एकत्र कुटुम्बांतील व्यक्तीस, सज्ञान झालेवर, विभक्त राहणें झाल्यास आपला हिस्सा तोडून मागतां येईल.

(२) हें वाऱ्याचें काम आपसांत मिटत नसल्यास, पंचायतीचा निकाल मान्य करावा लागेल. पंचायतीनें अशा वाटण्या समान कराव्यात. आणि त्या चिठ्यांवर लिहून, बंद करून, लहान मुलांकडून उचलाव्यात; व त्या क्रमानें (वयोमानाप्रमाणें) द्याव्यात.

(३) वाट्याची नोंद जरूर त्या बुकास लगेच करण्यांत यावी. वाट्याची माहिती छापील फार्मांत भरून त्यावर सर्वांच्या सह्या घ्याव्यात व कर्ज सर्वांच्या हिश्शावर सारखें नोंदावें.

(४) मुलाच्या पश्चात् सासूसुनांत पटत नसल्यास, त्यांना आपले हिस्से समसमान वांटून घेतां येतील. अशी इस्टेट विक्री करतां येणार नाहीं; त्यांवर कर्ज काढतां येईल.

(५) बापाच्या हयातींत मुलांना विभक्त राहाणें झाल्यास, सर्वांचे समान हिस्से पडतील. मात्र त्यानें स्वतः जी मिळकत मिळविली असेल, ती त्याच्या पश्चात् अशा विभक्त मुलांना आपसांत वाटून घेतां येईल.

(६) परघराण्यांत इस्टेट जेव्हां वारसाहक्कानें जाईल, तेव्हां सरकार त्यावर स्वतः चौकशी करून वारस ठरवील.

(७) वारसाहक्क ठरविण्यास सोपें जावें म्हणून सरकार प्रत्येक गांवास वंशावळबुक ठेवील. या बुकांत प्रत्येक खातेदाराची जरूर तेवढी वंशावळ लिहिली

जाईल, व त्यांत वेळोवेळीं होणारे फेरफार नमूद होतील.

(८) वारसाहक्क ठरविण्याचें काम सरकार स्वतः करील व या कामीं वारसदाराकडून ५ रु. फी घेतली जाईल. हें काम वरिष्ठ पंचायत मंडळ करील. या कामीं लागणारी जरूर ती माहिती पंचायतींनीं कळवावी.

(९) वारसाहक्काच्या नोंदी व त्यावरील बोजे जरूर त्या पत्रकास दाखल केले जातील.

(१०) कोणतेंहि वाटप करून देण्याचें काम पंचायतीकडे आणल्यास वाटून मागणारानें एक रुपया फी भरली पाहिजे.

वारसाहक्कसंबंधांत मूळ पुरुषाचा वंश चालावा म्हणून, औरस संतति नसेल त्या वेळीं दत्तक घेण्याचा प्रघात आहे. या कामीं समाजांत बरीच भानगड पिकते. त्या कामीं दत्तक घेणारी बाई असल्यास उपद्व्यापी व चळवळ्या माणसांचें चांगलें फावतें. म्हणून या कामीं कायद्याचीं कलमें पुढीलप्रमाणें असतील.

(४) दत्तकपत्र.

(१) दत्तक घेणारी बाई विधवा असून एकत्र कुटुंबांत राहणारी असेल तरी तिला दत्तक घेतां येईल.

(२) अशा दत्तकाकडे तिच्या नवऱ्याचा हिस्सा समाईक कुटुंबांत जो पडत असेल, तो तिच्याकडे वर्ग करून देण्यांत येईल व त्याबरोबर समाईक कर्जाचा बोजा विभागून दिला जाईल. मूळ इस्टेटीचे असे समान हिस्से ठरवून ते निरनिराळ्या चिठ्यांवर लिहिले जातील. अशा चिठ्यांपैकीं कोणतीहि चिठी मुलाकडून उचलून घ्यावी व त्यांत लिहिलेला हिस्सा तिचे खातीं नमूद करावा. या योजनेनें पक्षपातबुद्धीचा आरोप कोणास करतां येणार नाहीं. कोणत्याही वाटपास हीच पद्धत उपयोगांत आणिली जाईल.

(३) विभक्त कुटुंबांतील विधवेस वरील अडचण पडणार नाहीं.

(४) एकत्र कुटुंबांतील ज्या विधवेस निराळें राहावयाचें असेल, तिला तिचा हिस्सा तोडून मागतां येईल. असा हिस्सा समाईक कुटुंबांत तिच्या नवऱ्याचा जो बसत असेल, तो, तिला सावकारी बोजासह, वांटून दिला जाईल. याकरितां तिनें पंचायतीकडे छापील अर्ज भरून दिल्यास पंचमंडळ हें काम

करील व त्याच्या नोंदी लगेच जरूर त्या कागदपत्रास होतील.

(५) असा विभागून दिलेला हिस्सा तिला उपभोगितां येईल, पण विक्री करतां येणार नाहीं. दत्तक घेतल्यास हा हक्क त्याच्याकडे येईल.

(६) अशा बाईस मुली असतील तर तो हिस्सा वारसाहक्कानें त्यांच्याकडे विभागून दिला जाईल.

(७) दत्तकपत्राच्या नोंदीस ५ रुपये फी घेतली जाईल, व हें काम गांवांतील पंचायतीच्या ऑफिसांत होईल.

(८) दत्तकपत्राचा मजकूर छापील फार्ममध्यें भरला जाईल; ह्या फार्मांत मिळकतीचें वर्णन नमूद केलें जाईल. फार्मवर दत्तक देणारा व घेणारा यांच्या सह्या घेतल्या जातील.

(९) दत्तक देण्याघेण्याचें काम तो ज्या गांवीं राहात असेल त्या गांवींच पंचांसमक्ष व्हावयास पाहिजे. दत्तकपत्रावर पंचांच्या सह्या लागतील. दत्तकविधानास फोटोची जरूरी नाहीं. तो हौसेचा प्रकार समजला जाईल.

(१०) दत्तकविधान होतांच लगेच त्या दिवशीं दत्तकपत्राची नोंद जरूर त्या बुकास करण्यांत येईल व त्यांत दत्तकाचें नांव दाखल होईल.

(११) ही नोंद झाल्यावर त्यांत फरक होणार नाहीं.

(१२) दत्तकाचें व बाईचें न पटल्यास इस्टेटीचा $\frac{1}{3}$ हिस्सा तिच्या उपजीविकेसाठीं तोडून मागतां येईल. हा हिस्सा तिला विकतां येणार नाहीं. जरूरीच्या प्रसंगीं त्याच्यावर कर्ज काढतां येईल. हें वाटपाचें काम पंचायतीकडे आल्यास ती तें करून देईल.

(१३) दत्तक बापाचें व मुलाचें न पटल्यास त्यांना निमानिम हिस्सा, कर्जाच्या बोजासह विभागून मिळेल. हें वाटपाचें काम पंचमंडळ करील.

(१४) हा वाटून घेतलेला हिस्सा बापास विकतां येणार नाहीं. प्रसंगीं त्यावर कर्ज काढतां येईल.

(१५) दत्तक देण्यास आई किंवा बाप ह्यांपैकीं कोणीही चालेल.

(१६) नवऱ्यानें ठरविलेला किंवा इच्छा प्रगट केलेलाच दत्तक त्याच्या माघारीं बाईस घ्यावा लागेल. तशी इच्छा प्रगट केली नसल्यास तिला आपल्या

मर्जीप्रमाणें योग्य तो दत्तक घेतां येईल.

(१७) दत्तक घेण्यापूर्वीं, घेणाराची मनःस्थिति व प्रकृति चांगली आहे अशी प्रथम पंचायतीची खात्री पटविली पाहिजे. अशा इसमानें आपणास अमुक मनुष्य दत्तक घ्यावयाचा आहे, असें लेखी अगर तोंडी पंचांला सांगितलें पाहिजे. असा प्रसंग आजारीपणांतच उत्पन्न होईल. त्या वेळेस लबाडी होण्याचा पुष्कळ संभव असतो. आजारी बेशुद्ध स्थितींत आहे, असें पाहून कांहीं लबाड लोक त्याचा आंगठा यादीवर उठवून घेतात; व मग भांडणास प्रारंभ होतो. या कामीं पंचांनीं आपली खात्री करून घेतल्याशिवाय अशा दत्तविधानास संमति देतां कामा नये.

(१८) यापुढें पोटगीचा प्रश्न उत्पन्न होणार नाहीं व पोटगी मिळविण्यासाठीं फिर्यादीची जरूरी राहाणार नाहीं. पंचायतीकडे हिस्सा तोडून मागण्याचा अर्ज येतांच हें वाटप करून देण्यांत येईल.

(१९) दत्तक सजातीय व सगोत्री किंवा गोत्रास जुळेल अशा गोत्राचा असावा. धर्मशास्त्रानें निषिद्ध ठरविलेला दत्तक घेतां येणार नाहीं. दत्तक घेण्यापूर्वीं, तो घेतां येतो अशी पंचांनीं आपली खात्री करून घेतल्याशिवाय परवानगी देतां कामा नये किंवा असें दत्तकपत्र नोंदू नये. नोंदल्यास तें रद्द ठरविण्याचा अधिकार वरिष्ठ पंचायतीस राहील.

(२०) निरनिराळ्या धर्मशास्त्राचा निर्णय घेऊन, दत्तक कोणास घेतां येईल, त्याची यादी पंचायतीच्या आफिसांत छापून लावण्यांत येईल.

(५) मृत्युपत्र

(१) कोणाहि इसमास अगर स्त्रीस आपल्या मिळकतीचें मृत्युपत्र करून ठेवितां येईल. मृत्युपत्राच्या वेळीं पंचायतीचे सभासद हजर पाहिजेत. मृत्युपत्र करून देणारी बाई अगर पुरुष हीं मजकूर सांगण्याच्या मनःस्थितींत असल्याशिवाय मृत्युपत्र होणार नाहीं. अशी व्यक्ति पराठिकाणीं जाऊन आजारी पडल्यास तेथील पंचायतीपुढें असें मृत्युपत्र करून ठेवितां येईल.

(२) मृत्युपत्राच्या नोंदीस ५ रुपये फी पडेल. तें सरकारी छापील फार्मांत भरलें पाहिजे. त्यावरील बोजासह मिळकत नोंदली जाईल. त्यावर पंचायतीच्या

सह्या लागतील.

(३) मृत्युपत्राची नोंद, जरूर त्या कागदास आठ दिवसांत झाली पाहिजे.

(६) भाडेपट्टे, मुखत्यारपत्रें इत्यादि.

(१) मालक व कूळ यांच्यामधील करार छापील फार्मवर लिहिला जाईल. यांत मिळकतीचें वर्णन, खंडाची रक्कम, मुदत व प्रकार यांची नोंद होईल.

(२) या फार्मवर उभयतांच्या सह्या लागतील. हें काम पंचायतीच्या आफिसांत, पंचांसमोर व्हावयास पाहिजे.

(३) या कबुलायतीची नोंद दोघांच्या खात्यांस केली जाईल. त्याकरितां स्वतंत्र ' कबुलायती खंड रजिस्टर ' ठेविलें जाईल.

(४) खंड रजिस्टरावरून पंचायतीस खंडकऱ्याकडील येणें रकमांचा तक्ता तयार करतां येईल व त्यावरून योग्य वेळीं वसूल करतां येईल.

(५) खंडांत झालेले फेरफार या बुकास नोंदून घेतले जातील.

(६) खंडाच्या नोंदीस एक रुपाया फी पडेल. ती मालकाकडून घेतली जाईल.

(७) मुखत्यारपत्र देतां-घेतां येईल. त्याची नोंद कबुलायत खंड रजिस्टरास होईल. या कामीं मुखत्यारपत्र घेणाराकडून एक रुपाया फी घेतली जाईल. त्याचा छापील फार्म भरून द्यावा लागेल.

वरीलप्रमाणें कायद्याची रूपरेखा असेल. या गोष्टींशीं विसंगत असलेला, हल्लींच्या कायद्यांतील भाग रद्द समजण्यांत येईल.

कामकाजाची व्यवस्था.

वरीलप्रमाणें सर्व महत्त्वाचीं कामें स्थानिक ग्रामपंचायतीकडून यापुढें पार पाडलीं जाणार असल्यामुळें, पंचायतीचे अधिकार व निवडणुकी या बाबतींत कायद्याचा महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणें राहील.

(१) पंचायतीचें क्षेत्र व निवडणूक.

(१) पंचायतीचा कायदा सर्व लहानमोठ्या खेड्यांस लागू करण्यांत येईल.

(२) एक मैलाच्या आंतील वस्तीपर्यंतचीं सर्व खेडीं एक करण्यांत येतील, अशा सर्व खेडयांची वस्ती निदान ५०० च्या पुढें पाहिजे. नाहींतर हा संयुक्त गट त्यापेक्षां लांब अंतरावरील पंचायतीस जोडण्यांत येईल.

(३) अशा संयुक्त खेडयांतर्फे पंचायतीची निवडणूक होऊन कामाची व्यवस्था होईल.

(४) पंचायतीचें लेखी काम पहाण्यासाठीं सेक्रेटरीची योजना होईल. तीन ते चार मैलांच्या आंतील खेडयांच्या पंचायतीचा गट करून त्यांचें लेखी काम त्यास पहावें लागेल. अशा खेडयांची वस्ती ३००० च्या आंत राहील.

(५) शहरची व्यवस्था निवडून आलेल्या म्यु. मेंबरमधून होईल. असे पांच पंच त्यांनीं निवडून द्यावेत. ही निवडणूक त्यांच्या संयुक्त मतदारसंघांतून (सर्व सभासदांतून) होईल. अल्पसंख्याक वर्गासाठीं त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत पूर्ण जागा बसत असल्यास, राखून ठेवण्यांत येतील.

(६) वयांत आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषास (२१ वर्षें पूर्ण झालेल्या) मतदानाचा हक्क राहील. ही निवडणूक गुप्त मतदानपद्धतीप्रमाणें मतदानाचे कागद देऊन केली जाईल.

(७) मतदारांचा संयुक्त मतदारसंघ राहील. लोकसंख्येच्या प्रमाणांत जर अल्पसंख्याकांच्या पूर्ण जागा बसत असतील, तर त्यांच्यासाठीं जागा राखून ठेवण्यांत येतील. जर पांच इसमांत अशा वर्गाचा प्रतिनिधि निवडून आला नाहीं तरच हा हक्क बजावण्यांत येईल.

(२) पंचायतीच्या सभासदांची लायकी व निवडणूक

(१) तो सभ्य स्त्रीपुरुष नागरिक असावा. (त्या गांवीं घर अगर जमीन-जुमला धारण करणारा असावा.)

(२) तो निर्व्यसनी व लोकांचा विश्वस्त असावा.

(३) तो सुशिक्षित (ज्याचें प्राथमिक शिक्षण निदान चार इयत्ताअखेर झालें आहे असा) असावा. त्यानें पंचायतीच्या कामकाजाची माहिती करून

घेतलेली असावी.

(४) त्यास पूर्वी राजकीय गुन्ह्याशिवाय दंडाची अगर कैदेची शिक्षा झालेली नसावी. निदान दंड होऊन पांच वर्षांपेक्षां जास्त काळ झालेला असावा. किंवा कैदेची शिक्षा होऊन, सुटून आल्यास निदान दहा वर्षांपेक्षां जास्त काळ गेलेला असावा. अशाबद्दल सदर इसमानें लेखी पुरावा सादर करावा.

(५) त्याचें पूर्ण वय २५ च्या पुढें असावें.

(६) पंचायतीच्या सभासदाचें शिक्षण त्याच्या देशभाषेंतील प्राथमिक पांच इयत्ता पास झालेलें असावें. तसे लोक कमी सांपडत असल्यास निदान चार इयत्ता तरी झालेले असावे. अशा इसमांस सफाईदार लिहितां व बोलतां येत असावें.

(७) तो रक्तपिती, क्षय, परमा इत्यादि रोगानें पीडलेला नसावा. तसा संशय लोक घेत असल्यास त्यानें डॉक्टरी सर्टिफिकेट हजर करावें.

(८) पंचायतीच्या सभासदास पंचायतीचा कायदा (ॲक्ट) व हिशेबी जमाखर्च यांची माहिती होण्यासाठीं, तसेंच पंचायतीचीं दुसरीं कामें चांगल्या तऱ्हेनें कशीं पार पाडावींत हें कळण्यासाठीं दर तालुक्यांत सोईस्कर अशीं दोन केंद्रें (शाळा) उघडून नऊ महिन्यांच्या शिक्षणाचा कोर्स ठेवण्यांत येईल. या कोर्समध्यें जरूर त्या विषयाचें शिक्षण देण्याची व्यवस्था होईल. परीक्षा लेखी व तोंडी अशी होईल व त्यांना निंमेनिम मार्क ठेवण्यांत येतील. अशा परीक्षेंत एकंदरींत शें. ४० मार्क मिळणें हें पासाचें किमान प्रमाण समजण्यांत येईल. अशी शाळा सतत (वर्षांतून ९ महिने) चालू राहील. नापास होणाराला पुन्हा शिक्षण घेण्याची दोन वेळां संधि देण्यांत येईल.

(९) ज्यांना पंच म्हणून उभें राहावयाचें असेल, त्यांनीं त्या शाळेचें प्रमाणपत्र (पासाचा दाखला) मिळविलें पाहिजे. अशा उभे राहिलेल्या सभासदांमधून गुप्त मतदानपद्धतीनें (मतदानाचा कागद देऊन) निवडणूक होईल.

(१०) ही निवड झाल्यानंतर त्यांनीं आपला अध्यक्ष निवडावा.

(११) ही निवडणूक दर तीन वर्षांनीं होईल.

(१२) दरसाल गुढीपाडव्याच्या दिवशीं संध्याकाळीं चार वाजतां खुल्या जागेंत, स्त्री-पुरुष नागरिकांची सभा भरविण्यांत यावी. या सभेचा अध्यक्ष गांवांतील एखादा सन्मान्य गृहस्थ सभेनें निवडलेला असावा. या प्रसंगीं पंचायतीच्या अध्यक्षानें गतसालांतील कामाचा अहवाल वाचून दाखवावा, व तो लोकांच्या मंजुरीसाठीं मतास टाकावा. सभेच्या अध्यक्षानें, पंचांची मागील सालची कामगिरी विश्वासार्ह झाली आहे, असा ठराव मांडावा व तो खुल्या अधिवेशनांत लोकांनीं आपले हात वर करून पास किंवा नापास आहे याचें मतप्रदर्शन करावें. हा ठराव पास झाल्यास पंचांना पुढील सालीं काम करण्यास परवानगी मिळेल व त्यांचा बोनस त्यांना घेतां येईल.

(१३) हा ठराव नापास झाल्यास तशी दोन वेळां पूर्ण खात्री करून घेण्यांत येईल. अशा पंचांस पुढें ५ वर्षेपर्यंत पंचायतींत निवडून येण्यास संधि दिली जाणार नाहीं, व बोनसपैकीं निम्मी रक्कम कापली जाऊन बाकीची दिली जाईल.

(१४) व्यक्तिशः एखाद्या पंचाविरुद्ध कोणीं सूचना मांडिली, तर त्या सूचनेस निदान २५ माणसांनीं आपला पाठिंबा आहे, असें उभें राहून दाखविलें पाहिजे. अशी सूचना पास झाल्यास त्याबद्दल फेर निवडणूक होईल, व ती गुप्त मतदानपद्धतीप्रमाणें केली जाईल.

(१५) ‘ लोकांचा विश्वास ’ हीच पंचांची मुख्य लायकी समजली जाईल. म्हणून ती सिद्ध करण्याच्या कामीं लोकांच्या विश्वासास पात्र अशीच त्याला कामगिरी करावी लागेल. त्या कामीं ‘ अमुक जणांनीं मत विरुद्ध दिलें ’ म्हणून कष्टी होण्याचें किंवा त्यांचा द्वेष करण्याचें कारण नाहीं. हा गांवचा गाडा चालविण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. येथें रागलोभाचें कारण नाहीं. लोकांची नीति सुधारण्याचें तें व्यासपीठ ठरेल.

(१६) पंचांच्या कामगिरीसंबंधानें एखाद्या वेळीं भयंकर खळबळ माजली असेल, तर त्या वेळेस निदान पंचवीस मतदारांच्या सहीनें जादा सभा बोलावितां येईल, व उत्पन्न झालेल्या प्रश्नावर मतें घेऊन पंचांची कामगिरी योग्य कीं अयोग्य हें ठरविलें जाईल. ती अयोग्य ठरल्यास पंचांकडून राजिनाम्याची मागणी

करितां येईल व दुसरी फेरनिवडणूक होईल.

(१७) पंचायतीच्या सभासदानें लांचलुचपत घेतल्यास किंवा न्यायाच्या कामीं पक्षपातबुद्धि दाखविल्यास त्याचा न्याय वरिष्ठ पंचायतमंडळ करील. असा आरोप सिद्ध झाल्यास अशा सभासदाचें सभासदत्व बेमुदत तहकूब होईल. त्यास खुल्या वार्षिक बैठकींत निदान शें. ६० मतें पडावयास पाहिजेत, म्हणजे त्यान्च्यावरील निर्बंध दूर होईल.

(३) वरिष्ठ पंचायतमंडळ.

(१) तालुक्यांतील पंचायतीच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठीं व त्यांच्या अडचणी नाहींशा करण्यासाठीं एक वरिष्ठ पंचायतमंडळ (बोर्ड) निवडण्यांत येईल.

(२) या मंडळांत सर्व पंचायतींतर्फें एक व लोकांतर्फे तीन असे चार प्रतिनिधि निवडले जातील व त्यांवर पंचायत ऑफिसर म्हणून सरकारी इसमाची नेमणूक होईल. त्यांनीं बहुमतानें आपला कारभार हाकावयाचा आहे.

(३) त्यांच्या निवडणुका दर पांच वर्षांनीं व्हाव्यात.

(४) यांतील सभासदांची लायकी पुढीलप्रमाणें असावी:—[१] तो त्या तालुक्यांतील नागरिक, [२] सभ्य स्त्री–पुरुष, [३] त्याचें शिक्षण मराठी सात किंवा इंग्रजी सात इयत्ता पूर्ण झालेलें असावें. बाकीच्या अटी वरीलप्रमाणेंच समजाव्यात.

(५) वरिष्ठ व कनिष्ठ पंचायतीच्या सभासदांसाठीं दरसाल १५ दिवसांचा एक रिफ्रेशर कोर्स (ज्ञानाला उजळा देणारी, ताजीतवानी करणारी संधि) उघडण्यांत येईल. ह्या कोर्सचा फायदा प्रत्येकानें घेतलाच पाहिजे.

(४) पाटीलतलाठी-सिस्टिमचें पंचायतींत रूपांतर.

(१) गांवांत दोहातीं राज्यकारभार नको म्हणून वसुलाच्या व इतर कामांसाठीं निर्माण केलेली ही सरकारी जुनी संस्था पंचायत मंडळांत सामील केली जाईल.

(२) सरकारी सारा वसूल करणें, पाणीआकार घेणें, जन्ममृत्यूची नोंद ठेवणें, पोलिसास गुन्ह्याची वर्दी देणें, कोंडवाडा राखणें इत्यादि कामें निराळीं

चालू न ठेवतां तीं निवडून आलेल्या पंचायतीकडे सोंपविण्यांत येतील.

(३) हल्लीं काम करीत असलेल्या पाटलांची नेमणूक पंचमंडळांत जादा सभासद म्हणून करण्यांत येईल. परंतु त्या जागा पुढील निवडणुकीच्या वेळीं कमी करण्यांत येतील. त्या वेळेस त्यांनीं आपली लायकी सिद्ध करूनच त्यांत निवडून आले पाहिजे.

(४) हल्लीं त्यांना मिळत असलेला मुशाहिराच येथून पुढें तीन वर्षें मिळत राहील. पण पुढें तो बंद करून, ते निवडून आल्यास पंचांना मिळणारा बोनस (मुशाहिरा किंवा मोबदला किंवा पारितोषिक) त्यांना मिळेल.

(५) ते निवडून न आले तरी त्यांचीं वतनें त्यांच्याकडे कायमचीं वंश-परंपरा चालू राहतील.

(६) हल्लीं असलेल्या सर्व सरकारी तलाठ्यांना यापुढें पंचायत सेक्रेटरी (किंवा कार्यवाहक) म्हणून समजण्यांत येईल व त्यांचा पगार व ग्रेड पूर्वीं-प्रमाणेंच सरकारांतून सुरू राहील.

(७) काम फार वाढत असल्यास, त्याच्या देखरेखीखालील गांवें कमी करण्यांत येतील. अशा कमी झालेल्या गांवांचा गट करून त्यावर नवीन सेक्रे-टरीची निवडणूक करण्यांत येईल.

(८) नवीन सेक्रेटरीची नेमणूक मॅट्रिक पास झालेल्यांमधूनच करण्यांत येईल. त्याकरितां ह्या विषयाचें ज्ञान देण्यासाठीं एक वर्षाचा कोर्स उघडण्यांत येईल. त्यांत पास होणारालाच सेक्रेटरीकरितां अर्ज करितां येईल.

(९) हल्लींचे तलाठी जसजसे कमी होत जातील, तसतशा ह्या नवीन सेक्रेटरींच्या जागा भरण्यांत येतील.

(१०) सेक्रेटरीचा पगार २० ते ४० रुपये असा सामान्यतः राहील.

अधिकार व कामें.

(१) स्थानिक पंचायतमंडळ.

(१) कर्जविमोचनाच्या कायद्यांत नमूद केलेली सर्व व्यवस्था पाहाण्याचा अधिकार पंचायत मंडळास राहील.

(२) सरकारी सारा, पाणी आकार व पंचायतीच्या अधिकारांतील कर गोळा करणें.

(३) सावकार व जमीनदार यांचे खंड व हप्ते वसूल करणें.

(४) जमीनीचे लागण-लिलाव करणें.

(५) जन्ममृत्यूची नोंद ठेवणें.

(६) लहानसहान गुन्हे, चोऱ्या, मारामाऱ्या, आगी यांचा न्याय करणें. या कामीं २५ रुपयेपर्यंत दंड करण्याची शिक्षा करण्याचा अधिकार राहील.

(७) गांवची स्वच्छता, आरोग्य, सडका, पाणी पुरवठा, दिवाबत्ती, शिक्षण, वाचनालयें, लायब्ऱ्या इत्यादिकांची व्यवस्था करणें. प्रत्येक गांवीं या सुधारणा प्रथम हातीं घेतल्या जातील.

(८) घरपट्टी, चाकपट्टी, बाजारभाडें व जरूर तर पंचायतीच्या कार्य-क्षेत्रांत बाहेरून येणाऱ्या मालावर जकात बसविणें, कोंडवाडा फी, धर्मादाय, देणग्या वगैरे सोईचे कर बसवून पैसा गोळा केला जाईल.

(९) हा पैसा गांवच्या वरील सुधारणेसाठींच खर्च करण्यांत येईल. शिक्ष-णापैकीं प्रौढांच्या शिक्षणाचा खर्च यांतून केला जाईल.

(१०) सेक्रेटरीचा पगार, पंचांचा बोनस ह्या खर्चाचा बोजा ह्या उत्पन्ना-वर टाकला जाणार नाहीं. हें उत्पन्न वरील खर्चास पुरत नसल्यास $\frac{1}{4}$ ग्रँट मागतां येईल.

(११) औषधपाण्याची व्यवस्था मोफत होण्यासाठीं अशा शिकलेल्या माण-सास, गांवच्या पडीक जमीनीपैकीं चांगल्या स्थितींतील २५ एकर जमीन उप-भोगण्यासाठीं देण्यांत येईल व त्याला लागतील तीं औषधें आणून दिलीं जातील. पगाराच्या ऐवजीं वरील जमीनीचें उत्पन्न उपभोगावें व लोकांना फुकट औषधोप-

चार करावा. जरूर तीं वैद्यकीय उपकरणें पुरविलीं जातील.

(१२) प्रौढांना शिक्षण देण्याचें काम कोणीं पत्करल्यास त्यालाही १५ ते २० एकर पडीक पण चांगल्यापैकीं जमीन द्यावी. अशा इसमानें निदान ४० इसमांला तरी दरसाल शिकविलें पाहिजे. प्रौढांना लागणारीं पुस्तकें, पाट्या व साहित्य पंचायतीकडून पुरविलें जाईल. हें शिक्षणाचें काम संध्याकाळीं दोन-अडीच तास चालेल.

(१३) सुधारलेल्या पद्धतीनें शेतीचे नमुने तयार करून दाखविणें, पिकावरील रोगराई व कीड यांचा नायनाट करणें, लहानमोठीं धरणें धरून त्यांचा जमिनीकडे उपयोग करून घेणें, दुय्यम धंद्यांच्या वाढीस मदत करणें इत्यादि कामें पूर्ण जबाबदारीनें पार पाडावीं लागतील.

(१४) मुलांचें व प्रौढांचें शिक्षण, सार्वजनिक वाचनालयें, लायब्ऱ्या इत्यादि शिक्षणाच्या बाबतींत लक्ष घालतां येईल व त्या कामीं जरूर ते अधिकार देण्यांत येतील.

(१५) गांवच्या रचनेंत (बांधणींत) जरूर ते फेरफार करणें, जुन्या घरांतून आरोग्यकारक सुधारणा करण्यास भाग पाडणें वगैरे जरूर ते अधिकार देण्यांत येतील.

(२) पंचांना मुशाहिरा

(१) एक हजार वस्तीपर्यंतच्या खेड्यांतील पंचायतीच्या सभासदांस, त्यांच्या चांगल्या कामाबद्दल म्हणून, ते वार्षिक जेवढा शेतसारा भरीत असतील, त्याच्या $\frac{1}{2}$ इतकी रक्कम दरसाल बोनस (पारितोषिक) म्हणून दिली जाईल. ही रक्कम सर्वांस सारखी मिळेल व हा आंकडा सभासदांच्या शेतसाऱ्याच्या बेरजेवरून तयार करून दिला जाईल.

(२) एक हजार वस्तीवरील गांवच्या पंचायतीच्या सभासदांस त्यांच्या चांगल्या कामाबद्दल, ते वार्षिक जेवढा शेतसारा भरीत असतील तेवढी रक्कम दरसाल पारितोषिक म्हणून दिली जाईल. ही रक्कम सर्वांना सारखी मिळेल व हा रकमेचा आंकडा सभासदांच्या शेतसाऱ्याच्या बेरजेवरून तयार केला जाईल. कोणत्याही ठिकाणच्या पंचायतीच्या सभासदांस ५० रुपयापेक्षां कमी व

१०० रु. पेक्षां जास्त वार्षिक बोनस मिळणार नाहीं.

(३) ज्या पंचायतीचें काम उत्तम ठरेल, त्या पंचायतीच्या अध्यक्षास सरकारांतून रौप्य अगर सुवर्णपदकें दरसाल देण्यांत येतील, व हा त्या गांवचा मोठा बहुमान म्हणून समजण्यांत येईल.

(४) पंचायतीचा कारभार गैरशिस्त ठरल्यास किंवा त्यांत घोटाळे झाल्याचें उघडकीस आल्यास बोनसची रक्कम कमी करण्याचा अधिकार वरिष्ठ पंचायत-बोर्डास राहील व त्यांचें सभासदत्व बेमुदत तहकूब होईल.

(५) पंचायतीच्या कामाची वेळ शेतकामाच्या हंगामाच्या वेळीं सकाळीं ७॥ ते ११ पर्यंत ठरविण्यांत येईल.

(६) इतर वेळीं ही वेळ (वसुलाच्या दिवसांत) सकाळीं ८ ते ११ व दुपारीं २ ते ६ ठेविली जाईल. या वेळीं सर्व सभासदांनीं हजर राहून कामें केलीं पाहिजेत. पंचांचें हजेरीबुक ठेवण्यांत येईल. सोमवार हा आठवड्यांतील बैलाच्या विश्रांतीचा दिवस ठरविला जाईल. त्या दिवशीं ऑफिसला सुट्टी मिळेल.

(७) महिन्यांतील कामाच्या दिवसांपैकीं निदान १५ दिवसांपेक्षां कमी हजेरी सभासदांची लागतां कामा नये. तसेंच कारण पडलें तर अध्यक्षांची परवानगी घ्यावी लागेल.

(३) वरिष्ठ पंचायतमंडळाचा अधिकार व मुशाहिरा

(१) आपल्या तालुक्यांतील पंचायतमंडळें यांस भेटी देणें, त्यांच्या अडी-अडचणींचा विचार करणें, त्यांचें कामकाज कसें चालतें यांचें निरीक्षण करणें, दप्तर तपासणें, कॅश मोजून पाहाणें वगैरे कामें करणें.

(२) पंचायतीच्या कामासंबंधीं लोकांचा गैरसमज झाला असल्यास, किंवा त्यांच्याकडून कोणावर अन्याय झाला असल्यास त्याची समक्ष जाऊन चौकशी करणें व निकाल देणें.

(३) निदान महिन्यांतून १० पंचायतींस तरी भेटी देणें व तेथील कामांसंबंधीं वरिष्ठाकडे रिपोर्ट करणें.

(४) पंचायतीचे सभासद किंवा सेक्रेटरी यांचेकडून पैशाची अफरातफ

झाल्याची दिसतांच त्यांना सस्पेंड करणें, दंड करणें, वगैरे जरूर ते अधिकार दिले जातील.

(५) या सभासदांस वार्षिक २५० रु. बोनस मिळेल. याशिवाय भत्ता किंवा मैलेज कांहीं मिळणार नाहीं.

(६) पंचायत ऑफिसरचा पगार सरकार ठरवील व त्याची लायकीहि उच्च प्रकारची पाहिली जाईल.

× × ×

शेतकरी ऋणविमोचनाच्या कायद्यांतील मुख्य बाबी वर दाखविल्याप्रमाणें राहतील. हा कायदा यशस्वी करून दाखविण्याची जबाबदारी स्थानिक पंचायतींवर असल्यामुळें, त्यांच्या घटनेसंबंधीं याच कायद्यांत ऊहापोह केला आहे.

आतां या कायद्यापासून शेतकरी, सावकार, जमीनदार व सरकार या सर्वांचा फायदा कसकसा होत राहील तें पाहूं.

शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा.

भाग ३ रा.

(१) शेतकऱ्यांचा फायदा.

(१) वरील व्यवस्थेनें शेतकरी समाजास सरकारमान्यतेखालीं सावकाराकडून जरूरीच्या प्रसंगीं कर्ज काढतां येईल. हें कर्ज काढतांना करावा लागणारा व्याप वांचेल. पैशाची, वेळेची व शीलाची बचत होईल व गांवांतच कर्ज मिळूं शकेल.

(२) रजिस्ट्रेशनच्या वेळचा होणारा भरमसाट फालतुक खर्च वांचून अल्प खर्चांत हीं कामें गांवचे गांवीं होतील. त्यामुळें लबाड लोकांस त्यांत हात घालतां येणार नाहीं.

(३) वसुलीबाब सरकारनें हातीं घेतल्यामुळें व वाटपाचीं व वारसाहक्काचीं कामें पंचायतीकडे गेल्यानें कोर्टकज्जाचे प्रश्न मुळांतच उत्पन्न होणार नाहींत. त्यामुळें हल्लींच्या कोर्टांचा शेतकरीजीवनाला लागलेला फास तुटून पडेल.

(४) समाजांतील भांडणाचे प्रश्न स्थानिक पंचायतीकडून मिटले जातील.

सावकार व कूळ यांच्यांतील वसूलबाबीचा तेढीचा प्रश्न नाहींसा केल्यामुळें त्यांच्यांत आदरभाव उत्पन्न होईल व त्यांची परस्परांना आवश्यकता भासूं लागेल.

(५) न्याय अत्यंत स्वस्त, घरच्याघरीं खेळीमेळीनें मिळेल.

(६) दत्तकपत्रें, पोटगी हक्काच्या फिर्यादी, वाटपाचीं व वारसाहक्काचीं कामें इ. कामीं समाजाची जी भयंकर आर्थिक व नैतिक हानि होते, तीपासून समाज वांचवितां येईल.

(७) समाजांतील भांडणें नष्ट झाल्यामुळें त्यांचें ऐक्य साधेल. त्यांच्यांतील तट अगर तरफा नाहींशा होतील. समाजास शांतता प्राप्त होईल. त्यांची कार्यक्षमता वाढेल. त्यांच्यांतील एकोपा दृढ होत जाईल व त्यांना आपलें संघटित बळ, पैसा व वेळ ग्रामोद्धार, शेतीसुधारणा इत्यादि विधायक कामगिरींत खर्चावयास मिळेल.

(८) शेतकऱ्यांची पत वाढेल. सावकाराच्या हातांत हप्त्यांच्या रूपानें दरसाल रकमा पडणार असल्यामुळें, शेतकऱ्यांच्या गरजा भागतील. त्यांचें उत्पन्न वाढेल, तेणेंकरून त्यांची आर्थिक कुचंबणा दूर होईल.

(९) जबर व्याजापायीं व व्यसनापायीं होणारी नागवणूक थांबेल.

(१०) उधळ्या आईबापांस आपली इस्टेट उधळून टाकतां येणार नाहीं. त्यामुळें समाजव्यवस्थेंत बिघाड होणार नाहीं व बेकारांचा नवीन वर्ग निर्माण होणार नाहीं.

(११) जमिनीचा मोह बाळगून जिवाउपरान्त झालेलें कर्ज पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेलें होतें, त्यास आळा बसेल, व त्यापायीं कायमची पारखी होणारी जमीन, श्रम करून पोट भरण्यास उजळ माथ्यानें पदरीं राहील.

(१२) विधवा स्त्रियांवरील अन्याय दूर होऊन त्यांना आपलें आर्थिक जीवन स्वावलंबी व सुखी करितां येईल.

(१३) दिढी-दुणीचे दस्तऐवज करून घेणें, दामदुपटीच्या प्रॉमिसऱ्या लिहून घेणें, सोन्याचांदीचे डाग अडकवून ठेविणें, इत्यादि मार्गांनीं होत असलेली समाजाची पिळवणूक थांबेल.

(१४) समाजांतील तंट्याचे प्रश्न मुळांतच खोडून काढल्यामुळें घातपात व मारामाऱ्या यांचें निर्मूलन आपोआप होईल.

(१५) पंचायती कार्यक्षम झाल्यास राज्यकारभाराचे प्राथमिक धडे नागरिकांस मिळून, सर्व जनता स्वातंत्र्य उपभोगण्यास लायक होईल.

(१६) पंचायतीच्या द्वारा सर्व सुधारणांची अम्मलबजावणी थोड्या कालांत सर्व खेड्यापाड्यांतून करतां येईल; त्यामुळें शेंकडों वर्षें जें कार्य घडून आलें नाहीं, तें पुढील ५।१० वर्षांतच घडून आलेलें दिसेल.

(१७) समाजकंटकांचा व गुंडांचा त्रास नाहींसा होईल व त्यांच्यापासून जनता निर्भय व सुखी होईल.

(१८) शेतकरी समाजांतील भांडणावर जगणारा परोपजीवि वर्ग नामशेष होईल. झाडाचें सत्त्व त्यावरील बांडगुळांनीं ज्याप्रमाणें शोषण करून घ्यावें, त्याप्रमाणें हा वर्ग समाजाचें आर्थिक रक्तशोषण करीत आहे, त्यापासून समाजाची मुक्तता होईल.

(१९) कर्जाचा बराचसा बोजा एकदम कमी होत असल्यामुळें व व्यसनें व उधळपट्टी यांचे मार्ग बंद होत असल्यामुळें, शेतकऱ्याच्या हातांत दोन पैसे शिल्लक राहून तो कर्जमुक्त होण्याच्या मार्गास लागेल.

(२०) जोडधंद्याची मदत, शेतीची सुधारणा, कोर्टबाजी व व्यसनें यांचें उच्चाटण, पंचायतीच्या द्वारा राज्यकारभाराचें शिक्षण, मतदानाचें महत्त्व इत्यादि बहुमोल गोष्टी अल्प काळांत घडून येतील; त्यामुळें राष्ट्राच्या पूर्ण स्वातंत्र्याची वेळ नजीक आणिली जाईल.

(२) सावकारांचा फायदा.

(१) या योजनेपासून सावकारांना आपल्या रकमेची शाश्वती मिळेल, त्यामुळें अन्य वाममार्गांपासून तो अलिप्त राहील.

(२) कर्जवसुलीच्या देवघेवीचें काम सुरवातीपासूनच सरकारी संस्थेनें आपलेकडे घेतल्यामुळें त्या कामीं उत्पन्न होणारी तेढ नष्ट होईल, व बँकेंतील ठेवीप्रमाणें अनायासें व्याज व मुद्दल रक्कम बिनधोक घरीं चालत येईल.

(३) सावकारीमुळें शत्रुत्व येण्याचे प्रसंग टळून समाजांत त्यास मानाचें

स्थान मिळेल. समाजव्यवस्थेची आर्थिक घडी सुधारणेसाठीं त्याची समाजास आवश्यकता भासेल.

(४) गरीबीश्रीमंतीमुळें समाजांत उत्पन्न होणारा वर्गकलह कमी होईल. दोन पैसे पदरीं बाळगून लोकांच्या उपयोगी पडतां येऊन, आपला चरितार्थ चांगल्या तऱ्हेनें त्यास चालवितां येईल.

(५) आज शहरांतील बँकांतून कमी व्याजानें पडून राहिलेला पैसा त्यास आपल्या खेडयांत आणतां येईल, व त्यामुळें आपल्या ग्रामबंधूंच्या गरजा भागवून त्यांची भरभराट घडवून आणतां येईल.

(६) फिर्यादी करणें, हुकूमनामे मिळविणें, दरखास्ती देणें, जप्ती वारंट काढणें, माल दाखविणें इत्यादि कितीतरी व्याप त्याच्यामागचे वांचतील

(३) जमीनदारांचा फायदा.

(१) जमीनदार लोकांस आपला खंड वसूल करण्यासाठीं यापुढें कुळाच्या दारांत हेलपाटे घालण्याचा प्रसंग येणार नाहीं, किंवा मामलेदार कचेरींत मदतीच्या फिर्यादी देऊन निकालासाठीं तिष्ठत बसण्याचा प्रसंग येणार नाहीं.

(२) शेतीच्या बांधबंधाऱ्यासाठीं खंडांतून परस्पर पैसा कापला गेल्यामुळे जमिनी बांधून निघतील. त्यामुळें जमिनीचा कस कमी होण्याचा थांबून तो वाढेल, त्यामुळें खंडाचें उत्पन्न कमी होण्याची भीति राहणार नाहीं.

(३) जमिनीच्या सुधारणेसाठीं दोन पैसे खर्च करण्याची त्याला इच्छा होईल, त्यामुळें त्याचें व त्याच्या कुळाचें हितच होत राहील.

(४) सावकारवर्गाप्रमाणेंच जमीनदारवर्ग बहुजनसमाजाच्या रोषास पात्र झाला आहे. या योजनेपासून जनतेच्या मनांतील रोष या वर्गाबद्दल कमी कमी होत जाईल. त्यामुळें ह्या वर्गाचें समाजांतील वजन कायम राहील.

(५) जमीनदाराला आपल्या खंडाबद्दल शाश्वती वाटूं लागेल. त्यामुळें वरचेवर कुळें बदलणें, खंड कमीजास्त करणें, कुळाशीं वर्दळीवर येणें इत्यादि भगभगी कायमच्या बंद होतील. कुळासही दीर्घकाल जमिनी उपभोगण्यास मिळत राहिल्यामुळें जमिनीची मेहनत उत्तम प्रकारें त्यांच्याकडून होईल.

(६) जमीनदार व कूळ यांच्यामधील वसूलबाबीचा तेढीचा प्रश्न मिटल्या-

मुळें व कुळास दीर्घकालाची शाश्वती लाभल्यामुळें त्या दोन्ही वर्गांत परस्परां-विषयीं आदरभाव उत्पन्न होईल, व ते एकमेकांच्या उपयोगी पडतील.

(७) जमीनदारवर्गाला मनःस्वास्थ्य लाभेल. शेतीवाडीची कोणत्याही प्रकारें काळजी राहणार नाहीं. बँकेप्रमाणें ठराविक वेळीं रकमा मनिऑर्डरीनें येत राह-तील. त्यामुळें हातीं घेतलेल्या उद्योगांत व्यत्यय येणार नाहीं.

(४) सरकारचा फायदा.

(१) कोटयवधि रुपयांचा कर जो शेतकरीवर्ग भरतो, त्या वर्गाची स्थिति सुधारतां येईल.

(२) वसुलीबाब, वारसाहक्काचे झगडे, जमिनीच्या मालकीहक्काचे तंटे या बाबतींत समाजांत उत्पन्न होणारी तेढ व भांडणें मिटलीं जाऊन समाजांत प्रेम व शांतता उत्पन्न होईल.

(३) अशा शांतताप्रधान समाजनौकेचें सुकाणूं इष्ट दिशेनें फिरविणें फार सोपें जाईल. त्यामुळें ग्रामोद्धार, प्रौढ शिक्षण, शेतीसुधारणा, औद्योगिक क्रांति या बाबींकडे समाजाचें चित्त आकर्षून घेतां येईल.

(४) समाजांतील तंटे व मारामाऱ्या मुळांतच मिटल्यामुळें राष्ट्रीय मह-त्वाच्या प्रश्नांत सर्व समाज एकदिलानें काम करूं लागेल. अशी जनताच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यास समर्थ होईल.

(५) ग्रामपंचायतीद्वारा राजकीय सुधारणेचें व स्वातंत्र्याचें लोन खेड्या-पाड्यांतून पोंचवितां येईल. वाचनालयें, प्रौढ स्त्रीपुरुषांचें शिक्षण या सुधारणांनीं समाज जागृत ठेवतां येईल. त्यामुळें राजकारणांत उत्पन्न होणाऱ्या लाटा खाल-पर्यंत पोंचत राहातील. त्यामुळें राष्ट्रांत अभूतपूर्व अशी जागृति होईल. लोक राज्यकारभारांत अधिक लक्ष घालूं लागतील. त्यांना आपल्या मताचें महत्त्व कळून येईल. तेणेंकरून पारतंत्र्याचे पाश तोडणें सुलभ जाईल.

(६) सावकारी व्याजांतील शेंकडा १$\frac{1}{4}$ टक्का व्याज, जमीनदारांच्या खंडां-तील शेंकडा ३ टक्के फी व इतर दस्तांच्या वेळीं मिळणारी फी इत्यादि मार्गांनीं उत्पन्न वाढेल. त्यामुळें कोर्टबाजी कमी करण्यापासून उत्पन्नांत पडणारी तूट भरून निघेल.

(७) खेडेगांवच्या सुधारणेसाठीं आजपर्यंत कोणत्याही प्रकारें खेड्यांत पैसा

खर्च केला गेला नाहीं; त्यामुळें खेडेगांवांचें स्वरूप अगदीं भिकार झालें आहे. या योजनेनें खेडेगांवांची सुधारणा होऊन पुढील १०।१५ वर्षांत तीं सुंदर व टुमदार दिसूं लागतील व शहरच्या लोकांचा ओढा खेड्यांकडे लागेल.

(८) दुय्यम धंद्यांच्या प्रसारानें खेड्यांची पांगलेली वस्ती एकवटेल, मजुरीच्या रूपानें शहराकडे धांव घेणारा शेतकरी मागें परतेल; शहरांतून झालेली त्यांची गर्दी कमी होईल; उपजीविकेच्या साधनासाठीं भटकण्याची किंवा दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याची दीनस्थिति नाहींशी होईल.

(९) सावकार-लिस्ट व कर्जबुक यांवरून शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा सालोसाल कळत राहील. त्यामुळें समाजाची आर्थिक परिस्थिति वेळोवेळीं ताडून पाहातां येईल व त्यावर योग्य वेळीं योग्य उपाययोजना करतां येईल.

(१०) कर्जाची देवघेव, खरेदी-विक्री, दत्तकपत्रें, बक्षीसपत्रें, वारसाहक्क, वाटपांचे तंटे, पोटगीहक्काच्या फिर्यादी, दरखास्ती, जप्ती वारंटें इत्यादि महत्वाचे प्रश्न कायद्याच्या आधारें गांवच्या गांवींच सरकारी व्यवस्थेनें सोडविले जातील. यामुळें कोर्टकचेऱ्या व रजिस्टर कचेऱ्या या बाबतींत होणारा भरमसाट खर्च वांचेल.

(११) यापुढें प्रत्येक जिल्ह्याला फक्त एक न्यायकोर्ट व इलाख्याला एक हायकोर्ट ठेविलें असतां भागेल. त्यामुळें खर्चांत लाखों रुपयांची बचत होईल व जनतेच्या कोट्यवधि रुपयांची होणारी नासाडी थांबवितां येईल.

(१२) न्यायाच्या नांवाखालीं समाजाची होत असलेली आर्थिक व नैतिक नागवणूक थांबविल्यामुळें समाजव्यवस्थेस स्थैर्य प्राप्त होईल व मजबुती येईल.

(१३) ग्रामसंस्थेचें पुनरुज्जीवन होईल, त्या कार्यक्षम बनतील व त्यामुळें प्रत्येक खेडें व शहर संघटित होईल. अशा संघटित संस्थेकडून देशाच्या अंतर्गत सुधारणेचा प्रश्न सुलभतेनें सुटून राष्ट्र बलवान व संपन्न होईल.

(१४) शेतकऱ्यांच्या जीवनाचा आधार जी शेती ती हल्लींच्या सुधारलेल्या पद्धतीनें सुधारतां येईल. रोगराई व कीड यांचा नाश करून उत्पन्नाच्या गळत्या थांबविल्या जातील. पावसाचें पडणारें पाणी अडवून शेतीच्या पिकांचा अनिश्चितपणा घालवितां येईल. व्यसनांचें उच्चाटण करणें सोपें जाईल. एकंदरींत सर्व समाज संपन्न व सुखी करतां येईल.

प्रकरण ३ रें

आक्षेप व त्यांचें खंडन.

भाग पहिला.

शेतकरी ऋणविमोचनाची आतांपर्यंत वर्णन केलेली योजना, क्रांतिकारक स्वरूपाची असल्यामुळें व समाजव्यवस्थेचें स्वरूप ती आमूलाग्र बदलीत असल्यामुळें या योजनेवर ' परोपजीवि वर्गाकडून ' टीकेचे चौफेर हल्ले चढविले जातील, याची लेखकाला पूर्ण जाणीव आहे. म्हणून पुढें येणाऱ्या आक्षेपांचें निरसन करणें, उत्पन्न होणाऱ्या नाना प्रकारच्या शंकाकुशंकांचें समाधान करणें व समाजव्यवस्थेस व राज्यव्यवस्थेस स्थैर्य प्राप्त होणारी बहुलाभदायी घटना—योजना—जनतेस विशद करून सांगणें, हें महत्त्वाचें कार्य आहे; म्हणून त्यासंबंधीं उत्पन्न होणाऱ्या आक्षेपांचा विचार या प्रकरणांत केला आहे. तो वाचून विद्वान वाचकवर्गाची या योजनेच्या यशस्वितेबद्दल पुरेपूर खात्री पटेल.

आक्षेप १—सावकारी व्याजाचा दर कमी केल्यामुळें भारी व्याजास सोकलेल्या खेडेगांवांतील सावकारांकडून किंवा धनिकांकडून यापुढें शेतकऱ्यांच्या गरजा मुळींच भागणार नाहींत ! पठाण सावकारास तर आपला गाशा गुंडाळून काबूल-कंदाहारची वाट धरावी लागेल ! सराफकट्ट्यावरचे व्यवहार पार बसून जातील ! अल्प व्याजानें पैसा व्याजीं लावून त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसण्यापेक्षां, तो दागिन्यांच्या रूपानें घर करून बसेल किंवा भूमातेच्या उदरांत गाढ निद्रा घेत बसेल ! यामुळें समाजधारणेस लागणारा जरूर तो पैसा बाहेर न पडल्यामुळें समाजाची कुचंबणा होईल. त्यामुळें ही योजना टाकाऊ ठरेल !

उत्तर—नवीन कायद्यानें सावकारास मिळणारें व्याज त्यास इतर कोणत्याहि बँकेपेक्षां, टक्का दोन टक्क्यांनीं अधिक असल्यामुळें त्यांना आपलें नुकसान झालें असें विचारांतीं वाटणार नाहीं. कर्जाच्या देवघेवीचे व्यवहार हल्लींच्या सावकारी पद्धतींत करणें अत्यंत जिकिरीचें व तापदायक झालेमुळें ' शेतकऱ्यांस कर्ज देणें नको ' अशी मनोवृत्ति सर्व संपन्न माणसांची होत

चालली आहे. त्यामुळें समाजधारणेस आवश्यक तो पैसा, पोस्टल बँका, कॅश सर्टिफिकिटें, सरकारी रोखे, शेअर्स, सरकारमान्य बँका, इन्शुअरन्स कंपन्या दागदागिने इत्यादि रूपानें गुंतून पडल्यामुळें समाजाची आर्थिक उपासमार सुरू आहे. भांडवलाच्या अभावीं नवीन धंदे निघणें अशक्य झालें आहे व निघालेल्या धंद्यांस लागणारें जरूर तें धन भेटत नसल्यामुळें 'सावत्र मुला-प्रमाणें' त्यांची स्थिति केविलवाणी झाली आहे! हा राष्ट्रीय अधःपात नव्हे काय?

'आपलें धन सुरक्षित राहावें व त्यावर थोडेंबहुत कां होईना व्याज मिळून तें विनासायास घरीं परत चालत यावें.' या मनुष्यस्वभावास हल्लींच्या सावकारींत वाव नसल्यामुळें, कोट्यवधि रुपयांची संपत्ति आज निष्क्रिय स्थितींत पडून आहे! पोस्टल सेव्हिंग बँकेंत या देशांतील ४० लाख लोकांचे ८० कोट रुपये शिल्लक असून, कॅशसर्टिफिकेटांत ७० कोट रुपये शिल्लक आहेत, असें पोष्टाच्या सन १९३६–३७ च्या अहवालांत नमूद केलें आहे! एवढी ही प्रचंड संपत्ति, हा मनुष्यजीवनाचा जिवंत झरा, वरील मनोवृत्तीमुळेंच शेंकडा २ ते ३ टक्क्यांचें 'ओंजळभर पाणी' देऊन सरकारी खजिन्यांतच आटला जात नाहीं का? सावकारीचे व्यवहार किचकट केल्यामुळेंच हा संपत्तीचा नद सरकारी खजिन्यांत अंतर्धान पावत नाहीं का? एवढ्या प्रचंड संपत्तीचा उपयोग सरकार लोकांच्या उपयोगासाठीं काय करतें, याचा कोणीं पूसतपास केला आहे का? ही संपत्ति सरकार कशांत गुंतवितें? राष्ट्रीय जीवनाला आवश्यक ते उद्योगधंदे उभारण्यांत तिचा विनियोग केला जात आहे काय? वगैरे प्रश्न समाजानें कधीं आपल्या डोक्यांत आणले आहेत काय?

आज ठिकठिकाणच्या स्थानिक अर्बन बँका, प्रॉव्हिन्शियल बँका, लँडमार्गेज बँका, इंपिरियल बँका व इन्शुअरन्स कंपन्या यांमधून जनतेचे क्रोडो रुपये अल्प व्याजाच्या रूपानें गोळा झाले असून, हा पैसा कोठें गुंतवावा ह्या विचारांत बँकेचे डायरेक्टर्स नेहमीं गढून गेलेले दिसतात! एकीकडे बहुजनसमाजाची, उद्योगधंद्यास तें भांडवल मिळत नाहीं, म्हणून उपासमार सुरू आहे, तर दुसरी-कडे बँका व पतपेढ्या यांना पैशाचें अजीर्ण झाल्यामुळें त्या रात्रंदिवस बेचैन व

त्रस्त झाल्या आहेत ! गेल्या ५।६ वर्षांत सोन्याला भाव फार आल्यामुळें या देशांतून ३२५ कोटी रुपयांचें सोनें परदेशीं गेलें ! व त्याचें रूपांतर 'रुपयांत' झाल्यामुळें सर्व बँकांकडे पैशाचा महापूर लोटला आहे ! खेडेगांवांतून कणाकणांनीं विखुरलेलें हें सुवर्णधन सातसमुद्रापार तर झालेंच ! पण आलेला पैसा खेडेगांवच्या गांवकुसवांतूनहि नाहींसा झाला ! धनिकांनीं या संधीचा मोका साधून आपलें येणें वसूल करून घेतलें व शहरांतील बँका भरून काढल्या ! बँकांना या पैशाचें काय करावें हें कळत नसल्यामुळें त्यांनीं आपल्या व्याजाचे दर इतके भरमसाट उतरविले कीं, ते दीडदोन टक्क्यांवर आणून सोडिले ! या सुवर्णसंधीचा (सुवर्ण लुटीचा !) फायदा खेड्यास किंवा उद्योगधंद्यास मुळींच मिळाला नाहीं. त्यांची उपासमार सुरूच आहे ! बृहन्महाराष्ट्र शुगर कंपनीनें शें ५॥ व्याजानें १०।५ लाखाचें कर्ज मागितलें, तर तें तिला उभ्या महाराष्ट्रांत लवकर मिळूं नये, हें कशाचें द्योतक आहे ? सरकार १०।५ कोटींचें नवीन कर्ज उभारणार असल्याचा नुसता वास लागतांच, ते कर्जरोखे अवघ्या १० मिनिटांत खपून जातात, हा कशाचा प्रभाव आहे ? सरकारच्या या मयासुरी मायेचा अजूनहि आपणांस थांग लागूं नये ना !

या सर्व गोष्टींचा विचार केल्यास हल्लींच्या कर्जाच्या देवघेवींत आमूलाग्र सुधारणा केल्याशिवाय व देशांतील सर्व उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं लागणारा आवश्यक तो पैसा पुरविल्याशिवाय ही स्थिति पालटणार नाहीं, असें आपल्या लक्षांत येईल. ' हिंदुस्थानची औद्योगिक सुधारणा करणें ' हें राज्यकर्त्यांचें ध्येय कधींच नव्हतें व नाहीं. प्रांतिक काँग्रेस सरकारनेंच तिचा घोष आपल्या नव खंडांतून (नऊ प्रांतांतून) सुरूं केला आहे ! ही अभिमानास्पद गोष्ट नाहीं का ?

वरील ऋणविमोचनाच्या कायद्यानें सरकारच्या कृपाछत्राखालीं ग्रामपंचायतींच्या रूपानें, सावकारी धनाची नीट जोपासना व वाढ होणार असल्यामुळें, स्थानिक सावकारांच्या मनोवृत्तींत झपाट्यानें फरक पडून समाजधारणेस जरूर तो पैसा, सरकारी संरक्षणाच्या साह्यानें गांवचे गांवींच राहून जनतेची अभिवृद्धि करील, मग कुचंबणेचें नांवच नको ! या कायद्याच्या सुरवातीस जरी कांहीं अज्ञ व लोभिष्ट सावकारांनीं आपलें द्रव्यरूपी कोंबडें लपवून ठेविलें, तरी उजाडण्याचें

थोडेंच राहील ? अशा वेळीं शहरांतील बँका, खेड्यांतील जमिनींच्या तारणावर सरकारच्या वसुली बाबीमुळें, आपल्या कोट्यवधि रुपयांच्या रकमा खेड्यांत आणून ओततील ! त्यामुळें कुचंबणा तर होणार नाहींच; पण उलट मात्र अशा सावकारांची पुरेपूर फजिती होऊन त्यांना ' मनचे मांडे ' मनांत खात बसावें लागेल !

कोट्यवधि रुपयांची आमची संपत्ति सरकारच्या सेवेला बँकेच्या रूपानें हात जोडून सदैव उभी असतां, पैशाच्या अभावीं गरीब दीनदुबळी जनता आज कित्येक वर्षें पठाणी पाशांत सांपडून पिळली जावी ना ? काबूल-कंदाहारकडील हे भुरटे लुटारू व्यापारी, कीं ज्यांच्या देशांत खाण्यास भरपूर अन्न नाहीं, कारखाने नाहींत कीं स्थिर अशी राज्यघटना नाहीं, त्यांनीं म्हणे येथें येऊन सावकारी करावी ! आणि आमच्या प्रपंचास लागणारा पैसा आम्हांस नित्य पुरवावा ! काय चमत्कारिक इंग्रजी राज्यटना आहे पहा ! आमचें धन, आमच्या हाताशीं असलेलें, आमच्या उपयोगीं पडूं नये; तें मिळण्याची आम्हांला शाश्वती वाटूं नये; त्यासाठीं परक्यांच्या तोंडाकडे पाहाण्याचा केविलवाणा कठोर प्रसंग आम्हां लाखों गोरगरीब शेतकऱ्यांवर नित्य यावा; यापेक्षां राज्यघटनेचे आणखी कोणते दुष्परिणाम आम्हीं भोगावयाचे राहिले आहेत ?

पावसाचा अनिश्चितपणा, बाजारभावाची मंदी, पिकांवरील रोगराई, दुष्काळी घाले, उद्योगधंद्यांचा नाश यांमुळें शेतकरी जीवन इतकें अनिश्चित झालें आहे कीं, त्याला पैसे देणें म्हणजे त्यांवर पाणी सोडणें होय ! अशी परिस्थिति निर्माण झाली आहे ! वसुलीचा प्रश्न इतका किचकट करून टाकला आहे कीं, त्याचा भेद करणें, म्हणजे ' चक्रव्यूहांतून ' बाहेर पडणें होय ! ! ही विद्या जाणणारे सर्वच अभिमन्यु कोठून उत्पन्न होणार ? पण आमच्या सुदैवानें पठाणांना ही विद्या पूर्ण अवगत झाली आहे. अशा लोकांना कोर्ट कचेऱ्यांचीं दर्शनें न घेतां, चार आणे व्याजाची आपली सावकारी आठवे दिवशीं आपल्या पठाणी बडग्याखालीं विटंबनेच्या भीतीनें, बरोबर वसूल होऊन मिळते ! अयोध्येच्या बेगमांपासून ज्या वारन हेस्टिंग्जनें ' लाल वादीचा इंगा ' दाखवून पाऊणकोट रुपये उकळले, म्हणून इंग्रजी न्यायदेवता ढसढसा रडली;

त्या न्यायदेवतेला हा ' पठाणी इंगा ' समजूं नये का ? समाजाच्या विटंबनेची ही रंगीत तालीम आतां पुरे झाली नाहीं का ? कर्ज देणें आणि तें सुलभतेनें वसूल होऊन मिळणें, यांत आमूलाग्र बदल झाला पाहिजे, असें काँग्रेस प्रधानांना अजून वाटत नाहीं का ? कर्जाच्या देवघेवींत आमच्या शेतकरी जीवनाला चिकटलेल्या ह्या पठाणरूपी जळवा तटातट तोडून टाकाव्यात, अशी सद्‌बुद्धि अजून मंत्रिमंडळांना होत नाहीं का ? हा शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा, हें मंगलकार्य लवकरच घडवून आणील, अशी आपण अपेक्षा केली, तर ती वावगी होईल का ?

आक्षेप २——बँका व शेतकरी समाज यांत गुंतविलेल्या रकमांच्या व्याजाच्या दरांत फारसा फरक न ठेविल्यामुळें, लोक आपल्या रकमा शेतकऱ्यांस न देतां बँकेंतून ठेवण्याकडेच जास्त प्रवृत्ति दाखवितील. त्यामुळें बहुजनसमाजाची आर्थिक उपासमार होईल !

उत्तर: —' सरकार ' ह्या संस्थेवर बहुजनसमाजाचा सर्व काळीं व सर्व राष्ट्रांत जितका भरंवसा असतो, तितका ' बँकांवर ' नसतो. कारण बँकेचा कारभार गैरशिस्त ठरल्यास त्यांचें दिवाळें निघून त्या बुडण्याचा संभव फार असतो, असे अनुभव प्रत्यहीं येतात. ह्या देशांतील शेंकडों देशी व विदेशी बँकांनीं आजपर्यंत आपलीं दिवाळीं काढून लोकांच्या लाखों रुपयांची धूळधाण केली आहे ! याबद्दल पुढील उतारा आपणांस साक्ष देईल. " १७७० मध्यें मेसर्स ॲलेक्झांडर कंपनीनें पहिली हिंदुस्थान बँक काढिली. ही ४०—५० लाखांची उलाढाल करीत असे. पण ती १८३२ मध्यें बुडाली. १८२९ ते ते ३२ च्या दरम्यान् पुष्कळ इंग्लिश बँका निघाल्या व त्या बुडाल्या. १८३८ मध्यें युनियन बँक निघाली. हीही बँक १८४८ मध्यें बुडाली. ही बँक आपल्या भागीदारांना लोकांच्या ठेवींतून नफा वाटीत असे ! व आपल्या बँकेंतील पैसे इंग्रज व्यापाऱ्यांना देत असे. या बँकेंतील ठेवी अर्थात् येथील लोकांच्याच होत्या. व त्यांच्या ठेवीवर ही कंपनी व्यापार करीत असे ! एका इंग्रज कंपनीला २४ लाख रुपये तर दुसऱ्या कंपनीला १६ लाख रुपये ह्या बँकेनें दिले होते ! या कारभाराला हिंदी लोकांची ' दिवसाढवळ्या लूट ' याशिवाय दुसरें नांव

नाहीं. हिंदुस्थानांत बँका काढल्या, त्यासुद्धां त्यांच्या व्यापाराकरितां आणि आपल्या लुटीच्या व्यापाराकरितां काढल्या. हीच बँक असले धंदे करीत होती असें नाहीं, तर त्या वेळच्या सरकारी बँका सुद्धां कायदे वगैरे गुंडाळून ठेवीत असत आणि पैशाचा दुरुपयोग करीत. त्यामुळें बँक ऑफ बाँबे ही सुद्धां १८६८ मध्यें बुडाली. ही बँक असाच व्यापार करीत असे, हें त्या वेळीं नेमलेल्या कमिशननें सांगितलें. त्यामुळेंच ही बँक बुडाली. ह्या बँका अर्थातच आमच्या व्यापाऱ्यांना पैसा देत नसत. गोऱ्या व्यापाऱ्यांना नुसत्या प्रामेसरी नोटी-वर पैसे देत. १८६३ मध्यें एकंदर ज्या ७ युरोपियन बँका होत्या, त्या साऱ्या बुडाल्या. यानंतर अशाच इतर बँका निघाल्या, पण त्याही थोड्याफार अवधींतच रसातळास गेल्या. हिंदी लोकांनीं काढिलेल्या बँका फारशा बुडाल्या नाहींत, आणि ज्या बुडाल्या त्या स्वार्थामुळें बुडाल्या नसून अनुभवाच्या अभावीं व सर-कारच्या असहकारितेमुळें बुडाल्या. एकंदर ४७६ पैकीं २४ हिंदी बँका १५ वर्षांत बुडाल्या. इंग्लंडांत ३०० पैकीं २७० कंपन्या बुडाल्या, आणि हिंदु-स्थानांत युरोपियनांनीं चालविलेल्या बहुतेक बँका बुडाल्या. अलीकडे अलीकडे ज्या बँका बुडाल्या त्या कशा बुडाल्या, कोणीं बुडविल्या, त्या बुडविण्यांत कोणाचा हात होता, या गोष्टी जरी उघड आहेत, तरी त्यासंबंधीं स्पष्टपणें सांगणें आज अवघड आहे !" (चित्रमय जगत् १९३०)

वरील ऐतिहासिक घटना लोक विसरले नाहींत, पण 'शेतकऱ्यांशीं सावकारी करण्यापेक्षां हें मधूनमधून येणारें संकट पुरविलें, पण रोजची भगभग नको !' अशा त्रस्त विचारानें नाइलाजास्तव भरंवसा टाकून लोक आपल्या रकमा बँकां-तून ठेवीत आहेत ! त्याचा शेवट कसा होणार आहे, हें एक परमेश्वरासच माहीत ! बँका अगर सरकारी प्रॉमिसरी नोटा यांच्यामध्यें गुंतविलेला पैसा हा सारा आमचाच असतो. त्या पैशाचा विनियोग आमच्याविरुद्ध कसा केला जातो याची ठेवीदारांना कल्पना नसते. हा पैसा अचुकपणें इंग्रजी व्यापारी उचलतात व त्या पैशावर आपले उद्योगधंदे सुरू करतात. ठेवी ठेवणारांला नेहमीं असें वाटतें कीं, आपला पैसा सुरक्षित राहिला म्हणजे झालें, मग तो पैसा कोणीहि कसाही वापरो. पण ही चूक आहे. स्वतःच्या पैशाचा स्वतःला उपयोग करतां येत नसेल तर तो निदान अशा बँकेंत ठेवूं नये हेंच इष्ट होय !

बँकांची वरील कहाणी लक्षांत घेतां लोक आपला पैसा बँकेकडे ठेवण्यांतच शहाणपणा आहे असें समजणार नाहींत. वरील कायद्यानें, वसुलीबाब सरकारनें आपले हातीं घेऊन, सावकारास बँकेप्रमाणें नियमित वेळीं व्याज व मुद्दल यांचा उलगडा करून देण्याची हमी मिळत असल्यामुळें, लोक आपल्या रकमा भराभर बँकेंतून काढून घेतील, व शेतकऱ्यास लागणाऱ्या जोडधंद्यांच्या भांडवलासाठीं त्या बिनदिक्कत देऊं लागतील. हे जोडधंदे राष्ट्रीय सरकारनें आपल्या हातीं घेऊन त्यांची वाढ व जोपासना करावयाचें ठरविलें, तर त्यांच्यावर पैशाचा पाऊस पडेल, हें सांगावयास कोणी भविष्यवादी पाहिजे का ? हा अनुभवाचा पडताळा पाहाण्याचें कॉंग्रेसनें ठरविलेलें धोरण कोणाला आनंद देणार नाहीं ? आणि अशा मनःस्थितींत कोणता सावकार आपल्या रकमा ह्या ग्रामसंस्थारूपी सरकारी बँकेंत ठेवण्यास तयार होणार नाहीं ? मग उपासमार आणि कुचंबणा यांचें नांवच नको !

आक्षेप ३ रा—पैशाच्या देवघेवीचे सर्व व्यवहार, रेकार्ड ऑफ राइटच्या सर्व नोंदी, न्यायनिवाड्याचीं सर्व कामें इत्यादि महत्वाचे प्रश्न ग्रामसंस्थेवर व तेथील नोकरवर्गावर सोपविल्यास, भोळ्याबापड्या शेतकऱ्यास फसविणारी व लुबाडणारी स्थानिक नोकरशाही (गुंडांचें राज्य) निर्माण होईल आणि त्यामुळें हल्लींच्या व्यवस्थेंत मिळणारा न्यायहि (!) दुरावेल !

उत्तर—रजिस्टर कचेऱ्या व सरकारी कोर्टें यांचें अस्तित्व ज्या वादग्रस्त व चमत्कारिक न्यायव्यवस्थेमुळें ठेवणें भाग पडलें, ती अंतर्गत न्यायव्यवस्थाच ह्या कायद्यामुळें आमूलाग्र बदलत असल्यामुळें, समाजास वरील कोर्टकचेऱ्यांची मुळींच जरूरी भासणार नाहीं. जनता दिवसेंदिवस साक्षर होत चालली, सक्तीच्या शिक्षणाची अम्मलबजावणी सुरू होण्याचा समय प्राप्त होऊं लागला, अशा वेळीं जनता भोळसर कशी राहील ? गेल्या ५० वर्षांतील कॉंग्रेसच्या चळवळीनें जनतेंत हल्लीं अभूतपूर्व अशी जागृति झाली असून, तिचें कर्णधारत्व (पुढारीपण) मिळविणें व टिकविणें सोपें राहिलें नाहीं ! त्यामुळें लोकांनीं बहुमताच्या जोरावर निवडलेल्या पंचायतींना जनतेशीं अन्यायानें वागून कसें चालेल ? समाजरूपी दंडाची भीति त्यांना सतत जाणवूं लागेल, व सरकारच्या राष्ट्रीय धोरणानें त्यांना

आपले मार्ग पद्धतशीर चोखाळावे लागतील व लांचलुचपतीपासून स्वतः अलिप्त राहून समाजाचें संरक्षण व संवर्धन करणें त्यांना क्रमप्राप्तच होऊन बसेल !

पंचायतीची घटना लक्षांत घेतल्यास ह्या आक्षेपाचें आपोआपच निरसन होईल. पंचायतीचे सभासद हे ' संस्कारक्षम ' होऊन निवडले जातील. त्यांच्या वार्षिक कामगिरीवर दरसाल, विश्वासाचा ठराव पास व्हावयाचा असल्यामुळें, त्यांना जनतेशीं गैर वागून कसें चालेल ? विश्वासाचा ठराव पास न झाल्यास त्यांचें सभासदत्व पांच वर्षे रद्द होईल व मिळणारी बोनसची रक्कम व स्थानिक मानमान्यता यांस मुकावें लागेल ! दुष्कृति केल्यास अप्रतिष्ठेचा वाईट प्रसंग, वार्षिक खुल्या बैठकींत, पाडव्याच्या मंगल प्रसंगीं अविसाश्वाच्या ठरावानें त्यांच्या-ुढें दत्त म्हणून उभा राहील ! या अप्रतिष्ठेचा परिणाम नवीन पंचायतीच्या सभासदांवरहि होऊन त्यांना आपले मार्ग पद्धतशीरपणें सुधारावे लागतील ! मध्यंतरीं एखादें वाईट कृत्य पंचांकडून घडून आल्यास त्याचा गवगवा होऊन त्यांच्यावर राजीनाम्याचा प्रसंग ओढवल्याशिवाय राहणार नाहीं. पंचायतीकडून अन्याय झाल्यास, वरिष्ठ पंचायतीकडे दाद मागतां येईल व त्यांच्या पापाचा झाडा त्यांना बरोबर द्यावा लागेल ! म्हणून प्रथमारंभीं वाटणारी भीति परिणामीं खरी कशी ठरेल ?

म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांतील बजबजपुरी व खाबूपणा यांमुळें समाजाचीं मनें साशंक झाल्यामुळें, पंचायतीच्या हातीं सर्व सत्ता देण्यास समाज प्रथम कचरूं लागेल. गेल्या १५।१६ वर्षांच्या राजकारणांत ' सरकार विरुद्ध जनता ' असा झगडा चालला असल्यामुळें व कौन्सिलें व बोर्डें यांवर देशांतील राजकारणी पुढाऱ्यांनीं बहिष्कार पुकारल्यामुळें, कौन्सिलांतून व लोकलबोर्डांतून प्रतिगामी वृत्तीचे गट शिरले व त्यांच्या कारभारास किळसवाणें रूप आलें ! पण कॉंग्रेसनें आपल्या हुकमी बहुमतावर हे राज्यकारभाराचे बालेकिल्ले सर करतांच हा मनू पार पालटून गेला ! प्रतिगामी वृत्तीचे (जात्यंध !) गट नेस्तनाबूद झाले व वशिलेबाजी व लांचलुचपत यांवर कडक नियंत्रण पडलें ! अत्यंत विचार करून ह्या कायद्याची घटनाच अशी तयार केली आहे कीं, त्यांत वशिलेबाजीस व लांचलुचपतीस मुळींच वाव ठेविला नाहीं. वरिष्ठ पंचायतमंडळ अशा पंचा-

यतीच्या कामासंबंधीं गुप्त रिपोर्ट ठेवील. त्यामुळें पंचायतमंडळ हुशार व कर्तव्यदक्ष राहील.

हल्लींच्या रजिस्टर कचेऱ्या, मुलकी व फौजदारी कोर्टें व बेंचकोर्टें यांतील अधिकाऱ्यांवर व नोकरांवर, लोकमताची सत्ता बिलकूल चालत नसल्यामुळें, ते लोक आपल्या तावडींत सांपडलेल्या लोकांस वाटेल तसें पिळून काढीत आहेत, व हीच नोकरशाहीची परंपरा थेट वरपर्यंत पोंचल्यामुळें, जनतेस खरा न्याय मिळणें दुर्घट झालें आहे ! एकाद्या सरकारी अम्मलदारानें लांच खाल्ली तर ती सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर पडत असल्यामुळें, भीति आणि दडपण बाजूस सारून छातीठोकपणें पुढें येण्याचें नीतिधैर्य त्यास होत नाहीं ! म्हणून सर्वत्र 'रामराज्य' आहे असें कोणी समजत नाहीं ! परंतु ह्या कायद्यानें स्थानिक पंचायतीचें पुढील भवितव्य तेथील लोकमतावर अवलंबून असल्यामुळें, त्यांना आपला कारभार गैरशिस्त ठेवून कसा चालेल ? एखाद्या सभासदानें गैरशिस्त वर्तन केल्यास, लांचलुचपत घेतल्यास—किंवा न्यायदानाच्या कामीं पक्षपातबुद्धि दाखविल्यास—त्यास सर्व समाजाकडून जाब विचारला जाईल. त्यावर अविश्वासाचा ठराव आणून त्याची हकालपट्टी करतां येईल. त्यामुळें त्यास लोकमतापुढें नमावेंच लागेल !

मध्यप्रांत-विधिमंडळांत नामदार शरीफ यांचेकडून एका कैद्यास 'दया दाखविण्याचा' अस्थानीं प्रयत्न होतांच, सर्व प्रांतभर त्यांचे विरुद्ध काहूर उठलें व शेवटीं न्यायासनाकडून त्याची चौकशी होऊन त्यांना मंत्रिपदावरून दूर व्हावें लागलें. सिंध, सरहद्दप्रांत, मध्यप्रान्त, आसाम व बंगाल येथील मंत्रिमंडळांचे कारभार लोकमताविरुद्ध होतांच, लोकमताच्या दाबापुढें तेथील मांत्रिमंडळें कोलमडून पडलीं. मंत्र्यांना खालीं खेचण्यांत आलें व त्यांच्या जागा राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं भरून काढल्या ! कित्येक मंत्र्यांना तर आपल्या कामगिरीचा वाढदिवस पाहाण्यासहि फुरसत दिली गेली नाहीं ! तेव्हां, जनतेपासून शेंकडों कोस दूर असलेल्या मंत्रिमंडळावर जर जागृत लोकमताची छाप ताबडतोब पडते, तर गांवच्या स्थानिक पंचायतीच्या कारभारावर लोकमताची छाप पडल्यावांचून कशी राहील ? लोकांची दृष्टि निवळली असून, ह्या संस्था कार्यक्षम करण्याचा

चंग त्यांनीं बांधलेला आहे, हें नुकत्याच झालेल्या सर्व प्रकारच्या निवडणुकीं-वरून सिद्ध झालें आहे. अशा स्थितींत, ह्या बाबतींत वाटणारी भीति नाहींशी होऊन ह्या ग्रामसंस्था ' गुंडांचें राज्य ' न बनतां ' रामराज्य ' बनतील अशी अपेक्षा केली तर ती अस्थानीं होईल का ? हा टप्पा त्यांना एकदम साधला नाहीं, तरी त्यांचा रोख त्या दिशेकडे एकदां वळल्यास ' स्वातंत्र्यशिखर ' गांठ-ण्यास त्यांना कितीसा वेळ लागेल ?

आक्षेप ४—रजिस्ट्रेशन पद्धति बंद पडल्यास, त्या खात्याकडील सरकारी उत्पन्न बुडेल व लोकांना आपलेजवळील दस्तऐवजी पुरावा नाहींसा झाल्या-सारखा वाटेल, तसेंच कोर्टकचेऱ्यांचें काम संपुष्टांत आल्यामुळें, सरकारच्या उत्पन्नांत लाखों रुपयांची तूट येईल. म्हणून ही योजना स्वीकारली जाणार नाहीं.

उत्तर—गांवचे गांवींच सर्व प्रकारचे दस्तऐवज, छापील फार्मांत जरूर ती माहिती भरून तयार केले जाणार असल्यामुळें व लगेच त्यांची नोंद जरूर त्या रेकार्ड आफ राइटला होत असल्यामुळें, दस्तनोंदणीचें काम नाहींसें झालें असें वाटणार नाहीं. हें काम पंचायतीचा सरकारी सेक्रेटरी करीत असल्यामुळें, त्यास आपली जबाबदारी विसरून चालणार नाहीं. या नोंदीवरून अम्मलबजावणीचें काम पंचायतीकडे गेल्यामुळें, कोर्टकज्जाचे प्रश्नच मुळीं उत्पन्न होणार नाहींत. त्यामुळें दिवाणी व मुलकी कोर्टाची जरूरी राहाणार नाहीं. मग स्टॅंपावरचे दस्त-ऐवज जवळ बाळगण्याची जरूरी ती काय राहिली ?

उत्पन्नांतील तूट भरून निघण्याचे मार्ग.

(१) ऋणमुक्ततेच्या कायद्यानें या इलाख्यांतील जनतेवर २५ ते ३० कोटि रुपयांचा सावकारी कर्जाचा बोजा राहील. त्यावरील शेंकडा $१\frac{१}{४}$ टक्या-प्रमाणें दरसाल ३० ते ३५ लाख रुपये व्याजाचे सरकारला मिळतील.

(२) जमीनदारांच्या खंडाच्या रकमा वसूल करून देण्याच्या कामीं, सर-कारास शेंकडा ३ रु. प्रमाणें २० ते २५ लाख रुपये फी मिळेल.

(३) याशिवाय निरनिराळ्या व्यवहारांच्या नोंदींतील फी दरसाल ५ लक्ष रुपये सरकारास मिळेल. यामुळें उत्पन्नांत पडणारी तूट निम्यापेक्षां जास्त भरून निघेल. बाकी राहाणाऱ्या २५।३० लाख रुपयांच्या तुटीसाठीं हल्लींची पद्धत

कायम ठेवून, जनतेस दरसाल १० ते १२ कोट रुपयांस बुडवावयाचें कीं काय, हा प्रश्न उरतो. या प्रश्नाचें उत्तर लोकमतास जबाबदार असें कॉंग्रेस प्रधान-मंडळ कोणत्या प्रकारचें देतें, यावरच त्या मंत्रिमंडळाचें भवितव्य अवलंबून राहील ! जें मंत्रिमंडळ, अबकारी खात्याच्या ३ १/२ कोटि रुपये उत्पन्नावर पाणी सोडावयास तयार झालें; ज्या मंत्रिमंडळानें गेल्या सालच्या बजेटांत जनहिताच्या अनेक गोष्टी करण्यासाठीं जादा १ १/४ कोटि रुपये खर्चीं घातले, तें कॉंग्रेस मंत्रि-मंडळ वरील तुटीमुळें ही योजना स्वीकारणार नाहीं काय ? अर्थात् या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट असल्यामुळें हा आक्षेप खरा ठरणार नाहीं.

(४) शिवाय हें उत्पन्न भरून काढण्याचे कितीतरी राजमार्ग उपलब्ध आहेत ! मुंबईसरकार आपला राज्यकारभार चालवितांना सर्व प्रकारच्या खात्यां-तील नोकरवर्गासाठीं ६ कोटी रुपये दरसाल पगारासाठीं खर्च करितें; व त्या-करितां दरसाल पेन्शनफंडांत ६० ते ७० लाख रुपये ठेवितें. अशा नोकरांस, झालेल्या नोकरीचें पेन्शन ठरवून देऊन, ही पेन्शनफंडाची पद्धति बंद करावी व त्याऐवजीं येथून पुढें प्रॉव्हिडंट फंडाची राजमान्य पद्धति सुरू केल्यास, सर-कारच्या खर्चांत दरसाल ३० लाख रुपयांची बचत होऊन वरील तूट भरून निघेल ! पेन्शनफंड हा पगाराच्या १/६ भरला जातो व प्रॉव्हिडंट फंड पगाराच्या १/१६ भरला जातो. या दोहोंमधील फरक वरील ३० लाख रुपये इतका पडतो. आज सर्व व्यापारी कंपन्या, बँका, इन्शुअरन्स कंपन्या, रेल्वे कंपन्या, स्कूलबोर्डें, व म्युनिसिपालिट्या, तसेंच मोठमोठ्या कॉर्पोरेशन्स इत्यादि कोट्यवधि रुपयांचा व्यवहार करणाऱ्या संस्था, आपल्या नोकरवर्गास प्रॉव्हिडंट फंडाच्या योजनेचा आज कित्येक वर्षें फायदा देत आहेत. म्हणून त्या मार्गाचा जरूर अवलंब सर्व प्रांतिक सरकारांनीं करावा. जीवित क्षणभंगुर असल्यामुळें, पेन्शनचा फायदा अशा वर्गास दीर्घकाल मिळत नाहीं. पण प्रॉ. फंडाच्या योजनेनें अशा इसमास केव्हांहि एकदम फायदा घेतां येतो. त्यामुळें प्रॉ० फंडाची रक्कम कायमची घरांत येते. असा फायदा त्याला व त्याच्या वंशजांना कायमचा मिळूं लागतो. यापुढें सरकारी नोकरांच्या मुलाबाळांस नोकरीची शाश्वती नसल्यामुळें उद्योगधंद्याचीच कास धरावी लागेल; उत्पादक प्रश्नच हातीं घेऊन ते सोडवावे लागतील. अर्थात् त्या वेळीं लागणारें भांडवल प्रॉव्हिडंट फंडाच्या योजनेनें त्यांना उपलब्ध

होईल व आजचा तुटीचा प्रश्न सुटला जाईल.

(५) जमीनदारांचा खंड हा फार मोठा आहे. म्हणून त्या खंडावरील वार्षिक उत्पन्नाचा अंदाज करणें आज जरा धाडसाचें होईल. तत्रापि त्यासंबंधीं कांहीं माहिती आज आपणांस उद्बोधक वाटेल. " आपल्या प्रांतांत २१३३ इनाम गांवें आहेत. एकंदर जमिनीचा सहावा भाग इनामी आहे व जमीन-धाऱ्याचा शेंकडा २० इतका धारा इनामी जमिनीचा होतो. ही रकम सुमारें ९६ लक्ष रुपये होते." (केसरी) यावरून इनामदार वर्गाकडे या आकाराच्या पांचपट साऱ्याची, म्हणजे सुमारें ५ कोटि रुपये आकाराची जमीन आहे असें ठरतें. या जमिनीचा खंड साऱ्याच्या तिपटीइतका तरी निदान असावा. कारण खंडाचे आंकडे सरकारी रिपोर्टांत यापेक्षां किती तरी जास्त असल्याचें दाखविलें आहे. म्हणजे जमीनदारांचा खंड सुमारें १५ कोट रुपये असावा ! याशिवाय लाखों खातेदार असे आहेत कीं, ते आपली जमीन दुसऱ्यास खंडानें अगर वाट्यानें देतात. खंड वसूल करणें जिकिरीचें झाल्यामुळें खंडाऐवजीं भागवाट्याची पद्धति मोठ्या प्रमाणांत अमलांत आहे. वरील कायद्यानें जमिनीची सुधारणा होऊन खंड लोकांना बिनबोभाट वसूल करून मिळणार असल्यामुळें अशा बहुतेक जमिनींचें रूपांतर खंडांत होईल. हा वरील सर्व अंदाज केल्यास हे खंड वसूल करून देण्याच्या कामीं सरकारास दरसाल ५० ते ६० लाख रुपये फीचे मिळत राहातील. त्यामुळें कोर्टबाजीचें उच्चाटण करणें पैशाच्या दृष्टीनें नुकसानकारक होणार नाहीं.

आक्षेप ५—सोन्याचांदीच्या डागावरील गहाण सावकारीस बंदी केल्यामुळें समाजाची आर्थिक कुचंबणा होईल. त्यास आपल्या गरजेच्या वेळीं जिन्नस गहाण ठेवून पैसा मिळतो तो यापुढें मिळणार नाहीं. त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्याची पायमल्ली होऊन समाजाची अडवणूक होईल.

उत्तर—आधींच सर्व बाजूनें गांजलेल्या शेतकऱ्यास त्यानें कष्ट करून संपादन केलेल्या दागिनारूपी संपत्तीवर कर्ज काढूं देणें, म्हणजे त्यानें निढळाचा घाम गाळून जमा केलेल्या संपत्तीवर त्यास व्याज भरावयास सांगणें नाहीं का ? त्यामुळें दोन पैसे रोकड बाळगून असलेल्या धंदेवाल्या सराफ सावकारांचें ऐतेंच

फावतें ! त्यांना आपलें धन (लोकांचे ठेवून घेतलेले डाग) आपल्या पेटींत सोन्याचांदीच्या अस्सल स्वरूपांत सुरक्षित ठेवितां येऊन, उलट बहुजनसमाजाच्या श्रमाच्या संपत्तीवर, कांहीं एक श्रम न करितां ' व्याजरूपानें ' चांगलाच हात मारतां येतो. ही एक प्रकारची सनदशीर लूट नाहीं का ? या पद्धतीनें व्याजमुद्दलापायीं बहुजनसमाजाची कोट्यवधि रुपयांची डागरूपी इस्टेट सराफ-सावकारांच्या घरांत बिनधोक उतरत नाहीं का ? या मोहानें कित्येक सुखवस्तु घराणीं पार बुडाल्याचें लेखकानें प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिलेलें आहे ! म्हणून या मोहापासून समाजाची सुटका केलीच पाहिजे. हिंदुमुसलमानादि लोकांत, दागिन्यांचा सोस फार आहे ! दागिन्यांशिवाय लग्न ठरत नाहीं, अशी परिस्थिति आज निर्माण झाली असल्यामुळें लोकांचें कर्ज काढून हे डाग तयार केलेले असतात. असें शेंकडा ८० लग्नांत तरी घडत असावें. सोन्याचांदीचे अमुक डाग घालूं अशी अगोदरच ' ठरोती ' झालेली असते. त्याला अनुसरून ते तयार करण्यासाठीं हातावर अगर जमिनीच्या तारणावर कर्ज काढलेलें असतें. दागिने हे सौभाग्यअलंकार समजले जातात. शिवाय घराण्याच्या अब्रूसाठीं ते जवळ ठेवावेच लागतात. त्यासाठीं तो सालोसाल व्याज भरीतच असतो. पण हा पैसा फिटण्यास उत्पन्नांत कोणत्याहि तऱ्हेचा वाव न सांपडल्यामुळें सावकाराचा बोजा कोणत्याही तऱ्हेनें कमी होत नाहीं. शेवटीं त्याला तो डाग गहाण ठेवून तुंबलेलें व्याज भरावें लागतें. त्या वेळेस तर त्याला दुहेरी व्याज भरावें लागतें. एक मूळ सावकाराचें व दुसरें सराफाचें ! दोघांचे व्याजाचे दर पाहिल्यास मूळ डागाची ' चटणी ' अवघ्या ३—४ वर्षांत उडून जाते ! शेवटीं मुद्दल कायम तें कायमच ! असा वाईट प्रसंग हमेशा येतो !

माझ्या एका सुशिक्षित स्नेह्यानें आपल्या लग्नासाठीं काढलेल्या कर्जांतून, ३०० रुपयांची एक सोन्याची सरी तयार केली. व्याजाचा दर १८८१२ होता. पुढें ३—४ वर्षें त्याला परिस्थितीमुळें व्याज भरणें अशक्य झाल्यामुळें नाइलाज होऊन, शेवटीं त्यानें तो डाग सराफाजवळ १०० रु. ला १८८१२ दरानें गहाण ठेविला. व व्याज भागवून बाकीचे २५ रु. इतर कामीं खर्च केले. त्याच्या शेतीचें उत्पन्न जेमतेम पोटापुरतें येत असल्यामुळें हें कर्ज व त्याचें व्याज फिटणें अशक्य झालें. पुढें चार वर्षें गेलीं. तेव्हां दोन्ही सावकारांनीं

आपल्या व्याजाचे हिशेब केले, तेव्हां ते मूळ डागाच्या किमतीइतके, ३०० रुपये झाले. तेव्हां त्याचे डोळे उघडले ! पण उघडून काय उपयोग ? तो डाग तर व्याजापायीं गेलाच, पण दोन्ही सावकारांच्या ४०० रुपये कर्जासाठीं १२।१५ मण दाण्याची (सबंध कुटुम्बाचें वर्षाचें अन्न देणारी) जमीन कबजेगहाण लावून द्यावी लागली ! वाचकहो, ही सुशिक्षित माणसाची गोष्ट ! मग अडाणी लोकांची काय स्थिति होत असेल ? सौभाग्याचें लेणें म्हणून जो डाग त्यानें केला, तो त्याच्या सौभाग्यवतीस पुरता डोळे भरून तरी पाहावयास मिळाला का ? तो सराफाच्या पेटींत विश्रांति घेत पडला होता, पण इकडे या बिचाऱ्यास झोंप लागत नव्हती कीं अन्न गोड लागत नव्हतें ! गरजेच्या वेळीं डाग मोडण्याचें जें त्यास व्यक्तिस्वातंत्र्य आहे, त्याचा त्यानें उपयोग केला असता तर त्याच्यावर असा अन्नाला मोताद होण्याचा प्रसंग आला असता का ? आज अशा तऱ्हेचे प्रत्यहीं हजारों व्यवहार सराफकट्ट्यावर राजरोस घडत आहेत, त्याबद्दल कोणीं विचार केला आहे का ? ' व्यक्तिस्वातंत्र्य ' ' सोय ' इत्यादि भपकेबाज नांवाखालीं ही सराफ सावकारांनीं चालविलेली सनदशीर लूटच नव्हे काय ?

समाजाच्या डोक्यांतील गहाणाचें वेड

गेल्या दीडशें वर्षांच्या इंग्रजी अमदानींत तरी या हतभागी देशांतील शेतकऱ्यांस ' सुखाचे व सुबत्तेचे ' दिवस गेल्याचें राष्ट्रास आठवत नाहीं. दरसाल कोट्यवधि रुपयांचें आर्थिक द्रव्यशोषण परकीय सत्तेकडून राजरोस चालू असल्यामुळें, त्यांच्या अमदानींत तरी शेतकऱ्यांस चांगले दिवस येतील अशी आशा करण्यास कांहीं जागा आहे का ? नाना प्रकारच्या आपत्तींत तो हरहमेशा गुरफटत असल्यामुळें ' दोन पैशाला उलाळ ' हा शब्द त्याच्या जीवनांतून—शेतकरी शब्दकोशांतून—नष्ट झाला आहे ! म्हणून त्याला आपल्या डागरूपी संपत्तीवर कर्ज काढूं देणें इष्ट होणार नाहीं, अशी आपली खात्री होईल. डाग विकण्याची पाळी त्याच्यावर आली तर तो विकावा कीं न विकावा, याबद्दल तो दहादां विचार करील—पण गहाणावर पैसे मिळत आहेत असें दिसतांच तो विचार न करितां डाग गहाण ठेवून कर्ज काढून मोकळाहि होतो ! पण तें फिटण्यास मार्ग नसल्यामुळें व्याजापायीं तो डाग डुबून जातो. असा शेंकडा ७५

तरी अनुभव आहे ! डाग विकण्यांत जरी त्याचें प्रथमारंभीं थोडेंबहुत नुकसान होत असलें, तरी सावकारी व्याजाच्या दृष्टीनें तें कांहींच नव्हे, ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत येईल. आज ह्या गहाणाच्या व्यवहाराचें वेड समाजास इतकें लागलें आहे कीं, लाखों लोकांच्या प्रपंचाची त्यानें 'गहाण' करून टाकिली आहे ! तरी आमचे डोळे उघडत नाहींत ! आमच्यांतील चांगले सुशिक्षित लोकसुद्धां अशी बंदी केल्यास समाजाची 'कुचंबणा' होईल असें मोठ्या अट्टाहासानें प्रतिपादन करितात; तेव्हां त्यांच्या बुद्धिमत्तेची कींव करावीशी वाटते ! म्हणून हें गहाणरूपी 'उंटाचें पिल्लू' जितक्या लवकर ह्या शेतकरी वर्गांतून नाहींसें होईल, तितका समाज लवकर ऋणमुक्त होणार नाहीं का ? म्हणून कायद्यानेंच हें भूत गाडलें पाहिजे. गहाणावरील सावकारी ही बेकायदेशीर ठरविली पाहिजे; इतकेंच नव्हे, तर तसें उघडकीस आल्यास सावकारास दंड केला पाहिजे; तरच हें गहाणाचें वेड आमच्या डोक्यांतून नाहींसें होईल !

आक्षेप ६—प्रत्येक व्यक्तीस कर्ज काढण्याची मर्यादा घातल्यामुळें व जमीनविक्रीच्या बाबतींत बंधनें ठेविल्यामुळें त्याच्या नागरिक स्वातंत्र्याची पायमल्ली होईल, तेणेंकरून ही योजना लोकांस आवडणार नाहीं !

उत्तर—हा आक्षेप बाह्यतः दिसतो तितका खरा नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या स्थावरजंगम मिळकतीवर कोणाचेच निर्बंध नसल्यामुळें, उधळे आईबाप आपल्या मुलाबाळांस मागें कांहींच ठेवीत नाहींत ! त्यामुळें त्यांचीं मुलेंबाळें बेकार होतात व भीक मागत सुटतात, किंवा पोटासाठीं कोणाची तरी गुलामगिरी करीत राहातात. सट्टे, लॉटरी, रेसेस, पत्ते, कोंडीं, आंकडे, कोर्ट व दारुबाजी इत्यादिपायीं पुष्कळ लोक भिकेस लागले आहेत; तर कित्येकांचीं घरेंदारें पार रसातळास गेलीं आहेत; कित्येक तर माणुसकींतून उठले आहेत ! आज अशांच्या मुलांना पोसण्याचें काम राष्ट्रावर पडत असल्यामुळें, वरील बंधनाचें समाजाकडून स्वागतच होईल ! कर्जनिर्बंधामुळें यापुढें कोणासच भरमसाट खर्च करतां येणार नाहीं. असें आटोपशीर कर्ज व त्यावरील नियमित व्याजही वसूल करणें पंचायतीस जड जाणार नाहीं. कर्जनिर्बंधाचीं किंवा मिळकत विकण्या-

संबंधाचीं, व्यक्तिस्वातंत्र्याच्या गोड नांवाखालीं, कोणत्याही प्रकारचीं बंधनें नसल्यामुळें, व्यसनी समाज धुळीस मिळाला; त्यांच्या वाडवडिलांनीं कष्ट करून संपादन केलेली इस्टेट नष्ट झाली, व शेवटीं तर त्यांचीं मुलेंबाळें पोटासाठीं गल्लोगल्लीं भीक मागत सुटलीं! याला व्यक्तिस्वातंत्र्य म्हणावयाचें असल्यास खुशाल म्हणा! आज कर्जबाजारीपणावर नियंत्रण नसल्यामुळें खानदेश व वऱ्हाड-कडची शेंकडा ५० ते ६० टक्के शेती, तेथें व्यापारासाठीं जाऊन बसलेल्या गुजर, मारवाडी, भाटे, कच्छी यांच्या ताब्यांत गेली व तेथील शेतकरी समाज उपरा होऊन मजूर बनला व आपल्या अन्नदात्या जमिनीस कायमचा पारखा झाला! भांडवलशाही युगांत यापेक्षां आणखी कोणती वाईट गोष्ट व्हावयाची राहिली आहे? म्हणून कर्ज काढणें व इस्टेट विकणें यांवर शासनसंस्थेचे कांहीं तरी निर्बंध असणें जरूर झालें आहे!

आक्षेप ७—तुमच्या योजनेंत कर्ज काढण्याची मर्यादा, तरम आकाराच्या दसपट ठेविल्यामुळें या इलाख्यांतील शेतकरीवर्ग २५ ते ३० कोटि रुपयांच्या कर्जांत नेहमीं गुरफटला जाईल. त्यामुळें कर्जविमोचन न होतां तो सदैव ऋण-ग्रस्तच राहील! त्यामुळें ह्या योजनेचा फोलपणा सिद्ध होईल!

उत्तर—यांत्रिक युगामुळें व परकीय सत्तेच्या आर्थिक रक्तशोषणामुळें सर्व समाजाची आर्थिक घडी पार विसकटून गेली आहे. ती पूर्वस्थितींत आणण्यास भगीरथ प्रयत्न करावे लागतील. पूर्ण स्वातंत्र्याशिवाय तो प्रश्न शक्य कोटींतील नाहीं. शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनास लागलेल्या गळत्या बंद करतां करतां प्रांतिक सर-कारच्या नाकीं नव येऊन जातील! त्या गळत्या थांबविल्याशिवाय शेतकरी-समाज ऋणमुक्त होणार नाहीं. पण तोंपर्यंत शेतकऱ्यांचा कर्ज काढण्याचा हक्क आपण हिरावून घेतल्यास किंवा सावकारवर्ग बुडवून नामशेष करून टाकल्यास, ' आई जेवूं घालीना व बाप भीक मागूं देईना ' याप्रमाणें शेतकऱ्यांची केविल-वाणी स्थिति होऊन जाईल. त्यांस आपल्या अडीअडचणी भागविण्यासाठीं किंवा शेतीच्या अभिवृद्धीसाठीं प्रसंगविशेषीं कर्ज हें काढावेंच लागणार! निष्कर्जी समाज किंवा राष्ट्र जगाच्या पाठीवर आज एकही नाहीं. मग त्यास हिंदुस्थान कोठून अपवाद होईल?

डोईजड कर्जांतून मुक्तता.

शेतकरी ऋणविमोचनाच्या कायद्यानें, तो अमलांत येतांच, एकदम ६० ते ७० कोटि रुपयांच्या कर्जाचा बोजा त्याचे डोक्यावरून कमी होईल. यापैकीं कोट्यवधि रुपयांचें कर्ज ' जुनी कर्जफेड ' ह्या सदराखालीं माफ होऊन त्याच्या अन्नदात्या जमिनी त्याच्या घरीं येतील. तर मर्यादेच्या बाहेर गेलेलें जिवाउपरान्त कर्ज फिटण्यासाठीं, त्याच्यापासून कायमच्या हिरावून घेतल्या जाणाऱ्या जमिनी, फक्त सावकाराच्या नांवावर वर्ग केल्या जाऊन, त्याच्या गळ्याभोंवतीं करकचून आवळला जाणारा फांस ढिला होईल, नव्हे तुटून मोकळा होईल. अशा जमिनींची कागदोपत्रीं मालकी जरी सावकारांकडे गेली, तरी जमीन प्रत्यक्ष उपभोगण्याचा व ती अधिकाधिक पिकविण्याचा त्याचा नैसर्गिक हक्क कोणत्याहि तऱ्हेनें कमी होणार नाहीं. सावकारालाहि आपल्या रकमेची शाश्वती मिळेल. व्याजाऐवजीं अशा जमिनीचा मर्यादित खंड त्यास सालोसाल मिळेल; २५ वर्षांत केव्हांहि त्यांत अडकून पडलेला पैसा मोकळा होऊं शकेल. इतकेंच नव्हे तर प्रसंगविशेषीं अशा जमिनी त्यास विकून आपलें गुंतलेलें धन मोकळें करतां येईल. कारखान्याच्या किंवा बँकेच्या शेअरविक्रीसारखें त्याला रूप येईल. सरकारी कर्जरोख्यांच्या विक्रीप्रमाणें अशा विक्री केलेल्या जमिनीचा प्रत्यक्ष कबजा खरेदीदाराला मिळणार नाहीं, तर मूळ खंडाचा कबजाच त्याला मिळेल ! यांत तरी त्याचें काय नुकसान झालें ! हे त्याला शें. ६ टक्क्यापर्यंतचे मिळालेले जमीनबॉंडच होत ! या योजनेंत सर्वांचाच फायदा व सोय आहे.

आर्थिक सुबत्तेचीं पुढील दहा वर्षें

पुढील १० वर्षांत प्रांतिक सरकारच्या प्रयत्नानें बहुतेक शेतकऱ्यांना जोडधंदे मिळून त्यांच्या कौटुम्बिक धनांत वाढ होऊं लागेल; पिकावरील रोगराई व कीड यांचा नायनाट, पंचायतीमार्फत सालोसाल होत राहिल्यामुळें दरसाल १० ते १५ कोट रुपयांची बचत होऊं लागेल. दुर्जल शेतीचे प्रयोग दुष्काळी व सुकाळी मुलखांत कायद्यानें सक्तीनें घडवून आणल्याच्या योगानें उत्पन्नांतील कोट्यवधि रुपयांची गळती थांबेल; शेतीच्या सुधारलेल्या नवीन नवीन पद्धतींशीं त्याचा जास्त जास्त संबन्ध ग्रामपंचायतीद्वारा आणला जाणार असल्या-

मुळें, त्याचें उत्पन्न दिढीदुणीनें वाढीस लागलेलें दिसेल; जुगार, दारू व कोर्टे यांतून त्याची सहीसलामत सुटका झाल्यामुळें त्याची वार्षिक बचत २५।३० कोटींनीं होऊं लागेल; दुष्काळाच्या वेळीं ' स्थानिक धान्य कोठारांतून ' अल्पवाढीनें धान्य मिळण्याची सोय होऊन तो निष्कर्जी राहूं लागेल ! औषधपाण्याची सोय गांवांतल्या गांवांत मोफत झाल्यामुळें डॉक्टरी पेचांतून तो मोकळा राहूं लागेल ! हें गोड स्वप्न नव्हे ! हा पुढील १० वर्षांतील कॉंग्रेसच्या कामगिरीचा मीं आढावा सांगितला आहे ! तो बरोबर व्यवहारांत उतरलेला दिसतांच त्याच वेळीं शेतकरी पूर्ण ' निष्कर्जी ' झालेला दिसेल !

फेडरेशनचा डोलारा ढासळेल !

राष्ट्राच्या संपन्नतेचा मूलाधार असा जो शेतकरी तो ऋणमुक्त झाल्याशिवाय राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पाया भक्कम होणार नाहीं. वाळूच्या पायावर उभारलेल्या मनोऱ्याप्रमाणें तें स्वातंत्र्य हेलकावे खाऊं लागेल. म्हणून सर्व प्रांतिक सरकारांनीं कंबर कसून हा ' ऋणविमोचनाचा—राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा—नाजूक प्रश्न—सोडविलाच पाहिजे ! फेडरेशनच्या तत्वावर झगडा करण्याचा कसलाही कठोर प्रसंग आला, तरी प्रांतिक स्वायत्ततेच्या अधिष्ठानावरून कॉंग्रेसनें एक इंचही आपली बैठक सरकूं देऊं नये. शेतकऱ्यांच्या जीवनाभोंवतीं आपली सत्ता केन्द्रीभूत करून, लाखों—कोट्यवधि शेतकऱ्यांच्या मदतीनें फेडरेशनचा उभारलेला डोलारा ढासळून टाकावा. लोकमान्य टिळकांच्या तत्वाप्रमाणें ' मिळालें तें पचवून अधिकासाठीं हात पुढें करावा. ' पुढें केलेल्या हातांत—मनगटांत—जर प्रांतिक स्वायत्ततेचें संपूर्ण बळ ओतलेलें असेल, तर कोठल्याही साम्राज्यशक्तीस आमचा हात झिडकारतां येणें शक्य होणार नाहीं. असें दणकट मनगटच स्वातंत्र्य हस्तगत करूं शकेल ! मग तें मिळाल्यावर ' ऋणविमोचन ' झालेलें दिसणार नाहीं का ?

आक्षेप ८—हल्लींच्या समाजव्यवस्थेची पुनर्घटना, सोशॅलिझमच्या तत्वावर केल्याशिवाय शेतकरी समाज ऋणमुक्त होणार नाहीं. म्हणून या पद्धतीनें ऋणविमोचन होणें शक्य नाहीं.

उत्तर—हल्लींच्या समाजव्यवस्थेस सोशॅलिझमचें तत्व लावणें, म्हणजे सर्व

सावकारवर्ग बुडवून व श्रीमंत वर्गाची सर्व संपत्ति व तिच्या उत्पादनाचीं सर्व साधनें हिरावून घेऊन शेतकरी समाज निष्कर्जी करणें होय. हें बोलणें जितकें सोपें आहे, तितकेंच तें करणें फार कठीण आहे ! रशियन राज्यक्रांतीच्या वेळीं लेनिनला तें शक्य झालें, म्हणून सर्वत्र तेंच अमलांत येईल, हें शक्य दिसत नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका हीं लोकशाहीवर अधिष्ठित झालेलीं व बलाढ्य राष्ट्रें असूनही त्यांना हें लेनिनचें तत्व ग्रहण होत नाहीं, अमलांत आणतां येत नाहीं. मग परतंत्र राष्ट्रांतील आम्हां परतंत्र लोकांना तें कसें शक्य होईल ? सर्व राष्ट्रांना त्यांचीं तत्वें कबूल आहेत, पण तपशील मात्र नाकबूल आहे. आपणहि तींच तत्वें घेऊं, राष्ट्रांतील प्रत्येक घटक बलवान, सुखी व संपन्न करावयाचा असें आपणहि गृहीत धरूं आणि आपल्या परिस्थितीनुरूप त्या तत्वाला मुरड घालून इष्ट तो मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न करूं म्हणजे झालें. आजच्या परिस्थितींत—परिस्थितिभेदामुळें—त्यांचें तत्वज्ञान आम्हांस ग्रहण होत नाहीं, अमलांत आणतां येत नाहीं, म्हणून तें वाईट आहे असें आम्ही म्हणत नाहीं. फक्त तपशिलांत वाद आहे. तो आपल्या सोईप्रमाणें ठरवून घ्यावयाचा, इतकेंच धोरण आपण ठरवूं.

शेतकरी सुखी व संपन्न कसा होईल ?

आज त्यांच्या तत्त्वाप्रमाणें जरी सर्व सावकार बुडाले, किंवा श्रीमंतांचें धन त्यांना वाटून मिळालें, तरी तेवढ्यानें ते सुखी कसे होतील ? परदेशीं जाणाऱ्या द्रव्याचा अखंड ओघ थांबवितां आला, देशांतल्या देशांत कच्च्या मालापासून पक्क्या मालाची निपज मोठ्या प्रमाणावर होऊं लागली, शेतीचें उत्पन्न सुधारलेल्या पद्धतीनुसार भरमसाट वाढवितां आलें, समाजास लागलेलीं व्यसनें व उधळपट्टी हीं नेस्तनाबूद करतां आलीं, अंतर्गत न्यायदानाच्या पद्धतींत व करग्रहणाच्या योजनेंत इष्ट तो फरक घडवून आणतां आला, शेतीच्या पिकांतील अनिश्चितपणा घालवितां आला, बाजारभावांतील मंदी नाहींशी करतां आली, दुष्काळी मुलखांत जलप्रवाह खेळवितां आले, प्रत्येक शेतकऱ्यास जोडधंदा देतां आला तरच शेतकरी समाज ऋणमुक्त होऊन सुखी व संपन्न होईल ! वरील सर्व कारणें शाबूद ठेवून, प्रत्यक्ष कुबेराची जरी सर्व संपत्ति ह्या देशांतील सर्व लोकांस सारखी वाटून दिली, तरी ती पुरी पडणार नाहीं ! शेंकडों भोकें पडलेल्या

भांड्यांत कितीहि पाणी ओतलें, तरी तें कधीं परिपूर्ण भरलेलें आहे असें कधीं होईल का ? किंचित्काल तसा भास झालेला दिसेल ! पण पुढच्याच क्षणीं तें रितें होऊं लागल्याचें दिसणार नाहीं का ? तोच दृष्टांत वरील परिस्थितींत आमच्या आर्थिक जीवनास बरोबर लागू पडतो. त्यामुळें त्यांच्या तत्त्वाप्रमाणें (कारण तें बोलण्यास फार सोपें व मोहक आहे) जरी किंचित्काल तसा शेतं-करीसमाज पूर्ण ऋणमुक्त झाल्याचा दिसला, तरी तो पुन्हा ऋणग्रस्त होणार नाहीं असें म्हणतां येईल का ? जोंपर्यंत वरील परिस्थिति कायम आहे, तोंपर्यंत तो पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होईल. तोडलेलें झाड जसें पुन्हां शेंकडों अंकुर फुटून बहरतें, त्याप्रमाणेंच असा निष्कर्जी केलेला समाज थोड्याच कालांत पुनरपि कर्जबाजारी झालेला दिसणार नाहीं का ? म्हणून आजच्या परिस्थितींत सोशॅ-लिझमचें तत्व, ह्यावर खरा रामबाण उपाय नव्हे, हें वाचकांच्या लक्षांत येईल.

या तत्वामुळें समाजांतील यादवी कमी न होतां उलट ती वाढतच जाईल. त्यामुळें शेतकरी समाजाची भयंकर कुचंबणा होईल. ' एकादशीच्या घरीं शिव-रात्र ' गेल्याप्रमाणें सगळेच ' कंगाल बाबुलभाई दरवेशी ' बनल्यावर त्यांच्या गरजा कोण कशा भागविणार ? व त्यांना हरघडी लागणारा पैसा कोण कोठून पुरविणार ?

शिवाय पारतंत्र्यांत राहून ही सोशॅलिझमची कल्पना यशस्वी करूं पाहाणें, म्हणजे मृगजळामागें लागून तहान शमते ह्या म्हणण्यासारखेंच नाहीं का ? " दिल्ली तो बहोत दूर है " ह्या म्हणीप्रमाणें राष्ट्राच्या पूर्ण स्वातंत्र्याचा टप्पा अजून फार दूर आहे ! आतांसा कोठें तो दृष्टिपथांत आलेला आहे ! तो गांठे-पर्यंत शेतकरी समाजांत वर्गकलहाच्या ज्वाळा उत्पन्न करणें इष्ट होणार नाहीं. " राष्ट्रीय स्वातंत्र्य हस्तगत झाल्यावर आमच्या तत्वाप्रमाणें तुम्हांला निष्कर्जी करूं, तोंपर्यंत थांबा; तोंपर्यंत सामाजिक वर्गकलहाची धूळफेंक करीत रहा " असें सांगणें म्हणजे त्यांचा आत्मनाश करण्यासारखें होय ! उपाशीं मरणाराला घांसभर अन्न न घालतां ' थांब, थोड्याच दिवसांत मी तुला तूपपोळीचें जेवण घालीन ' असें सांगण्यापैकींच नाहीं का ? तेव्हां हातीं पूर्ण सत्ता पडेपर्यंत ह्या काल्पनिक तत्वाच्या मागें न लागतां व्यवहाराचीच कास धरण्यांत कसा शहाणपणा आहे,

हें आपल्या लक्षांत येईल !

आक्षेप ९—सरकारला आपला सारा वसूल करणें जेथें जिकिरीचें होऊन जातें, तेथें कर्जवसुलीसारखें अत्यंत किचकट काम सरकार कधींच आपले अंगावर घेणार नाहीं. त्यामुळें ही योजना कल्पनेंतच विरून जाईल.

उत्तर—राष्ट्रीय हिताचें कंकण बांधून गेलीं ५० वर्षे सरकारशीं झगडणारी कॉंग्रेस, आज हातीं सत्ता आल्यावर आपल्या ध्येयापासून रतिभर तरी ढळेल का ? लोकांच्या कल्याणाचे मार्ग चोखाळतांना, प्रधानांना जरी रात्रीचे दिवस करावे लागले, तरी कॉंग्रेस प्रधानमंडळें, त्यास कंटाळून आपला जनसेवेचा कार्यक्रम कधींतरी सोडतील का ? आजपर्यंतचा अनुभव लक्षांत घेतल्यास, ही शंका व्यर्थ ठरते ! आज तर ह्या 'ऋणविमोचनाच्या' प्रश्नाची उचल त्यांच्याकडूनच होत असल्यामुळें आमच्यासारख्यांना निराळें रान उठविण्याची जरूरी पडणार नाहीं. ही योजना म्हणजे त्यांना इच्छित ध्येय प्राप्त करून देणारी कामधेनुच वाटेल ! अशा कामधेनूच्या जोपासनेची कोण काळजी वाहणार नाहीं ?

हल्लींच्या परिस्थितींत, शेतकऱ्यांनीं घेतलेलें कोट्यवधि रुपयांचें कर्ज सरकार आपल्या सावकारांस वसूल करून देत नाहीं का ? त्याकरिता मॅजिस्ट्रेट, जज्ज, कलेक्टर इत्यादि जरूर तो वर्ग उत्पन्न करून व तालुकानिहाय रजिस्ट्रेशन खातें व सबजज्ज कोर्टें उघडून सरकार लोकांची सोय करीत नाहीं का ? वसुलीबाब सरकारनें कधींच अंगानिराळी टाकिली नाहीं. पण त्यांचे मार्ग चुकीचे ठरले; जनतेला तापदायक झाले. म्हणून त्यांत इष्ट ती सुधारणा करावयास नको का ? प्रगतिपर सरकार अशा सुधारणा हरहमेशा करीत असतें. त्यांपैकींच ही एक सुधारणा आहे. या योजनेंत खरा फरक एवढाच केला आहे कीं, वसुली काम जें शेवटीं सरकार आपलेकडे घेतें, तें त्यांनीं सुरवातीपासूनच आपलेकडे घ्यावयाचें आहे ! त्या करण्यापासून कोर्टकचेऱ्यांची दगदग सरकारची कमी होईल व वसुली काम बिनबोभाट पार पाडतां येईल. वसूल थकल्यास, त्याच्या जमिनींतील जरूर तेवढाच भाग सालोसाल लागण–लिलावास काढून वसूल परस्पर करून घेणें अवघड जाणार नाहीं. अशी वसुलाकरितां लागणीस काढलेली जमीन, ही त्याच्या खात्यावरील जमिनीच्या $\frac{1}{6}$ पेक्षां जास्त असूं शकणार नाहीं. त्यामुळें

सावकारी कर्जाचा हप्ता भागवीत असतां, आपण आपल्या रयतेस वसुलीच्या कैचींत धरून पिळून काढीत आहोंत, असें होणार नाहीं. उदाहरणार्थ ५० रुपये साऱ्याची जमीन धारण करणारास जास्तींत जास्त कर्ज ५०० रुपये असूं शकेल. याचा वार्षिक हप्ता व्याजमुद्दलासह ५० ते ७५ रुपयांच्या दरम्यान असूं शकेल. अशा जमिनीचें उत्पन्न कमींत कमी त्याच्या सहा पट म्हणजे ३०० रुपये असूं शकेल. अशा उत्पन्नांतून सरकारला आपला सारा व वरील हप्ता वसूल करणें अवघड जाणार नाहीं. शेतीच्या सुधारलेल्या बिनखर्ची पद्धतीचा जरी त्यास परिचय करून दिला, तरी त्याचे उत्पन्नांत शेंकडा ५० टक्क्यांची वाढ करून दाखवितां येईल, असें शेतकरी खात्याच्या प्रयोगावरून सिद्ध होतें ! पण हें जीवनामृत त्यास पाजिलें पाहिजे, म्हणजे वसूलबाबीचा प्रश्न सोडविणें सुलभ जाईल !

आज सरकार जसें आपल्या शेतकऱ्यांस लाखों रुपयांचें कर्ज ' तगई ' म्हणून देतें व तें बिनबोभाट वसूल करून घेतें, त्याप्रमाणेंच हा वसूल करावयाचा आहे, त्यांत विशेष असें कांहीं नाहीं. सरकारसारा डोईजड केला असल्यामुळें तो वसूल करणें जिक्रिरीचें होतें, म्हणून ही बाब हातावेगळी करून कशी चालेल ? प्रत्येक गोष्टीचीं कारणें हुडकून काढून तीं नाहींशीं करीत गेल्याशिवाय राज्यकारभाराची नीट सुधारणा होणार नाहीं ही गोष्ट प्रधानमंडळास विसरून कशी चालेल ?

आक्षेप १०—सरकार सारा भरतां भरतां नाकीं नव येणाऱ्या शेतकऱ्यांकडून जेव्हां सरकार, सावकारी बोजे व जमीनदारांचे खंड वसूल करूं लागेल, तेव्हां रयतेवर भयंकर जुलूम होऊन ती त्रस्त होऊन जाईल. त्यामुळें बहुजनसमाजाकडून या योजनेस जोराचा विरोध उत्पन्न होईल !

उत्तर—हा आक्षेप वरवर पाहाणारास खरा वाटेल, पण त्यांत तथ्यांश मुळींच नाहीं असें विचारांतीं कळून येईल ! सरकार हें आपला जमीनसारा वसूल करीत असतांनाच, सावकारांच्या दरखास्ती व जमीनदारांच्या कुळावरील मदती यांचा वसूल करून देत नाहीं का ? हें काम तें आपल्या स्थानिक मुल्की कामगारांकडूनच पार पाडतें ना ? ह्या वसुली कामांत या इलाख्यांतील गरीब जनता दरसाल कोट्यवधि रुपयांस बुडत असतां, सरकारचा वसूली त्रास

ती सहन करतेच ना ? मग त्या समाजाची वरील मार्गांनीं होणारी पद्धतशीर लूट थांबविली असतां ती आप्तले देणें देण्याच्या वेळीं आडमार्गाचा अवलंब कसा करील ? आज न्यायाच्या मागें लागून तिची होणारी फसगत वांचविली असतां, ती सरळ मार्गाचा अवलंब कां करणार नाहीं ? मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म परीक्षण केल्यास ही वाटणारी भीति अस्थानीं ठरेल !

आजच्या परिस्थितींत, सावकारांचें डोईजड व्याज, जमीनदारांचा वाढता खंड व न्यायदानसंस्थेनें त्यांच्यावर लादलेला खर्चाचा न्याय-(!) बोजा, तो वर्ग भरीतच आहे. पण वरील कायद्यानें त्याची दरसाल कोट्यवधि रुपयांची बचत होणार असल्यामुळें होणाऱ्या बचतीमधूनच त्यास आपलें देणें फेडणें कसें अशक्य होईल ? हल्लींच्या परिस्थितींत सावकारी व्याज १२–१५ कोट रुपये, न्यायदानाचा भुर्दंड १०–१२ कोट रुपये; मादक पदार्थांच्या व्यसनामुळें खिशास बसणारी चाट १०–१२ कोट रुपये, एकूण ३० ते ३५ कोटि रुपयांचा बोजा त्यास सालोसाल भरावा लागत आहे. त्यामुळें तो अर्धपोटी राहून दारिद्र्याचें माहेरघर बनला आहे ! आज सर्व जगांत हिन्दुस्थान इतका कंगाल व अर्धपोटी शेतकरी दुसरीकडे कोठेंहि सांपडावयाचा नाहीं ! खेड्यांत जाऊन पाहा, म्हणजे माझ्या म्हणण्याची तुम्हांला बरोबर कल्पना येईल. आजचा दिवस गेला, उद्यांचा दिवस कसा जाईल ह्याच विवंचनेंत तो रात्रंदिवस गढून गेलेला दिसेल ! आज पोटाचें बंड शहरांत नसून, तें खेड्यापाड्यांतून पसरलेलें दिसेल ! या पोटाच्या विवंचनेमुळें त्यास आपल्या मुलांस शाळेंत घालतां येत नाहीं, त्यामुळें सर्वत्र अज्ञान पसरून तें त्यांच्या दुःखसागरास भरती आणण्यास कारणीभूत होत आहे ! आमच्या धर्माचें तत्वज्ञान अत्यंत उच्च असल्यामुळें व साधुसंतांनीं आपल्या रसाळ अभंगवाणींनीं आमचें रोजचें जीवन ' हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ' असें ईश्वरमय करून टाकल्यामुळें आम्ही भाविक व अल्पसंतुष्ट राहिलों. " भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥ ऐशीयासी भगवानें ॥ उपेक्षिजे सर्वथा " या साधु तुकारामाच्या अभंगवाणीनें आम्ही भारलें गेलों असल्यामुळें आमचें दैन्य आम्ही कोणाजवळ बोलून दाखवीत नाहीं. यामुळें सारें दुःख गिळून आम्ही कसेंबसें जीवन कंठीत आहों ! अशा दुःखमय स्थितींत जर राष्ट्रीय सरकारच्या कृपेनें त्यांची एवढी ३०–३५

कोटि रुपयांची बचत दरसाल होऊं लागली, तर त्यामधूनच सावकारी बोजे व जमीनदारांचा खंड भागविणें त्यांस कसें जड जाईल ?

वरील कायद्याअन्वयें त्यास दरसाल सुमारें १॥ ते २ कोटि रुपये व्याज व मुद्दलाचा हप्ता ३ कोटि रुपये, एकूण सुमारें ५ कोटि रुपये दरसाल भरावे लागतील. त्यांत सरकारी चावडी ३ कोटि रु. व सावकाराकडे वर्ग केलेल्या जमिनीचा खंड २ कोटि रु. मिळविल्यास हा सर्व बोजा १० कोटि रुपये होईल. जमीनदारांचे खंड, हे त्यांच्या उत्पन्नांतून परस्पर फिटणारे असल्यामुळें त्यांचा बोजा त्यास मुळींच वाटणार नाहीं. उलट अशा जमिनी बांधून मिळाल्यामुळें व त्यांत दीर्घकाल वहिवाट करण्याची हमी त्यास मिळाल्यामुळें अशा जमिनी कसणें त्याला फायदेशीरच होईल. खंड निश्चित झाल्यामुळें उत्पन्न कितीही काढलें, तरी तें डोळ्यावर येण्याचें कारण उरणार नाहीं. त्यामुळें अशा जमिनींतून तो दरसाल कोट्यवधि रुपयांचें उत्पन्न काढून, वरील देण्याचा बोजा फेडण्यास समर्थ होईल. दारूबाजी, कोर्टबाजी व सावकारशाही या त्रयींच्या कचाट्यांतून त्याची सहीसलामत सुटका होत असल्यामुळें, त्याची वार्षिक बचत दरसाल ३० ते ३५ कोटि रुपयांनीं होऊं लागल्यास, तो ऋणमुक्त कां होणार नाहीं ? अशा ऋणमुक्त होण्याच्या मार्गास लागलेल्या शेतकऱ्यावर, सरकारच्या वसुली खात्याकडून—ग्रामपंचायतीकडून, जुलूम तो कसा होईल ?

खर्चांत काटकसर व उत्पन्नांत वाढ

ग्रामपंचायतीद्वारा होणाऱ्या बहुविध सुधारणांनीं त्याचें उत्पन्न वाढूं लागेल. पिकावरील रोगराई व कीड यांचें उच्चाटन पंचायतीमार्फत होऊं लागतांच त्याच्या वार्षिक उत्पन्नांत पडणारी १२–१५ कोटींची तूट भरून निघूं लागेल; ग्रामपंचायतीद्वारा सुधारलेल्या शेतीचें सप्रयोगज्ञान त्यास होऊं लागतांच त्याचें वार्षिक उत्पन्न शें. २५ टक्के म्हणजे दरसाल २० ते २५ कोटि रुपयांनीं वाढूं लागेल. दुय्यम धंद्यांचा प्रसार सर्वत्र होऊं लागतांच त्याचे वार्षिक उत्पन्नांत नवीन ५ कोटींची भर पडूं लागेल. अशा रीतीनें वाह्यात खर्च ३०–३५ कोटींनें कमी करून, उलट त्याचें वार्षिक उत्पन्न दरसाल ४० ते ४५ कोटी रुपयांनीं वाढवीत गेल्यास, तो पुढील १० वर्षांतच सुखी व समृद्ध झाल्या-

शिवाय कसा राहील ?

लोकांना कदाचित् हें मनोराज्य वाटेल ! पण तें मनोराज्य नाहीं ! तो कॉंग्रेसच्या भावी कामगिरीचा चित्रपट आहे ! आज त्या दृष्टीनें प्रांतिक प्रधानमंडळाच्या हालचाली सुरू आहेत. नामदार लठ्ठे यांच्या ग्रामपंचायत बिलावर व सावकार-नियंत्रण बिलावर ' सिलेक्ट कमेटी ' बसून रात्रंदिवस खल चालला आहे ! नामदार पाटील यांनीं लहानमोठ्या उद्योगधंद्यांस मदत व संरक्षण देण्याचें बिल गेल्या बैठकींत पास करून घेतलें आहे. राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांच्या ' आर्थिक नियोजन मंडळा ' ची स्थापना झाली असून प्रत्यक्ष कार्यास सुरवात झाली आहे ! अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं कार्याला प्रत्यक्ष सुरवात झाली असल्यामुळें हे विचार म्हणजे ' हवेंत बांधलेले किल्ले ' नव्हेत, याची कल्पना येईल.

आक्षेप ११—कर्ज काढण्याची मर्यादा तरम आकाराच्या दसपट ठेवल्यामुळें तेवढ्या थोड्या रकमेंत शेतकऱ्यांच्या गरजा भागणार नाहींत. जमिनीचे भाव उतरतील, गरजेकरितां त्यांस शेतांतील पिकें विकावीं लागतील. याकरितां ही दसपटीची योजना रद्द करून ती ४० पट करावी.

उत्तर—असा आक्षेप घेणारांचा हेतु, शेतकऱ्यांची जास्तींत जास्त सोय करावी असा आहे. पण त्यांच्या या योजनेपासून शेतकऱ्यांची सोय न होतां उलट गैरसोयच मात्र होईल ! इतकेंच नव्हे, तर ती त्यांच्या नाशाला कारणीभूत होईल ! कशी तें पाहूं — समजा, एखाद्या शेतकऱ्यास ५० रु. तरम आकाराची जमीन आहे. यांच्या योजनेप्रमाणें त्याला त्याच्या ४० पट कर्ज काढण्याचा अधिकार आहे. अर्थात् असें कर्ज २००० रुपये होईल. याचे जास्तींत जास्त दहा हप्ते झाल्यास वार्षिक हप्ता २०० रुपयाचा बसेल व अगदीं शेंकडा ६ रुपये दराचें व्याज धरलें, तरी तें १२० रुपये होईल. म्हणजे व्याजमुद्दलासह त्याला दरसाल ३२० रुपये हप्ता भरावा लागेल ! याशिवाय सरकारी चावडी ५० रुपये भरावयाची आहे ती निराळीच ! आतां हे ३७५ रुपये त्याला शेतींतून निघाल्याशिवाय कर्ज व सारा फिटणार नाहीं. पण ५० रु. आकाराच्या जमीनींतून हल्लीं किती उत्पन्न येतें, याचा वाचकांनीं आपला स्वतांचा अनुभव पडताळून पाहावा; म्हणजे हा हप्ता फिटणें कसें अशक्य आहे

तें त्यांना पुरें कळून येईल. सरकार तरम आकाराच्या जास्तींत जास्त ५ ते ६ पट उत्पन्न धरतें. परंतु सर्वच जमीनींची व्यवस्था चांगली राखिली जात नसल्यामुळें इतकें उत्पन्न कधींच निघत नाहीं. आपण वादाकरितां तितकें निघतें असें जरी गृहीत धरलें, तरी हें उत्पन्न २५० ते ३०० रुपयांच्या पुढें जात नाहीं. मग त्यानें ह्यांतून हप्ता कसा भागवावा व आपला प्रपंच तरी कसा चालवावा तें सांगा ! पण कर्जमर्यादा तरम आकाराच्या दसपट ठेविल्यास, अशा जमीनीवर ५०० रु. कर्ज निघेल. त्याचा वार्षिक हप्ता ५० रु. व व्याज २५।३० रु. एकूण ७५ रुपयांपेक्षां जास्त रकम होणार नाहीं. अर्थात् हा हप्ता त्याच्या उत्पन्नाच्या $\frac{1}{4}$ च असल्यामुळें सावकारी व सरकारी हप्ता वजा जाऊन त्यास सुमारें १७५ रुपये दरसाल खर्चावयास सांपडतील व तो ऋणमुक्त होऊं लागेल.

हल्लीं जमिनींच्या किंमती कित्येक ठिकाणीं तरम आकाराच्या १०० पट वाढल्यामुळें, अशा जमिनींवर प्रायः ५० ते ६० पटीपर्यंत कर्ज सावकारांकडून दिलें जातें. परंतु वरील हिशोबानें पाहातां अशा कर्जाचें व्याज फिटणेंहि अशक्य होऊन जातें, मग मुद्दल फिटण्याचें नांवच नको ! कोणीं किती कर्ज काढावें, यास कांहीं मापच न राहिल्यामुळें, शेतकरी कर्जसागरांत आज गटंगळ्या खात आहे ! तरी देखील आमच्यांतील कांहीं सुशिक्षित लोक कर्जाची मर्यादा वाढवावी म्हणून म्हणत आहेतच ! या त्यांच्या वेडेपणास काय म्हणावें ? कर्ज न फिटल्यास जमीनीची विक्री होऊन सव्याज रकम सावकारास मिळत असल्यामुळें, दिलेलें कर्ज त्याला आपल्या उत्पन्नांतून फेडतां येईल किंवा नाहीं, ह्याचा तो विचार करीत बसत नाहीं. हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पण आज आमची हिशोबी दृष्टि नाहींशी झाल्यामुळें आम्हां शेतकऱ्यांवर ‘ दिवाळखोरीचा ’ प्रसंग येऊन ठेपला आहे ! शेतकऱ्याला शेतीशिवाय जगावयास दुसरें कोणतेंच साधन उपलब्ध नसल्यामुळें त्याला दिवाळखोरी पुकारतां येत नाहीं. नाहींतर मागेंच सर्व सावकार बुडाले असते ! अशी आज कठीण परिस्थिति निर्माण झाली आहे. म्हणून कर्जाची मर्यादा वाढवून घेण्याची कोणीही आपली भ्रामक समजूत करून घेऊं नये.

आज सरकार देखील आपल्या पेन्शनदार नोकराला $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त पेन्शन

विकूं देत नाहीं, किंवा नोकरदार लोकांना कर्ज देणाऱ्या सोसायट्या, त्यांच्या मासिक पगाराच्या $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त हप्ता बसवीत नाहींत. हेतु एवढाच कीं, बाकीच्या पैशांत तरी त्यास प्रपंच भागवितां यावा ! मग असा विचार सरकारनें कधीं शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत केला आहे काय ? शेतकऱ्यानें कर्ज किती काढावें, यास माप नसल्यामुळें त्याच्यावर आज असा अनवस्थाप्रसंग गुदरला आहे. त्यांतून त्यास मुक्त करण्यास ' ऋणविमोचनाच्या कायद्याशिवाय ' आज कोणता मार्ग शिल्लक आहे ?

वरील विवेचनावरून, शेतकरी दिवाळखोरींतून वांचवावयाचा असेल, तर त्याच्यावर कर्जनिर्बंधाच्या मर्यादा घालावयास पाहिजेत. नाहींतर हा ऋणरोग बरा होणार नाहीं. जमीनीच्या किंमती तिच्या उत्पन्नावर ठरत असल्यामुळें, सावकारी बोजाचा व तिच्या किंमतीचा अर्थाअर्थी कांहीं संबंध येत नाहीं. म्हणून कर्जमर्यादा कमी केल्यास जमीनीच्या किंमती उतरतील हें म्हणणें कसें भ्रामक आहे हें आपल्या लक्षांत येईल !

आक्षेप १२—पंचायतीची निवडणूक गांवचे लोकांकडून होणार असल्यामुळें खेडेगांवांत निवडणुकीची चुरस माजून दुफळ्या होतील व त्यामुळें अंतस्थ यादवी माजेल. बहुमतानें ज्या जातीचे लोक निवडून येतील, ते आपल्या जातिपक्षाचा फायदा केल्याशिवाय राहाणार नाहीं. लाचलुचतीचे प्रकार फार वाढतील. निःपक्षपातपणें न्याय मिळणार नाहीं. सध्यां कॉंग्रेसमध्यें जसा गोंधळ माजला आहे तसा माजेल. न्यायदान केव्हांहि तिऱ्हाइताकडूनच झालें पाहिजे.

उत्तर—वरीलसारखा आक्षेप घेणारांचा हेतु, ह्या कायद्यानें गांवची घडी विसकटून त्याच्या दुफळ्या होतील व बजबजपुरी माजेल असा दिसतो. लोकशाही राज्यकारभारांत निवडणुकी ह्या क्रमप्राप्तच होत ! निवडणुकीच्या वेळीं लोकांत खळबळ उडणें हें त्यांच्या जागृतीचें लक्षण समजलें जातें. १८८४ सालापासून आपल्या इकडे म्युनिसिपल कायदा सुरू झाला, तेव्हांपासून त्रैवार्षिक निवडणुकीचे अनुभव आपण पडताळीत आहोंतच. निवडणुकी चुरशीच्या होणें हा जागृत लोकमताचा प्रभाव आहे ! प्रतिनिधीच्या लायकीनालायकीप्रमाणें त्यांस रंग चढत असतो ! नालायक इसम निवडून येऊं नये म्हणून हा निवड-

णुकीचा पारा चढल्यासारखा दिसतो. जितके प्रतिनिधि उभे राहिले असतील, तितके पक्ष निर्माण होणें साहजिक असतें. पण हें निवडणुकीपुरतेंच नाटक असतें ! एकदां निवडणूक झाली म्हणजे त्यांना सरकारी चाकोरीनेंच जाणें भाग पडतें ! सरकारी कायदा जसा घडविला असेल त्याप्रमाणें तेथील कारभारास रंग चढतो. तो व्यक्तीचा दोष नाहीं; तो कायद्याच्या घटनेंतील दोष असतो ! ग्रामपंचायतीच्या कायद्याची घटना शक्य तितकी निर्दोष करण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें तेथील कारभारांत जातीय हित, लांचलुचपत यांस स्थान ठेवलेलें नाहीं. सरळ मार्गानेंच गाडी हाकल्याशिवाय त्यांना मार्ग नाहीं ! सध्यां कॉंग्रेसमध्यें जसा गोंधळ माजला आहे, तसा ग्रामपंचायतींत माजेल, हें म्हणणें वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. असा आरोप करणें म्हणजे आपलें अज्ञान प्रगट करणें होय. एखादा पक्ष आपल्या तत्वाप्रमाणें काम करीत असेल तर ती चूक त्याची नव्हे ! त्यांना निवडून देणाराची होय ! म्हणून जितकें लोकमत जागृत होईल तितकें तें पाहिजेच असतें ! निवडणुकीच्या तावांतून निघाल्याशिवाय सभासदांची लायकी प्रगट होत नाहीं ! लोकशाही कारभारांत निवडणुका व पार्टीस्पिरिट उत्पन्न होणें, हा दोष नाहीं; तो गुणच समजला जातो ! मुसोलिनी किंवा हर हिटलेर, ह्या हुकूमशहांचा लोकांना वीट आलेला आहे ! राष्ट्रांत फॅसिझम माजूं नये, म्हणून राष्ट्रांतील विचारी वर्ग प्रयत्न करीत असतो. सत्ता गाजविणें हा व्यक्तीच्या ठिकाणीं असलेल्या कर्तुंसकर्तुम् शक्तीचा प्रभाव असतो ! 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये ' हा व्यक्तिमाहात्म्याचा प्रभाव होय !

कोर्टबाजीनें आज खेडेगांवचीं शकलें केलीं आहेत ! त्यांच्यांत अनंत पक्ष वा पार्ट्या निर्माण केल्या आहेत ! त्यांच्या दैनंदिन वागणुकींत स्वार्थाची घाण माजविली आहे ! भांडणें, मारामाऱ्या, घातपात, जाळपोळी यांस कमीजास्त प्रमाणांत ऊत आला आहे ! सावकार व रयत, जमीनदार व कूळ, स्पृश्य व अस्पृश्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर ह्या वादानेंही त्यांत आणखी भर घातली आहे ! हा चेतविलेला अग्नि जर विझविण्याचा प्रयत्न केला नाहीं, तर खेडेगांवचें भवितव्य कांहीं बरोबर दिसत नाहीं ! या भांडणामुळें विचारी माणसें मागें पडलीं, त्यांचें महत्त्व लोपलें, म्हणून खेडेगांवचें शुद्धीकरण करणारा, व त्यांना आपल्या कर्तव्यकर्मास बरोबर लावणारा असा कायदा व्हावयास पाहिजे. तें कार्य ह्या

ऋणविमोचनाच्या कायद्यानें घडून येईल असा विश्वास आहे. काळ पालटला आहे ! लोकमत जागृत झालें आहे ! लोकांना दारिद्र्याचे चटके सारखे बसूं लागले आहेत, अशा वेळीं त्यांच्यांतील पक्षभेद नाहींसे करणारी व सर्वांना हितकारक होईल अशी घटना तयार करून लावण्याची वेळ आली आहे. लोकांचे डोळे त्या योजनेकडे आकर्षिले गेले आहेत व ते चातकाप्रमाणें कॉंग्रेसच्या कामगिरीकडे डोळे लावून बसले आहेत. जनताजनार्दनाची कॉंग्रेस, त्यांनीं उघडिलेल्या मुखांत, ह्या ऋणविमोचनाच्या कायद्याचे मधुबिंदु सोडील का ?

आक्षेप १३—खेडेगांवची जनता अज्ञ असल्यामुळें त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी त्यांना पार पाडतां यावयाची नाहीं. ती एक पंचायतींतील पंचाईतच होऊन बसेल !

उत्तर—लेखकाला खेडेगांवांतील अज्ञानाची कल्पना नाहीं असें नाहीं. तिथें अज्ञान ओतप्रोत भरलें आहे, म्हणून तर सुधारणेची खरी जरूरी उत्पन्न झालेली आहे. एवढ्याचसाठीं पंचायतीकरितां उभे राहिलेल्या प्रतिनिधीला 'संस्कारक्षम' करण्याची योजना त्यांत केली आहे. त्या दिव्यांतून पार पडणारास पंचायतीचा गाडा सुरळीत हाकणें जड जाणार नाहीं. पंचायतीवर सोंपविलेल्या कामगिरीची पूर्ण कल्पना त्यास अगोदरच देण्याची योजना केली आहे ! याशिवाय अशा पंचायतीच्या सभासदांना अधिक ज्ञानाचा लाभ होण्यासाठीं दरसाल महिना-पंधरा दिवसांच्या रिफ्रेशर कोर्सचीहि योजना केलेलीच आहे. या सर्व योजनेमुळें लायक पंचांची निर्मिति होणें अशक्य नाहीं. मग अशा ' संस्कारक्षम ' लायक लोकांच्या हातीं कारभार गेल्यावर, त्यांना कारभार करण्याची ' पंचाईत ' कशी पडेल ?

पाण्यांत पडल्याशिवाय जसें पोंहतां येत नाहीं, किंवा चढण्याचा प्रयत्न केल्याशिवाय जसें पडणें संभवत नाहीं, त्याप्रमाणें हें अज्ञान घालविण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तें जाणार नाहीं ! पंचायती कार्यक्षम होणार नाहींत, त्यांच्यांत बजबजपुरी माजेल, वगैरे भीति पोटांत धरून बसलों, तर आपला सप्त जन्मांतही उद्धार होणें शक्य नाहीं. घर बांधलें असतां, घरास उंदीर-घुशी लागतील म्हणून कोणीं घरें बांधावयाचीं ठेविलीं आहेत का ? पाऊस वेळेवर

पडेल कीं न पडेल असा तर्क करीत, कोणीं जमिनी पेरावयाच्या ठेविल्या आहेत का ? मूल होईल का न होईल, असा तर्क करीत बसून, कोणी आपल्या मुली नियोजित वराला देण्याचें थांबविलें आहे का ? तेव्हां हा आरोप अप्रस्तुत होय ! लोक अज्ञ आहेत म्हणून पंचायती कार्यक्षम होणार नाहींत, एवढ्याकरितां त्या उत्पन्न करूं नका, त्यांच्या हातीं सत्ता देऊं नका ही विचारसरणी चूक आहे. असा आक्षेप घेणारांना परिस्थितीचें बरोबर आकलन झालेलें दिसत नाहीं. आजपर्यंतच्या ग्रामपंचायती यशस्वी झाल्या नाहींत म्हणून त्या सुधारूं नयेत का ? चूक कोठें होत आहे तें हुडकून काढणें व ती दुरुस्त करणें, हाच त्यांतील शहाणपणाचा मार्ग नाहीं का ? आज हिन्दुस्थानांत ७॥ लक्ष खेडीं आहेत; व त्यांमधून ३० कोटि लोक राहातात. त्यांच्या अभ्युदयास ग्रामपंचायतीच्या स्थापनेशिवाय व त्यांच्यावर तेथील कारभाराची संपूर्ण जबाबदारी टाकल्याशिवाय कोणता मार्ग उपलब्ध आहे ? पेशवाईअखेर आमची ग्रामव्यवस्था सुरळीत चालली होती; पण त्या काळच्या राज्यकर्त्यांना आमची ही संघटना पाहवली नाहीं; तींत सुधारणा करून तिला मजबुती आणणें त्यांना इष्ट वाटलें नाहीं. आपल्या नोकरशाहीकडून अनियंत्रित राज्यकारभाराचा गाडा सुरळीत चालावा म्हणून त्यांना हे स्थानिक लोकशाहीचे सर्वत्र पसरलेले बालेकिल्ले शाबूत ठेवणें इष्ट वाटलें नसावें ! हा त्यांचा हेतु गेल्या शंभर वर्षांत बरोबर साधला. परंतु आतां काळ पालटला आहे ! एवढी कोटयवधि जनता आपसांत झुंजत ठेवणें कॉंग्रेस राज्यकर्त्यांना इष्ट वाटत नाहीं. ३० कोटि लोकांच्या उद्धारासाठीं भरीव व भक्कम कामगिरी केल्याशिवाय त्यांचें आसन स्थिर होत नाहीं, म्हणून ग्रामपंचायती येणें हें क्रमप्राप्तच आहे ! त्याशिवाय तरणोपाय नाहीं ! त्याशिवाय खेड्यांचा उद्धार नाहीं ! म्हणून अशा शुभकाळीं मीं तयार केलेला ' ऋणविमोचनाचा व्यापक कायदा ' अभ्यासिल्याशिवाय जनता कशी राहील ? व प्रधानमंडळास तरी तिकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ?

आक्षेप १४—हल्लींच्या प्रांतिक कायदेकौन्सिलांतील प्रधानमंडळांत व लोकप्रतिनिधींत, वकील व बॅरिस्टरवर्गाचें प्राबल्य असल्यामुळें व ही योजना त्यांच्या धंद्यावर ' मूले कुठारः ' या न्यायानें आघात करणारी असल्यामुळें ती जन्महि पावणार नाहीं.

उत्तर—असा आक्षेप उत्पन्न होणें साहजिक आहे. परंतु काँग्रेसचा गेल्या ५० वर्षांचा उज्वल इतिहास पाहिल्यास ह्या आक्षेपास स्थान मिळणार नाहीं. आजपर्यंतचें काँग्रेसचें राजकारण हें अपूर्व स्वार्थत्याग, उज्वल देशभक्ति व प्रसंगविशेषीं स्वतःचें बलिदान अशा अधिष्ठानत्रयीवर उभारलें असल्यामुळें, तिच्यावर चुकूनसुद्धां स्वार्थाचा आरोप करणें हें महापाप होय ! कै. लोकमान्य टिळक, कै. लाला लजपतराय, कै. दादाभाई नौरोजी, कै. बॅरिस्टर दास, कै. मोतीलाल नेहरू व बॅरिस्टर सेनगुप्त ह्या दिवंगत पुढाऱ्यांनीं व राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहिरलाल नेहरू, महात्मा गांधी, लोकनायक अणे, बॅरिस्टर सावरकर, देशभक्त बाबू राजेंद्रप्रसाद, पंडित मालवीय, आचार्य नरेंद्रदेव, स्वामी श्रद्धानंद, स्वामी सहजानंद, दे. भ. तात्यासाहेब केळकर, सरदार वल्लभभाई पटेल, दे. भ. शंकररावजी देव इत्यादि अनेक विद्यमान नरश्रेष्ठांनीं तिचें राजकारण आजपर्यंत हातीं धरलें असल्यामुळें, आजची काँग्रेस ही त्यागवृत्तीचें मूर्तिमंत प्रतीक होय ! या थोरथोर विभूतींनीं, राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं, आपल्या बॅरिस्टरीवर पाणी सोडिलें, आपली हजारों रुपयांची इस्टेट स्वराज्याच्या कामीं लाविली व अनंत देहकष्ट सोसले ! अशा त्या थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांकडून या योजनेंत 'वकील आणि बॅरिस्टर या वर्गाच्या प्रॅक्टिसवर पाणी पडेल' म्हणून माघार घेतली जाईल का ? कालत्रयीं शक्य दिसत नाहीं ! एक वेळ उजडावयाचें थांबेल, पण यांचा जनहिताचा कार्यक्रम थांबणार नाहीं ! मंत्रिमंडळांना मिळणारा मासिक ५००० रु. चा तनखा, हातीं सत्ता येतांच त्यानीं कमी करून तो दरमहा ५०० रुपयेच केला नाहीं का ? हें त्यागाचें उदाहरण आपणांस काय सांगतें ? काँग्रेस ही गरिबांकरितां वाटेल तेवढा त्याग करतें, हेंच ना ?

आज बुद्धिमान वर्गाची बुद्धि, कोर्टकज्ज्याच्या कामांत गुरफटल्यामुळें देशाचें फार नुकसान झालें आहे ! नानाप्रकारचे शोध लावणें, उद्योगधंद्यांची वाढ करणें व परदेशीं जाणारी संपत्ति मागें खेंचून धरणें या कामीं अशा बुद्धिमान वर्गाची मदत न झाल्यामुळें साऱ्या दुनियेच्या राजकारणांत आम्ही मागें पडलों. आमच्या बुद्धीस कोर्टबाजीचा रोग जडल्यामुळें आमच्या हातून वरील स्वरूपाची विधायक कामगिरी आतांपर्यंत झाली नाहीं. 'लंगोट्या खेडवळांचीं' भांडणें हायकोर्टपर्यंत लढविण्यांत आमच्या बुद्धीला पुरुषार्थ वाटूं लागल्यामुळें आम्ही जगाच्या

शर्यतींत मागें पडलों ! कोर्टांतील कायदेपांडित्य, हें देशाच्या भाग्योदयाला उपयोगीं पडत नाहीं, असें समजतांच कै. लोकमान्य टिळक, तात्यासाहेब केळकर, महात्मा गांधी, बॅरिस्टर दास, बॅरिस्टर सुभाषचंद्र बोस, बॅरिस्टर नेहरू इत्यादि नरश्रेष्ठांनीं त्यांतून आपलें अंग काढून घेतलें व आपली बुद्धिमत्ता देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लाविली, म्हणून तर आज आपणांस हे दिवस दिसले ! नाहींतर सगळा अंधारच दिसला असता !

प्रायः वकिलींत शिरणारा वर्ग हा फार बुद्धिमान असतो. या वर्गाची बुद्धि जर यंत्रकलेंत किंवा व्यापारांत शिरली असती, तर लक्ष्मीनें त्यांच्या पायावर लोळण घेतली असती ! 'उद्योग्याचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी' ही म्हण सर्वश्रुत आहेच ! पण या वर्गाचे उद्योग गरिबांना उपकारक झाले नाहींत ! कोर्टाच्या पायीं लाखों लोक धुळीस मिळाले, अन्नाला मोताद झाले ! त्यांच्या संपत्तीच्या थडग्यावर आज वकील, बॅरिस्टर वर्गाच्या टोलेजंग हवेल्या उभारलेल्या दिसतील ! आमच्या वकीलवर्गाची बुद्धि इंग्रजी न्यायकोर्टाच्या दरबारांत गहाण पडल्यामुळें, गरीबांच्या संसाराची होत असलेली होळी त्यांना दिसली नाहीं ! न्यायाच्या दरबारांत जाऊन सर्वस्व गमावून बसणाऱ्या लाखों गरीब प्रजेच्या आर्त किंकाळ्या त्यांच्या कानांत शिरूं शकल्या नाहींत; समाजांतील भांडणें कौशल्यानें कशीं लढवावींत यांतच त्यांची बुद्धि गुरफटून गेल्यामुळें राष्ट्राची फार मोठी बौद्धिक उपासमार झाली आहे. म्हणून या मोहापासून हा बुद्धिमानवर्ग परावृत्त केल्याशिवाय आमचा तरणोपाय नाहीं. ऋणविमोचनाच्या कायद्यानें ह्या वकीलवर्गाचें $\frac{९९}{१००}$ काम कमी होणार असल्यामुळें, हा रोग नाहींसा होईल अशी खात्री वाटते ! म्हणून अशा बहुलाभदायी घटनेचा—ऋणविमोचनाच्या कायद्याचा हल्लींचें प्रांतिक प्रधानमंडळ कां स्वीकार करणार नाहीं ?

भाग २ रा.
शंकासमाधान.

प्रश्न—नवीन कायद्यानें कूळ, सावकार व सरकार यांचे संबन्ध कोणत्या प्रकारचे राहतील ?

उत्तर—ह्या योजनेंत प्रत्येक गांवीं ' ग्रामपंचायत ' ही एक बँक बनेल. सावकार किंवा पेढ्या ह्या तिच्या ठेवीदार बनतील व गांवांतील नागरिक हे तिचे सभासद राहतील. ह्या बँकेची त्या गांवच्या हद्दींतील जमीन ही तिची स्थावर प्रापर्टी म्हणून राहील, व वसुलीचा हुकमी राजदंड ह्या मिळकतीचें संरक्षण करील. यापुढें सावकारी कर्जापायीं किंवा सरकारी सारा किंवा जमीन-दारांचा खंड या पायीं शेतकऱ्यांची जमीन कायमची हिरावून घेतली जाणार नाहीं ! कर्जापायीं कोणत्याही शेतकऱ्याची जमीन खरेदी अगर कबजेगहाण स्वरूपांत वर्ग करून दिली जाणार नाहीं. प्रत्येक कुटुम्बाचें चरितार्थाचें साधन जी शेती ती त्याच्या घराण्यांत पिढ्यानुपिढ्या चालत राहावी याची काळजी ही स्थानिक बँक नेहमीं घेत राहील ! ही बँक स्वतःसाठीं म्हणून कोणत्याहि प्रकारची ठेव स्वीकारणार नाहीं. गरजू सभासदानें आपल्या गरजेच्या वेळीं, सावकाररूपी ठेवीदार ह्या बँकेकडे घेऊन यावें, बँकेनें ती ठेव आपल्यातर्फे सभासदास कर्ज म्हणून द्यावी व व्याजमुदलाचे हप्ते बांधून मुदतीच्या ठेवीप्रमाणें रकमा वसूल करून घ्याव्यात व आपल्या ठेवीदारास द्याव्यात, अशी ही अभिनव योजना आहे ! कर्ज देण्यापुरता सावकार आणि कूळ यांचा संबंध आणला जाईल. वसूलबाबीच्या प्रश्नांत त्यांच्यांत तेढ पिकत असल्यामुळें तें काम ही पंचाईत बँक आपलेकडे घेईल व त्यांच्यामधील गोडी व प्रेम कायम टिकवील.

प्रश्न २—कर्जदार सभासदानें आपला सावकार हुडकून काढण्यापेक्षां, सरकारनें इतर बँकेप्रमाणें, सावकाराच्या ठेवी स्वीकारून त्या शेतकरी समाजास दिल्यास यापेक्षां जास्त चांगली सोय होणार नाहीं का ? या योजनेंत याचना करण्याचा जो प्रसंग कुळावर येतो, तो टळणार नाहीं का ?

उत्तर—इतर बँकेप्रमाणें लोकांच्या ठेवी स्वीकारून त्या सभासदास देण्यांत

ठेवीदार व कर्जदार कूळ यांच्यांत सहकार्य मुळींच संभवत नाहीं. या दोन वर्गांची परस्परांना ओळखही नसते! मग त्यांच्यांत प्रेमभाव कोठून उत्पन्न व्हावा? या योजनेनें शेतकरी समाजास सावकाराची पूर्ण जरूरी भासेल. गरजेच्या वेळीं योग्य मदत झाल्यामुळें तो सावकाराशीं कृतज्ञताबुद्धीनें वागेल! सावकारासही आपल्या चरितार्थाचें व्याजरूपी साधन अशा वर्गाकडून मिळत राहिल्यानें तो शेतकऱ्यांच्या हितासाठीं वेळीं अवेळीं जागृत राहील. दुष्काळ, रोगराई इत्यादि आपद्‌प्रसंगीं तो आपल्या कुळास कर्जतहकुबीसारख्या सवलती देण्यास आनंदानें तयार होईल. कर्जवसुलीचें कटु काम त्याच्याकडे नसल्यानें दोघांच्या सहकार्यांत व प्रेमांत वितुष्ट येणार नाहीं. जुन्या कर्जाचा बोजा जसजसा कमी होत जाईल, तसतसें त्याला पुन्हां जरूरीच्या वेळीं इष्ट कर्ज काढतां येईल. त्या वेळीं सावकारहि त्याच्या गरजा भागवील. कारण दरसाल कुळाकडील व्याजमुद्दलाचा हिशोब त्याच्या हातांत पडत असल्यामुळें त्या रकमा पुन्हा गुंतविण्याच्या विचारांतच तो असेल. अशा वेळीं कुळानें मागणी करण्याचाच फक्त अवकाश राहील. हल्लीं जसा शेंकडों वेळां याचना करण्याचा व वाटेल त्या अटी कबूल करण्याचा अत्यंत नामुष्कीचा प्रसंग येतो, तसा प्रसंग या योजनेमुळें येणार नाहीं. पंचायतीकडून कुळाची पत कायम राखिली जात असल्यामुळें सावकारास डोळे झांकून सावकारी करण्यास कोणत्याही प्रकारें प्रत्यवाय येणार नाहीं. आपल्याकडे वाईटपणा घेऊन आपल्या शेतकऱ्यांची पत टिकवून धरणें, हें स्थानिक बँकेचें मुख्य कर्तव्य राहील! वसूलबाबीचा मुख्य तेढीचा प्रश्न ह्या बँकेनें आपलेकडे घेतल्यामुळें सावकार व कूळ यांच्या सहकार्यास कधींच बाध येणार नाहीं. आज हे दोन समाज परस्परांकडे कुत्र्यामांजरांप्रमाणें वैरबुद्धीनें पहात आहेत. त्यांच्यांतील हें वैर नाहींसें होऊन त्यांची मैत्री दृढपरिणत स्वरूपांत नेण्यास वसुलीबाब सुरवातीपासूनच शेवटपर्यंत सरकारनें आपले हातीं घ्यावयास पाहिजे. त्याशिवाय हा वैराग्नि धुमसण्याचा थांबणार नाहीं.

वरील योजनेनें गरजेपुरताच पैसा बँकेकडे येईल व लगेच विभागला जाईल. इतर बँकेमध्यें आज लाखों रुपये ठेवीच्या रूपानें जमा झाले आहेत, तशा तऱ्हेची आपत्ति या बँकेवर येणार नाहीं. लोकांच्या सोईसाठीं ही बँक आपलें ऑफि-

सांत एक मागणी बुक व एक ठेवबुक ठेवील. ज्यांना कर्जाची जरूरी असेल त्यांचीं नांवें व कर्जाचा आंकडा यांत नोंदला जाईल व ठेवबुकांत ज्यांना आपली रक्कम गुंतवावयाची असेल, त्यांचीं नांवें घालून त्यांपुढें त्यांच्या ठेवीचा आंकडा मांडला जाईल. या दोन बुकांवरून सावकार व कूळ यांची गांठ घालून देणें सोपें होईल. मागणी व पुरवठा यांचा मेळ जेव्हां बसणार नाहीं, तेव्हां सरकार इतर बँकेकडे मागणी करून आपल्या सभासदांची सोय करून देईल. तसेंच मागणीपेक्षां पुरवठा जास्त झाल्यास अशा रकमा शेतकऱ्यांच्या जोडधंद्यांकडे गुंतवून दिल्या जातील. या योजनेनें परस्परांची सोय होत राहील.

प्रश्न ३—न्यायदानासाठीं उभारलेलीं तीं भव्य कोर्टें, त्यांतील तो विद्वान् वकीलवर्ग, कायद्याच्या पुस्तकांचीं भरलेलीं तीं सुंदर शेंकडों कपाटें, दरमहा शेंकडों रुपये पगार मिळविणारे ते सरकारी गाऊन घातलेले विद्वान न्यायमूर्ति, यांची सोय कशी लागेल ? गेल्या शंभर वर्षांच्या इंग्रजी अमदानींत इंग्रज राज्यकर्त्यांनीं मोठ्या धूर्तपणानें उभारलेला हा न्यायाचा सुंदर मोरपिसारा, सरकार एकदम कसा नाहींसा करील !

कोर्टबाजीचें उच्चाटन.

उत्तर—एक वसुलीबाब सरकारनें आपले हातीं घेतली व निरनिराळ्या दस्तांच्या नोंदी नीट पारखून करावयाच्या ठरविल्या, तर तंट्याचे प्रश्नच मुळीं उद्भवणार नाहींत ! मग वरील अवडंबर माजविण्याची जरूरी ती काय राहील ?

(१) वसुलीबाब सरकारनें आपले हातीं घेतल्यास, सावकारास आपले कुळावर फिर्यादी करण्याची जरूरी राहणार नाहीं.

(२) एकत्र कुटुम्बांतील सज्ञान व्यक्तीस विभक्त राहण्याची इच्छा झाल्यास, त्यांचें वाटप करून देण्याचें काम पंचायतीकडून झाल्यास, वाट्याच्या फिर्यादी उत्पन्न होणार नाहींत.

(३) विधवा स्त्रियांस त्यांच्या नवऱ्याचा हिस्सा उपभोगण्यास दिल्यास पोटगी हक्काचे दावे व त्यांच्या दरखास्ती उत्पन्न होणार नाहींत.

(४) एकत्र कुटुम्बांतील विधवेस दत्तक घेण्याची परवानगी दिल्यास, तिला दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता, म्हणून दावे निर्माण होणार नाहींत.

(५) वारसाहक्कानें जमिनी परघराण्यांत जातांना, वंशावळ बुकावरून त्याचा उलगडा सरकारास होत राहिल्यामुळें, लबाड लोकांस इस्टेट बळकावतां येणार नाहीं व योग्य वारसांना कोर्टांत दावे दाखल करण्याची जरूरीच उत्पन्न होणार नाहीं. त्यामुळें असे दावे मुळांतच जन्म पावणार नाहींत.

(६) खंडवसुलीचें काम सरकारनें आपलेकडे घेतल्यामुळें, मालकांस मदती करण्याची जरूरी भासणार नाहीं.

(७) जमीनदार व कूळ यांच्यांत खंडाचें प्रमाण पंचायतीकडून निश्चित होणार असल्यामुळें खंड वाढवून मागण्याचें किंवा कुळाला काढून टाकण्याचें काम यापुढें कोर्टांत येणार नाहीं.

(८) दत्तकपत्र, बक्षिसपत्र, खरेदीपत्र, मृत्युपत्र, इ. महत्वाचे कागद पंचायतीसमोर होणार असल्यामुळें, त्यांत लबाड लोकांस बोट शिरकवतां येणार नाहीं व असे कांहीं घोटाळे झालेच, तर वरिष्ठ पंचायतीकडे अर्ज करून, त्यांची दाद घेतां येईल. वरिष्ठ पंचायतीच्या सभासदांनीं प्रत्येक खेड्यास जाऊन तेथील कारभाराचें निरीक्षण करावयाचें असल्यामुळें असे घोटाळे त्यांच्या नजरेस आणून काढून टाकणें सुलभ जाईल. तेवढ्यासाठीं कोर्टाच्या महायात्रा करण्याची जरूरी उरणार नाहीं.

(९) समाजांतील तेढ नष्ट झाल्यामुळें मारामारी, घातपात हीं कामें बंद पडतील.

(१०) समाजाची आर्थिक घडी बसू लागतांच चोऱ्यामाऱ्या बंद पडूं लागतील. त्यामुळें फौजदारी काम संपुष्टांत येईल.

(११) अनीतिकारक वर्तन घडल्यास, त्यांच्यावर पंचायतीस सामाजिक बहिष्कार पुकारणें शक्य होईल. त्यामुळें सामाजिक नीतीचें संरक्षण व संवर्धन होईल.

(१२) खोटीं मृत्युपत्रें, दत्तकपत्रें यापुढें सहसा होणार नाहींत ! झाल्यास समाजांत भयंकर खळबळ माजून पंचांस राजीनामा देण्याची पाळी येईल. समाजाच्या दृष्टीनें तें कृत्य लबाडीचें ठरल्यास रद्द केलें जाईल. त्याकरितां कोणत्याहि हॉयकोर्टाचे किंवा प्रिव्ही कौन्सिलचे ठराव पहाण्याचें आम्हांस कारण

पडणार नाहीं. जनतेचा कौल हाच आमचा न्याय ! त्याकरितां कायद्याच्या पुस्तकांत डोकें खुपसण्याची आम्हांस जरूरी नाहीं.

(१३) यापुढें हुकूमनामा मिळविणें, अवार्ड करून घेणें, दरखास्त देणें, जप्तीवारंट काढणें, मिळकत लिलावास काढणें, माल दाखविणें, कबजा देणें, तुरुंग दरखास्त काढणें, साक्षीसमन्सें व पकडवारंटें काढणें इत्यादि शेंकडों कामें —भगभगी—समाजाच्या मागच्या कमी केल्या जातील.

(१४) या कायद्यांत वर्णन केलेल्या पद्धतीनें आम्हांस खेडुतांचें जीवित सुधारतां येईल; भांडणतंट्यांची कीड जन्मतांच मारतां येईल. त्याकरितां आम्हांस कायदा पाठ करण्याची जरूरी नाहीं.

(१५) लॉ कॉलेजमधून डिग्र्या मिळविण्याची जरूरी नाहीं.

(१६) आमच्या रोजच्या जीवनांत उपयोगी पडणारीं साधीं व सुटसुटीत तत्वेंच आम्हांला मार्गदर्शक होतील व आमचे व्यवहार सुरळीत चालूं देतील.

(१७) याकरितां आम्हांला कायदेपंडितांची जरूरी भासणार नाहीं.

(१८) पंचांना सरसनिरस पाहून वाटण्या करतां येऊं लागल्या.

(१९) दस्त नोंदणीचे छापील फार्म वांचून त्यांतील नोंदी कळूं लागल्या,

(२०) जमीनदार व सावकार यांचे हप्ते थकतांच योग्य तितकी जमीन लिलावास पुकरतां आली; तसेंच,

(२१) कर्जाच्या देवघेवींत तरम आकाराच्या दसपटीचें गणित करतां येऊं लागलें.

(२२) जमिनीच्या विक्रीचा पैसा योग्य कारणींच लागला हें पडताळून पाहातां येऊं लागलें, म्हणजे झालें ! ज्ञान बेताचेंच कां असेना, पण तें सत्तेच्या अधिष्ठानावर उभारलेलें असलें म्हणजे बस्स झालें !

इतका प्रपंच आटोपशीर व साधासुधा केल्यावर, आम्हांस त्या न्यायकोर्टांची जरूर ती काय राहिली ? व मग न्यायाच्या दरबारांतले विद्वान पुरोहित, वकील तरी पाहाण्याची जरूरी काय राहिली ? आमचे एकमेकांचे ' पिंड पाडण्यासाठीं ' बसलेल्या पुरोहितांना, आपले इंग्रजी दर्भ व पळीपंच-पात्र घेऊन व पोथी गुंडाळून (कायद्याचीं बाडें) घरीं जा, असें सांगण्या-

शिवाय कोणतें काम आमच्याजवळ मिळत राहील ?

डिस्ट्रिक्ट कोर्टाचें अस्तित्व

यापुढें प्रत्येक जिल्ह्यास एक न्यायकोर्ट राहील. या कोर्टाकडे मनुष्यवधाचे खटले जातील; मोठमोठे घातपात, भयंकर स्वरूपाच्या मारामाऱ्या, दरोडे यांचें काम जाईल. राजकीय खटले जातील ! निरनिराळया खात्यांतील नोकरवर्गानीं लाचलुचपत खाल्ल्यास त्यांना तेथें खेचतां येईल. व्यापारी कंपन्या व बँका यांनीं दिवाळीं पुकारल्यास, त्यांचा इन्साफ करतां येईल. वारसाहक्काचे गूढ प्रश्न सोडविण्यास हें कोर्ट पंचायतीस मदत करील. सारांश, वरीलसारखें अत्यंत अवघड व महत्वाचें काम जें शिल्लक राहील तें करण्यासाठीं जिल्ह्यास एक डि. कोर्ट व इलाख्यास एक हायकोर्ट ठेविलें असतां काम भागेल ! अनीतिकारक सामान्य गुन्ह्यास दंड करून, तर प्रसंगीं सामाजिक बहिष्काराचें शस्त्र उगारून, त्यांचा बंदोबस्त करणें अवघड जाणार नाहीं. अशा तऱ्हेनें कोर्टाच्या कामाचा उभारलेला हा डोलारा क्षणार्धांत ढांसळून पडेल ! ग्रामपंचायतीच्या बलिदानावर उभारलेला हा इंग्रजी न्यायासनाचा डोलारा, पापाचा घडा भरतांच नष्ट झालेला दिसणार नाहीं का ? वाचकहो, तो भविष्यकाल दूर नाहीं ! आपलें भवितव्य उज्वल असल्यामुळेंच, आपणांस ही ऋणविमोचनाची घटना भेटत आहे, तिला सामोरे येऊन भेटा, म्हणजे सर्व कांहीं जमून येईल !

न्यायदानाचें विचित्र जाळें.

न्यायदानाच्या साध्यासुध्या व्यवहारास किचकट रूप देऊन, ती सत्ता ग्रामपंचायतीकडून काढून घेण्यांत, व तेथील भांडणें, तालुक्याच्याच नव्हे तर, जिल्ह्याच्या व इलाख्याच्या शहरीं आणून भांडत ठेवण्यांत इंग्रज राज्यकर्त्यांनीं दाखविलेली धूर्तगिरी अजब आहे ! त्यांच्या या जादूगिरीनें भारलें गेलें नाहीं, असें आज एक खेडें या देशांत सांपडावयाचें नाहीं ! आमच्या रोजच्या जीवनाला जडलेला हा एक ' महारोगच ' नव्हे का ? या रोगानेंच, खेडेगांवांत दुफळ्या, नव्हे त्रिफळ्या माजून प्रत्यहीं त्यांचा ' त्रिफळा ' उडविला जात आहे ! लहानशा ठिणगीस फुंकर घातली असतां, ती फुलून चेतविली जाते; चेतविलेल्या अग्नीनें—अग्नीकडून—खांडववनें दग्ध केलीं जातात ! असा पराक्रमी पांड-

वांचा इतिहास आपणांस साक्ष देतो ! भांड्यास भांडें हें जसें लागावयाचें, व त्याचा नाद निघावयाचा, त्याप्रमाणेंच एकत्र जमलेल्या, एकमेकांशीं सर्व संबंध निगडित झालेल्या मानवी समाजांत धुसफूस, रागलोभ, स्वार्थ, मत्सर ह्या भावना निर्माण व्हावयाच्याच ! त्या क्रमप्राप्तच आहेत ! त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या ह्या रागलोभाच्या भावनांना आळा घालून त्यांचा गोड मिलाफ घडवून आणण्याचें काम समाजांतील शहाण्यासुर्त्या, वयोवृद्ध पंचांकडे पूर्वीं असे !

इंग्रजी अमदानीपूर्वीं, गांवांतील भांडणें गांवकुसवाच्याबाहेर सहसा ऐकूं जात नसत ! समाजांतील ते वयोवृद्ध पुढारी—नगरपिते—आपल्या डोळ्याच्या दाबाखालीं या खोडकर प्रौढ मुलांना समजावणी देऊन, त्यांच्यांतील उपजत गोडी कायम ठेवीत असत ! पण तो मनु इंग्रज राज्यकर्त्यांच्या आगमनाबरोबर पालटला ! ते आमचे वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध नगरपिते नाहींसे झाले ! त्यांच्या जागा मॅजिस्ट्रेट व जज्ज यांनीं विभूषित केल्या ! ते तालुक्याच्या, जिल्ह्याच्या वा इलाख्याच्या शहरीं राहून तेथूनच आमचीं भांडणें मिटवूं लागले. 'उंटावरून शेळ्या हाकणाराप्रमाणें' त्यांच्या तेथील कामगिरीस स्वरूप आलें ! या दोन वर्गांचें पुरोहित कर्म करण्यास इंग्रजी अमदानींत 'वकिल वर्ग' निर्माण झाला. त्यांच्या बुद्धिवादाचीं भाष्यें निर्माण झालीं ! त्याला कायद्याच्या पुस्तकाचें रूप प्राप्त झालें ! मनुष्यस्वभावांतील—भांडणांतील चेतविलेला प्रत्येक कप्पा त्यांत खोलला गेला. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' आणि 'प्रकृति तितके स्वभाव' लक्षांत घेतलेल्या ह्या जादूगारांनीं न्यायाचें जाळें इतकें गुंतागुंतीचें करून टाकलें कीं, तें पाहून मन थक्क होऊन जातें ! आजची समाजव्यवस्था नीट लावणारा 'मनु' आपल्या एका 'मनुस्मृतीच्या' आधारें समाजधारणा करीत होता ! आर्यांच्या उपलब्ध झालेल्या दहा हजार वर्षांच्या इतिहासांत, एका 'मनुस्मृतीनें' आमची समाजव्यवस्था स्थिर ठेविली ! पण आजकाल पहावें, तों साराच प्रकार विपरीत दिसतो ! दरसाल प्रत्येक हायकोर्टांकडून व प्रिव्ही कौन्सिलकडून, आणि आतां तर आणखी फेडरल कोर्टांकडून निकालाची, कायद्याच्या सूक्ष्म अंगोपांगांची बरोबर छाननी केलेलीं मोठमोठीं पुस्तकें निर्माण होतच आहेत ! या विद्वान् न्यायमूर्तींनीं न्यायदानाचें विचित्र जाळें गुंफून त्यांत प्रत्यहीं सांपडणाऱ्या मानवरूपी पक्ष्याची शिकार (न्यायदान) कशी करावी, याचें तयार केलेलें शास्त्र

म्हणजेच हल्लींच्या कायद्याचीं लठ्ठ लठ्ठ बुकें होत ना ?

लेखनकलेचा उदय होण्यापूर्वीं, पंचांना, दिलेले निकाल आपल्या स्मृतींत ठेवावे लागत असत ! तेवढ्या आठवणीवर, त्यांना आमची समाजव्यवस्था बरोबर लावून देतां येत असे ! त्याच समाजव्यवस्थेंतून निर्माण झालेल्या आजच्या घटकांना मात्र, इंग्रजी कायदा समजून घेण्यासाठीं, ' लॉ लायब्ररी 'चें उद्घाटन करावें लागतें ! प्रत्येक न्यायमंदिरांत कायद्याच्या पुस्तकांनीं खच्चून भरलेलीं कपाटें पाहिलीं, म्हणजे इंग्रजांच्या न्यायकौशल्याची धन्यता वाटते ! कुठें आमची मनुस्मृति आणि कुठें हा आजचा ज्ञानाचा भरलेला अथांग सागर ! धन्य धन्य त्या इंग्रजांची ! कीं ज्यांनीं एवढा ज्ञानसमुद्र आम्हांस प्राशन करावयास निर्माण करून दिला ! वाचकहो, ह्या ज्ञानसागरानें आपली तहान शमेल काय ? कोट्यवधि खेडुतांच्या जिवाचें पाणी पाणी करून हा अथांग भरलेला ' ज्ञानसागर ' निर्वाणीच्या वेळीं, त्यांना समाधानाचें घोटभर पाणी पाजील का ? न्यायाच्या दरबारांत जाऊन जन्मभर दावे खेळणाऱ्या ' दावेदारांना ' मृत्युसमयीं समाधानाचें—सत्कृतीचें घोटभर पाणी—त्यांतून मिळेल का ? अशी वेडी आशा करण्यांत काय अर्थ आहे ? ब्रिटिश न्यायकोर्टांतील भांडणें भांडून कोणी मोक्षपदास गेलें आहे का ? लोकमान्य टिळकांनीं चिरोलसाहेबावर ' प्रिव्ही कौन्सिल 'मध्यें केस गुदरली, म्हणून त्यांना तरी हा 'मोक्ष' तेथें लाभला का ? वॉरन हेस्टिंग्जनें लोकांवर भयंकर जुलूम केला, म्हणून त्याच्यावर त्या वेळच्या विरुद्ध मंडळींनीं ब्रिटिश कोर्टांत सात वर्षें वाद घातला; त्यांना तरी ' मोक्ष ' मिळाला का ? तेव्हां हा नाद आतां सोडा ! हें नाटक आतां बस्स करा ! तीं कायद्याचीं सुंदर कपाटें वस्तुसंग्रहालयांत नेऊन ठेवा, म्हणजे तुमच्या जिवाचा फास तरी कमी होईल !

इतका व्याप आटोपशीर केल्यावर, त्या शेंकडों सुंदर न्यायकोर्टांच्या इमारतींची जरूरी ती काय राहिली ? त्या कोर्टांच्या सुंदर इमारतींचीं सुंदर रुग्णालयें केल्यास आजपर्यंत ऋणग्रस्ततेनें, भांडखोर वृत्तीनें व कज्जेदलालीनें जर्जर झालेल्या समाजाची शुश्रूषा तरी त्यांत होईल ! व असा कोर्टबाजीनें घायाळ होऊन मृत्युपंथास लागलेला समाज तरी बरा होऊन, जगांतील सुख व सौंदर्य

ऱ्याचा उपभोग आणखी कांहीं काळ तरी सुखासमाधानानें घेत राहील ?

सुवर्णसंधीचा लाभ !

आज राष्ट्राध्यक्ष बाबू सुभाषचंद्र बोस यांनीं स्थापिलेल्या ' अखिल भारतीय नियोजन मंडळास ' अखिल हिंदुस्थानभर औद्योगिक क्रांति करावयाची आहे. उद्योगधंद्यांचें जाळें सर्वत्र पसरून कोट्यवधि रुपयांचें परदेशीं जाणारें धन अडवून आपल्या पदरांत पाडून घ्यावयाचें आहे ! आपल्यांतील लाखों तरुणांना कामास लावून, समाजांतील बेकारी नाहींशी करावयाची आहे ! हिंदुस्थानच्या सुवर्णभूमीचीं उडालेलीं शकलें एकत्र करून तिला आलेलें दैन्य नाहींसें करावयाचें आहे ! आज ह्या योजनेस सक्रिय पाठिंबा देण्याचें धोरण सर्व प्रांतिक कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं आंखलें असल्यामुळें, ही योजना पुढील १० वर्षांत भारताचा अभ्युदय केल्याशिवाय राहाणार नाहीं ! अशा सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचा योग, ह्यांतून रिकाम्या होणाऱ्या बुद्धिमान वर्गास घरबसल्या चालून येत आहे ! मग अशा वेळीं, ' खटाळण्या ' करण्याचें सोडून देऊन, त्या संधीचा फायदा घेतल्याशिवाय हा वर्ग कसा राहील ? ह्या ' आर्थिक नियोजनमंडळाचें ' अध्यक्षस्थान बॅरिस्टर जवाहिरलाल नेहरूसारख्या अव्वल प्रतीच्या पुढाऱ्याकडे आलें असल्यामुळें, त्यांच्या बिनीच्या फौजेंत, हा वकील–बॅरिस्टर वर्ग सामील झाल्याशिवाय कसा राहील ? देशहिताच्या प्रत्येक आघाडीवर छातीठोकपणें पुढें सरसावणारा हा वर्ग, देशाच्या औद्योगिक क्रांतींत सामिल झाल्याशिवाय कसा राहील ! अर्थात् त्याच्या मागचा हा कोर्टकज्जाचा ' ससेमिरा ' कमी केल्याशिवाय, त्यांना उडी मारतां येणार नाहीं, हें समजून हल्लींच्या प्रधानमंडळांनीं त्यांचा मार्ग सुकर करून द्यावयास नको का ? हें महत्वाचें–राष्ट्राच्या जिव्हाळ्याचें कार्य, ' ऋणविमोचनाच्या ' कायद्यानें घडून येत असल्यामुळें, त्या बहुलाभदायी घटनेचा–कायद्याचा–स्वीकार, हल्लींचीं राष्ट्रीय कॉंग्रेस प्रधानमंडळें केल्याशिवाय कशीं राहतील ?

प्रश्न ४—हल्लींच्या सावकारी पद्धतींत सावकार व कूळ यांच्यांत सरकारची त्रयस्थपणाची भूमिका असतां ह्या दोन वर्गांत वितुष्ट कां यावें ? व त्या दोषाचें खापर सरकारच्या माथीं मारण्यांत कां यावें ?

उत्तर—या वितुष्टाचें बीज सरकारच्या तटस्थपणाच्या भूमिकेंतच रुजलेलें आहे ! " तुम्ही आपले देवघेवीचे व्यवहार परस्पर सहानुभूतीनें व सहकार्यानें चालवा, आम्हांस त्यांत पडण्याचें कारण नाहीं. पण जर हें तुमच्यांतील सहकार्य नष्ट होत असेल, तर आमची मदत मागितल्यास ती आम्ही आमचें पवित्र कर्तव्य समजून आनंदानें देऊं." ही सरकारची राजनीतीची भाषा, ' व्यक्तिस्वातंत्र्याच्या ' गोड नांवाखालीं कितीहि गोंडस दिसली, तरी त्याच भाषेनें शेतकरी आणि सावकार यांची पूर्ण फसगत केली आहे ! शेतकऱ्यांचें उत्पन्न घटलें, लोकसंख्या वाढली, लोकांच्या आवडीनिवडी बदलल्या, राहाणी खर्चाळ झाली, परदेशीं जाणाऱ्या कोट्यवधि पैशांचा प्रवाह शतकानुशतकें सुरू राहिल्यामुळें शेतकरी द्रव्यदृष्ट्या निखालस धुवून निघाला. त्यांतच दुष्काळ, रोगराई, इत्यादि दैवी कोपांनीं तो त्रस्त व कंगाल बनला. अशा स्थितींत त्याला आपला शब्द खरा करून दाखवितां येईना ! त्यामुळें त्याच्या पदरांत लबाडी पडूं लागली; तो अविश्वासाचें स्थान झाला ! त्यामुळें त्याला जबर व्याजाच्या कैचींत धरून व न्यायासनापुढें खेंचून आपल्या रकमा वसूल करून घेणें सावकारांस भाग पडलें ! ' देवो दुर्बलघातकः ' या न्यायानें सावकार व सरकार यांनीं त्याच्या ' असहाय ' परिस्थितीचा विचार न करितां, त्याच्यावर कायद्याचें शस्त्र उगारून त्याचा वृत्तिच्छेद चालविला ! त्याची माणुसकी पणास लाविली व त्यास ब्रिटिश न्यायदेवतेकडून ' लुच्चा व लबाड ' ठरवून त्यास जगांत नादान म्हणून ठरविलें; आणि हें कशाकरितां ? तर सावकाराची घेतलेली रक्कम तो सरळपणें देत नाहीं म्हणून ! यास जबाबदार कोण ? सरकार, सावकार कां शेतकरी ? शेतकऱ्यांचें उत्पन्न कोणीं घटविलें ? त्यांच्या जोडधंद्यांचा नाश कोणीं केला ? त्यांचें आर्थिक द्रव्यशोषण कोणीं चालविलें ? दुष्काळाच्या वेळीं उघड्या डोळ्यांनीं, आपल्या लेकराबाळांचें मरण पाहाण्याचा भीषण प्रसंग त्याच्यावर कोणीं कसा आणिला ? या सर्व कृत्यांची जबाबदारी राजशासन संस्थेवरच पडत नाहीं का ? आणि जर पडत असेल, तर प्रांतिक स्वायत्ततेच्या अमदानींत राष्ट्रीय सरकारचें, त्या सदोष अंतर्गत व्यवस्थेंत सुधारणा करणें हें पवित्र कर्तव्य ठरत नाहीं का ?

प्रांतिक बजेटाची उभारणी

आजच्या सावकारी पद्धतींत व सरकारच्या वसुली व न्यायदान कारभारांत

शेतकऱ्यांची पद्धतशीर अडवणूक व फसवणूक चाललेली आहे ! प्रांतिक सरकारांनीं तर दारूबाजी (अबकारी खातें) प्रमाणेंच कोर्टबाजी (न्यायखातें) हें आपल्या उत्पन्नाचें साधन करून टाकलें आहे ! ब्रिटिश सरकारनें प्रांतिक स्वायत्तता देतांना आमच्या डोळ्यांत टाकिलेली ही धूळफेक नव्हे का ? त्यांनीं आपल्या बजेटाच्या जमेंत, संस्थानिकांकडील खंडणी ८५ लाख रुपये, परकीय मालावरील आयात व निर्यात जकात सुमारें ५५ कोट रुपये, रेल्वेकडील उत्पन्न सुमारें ३५ कोटि रुपये, मिठावरील कर ८ कोटि रुपये, प्राप्तीवरील कर १५ कोट रुपये, मादक पदार्थांवरील कर ७ कोट रुपये, पोस्ट व कर्जाऊ रकमांवरील व्याज वगैरे १५ कोट रुपये इत्यादि न्याय्य कर आपल्या खर्चाकडे ठेवून घेऊन, दारू ३॥ कोटि रुपये, कोर्ट व रजिस्ट्रेशन फी २ कोटि रुपये, जंगल ४० लाख रुपये, करमणूक १६ लाख रुपये इत्यादि बाबींतील अन्याय्य करांचा पैसा प्रांतिक सरकारच्या पदरांत टाकिला ! या करांच्या पैशानेंच प्रांतिक सरकारचें अर्धे अधिक बजेट भरलेलें दिसेल. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांच्या सनदशीर करांवर उभारलेल्या ह्या बजेटांत, मंत्रिमंडळाला कर्तबगारी दाखविण्यास कोणता मार्ग शिल्लक ठेविलेला आहे ? लोकांनीं भरपूर दारू प्यावी व आपल्या घरादारांवर निखारा ठेवून प्रांतिक सरकारला, आपल्या जवळ असेल नसेल तो पैसा मिळवून द्यावा, लोकांनीं आपआपसांत लाथाळी माजवून घेऊन कोर्टकज्जापायीं आपल्या घरादाराचा ‘ उन्हाळा ’ करून घ्यावा व प्रांतिक सरकारची २ कोटीची भर करावी ! अशा तऱ्हेनें लोकांच्या संस्कृतिनाशाच्या महान पातकावर, प्रांतिक सरकारच्या बजेटाची उभारणी करून देऊन ब्रिटिश गव्हर्नमेंट मोकळें झालें आहे ! त्यामुळें प्रांतिक सरकार आज असें पेचांत येऊन पडलें आहे कीं, हें पापी धन गोळा करावें तर लोकांचा संस्कृतिनाश होतो व लोक कंगाल होऊन दुबळे बनतात ! बरें, हें धनगोळा न करावें, तर बजेटाची तोंडमिळवणी होत नाहीं ! शिक्षण, आरोग्य, शेती इत्यादि लोकोपयोगीं खात्यांची उपासमार होते ! यावरून ब्रिटिशांच्या धूर्तगिरीची बरोबर कल्पना होते !

कोर्टकचेऱ्या हें उत्पन्नाचें साधन सरकारनें ठरविल्यामुळें, या व्यसनास आज राजमान्यतेचें स्वरूप प्राप्त झालें आहे ! व त्याबद्दल कोणास दिक्कत वाटेनाशी

झाली आहे ! सरकारचा हा खेळ होतो खरा, पण इकडे लाखों दीनदुबळी जनता भरडून निघत आहे, त्याची वाट काय ? सावकार हे कोर्टांत ओढले जावेत, म्हणून त्यांच्यावर प्रथम दस्त ऐवज करण्याची जबाबदारी टाकिली ! आणि पुढें तो दस्तऐवज खरा करून घेण्याचा बोजाही त्यांचेचवर लादला ! या गोष्टीमुळें भिऊन जाऊन सावकार माघार घेईल, कच खाईल, तर ह्या दाव्याचा खर्च कुळाकडून भरून देण्याची हमी, नव्हे गोड आमिष त्याला दाखविण्यांत आलें ! मग तो कोर्टबाजीस कां प्रवृत्त होणार नाहीं ? सावकार एकदां कोर्टांत ओढला कीं, त्याचीं सर्व कुळें आपल्या लव्याजम्यानिशीं त्यांत येऊन पडतील, हा सरकारचा अंदाज खरा ठरला ! सावकाराकडून घेतलेलें कर्ज त्यास परत देऊं नये, असा खरोखरी घेणाराचा हेतु असतो का ? पण हल्लींच्या राज्यघटनेंत त्याला तें फेडणें अशक्य होत असल्यामुळें, तो सरकारच्या न्यायदानरूपी जाळ्यांत बरोबर अडकला जातो ! त्याला तो सर्व देखावा आपल्या हितासाठींच उभारलेला आहे असा भास होतो, कां होणार नाहीं ? आपण सावकाराचें प्रत्यक्ष कर्ज घेतलें असूनही ‘ तें सिद्ध करून दे ’ म्हणून सरकार त्याच्यावर ‘ पुराव्याचा बोजा ’ टाकीत असतां सरकारच्या न्यायप्रियतेबद्दल त्याची खात्री कां होणार नाहीं ? कोर्टांची लढत खेळली असतां, व्याजाच्या दरांत मिळणारी सवलत, रकमेची हप्तेबंदी, दोन हप्ते थकेपर्यंत पुन्हा मुदतीची सूट इत्यादि फायदे त्याच्या डोळ्यांपुढें उभे असतां, तो कोर्टबाजीस कां प्रवृत्त होणार नाहीं ? यापैकीं कोणतीच गोष्ट सावकाराकडून त्यास मिळत नसतां, तो सावकारास आपसांत पैसा कां देईल ? अगोदर त्याची परिस्थिति दारिद्र्यानें पोखरलेली असते; तशांत सावकारानें त्याच्याकडून दिढीदुणीचा दस्तऐवज करून घेतलेला असतो; डोईजड व्याज लावून घेतलेलें असतें ! इतकेंहि करून त्याला एकदम रक्कम पाहिजे असते ! मग हा सौदा आपसांत कसा मिटावा ?

पवित्र कोर्टाची उभारणी.

कुळानें कोर्टांत जाण्याचा प्रसंग आणूं नये म्हणून, सावकार त्यास जों जों बांधून घेतो, तों तों तें कूळ पिसाटाप्रमाणें कोर्टाकडेच पळत सुटतें; त्याला सरकारनें तरी काय करावें ? दयाळू सरकारला सगळेच सारखे ! “ नव्याण्णव

गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एकाहि निरपराध्यास शिक्षा होऊं नये " हें ब्रिटिश न्यायदेवतेचें तत्त्व उच्च नाहीं, असें कोण म्हणेल ? त्या तत्त्वाच्या पाठपुराव्यासाठीं सरकारला आपलीं न्यायकोर्टें स्थापन करून, न्याय मिळवून द्यावयास नको का ? बरें, अशा वेळीं या अडाणी खेडुतांचें म्हणणें ह्या विद्वान् न्यायमूर्तींस पटवून देण्यासाठीं विद्वान् पुरोहिताची—वकिलांची मदत नको का ? बरें, वकिलांनीं तरी ' वकिली ' हें आपल्या चरितार्थाचें ' एकमेव साधन ' ठरविल्यास, शक्य तितका जास्त पैसा मिळविण्याचा प्रयत्न केला, तरी तो वावगा ठरेल का ? वकिलीच्या धंद्यांत प्रमाणापेक्षां जास्त झालेल्या खेंचाखेंचीमुळें, आपलें ' प्रॅक्टिस ' सांभाळलें जावें म्हणून कांहींनीं ' एजन्सी खातें ' उघडून त्या कामीं गांवगुंडांची मदत घेतल्यास, ती तरी न्यायाच्या दरबारांत वावगी ठरेल का ? वकील हा झाडाचा सच्चा असतो ! पण पक्षकाराच्या हितासाठीं त्याला तें सच्चेपण बाजूस सारून प्रसंगविशेषीं, 'तूं असें असें सांग, भिऊं नको; नाहीं तर दावा बुडेल ' असें सांगावें लागतें ! त्यांत त्याचा दोष काय ? मुळांतला खरा प्रकार कित्येक मैल दूर राहात असलेल्या वकीलांना कसा कळावा? प्रत्येक पक्षकार आपली बाजू न्याय्य आहे अशी त्यांची खात्री करून देत असतां, घरीं चालून आलेल्या लक्ष्मीचा कोण त्याग करील ? आणि अशा प्रसंगीं आपल्या वाढत्या लौकिकानुसार त्या गरजू पक्षकाराजवळ वकील फी, बयाणा व बक्षिसी याची ' योग्य ती ' रक्कम घेतल्यास ती तरी वावगी कशी ठरेल ? अशा वकीलाचा वाढता लौकिक, त्याचें कोर्टावरील इंप्रेशन, त्याचीं क्रॉस करण्याची अजब हातोटी ह्या गोष्टी पाहून कोणता पक्षकार मोहित होणार नाहीं ? आणि असा चांगला वकील मिळविण्यासाठीं त्यानें आपल्या जीविताची सांठविलेली ' दौलत ' जरा जास्त कमी उधळली, तर तो त्याचा तरी दोष कसा होईल ?

कोर्टाच्या दरबारांत जमा झालेले सर्वच आपआपल्यापरी खरे असतात ! दोष जर कांहीं होत असेल, तर हें सर्व अवडंबर माजविण्यांत ! नदीच्या पात्रांतून स्वैरसंचार करणारे मासे, कोळ्यानें टाकिलेल्या जाळ्यांत सांपडले, तर तो माशांचा दोष होईल का ? तटस्थपणाचें व्रत स्वीकारून न्यायदानाचें विचित्र जाळें पसरलें असतां, त्यांत सावकार व पक्षकार सांपडले, तर तो त्यांचा दोष

होईल का ? म्हणून प्रांतिक सरकारांना अशी विनंती करावीशी वाटते कीं, आतां हा खेळ आटोपता घ्या ! तटस्थपणाचें व्रत सोडून देऊन, कोट्यवधि जनतेची होत असलेली कुचंबणा दूर करण्यासाठीं, ह्या 'ऋणविमोचनाच्या' कायद्याची कास धरा, तरच जनतेचा अभ्युदय होईल !

प्रश्न ५—पाटील तलाठी सिस्टीमचें (पद्धतीचें) रूपांतर ग्रामपंचायतींत करण्यापासून काय फायदा होईल ? ह्या पद्धतीस वतनदार पाटलांचा विरोध होणार नाहीं का ?

उत्तर—गावची संपूर्ण सत्ता पंचायतीकडे देऊन त्या बलिष्ठ करणें, हें महत्वाचें कार्य साधण्यासाठीं ही दोहातीं राज्यकारभाराची पद्धति बंद करावयास पाहिजे. सावकारी हप्ते, जमिनदारांचे खंड, रेकार्ड आफ् राईटच्या सर्व नोंदी, कर्जाची देवघेव यांसारखीं अत्यंत महत्वाचीं कामें पंचायतीकडे सोपविल्यानंतर, निव्वळ सरकारी साऱ्याच्या वसुलीसाठीं व त्यानिमित्त कागदपत्राच्या व्यवस्थेसाठीं, पाटील तलाठी-वर्ग निराळा ठेवण्याची जरूरी दिसत नाहीं. पंचायतीला सेक्रेटरीची अत्यंत जरूरी असल्यामुळें, खर्चाच्या दृष्टीनें हल्लींच्या तलाठ्यांचीच त्या जागीं नेमणूक झाल्यास, फायदेशीर होईल. जमीनदार व सावकार यांच्या कोट्यवधि रकमांचा वसूल पंचायतीमार्फत होत असतां, त्याबरोबरच सरकारी सारा तीन साडेतीन कोटि रुपये वसूल करणें कितीसें अवघड जाईल ? दोहातीं राज्यकारभारापेक्षां एकहातीं राज्यकारभार हा लोकांच्या सोईच्या दृष्टीनें फार चांगला असतो. ह्या कायद्यानें तलाठ्यांचा पगार व ग्रेड ह्यांत कोणताही फरक केला नाहीं. फक्त कामाचें स्वरूप व क्षेत्र बदललें आहे. 'पाटीलकी' ही पाटील घराण्यांतून वंशपरंपरा चालू आहे. त्याकरितां 'पाटील वतनी' जमिनी त्यांच्या घराण्यांत वंशपरंपरा चालू आहेत. त्या त्यांच्या परंपरागत हक्कांत ह्या कायद्यानें कोणताच हात घातलेला नाहीं. आजपर्यंत पाटीलवर्गानें अल्प वेतनावर संतुष्ट राहून गांवचा वसूल करून देण्याचें महत्वाचें कार्य केलें असल्यामुळें 'पाटील वतनें' हीं त्यांच्या श्रमाचीं फळें होत. त्यांत हात घालणें हा कृतघ्नपणा होईल. पाटील-वतनाप्रमाणेंच कुलकर्णी-वतनाच्या जमिनी 'वतनी जमिनीच्या' हक्काप्रमाणें त्यांच्या घराण्यांत वंशपरंपरा चालविल्या गेल्या पाहिजेत.

तो त्या वर्गाचा हक्क आहे. आजपर्यंत गांवचा गाडा सुरळीत चालू ठेवण्याचें महत्वाचें कार्य पाटील कुलकर्णी या वतनदार वर्गाकडून झालें असल्यामुळें त्यांच्या वतन हक्कांत कोणत्याहि प्रकारें फरक करणें इष्ट होणार नाहीं.

सरंजामी पद्धतीचे दुष्परिमाम !

आतां फक्त प्रश्न राहातो त्यांच्या नोकरीचा. नोकरी हा व्यक्तीच्या कर्तबगारीचा प्रश्न असतो. ह्या कामीं सरंजामी पद्धत लावणें चुकीचें आहे. सरंजामी पद्धतींत दुर्गुणी माणसें निपजतांच राष्ट्राचा अधःपात होतो ! मराठे सरदार व पेशवे यांच्या घराण्यांत सरदारक्या व प्रधानपदें वंशपरंपरा चालू ठेवल्यामुळें, त्या घराण्यांत नालायक लोक निपजतांच त्यांनीं राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा नाश करून टाकिला. शिवाजी राजे हे सरंजामी पद्धतीच्या विरुद्ध होते. त्यांच्या राज्यघटनेचें स्वरूप ब्रिटिश प्रधानमंडळाच्या धर्तीवर होतें. पण पुढें संभाजी राजानंतर पालटलेल्या काळांत राजाराममहाराजांचा जम या पद्धतीनेंच बसला. पण त्या पद्धतींत इष्ट त्या सुधारणा न झाल्यामुळें नालायक लोकांच्या हातीं पुढें सत्ता गेली व राष्ट्राचें भयंकर नुकसान झालें. ब्रिटीश राज्यकर्त्यांनीं वंशपरंपरा नोकरीचें घातुक तत्व कधींच स्वीकारलें नाहीं. त्यामुळें प्रत्येक वेळीं अत्यंत लायक व कर्तबगार व्यक्तींचा त्यांना पुरवठा होत गेला. सनदी नोकरदार वर्ग हा मराठी राज्यांत त्या कालाला अनुरूप असा नेमला गेला. तो काळ आतां राहिला नाहीं. हल्लीं सगळ्या संस्थानांतूनसुद्धां सनदी नोकर वर्ग कमी केला असून, पगारी नोकरांची पद्धत रूढ केली आहे. ह्या पद्धतीनें लायक लोकांच्याच हातीं सत्ता जाते. पाटीलकीची नोकरी हा त्या सरंजामपद्धतींतील अवशेष अजून राहिलेला आहे. ही वतनी नोकरी घेण्याच्या बाबतींत सरकारनें कोणत्याच प्रकारची सुधारणा न केल्यामुळें ह्या वतनावर काम करणारे शेंकडा ५० पाटील तरी निरक्षर आहेत. व त्यांना वेतनही अत्यंत अल्प आहे. त्यांना त्याबद्दल रोजीं दोनतीन आण्यांपेक्षां जास्त पगार दिला जात नाहीं. हा वर्ग निरक्षर ठेवण्यांत (साक्षरतेची अट न घालण्यांत) सरकारनें काय साधलें तें कळत नाहीं. आपल्या प्रत्येक खात्यांतून क्वालिफाईड (पास झालेले) इसम नेमण्याचा सरकारचा कटाक्ष असतां, पाटील वर्गावर शिक्षणाची अट न लादण्यांत सरकारचा काय हेतु

असावा ? हा वर्ग अज्ञानांत ठेवण्यानें, राज्यकारभाराचें आर्थिक स्वरूप सामान्य जनतेपासून लपवून ठेवण्यांत आलें, असें म्हटल्यास तें चुकीचें होईल का ? जे पाटील सरकारला दरसाल कोट्यवधि रुपयांचा जमीनसारा वसूल करून देतात त्या पाटलांना अक्षरशत्रु ठेवणें अत्यंत चुकीचें आहे.

काम थोडें पण उठाठेव जास्त.

पाटलांच्या मानानें तलाठ्यांना पगारही चांगले असतात व कामही भरपूर असतें. पाटलांना काम कमी व पगारही कमी असतो. पण त्यांचा सर्व वेळ तलाठ्यांच्या बरोबर उठाठेवी करण्यांत जात असल्यामुळें त्यांच्या शेतीवाडीचें फार नुकसान होतें. त्या दृष्टीनें विचार करतां पाटलांना ह्या नोकरीपासून खरा फायदा कांहींच होत नाहीं. दस्तनोंदणीच्या वेळीं तालुक्याच्या गांवीं जातांना शेतकऱ्यांकडून जो कांहीं ' हात ओला ' होत असेल तेवढाच ! यापुढें ह्या कायद्यानें तोहि फायदा नष्ट होत असल्यामुळें, पाटील-नोकरीचा मोह फारसा कोणास राहाणार नाहीं. काम थोडें, पगार थोडा व सत्ता तर बेताचीच, यामुळें ही नोकरी तितकीशी महत्वाची राहिलेली नाहीं. म्हणून ती कमी करण्यांत पाटील-वर्गाचा मोठा विरोध होईल असें वाटत नाहीं. त्यांना आपल्या अंगच्या गुणानें पंचायतींत निवडून येणें अशक्य नाहीं. त्या ठिकाणीं निवडून येतांच त्यांना वार्षिक बोनसाचा लाभ होईल; व खऱ्या सत्तेचा व मानमान्यतेचा लाभ मिळूं लागेल. म्हणून ह्या वर्गाचें लक्ष ह्या बहुलाभदायी घटनेकडे आकर्षल्याशिवाय कसें राहील ?

प्रकरण ४ थें,
ऋणविमोचनाचें राष्ट्रीय स्वरूप व अखिलभारतीय स्थान.

(१) समाजधारणेस सोईस्कर अशी सावकारीची घटना.

राष्ट्राच्या सुसंपन्नतेचा व जीवनाचा मूलाधार असा जो शेतकरीवर्ग, तो कर्जमुक्त कसा करावा, यासंबंधीं पुष्कळच उहापोह मागील सर्व प्रकरणांतून केला आहे. या प्रकरणांत, या प्रश्नाला ' अखिल भारतीय विराट् स्वरूप ' कसें प्राप्त झालें आहे, व त्यामुळें हा प्रश्न आज राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा कसा होऊन बसला आहे तें स्पष्ट करावयाचें आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या कामीं ' मानवी स्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण ' लक्षांत घेतलें पाहिजे. नाहीं तर भावनावश होऊन, शेतकऱ्यांच्या हितासाठीं म्हणून करावयास गेलेल्या सुधारणा ह्या त्यांच्याच नाशाला कारणीभूत व्हावयाच्या ! कारण सावकार हा वर्ग कांहीं समाजांत निराळा समजला जात नाहीं. जेव्हां एकादा मनुष्य आपल्या अंगच्या कर्तबगारीनें दोन पैसे मिळवून शिल्लक टाकूं लागतो, व आपल्या भोंवतालच्या समाजास त्याचा वापर करावयास देतो, तेव्हां तो ' सावकार ' ठरतो. आजचा गरीब मनुष्य उद्यांचा सावकार बनेल, तर आजचा सावकार हा उद्यांचा गरीब मजूर बनेल ! हा सर्व चंचल अशा लक्ष्मीचा खेळ आहे ! रंकाचा राव बनणें किंवा रावाचा रंक बनणें, हें व्यक्तीच्या अंगच्या गुणावगुणांवर अवलंबून असतें. आज सर्व जगांत संपन्न असा ' ज्यू ' समाज जसा जर्मनींत, जर्मनांच्या रोषास बळी पडत आहे, त्याप्रमाणेंच भावी कालांत हा सावकार वर्ग, ह्या देशांतील बहुसंख्याक अशा गरीबांच्या रोषास बळी पडेल अशी साधार भीति वाटते ! प्रांतिक सरकारलासुद्धां ह्या प्रश्नाचें भूत सारखें भेडसावीत असल्यामुळें, त्यांचाही आपल्या मनांवरील ताबा उडत चालला असून, या प्रश्नाला विकृत स्वरूप येऊं पहात आहे. म्हणून या प्रसंगीं समाजधारणा नीट होणारी शाश्वत स्वरूपाची घटना तयार करून, तिच्यावर हल्लींच्या समाजाची व्यावहारिक उभारणी

व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीनें ह्या पुस्तकांत दिलेली योजना समाजाचें योग्य धारणपोषण करण्यास कशी समर्थ आहे तें दिसून येईल.

प्रचलित सदोष घटना.

हल्लींच्या सावकारी पद्धतींत जनतेवर जो कांहीं जुलूम होत असेल, त्याचा दोष सावकाराकडे नसून, तो सदोष राज्यघटनेचा परिणाम आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. ती सदोष घटना न बदलतां सावकार वर्गावरच हत्यार उपसून त्यांचा वृत्तिच्छेद चालविल्यास, समाजधारणेस जरूर तो पैसा यापुढें व्यवहारांत उतरणें अशक्य होईल. सावकारीचे हिशोब व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी त्या वर्गावर न टाकतां, ती सरकारनें आपलेवर घेऊन पंचायतीच्या द्वारा पार पाडली पाहिजे, तरच त्यांतील दोष नाहींसे होतील. नाहींतर प्रत्यक्ष व्यवहार व कागदी जमाखर्च यांचा मेळ कधींच बसणार नाहीं. बहुजनसमाज निरक्षर असल्यामुळें सावकारांचें कागदी गौडबंगाल त्यांच्या लक्षांत कधींच येणार नाहीं !

सावकारींत बँकेचें स्थान.

बँकांची उभारणी ही ठेवीदारांच्या निधीवर झालेली असते. ठेवीदार हे बँकेचे सावकार होत ! त्यांना आपल्या ठेवीदारांची पत सांभाळावी लागत असल्यामुळें, व्यवहारांत गुंतविलेला पैसा कसोशीनें वसूल करून घ्यावा लागतो. या इलाख्यांतील शेतकऱ्यास कर्ज देणारी बॉंबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक ही एक आहे. ह्या बँकेनें कोट्यवधि रुपयांचें कर्ज शेतकरी वर्गास दिलें आहे. व तें, कर्जवसुलीचे एक किंवा दोन हप्ते ठरवून ती वसूल करून घेते. बँकांच्या देवघेवीचा कायदा सावकारी कायद्याहून निराळा असल्यामुळें, वसूल थकतांच जमिनींचे लिलांव भराभर करून, किंवा घरांतील जंगम माल जप्त करून, वसूल करून घेणें त्यांना सुलभ झालें आहे. प्रसंगीं सावकाराची मनधरणी करून कुळास आपली अब्रू राखतां येते, परंतु बँकेच्या बाबतींत तसें घडत नसल्यामुळें, शेतकऱ्यांना ही सावकारी मानवलेली दिसत नाहीं ! शेतकऱ्यांच्या सावकारींत सावकाराचा भाग शें. ९० टक्के असून, शें. १० टक्केच सावकारी बँकेच्या हातांत गेलेली आहे. ही गेल्या १०० वर्षांतील परिस्थिति लक्षांत घेत-

त्यास, सावकार वर्गाची नीट जोपासना केल्याशिवाय समाजधारणा नीट होणार नाहीं हें लक्षांत येईल.

आजच्या सदोष राज्यघटनेमुळें, शेतकऱ्यांच्या गळ्याभोंवतीं बसलेला हा सावकारी पाश फार विचार करून काढला पाहिजे. त्या कामीं विकारवश होऊन सूडबुद्धि धारण केल्यास देवघेवीचे व्यवहार कदापि सुरळीत चालणार नाहींत. शेतकऱ्यांस दैन्यावस्थेंत टाकण्यास, सावकार वर्ग कारणीभूत झाला नसून, सदोष राज्यघटनाच कारणीभूत झाली आहे, हें कदापि विसरून चालणार नाहीं. कर्जाच्या देवघेवींत बँकेचा कायदा एक, तर सावकाराचा कायदा दुसराच, तर खास शेतकऱ्याकरितां कायदा तिसराच, असा तिरंगी प्रकार दिसून येतो ! म्हणून हे सर्व प्रकार बंद करून, जमीन धारण करणारा व तिची मशागत करणारा या उभयतांची सोय ज्या एकाच कायद्यानें लावणें शक्य होईल अशी घटना तयार व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीनें ऋणविमोचनाचा मागें वर्णिलेला कायदा समाजधारणेस सोईस्कर होईल.

प्रचलित सरकार हेंहि रिणकोच आहे !

इंग्रजी अमदानीपासून कोट्यवधि रुपयांची सुवर्णगंगा या देशांतून इंग्लंडकडे अखंड वाहूं लागल्यामुळेंच शेतकरी वर्ग पूर्ण दैन्यावस्थेस जाऊन पोंचलेला आहे. त्याचा दोष सावकारांकडे नाहीं. वरील द्रव्यशोषणाच्या क्रियेनें शेतकरी लुंगविला जात असल्यामुळें, सावकारी देणें फेडणें त्याला अशक्य होत गेलें. त्या परिस्थितीचा दुरुपयोग सावकारांनीं केला असला तरी त्याचा दोष त्या क्रमप्राप्त परिस्थितीकडेच जातो ! हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जापैकीं ७०० कोटीचें कर्ज इंग्लंडमध्यें उभारलें असून, ५०० कोटीचें कर्ज या देशीं उभारलेलें आहे. त्या दृष्टीनें साम्राज्य सरकार हें देखील ऋणकोच ठरत नाहीं का ? हा सावकारी पाश सरकारच्या गळ्याभोंवतींसुद्धां आहे. सरकार हें आपल्या सावकारांचें कर्ज देण्यास पूर्ण बांधलें असतां, शेतकऱ्यांच्या सावकारींतील ‘ सावकारी ’ बुडविण्याचा विचार तें करीत आहे, हें पाहून आश्चर्य वाटतें ! त्या करण्यानें शेतकऱ्यांची पत नष्ट होऊन, तो दीन व दुबळा केला जाईल. म्हणून शेतकऱ्यांच्या गळ्याभोंवतालचा हा सावकारी पाश फार विचार करून, ढिला केला पाहिजे.

व्याजाचे भरमसाट दर हा सावकारींतील मोठा फास आहे. तो कायद्यानेंच कमी केला पाहिजे. तो कमी करण्याबरोबरच सावकाराला त्याच्या रकमेचें व्याज व मुदलांतील सोईस्कर असा हत्ता, सालोसाल परत करण्याची हुकमी योजना केली पाहिजे.

वसुलाची सर्वत्र अनास्था !

सावकारी व्याजाचे दर कमी करण्याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. प्रत्यक्ष सावकार देखील या योजनेस विरोधक नाहींत. मुख्य महत्वाचा प्रश्न आहे तो वसूल बाबीचा ! हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आपणावर आहे, अशीं कोणत्याच प्रांतिक सरकारची समजूत झालेली दिसत नाहीं. मद्रास सरकारनें देखील गेल्या वर्षी सावकारीचें बिल आणून हा व्याजाचा दर शें. ६$\frac{1}{4}$ प्रमाणें ठरवून टाकिला; पण वसुलाची जबाबदारी मात्र आपले अंगावर मुळींच घेतली नाहीं. त्याचीच आवृत्ति मध्यप्रांत सरकारनें देखील केली. पण या त्यांच्या योजनेनें समाजधारणेस जरूर तो पैसा सावकाराकडून शेतकऱ्यास मिळत राहाणार नाहीं. भरमसाट व्याजाच्या आशेनें लाचावलेला हा सावकारवर्ग यापुढें आपल्या रकमा सुखासमाधानानें शेतकऱ्यास कर्जाऊ देणें शक्य दिसत नाहीं. त्या कामीं अनेक वाममार्गांचा पद्धतशीर प्रयत्न झाल्याशिवाय कधींच राहाणार नाहीं. कारण शेतकरी हा सदैव गरजू असणारच ! आणि गरजवंताला अक्कल नसते म्हणतात. त्याप्रमाणें या व्यवहारांत शेतकरीच बेअकली ठरण्याचा संभव आहे ! (वास्तविक तसा तो कधींच नसतो.) शेतकऱ्याचें उत्पन्न अनिश्चित असल्यामुळें व कोणीं किती कर्ज काढावें यास ताळतंत्र नसल्यामुळें हें ६$\frac{1}{4}$ टक्क्याचें व्याज देखील सावकारास वेळचे वेळीं पोंचतें होणार नाहीं. मग मुदलाचा प्रश्न तर दूरच राहिला !

बँकेची सोईस्कर घटना !

आज देशांतील सर्व बँकांनीं व पोस्टांनीं आपले व्याजाचे दर कमालीचे उतरविले असतां देखील लोक आपला पैसा त्यांतच ठेवण्याची धडफड कां करतात ? बँकेंतील पैसा ठराविक वेळीं व्याजमुदलासह मिळतो, हेंच त्यांतील रहस्य नव्हे का ? हें साधें व्यावहारिक तत्व कोणत्याही प्रांतिक सरकारांनीं आपल्या

गळीं उतरवून घेतलेलें दिसत नाहीं. त्यामुळें हा प्रश्न त्यांना सुलभतेनें सोडवितां येत नाहीं. बँकेप्रमाणेंच जर शेतकऱ्याकडून व्याजमुद्दलाचे हिशोब सालोसाल सावकारास सरकारमार्फत मिळत गेले, तर सावकारवर्ग आपल्या रकमा बँकेप्रमाणेंच शेतकऱ्यांना कां देणार नाहीं ? हें साधें व्यावहारिक तत्व दृष्टीआड केल्यामुळें भयंकर घोटाळे व असंतोष माजत आहे, असें आपणांस वाटत नाहीं का ? म्हणून आजच्या परिस्थितींत शेतकऱ्यांना झेपण्याजोगें कर्ज किती व तें किती हप्त्यांनीं फेडून घ्यावयाचें, हा महत्वाचा प्रश्न आहे. इकडे कोणाचेंच लक्ष गेलेलें दिसत नाहीं. काँग्रेसच्या राजवटींत देखील सावकारवर्ग हा ' क्रूर प्राणी ' आहे अशी लोकनियुक्त सभासदांची व प्रधानमंडळांची समजून व्हावी हें देशाचें दुर्भाग्य नव्हे का ? साप साप म्हणून दोरी धोपटण्यापैकींच हा विचित्र प्रकार नव्हे का ? म्हणून हा प्रश्न सोडवितांना पुढील महत्त्वाच्या गोष्टी विसरून कदापि कोणतीही सुधारणा यशस्वी होणार नाहीं, अशी सर्वांची खात्री होईल.

ऋणविमोचनाचीं दहा तत्वें.

(१) जुनें कर्ज निश्चित करणें. हें कर्ज निश्चित करतांना दामदुपटीचें साधें व्यावहारिक तत्व डोळ्यांपुढें ठेवणें.

(२) जमीन धारण करणारा व ती कसणारा या दोन्ही वर्गांचें पूर्ण हित होईल अशी योजना आंखणें. प्रत्यक्ष जमीन कसणारा आणि न कसणारा असा भेदभाव न ठेवणें.

(३) जमीन धारण करणाराची (शेतकऱ्याची) कर्ज काढण्याची मर्यादा त्याच्या तरम आकाराच्या दसपटी इतकी जास्तींत जास्त ठेवणें व कुळाची त्याच्या चौपट ठेवणें जरूर आहे.

(४) दसपटीपेक्षां जें जादा कर्ज निघेल, तें फेडण्यासाठीं त्याच्या जीवनाचें साधन जी शेती ती त्याच्यापासून हिरावून घेतली जाणार नाहीं, अशी व्यवस्था करणें. तसेंच सावकाराचें न्याय्य देणें बुडविलें जाणार नाहीं, याचीहि काळजी घेणें.

(५) दसपटीपर्यंत वेळोवेळीं जें कर्ज घेतलें जाईल, त्याचे दहा हप्ते करून व व्याजाचा दर द. सा. द. शें. ६$\frac{1}{4}$ रु. म्हणजे रुपयास एक पै असा

सोईस्कर ठरवून देणें.

(६) बांधलेले व्याज मुदलाचे हप्ते वेळच्या वेळीं वसूल करून सावकारास देण्याची सरकारी व्यवस्था करणें.

(७) जमिनीच्या हक्कसंबंधांतील फेरफार, अल्प खर्चांत व अल्प वेळांत गांवचे गांवींच होण्याची पंचायतीची पद्धति रूढ करणें.

(८) शेतकऱ्यांच्या उत्पन्नास निश्चितपणा देण्यासाठीं त्यास जोडधंद्याची मदत देणें व त्याची पत टिकवून धरणें.

(९) शेतीच्या सर्व सुधारणा अमलांत आणण्याची व्यवस्था करणें.

(१०) जोडधंद्यांचें शिक्षण देणें व त्यासाठीं लागणारें भांडवल तरम आकाराच्या २५ पटी इतकें देऊन, त्याची कौटुम्बिक आर्थिक उन्नति घडवून आणणें.

हीं दहा तत्वें विसरून कोणत्याही राज्यघटनेस हा प्रश्न सोडविणें शक्य होणार नाहीं. या तत्वावरच ही 'ऋणविमोचनाची योजना' आधारलेली असल्यामुळें, तीच समाजधारणेस सोईची आहे, अशी सर्व प्रांतिक काँग्रेस प्रधान मंडळांची विचारांतीं खात्री होईल.

ऋणग्रस्ततेचें अखिलभारतीय विराट् स्वरूप

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाच्या प्रश्नास आज अखिलभारतीय विराट् स्वरूप प्राप्त झालेलें आहे ! या इलाख्यांतील शेतकऱ्यांच्या डोक्यावर सुमारें १०० कोटि रु. कर्जाचा बोजा आहे, असें कित्येक तज्ज्ञ म्हणतात, तर कांहीं हा बोजा १५० कोटि रुपयांच्या घरास गेला आहे, असें प्रतिपादन करतात. या त्यांच्या म्हणण्यांत पुष्कळच सत्यांश आहे, असें उपलब्ध झालेल्या इतर प्रांतांतील रिपोर्टांवरून म्हणण्यास आधार वाटतो. संयुक्तप्रांत सरकारनें आपल्या प्रांतांतील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचें स्वरूप समजून घेण्यासाठीं, दीड वर्षापूर्वीं नेमलेल्या कमेटीनें आपला रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्या रिपोर्टावरून त्या प्रांतांतील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा १८६ कोटी रुपयांच्या वर गेलेला दिसून येतो ! याप्रमाणेंच पंजाबच्या शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा १३५ कोटीच्या घरास गेला असून, त्याचें वार्षिक व्याज सुमारें २० कोटी

रुपये भरावें लागतें, असें सरकारी रिपोर्टावरून दिसून येतें. त्याप्रमाणेंच मद्रासच्या शेतकऱ्यांससुद्धां २०० कोटीचें कर्ज असून त्याचें प्रतिवार्षिक २० कोटि रुपये व्याज भरावें लागतें ! अत्यंत सुपीक असा बंगाल प्रांत घेतला, तरी तोही याप्रमाणेंच कर्जाच्या अफाट जंजाळांत गुरफटून गेलेला दिसून येतो. तेथील शेतकऱ्यास तर शें. १५ ते २५ टक्के व्याजानें कर्ज काढावें लागतें, इतकी त्याची पत उडालेली आहे ! पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल व मद्रास हे प्रांत, आमच्या मुंबई इलाख्याच्या मानानें अत्यंत समृद्ध असतांना, जर तेथें कर्जबाजारीपणास इतका ऊत आलेला आहे, तर तो आमच्या इलाख्यांतच कमी असेल, असें कसें म्हणतां येईल ? वरील सर्व प्रांतिक सरकारांचें बजेट सुमारें १५ कोटि रुपयांच्या आंतबाहेर असतें, तर त्या प्रांतांतील सावकारांचें हें व्याजरूपी बजेट त्याच्या सवाई, म्हणजे सुमारें २० कोटि रुपयांचें असतें. हें पाहून कोण आश्चर्यचकित होणार नाहीं ? शेतकऱ्यांनीं वेळोवेळीं सावकारांचीं घरें उपसून काढलेला हा पैसा कोठें गेला ? इतकें जबरदस्त कर्ज काढण्याचा प्रसंग त्यांचेवर कोठून कसा आला ? इतकें जबरदस्त व्याज डोक्यावर घेऊन व कोर्टकज्जाच्या पायीं दरसाल १०–१२ कोटींचा बसत असलेला धक्का सहन करून शेतकरी समाज अर्धपोटी तरी कसा राहिला ? इत्यादि प्रश्नांचा विचार राष्ट्रीय सरकारनें करावयास नको का ?

सरकारची धूर्तता !

हा प्रश्न सोडविण्याचे निरनिराळ्या प्रांतिक सरकारचे बहुविध प्रकार पाहिले म्हणजे आश्चर्य वाटतें. सावकार व कूळ यांच्या व्यवहारांत सावकार हाच दोषी आहे, अशी समजूत सर्व प्रांतिक सरकारांनीं करून घेतलेली दिसते ! रोगाचें निदान बरोबर न झाल्यास जसें कोणतेंच औषध त्यावर बरोबर लागू पडत नाहीं, त्याप्रमाणें ह्या व्यवहारांतील गुंतागुंतीचें निदान बरोबर न झाल्यास ऋणमुक्ततेचे कायदे यशस्वी होणार नाहींत. देशांतील सर्व बँका, पोस्टें, विमाकंपन्या व सरकारी कर्जरोखे यांची उभारणी सावकारी धनावर–शेअर्स, ठेवी व कर्जे–या रूपानेंच झालेली आहे. आज या क्षेत्रांतील सावकारी बिनबोभाट व सुरळीतपणें चालू आहे. हल्लींचें सरकार हें ऋणको असून, तें आपल्या सावकारांस तर दर सहामाहीस व्याज घरपोंच देतें ! सरकार व सावकार यांच्यामधील

ही चक्रवाढीच्या व्याजस्वरूपाची सावकारी पाहिली, तर सरकारी क्षेत्रांत, या सावकारी धनाच्या जोपासनेची किती काळजी घेतली जाते, याची बरोबर प्रचीती येते. साम्राज्यसरकारनें तर आपणास सतत हुकमी कर्ज मिळत राहावें, म्हणून या कामीं इतकी दक्षता घेतली आहे कीं, हल्लींच्या सावकारांस तर सरकार हें आपलें मायबापच वाटत आहे ! त्यामुळें कोट्यवधि रुपयांचें धन सरकारास बिनबोभाट व हुकमी मिळत आहे. देशांतील हा सर्व पैसा आपणाकडे ओढून घेण्याचें सरकारी धोरण पाहिलें, म्हणजे त्यांच्या जादुगिरीची बरोबर कल्पना होते ! सावकार व कूळ यांचे व्यवहार गुंतागुंतीचे करून व त्या व्यवहारांत सावकाराची कोर्टामार्फत चिरफाड करून, त्याला त्या क्षेत्रांतून पद्धतशिरपणें हुसकावून लावण्याचें कायद्यांतील धोरण पाहिलें, म्हणजे आश्चर्य वाटतें ! सावकारी धनाचा उपयोग बहुजनसमाजाच्या उन्नतीस कोणत्याही तऱ्हेनें न होतां, तें धन आपणाकडे नेमकें कसें ओढलें जाईल, याचीच सरकार नेहमीं काळजी घेतें, असें म्हटल्यास तें चुकीचें ठरेल का ? आजपर्यंत सरकारनें कधीं आपल्या सावकारांस बुडविण्याची भाषा वापरली आहे का ? कोट्यवधि रुपयांचें—१२०० कोटींचें ! भयंकर कर्ज डोक्यावर असूनही साम्राज्यसरकार तें बुडविण्याचें चुकूनसुद्धां मनांत आणीत नाहीं ! हें भरमसाट राष्ट्रीय कर्ज नाकारण्याचें काँग्रेसनें ठरविल्याबरोबर हा प्रश्न नव्या घटनेंत फेडरल कौन्सिलच्या कार्यक्षेत्रांतून वगळून तो व्हाइसरायसाहेबांच्या खास अधिकारांतील करून टाकण्यांत साम्राज्यसरकारची धूर्तता बरोबर लक्षांत येते. सरकार हें आपल्या सावकारांचे व्यवहार वेळच्या वेळीं पार पाडण्याबद्दल जी अत्यंत दक्षता घेते, ती पाहिली म्हणजे कोट्यवधि रुपयांची सुवर्णगंगा सरकारी तिजोरीकडे कां वळलेली आहे याची बरोबर कल्पना होते.

सावकारीचें उच्चाटन व तिजोरीची भर.

सावकार व कूळ यांच्या व्यवहारांत सावकारासच धोपटून काढण्याचें हल्लींच्या सर्व प्रांतिक सरकारांचें धोरण पाहिलें म्हणजे त्यांच्या धोरणाबद्दल संशय वाटूं लागतो ! शेतकऱ्यांच्या कळवळ्याचें निमित्त पुढें करून, तेथून सावकाराचें उच्चाटन केल्यास, त्यास पद्धतशीर हुसकून लावल्यास तो सरकारी कर्जरोख्याकडे आपोआप वळेल, असाच त्या धोरणाचा अर्थ होत नाहीं का ? नामदार लट्ठे-

साहेब ह्यांनीं शेतकरी ऋणविमोचनाच्या बाबतींत जे नुकतेच उद्गार काढले, ते याच धोरणाचे निदर्शक ठरत नाहींत का ? शेतकरी ऋणमुक्त करण्यासाठीं, सावकाराचे यापुढील सर्व व्यवहार बंद पाडण्याचें त्यांचें धोरण पाहिलें म्हणजे हा संशय दृढच होतो ! “ शेतकऱ्याचें कर्ज हें त्याच्या स्थावर मिळकतीच्या शेंकडा ८० इतकेंच धरलें जाईल व त्याची २० वर्षांत फेड करून मिळेल. खतें व बींबियाणा यांकरितां त्यानें क्रेडिट सोसायट्यांकडूनच कर्ज काढलें पाहिजे. याव्यतिरिक्त व्यवहार त्यानें आपल्या उत्पन्नांतूनच भागविले पाहिजेत. त्यास अन्यत्र कर्ज काढतां यावयाचें नाहीं.” (केसरी, १३ जानेवारी.)

या नामदार लठ्ठेसाहेबांच्या मुलाखतीचा अर्थ काय होतो ! शेतकऱ्याच्या देव-घेवींत, सावकारास निम्माअर्धा बुडवून पुढें तर त्यास त्या व्यवहारांतून सरळ हुसकावून लावण्याचाच हा पद्धतशीर प्रयत्न नव्हे का ? या योगानें आपसांतील व्यवहार संपुष्टांत येऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक नाड्या आंखडल्या जातील ! त्यांचा कर्ज काढून घेण्याचा हक्क हिरावून घेतल्यामुळें, त्यांची उत्पादक शक्ति कमी होईल. योग्य वेळीं त्यास भांडवलाची मदत न मिळाल्यामुळें, त्याचे सर्व व्यवहार अडून पडतील व ते ‘ पाणी तोडलेल्या झाडाप्रमाणें ’ वळून जातील ! तो सदैव दीन व कंगालच राहील ! शेतकऱ्यांच्या हितासाठीं करावयास गेलेल्या योजनेचीं कटु फळें याप्रमाणें पुढील कालांत चाखावयास मिळतील. सावज नेमकें हातीं पडावें, म्हणून ज्याप्रमाणें शिकारी सर्व रान उठवून, त्यास इष्ट स्थळीं नेमकें ताणून आणतात, त्याप्रमाणें हल्लींच्या व्यवहारांत सावकाराची काय-देशीर लांडगेतोड केल्यास तो नेमका निरनिराळ्या बँका, विमाकंपन्या, सरकारी कर्जरोखे व पोस्टल कॅश-सर्टिफिकिटें इत्यादि रूपानें सरकारी खजिन्यांत येत राहील, हें सांगण्यास एखाद्या भविष्यवाद्याची जरूरी आहे काय ? बरें, हें जमा झालेलें सरकारी खजिन्यांतील धन, लोकांच्या औद्योगिक उन्नतीस कारणीभूत होत असेल असें म्हणावें, तर तिकडूनहि पूर्ण अंधारच दिसतो ! अशा तऱ्हेनें हें आमचें धन आमच्या उपयोगीं पडूं नये, असाच याचा अर्थ होत नाहीं का ? लोकांना आज आपला पैसा उद्योगधंद्यांत किंवा सावकारींत न गुंतवितां सर-कारी कर्जरोख्यांत, बँकेंत व कॅश-सर्टिफिकेटांतच कां गुंतवावासा वाटतो ’ त्याचें मर्म लक्षांत येतें ! सावकारी व उद्योगधंदे या क्षेत्रांत, पुरेशा संरक्षणाच्या

अभावीं त्याची कुचंबणा होत असल्यामुळेंच, तो तेथून आपला पाय काढता घेतो, असेंच आपणांस वाटत नाहीं का ? सरकारी कर्जरोख्यांत किंवा पोस्टांत पैसे ठेवण्याचें लोकांचें वेड पाहिल्यास ह्या धोरणाचे राष्ट्रीय दुष्परिणाम आणखी किती होणार आहेत तें एक परमेश्वरासच माहीत ! आज ही कोट्यवधि रुपयांची संपत्ति सरकारी संरक्षणाखालींच निष्क्रिय स्थितींत पडून नाहीं का ? राष्ट्रांत बेकारी भयंकर माजली असतां, उद्योगधंद्यांस लागणारें भांडवल उपलब्ध नाहीं म्हणून सरकारची पुन्हा ओरड सुरू आहेच ! परकीय सरकार आपल्या देशचे उद्योगधंदे नीट चालावेत म्हणून या देशीं आपणहून कधींहि धंदे काढणार नाहीं. आजपर्यंत सरकारनें एकहि धंदा काढला नाहीं व पुढेंहि काढीलच ह्यासहि पण कांहीं आधार दिसत नाहीं ! अशा तऱ्हेनें आमचें सर्व धन कर्जरोख्यांच्या स्वरूपांत गुंतवून सरकार स्वस्थ बसलें आहे, असें कोणीं विधान केलें तर, तें वस्तुस्थितीस सोडून होईल का ? त्यामुळें आमची सर्व बाजूंनीं कुचंबणा सुरू आहे. त्यांतून काँग्रेस मंत्रिमंडळानें मार्ग काढल्याशिवाय त्याची कामगिरी उज्वल दिसणार नाहीं. हा सरकारी संरक्षणाखालीं जमा होत असलेला कोट्यवधि रुपयांचा खजिना, उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं लाविल्याशिवाय जनता खरी कार्यक्षम व सुखी होणार नाहीं. याची पूर्ण खूणगांठ मंत्रिमंडळानें मनाशीं बांधावयास नको काय ?

सरकारचें सुवर्णविषयक प्रतिगामी धोरण.

सरकारच्या सुवर्णचलनाच्या विकृत धोरणामुळें गेल्या ६।७ वर्षांत सुमारें ३२५ कोटि रुपयांचें सोनें येथून परागंदा झालें ! गेल्या ८।१० वर्षांतील बाजारभावाच्या मंदीच्या झळीनें शेतकऱ्यांच्या घरांतून हें सर्व सुवर्णधन, रोजचे व्यवहार पार पाडण्यासाठींच खर्ची पडलें, असें ठरत नाहीं का ? शेतकऱ्यांच्या क्रयविक्रयशक्तीवर व इतर सर्व व्यवहारावर अवलंबून असलेल्या ' परोपजीवी ' वर्गांच्याच हातीं हें सर्व धन पडलें नाहीं का ? बाजारभाव शें. ५० ते ६० टक्कयांनीं घटले असतां सरकारनें आपला सारा एक पै तरी कमी घेतला आहे का ? महर्गतेच्या काळांत बसविलेले डोईजड कर अल्पांशानें तरी कमी केले आहेत का ? हुंडणावळीचा भाव १८ पेन्स करून ही मंदीची आंच आणखी प्रखर करून सोडिली नाहीं का ? अशा तऱ्हेनें जोडधंद्यांच्या अभावीं

शेतकऱ्यांचें उत्पन्न घटवून व पूर्वीचेच डोईजड कर कायम ठेवून, शेतकऱ्यांच्या घरांतील हें सुवर्णधन सरकारनें बाहेर काढलें असें म्हटल्यास तें चुकीचें होईल का ? सोन्याचांदीच्या रूपांत गुंतून पडलेली ही अलोट संपत्ति, नाण्याच्या स्वरूपांत शेतकऱ्यांच्या हातीं खेळती ठेवून, ती डोईजड कर व परदेशी मालाची भरमसाट मागणी, या रूपानें पुन्हां आकर्षण करून घेण्याची सरकारची मयासुरी वृत्ति पाहिली म्हणजे आश्चर्यभरानें चित्त थक्क होऊन जातें !

आर्यसंस्कृतीनें हजारों वर्षे सौभाग्यालंकाराचे रूपानें प्राणापलीकडे जतन करून ठेवलेलें हें सुवर्णधन, आज कोठें आहे ? ३२५ कोटींचें सोनें परदेशीयांस भरमसाट भावानें विकून आलेला हा अलोट पैसा कोठें आहे ? इतकें सोनें मोडूनहि शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा गुंजभरहिं कमी न होतां तो अप्रतिहतपणें वाढत चाललेला पाहून मन दिङ्मूढ होऊन जातें ! एकीकडे बाजारभावाची मंदी करून तर दुसरीकडे सोन्याचे भाव भरमसाट वाढवून हा सुवर्णलुटीचा डाव पाश्चिमात्य राष्ट्रांनीं कसा सुरू केला आहे, त्याचा उमज कोणासच कसा झालेला दिसत नाहीं, याचें आश्चर्य वाटतें ! सन १९३० च्या कायदेभंगाच्या मोहिमेंत जी काँग्रेस, ' सरकारला कर्ज देऊं नका ' म्हणून म्हणत होती, त्या काँग्रेसचा हा डाव उधळून टाकण्यासाठींच हा बाजारभावाच्या मंदीचा फासा पुढें टाकण्यांत आला नसेल का ? सोन्याचे भाव दुपटीवर नेऊन तें खरेदी करण्याची पाश्चिमात्य राष्ट्रांची वाढती सधनता लक्षांत घेतल्यास, आर्थिकदृष्ट्या भावी कालांत आम्ही जगाचे गुलाम बनल्यावांचून कसे राहाणार नाहीं, तें लक्षांत येईल ! अर्थनाशाच्या पोटींच संस्कृतिनाश व स्वातंत्र्यनाश हा ठेवलेलाच असतो ! हें व्यवहाराचें परस्पर गमक लक्षांत घेऊनच यापुढें राष्ट्रीय सरकारनें आपलें सर्व धोरण बदलावयास नको का ?

सुवर्णलुटीच्या पोटीं स्वातंत्र्यनाश.

या सुवर्णलुटीपैकीं निम्माअधिक पैसा गेल्या ७।८ वर्षांतील सरकारच्या धोरणामुळें परदेशीं गेलाच आहे ! आणि राहिलेला पैसाही वाट चालत आहे ! अशा तऱ्हेनें आम्ही द्रव्यदृष्ट्या पूर्ण नागविल्यावर आम्हांला स्वातंत्र्यलाभ होऊन तरी काय उपयोग ? नारळांतील मगज काढून घेऊन, करवंटी बहाल करण्यापैकींच हा

सौदा ठरणार नाहीं का ? जगाच्या अंतर्गत राजकारणांत भयंकर उत्पात चालू असतां, शक्य तितकें सुवर्णधन येथून लांबविण्याचाच हा परदेशीयांचा कावा नसेल का ? सर्व जगांतच मंदीची लाट उसळून दिली असतां, हें सुवर्णधन दामदुप्पट पैसा देऊन त्यांना कसें नेतां येतें, याचा कोणी सूक्ष्म विचार केला आहे का ? सोनें घेऊन आमच्या हातीं रुपें, निकल, तांबें व कागदाच्या नोटाच पडल्या नाहींत का ? जगाच्या राजकारणांत भयंकर उत्पात होण्याचीं जीं भयसूचक चिन्हें दिसत आहेत, त्यांत 'बरेंवाईट' कांहीं झाल्यास, ह्या हातीं पडलेल्या संपत्तीचा आम्हांस कितीसा उपयोग होईल ? ह्याचा विचार लोकधुरिणांनीं करावयास नको का ? संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या काँग्रेसला, स्वातंत्र्याचें दान सुटण्याची वेळ कधींकाळीं आली असतां, आपलें सर्व सुवर्णधन नाहींसें झालें असून, आपण आर्थिकदृष्ट्या जगाच्या धकाधकीच्या मामल्यांत एक क्षणहि पूर्ण स्वातंत्र्यानें जगण्यास समर्थ नाहीं, असेंच दृश्य दिसणार नाहीं का ? चीन व ॲबिसीनिया या देशांची आर्थिक उपासमार केल्यामुळेंच तीं राष्ट्रें हतबल व पंगु ठरलीं, आणि त्यामुळेंच तीं भांडवलशाही राष्ट्रांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं असें आपणांस वाटत नाहीं का ? तोच दाखला, पूर्ण निर्धन अशा हिंदुस्थानच्या बाबतींत जपानसारख्या साम्राज्यशाहीच्या आहारीं पुढेंमागें जाण्यांत बरोबर लागूं होणार नाहीं, असें आपणांस वाटतें का ? निर्धनतेच्या अधिष्ठानावर उभें राहून, स्वातंत्र्याच्या तोंडभर मारलेल्या गप्पा, ह्या सर्व फोलच होत ! निर्धनता म्हणजेच पारतंत्र्य ! निर्धनता म्हणजेच राष्ट्रीय स्वातंत्र्यनाश ! निर्धनतेच्या दुखण्याचा शेवट मृत्यूच्या दरबारांतच होत असतो ! राष्ट्र निर्धन करणें, म्हणजे त्यास मृत्यूच्या, गुलामगिरीच्या रौरव नरकांत ढकलून देणें होय ! त्यांतून त्याची सप्त जन्मांतही सुटका होणार नाहीं ! या सर्व गोष्टींचा विचार प्रांतिक सरकारांनीं करावयास नको का ?

सुवर्णसंधि व राष्ट्रीय सरकार.

या सुवर्णलुटींतील सुवर्णसंधीचा फायदा, अजून वेळ गेली नाहीं तोंच, प्रांतिक सरकारांस करून घेतां येईल ! हिंदी संस्कृतीच्या दडपणामुळें दागदागिन्यांच्या रूपानें कोट्यवधि रुपयांची अडकून पडलेली ही अलोट संपत्ति आज मोकळी झाली असून ती बँका, पोस्टें, कॅश सर्टिफिकिटें व सरकारी रोखे या

रूपानें एकत्रित झालेली आहे. १९२६ सालच्या बँकेच्या सरकारी रिपोर्टांत या देशांतील लोकांच्या १०५ कोटीपेक्षां जास्त रकमेच्या ठेवी निव्वळ परकीय बँकांतून गुंतलेल्या दिसतात! आज हा आंकडा तर त्यापेक्षां कितीतरी मोठा झालेला असेल!

हिंदुस्थानांतील हजारों बँकांतून कोट्यवधि रुपयांची ही जमा झालेली अलोट संपत्ति लक्षांत घेतल्यास, तिचा उपयोग शेतकऱ्यास जोडधंद्यांच्या रूपानें करून दिल्यास अजूनही शेतकऱ्याची परिस्थिति सुधारतां येईल व तो ऋणमुक्त करतां येईल. शेतकऱ्याचें उत्पन्न वाढवून केलेलें ऋणविमोचन हेंच खरें ऋणविमोचन ठरेल! एरवींचे सर्व उपाय, हे उपाय न होतां अपायच ठरतील!

प्रांतिक सरकारनें (कँग्रेस सरकारनें) पूर्ण स्वातंत्र्याचें गोड ध्येय जरा बाजूस ठेवून, औद्योगिकदृष्ट्या राष्ट्र कसें स्वावलंबी होईल, याचाच प्रथम विचार करावयास नको का? महात्माजींना तर चरख्याच्या चळवळींतील रोजच्या 'चार पैशांतच' आपला भाग्योदय सांठविल्याचें वाटत आहे! पण आपल्या सुदैवानें हा संकुचित दृष्टिकोन राष्ट्रांतील थोरथोर पुढाऱ्यांच्या दृष्टींतून नाहींसा होत असून, हिंदी राष्ट्र औद्योगिकदृष्ट्या कसें संपन्न होईल, ह्याचाच विचार आज प्रामुख्यानें चालू असल्याचें दिसत आहे, ही अत्यंत आशेची गोष्ट होय! अशा वेळीं सर्व थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं, 'जोडधंद्याची पुनर्घटना, औद्योगिक क्रांति व राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य' हीं ह्या पुस्तकांतील महत्त्वाचीं प्रकरणें नजरेखालीं घालावींत अशी मी त्यांना नम्र विनंती करितों.

शेतकरी-ऋणविमोचनाचा प्रश्न ह्या पुस्तकांत वर्णन केलेल्या तत्त्वावरच सुटला तर सुटेल, बाकीचे सर्व मार्ग आडरानांत शिरण्यापैकींच होत, याबद्दल सर्वांची पुरेपूर खात्री होईल. या प्रश्नाचें अखिलभारतीय स्वरूप लक्षांत घेतां, आज हा प्रश्न राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा कसा होऊन बसला आहे, हें सर्वांच्या लक्षांत येईल. निव्वळ कायदा करून ऋणविमोचनाचा प्रश्न सुटणार नाहीं. तसेंच शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें सावकारांचें न्याय्य देणें बुडवूनही कार्यभाग होणार नाहीं, ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे.

ऋणविमोचनाचा दशवार्षिक काल.

शेतकरी ऋणमुक्त करणें म्हणजे राष्ट्र स्वावलंबी व सुखी करणें होय ! आखिल हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या डोक्यावर असलेलें १०००–१२०० कोटींचें कर्ज फेडणें ही गोष्ट साधीसुधी नाहीं ! मी ही निष्कर्जी होण्याची कालमर्यादा १० वर्षांची धरतों. ह्यापुढील दहा वर्षांत शेतकरी ऋणमुक्त करावयाचा ठरविल्यास व्याजमुद्दलासह १५०० कोटी रुपयांचा बोजा फेडण्याचें सामर्थ्य शेतकरीवर्गांत उत्पन्न व्यावयास पाहिजे. म्हणजे वार्षिक १५० कोटींचा बोजा त्यास फेडतां आला पाहिजे.

(१) दारूबाजीचें व कोर्टबाजीचें उच्चाटन करून ५० कोटींची बचत करणें शक्य होईल.

(२) सुधारलेल्या शेतीचें ज्ञानामृत पाजून, जमीनीचें उत्पन्न शेंकडा २५ टक्के तरी वाढवून दाखवितां येईल. ही वाढ एकंदर उत्पन्नाच्या दृष्टीनें सुमारें ३०० कोटि रुपयांची होईल. परंतु वाढती लोकसंख्या व आजची अर्धपोटी स्थिति लक्षांत घेतां, या वाढींतून सुमारें ५० कोटि रुपयांचा उलाळ त्यांना सांपडूं शकेल.

(३) जोडधंद्यांचा प्रसार झपाट्यानें केल्यास परदेशच्या आयातीपैकीं सुमारें १०० कोटि रुपयांची आयात घटवून, तो माल येथें उत्पन्न करितां येईल व त्यामधून दरसाल २५ कोटि रुपयांचा उलाळ त्यास मिळूं लागेल. कारण कच्च्या आणि पक्क्या मालाच्या किंमतींतील महदंतर लक्षांत घेतल्यास इतकी रक्कम निव्वळ मजुरी व नफा या दृष्टीनें त्याच्या पदरांत पडूं लागेल !

(४) पिकावरील रोगराई व कीड यांचा नायनाट केल्यास उत्पन्नांतील घट १५०–२०० कोटींनीं कमी करितां येईल. या बचतीमधून २५ कोटींचा वार्षिक उलाळ त्यास कर्जफेडीसाठीं घेतां येईल. वाढती लोकसंख्या व वाढतें उत्पन्न, याबरोबरच होणारा वाढता खर्च लक्षांत घेऊन ही वार्षिक १५० कोटि रुपयांच्या कर्जफेडीची योजना कशी शक्य कोटींतली आहे, हें सर्वांच्या लक्षांत आलेंच असेल !

अशा तऱ्हेनें पुढील १० वर्षांत सावकारांच्या हातांत पडणाऱ्या ह्या १५००

कोटीच्या निधींतून सुमारें १००० कोटि रुपयांचें अवाढव्य भांडवल पुन्हा औद्योगिक क्षेत्रांत आणून उभें करणें शक्य होईल ! या अवाढव्य भांडवलाच्या जोरावर, जागृत व ज्ञानसंपन्न जनतेला, प्रांतिक स्वयत्ततेच्या रूपानें आपला उद्धार करून घेणें कितीसें अवघड जाईल ? आपणांस हा सर्व कल्पनारम्य सुंदर देखावा वाटेल ! परंतु या ग्रंथांत वर्णन केलेल्या योजनेनुरूप हें कल्पनारम्य स्वप्न सत्यसृष्टींत उतरून खरें ठरल्याशिवाय कसें राहील ? हिंदी जनतेची सर्व बाजूंनीं झालेली आर्थिक गळचेपी उठविण्याचा याशिवाय कोणता सुलभ मार्ग आज शिल्लक आहे ? तेव्हां सर्व प्रांतिक सरकारांना याच मार्गाचा अवलंब केल्याशिवाय तरणोपाय नाहीं असें पूर्ण विचारांतीं कळून येईल ! आणि तसें झालें तरच हा अखिलभारतीय ऋणविमोचनाचा अवघड प्रश्न सोडविणें शक्य होईल ! नाहीं-तर अन्यथा सर्वस्वनाश हा भावी काळांत ठरलेलाच आहे ! त्या वेळीं त्या सर्व-भक्षक कालाचेपुढें कोणाचें काय चालणार ?

प्रकरण ५ वें

औद्योगिक क्रांति व राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य !

यंत्रकलेचा उदय व हिंदुस्थानचा स्वातंत्र्यनाश !

विसावें शतक म्हणजे यंत्रयुगांतील सुधारणेचें परमोच्च स्थान होय ! पाश्चिमात्य राष्ट्रांतून अठराव्या शतकांत वाफेच्या शक्तीचा शोध लागून या युगास सुरवात झाली. गेल्या दोनतीन शतकांत तेथील बुद्धिमान व शोधक पुरुषांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून आधिभौतिक शास्त्रांत अद्‌भुत शोध लाविले व नाना प्रकारचीं व्यावहारिक यंत्रें निर्माण केलीं. गेल्या शतकांत युरोप-अमेरिका खंडांत झालेली शास्त्रीय ज्ञानाची वाढ खरोखर तोंडांत बोट घालण्याइतकी आश्चर्यकारक आहे ! तिच्यापायीं आकाशांतील गोलांचेंच केवळ वजन व मापच नव्हे, तर अंतर्गत घटना देखील समजून आली आहे. अगाध व अतल अशा भूविवरांत व महासागरांत बिनधोक उतरणें सुलभ झालें आहे. भूगर्भशास्त्रानें मोठमोठे पर्वत, दरेखोरीं, नद्या कां व कशा निर्माण होतात हें कळून आलेलें आहे. महानद सेतुबंधनानें सुतर झाले आहेत. महोदधीवरून जशी काय पायवाटच पडली आहे ! प्रवासांतील शीघ्रवाइक वाहनांनीं दूरदूरचे प्रदेश ओसरी-अंगण होऊन राहिले आहेत. विद्युत्प्रकाशानें चांदोबाची शेखी उतरविली आहे. व्याधिग्रस्तांचें दुःख हलकें केलें आहे. आयुर्मर्यादा वाढविली आहे व एकंदरींत जीवित विलोभनीय करून सोडिलें आहे. या शास्त्रीय ज्ञानानेंच आम्हांस प्राचीनतम अशाहि काळाचें सम्यक् ज्ञान प्राप्त झालें असून भविष्यत्कालीं अशीच प्रगति चालत राहील असा विश्वास उत्पन्न झाला आहे.

" गेल्या शतकांत गूढ शोध व दिव्य कल्पना यांचा उदय झाला आहे. अग्निरथ आणि अग्निनौका, तारायंत्र, किरणलेखन, धुराचे-राकेलचे दिवे, विजेचे दिवे, सौरप्रकाशाचें पृथक्करण, रेडियम, ध्वनियंत्र (टेलिफोन), फोनोग्राफ, हवेचें-विशेषतः जलजनक वायूचें-द्रावण, डार्विनचे अमूल्य शोध, वेदनापहारक

बेशुद्धीचीं औषधें, आयडोफार्मसारखीं शरिराचें सडणें बंद करणारीं औषधें इत्यादि अद्‌भुत व अभिनव शोध लागले आहेत. काळोख्या रात्रीला पौर्णिमेचें ऐश्वर्य दिलें आहे. चर्मचक्षूंची (दुर्बिणीच्या साहाय्यानें) अनंत अंतरालांत धाव पोंचविली आहे. गतीची त्वरा वाढवून अंतर जणूं नाहींसेंच झालें आहे ! परस्पर-पत्रव्यवहार, व्यापार, दळणवळण फार सुलभ झालें आहे. अगाध समुद्राचे तळीं जाणें, किंवा अनंत आकाशांत पक्ष्याप्रमाणें उडणें, खोलखोल भूविवरांत निर्वेध-पणें प्रवेश करणें, अश्वरहित रथांतून वायुवेगानें भूपर्यटन करणें व तासांत दश-योजन गतीनें वायूचे उलट दिशेनेंहि समुद्रांतून हिंडणें ह्या गोष्टी केवळ करतला-मलकवत् स्वाधीन झाल्या आहेत.

" शास्त्रांत ज्ञानाला निर्झराची उपमा दिली आहे. तीवरून पाहातां असें दिसतें कीं, निर्झराप्रमाणेंच ज्ञानप्रवाह पुढें पुढें वाहात राहील तितका तो स्वच्छ व निर्मल होत जाईल, आणि तोच कोंडून पडेल तर नासून जाईल. याकरितां आपले शास्त्रीय ज्ञानाचा प्रवाह अखंड अधिकाधिक वाढत राहाणें इष्ट आहे. शास्त्रीय ज्ञानाचा अद्‌भुतपणा यक्षिणीचे कृत्याहून अधिक आहे व कादंबरी-पेक्षांहि मोहक आहे. जों जों प्रवाह पुढें जाईल, तों तों त्याचे तळीं दिव्य दिव्य रत्नें निपजूं लागतात; व ज्यांचीं कधीं कल्पनाहि नव्हती असल्या अपूर्व मौजा दृष्टीस पडतात. आयुष्य हें एखाद्या बगीच्याहूनहि आरामशीर वाटूं लागतें व त्यामुळें जीवनाला हुशारी येऊन अधिकाधिक उद्योग करण्यास हौस वाटते. असे अनेक फायदे ज्ञानवृद्धिपायीं होत असूनही जे कोणी ज्ञानाची उपेक्षा करीत अस-तील, ते परम कारुणिक व उदार परमात्म्यानें मनुष्यास दिलेली एक अद्‌भुत देणगी उकिरड्यावर फेंकून देत आहेत, असें दुःखानें म्हणावें लागतें ! आम्ही भारतवासी लोक बुद्धीनें कमी नाहीं. परंतु जोंपर्यंत आम्ही आपली खरी स्थिति-स्थापकता सोडीत नाहीं, तोंपर्यंत आमचे ' पहिले पाढे पढो पंचावन ' हीच दशा राहाणार ! सुदैवानें या कामीं युरोपचें उदाहरण डोळ्यांपुढें आहे. त्याचें अनुकरण सर्वांतर्यामानें आम्हीं केल्यास आम्हांसही आनंदाचे दिवस दुरावणार नाहींत. लवक म्हणतो, ' आपलें शास्त्रीय ज्ञान आपणांस अफाट वाटत असलें तरी निरभिमानानें बोलूं लागल्यास या अनंत विश्वांत भरलेल्या ज्ञानापैकीं

"खंडींत पाव रती' देखील ज्ञान अजून आपले हातीं आलें नाहीं."-(सुखशांति)

अशा तऱ्हेची आधिभौतिक सुधारणेची प्रचंड लाट उसळली असून, यंत्र-युगास खरी सुरवात झाली आहे. विद्युत्, वाफ व तेलें यांच्या शक्तीनें चालणारीं प्रचंड राक्षसी यंत्रें निर्माण होऊन त्यांमधून मालाची निपज प्रचंड प्रमाणावर होऊं लागली. त्यांतील एकेक यंत्र शेंकडों माणसांचें काम करूं लागलें. त्यामुळें या यंत्रांतून निघालेल्या प्रचंड मालांनीं जगाच्या बाजारपेठा काबीज केल्या व त्याबरोबरच सर्व जगांतून संपत्तीचा प्रवाह युरोप-अमेरिकेकडे गेल्या शतकभर एकसारखा वाहूं लागला. युरोप-अमेरिकेच्या वैभवाचें बीज त्यांनीं लाविलेल्या यांत्रिक शोधांत आहे. या यांत्रिक शक्तीनें जगांतील जुने धंदे नष्ट केले व ते यापुढें चालणें अशक्य करून टाकिलें. त्यामुळें गरिबांच्या तोंडचा घांस हिरावून घेतला गेला. त्यांत हिंदुस्थानसारखीं परतंत्र राष्ट्रें मरून चूर झालीं ! जीं राष्ट्रें स्वतंत्र होतीं त्यांनीं त्यामधून निर्माण झालेला बेकारीचा राक्षस नाहींसा करण्यासाठीं-ही राष्ट्रीय आपत्ति टाळण्यासाठीं-आपल्या देशांत मोठमोठे कारखाने काढण्यास धनिक लोकांस उत्तेजन दिलें, बुद्धिमान माणसांकडून संशोधन सुरू ठेविलें व जबर जकातीच्या प्रतिबंधक भिंती उभारून, राष्ट्रीय उद्योगधंद्यांचें संरक्षण व संवर्धन केलें. याचें उत्तम उदाहरण, म्हणजे इकडील जपान व तुर्कस्थान हें होय !

परकीय व्यापाऱ्यांची टोळधाड !

पण याच वेळीं जगाच्या औद्योगिक क्रांतींत हिंदुस्थान मात्र मागें पडला ! कारण यांत्रिक युगास आरंभ होण्याच्या सुमारासच पाश्चिमात्य राष्ट्रांतील धाडसी व सुसंघटित व्यापाऱ्यांनीं राजाश्रयाच्या बळावर हिन्दुस्थानवर व्यापारी आक्रमण करून या देशची संपत्ति हरण केली ! व याच संपत्तीच्या जोरावर पुढें आपली व्यापारी सत्ता दृढमूल करण्यासाठीं नानाप्रकारचीं कुटिल कारस्थानें रचून येथील राजसत्ता हस्तगत केली. इकडे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा नाश चालू असतां, त्यांच्या देशांत यंत्रकलेनें जन्म घेतला. वाफ, विद्युत् व तेल या सृष्टिनिर्मित शक्तींनीं यंत्रें सुरू झाल्यामुळें यंत्रांचें सामर्थ्य सहस्रपटीनें वाढलें. त्यामुळें मालाची निपज प्रचंड प्रमाणावर होऊं लागली. हा माल खपविण्यास त्यांना

आयतीच हिन्दुस्थानची बाजारपेठ सांपडली. या व्यापाऱ्यांनीं, हस्तगत झालेल्या मुलुखांत राजसत्तेच्या जोरावर आपल्या–इंग्लंडच्या–मालास उत्तेजन देऊन येथील बाजारपेठा आपल्या मालांनीं भरून काढल्या ! जबर जकाती, अनन्वित जुलूम व अगणित द्रव्यशोषण या उपायांनीं येथील उत्कर्षशिखरास गेलेले हजारों धंदे धुळीस मिळाले ! ! राजसत्तेच्या अभावीं परकीयांच्या यांत्रिक शक्तीपुढें आम्हीं हात टेकले ! व लवकरच क्रमाक्रमानें येथील उद्योगधंद्यांचा नाश झाला. हजारों वर्षांपासून चालत आलेले सर्व उद्योगधंदे नष्ट होत आल्यामुळें, राष्ट्रांत दारिद्र्य व बेकारी मात्र भयंकर माजून राहिली !

परकीय भांडवलाची आयात व वाढतें द्रव्यशोषण

गेल्या ५०।७५ वर्षांत हिंदुस्थानांत औद्योगिक कारखानें काढण्याच्या दृष्टीनें मोठा प्रयत्न झाला खरा ! पण त्यांतील तीनचतुर्थांशपेक्षां जास्त धंदे परकीय व्यापाऱ्यांनीं आपल्या स्वतःच्या भांडवलावर उभारलेले असल्यामुळें हिंदुस्थानचा खरा आर्थिक फायदा फारच थोडा झाला ! कापडाच्या व ज्यूटच्या गिरण्या, लोखंड व दगडी कोळसा, सोनें, अभ्रक इत्यादि खनिज पदार्थांच्या खाणी, राकेलच्या खाणी, चामड्याचे मोठमोठे कारखाने, चहाचे मळे, रेल्वे व आगबोटी यांचा प्रसार इत्यादि शेंकडों प्रकारांत त्यांनीं आपलें अलोट भांडवल--१५०० कोटींचें भांडवल गुंतविलें. या व्यापारांतील ६० कोटींपेक्षां जास्त नफा दरसाल परदेशीं जाऊं लागला ! देशाच्या अन्तर्बाह्य वाहतुकीचीं साधनें, ज्या रेल्वे, मोटारी व बोटकंपन्या त्या परकीय भांडवलावर व सत्तेवर उभारल्या असल्यामुळें त्यांपायीं हिन्दुस्थानच्या लोकांचे कोट्यवधि रुपये सालोसाल परदेशीं जाऊं लागले. जहाजांचें भाडें ४०–५० कोट रुपये, रेल्वेंत गुंतविलेल्या भांडवलावरील व्याज ३५ ते ४० कोट रुपये, मोटारी व त्यांस लागणारी तेलें यापायीं १२।१५ कोटि रुपये, एकूण सुमारें १०० कोटींपेक्षां जास्त पैसा केवळ वाहतुकीप्रीत्यर्थ प्रतिवर्षीं इंग्लंडची वाट चालूं लागला ! याशिवाय व्यापारांतील नफा, होमचार्जेसचा खर्च, इंग्रजी नोकरांच्या पगारांतील शिलका व पेन्शनें इत्यादि अनेकविध मार्गांनीं या देशांतून पाण्यासारखा पैसा (सुमारें २२० कोटि रुपये) प्रतिवर्षीं इंग्लंडमध्यें जाऊं लागल्यामुळें आमची औद्योगिक क्रांति–आमच्या व्यापाराच्या नाड्या पार आंखडल्या गेल्या ! आमची चलनवलनशक्ति नष्ट होत चालली

व आम्ही हिन्दुस्थानांतील तरुण प्रेतवत् दिसूं लागलों ! दारिद्र्यानें आमच्या तोंडास काळोखी फासली गेली व आम्ही जगाच्या दास्यत्वास पात्र झालों ! यांत्रिक युगांतील परकीय आक्रमणानें आम्हांला माणसांतून उठविलें !

" हिंदुस्थानांत ब्रिटिश व परक्या व्यापाऱ्यांनीं गुंतविलेलें भांडवल हेंच आमच्या उद्योगधंद्याला मारक होतें. या परक्या भांडवलामुळें दुर्बळ स्थितींत असलेल्या आपल्या उद्योगधंद्यांचे पाय जमिनीला लागत नाहींत. त्यांचें भांडवल मोठें व सर्व प्रकारची अनुकूलताही मोठी असल्यामुळें, आमचे उद्योगधंदे त्यांच्यापुढें टिकाव धरूं शकत नाहींत. परक्या व्यापाऱ्यांचें भांडवल येथें किती व कसल्या धंद्यांत गुंतविलेलें आहे, हें खालील आंकड्यांवरून दिसून येतें.

(प्रो. शहा व खंबाटा यांच्या पुस्तकांतील आंकडे.)

अनु. नं.	वर्णन	संख्या	गुंतविलेलें भांडवल (पौंड)
१	बँकिंग व कर्ज	२९	६,८७,२८,६,३१
२	विमा	११३	१०,३४,७३,९,९१
३	नौकानयन	१७	२,३१,६९,८,७६
४	रेल्वे व ट्राम्वे	२५	३,५५,७१,३,७६
५	इतर व्यापारी कंपन्या	२२७	२३,२०,५२,३,७७
६	चहा	१७०	१,८६,०३,३,४९
७	मळे इतर	३७	२९,६४,९,६८
८	कोळशाच्या खाणी	६	९,१४,९,६२
९	सोन्याच्या खाणी	१०	२०,५९,४,५४
१०	इतर खाणी	१७	१,०४,६१,९,९९
११	कापसाच्या गिरण्या	८	६,६१,८,८८
१२	ज्यूटच्या गिरण्या	७	२३,९२,०००
१३	कापूस–ज्यूटचे जीन	२	१,५०,०००
१४	साखर	२	३,०६,६,५६
१५	इतर कंपन्या	८	१,०७,०४७
	एकूण	६७८	५०,१६,१३,५७४

" हिंदुस्थानांत जवळजवळ ७॥ अब्ज रुपयांचें (७५० कोटीचें) भांडवल परक्या कंपन्यांनीं गुंतविलें आहे. याशिवाय युरोपियनांचें रेल्वे वगैरे सरकारी कर्जांत सुमारें ८०० कोटीचें भांडवल गुंतलें आहे तें वेगळेंच ! हें एवढें १५००।१६०० कोटीचें अवाढव्य भांडवल गुंतविल्यामुळें परदेशीं किती पैसा जातो, याचा विचार करणें कठीण नाहीं. खाजगी भांडवलाशिवाय हिंदी किनाऱ्या किनाऱ्या नजीकच्या जहाजांच्या वाहातुकीप्रीत्यर्थ २२–२३ कोटि रुपये परक्या व्यापाऱ्यांना मिळतात ! (याशिवाय बाहेरदेशीं जाणाऱ्या व येणाऱ्या आगबोटीस ४०।५० कोटि रुपये वहातुकीचें भाडें मिळतें तें निराळेंच !)

" हिंदुस्थानांत परक्या व्यापाऱ्यांनीं गुंतविलेलें सारें भांडवल त्यांनीं इंग्लंडहून आणलें असेल, अशी कल्पना करण्याचें कारण नाहीं. हें भांडवल एकाच वेळीं गुंतविलें नसून, फारा दिवसांपासून सांचत आलेलें आहे. १८३२ मध्यें पार्लमेंटरी कमेटीनें येथें निळीच्या धंद्यांत गुंतविलेलें भांडवल कोठून आणलें असा प्रश्न विचारला असतां, ' डेव्हिड हिल ' म्हणतात कीं, ' हें सारें भांडवल हिंदुस्थानांतच गोळा केलेलें आहे. '

" Where does the capital employed by the indigo planters come from ?"

" It is accumulated in India exclusively."

दुसरा साक्षीदार म्हणतो " In truth, capital is, I believe, never taken from England to India; it is made there and remitted home."

(चित्रमय जगत् १९३०.)

अशा तऱ्हेनें परकीय व्यापाऱ्यांच्या व धनिकांच्या मगरमिठींत आमच्या देशाचे भरभराटीस आलेले उद्योगधंदे गेलेले दिसतील ! या प्रचंड भांडवलाच्या जोरावर व अभेद्य अशा संघटित शक्तीवर–राजाश्रयावर–ब्रिटिश व्यापाऱ्यांना हिंदुस्थानची बाजारपेठ काबीज करतां आली. या आर्थिक पकडीचे पेच इतके बळकट बसले आहेत कीं, ते ढिले करतां करतां राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नाकीं नव येऊन जातील !

औद्योगिक उन्नतीच्या दृष्टीनें देशांतील शिक्षणाकडे पाहिल्यास पूर्ण अंधार दिसतो ! औद्योगिक शिक्षण हें जणुं काय हिन्दी लोकांस वावडेंच आहे ! 'त्याच्या प्रसाराचा प्रयत्न करणें हिन्दी पैशाचा व वेळेचा अपव्यय करणेंच होय' अशी राज्यकर्त्यांची मनीषा दिसते ! म्हणूनच त्याच्या प्रसाराचा प्रयत्न राज्यकर्त्यांनीं आजवर बिलकूल केलेला दिसत नाहीं ! या देशांत स्थापन झालेल्या हजारों परकीय कारखानदारांनीं हिन्दी माणसास औद्योगिक ज्ञानाचा—शिक्षणाचा—यत्किंचितही संपर्क लागूं दिला नाहीं ! हिंदुस्थानांतील पुस्तकी शाळांनीं उत्तम खर्डेघाशी कारकूनवर्ग निर्माण केला ! आज देशाची धुरा तो वाहात आहे ! ही काय आमची थोडी सुधारणा झाली, म्हणून त्यांनीं यांत्रिक शिक्षणाकडे लक्ष द्यावें ? हिन्दुस्थानांतील सर्वश्रेष्ठ विभूति जे पूज्य महात्मा गांधीजी त्यांना यांत्रिक सुधारणा ही तर पूर्ण वावडी आहे ! यंत्रांनीं मनुष्यांची माणुसकी घालविली—बेकारी निर्माण केली—हा त्यांचा आक्षेप ! म्हणून ते यंत्रांपासून चार पावले दूरच ! फक्त चरका आणि टकळी हीच काय ती जगाच्या—हिंदुस्थानच्या—प्रगतीचीं साधनें त्यांना दिसतात ! सुतानेंच स्वर्ग मिळेल हाच त्यांचा दृढ विश्वास ! म्हणून आपल्या उभ्या आयुष्यांत याशिवाय दुसरी कोणतीहि औद्योगिक चळवळ करावयाची नाहीं असें जणूं त्यांनीं खडतर व्रतच धारण केलेलें दिसतें ! चरका हाच गरिबांचा परमेश्वर ! त्याची उपासना हाच मोक्ष ! त्यांतून निघालेलें सूत हेंच मोक्षास जाण्याचे धागे ! अशी त्यांची दृढ सद्भावना आहे ! अर्थात् आम्ही इतके अल्पसंतुष्ट व अल्पवेतनी राहूं लागल्यावर राज्यकर्त्यांनीं तरी आमच्या औद्योगिक सुधारणेसाठीं विशेष धडपड कां करावी ?

पण आज हा मनु पालटलेला दिसतो ! सुभाषचन्द्र बोस सारखा तरुणांचा कलिजा, पंडित नेहरूसारखे चतुरस्र सेनानी यांनीं हिन्दी तरुणांच्या अन्तःकरणांतील भूक ओळखली ! हिन्दी हृदयाची झालेली कालवाकालव त्यांना दिसली ! म्हणून तर हे रणगाजी, भारताच्या अभ्युदयासाठीं, औद्योगिक उन्नतीच्या गर्जना आसेतुहिमाचल करूं लागले ! 'भारता ! ऊठ, जागा हो ! औद्योगिक उन्नतीसाठीं सज्ज हो !' असा खडा इषारा त्यांचेकडून मिळूं लागला !

अशा वेळीं आपणांस आपली उन्नति कशी करून घेतां येईल याचाच विचार करावयास नको का ?

भांडवल उभारण्याची प्रचलित सदोष पद्धति

यांत्रिक युगांत मालाची निर्मिति प्रचंड प्रमाणावर होण्यासाठीं, कारखाने, गिरण्या व खाणी यांस लागणारें लक्षावधि रुपयांचें भांडवल उभारण्याचा सर्वसम्मत राजमार्ग म्हटला म्हणजे शेअरपद्धति हा होय. संकल्पित भांडवलाचे सोईस्कर भाग ठरवून ते विक्रीस काढणें व त्या रूपानें भांडवल उभारणें हा प्रघात सर्व भांडवलशाही राष्ट्रांतून दिसून येतो. पांच रुपयांपासून पांच हजार रुपयांपर्यंतचे व प्रसंगीं त्यापेक्षांही जास्त किंमतीचे शेअर्स (भाग) विक्रीस काढून जमा झालेलें भांडवल हुशार कामगारांचा संच निर्माण करून, कारखान्यांच्या रूपानें आपणांस दिसतें !

शेअरपद्धतीनें भांडवल उभारण्यांत गिरण्या अगर कारखाने अथवा खाणी, भांडवलवाल्या वर्गाच्या हातीं जाऊन, 'भांडवलशाही विरुद्ध मजूरदार' असें त्यास वर्गकलहाचें स्वरूप प्राप्त होतें. पाश्चिमात्य देशांकडून, विशेषतः रशियामधून सोशालिझमरूपी वारे वाहात असल्यामुळें, समाजांतील गरीबश्रीमंतांत व मजूर-कारखानदारांत धुमसत असलेला द्वेषाग्नि केव्हां पेट घेईल, हें सांगतां येणार नाहीं. जगाचें सुकाणू ह्या वादांत कोणीकडे वळेल ह्याचा नेम नाहीं. म्हणून वरील सर्वसम्मत पद्धति स्वीकारणें धोक्याचें व नाशाचें आहे, असें आतां सर्व विचारी माणसांस वाटूं लागलें आहे !

कारखानदारी युगांतील झब्बूशाही !

आजपर्यंतच्या कारखानदारी युगांत भांडवल एका वर्गाचें व प्रत्यक्ष परिश्रम दुसऱ्या वर्गाचे, असे दोन स्वतंत्र वर्ग पडलेले दिसतील. म्हणजे कोठल्या तरी धनिक वर्गाकडून, शेअर्सरूपानें भांडवल उभारावयाचें व कोठल्यातरी व कसल्या तरी बेकार तरुणांनीं त्यांत दिला जाईल तो पगार घेऊन इच्छेस येईल तितके दिवस त्यांत काम करावयाचें, असें स्वरूप असे ! यामध्यें पुढेंपुढें करणाऱ्या सर्व धूर्त व चाणाक्ष व्यक्ति, कोणी डायरेक्टर बोर्डांत तर कोणी कारखान्याच्या उच्च नोकरवर्गांत आपली वर्णी लावून घेत ! त्यांतील विशेष तेजस्वी व्यक्ति ही तर

अशा कारखान्याची मॅनेजरशिपच घेऊन बसे ! यांचे पगार पाहिले तर ते दर-महा २०० रुपयांपासून २००० रुपयांपर्यंत चढत गेलेले दिसतील ! सर्वांत कनिष्ठ नोकरास मासिक ५।६ रुपयांपासून पगारास सुरवात व्हावयाची ! शेंकडा ८० टक्के नोकरवर्ग तर दरमहा ५ रुपयांपासून २५ रुपये पगारापर्यंतच वेतन घेत असावयाचा ! हा वर्ग बहुतेक अशिक्षित, पण प्रकृतीनें पूर्ण सुदृढ, म्हणूनच कष्टाचीं अवजड कामें करण्यास लावलेला असावयाचा ! त्यांचें वेतन, हें रोज पांच आण्यांपासून आठ आणे इतकेंच भारी असावयाचें ! बाकीचा शेंकडा १५ टक्के वर्ग हा बहुतेक पांढरपेशा वर्गांतील, सुशिक्षित, पण प्रकृतीनें नाजुक व गोरागोमटा असावयाचा ! आरामशीर जागीं बसून, विजेच्या पंख्याचा वारा घेत, त्याचें लेखी काम चालावयाचें ! त्याचा पगार २५ रुपयांपासून २०० रुपयांपर्यंत चढत गेलेला असावयाचा ! राहिलेला शेंकडा ५ इतका बड्या भाग्यवंतांचा वर्ग त्यांत असावयाचा ! तो नखशिखान्त इस्त्रीच्या सूटमध्यें, आपले कोमल हात पँटच्या खिशांत घालून, भेदक नजरेनें, करड्या आवाजानें व हुकमी वाणीनें सर्वत्र अधिकार गाजवीत मॅनेजमेंटकरितां फिरत असावयाचा !

कारखान्यांतील कर्तुमकर्तुम् शक्ति, म्हणजे हाच बड्या पगाराचा वर्ग ! ह्याला काम थोडें पण पगार भरगच्च असावयाचा ! कारण हे लक्ष्मीपुत्र असावयाचे ! विद्यादेवीचा वरदहस्त यांचे मस्तकीं असावयाचा ! कारखान्याच्या भरभराटीसाठीं व शेअर होल्डरांना जास्त डिव्हिडंड वाटतां येण्यासाठीं, कपातीच्या व त्याचबरोबर कामवाढीच्या योजना यांच्या खिशांत अगदीं जय्यत तयार असावयाच्या ! त्यांची अम्मलबजावणी कारखान्यांतील शेंकडा ८० अशा अर्धपोटी कामगारांवरच त्यांनीं प्रथम करावयाची ! नाहींतर ते उत्तम मॅनेजर कसे ठरावयाचे ? राज्यकारभारांत जशी बड्या पगाराची नोकरशाही शिरजोर झालेली असावयाची, त्याप्रमाणेंच कारखान्याच्या क्षेत्रांत ही मॅनेजरी शिरजोर झालेली दिसावयाची ! त्यांचें काम म्हणजे काटकसर, मजुरांची पिळवणूक व वेळ पडल्यास संपवाल्यांची मुस्कटदाबी हेंच असावयाचें ! या शेंकडा ५ लोकांचा पगार हा शेंकडा ८० मजुरांच्या पगारापेक्षां थोडा जास्तच असावयाचा ! शेअर होल्डरचा व त्यांचा संबंध फक्त डिव्हिडंड वाटण्यापुरता ! त्यांचे प्रतिनिधि—डायरेक्टर बोर्ड—हेच खरे सत्ताधीश ! त्यांना दर मीटिंगच्या वेळेस थैलीभर भत्ता व मैलेज मिळाव-

याचेंच ! यांत्रिक ज्ञानाची व यांची जवळ जवळ फारकत असावयाची ! हा वर्ग विद्वान खरा, पण यांत्रिक ज्ञानाच्या बाबतींत पूर्ण अनभिज्ञ ! म्हणून त्यांची सर्व भिस्त अशा मॅनेजरसाहेबांच्या कर्तबगारीवरच असावयाची ! एकूण काय, तर ज्याचा माल, त्याचेच हाल दिसावयाचे !

बिचारे शेअर होल्डर्स मात्र मिळेल तो डिव्हिडन्ड घेऊन देशाच्या आन्तर भागांत कोठें तरी असावयाचे ! कारखान्याची व त्यांची ओळख व्हावयाची म्हणजे कपिलाषष्ठीचाच योग ! कारखान्यास नफा झाला नाहीं म्हटलें, कीं बसले हे स्वस्थ ! करतात काय ? शेअरमधील भांडवल त्यांस परत देण्यास थोडाच कारखाना बांधलेला आहे ! शेअर होल्डर्सना नफा नाहीं म्हणून, मॅनेजरसाहे-बांच्या पगारांत किंवा कमिशन एजंटच्या खुराकांत एखादा रुपया कमी पडेल म्हणाल, तर शपथ ! त्यांनीं काय म्हणून कमी घ्यावें ? भांडवलावर ऐता नफा खाण्यास सोकलेल्या ह्या शेअर होल्डरांना त्यांनीं आपल्या पगारांत दोन पैसे कमी करून जास्त नफा काय म्हणून करून द्यावा ? ‘ तळें राखी तो पाणी चाखी ’ ही म्हण त्यांनीं सार्थ करूं नये, तर मग कोणीं ?

तेव्हा असा हा भांडवलशाही युगांत ‘ आंधळ्या कोशिंबिरीचा ’ खेळ रात्रं-दिवस चालू असतो !

स्वदेशीचें स्तोम ह्याच वर्गाकडून माजविलें जातें ! मोठमोठे राजकारणी लोक यांचे हस्तक असतात ! कारखान्यास भेटीस बोलावून त्यांच्याकडून आपल्या कर्तबगारीची जाहिरात हाच वर्ग पुरेपूर करीत असतो ! गरीब बिचारे शेअर होल्डर्स व कामकरी ! त्यांना मात्र स्वदेशीची ओळखही नसते ! ओगले ग्लास वर्क्सचे कित्येक शेअर होल्डर्स, प्रभाकर कंदील किंवा ओगल्यांची कांच न घेतां, अमेरिकन किंवा जर्मन कंदील व कांचा खुशाल घेत असतात ! हें दृश्य पाहून अन्तःकरण कळवळून जातें ! त्यांत तरी त्या बिचाऱ्यांचा दोष काय ? दोन पैसे जवळ होते म्हणून त्यांनीं त्यांत गुंतविले ! झालें त्यांचें कर्तव्य ! त्यांना स्वदेशीचे धडे कोणीं द्यावयाचे ? डायरेक्टर बोर्डातील लोक किंवा मॅनेजर वर्ग हें काम करील, तर मग नवल तें कोणतें ! एकंदरींत असा हा कार-खानदारी युगांतील जामानिमा असतो !

आतां यास अपवाद असतील, नाहीं असें नाहीं. पण असले तरी ते अगदीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतके ! तसें नसतें तर दरसाल शेंकडों गिरण्यांमधून व कारखान्यांमधून हजारों कामगार संप कां करितात ? व पोलिसांचा लाठीमार व गोळीबार यांस बळी कां पडतात ? ह्यांतील खरी भांडवलशाही कोणती ? शेअर होल्डर्स, कां डायरेक्टरवर्ग, कां मॅनेजरवर्ग ? वाचकहो, हा प्रश्न मी तुमचेवरच सोंपवितों ! मी तर ह्या प्रकारास भांडवलशाही न म्हणतां झब्बूशाही म्हणतों !

कारखानदारी युगांत मजुराला माणुसकी राहिली नाहीं. त्यानें मिळेल त्या पगारावर दिवसभर राबावें व दिला जाईल तो पगार घ्यावा असा दंडकच ठरला आहे ! अर्थात् अशा बेफिकीर वृत्तीमुळेंच कामगार मयत झाला तरी त्याचें सोयरसुतक कारखान्याच्या चालकास नाहीं कीं शेअरहोल्डर्संना त्याची दाद नाहीं ! किंवा कामगार कसल्याही हीन परिस्थितींत जीवित कंठीत असला तरी त्याची कोणास वास्तपूसहि नाहीं !

जिकडे भांडवल तिकडे नफा ! श्रमजीविकांची उपासमार !

शेअरपद्धतीनें भांडवल उभारण्यांत, शेअरहोल्डर बनलेला धनिकवर्ग हा बाजूसच राहतो. त्यांचे प्रतिनिधि व कारखान्यांतील बड्या पगाराची नोकरशाही ह्यांच्याच हातांत सत्ता एकवटलेली असते. त्या सत्तेचा हेतु, मजुरांना कमींत कमी पगार देऊन, जास्तींत जास्त राबविण्याचा असतो ! कारखान्यास होणारा फायदा हा शेअर होल्डर्सना डिव्हिडंडच्या रूपानें व बड्या नोकरशाहीला लठ्ठ पगाराच्या रूपानें मिळत असतो. त्या नफ्यामधील थोडादेखील अंश मजुरांच्या हितासाठीं किंवा संवर्धनासाठीं खर्ची पडत नाहीं ! त्यामुळेंच वरचेवर संपासारखे तीव्रतम तंटे माजून वर्गकलह चेतविला जातो ! 'ब्राह्मणांतील बेकारी' ह्या पुस्तकांत श्री. पटवर्धन म्हणतात कीं, "अहमदाबादच्या गिरणीमालकांशीं मजुरांचा तंटा सुरू असतां, मजूरसंघानें असें सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं, १९१६ ते १९३२ पर्यंत प्रत्येक मालकाला आपलें नुकसान भरून काढूनसुद्धां सरासरीनें शेंकडा ३२ टक्के नफा पडलेला आहे. ९ टक्क्यांखालीं तर तो कधींच गेला नाहीं. शें. ५८ टक्क्यांइतकी भरमसाट रक्कम मिल एजंटांना

देऊनही प्रत्येक गिरणीवाल्यास निव्वळ फायदा शें. १६ टक्के पडला आहे. १९१८ ते १९३२ पर्यंत नुसता कागदोपत्रीं दिसणारा नफा ८०००००० रुपये इतका मिल एजंटांना मिळाला होता! त्याचप्रमाणें मुंबईच्या गिरण्यांनीं सन १९२२ ते १९२९ पर्यंत आपल्या शेअरहोल्डर्सना नफा दर शंभर रुपयांमागें १२५ रुपये दिला आहे!"

म्हैसूरच्या कोलार येथील सोन्याच्या खाणीचा अहवाल जो नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत असें म्हटलें आहे कीं, 'गेल्या ५० वर्षांत या कंपनीनें १०५ कोटीचें सोनें, ह्या खाणींतून काढून नेलें! त्यापैकीं ३७॥ कोटि रुपये फायदा, कंपनीनें आपल्या २॥ कोटि रुपये भांडवल भरणाऱ्या शेअर होल्डर्सना वाटला आहे!' (मजुरांना नव्हे!)

'आसाम, निलगिरी व हिमालयाचा उतरणीचा प्रदेश या भागांतून चहाचे मळे घालणारे युरोपियन मळेवाले असून त्यांनीं त्या धंद्यांत ५० कोटि रुपयांचें भांडवल गुंतविलें आहे. या भांडवलावर महायुद्धाच्या पर्वणींत ह्या गोरे मळेवाल्यांनीं शंभर रुपये भांडवलावर २३० रुपयांपासून ४७० रुपयांपर्यंत भरमसाट नफा वाटलेला आहे. अशा मळ्यांतील मुदतबंदीच्या मजुरांना वेतन विचाराल, तर तें अवघें रोजीं दोन ते तीन आणे!'—(केसरी).

अशा तऱ्हेनें कोट्यवधि रुपयांचा फायदा शेअरहोल्डर्सनीं व मिल एजंटांनीं मिळविला आहे! त्यापैकीं कितीसा फायदा मजुरांची स्थिति सुधारणेसाठीं खर्ची पडला आहे? (कोणत्याहि रिपोर्टांत त्याचा उल्लेख नाहीं.) उलट पगार कपातीमुळें मात्र संप करून गिरणी-मजुरांनीं चारचार महिने अत्यंत हलाखींत दिवस काढले आहेत. तेव्हां शेअरपद्धतीनें भांडवल उभारण्यांत, मजुरांची स्थिति न सुधारतां, धनिकांना मात्र अधिक श्रीमंत होतां येतें व मजुरांच्या निढळाच्या घामावर अलोट नफा मिळविण्याचा मार्ग उपलब्ध होतो!

संपानिर्बंधाचे कायदे!

शेअरपद्धतीनें राष्ट्रांतील मूठभर धनिकांच्या हातांत सर्व कारखाने व सत्ता एकवटली जाते, व त्या सत्तेचा दुरुपयोग मजुरांना पिळून काढण्यांत होतो— त्यांच्या सर्व चळवळी मजुरांना दडपून टाकण्यांत होतो. त्याकरितां काँग्रेस सर-

कारला देखील गेल्या बैठकींत ' औद्योगिक कलहनिवारक बिल ' आणून पास करून घ्यावें लागलें ! त्या बिलाच्या वेळीं मजुरांच्या पुढाऱ्यांनीं सतत दोन महिने केलेला विरोध व त्यानंतर ७ नोव्हेंबर १९३८ चा झालेला सार्वत्रिक संप व त्याजबरोबर मजुरांच्या दंगली, पोलिसांचा गोळीबार व शेवटीं चौकशीचें केलेलें नाटक हें पाहिलें म्हणजे ह्या पद्धतीचा अगदीं वीट येऊन जातो. जितक्या लवकर ही भांडवलशाही नष्ट होईल तितक्या लवकर होवो, असें वाटावयास लागतें ! गरीब व श्रीमंत, मजूर व कारखानदार यांच्यामधील वर्गकलहानें तर रशियाची भांडवलशाही व साम्राज्यसत्ता धुळीस मिळविली ! व तेव्हांपासून तर प्रत्येक देशांतून भांडवलशाहीविरुद्ध मजुरांच्या चालू असलेल्या संघटित चळवळी पाहिल्या, म्हणजे तर त्या चळवळींतून आणखी किती राज्यक्रांत्या व्हावयाच्या आहेत तें कळेनासें होऊन, मति कुंठित होऊन जाते !

धनिकांचा दृष्टिभ्रम !

महाराष्ट्रांतील, ओगले व किर्लोस्कर ह्या नामांकित कारखान्यांचें भांडवल वरील पद्धतीनेंच उभारलें असून, राजाश्रयाच्या अभावीं हे कारखाने शेअरहोल्डर्सच्या दृष्टीनें आज किफायतशीर होईनासे झाले आहेत. त्यामुळें महाराष्ट्रांतील धनिकांचा ओढा यापुढें कारखान्यांत पैसे न गुंतवितां, सरकारी रोखे, कॅश सर्टिफिकिटें व बँकेंतील लांब मुदतीच्या जास्त व्याज देणाऱ्या ठेवी वगैरे रूपानेंच ठेवण्याकडे होत आहे, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय ! ह्या मनोवृत्तींत पालट झाल्याशिवाय उद्योगधंद्यास लागणारें लाखों रुपयांचें भांडवल मिळविणें दुरापास्त झालें आहे ! कारखान्यास फायदा होईनासा झाला कीं, लोकांच्या द्रव्याचा ओघ सरकारी खजिन्याकडे वळलाच म्हणून समजावें ! सरकारी खजिन्यांत पैसा ओतणें, म्हणजे राष्ट्र कर्तव्यपराङ्मुख करणें होय !

तेव्हां हा धनिक-मजुरांतील वर्गकलह मिटावा, थोड्या कालांत लाखों रुपयांचें भांडवल उभारतां यावें, ठिकठिकाणीं तरुणांच्या सहकारितेवर धंद्याची उभारणी व्हावी व त्यामधून काम करणाऱ्या सर्व लोकांची व त्यांच्या मुलाबाळांची पिढ्यानपिढ्या चांगली सोय लागावी व तेणेंकरून सर्व देशाची औद्योगिक भरभराट पुढील १० वर्षांतच व्हावी, या दृष्टीनें अत्यंत विचार करून पुढील

भागांत वर्णन केलेली पद्धति सर्व जनतेनें व मंत्रिमंडळांनीं जरूर अभ्यासावी अशी विनंती आहे. वाचकांचें लक्ष पुढील प्रकरणाकडे मी वेधूं इच्छितों.

भाग २ रा.

सद्यस्थितीचें मोजमाप.

इंग्रजी अमदानींत आंग्ल शिक्षणाचीं शाळा–कॉलेजें निघाल्यापासून देशांतला पुढारलेला वर्ग प्रथम तिकडे आकर्षिला गेला. सरकारला आपला राज्यकारभाराचा गाडा सुरळीत चालविण्यासाठीं, सुशिक्षित तरुणांचा भरगच्च पुरवठा अशा शाळाकॉलेजांमधून होऊं लागला. या पांढरपेशा वर्गांत, नोकरीवृत्तीचें, सेवावृत्तीचें बीजारोपण करून त्याची अमर्याद वाढ करण्यास मुख्यतः या शाळाकॉलेजांचीच मदत सरकारला झाली. यांमधून पाजलेलें ज्ञानामृत सेवावृत्तीखेरीज तरुणांच्या पोटाची भूक भागविण्यास असमर्थ ठरूं लागलें! मागणीपेक्षां पुरवठा जास्त झाल्यामुळें सुशिक्षितांत बेकारीचें भूत थैमान घालूं लागलें. खेड्यापाड्यांतून शहरांकडे धाव घेतलेला हा वर्ग, ज्ञानामृताच्या मागें लागून पूर्ण कफल्लक बनला! नोकरीला लॉटरीचें रूप प्राप्त झालें! हजारों रुपये खर्च करून व वयाची विशीपंचविशी शिक्षणाच्या चरकांत ओतूनही जीवनाचा प्रश्न सुटणें कठीण होऊं लागलें! तहानेनें व्याकुळ झालेलीं हरणें जशीं, पाणी भेटेल म्हणून मृगजळामागें एकसारखीं धावत सुटतात, त्याप्रमाणें नोकरीच्या आशेनें चटावलेला–वेडावलेला हा सर्व तरुण एकजात पांढरपेशा वर्ग, जवळ असेल नसेल तें सर्व धन शिक्षणापायीं खर्चीं घालून, प्रकृतीची तमा न धरतां, रात्रंदिवस कष्ट करून, जीविताचा प्रश्न सुटावा, म्हणून नोकरीच्या मृगजळामागें सारखा बेफाम धावतच आहे!

इंग्रजी अमदानींत घरगुती धंद्यांचा नाश झाल्यामुळें व हजारों लोकांचें काम एकएक यंत्र करूं लागल्यामुळें समाजाच्या सर्व थराथरांतून बेकारीचा रोग झपाट्यानें फैलवूं लागला! जीवनाचें साधन अशा रीतीनें हिरावून घेतलें गेल्यामुळें हा कोटयवधि निरक्षर बहुजनवर्ग किंकर्तव्यमूढ बनला! त्यापैकीं हजारों

लाखों—तरुणांनीं पांढरपेशा वर्गाचाच कित्ता आपल्या डोळ्यांपुढें ठेवून या ज्ञानसत्रांत !—भराभर उड्या घेण्यास सुरुवात केली ! त्याबरोबर हा सुशिक्षितांतील बेकारीचा राक्षस प्रत्येक तरुणाच्या अन्तःकरणाचें पाणी पाणी करूं लागला ! या ज्ञानसत्रापायीं शेंकडों—हजारों—रुपये खर्चीं घालावेत; वयाची विशी—पंचविशी—तिशी देखील खर्चीं घालावी व शेवटीं सर्टिफिकेटांचीं भेंडोळीं जवळ बाळगून, नोकरीसाठीं याचना करावी, वशिले लावावेत, प्रसंगवशात् सत्ताधाऱ्यांची गुप्तसंभावना करावी, असलें किळसवाणेंरूप आमच्या भावी जीवनास आलें आहे ! हल्लींच्या शाळाकॉलेजांमधील ज्ञानामृतानें आमच्या जीवनाचा प्रश्न सुटेल किंवा नाहीं याचा कोणताही पालक विचार करीत नाहीं; राजकारणी मुत्सद्यांचें तिकडे लक्ष नाहीं; आणि परकीय सरकारला तर तें आपलें कर्तव्य आहे असें मुळीं वाटतच नाहीं ! शेंकडों रुपये लॉटरीच्या तिकिटापायीं खर्चीं घालून आपला नंबर आज ना उद्यां लागेल आणि आपण सुखी होऊं ह्या विचारसरणीबरहुकूम, शिक्षण देणाऱ्या बहुतेक पालकवर्गाची मनोरचना तयार झाली असल्यामुळें नोकरीला लॉटरीचें रूप प्राप्त झालें आहे ! नोकरीव्यतिरिक्त अन्यत्र धंद्याचें ज्ञान त्याला दिलें नसल्यामुळें, ह्या नोकरीच्या खडकावरच एकसारख्या धडका मारण्यावांचून त्याला मार्गच दिसेनासा झाला आहे ! लॉटरीचें तिकीट काढून शेंकडा किती लोक सुखी झाले आहेत ? त्याप्रमाणेंच सार्टिफिकेटरूपी लॉटरीचें तिकिट काढून हल्लीं शेंकडा किती तरुण सुखी होत आहेत ? याचा विचार जनतेनें व काँग्रेस प्रधानमंडळांनीं करावयास नको काय ?

या इलाख्यांतून दरसाल मॅट्रिक परीक्षेस बसणारे २०।२२ हजार विद्यार्थी व व्ह. फा. परीक्षेस बसणारे ३५।४० हजार विद्यार्थी पाहिले म्हणजे, या सर्व विद्यार्थ्यांना नोकऱ्या कोठून आणावयाच्या, हें कोडें ' ब्रह्मदेवास ' तरी उकलेल कीं नाहीं, याची शंका वाटूं लागते ! ' आठशें लष्कर आणि नऊशें न्हावी ' अशी अवस्था झाल्यावर कोणत्या ' ब्रह्मदेवाला ' ह्या वर्गाची सोय नोकरींत लावून देतां येईल ? हा प्रश्न आज राष्ट्राच्या जिव्हाळ्याचा होऊन बसला नाहीं काय ? या बाबतींत अजून विचार करण्याची वेळ आली नाहीं, असें काँग्रेस प्रधानमंडळाला वाटतें काय ? औद्योगिक शिक्षणाच्या अभावीं, निव्वळ पुस्तकी ज्ञानामृताचे घुटके पाजून समाज जिवंत राहूं शकत नाहीं, हें

तत्त्व अझून त्यांच्या अन्तःकरणावर बिंबावयाचें आहे काय ? वर्धा-योजनेंतील साधनानेंच हा प्रश्न सुटेल अशी प्रांतिक सरकारची समजूत आहे काय ? असल्यास ती परिणामीं चुकीची आहे असें मला विनम्र भावानें सांगावेंसें वाटतें.

व्यापारास आलेलें किळसवाणें रूप

अशा तऱ्हेनें हा सर्व बुद्धिमान पांढरपेशा वर्ग पूर्णत्वानें शिक्षणाच्या व नोकरीच्या मोहपाशांत गुरफटलेला पाहून—उभ्या देशांत—गुजर, मारवाडी, भाटिया, कच्छी, मेमन, बोहरी, गुजराथी, लिंगायत, जैन या वर्गांनीं उद्योगधंद्यांत व व्यापारांत आपलें बस्तान इतकें दृढ करून टाकलें आहे कीं, व्यापाराचें नांव घेणेंहि इतरांस मुष्कील झालें आहे ! हा व्यापारी वर्ग चुकूनसुद्धां नोकरीचें नांव काढीत नाहीं ! इंग्रजी शिक्षणानें पांढरपेशा वर्ग जसा राज्यकर्त्यांचा दास—भक्त—बनला, त्याप्रमाणें हा व्यापारी वर्ग परकीय व्यापाऱ्यांचा व कारखानदारांचा निस्सीम भक्त बनला ! त्यांनीं माल उत्पन्न करावा व ह्यांनीं तो भरमसाट नफा घेऊन विकावा असें देशविघातक किळसवाणें रूप ह्या धंद्यास प्राप्त झालें ! ज्या मालांत दोन पैसे जास्त नफा मिळेल, तोच माल दुकानांत ठेवावयाचा; मग तो स्वदेशी असो अगर विदेशी असो ! तिकडे बिलकूल पाहावयाचें नाहीं, असा व्यापारी शिरस्ताच जणूं पडून गेला ! ओगल्यांचा कंदील कां दुकानांत ठेवत नाहीं ? तर ‘ तो परवडत नाहीं ! ’ परदेशी साबणच कां मागवतां ? तर ‘ देशी साबण विक्रीस परवडत नाहीं ! ’ अशीं ठरीव साच्याचीं उत्तरें मिळूं लागलीं ! गिऱ्हाइकाच्या पदरांत माल कसा बांधावा व रुपायाचा सव्वा रुपाया कसा करावा ह्याचें आनुवंशिक बाळकडू ह्या वर्गास पाजलें असल्यामुळें, परकीय कारखानदारांचा प्रश्न सुलभतेनें सुटला गेला ! दरसाल कोटयवधि रुपयांच्या मालाची आवक हिंदुस्थानांत होऊं लागली व त्यामुळें ह्या देशीं असलेले सर्व धंदे त्यापुढें पटापट मरूं लागले ! अशा तऱ्हेनें परकीय व्यापाऱ्यांचे हस्तक बनून—दलाल बनून—ह्या वर्गानें देशाचें अपरिमित नुकसान केलें आहे !

राहतां राहिला बहुजन असा कोटयवधि शेतकऱ्यांचा वर्ग ! अनियमित पाऊस, दुष्काळी हल्ले, सावकारीचा पाश, सरकारी भरमसाट कर, बाजारभावाची मंदी, कोर्टबाजी, दारूबाची व तदतर्गत अनेक व्यसनें या मार्गानें हा

समाज इतका पिळून निघत आहे–पोखरून निघत आहे, कीं तें पाहून बुद्धि कुंठित होऊन जाते व राष्ट्राचें भवितव्य कांहीं ठीक नाहीं असें वाटावयास लागतें ! हा वर्ग रोजच्या जीवनाच्या कैचींत सांपडल्यामुळें 'स्वदेशी व स्वातंत्र्य' या प्रश्नाकडे पाहाण्यास त्यास बिलकूल फुरसत नाहीं. पाठीशीं पोट बांधून गोळाभर अन्न मिळविण्यासाठीं हा वर्ग रातंदिवस कष्टमय स्थितींत जीवन कंठीत आहे. ही गोष्ट आतां सर्वांच्या निदर्शनास पुरेपूर येऊन गेलीच आहे.

अशा तऱ्हेनें राष्ट्रांतील सर्व थर कमीजास्त मानानें जीवनाच्या भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करीत आहेत. शेतकऱ्यास जोडधंदे देऊन त्याला आपल्या राहत्या गांवीं व नांदत्या घरीं सुखी करितां येईल. व्यापारी वर्गाची 'स्वदेशी घडी' बसविण्यासाठीं पांढरपेशा वर्ग हाताशीं धरून औद्योगिक क्रांति करावयास पाहिजे, ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत येऊन गेलीच असेल ! या वर्गाला लागलेलें नोकरीचें वेड, औद्योगिक क्षेत्रांत नोकरीचें पेव निर्माण करून कसें घालवितां येईल, हाच प्रश्न प्रामुख्यानें आपणांस आज सोडवावयाचा आहे; म्हणून त्या दृष्टीनें योजनेचें स्वरूप कसें असावें तें आपण समजून घेऊं.

पांढरपेशा वर्गांतील धनाचें औद्योगिक क्षेत्रांत पदार्पण !

पांढरपेशा वर्गांत सरकारी नोकर, वकील, डॉक्टर, इंजिनियर, कांट्रॅक्टर, सराफ, सावकार, बँकर्स, एजंट, भिक्षुक, जमीनदार–इनामदार, व थोडासा व्यापारी वर्ग यांचाच प्रामुख्यानें समावेश होतो. आपल्या मुलांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ, हजार पांचशें रुपये–प्रसंगीं त्यापेक्षांही जास्त पैसे खर्च करण्याची तयारी, धमक अजून ह्या वर्गांत आहे. अजून हा वर्ग शेतकऱ्यांच्या इतका निर्धन स्थितींत गेलेला नाहीं. ह्या वर्गांतून धनाची जोपासना व वाढ झाली आहे. परंतु बांधलेली ही शिदोरी किती दिवस पुरणार ? आपला प्रश्न कसाबसा सुटला, पण आपल्या मुलाबाळांच्या जीवनाचा भावी प्रश्न कसा सुटेल, याच चिंतेंत हा सर्व वर्ग आज आहे. तो न सुटल्यास त्यांच्याजवळील पुंजीही पुढील पिढींतच संपून गेल्याशिवाय राहणार नाहीं. हा बुद्धिजीवि वर्ग प्रज्ञाहत केल्यास किंवा त्याला सेवावृत्तीच्या गुलामगिरींत असाच पिचूं दिल्यास त्याचे राष्ट्रीय दुष्परिणाम झाल्याशिवाय कदापि राहणार नाहींत ! ह्या वर्गांतील शेंकडा ८० लोकांजवळ तरी

जमीनरूपी भांडवल मुबलक आहे. परंतु त्याच्या जोपासनेची व संवर्धनाची काळजी ह्या वर्गानें गेल्या ५०।७५ वर्षांत बिलकूल न घेतल्यामुळें, जीवनाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें तिचा तादृश उपयोग होईनासा झाला आहे. बुद्धि-प्रधान धंदे करावेत, नोकऱ्या कराव्यात, व जादा मिळणारें धन, सावकारींत-सरकारी रोख्यांत, बँकेत, पोस्टांत व कॅश सर्टिफिकेटांत गुंतवावें व त्यामधून मिळ, णाऱ्या अल्पस्वल्प व्याजावर संतुष्ट राहावें, यापलीकडे या वर्गाचें कार्यक्षेत्र गेलेलें दिसत नाहीं ! म्हणून ह्या सर्व मार्गांत गुंतून पडलेला पैसा आकर्षिला जाऊन तो उद्योगधंद्याच्या रूपानें व बेकारीनिवारणार्थ औद्योगिक क्षेत्रांत कसा आणला जाईल व तेणेंकरून त्याचा व त्याच्या वंशजांचा भावी जीवनाचा प्रश्न कशा तऱ्हेनें सोडवितां येईल याची स्वयंविकसित योजना राष्ट्रापुढें ठेवण्याचा प्रस्तुत लेखकाचा मानस असल्यामुळें, पुढील योजनेकडे मी सर्वांचें चित्त वेधून घेत आहें. तिचा विद्वानांनीं व देशहितचिंतकांनीं जरूर विचार करावा अशी विनम्र-भावानें विनंती करीत आहे.

औद्योगिक क्रांतिकारक योजना.

योजनेचें तत्त्वः—आजपर्यंतच्या कारखानदारी युगांत भांडवल एका वर्गाचें व प्रत्यक्ष परिश्रम दुसऱ्या वर्गाचें असें स्वरूप असे ! त्यामुळें वर्गकलह माजून मजुरांची स्थिति सुधारणें अशक्य होऊन जातें. म्हणून ही पद्धत न स्वीकारतां प्रत्यक्ष गिरणींत, कारखान्यांत अगर तत्सम उत्पादक धंद्यांत प्रत्यक्ष काम करून पोट भरणारालाच शेअरहोल्डर करून त्यामधून भांडवल उभारा-वयाचें, व त्यांच्यांतील लायक कामगार लोकप्रतिनिधींच्या हातीं त्या औद्यो-गिक शाखेची व्यवस्था देऊन, कारभार चालवावयाचा, हें या पद्धतीचें मुख्य तत्त्व राहील. राज्यकारभारांत ज्याप्रमाणें लोकशाहीची निस्सीम पूजा करावयाची, त्याप्रमाणेंच औद्योगिक क्षेत्रांतही मर्यादित स्वरूपांत कां होईना, पण लोक-शाहीचें तत्त्व अमलांत आणावयाचें, हें त्या योजनेचें वैशिष्ठ्य होय ! अर्थात् काम न करितां, निव्वळ भांडवल पुरविणाऱ्या वर्गास ह्यांत भागीदार न समजतां ठेवीदार म्हणून समजण्यांत येईल. भागीदारीचा उच्च दर्जा ह्या लक्ष्मीपुत्रांना न देतां ठेवीदारीचा दुय्यम दर्जा (सत्ताविरहित) असा देण्यांत येईल. त्यामुळें श्रमजीविकांची उपासमार होणार नाहीं. श्रमजीविकांच्या हातीं अशा कारखा-

त्याचीं सर्व सूत्रें दिलीं जाणार असल्यामुळें धनिक–मजुराचा प्रश्न येथें उत्पन्न होणार नाहीं. अशा धंद्यांत वर्गकलहाचें बीज निर्माण होणार नाहीं. संपासारख्या तीव्रतम चळवळी जन्म पावणार नाहींत. म्हणून हें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहाराच्या कसोटीवर उतरण्यासाठीं कारखान्यांची अगर गिरण्यांची उभारणी पुढील तत्त्वानुसार व्हावी.

कारखान्याचे उद्देश.

(१) कारखान्याचें भांडवल हें, कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांमधूनच प्रत्येकीं ५०० रुपयेप्रमाणें उभारण्यांत येईल. काम न करितां भांडवल गुंतविणाऱ्या धनिकांचे पैसे, कारखान्याच्या बँकेंत ठेव म्हणून स्वीकारले जातील, व त्यांवर त्यांना ठेवीदार म्हणून ठरलेलें व्याज मिळत राहील. अर्थात् या भांडवलाचा कारखान्याच्या मालकीहक्काशीं कोणत्याहि प्रकारें संबंध राहणार नाहीं.

(२) गिरणी अगर त्याला जोडून काढलेले हरएक प्रकारचे कारखाने, हे त्यांत काम करणारांच्याच मालकीचे राहतील. म्हणजे गिरणींत अगर कारखान्यांत, अगर त्याच्या अनेक इतर शाखांत काम करणारा मनुष्य हा त्या कारखान्याचा अंशभागी मालक म्हणून समजण्यांत येईल.

(३) अठरा वर्षांचें पूर्ण वय, निकोप प्रकृतीचा डॉक्टरी दाखला, देशभाषेंतील प्राथमिक सात इयत्तांचा किंवा दुय्यम शाळेंतील सात इयत्तांचा शिक्षणक्रम पुरा केल्याचा दाखला (नापास असला तरी चालेल) व ५०० रुपयांचें शेअर डिपॉझिट, ह्या अटी पुऱ्या करणाऱ्या कोणत्याहि जातीच्या व धर्माच्या तरुणाची यांत निवड केली जाईल. ह्या अटी पूर्ण न करणारास या क्षेत्रांत घेतलें जाणार नाहीं. हा फायदा ह्या देशच्या कायम रहिवाशांनाच घेतां येईल.

(४) ह्या योजनेचा फायदा, दोन एकर जमीन पदरीं बाळगणाऱ्या शेतकऱ्यास, आपल्या जमिनीचें रूपांतर रोकडींत करून, व आपल्या मुलास देशभाषेंतील प्राथमिक सात इयत्तांचें शिक्षण देऊन करून घेतां येईल. दोन एकर जमिनीच्या विक्रीचा पैसा ५०० रुपये होत असल्यामुळें जमीनरूपी भांडवलाच्या पतीवर, आपल्या मुलाबाळांचा प्रश्न सोडविणें सामान्य शेतकऱ्यास देखील

शक्य होईल. म्हणून लक्ष्मी आणि सरस्वती (पैसा आणि शिक्षण) यांचा संयोग, बेकार सुशिक्षित तरुणांच्या योगानें औद्योगिक क्षेत्रांत पुरेपूर करून घेण्यांत येईल. कमींत कमी २।३ एकर जमीन पदरीं असलेले खातेदार या इलाख्यांत सुमारें २० लाख असल्यामुळें, ह्या अटीचा फायदा इतक्या मोठ्या खातेदारांस घेणें शक्य होईल.

(५) अशा कारखान्यांत काम करणाऱ्या प्रत्येक कामगारास 'मत' देण्याचा हक्क राहील. या मतदारांमधूनच पांच इसमांचें एक प्रातिनिधिक मंडळ निवडण्यांत येईल. या मंडळांत प्रांतिक सरकारकडून लोकनियुक्त अशा तीन तज्ज्ञांची नेमणूक करून हें आठ इसमांचें अष्टप्रधानमंडळ म्हणून निवडण्यांत येईल, या मंडळाच्या हातांत कारखान्याचीं सर्व सूत्रें देण्यांत येतील.

(६) अशा प्रातिनिधिक मंडळाच्या वार्षिक कामगिरीसंबंधीं वर्षाअखेर विश्वासाचा ठराव मांडला जाईल. तो पास झाल्यास ह्या मंडळास पुढील सालीं काम करण्यास परवानगी मिळेल. ठराव नापास झाल्यास दुसरी फेरनिवडणूक होईल.

(७) ह्या निवडणुकीस उभे राहणाऱ्या इसमास तेथील काम पार पाडतां यावें म्हणून जरूर तें शिक्षण देण्याची कारखान्याकडून आगाऊ जरूर ती व्यवस्था होईल. त्यामध्यें पास होणाऱ्या उमेदवारासच प्रतिनिधि म्हणून उभें राहण्याचा हक्क राहील. अशा प्रतिनिधींमधूनच मतदानपद्धतीनुसार निवडणूक होईल. प्रांतिक सरकारकडून नेमलेल्या लोकनियुक्त तज्ज्ञांची देखील विश्वासाच्या कामगिरींत गणना केली जाईल. त्यांच्यावरील विश्वास प्रगट न झाल्यास त्यांची रवानगी प्रांतिक सरकारकडे करण्यांत येईल व दुसऱ्या तज्ज्ञांची नेमणूक करून मागतां येईल. हेतु हा कीं, प्रत्यक्ष जबाबदारीनें काम करणारीं हीं प्रातिनिधिक माणसें सुज्ञ व आपल्या कामांत तज्ज्ञ असावींत. म्हणजे ही टुमदार औद्योगिक घटना व्यवस्थित चालेल. अशा निवडणुकी दर पांच वर्षांनीं पुन्हा होतील. पण दरसाल विश्वासाचा ठराव पास व्हावयास पाहिजे.

(८) कारखान्यांत काम करणाऱ्या माणसास त्याच्या लायकीप्रमाणें काम व वेतन मिळेल व तो काम करण्यास समर्थ असेपर्यंत त्याच्याकडून काम करून

घेतां येईल. तो केव्हांहि मयत झाल्यास, त्याच्या वारसास लायकीप्रमाणें कामावर नेमून घेतलें जाईल.

(९) कामगारांचें वेतन ठरविणें, नवीन उद्योगधंदे काढणें, कारखान्यांची वाढ करणें, कामगारांच्या वसाहतीचा प्रश्न हातीं घेऊन तो सोडविणें, वसाहतींत निरनिराळ्या उपयुक्त संस्था काढणें इत्यादि अनेक प्रकारचीं कामें कामगारांच्या प्रातिनिधिक कौन्सिलमार्फतच केलीं जातील व त्याबद्दल त्यांना वार्षिक ९०० रु. बोनस म्हणून मिळतील. तज्ज्ञ माणसांनाहि वार्षिक ९०० रु. बोनस म्हणून देण्यांत येतील.

(१०) कारखान्याच्या सुरवातीस, कारखान्यांत दाखल करून घेण्यांत येणाऱ्या कामगारांपैकीं, कोणास कोणत्या शाखेंत दाखल करून घ्यावयाचें तें काम सरकारी तीन तज्ज्ञांकडून करून घेण्यांत येईल. त्या वेळेस कामगारांची लायकी ठरविण्याचें एक साधारण माप ठरविण्यांत येईल. कामगाराची तडफ, त्याची शरीरप्रकृति, शिक्षण, महत्त्वाकांक्षा, बुद्धिमत्ता व आवड ह्या गोष्टी प्रामुख्यानें पडताळून पाहाण्यांत येतील. त्यानंतर जे नवीन कामगार त्यांत सामील होतील, त्यांना कोणत्या शाखेंत दाखल करून घ्यावयाचें तें काम प्रातिनिधिक मंडळ करील.

(११) अशा कारखान्यांत काम करणाऱ्या कोणत्याहि कामगारास २५ रु. पेक्षां कमी व ७५ रु. पेक्षां जास्त वेतन कोणत्याही प्रसंगीं दिलें जाणार नाहीं. २५।३०।३५।४०।४५।५० अशा पगाराच्या निरनिराळ्या सहा रांगा निर्माण करून वार्षिक १ रुपाया वाढीनें त्या २५ वर्षेंपर्यंत चढत जातील.

(१२) प्रत्येक कामगाराचा १००० रु. चा २५ वर्षें मुदतीचा विमा उतरला जाईल, स्त्रीकामगाराचा ५०० रु. चा २० वर्षें मुदतीचा विमा उतरला जाईल. ह्या विम्याची व्याप्ति फक्त कारखान्यांतील कामगारांपुरतीच मर्यादित राहील. ही विमाशाखा कारखान्यातर्फेंच स्वतंत्र शाखा म्हणून चालविली जाईल. ह्या विम्याच्या प्रीमियमचे हप्ते कारखान्याच्या अनेक शाखांत गुंतविण्यांत येईल. त्यांवर होणाऱ्या फायद्यांतून $\frac{1}{4}$ फायदा रिझर्व करून बाकीचा ज्याच्या त्याच्या खातीं जमा करण्यांत येईल. रिझर्व फायद्यांतून अकस्मात् मृत्यूचे

क्लेम पुरे करण्यांत येतील. मुदतीपूर्वी मिळणारी किंवा मुदतीनंतर मिळणारी विम्याची सर्व रक्कम कामगारास प्रत्यक्ष न देतां त्याच्या खातीं जमा करून घेण्यांत येईल. अशा रकमा जमा झाल्या तारखेपासून 'नफा' आकारण्यास पात्र समजल्या जातील.

(१३) प्रत्येक कामगाराचा रुपयास ८१ प्रा. फंड म्हणून कापला जाईल. व तितकाच कारखान्यानें घालून ती रक्कम त्याचे खातीं जमा करण्यांत येईल. ह्या रकमा कारखान्याच्या विभागांत सालोसाल गुंतविल्या जातील. त्या शक्य तों रिकाम्या ठेवल्या जाणार नाहींत. ह्यांवर कर्ज काढतां येईल. नोकरी संपतांच सर्व रक्कम परत मागतां येईल.

(१४) विमा व प्रा. फंड या रूपानें जमणाऱ्या सर्व रकमा पुन्हा कारखान्यांत ओतून, कामगारांच्या कुटुंबांतील प्रत्येक काम करणाऱ्या व्यक्तीस (१८ ते ६० वर्षांच्या) निदान ४ तासांचा जोडधंदा देण्यांत येईल. पूर्ण वेळ काम करणाऱ्या व्यक्तीस शेअर डिपाझिटची अट लावण्यांत येईल. ४।२ तासांचा व्यवसाय करणारांचे २५० रु. चे १० वर्षे मुदतीचे विमे उतरण्यांत येतील. अशांचें वय ४५ वर्षांचे आंतीलच पाहिलें जाईल. तसेंच प्रकृति चांगली असेल तरच विमा उतरला जाईल.

(१५) कामगारांची स्थिति सुधारणेसाठीं व त्यांना निष्कर्जी करून त्यांची शिल्लक सुरक्षित राहणेसाठीं कारखान्यास जोडून कामगारांची बँक स्थापण्यांत येईल. प्रत्येक कामगारास या बँकेचे सभासद करून घेण्यांत येईल व त्याच्याकडून दर सहामाहीस ५ रु. प्रमाणें वार्षिक १० रु. वर्गणी म्हणून घेण्यांत येतील. व स्त्रीकामगाराकडून दर सहामाहीस ३ रु. प्रमाणें वार्षिक ६ रु.वर्गणी म्हणून घेण्यांत येतील. ह्या बँकेंतून सभासदास त्याच्या पगाराच्या ५ पटीइतकें कर्ज देऊन तें २० हप्त्यांत फेडून घेतलें जाईल. या बँकेंत कामगारांच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

(१६) कामगारांकरितां स्वतंत्र वसाहती स्थापन करण्यांत येतील. त्याकरितां हवा व प्रकाश यांनीं युक्त अशा हवेशीर चाळी बांधण्यांत येतील. या चाळीं सिमेंट कांक्रीटच्या तत्वावर अल्प खर्चांत बांधण्यांत येतील. अशा चाळीं-

मधूनच कामगारांना आपले कुटुंबांस घेऊन राहावें लागेल. शक्य तों अशा चाळीं-मधूनच त्यांस मोफत राहाण्यास मिळेल.

(१७) कामगारांसाठीं मोफत दवाखाने, प्रसूतिगृहें व अनाथसंगोपनगृहें स्थापन करण्यांत येतील.

(१८) कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं प्राथमिक व औद्योगिक शाळा, वाचनालयें व क्रीडांगणें स्थापन करण्यांत येतील. यांचा उपभोग मोफत घेऊं देण्यांत येईल.

(१९) कारखान्यास जोडून, औद्योगिक मोफत शाळा उघडण्यांत येईल. या शाळेचा उपयोग कोणासही करून घेतां येईल. त्यांतील प्रवेशास १४ वर्षांचें पूर्ण वय, निकोप प्रकृतीचा दाखला व निदान प्राथमिक पांच इयत्तांचें पूर्ण शिक्षण यांची अट घातली जाईल. अशा शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची निवड प्रथम करण्यांत येईल.

(२०) कारखान्यांतील कामगारांच्या अत्यंत बुद्धिमान मुलांस नवीन नवीन धंद्याचें उच्च प्रतीचें ज्ञान मिळण्यासाठीं कारखान्यातर्फे शिष्यवृत्त्या देऊन परदेशीं शिक्षणासाठीं पाठविलें जाईल. व तेथील शिक्षणक्रम पुरा झाल्यावर कारखान्याच्या शाखेंतच त्यांना नेमून घेण्यांत येईल.

(२१) प्रत्येक कामगारास चारचार तासांच्या विश्रांतीनें दररोज ८ तास काम करावें लागेल ! कारखाना पहाटे ५ ला सुरू करून रात्रीं ९ ला बंद करण्यांत येईल. या मुदतींत कामगारांचे दोन ताफे तयार करून काम करून घेतलें जाईल. कारखान्यांतील काम करण्याची जागा व वसतिगृहें हीं वसाहतींतच ठेवण्यांत येतील.

(२२) कारखान्यास दर रविवारीं सुटी देऊन त्या दिवशीं संध्याकाळीं एखाद्या प्रसिद्ध देशभक्ताचें व्याख्यान अगर मॅजिक लॅंटर्नच्या साह्यानें ऐतिहासिक व भौगोलिक माहिती देण्यांत येईल व सामुदायिक प्रार्थना होईल.

(२३) कारखान्याच्या वसाहतींत, कामगारांना लागणारा हरएक प्रकारचा माल मिळण्यासाठीं कारखान्यातर्फेंच मालविक्रीचे स्टोअर्स उघडण्यांत येतील. अशा वसाहतींत इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यास, दुकानदारी करण्यास परवानगी

दिली जाणार नाहीं. ह्या स्टोअरपद्धतीमुळें जो फायदा होईल, त्याचा विनियोग वसाहतींतील अनेक परोपकारी संस्थांचा कारभार चालविण्याच्या कामीं करण्यांत येईल. धर्मार्थ दवाखाना, प्रसूतिगृह, औद्योगिक शिक्षण, वाचनालयें, अनाथालयें यांचा उपयोग विनामोबदला कामगारांबरोबर सर्व जनतेला करून देण्यांत येईल. त्या कामीं जातीचा, धर्माचा किंवा गरीबश्रीमंतीचा प्रश्न उत्पन्न केला जाणार नाहीं.

(२४) कारखान्यातर्फे देशाच्या अंतभार्गांत मालविक्रीचे स्टोअर्स उघडण्यांत येतील. लोकांना स्वदेशीचें महत्त्व पटवून देण्यांत येईल. ठिकठिकाणच्या व्यापाऱ्यांची संघटना करण्याचा प्रयत्न केला जाईल.

(२५) कारखान्यातर्फे एक साप्ताहिक पत्र चालविलें जाईल. यामधून स्वदेशीचें महत्त्व जनतेस विशद करून सांगितलें जाईल. कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाची प्रसिद्धि केली जाईल. उपयुक्त संस्थांचा अहवाल प्रसिद्ध केला जाईल. तसेंच देशाच्या औद्योगिक प्रश्नास जेणेंकरून जोरानें चालना मिळेल व तरुणांची प्रवृत्ति औद्योगिक क्षेत्राकडे वळेल तें तें सर्व वाङ्मय यामधून प्रसिद्ध केलें जाईल. हें वृत्तपत्र सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रश्नांवरहि निर्भीडपणें चर्चा करील. जातिद्वेष व वर्गकलह यांपासून हें वृत्तपत्र दूर राहील.

याप्रमाणें कारखान्याचे उद्देश जाहीर होतील. या उद्देशांत कामगारांची स्थिति सुधारण्याचाच सर्वतोपरी प्रयत्न केला जाणार असल्यामुळें, इतर ठिकाणच्या कारखान्यांतील व गिरण्यांतील मजुरांपेक्षां ह्यामधील कामगार अधिक सुखी व कार्यक्षम बनतील. तेणेंकरून देशांत सुख व समृद्धि यांची वाढ होईल.

प्रांतिक सरकारचें कर्तव्य !

प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यापासून, प्रांतिक सरकारकडून आम्हीं आपल्या उन्नतीची अपेक्षा केल्यास ती वावगी ठरेल का ? ज्या स्वातंत्र्यासाठीं काँग्रेस गेली ५० वर्षें अविश्रांत प्रयत्न करीत होती, तें स्वातंत्र्य प्रांतिक स्वायत्ततेच्या रूपानें जरी पूर्ण रुपाया आमचे पदरांत पडलें नसलें, तरी जें कांहीं ८।१२ आणे आम्हांस मिळालें आहे, त्याचा सदुपयोग आम्हांस करून घ्यावयास नको का ? देशाच्या सुदैवानें सरकारशीं झगडा देणारी काँग्रेस, आज सर्वसत्ताधीश

बनली आहे. तेव्हां आमच्या फार दिवसांच्या आशा सफळ होण्याची वेळ आली आहे, असें आपणांस वाटत नाहीं का ? म्हणून प्रांतिक सरकारना औद्योगिक बाबतींत आपलें कर्तव्य कोणतें हें सांगणें आपणांपैकीं प्रत्येकाचें परम कर्तव्य नाहीं का ? प्रांतिक कौन्सिलांतील आजचे मंत्री हे जनतेचे विश्वस्त होत, म्हणून ते लोकांचे सेवक आहेत ! तिचे ते उपासक आहेत ! इतकेंच नव्हे, तर लोकांच्या आकांक्षा तृप्त करणारे ते कल्पवृक्ष आहेत ! कॉंग्रेसच्या शक्तीनें भारलेले ते प्रति 'कामधेनु-ताईतच' होत ! म्हणून औद्योगिक बाबतींत त्यांचें कर्तव्य स्पष्ट करणें हें आपलें कर्तव्य होय ! औद्योगिक बाबतींत नवीन नवीन धंदे करण्यास मदत करणें व प्रोत्साहन देणें ह्या बाबतींत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें, गव्हर्नरसाहेबांना त्यांत हस्तक्षेप करतां येणार नाहीं.

कार्याची रूपरेखा

(१) कॉंग्रेसनें नेमलेल्या नॅशनल प्लॅनिंग कमेटीचा रिपोर्ट लक्षांत घेऊन, आपल्या प्रांतांत कोणत्या उद्योगधंद्यांस अनुकूलता आहे, तज्ज्ञ लोक कोण आहेत, कच्च्या मालाचा पुरवठा कितपत आहे तें पाहून धंद्यांची रूपरेखा आंखणें.

(२) इलाख्याच्या एकंदर २० जिल्ह्यांतून हें औद्योगिक कार्य पसरण्यासाठीं प्रथम प्रत्येक जिल्ह्यास एक औद्योगिक केंद्र उघडावें. या केंद्रांत त्या त्या जिल्ह्यांतील हुशार, निवडक व वर सांगितलेल्या लायकीचे १००० तरुण कामगारांची निवड करण्यांत यावी. त्या प्रत्येकाकडून ५०० रुपयेप्रमाणें, पांच लाख शेअर डिपाझिटची मागणी करावी व वरील तत्वावर त्याची उभारणी करावी.

(३) या भांडवलांत प्रांतिक सरकारनें ४॥ टक्क्यांच्या लोननें पांच लाख रुपये भरतीला घालून धंद्याची उभारणी करून द्यावी. हें कर्ज २० वर्षें मुदतीचें असावें. या अधिकृत १० लाख रुपये भांडवलावर कोणत्याही एका मुख्य धंद्याची उभारणी करावी. याकरितां दरसाल १ कोटीचें नवीन कर्ज उभारावें.

(४) हे कारखाने हल्लींच्या कोणत्याही शहरांत न उघडतां, रेल्वे स्टेशनपासून जवळ अशा एखाद्या स्वतंत्र माळरानाच्या जागीं उघडण्यांत यावेत. अशा जागा भरपूर पाणवठ्याच्या असाव्यात. या ठिकाणीं कारखान्याची स्वतंत्र

वसाहत स्थापन करण्यांत यावी.

(५) वसाहतीच्या रचनेसाठीं तज्ज्ञ इंजिनियरची मदत देणें, कारखान्यास लागणाऱ्या जरूर त्या इमारती बांधणें, वसतिगृहें व जरूर त्या इतर इमारती बांधणें, हें काम प्रांतिक सरकारनें आपल्या सरकारी तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं पार पाडावें. या कामीं भांडवलाचा दोन लक्ष रुपयांपेक्षां जास्त भाग प्रथम खर्ची पडणार नाहीं अशी दक्षता घेणें.

(६) धंद्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करणें, तज्ज्ञांची निवड करणें व कामगारांचें प्रातिनिधिक मंडळ तयार करून त्यांच्या हातीं कारखान्याचीं सर्व सूत्रें देणें.

(७) या कामासाठीं सरकारनें एका औद्योगिक मंत्र्याची स्वतंत्र नेमणूक करावी. त्यास मदत करण्यासाठीं १० तज्ज्ञ माणसांचें एक मंडळ त्याला देण्यांत यावें. नवीन नवीन वसाहतींची स्थापना करणें, भांडवल उभारणें व धंद्याची जुळणी नीट करून देणें, रेल्वेच्या वाहतुकीच्या इतर सवलती व सोई उपलब्ध करून देणें, हें काम त्यानें पूर्ण जबाबदारीनें अंगावर घेऊन पार पाडणें.

(८) हे कारखाने, कामगारांचे दोन भाग करून, १६ तास सतत चालू ठेवावेत. म्हणजे ५०० कामगारांच्या यंत्रसामुग्रींत १००० कामगारांना काम मिळूं शकेल ! ५०० कामगारांना एकाच वेळीं काम पुरविणाऱ्या धंद्याला १० लाख रुपयांचें भांडवल प्रथमारंभीं पुरूं शकेल.

(९) प्रा. फंड व विमा या शाखेंतून जमा होणारें भांडवल त्याच कारखान्यांत घालून कामगारांच्या कुटुम्बांतील हरएक माणसास काम देत राहणें.

(१०) अशा कारखान्यांस सरकारमान्यता देऊन, त्यांच्या कामकाजावर आपल्या प्रतिनिधींमार्फत देखरेख ठेवणें, त्यांना व्यापाराच्या अनेक सोई उपलब्ध करून देणें व अशा कारखान्यांचे हिशेब वेळोवेळीं आपल्या ऑडिटरकडून तपासून देणें.

वरील प्रकारचें कर्तव्य सर्व प्रांतिक सरकारनीं करावयाचें मनांत आणल्यास आमची औद्योगिक उन्नति होण्यास कितीसा वेळ लागेल !

कामगारांचे दोन तांफे करून, व प्रत्येक कामगाराकडून ५०० रुपये शेअर

डिपॉझिट घेऊन, कारखान्याची उभारणी करणें कसें शक्य आहे, तें खालील माहितीवरून आपल्या लक्षांत येईल. असे कारखाने जोमानें चालण्यासाठीं त्यांस प्रथमारंभीं पांच लाख रुपये २० वर्षांच्या मुदतीनें देणें जरूर आहे. हे कारखाने प्रांतिक सरकारांनीं खास आपल्या देखरेखीखालीं चालवावयाचे असल्यामुळें बुडण्याची भीति नाहीं.

अ. नंबर	कारखान्याचें नांव व ठिकाण	मजूर	भांडवल	तयार होणारा माल व वार्षिक निपज
१	सेंट्रल कॅनिंग कंपनी–ढळकवाडी.	४०	१००००	फळें व मुरंबे टिकविणें. खप-१० ते १५ह.रु.
२	साठेबंधु–बिस्किटाचे कारखानदार, पुणें.	५०	५००००	बिस्किटें–वार्षिक खप ३ लाख रु.
३	किर्लोस्कर बंधु–किर्लोस्करवाडी.	८००	१२०००००	नांगर, चरक, पंप, एंजिनें वगैरे.
४	दि कूपर इंजिनियरिंग वर्क्स, सातारा.	२००	३०००००	,,
५	श्रीनिवास मेटल वर्क्स, औंध.	१०	८०००	लोखंडी, नांगर, चाकें, कुलुपें, बिजागऱ्या.
६	श्रीराम आयर्न वर्क्स, पाचोरा.	४०	८००००	सर्व प्रकारचा लोखंडी उपयुक्त माल. वार्षिक खप ३ लक्ष रु.
७	श्रीधूतपापेश्वर-औषधी कारखाना, पनवेल.	२००	५००००	औषधें. वार्षिक खप ३ लक्ष रुपये.
८	आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. अहमदनगर.	८५	६५०००	औषधें. वार्षिक खप ७५००० रुपये.
९	श्रीलक्ष्मी ऑईल मिल कं. लि.–अकोलें.	१००	१०००००	सुवासिक तेलें, साबण वगैरे. निपज५ला.रु.
१०	सी. पी. ब्राईट सोप कंपनी, नागपूर.	२०	२००००	साबण. वार्षिक खप ६०००० रुपये.
११	स्वदेशी मॅच मन्यु. कं. घाटकोपर.	२५०	२०००००	काड्यांच्या पेट्या. वा. उत्पादन २ लक्ष ग्रोस

अ. नंबर	कारखान्याचें नांव व ठिकाण	मजूर	भांडवल	तयार होणारा माल व वार्षिक निपज
१२	ओगले ग्लास वर्क्स लि. ओगलेवाडी.	६००	६०००००	कांचसामान, कंदील वगैरे ४ लक्ष रुपयांचें वार्षिक उत्पादन.
१३	नागपूर ग्लास वर्क्स, नागपूर.	१००	७००००	कांचसामान. खप १२५००० रु.
१४	श्री ओनामा ग्लास वर्क्स, गोंदिया.	१००	१२५०००	कांचसामान. उत्पादन १००००० रुपये.
१५	दि सेंट्रल पॉटरीज् लि. नागपूर.	१००	४१०००	चिनीमातीचीं भांडीं. वा. उत्पादन १ल. रु.
१६	कोल्हापूर शुगर मिल्स, कोल्हापूर.	१०००	१००००००	साखर. १ लक्ष गोण्या साखर.
१७	मार्सलंड प्राईस ॲण्ड कं. कळंब, जि पुणें.	५०००	१५०००००	साखर. ५५०० टन.
१८	एम्प्रेस मिल्स, नागपूर.	१००००	३००००००	कापड, सूत वगैरे.
१९	दि लक्ष्मी कॉटन मिल, सोलापूर.	३०००	१६०००००	६७ लक्ष रत्तल सूत, ४४ लक्ष पौं.कापड.
२०	दि विष्णु कॉटन मिल, सोलापूर.	३२००	२४०००००	७० लक्ष रत्तल सूत, ६२ लक्ष पौं.कापड
२१	न्यू प्रताप मिल्स, धुळें.	२५००	२५०००००	दररोज ११००० पौंड कापड.
२२	जरीकांठी विणकाम, पुणें.	३५	२५०००	शालू, कद, शेले वगैरे उत्पादन२००००रु.
२३	हिंदुस्थान क्लॉक वर्क्स, पुणें.	१२	१५०००	घड्याळें, शास्त्रीय उपकरणें.
२४	प्रभा मॅन्युफॅक्चरिंग कं. मुंबई.	१०	१००००	कंदील, स्टॉव्ह वगैरे २७०००रु.उत्पादन
२५	डेक्कन पेपर मिल्स, मुंढवें-पुणें.	५००	१००००००	कागद सुमारें ३१४३ टन.

वरील माहिती केसरीच्या औद्योगिक सन १९३४ च्या खास टिळक अंकांतून घेतली आहे.

अशा तऱ्हेनें प्रथमारंभीं ५०० रु. शेअर भांडवल घालून, त्यावर नफा घेत, सत्तेची नोकरी व सत्तेचें विश्रांतिस्थान मिळत असेल तर कोणता सुशिक्षित तरुण तिकडे आकर्षिला जाणार नाहीं ? निकोप प्रकृति, पूर्ण प्राथमिक शिक्षण व वरील डिपाझिट रक्कम येवढ्या अल्प भांडवलावर, स्वतःचा व आपल्या भावी वंशजांचा पोटापाण्याचा प्रश्न कायमचा सुटत असेल, तर कोणता तरुण त्यांत उडी घेतल्याशिवाय राहील ?

म्हणून प्रांतिक सरकारांनीं पुढें होऊन धंद्याची उभारणी वरील तत्त्वावर करावयाचें ठरविल्यास, त्यांना जरूर तेवढें भांडवल व जरूर तितके सुशिक्षित लोक मिळून औद्योगिक प्रश्न पुढील १० वर्षांतच सुटला जाईल व देशांतील बेकारीचें निर्मूलन होईल !

सुशिक्षितांचें जिणें.

आमच्या इकडील अलिकडच्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेवल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे बरें ? हाडाचीं काडें करून व शेंकडों रुपये खर्चून, बी. ए.पर्यंत अभ्यास करावा आणि पुढें फळ काय ? तर रेव्हिन्यू खात्यांत, किंवा शाळाखात्यांत ३०।३५ रु. दरमहाची नोकरी ! चांगला सुतार सुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां दरमहा २०।२५ रु. सहज मिळवितो. हें त्या ग्रॅज्युएटांस समजूं नये काय ? तसेंच कोठें १०।१५ रुपयाची जागा रिकामी झाली कीं, तीबद्दल शेपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज ! धिक् तुमची विद्या आणि तुमचें कर्तृत्व ! कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय ? विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें, स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे ? पण खांदा लावून काम करण्याची, दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आतां कोठें राहिली आहे ? इंग्रजी अमदानींतील निव्वळ खर्डेघाशी कारकूनवर्ग निर्माण करणाऱ्या शाळांनीं याप्रमाणें आमच्यांतील तरुणांचीं मनें खच्ची करून टाकिलीं

आहेत ! त्यावर स्वदेशी धंद्यांची उभारणी हाच एक मंत्र आहे !

अर्धपोटी खातेदार !

या इलाख्यांतील एकूण २२,९१,४१५ खातेदारांपैकीं पांच एकरांच्या आंतील खातेदार ११,२८,७३२ असून, पांच ते पंधरा एकरांपर्यंतचे खातेदार ६,७०,८९४ आहेत; व पंधरा ते २० एकरांपर्यंतचे २४,८,३६० आहेत व पंचवीस एकरांवरील खातेदार २,२२,४१९ आहेत. पंचवीस एकरांवरील खातेदार वगळल्यास, बाकीच्या वीस लक्ष खातेदारांचें उत्पन्न त्यांच्या जीवनास पुरेसें नाहीं. सरासरी चावडी दर एकरास ३ रुपये धरल्यास व उत्पन्न त्याच्या पांच ते सात पट मानल्यास एकरीं उत्पन्न सरासरी १५ ते २० रुपयेच पडतें ! त्या मानानें पांच एकरांच्या आंतील सुमारें १२ लक्ष खातेदारांचें वार्षिक उत्पन्न शेंपन्नास रुपयांपेक्षां जास्त नाहीं असें दिसून येईल. एवढ्या उत्पन्नांत तो, त्याची बायको व दोन मुलें, तसेंच शेतीचीं लहानमोठीं दोन जनावरें यांची गुजारणा कशी चालत असेल तें एक परमेश्वरासच माहीत ! हा वर्ग निःसंशय अर्धपोटी व बुभुक्षित असा आहे ! जोडधंद्यांचा नाश झाल्यामुळें व लोकसंख्या वाढल्यामुळें हा वर्ग भुकेकंगाल व दरिद्री बनत चालला आहे. निव्वळ शेतीवर पोट भरणें अशक्य झाल्यामुळें वेळोवेळीं जमिनीच्या तारणावर सावकारांचीं घरें उपसून त्यास आपला चरितार्थ चालवावा लागतो. हा वर्ग जर संतुष्ट असता तर, त्याच्या डोक्यावर १०० ते १५० कोटि रुपये कर्जाचा भार कां असता ?

सुमारें २० लक्ष खातेदार कर्जबाजारी अतएव अर्धपोटी असल्यामुळें, त्यांना बाहेरून पैसा आल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वरील तत्त्वावर कारखान्यांची उभारणी होऊं लागतांच पुढील १०-१५ वर्षांत, प्रत्येक खातेदाराचा एकतरी तरुण मुलगा ह्या औद्योगिक क्षेत्रांत ओढल्याशिवाय कसा राहील ? शेतीचें उत्पन्न वाढूं लागतांच व व्यसनें व उधळपट्टी यांचे मार्ग नेस्तनाबूद होतांच तो ऋणमुक्त होण्याच्या मार्गास लागेल. त्या वेळेस सावकाराच्या हातांत पडणारे कोट्यवधि रुपये, २।५ एकरांचे असलेले खातेदार आपल्या जमिनीची विक्री करून, त्या रूपानें पुन्हा औद्योगिक क्षेत्रांत आणून ओतल्याशिवाय कसे राहतील ? या योजनेनें पुढील १०।१५ वर्षांत सुमारें २० लाख तरुण व १०० कोटींचें भांडवल औद्योगिक

अंमलांत उतरणें कसें शक्य आहे त्याची पूर्ण कल्पना होईल.

धंद्याच्या उभारणीसाठीं, कंबर कसून आखाड्यांत उतरावयाचें ठरविल्यास प्रांतिक कांग्रेस प्रधानमंडळाचें कौतुक कोण करणार नाहीं ? ही सुवर्णसंधि त्यांनीं साधल्यास, त्यांची कामगिरी सुवर्णाक्षरांनीं लिहिली जाईल व भावी इतिहासकार त्यांची मनसोक्त स्तुति केल्याशिवाय कसे राहतील ? ' मरावें परी कीर्तिरूपें उरावें ' ही साधु तुकारामाची अभंगवाणी सार्थ केल्याशिवाय जनताजनार्दनाची कांग्रेस कशी राहील ?

सुशिक्षितांतील वाढती बेकारी !

आज सुशिक्षितांत भयंकर बेकारी माजली आहे ! पुस्तकी शाळांच्या परीक्षांचीं द्वारें सताड उघडीं ठेवल्यावर त्यांतून सुशिक्षित ' बेकारांचें पेव ' फुटल्याशिवाय कसें राहील ? याची साक्ष 'ब्राह्मणांतील बेकारी' या पुस्तकांत पहावयास सांपडते. त्यांत श्रीयुत पटवर्धन लिहितात कीं, " (१) इ. स. १९३२ सालीं वऱ्हाड व मध्यप्रांतांत इन्कमटक्स खात्यांत १३ जागा भरावयाच्या होत्या त्याकरितां ४००० उमेदवारांचे अर्ज आले ! पदवीधरांना वेळींच जागें करावें म्हणून प्रो. राधाकृष्ण यांनीं नागपूर युनिव्हर्सिटीच्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं, ही गोष्ट प्रामुख्यानें सांगितली. (२) परवां आग्र्यास पोलिसांतील कॉन्स्टेबलच्या म्हणजे शिपायाच्या १६ रुपयाच्या जागेकरितां असंख्य अर्ज आले. त्यांत एक बी. ए. व दोन इंटर पास झालेले उमेदवार होते. अर्थात् वरील तिघांनाच त्या हलक्या जागा मिळाल्या ! माडर्न रिव्ह्यूचे विद्वान् संपादक रामानंद चतर्जी यांनीं ही बातमी आपल्या मासिकांत देऊन दुःखांत सुख अगर वाईटांतून चांगलें निघतें असें म्हणून पोलीसखात्याची आतां सुधारणा होईल अशी टीका केली. हें बऱ्याच वाचकांनीं आतां वाचलें असेल. (३) गेल्या आगस्टमध्यें मद्रास इलाख्यांतील एलोरच्या पोलिस सुपरिंटेंडेंटनीं कांहीं पोलीस शिपायांच्या जागांची भरती केली. त्या वेळीं त्या जागांकरितां एक बी. ए., सहा इंटर व पंचवीस मॅट्रिक उमेदवारांचे अर्ज होते ! (४) गेल्या सालीं जुलै महिन्यांत अहमदनगर येथें पंधरा पोलीस कॉन्स्टेबलच्या जागा भरणेच्या होत्या. त्या जागांकरितां एकंदर ९०० अर्ज आले ! त्यांत नापास बी. ए. (अंडर ग्रॅज्युएट) व मॅट्रिक

लोकांचे बरेच अर्ज होते. (५) अहमदनगर येथेंच गेल्या जूनमध्यें मिलिटरी इंजिनियरिंग खात्यांत ५० रु. पगाराची ६ महिने मुदतीची हंगामी कारकुनाची एक जागा रिकामी होती. त्याकरितां ६०० पदवीधरांचे अर्ज होते! त्यांत एलएल्. बी. व बी. ई. चे पदवीधर होते! शिवाय पेन्शन घेतल्यावर ऑनररी मॅजिस्ट्रेटचें काम करणाऱ्या एका जज्जाचाही अर्ज होता! आणि आय्. सी. एस्. परीक्षा नापास झालेल्या पण जागा खालीं नसल्यामुळें नोकरी न मिळालेल्या गृहस्थाचाहि एक अर्ज त्यांत होता!

हर हर! वयाची विशी-पंचविशी–तिशी खर्च करून व हजारों रुपये खर्च करून हेंच फळ का? यांतील कांहीं तरुणांनीं आत्महत्त्या सुद्धां केल्याचा पुरावा सदर लेखकानें दिला आहे! पण तें भीषण सत्य मी आपणांपुढें ठेवून आपली चित्तवृत्ति अधिक प्रक्षुब्ध करीत नाहीं! इंग्रजांच्या जादुगिरीचें उच्चाटण करण्यास ' औद्योगिक क्रांति ' ह्याशिवाय आज कोणता मार्ग उपलब्ध आहे?

या देशांत उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालापासून हरएक प्रकारचा पक्का माल तयार करणें, परदेशच्या तोडीचा माल येथेंच तयार करून परकीय आयात घटविणें, व्यापारी संघटण करून व विशेष प्रकारच्या अंतर्गत व्यापारी सवलती देऊन, तसेंच स्वदेशीची ज्योत सतत तेवत ठेवून या मालाचा उठाव करणें अशक्य नाहीं. परकीय मालास बंदी करणें किंवा त्यावर जबर जकाती बसविणें, व्यापाराच्या बाबतींत ब्रिटीश मालावर बहिष्कार पुकारणें ह्या गोष्टी १९३५ च्या कायद्यानें प्रांतिक सरकारच्या अधिकारांतील नाहींत! म्हणून त्या भानगडींत न पडतां, ' उद्धरेदात्मनात्मानं ' या वचनाप्रमाणें आपणांस जेवढा आपला अभ्युदय करून घेतां येईल तेवढा करून घेणें हें प्रांतिक सरकारचें—कॅांग्रेसचें मुख्य कर्तव्य होय. म्हणून त्याची दिशा वर सांगितल्याप्रमाणें असावी.

वरील तत्त्वावर उभारलेल्या कारखान्यांपासून होणारे फायदे.

(१) या पद्धतीनें उभारलेल्या कारखान्यांत, भांडवलवाले व मजूर असा भेद राहणार नाहीं. त्यामुळें संपाचें वारें देखील या कारखान्यांस लागणार नाहीं!

(२) कारखान्यांची अंतर्गत व्यवस्था, त्यांच्या विश्वस्त प्रतिनिधींच्या हातीं

दिल्यामुळें त्यांना आपला उत्तरोत्तर उत्कर्ष करून घेणें सुलभ जाईल. असा कारखाना संकटप्रसंगीं केव्हांही डगमगणार नाहीं.

(३) कारखान्यांस होणारा लाखों रुपयांचा फायदा कामगारांना सालोसाल विभागून मिळाला जाईल. त्यामुळें प्रा. फंड, विम्याचे हप्ते व बँकेची वर्गणी या रूपानें पगारांतून कपात होणारी रक्कम नफ्याच्या रूपानें भरून निघेल.

(४) जीवनाच्या राहणीचें किमान व कमाल मान लक्षांत घेऊन पगाराची आकारणी सर्व प्रकारच्या कामगारवर्गांतून केली असल्यामुळें गरीब, श्रीमंत असा सामाजिक भेद पडणार नाहीं.

(५) ५०० रुपयांच्या शेअर डिपाझिटची अट ठेविली असल्यामुळें, कोणत्याहि एकाच जातीची वर्णी यांत लागली जाणार नाहीं. त्यामुळें समाजांतील सर्व थरांतून संपत्तीचा प्रवाह समप्रमाणांत खेळविला जाईल.

(६) कामगारांचा भरणा करतांना शिक्षणाची अट ठेविली असल्यामुळें सुशिक्षित वर्गाच्या अत्यंत नमुनेदार वसाहती स्थापन करण्यांत येतील. त्यामुळें अशा कारखान्यांतील कामगारांची कार्यक्षमता वाढलेली दिसेल.

(७) प्रत्येक जिल्ह्याची वस्ती १० लाखांच्या आंतबाहेर असल्यामुळें दर हजार लोकसंख्येस एक मनुष्य, याप्रमाणें १० लाख वस्तींतून १००० तरुण निवडून काढणें प्रथमारंभीं अशक्य नाहीं ! या कारखान्यांची उपयुक्तता जसजशी वाढत जाईल, त्याप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यांतून हजारों तरुण, औद्योगिक क्षेत्रांत येऊन ठाकतील. त्यामुळें लाखों रुपयांचें भांडवल अल्प मुदतींत उभारणें शक्य होईल.

(८) कारखान्यांस जोडून औद्योगिक मोफत शिक्षणाची सोय करणें सुलभ जाईल. त्यामुळें अशा वसाहतींना देशाच्या औद्योगिक शिक्षणाचा प्रश्न फारच थोड्या कालांत सोडविणें शक्य होईल.

(९) दरसाल शेंकडा एक या प्रमाणांत जरी लोक औद्योगिक क्षेत्रांत येऊं लागले, तरी प्रत्येक जिल्ह्यांतून १०००० तरुण कामगार व ५० लाख रुपयांचें भांडवल उपलब्ध होत राहील ! हा क्रम सतत १० वर्षें चालल्यास, शेंकडा १० लोक म्हणजे या इलाख्यांतील २० लाख तरुण व त्या-

बरोबरच १०० कोटींचें भांडवल औद्योगिक क्षेत्रांत उपलब्ध होणें अशक्य नाहीं. इंग्लंडमधील शेंकडा ८० लोक आज औद्योगिक क्षेत्रांत पोट भरतात, हें लक्षांत घेतल्यास, हा आंकडा मोठा नाहीं. तसेंच या इलाख्यांतील सावकारांनीं शेतकऱ्यांस दिलेलें १०० कोटींचें कर्ज लक्षांत घेतल्यास पुढील १० वर्षांत १०० कोटींचें भांडवल औद्योगिक क्षेत्रांत उभारणें अशक्य नाहीं ! मुंबई प्रांतिक सरकारला हल्लीं ७५ कोटि रुपयांचें कर्ज आहे. एवढें कर्ज उभारणें ज्या प्रांतांत शक्य होतें, त्या प्रांतांत पुढील १० वर्षांत १०० कोटींचें भांडवल उभारणें कोणत्याहि प्रकारें अशक्य नाहीं असें दिसून येईल !

(१०) एक हजार कामगारांचा विमा १० लाख रुपये इतका होईल. ही विमापद्धति बिनखर्ची व औद्योगिक क्षेत्रांत रकमा आणून ओतणारी असल्यामुळें पुढील २० वर्षांतच ही रक्कम नफ्यासह २० लाखांच्यापुढें जाईल. ही रक्कम कारखान्याच्या कायम भांडवलांत पिढ्यानुपिढ्या सांचून राहाणार असल्यामुळें (ही रक्कम कामगारास परत न देतां, त्याच्या खातीं जमा करून ठेवण्यामुळें) व कामगारांत सालोसाल नवीन नवीन कामगारांची सतत भरती होत असल्यामुळें कारखान्याच्या शेअर भांडवलांत व विमाशाखेंत लाखों रुपयांची भर सतत पडत जाईल. सालोसाल उपलब्ध होणाऱ्या या लाखों रुपयांच्या भांडवलांतून कारखान्यांची वाढ सतत होत राहील. ह्या वाढलेल्या कारखान्यांत कामगारांच्या कुटुम्बांतलि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व माणसांस ४।२ तासांचा रोज उद्योग देतां येईल.

(११) तसेंच १००० कामगारांचा प्रा. फंड व तितकीच कारखान्याची भर लक्षांत घेतल्यास ह्या फंडांत दरसाल ५०००० रु. ची भर पडत जाईल. हा पैसा कारखान्याच्या वाढीसाठीं उपयोगांत आणला जाणार असल्यामुळें, कामगारांच्या कुटुंबांतील हरएक माणसास जोडधंदे देण्यास उपयोगीं पडूं लागेल व त्या फंडाची वाढ चक्रवाढीच्या स्वरूपांत होत राहील.

(१२) कुटुंबांतील हरएक माणसास काम देण्याच्या पद्धतीनें कौटुम्बिक धनाची वाढ मोठ्या प्रमाणांत करतां येईल. कामगारांना पगार जरी बेताचे असले, तरी कुटुंबांतील सर्व कर्ती माणसें मिळवतीं झाल्यामुळें, हें पगारी धन

प्रत्येक कुटुम्बांत पुष्कळच आलेलें दिसेल. त्यामुळें गरजा भागून शिल्लक राहणारें धन कारखान्यांतील बँकेंत ठेवीच्या रूपानें जमा होत राहील. ह्या प्रचंड खेळत्या भांडवलाच्या जोरावर कारखान्यास, व्यापारी क्षेत्रांत होणाऱ्या चढाओढींत टिकाव धरतां येईल. इतकेंच नव्हे तर, अव्यवस्थित पायावर उभारलेले देशांतील सर्व धंदे ढासळून टाकतां येतील. प्रतिवार्षिक बँकेच्या भांडवलांत १२-१५ हजार रुपयांची भर सतत पडत जाईल. या पद्धतीनें पुढील १० वर्षांतच बँकेचें शेअर भांडवल २ लाखाच्या पुढें गेलेलें दिसेल.

(१३) प्रत्येक कुटुंबास लागणाऱ्या हरएक प्रकारच्या मालाचा पुरवठा, कारखान्याच्या स्टोअरमधून झाल्यामुळें, कामगारांच्या लाखों रुपयांच्या क्रयविक्रयांतील फायदा वसाहतींत राहूं लागेल. प्रत्येक कुटुंबाचा सरासरी वार्षिक खर्च २०० रु. धरल्यास १००० कामगार कुटुंबांस लागणारा माल २ लाख रुपयांचा होईल. ह्यावरील शेंकडा १० टक्के नफा लक्षांत घेतल्यास सुमारें २० हजार रुपयांची नफ्याची रक्कम उपलब्ध होईल ! या रकमेमधून, कामगारांच्या वसाहतींतील दवाखाने, प्रसूतिगृह, बालकमंदिरें, अनाथविद्यार्थिगृहें, शिक्षणालयें, मोफतवाचनालयें, क्रीडांगणें इत्यादि किती तरी उपयुक्त संस्था मोठ्या जोमानें चालूं लागतील.

(१४) औद्योगिक शिक्षण मोफत ठेवल्यामुळें, सर्वत्र नवीन नवीन धंद्यांची उभारणी अल्प काळांत होत राहील. त्यामुळें सुशिक्षितांतील बेकारी नष्ट होण्यास कालावधि लागणार नाहीं.

(१५) या देशांतील ३५ कोटि लोक (१९४१ सालीं ४० कोटि लोक !) हें आमचें गिऱ्हाईक राहील ! औद्योगिक उत्कर्षामुळें आमचे राहणीचें मान वाढूं लागेल. आमची शेती भरभराटीस येईल. त्यामुळें पुढील १५।२० वर्षांत आमचें वार्षिक उत्पन्न माणशीं ५० रुपयांवरून १०० रुपयांवर जाईल. (इंग्लंडमधील माणशीं उत्पन्न ७५० रु. आहे व अमेरिकेमधील माणशीं उत्पन्न १०५० रु. आहे. त्या दृष्टीनें हें कांहींच नव्हे !) आणि तसें झाल्यास वाढती लोकसंख्या लक्षांत घेऊन आमची उत्पादकशक्ति पुढील १० वर्षांतच सुमारें ५०० कोटि रुपये होईल ! याप्रमाणें उत्पादक शक्ति वाढत गेल्यास

अशा वसाहतींमधून उत्पन्न होणाऱ्या कोट्यवधि रुपयांच्या मालास, गिऱ्हाईक नाहीं म्हणून पस्तावण्याचा प्रसंग आमचेवर येणार नाहीं ! पुढील २५ वर्षांतच आम्ही सुवर्णभूमीचे सुपुत्र आहोंत असें जगाला बाहु उभारून सांगतां येईल.

(१६) अशा तऱ्हेचें आर्थिक स्वराज्य आम्हीं हस्तगत केल्यावर, संघटित अशा कोट्यवधि जनतेवर कोणत्याहि साम्राज्यशक्तीस एक क्षणही हुकमत गाजवतां येणार नाहीं ! ही गोष्ट सर्व पुढाऱ्यांनीं व प्रांतिक सरकारांनीं लक्षांत घेतल्यास माझ्या योजनेचें वैशिष्ट्य त्यांच्या पूर्णपणें लक्षांत येईल. तेणेंकरून भारताच्या अभ्युदयाची वेळ समीप आणिली जाईल.

(१७) हिंदुस्थानांत उत्पन्न होणारा कच्चा माल परक्यांच्या गळयांत बांधून, त्याऐवजीं त्यांचा पक्का माल घेण्याची आत्मघातकी पद्धत स्वीकारण्याचा प्रसंग आमचेवर यामुळें कधींच येणार नाहीं. ओटावा करार, जपानशीं केलेला कापसाच्या गासड्याचा व कापडाचा करार, इंग्लंडशीं चालू असलेला व्यापारी करार यांसारखे मानहानिकारक करार करण्याचे प्रसंग आमचेवर येणार नाहींत.

(१८) परदेशांहून ह्या देशीं येत असलेला वार्षिक २०० कोटींचा पक्का माल या देशीं तयार करून, ती आयात घटवीत गेल्यास पुढील १० वर्षांत पक्क्या मालासाठीं परक्या राष्ट्राच्या तोंडाकडे पाहण्याचा लाजीरवाणा प्रसंग आमचेवर येणार नाहीं. हिंदुस्थानांत एकंदर २०० जिल्हे आहेत. त्या प्रत्येक जिल्ह्यास दरसाल १००० कामगारांची एकएक वसाहत वाढत गेल्यास निदानपक्षीं पुढील १० वर्षांत २००० नवीन वसाहती स्थापन झालेल्या दिसतील ! यांमधून २० लाख तरुण व त्यांच्या कुटुंबांतील सुमारें ५० लाख लोक कामावर लागलेले दिसतील ! मीं हा अंदाज अत्यंत कमी धरलेला आहे. याप्रमाणें लाखों–कोट्यवधि लोक औद्योगिक क्षेत्रांत उतरविल्यावर भारताचा ऐहिक अभ्युदय करून घेणें पुढील १० वर्षांतच कितीसें कठीण होईल ?

(१९) कामगारांचे व त्यांच्या कुटुंबांचे विमे उतरून त्या त्या रकमा नफ्यासह कामगारांच्या खातीं कायम स्वरूपांत (परत कधीं न देण्याच्या पद्धतीनें) जमा करण्यानें कारखान्याच्या कायम भांडवलाचा निधि भूमितिश्रेढीनें प्रत्येक पिढीस एकसारखा वाढतच राहील. ह्या निधीवर होणारा अलोट नफा कामगारांना सालोसाल मिळत गेल्याच्या योगानें, त्यांच्या एकापेक्षां एक पुढील

भावी पिढ्या सुखी झाल्याशिवाय कशा राहतील ? विम्याच्या स्वरूपांत गोळा केलेलें भांडवल, म्हणजे कामगारांच्या पगारांतून काटकसरीनें केलेली सेव्हिंग होय ! ही सेव्हिंग म्हणजे भावी पिढीच्या जीवनाचा प्रश्न सोडविणारी राष्ट्रीय ठेव होय ! ती ठेव प्रत्येक पिढीस अशा कारखान्यांतून वाढत ठेवणें कारखान्याच्या मजबुतीच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य होय ! कामगारांच्या भावी पिढ्यांच्या सुखसोयीची व समृद्धीची ती दौलत होय ! ती उधळून टाकण्याचा वा खर्च करण्याचा अधिकार कोणत्याच पिढीला न ठेवतां, उलट कामगारांच्या प्रत्येक पिढींतून विम्याच्या स्वरूपांत काटकसर करून ह्या निधींत लाखों रुपयांची भर टाकतां येईल ! या निधींची वाढ पुढील १०० वर्षांत किती होईल, हा प्रश्न मी वाचकांचे कल्पनाशक्तीवरच सोपवितों !

(२०) याप्रमाणें कामगारांच्या भावी पिढ्यांच्या जीवनाचा प्रश्न एकदां कामगार त्यांत सामील झाल्यावर सुटणें सुलभ होत राहील ! सत्तेचें घर व सत्तेचें विश्रांतिस्थान उपलब्ध होत असतां व त्या ठिकाणीं जीवनाचा प्रश्न समाधानकारक सुटत असतां कोणता तरुण ह्या आकर्षक योजनेकडे आकर्षिला जाणार नाहीं ? याप्रमाणें लाखों–कोट्यवधि–बेकार तरुणांना हाताशीं धरून, देशाच्या अंतर्भागांत कणाकणांनीं विखुरलेलें धन गोळा करून, कारखान्यांची उभारणी करणें कितीसें अवघड जाईल ?

प्रांतिक सरकार व देशांतील विद्वान् राजकारणी मुत्सद्दी वर्ग, माझ्या ह्या बहुलाभदायी योजनेचा विचार व उच्चार करील का ? भारताच्या एका सुपुत्रानें अशी अपेक्षा केली व राष्ट्रीय हिताच्या प्रश्नास ह्याप्रमाणें चालना द्यावी म्हणून उच्च जयघोष केला, तर त्याचे प्रतिध्वनि देशाच्या दशदिशांतून उठल्याशिवाय कसे राहतील ?

धंद्यांची निवड

शेतकऱ्यांचे जोडधंदे व वसाहतींमधील धंदे यांचें कार्यक्षेत्र अगदीं निरनिराळें ठरविण्यांत यावें. या दोन्ही क्षेत्रांतील धंदे एकमेकांस मारक न होतां पूरकच व्हावयास पाहिजेत. त्या दृष्टीनें वसाहतींमधील धंद्यांची उभारणी व्हावी. शेतकऱ्यांस करतां न येण्यासारखे धंदे कोणते व त्या प्रकारचा माल परदेशांतून हल्लीं कोणता येतो हें पाहिल्यास त्याचा बोध होईल.

१९२६–२७ ची आयात

मालाचें नांव	किंमत
(१) धातूचें सामान–लोखंड, पोलाद, तांबें, पितळ वगैरे	१७,२३,३९,१३४
(२) यंत्रसामुग्री	१३,४१,०८,२३८
(३) विजेचीं हत्यारें	२,५१,९८,२७९
(४) औषधें	२,०६,५९,९७३
(५) रासायनिक द्रव्यें	२,४४,३५,०४६
(६) कागद वगैरे	३,४३,१९,६३४
(७) फोटोग्राफी, सिनेमा फिल्म्स वगैरे	१,२२,५७,१७८
(८) किरकोळ लोखंडी सामान	३,९५,१२,५१५
(९) बांगड्या	८४,८५,८१०
(१०) इतर कांचसामान	१,३७,१७,४५७
(११) रंगाचें सामान	२,१३,२२,७७२
(१२) चिनी मातीचीं पात्रें	८२,८२,१११
(१३) दिवे-धातूचे	८४,०६,१२६
(१४) पेन्सिली	८१,९६,२८१
(१५) छापखाने (शाई, टाईप, प्रेस वगैरे.)	२९,८७,७१७
(१६) रेल्वेसामान	३,२६,२४,४९४
(१७) रबर (टायर्स वगैरे)	२,१०,९५,५२४
(१८) मीठ	१,२६,१९,८७४
(१९) सायकली साध्या	१,०७,०७,३४५
(२०) मोटारगाड्या	५,०९,३९,५१५
(२१) गाड्या व भाग	१९,४८,८४७
(२२) टाइपरायटर्स	२२,०६,०९०
(२३) घड्याळें	२५,६५,६८०
(२४) टीनचे पत्रे	६,६१,६७,८०३
(२५) चामडें व वस्तु	५९,७२,८२९

(२६)	शेतकीचीं हत्यारें	१६,७९,६१६
(२७)	स्टोव्हज्	९,१६,५१०
(२८)	लाकूड	७३,९९,३१०
(२९)	पोस्टांतून येणारें सामान	३,७२,०४,४९६
(३०)	यंत्राचे पट्टे	८१,२९,०६२
(३१)	बॉबिन्स	३४,७५,५७१
(३२)	इमारतीच्या बांधकामाचें सामान	१,२३,९०,६२५
(३३)	पुस्तकें	५६,६०,१८३
(३४)	बूट	५७,१३,१६४
(३५)	पॉलिश	२०,७८,४५५
(३६)	कापड सुती	६५,०४,७३,९७६
(३७)	कापूस, लोकर वगैरे कच्चा माल	६,५९,५१,५९६
(३८)	रेशमी कापड	३,४५,०९,५८४
(३९)	लोकरीचें कापड	४,१४,३८,१३२
(४०)	इतर जातीचें कापड	५,५१,०५,७२८
(४१)	साखर (हल्लीं १॥ कोटि)	१९,००,००,०००
(४२)	जहाजांचे भाग	३,९७,४४१
(४३)	मेणकापड	९,०७,४३१
(४४)	वादन (हार्मोनियम, फोनो वगैरे)	२६,६३,०८३
(४५)	मुलाम्याचीं भांडीं	६,६५,३२७
(४६)	काफी	२०,६८,११४
(४७)	डांबर	३,४७,०४१
(४८)	ॲस्बेस्टास	२६,८४,२०४
(४९)	तारायंत्राचें सामान	४,१८,८८७
(५०)	पेंट्स्	१,४४,२२,९०२
(५१)	टायलेट	५७,०२,१६३
		१,८७,२८,१७,९१०

(चित्रमय जगत् १९३०)

वरील यादीवरून आपणांस कोणते धंदे सुरू करणें आवश्यक आहे, तें कळून येईल. वरील शेंकडों प्रकारचा कोट्यवधि रुपयांचा माल हिंदुस्थानांत येऊन या देशाची संपत्ति हरण करीत असतां, प्रिय महात्माजी आम्हांस फक्त चरका आणि टकळी फिरवूनच भारताचा अभ्युदय होईल म्हणून सांगतात, या त्यांच्या वेडेपणास काय म्हणावें ?

धंद्याच्या जुळणीची पूर्वतयारी !

(१) प्रांतिक सरकारनें धंद्यांची जुळणी करण्यासाठीं, तज्ज्ञांची परिषद बोलवावी व निर्णयात्मक योजना तयार करावी.

(२) धंद्यांच्या उभारणीसाठीं शिष्यवृत्त्या देऊन शेंकडों तरुणांस परदेशीं शिक्षणासाठीं पाठवावें.

(३) हल्लीं उपलब्ध असलेल्या कारखान्यांमधून, धंद्यांच्या उभारणीसाठीं कोणती यंत्रसामुग्री तयार होऊन मिळेल, याची चौकशी करावी व त्याप्रमाणें आर्डर द्यावी.

(४) यंत्रांच्या निर्मितीचे मोठमोठे कारखाने काढण्यासाठीं तशा धंद्यांचें संशोधन करण्यास परदेशीं तज्ज्ञांची रवानगी करावी.

(५) राष्ट्रांतील खनिज द्रव्यांच्या हरएक प्रकारच्या खाणी, व्यक्तीच्या मालकीच्या न ठेवतां प्रांतिक सरकारनें स्वतः पुढाकार घेऊन चालवाव्यात.

वस्त्रस्वावलंबन.

हिंदुस्थानांत १९२६।२७ सालीं सुमारें १०० कोटीचा कापूस पिकला. त्यापैकीं ६० कोटीचा कापूस परदेशीं निर्गत झाला व आम्हीं ६५ कोटीचें निव्वळ सुती कापड खरेदी केले ! हिंदुस्थानमधील गिरण्यांमधून २५० कोटि वार कापडाची निपज झाली व १९७ कोटि वार कापड परदेशांतून आलें. हा माल बहुतेक उच्च दर्जाचा असल्यामुळें येथील गिरण्या त्या मालाशीं चढाओढ करूं शकत नाहींत. म्हणून ही आयात घटविण्यासाठीं, परदेशच्या तोडीचा माल तयार करणाऱ्या गिरण्यांची वाढ नवीन योजनेंत आवश्यक आहे. परदेशांतून हल्लीं भरमसाट सूत येत आहे. त्यास पायबंद घालणेंसाठीं, तसेंच, शेतकऱ्यांस कापड करण्यास लागणारें निरनिराळ्या नंबरचें सर्व सूत अत्यंत माफक दरानें

पुरवितां येण्यासाठीं, सूत कातणाऱ्या गिरण्यांची वाढ ह्या योजनेंत होणें अत्यंत आवश्यक आहे.

सुवर्णसंधींतील वाहत्या गंगेंत

गंगा वाहात आहे, तोंच हात धुऊन घ्या ! गेल्या ७।८ वर्षांत सोन्यास भरमसाट भाव आल्यामुळें, दागदागिन्यांच्या रूपानें पडून राहिलेली संपत्ति आज मोकळी झाली असून, बँकेंतून तुडुंब भरून राहिली आहे ! सोन्यास भाव येण्यापूर्वी दरसाल हिंदुस्थानांत २०।२५ कोटींचें सोनें येत होतें. ही संपत्ति दागदागिन्यांच्या रूपानें अंगाखांद्यावरून व पेट्यातिजोऱ्यांतून पडून होती ! उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें, ह्या कोंडलेल्या कोट्यवधि संपत्तीचा उपयोग राष्ट्रास होत नव्हता. पण भाव दुप्पट झाल्यामुळें हें अंगाखांद्यावरील सुवर्णधन, तसेंच पेट्यातिजोऱ्यांच्या कुलुपांतून बंदींत पडलेलें हें सुवर्णधन आज नाण्यांच्या स्वरूपांत (!) बाहेर आलें आहे. त्याचा वेळींच उपयोग न केल्यास—ती चंचल लक्ष्मी—सातांसमुद्रांपलीकडे पार निघून जाईल ! किंवा बँकेच्या रूपानें शेवटीं सरकारी कर्जरोख्यांचा आश्रय घेईल ! साम्राज्य सरकारनें तर राष्ट्रीय कर्जाचा एवढा प्रचंड डोंगर आमच्या डोक्यावर तयार करून ठेविला आहे कीं, त्याच्या भाराखालीं आमचा आर्थिक प्राण गुदमरून जावा ! सरकारची आर्थिक भूक इतकी वाढली आहे कीं, हें सर्व धन तुम्हीं सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलें, तरी ती शमणार नाहीं ! म्हणून हा पैसा बेकार तरुणांना हाताशीं धरून, शेअर-डिपाझिटच्या रूपानें, औद्योगिक क्षेत्रांत खेचून आणला पाहिजे. ' बळेंच करणी करावी। लक्ष्मी घरीं ओढून आणावी ' अशी वेळ सांप्रत आली आहे ! तरच भारताचा अभ्युदय होईल !

बँकेंतून हा पैसा केवढ्या प्रचंड प्रमाणावर जमा होत आहे हें एक-दोन बँकेचीं उदाहरणें डोळ्यापुढें धरलीं तरी आपल्या लक्षांत चटकन येणार आहे. ' धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ' ही बँक १९११ सालीं येथें स्थापन झाली. या बँकेचें अधिकृत भांडवल ३½ कोटि रुपयांचें असून गोळा झालेलें भांडवल ३३६२६,४०० रु. आहे. ह्या बँकेचा रिझर्व व इतर फंड सुमारें १ कोटि रुपये झाला असून, ह्या बँकेंत लोकांच्या डिपाझिट रकमा—ठेवी—३१,०३,००,०००

रुपयांच्या आहेत ! धी बॉंबे प्रॉव्हिंशियल बँकेंतील ठेवीचा आंकडा पाहिल्यास तो २$\frac{1}{2}$ कोटीच्या घरास पोंचलेला दिसेल ! ओरिएन्टल इन्शुअरन्स कंपनीनें आतांपर्यंत गोळा केलेल्या प्रीमियमचा आंकडा २१ कोटीच्या पुढें गेला असून, निव्वळ व्याजाची रक्कम २ कोटीच्या पुढें ती मिळवीत आहे ! व दरसाल प्रीमियमच्या रूपानें सुमारें ३$\frac{1}{2}$ कोटी रुपये लोकांचे गोळा करीत आहे ! साताराची वेस्टर्न इंडिया लॉईफ इन्शुअरन्स कंपनीची कॅश ८५ लाखाच्या पुढें गेली असून वार्षिक उत्पन्न (प्रीमियम व व्याज) २२ लाखाच्या पुढें आहे ! इंपीरियल बँकेंतील शिल्लक तर मध्यंतरीं १०० कोटीच्या पुढें गेली होती !

सुवर्णधनाचें औद्योगिक क्षेत्रांत पदार्पण.

अशा तऱ्हेनें दरिद्री व कंगाल बनत चाललेल्या आमच्या मायदेशांतील धन, घटोत्कची मायेप्रमाणें उघड्यावर आलें आहे. मागें जशी बँकांचीं दिवाळीं निघण्याची साथ येऊन गेली व शेंकडों बँका बुडून आमच्या लाखों रुपयांची धूळधाण झाली, तशा तऱ्हेची आपत्ति पुन्हा येणार नाहीं, यास कांहीं आधार नाहीं ! आज हें धन अशाश्वत स्वरूपांत आहे ! म्हणून त्याचें रूपांतर औद्योगिक क्षेत्रांत केल्याशिवाय तरणोपाय नाहीं.

शाळाकॉलेजांमधून शिकत असलेल्या हजारों तरुणांचा मेळा पाहिला, म्हणजे हें धन गोळा करणें अशक्य नाहीं, असें वाटूं लागतें ! या तरुणांचें ध्येय उत्तमशी ' नोकरी ' हेंच असल्यामुळें, अशा सर्व तरुण शिक्षितांस कारखान्यांतून पर्मनंट नव्हे, वंशपरंपरागतच्या नोकऱ्या देण्याचें जाहीर केल्यास, तसा जाहीरनामा काढल्यास, कोणता तरुण तिकडे आकर्षिला जाणार नाहीं ? व आपला अभ्युदय करून घेणार नाहीं ? आज आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं, तसेंच लग्नकार्यें इत्यादि धार्मिक कार्यांसाठीं, चारपांचशें रुपयांचा किमान खर्च प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत तारुण्यांत पदार्पण करतांना होतच असतो ! अगदीं गरीबांतला गरीब शेतकरी घेतला, तरी त्याला ह्या प्रांतांत स्वतःचें घर व बिघा दोन बिघे जमीन ही असतेच ! या प्रांतांतील शेतकऱ्यांनीं काढलेलें १०० कोटीचें कर्ज, व त्यावर त्यास सालोसाल भरावें लागणारें १२।१५ कोटीचें व्याज लक्षांत घेतल्यास, ह्या संपत्तीचा केवढा मोठा व्यय गरीब समाजांतून होत आहे, याची

कल्पना होईल ! दारुबाजी व कोर्टबाजी यांप्रीत्यर्थ ज्या प्रांतांतील शेतकरी दर-साल २० कोटि रुपये बेगुमानपणें उधळितात, त्या प्रांतांतील शेतकऱ्यांस, आपल्या मुलाबाळांच्या जीवनाचा प्रश्न कायमचा सुटत असेल, तर ५०० रुप-यांची रक्कम शेअर डिपॉझिटसाठीं निर्माण करणें अशक्य नाहीं. कारण वाड-वडिलांपासून ' जमीनरूपी धन ' त्यांच्या पदरीं असतेंच. त्यांपैकीं २।३ एकरांचें रूपांतर करून (विक्री करून) एवढी रक्कम शेअरडिपॉझिटच्या रूपानें उभी करणें अशक्य नाहीं ! मुलाच्या लग्नाप्रीत्यर्थ जवळची जमीन गहाण टाकून किंवा प्रसंगीं विकून एवढी रक्कम शेतकरी समाज खर्च करीत असतो ! परंतु ही रक्कम खर्ची पडणार नसून शिल्लक राहणार आहे. ह्या भांडवलावर सालोसाल नफा मिळत राहून उलट त्या पतीवर आपल्या मुलाबाळांस कायमची, वंशपरंपरा-गतची नोकरी-धंदा मिळत असेल तर त्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय तो कसा राहील ? पांढरपेशा वर्गातून तर हें धन दागदागिने, पोस्टल बँका, कॅश सर्टिफिकिटें व बँकेंतील ठेवी, सराफी व सावकारी या रूपानें पडून आहे ! प्रांतिक सरकारनें आपल्या संरक्षणाखालीं धंद्यांची उभारणी करावयाची ठरवि-ल्यास, त्यांच्यावर ह्या वर्गातून तरुणांच्या उड्यावर उड्या पडूं लागतील व पैशाचा वर्षाव केला जाईल ! या इलाख्यांतील आर्टस् कॉलेजांमधून शिकणारा ४।५ हजार विद्यार्थी समाज पाहिल्यास, तो वार्षिक ३।४ शें रुपये म्हणजे सबंध कोर्स पुरा होईपर्यंत १०००–१५०० रुपये खर्च करितो ! म्हणून धंद्यासाठीं लागणाऱ्या भांडवलाची उभारणी ह्याच तत्त्वावर करून, प्रत्येक तरुणास वसा-हतीच्या द्वारें, औद्योगिक क्षेत्रांत सत्तेचें घर व सत्तेचें जीवनाचें साधन व विश्रांति-स्थान निर्माण करून द्यावें. हल्लींच्या भांडवलशाहीच्या युगांत, कारखान्यांतून मजुरांच्या जीवनाला गुलामगिरीचें किळसवाणें रूप प्राप्त झालें आहे ! हजारों मजुरांच्या कष्टावर लाखों रुपयांचा फायदा मारणारे मुंबईचे धनिक भाटे-गिर-णीवाले-पाहिले म्हणजे मजुरांना त्यांच्या श्रमाचा मोबदला पुरेपूर मिळत नाहीं याची कल्पना होते. स्वतंत्र होणाऱ्या हिंदुस्थानांतील प्रत्येक तरुण, जीवनाच्या अथांग सागरांतून, आपली आयुष्यनौका वल्हवीत असतां स्वतंत्रच असला पाहिजे ! भांडवलशाहीचा गुलाम असतां उपयोगी नाहीं ! त्यास ह्या गुलामी मनोवृत्तीं-तून मोकळा केलाच पाहिजे, तरच भारताचा अभ्युदय झाला, असें उच्च

स्वरानें जगास जयघोषित करतां येईल !

ब्रिटिश सरकारच्या हातीं प्रांतिक सत्ता असतां, औद्योगिक उन्नतीचा श्रीगणेशासुद्धां आम्हांस गिरवावयास मिळाला नाहीं ! आतां प्रांतिक स्वायत्ततेचें जें अल्पस्वल्प उदक आमच्या हातावर पडलें आहे, तोंच राष्ट्राच्या ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नास मोठ्या धडाडीनें हात घालावयास नको का ?

फेडरेशनच्या खडकावर—

प्रश्नावर प्रांतिक स्वायत्ततेचें तारू फुटणार काय ?

कौन्सिलबहिष्काराचे दुष्परिणाम !

राष्ट्रापुढें येऊं घातलेला फेडरेशनचा लढा फार मोठा आहे. हें फेडरेशन प्रतिगामी स्वरूपाचें असल्यामुळें, हिंदी स्वातंत्र्यदेवीच्या पायांतील तो सुवर्णाचा तोडा न ठरतां जड लोहशृंखलाच ठरणार आहे! आज हा प्रश्न निकरास आला असून, त्यांत प्रांतिक स्वायत्ततेचें भवितव्य कांहीं ठीक दिसत नाहीं ! फेडरेशनच्या प्रश्नावर हातीं आलेला प्रांतिक स्वायत्ततेचा पट उधळून देण्यास कॉंग्रेस मागेंपुढें पाहाणार नाहीं ! आणि तसें झाल्यास—लाखों दीनदुबळ्या प्रजेची, ही ऋणविमोचनाची बहुलाभदायी घटना कोण घडवून आणणार ? मॉंटफर्ड सुधारणेच्या जन्मापासून कॉंग्रेसनें कौन्सिलवर बहिष्कार घातला व तेव्हांपासून शेतकऱ्यांची परिस्थिति न सुधारतां उलट बिघडतच गेली.

(१) ह्याच काळांत जमीनसारा शें. ५० टक्यांनीं वाढला;

(२) कोर्टफीची वाढ शेंकडा ५० टक्यांनीं झाली.

(३) अबकारी खात्याचें उत्पन्न तर मध्यंतरीं ५ कोटीच्या घरास जाऊन पोंचलें.

(४) हुंडणावळीचीं बिलें पास होऊन प्रतिवार्षिक २०।२५ कोटीचें नुकसान होऊं लागलें.

(५) पोस्टकार्ड महाग झालें;

(६) काड्याच्या पेट्या महाग झाल्या;

(७) मिठावर कर बसून गरिबांचें मीठ तुटलें;

(८) करमणुकीवर कर बसले;

(९) तंबाकू महाग झाली;

(१०) बाजारभाव घसरगुंडीस लागले;

(११) ओटावा करार, इंडो जपानी करार होऊन आम्हीं नागविले जाऊं लागलों. अशा एक का दोन, शेंकडों अनिष्ट गोष्टी घडून आल्या ! आजच्या-प्रमाणें हुकमी बहुमत जर कौन्सिलांतून असतें, तर इतक्या विकोपास ह्या गोष्टी गेल्या असत्या का ?

लायक लोकांबरोबरच, नालायक लोकांची प्रभावळ देशांत जन्मास आलेली असते ! अशा लोकांचें मात्र या वेळीं चांगलें साधतें ! त्यांना उच्चीचे ग्रह येतात ! जनता दुःखसागरांत बुडाली, तरी त्यांना त्याचें सोयरसुतक नसतें ! सरकारी मानपान व भरभक्कम पगार यांमुळें हा वर्ग धुंद झालेला असतो ! अधिकारमदानें हा वर्ग जनहिताच्या कामीं अंध झालेला असतो; गेल्या १५।२० वर्षांच्या राजकारणांत लोकांवर नवीन बसलेले ७५।८० कोटींचे कर व व्यापारी करारामुळें व रुपयाचा भाव १८ पेन्स ठरविल्यामुळें, झालेलें कोट्यवधि रुपयांचें नुकसान लक्षांत घेतल्यास, कौन्सिल बहिष्काराचे दुष्परिणाम पूर्णपणें लक्षांत येतील. म्हणून फेडरेशनच्या तत्वावर प्रांतिक स्वायत्ततेचें तारू फुटूं देतां उपयोगीं नाहीं. राज्यघटनेस विरोधच करावयाचा असेल, तर तो अंतर्बाह्य व्हावा. कौन्सिलांत घुसविलेले सैनिक तेथेंच लढत ठेवून, दुसऱ्या सैनिकांकडून फेडरेशनच्या तटावर मारा सुरू ठेवावा. प्रांतिक स्वायत्ततेंतून अंग काढून घेतल्यास, नालायक लोकांच्या हातीं कौन्सिलें जाऊन, त्यांमधून फेडरेशनच्या निवडणुकी पार पडतील ! १९२० सालीं कौन्सिलांवर बहिष्कार घातला तरी कौन्सिलें जन्मास आलींच कीं नाहीं ! तीच दुर्दैवी घटना ह्या वेळीं घडून येईल ! म्हणून कॉंग्रेसनें प्रांतिक स्वायत्ततेच्या अधिष्ठानावरून आपली बैठक एकही इंच न हलवितां फेडरेशनला जेवढा विरोध करतां येईल तेवढा करावा. कारण फेडरेशन हें आमच्यावर आमच्या विचाराविरुद्ध—प्रतिगामी स्वरूपांत लादलें जात आहे. त्याचे दुष्परिणाम भावी काळांत होणार आहेत. म्हणून, त्याचें स्वरूप पालटेपर्यंत हा लढा लढवावा. व त्याच वेळीं बहुजनसमाजाच्या हिताच्या अनेक गोष्टी करण्यास सुरवात करावी. व कोट्यवधि जनतेचें हुकमी बळ निर्माण करून ह्या लढ्यास तोंड द्यावें. तरच हा लढा यशस्वी होईल !

कांग्रेस व औद्योगिक क्रांति

गेल्या ५० वर्षांच्या कांग्रेसच्या इतिहासांत, कांग्रेसच्या हातून प्रत्यक्ष स्वतः पुढाकार घेऊन औद्योगिक चळवळ फारशी झाली नाहीं. कांग्रेसनें आपली दृष्टि निव्वळ राजकारणावरच केन्द्रीभूत केल्यामुळें उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं व्यापक प्रमाणावर प्रयत्न झाला नाहीं. स्वदेशी व बहिष्कार ह्या साधनांनीं देशांत चालू असलेल्या अनेक धंद्यांना वेळोवेळीं नवजीवन मिळालें ही महत्त्वाची गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं. पण देशांत निघालेल्या अनेक लहानमोठ्या धंद्यांवर कांग्रेस संस्थेची हुकमत नव्हती, किंवा हे धंदे कांग्रेसच्या अनुमतीनें निघाले नव्हते किंवा चालू नव्हते ! निघालेल्या कारखान्यांनीं, आपल्या कारखान्यांस जोडून आपल्या धंद्यांचें शिक्षण देणाऱ्या औद्योगिक शाळा स्थापन केल्या नाहींत, कीं पुढाकार घेऊन व्यापारी संघटण केलें नाहीं, कीं स्वदेशीच्या मंत्राचा प्रसार केला नाहीं. म्हणून जे कांहीं तुटपुंजे औद्योगिक प्रयत्न झाले असतील, त्यांचें श्रेय कांग्रेसकडे जात नाहीं. तो व्यक्तीच्या कर्तबगारीचाच प्रश्न म्हणून भावी इतिहासांत नमूद होईल. कांग्रेसनें स्वदेशीच्या मंत्राचा जो अर्धशतक जप केला, त्या परिस्थितीचा फायदा ह्या कारखादारांनीं पुरेपूर घेतला, परंतु त्या ऋणाची फेड जनतेस औद्योगिक शिक्षण देऊन त्यांनीं करावयास नको होती का ? परंतु ह्या संस्थांवर कांग्रेसची हुकमत नसल्यामुळें औद्योगिक क्रांति झाली नाहीं. जर प्रत्येक कारखानदारानें निदान २०।२५ होतकरू व संपन्न विद्यार्थ्यांस आपल्या धंद्याचें संपूर्ण ज्ञान देऊन बाहेर काढलें असतें, तर हजारों नवीन कारखाने निर्माण होऊन, तोच उपक्रम पुढें त्यांनीं केला असता व या धंद्याची वाढ भूमितीश्रेढीनें होत जाऊन अल्पकाळांत हिंदी राष्ट्राची औद्योगिक क्रांति झाली असती ! आज बी. ए., एम्. ए. पर्यंत शिकूनही सुशिक्षितास—' पुढें काय करावें ! '—हा प्रश्न सुटत नाहीं ! नाहीं म्हणावयास गेलीं २० वर्षें मात्र, महात्माजींच्या नेतृत्त्वाखालीं अखिल भारतीय चरखा संघानें खादीची चळवळ जोरानें चालविली; लोकांच्या स्वदेशीच्या भावना जागृत केल्या; व वस्त्रस्वावलंबनाच्या बाबतींत लोकमत जागृत करून खादीची निपज वाढविली. आज सबंध हिंदुस्थानांत दरसाल ३२—३३ लाख रुपांयची खादीची निपज होते, असें त्यांच्या अहवालावरून स्पष्ट होतें. ही निपज १ कोटी वारांच्या आसपास आहे ! हिंदुस्थानांत दरसाल

५०० कोटी वार कापड खपतें. त्या दृष्टीनें ही निपज म्हणजे मागणीचा $\frac{1}{५००}$ इतकीच ठरते ! गेल्या २० वर्षांतील ही प्रगति पाहिली असतां, ह्या गतीनें गेल्यास वस्त्रस्वावलंबनास १०,००० वर्षेंहि लागतील ! आणि मग कांग्रेस दुसऱ्या धंद्यांसाठीं चळवळ करूं लागेल, असें कोणी गणित केल्यास तें चुकीचें होईल का ? आज एवढें कापड मुंबई किंवा अहमदाबाद येथील एकएक गिरणी काढीत आहे ! परदेशांतून दरसाल २०० कोटि वार कापड आपल्या देशांत येऊन त्याप्रीत्यर्थ दरसाल येथून ४०। ५० कोट रुपये जात असतां, ही आयात थांबविण्यास तसल्याच साधनांचा उपयोग करावयास नको का ?

दहा लाख रुपये म्हणजे दर्यामें खसखस !

ह्या खादीच्या अखिल भारतीय धंद्यांतून त्यांत काम करणाऱ्या सुमारें २ लाख लोकांना १० लाख रुपये मिळवून दिले असें अहवालांत नमूद केलें आहे. हें वेतन माणशीं ५ रुपयेच पडतें ! आतां हे मिळालेले रुपये त्या माणसांच्या मासिक पानतंबाकूस किंवा चहापाण्यास तरी पुरले असतील कीं नाहीं याची शंका वाटते ! कारण पानतंबाकू, विडीसिगारेट, चहापाणी हीं व्यसनें इतकीं शिष्टसम्मत व राजमान्य झालीं आहेत कीं, त्यांविरुद्ध बोलणें म्हणजे अरसिक ठरणें होय ! "महाराष्ट्रांत सालिना १२ अब्ज विडया खपतात व २। ३ अब्ज विडया परप्रांतीं जातात. या अंदाजांत वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत धरलेला नाहीं, हें लक्षांत घेतल्यास महाराष्ट्रांतील ह्या धंद्याचें महत्त्व लक्षांत येईल." (केसरी —टिळक अंक.) "येथील स्वदेशी गोल्डन टोबॅको कंपनी तर दररोज यंत्रावर १० लक्ष सिगारेट तयार करते, तरी मागणी पुरवत नाहीं.', (प्रमोद—खास औद्योगिक १९३८ अंक.) चहाविषयीं तर बोलावयासच नको ! "हिंदुस्थानांत चहाच्या लागवडीखालीं ७ लक्ष एकर जमीन गुंतली असून सन १९२३–२४ सालीं ३५ कोटि पौंड (वजनी) चहाची निपज झाली. हा व्यापार ३३–३४ कोटि रुपयांचा झाला. हा धंदा युरोपियन मळेवाल्यांच्या ताब्यांत असून त्यांत त्यांचें ५० कोट रुपये भांडवल गुंतलें आहे." (चित्रमय जगत् १९२८.)

हे उतारे देण्याचा हेतु आम्ही व्यसनापायीं किती रक्कम उडवितों व कफल्लक बनतों हा होय ! हेंच पुढें विस्तारानें सांगावयाचें झाल्यास, याच कालांत आम्ही

हिंदवासी लोक दरसाल सुमारें ३ कोटि रुपयांच्या परकीय सिगारेट घेऊन हवेंत धूर करून सोडीत होतों ! तर परदेशची २॥ कोटि रुपयांची नुसती सुपारी घेऊन दरसाल चघळून टाकीत होतों ! तर प्रतिवर्षी परदेशचा नुसता १॥ ते २ कोटीचा साबण घेऊन फेसाळीत होतों. याच कालांत दरसाल १५।२० कोटीची विलायती साखर घेऊन आम्ही गोड मिटक्या मारीत होतों ! तर आमच्यांतील कांहीं हरीचे लाल दरसाल परदेशी अस्सल व्हिस्की–ब्रँडीच्या बाटल्या घशांत ओतून खुशाल परकीयांची ४।५ कोटि रुपयांची ओंजळ भरीत होते ! तर गोवा लॉटरी व डर्बिन लॉटरी, लाख लाख रुपयांचीं बक्षिसें जाहीर करून, दरमहा लाखों रुपये या अभागी देशांतून ओढीत होत्या–आहेत ! तर विलायती अस्सल हॅण्टले-पामरचीं बिस्किटें घेण्यासाठीं आमच्यांतील प्रतिष्ठित लोक दरसाल ५० लाख रुपये उधळीत होते ! तर ह्या गोप्रधान देशांत दरसाल हॉलंड, डेन्मार्क देशांतील गोठलेलें 'कंडेन्स्ड मिल्क' १ कोटीचें येत होतें ! अशा प्रकारची अजूनही शेंकडों तऱ्हेनें चाललेली आमची प्रतिवार्षिक उधळपट्टी पाहिल्यास, चरखासंघानें मिळवून दिलेले हे प्रतिवार्षिक १० लाख रुपये, म्हणजे दर्यांमें खसखस होत ! म्हणून औद्योगिक चळवळीचें क्षेत्र निव्वळ 'खादीच्या भोंवतीं' घुटमळत न ठेवतां तें अत्यंत विस्तृत केलें पाहिजे. हजारों प्रकारचे धंदे यांत्रिक साह्य घेऊन सुरू केले पाहिजेत. तरच लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारतां येईल.


सत्ताधारी कॉंग्रेस.

आजपर्यंत कॉंग्रेस सत्ताविहीन होती. आज ती या देशाच्या ८।९ प्रांतांत पूर्ण सत्ताधीश झाली आहे व थोडयाच कालांत ती आपल्या सत्कृतीनें बाकीच्या दोनही प्रांतांत सत्ताधीश होईल ! अशा वेळीं हातीं आलेल्या सत्तेचा उपयोग औद्योगिक उन्नतीकडे करून घेतां येईल व तद्द्वारा परदेशीं जाणारी प्रतिवार्षिक कोट्यवधि रुपयांची संपत्ति थोपवून धरतां येईल. असें झालें तरच **ऋणविमोचनाचा प्रश्न सुटेल** ! एरव्हीं कदापि सुटणार नाहीं. याची खूणगांठ प्रधानमंडळांनीं व लोकधुरीणांनीं आपल्या मनाशीं बांधावयास नको काय ?

सारांश शेतीचें उत्पन्न वाढवून व त्यांतील गळत्या बंद करून, तसेंच ऋण-

विमोचनाचा कायदा पास करून शेतकऱ्यांची स्थिति सुधारतां येईल. तसेंच शेतीस जोडधंदे देऊन, ' औद्योगिक क्रांति ' या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मोठमोठ्या उद्योगधंद्यांची उभारणी करून, बहुजनसमाजाची आर्थिक भरभराट करतां येईल; आणि असें घडून आलें, तर **भारताचा अभ्युदय होण्यास** कितीसा वेळ लागेल ? कांग्रेस आपल्या पूर्व लौकिकास साजेल अशी धडाडी दाखवील का ? कांग्रेस प्रधानमंडळ, त्या दृष्टीनें विचार करून जनताजनार्दनाची सेवा करील का ?

वाचकहो, ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर अस्तिपक्षीं समजून पुढील बहुलाभदायी 'आर्थिक बजेट' प्रकरणाकडे आपलें लक्ष वेधूं इच्छितों !



प्रकरण ६ वें

क्रांतिकारक बजेट (अंदाजपत्रक).

अन्याय्य कर व आर्थिक अधःपात.

दारुबाजी, कोर्टबाजी व वाढलेला जबर शेतसारा यांच्या अन्याय्य करांवर प्रांतिक सरकारच्या बजेटाची अर्धीअधिक उभारणी झाली असल्यामुळें, हें पापी धन गोळा करण्याच्या बाबतींत कॉंग्रेस मंत्रिमंडळाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली आहे ! हें पापी धन गोळा करावें, तर लोकांचा संस्कृतिनाश होतो ! न करावें तर अनेक लोकोपयोगी खात्यांची उपासमार होते ! नवीन कर बसवावेत, तर लोकप्रतिनिधींकडून त्यांवर जोराचा विरोध होतो ! व जनता करभाराखालीं त्रस्त व संतप्त होऊन जाते ! अशा कात्रींत आजचें मंत्रिमंडळ सांपडल्यामुळें प्रांतिक स्वायत्तता मिळूनही त्यांना लोकहित साधतां येत नाहीं ! पेशवाईअखेर जो जमीनमहसूल कोटि सव्वाकोटि रुपये होता, त्याची वाढ होत होत आज तो ३॥ कोटीवर येऊन पोंचला आहे ! पेशवाईत ज्या अबकारी खात्याचें उत्पन्न अवघें १००० रु.ही नव्हतें, त्याच अबकारी खात्याचें उत्पन्न इंग्रजी अमलांत ३,२५,००००० रुपयांवर जाऊन पोंचलें आहे ! इंग्रजी अमलास सुरवात होईपर्यंत न्यायदानाचीं कामें प्रत्येक खेड्यांत ग्रामपंचायतींमार्फत मोफत होत असल्यामुळें, या बाबतींत लोकांचा एकही पैसा खर्चीं पडत नव्हता ! परंतु इंग्रजी अमलास सुरवात होतांच त्यांनीं ग्रामपंचायतींची इतिश्री करून ब्रिटिश कोर्टांची खर्चाळ पद्धति सुरू केली ! त्याबरोबर सरकारी तिजोरींत न्यायखात्याकडून २ कोटि रुपयांची भर पडूं लागली ! याशिवाय करमणुकीवरील कर, वारसाहक्कावरील कर, रेसेस, कोडीं, लाटऱ्या इत्यादि जुगारांवरील कर, तंबाखूवरील कर इत्यादि अनेक भल्याबुऱ्या मार्गांनीं ६०।६५ लाखांचे नवीन कर बसवून प्रांतिक बजेटाची उभारणी झाली आहे !

अशा तऱ्हेनें परकीय अमलाखालीं या आगंतुक ८।९ कोटींच्या करभाराखालीं जनता पिळवटून निघत आहे ! एवढ्यावरच भागतें तरी बरें होतें ! पण

कोर्टकचेऱ्यांच्या पायीं इतर अनेक खर्चांचीं तोंडें सताड उघडल्यामुळें, जनता दरसाल १०।१२ कोटि रुपयांस बुडत आहे, तर मादक पदार्थांच्या व्यसनामुळें दरसाल १० कोटि रुपयांस व्यसनी समाज बुडून धुळीस मिळत आहे! सट्टे, लाटऱ्या, कोडीं, सांखळ्या, रेसेस, नाटकें व सिनेमा इत्यादि राजमान्य व्यसनापायीं किती लोक भिकेस लागत आहेत याचें गाणित करणें तर अवघड होऊन बसलें आहे! याशिवाय इंग्रजी अमदानींत त्यांच्या सहवासानें आलेल्या सिगारेट व चहा या व्यसनापायीं लक्षावधि जनता प्रत्यहीं भिकेस लागत आहे, ती निराळीच! एक पेशवाई नष्ट झाली, स्वातंत्र्य नाहींसें झालें, तर त्याबरोबर आमचा असा अधःपात—आर्थिक नाश होऊं लागला! या आर्थिक नाशास सुरवात होऊन उणींपुरीं १२५ वर्षें झालीं असल्यामुळें, आमचा अर्थनाश किती झाला असेल, याचें गणित करणेंहि आज कल्पनाशक्तीच्या बाहेर गेलें आहे! जनता व्यसनापायीं भिकेस लागली, करभाराखालीं भरडून निघाली व दुष्काळ व साथी यांनीं पिचून निघाली! जिकडे तिकडे दारिद्र्य, दुःख, बेकारी यांचें घोर साम्राज्य पसरलें! अशा अमावास्येच्या काळ्याकुट्ट अंधेऱ्या नगरींत आमच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळाचा जन्म झाला आहे! लोकहिताच्या अनेक पिढ्यांच्या नाना आशा बाळगून जन्मास आलेल्या या मंत्रिमंडळास अर्थनाशाच्या अंधारनगरींतून मार्ग काढावा लागत आहे! काळोखांतून वाट काढणाऱ्या मुशाफराप्रमाणें कधीं रस्ता चुकून, तर कधीं आडमार्गानें जाऊन ठेंचाळत, कांटेकुटे बोंचत, आपटत, आदळत ते मार्गक्रमण करीत आहेत! आज ना उद्यां —कधींकाळीं—आपणांस 'स्वातंत्र्यरवि' भेटेल अशी गोड आशा बाळगून ते आहेत!

विविध कर!

आज लोकहितावर उभारलेल्या बजेटाचे लोकप्रतिनिधींकडून जे वाभाडे निघत आहेत, त्यावर टीकेचे जे घण पडत आहेत, रागालोभाचे जे फूत्कार निघत आहेत, ते पाहिले—ऐकले म्हणजे मति गुंग होऊन जाते! एक अबकारी खात्याचें उत्पन्न कमी करावयाचें ठरविल्याबरोबर स्थावर मिळकतीवरील कर, विजेवरील कर, जुगारावरील कर, कपडालत्त्यांवरील कर व पुढें तर जमीनदारांच्या वाढत्या उत्पन्नावरील कर, इनाम जमिनीवर भर आकार बस-

विण्याचा कर, लग्नसोहळे, व बारसें बारावें (जन्ममृत्यूचें) यांवरील कर, एक ना दोन शेंकडों प्रकारचे नवीन कर बसविण्याचा, नव्हे लादण्याचा जणूं कारखानाच निघाला आहे ! हा सर्व प्रकार पाहून मन विषण्ण होऊन जातें ! अक्कल गुंग होऊन जाते. ' जनता दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे, तेव्हां नाना प्रकारचे कर बसवा ' अशी आमच्या आमदार–नामदार महाशयांची समजूत झाली असल्यास न कळे !

दारूबाजी, कोर्टबाजी, राजमान्य व्यसनें व जबर शेतसारा हीं शेतकरीसमाज-रूपी वृक्षावर पोसलीं जाणारीं बांडगुळें तुटल्याशिवाय त्या वृक्षाचें–समाजाचें नीट धारणपोषण होणार नाहीं अशी वरील विवेचनावरून आपली खात्री होईल ! म्हणून यांतून मंत्रिमंडळास योग्य मार्ग दाखविण्यासाठीं बजेटाची उभारणी कोणत्या मार्गानें करावी तें पुढें मी स्पष्ट करणार आहें. त्या बहुलाभदायी योजनेचा मंत्रिमंडळानें व कौन्सिलरनीं स्वीकार केल्यास, नाना प्रकारच्या नवीन करांच्या आपत्तींतून त्यांची व जनतेची मुक्तता होईल ! इतकेंच नव्हे, तर लोकोपयोगी खात्यांची चाललेली उपासमार थांबवून त्यांची भरभराट करून दाखवितां येईल. म्हणून त्या बहुलाभदायी करयोजनेचा आपण विचार करूं.

आयातनिर्गत व्यापार व जकातीचें ५० कोटीचें उत्पन्न

मुंबई प्रांताचा आयातनिर्गत व्यापार आज सुमारें २०० कोटि रुपये आहे. १९२९–३० सालीं हा व्यापार २११ कोटि रुपये होता. मुंबई, मद्रास, कलकत्ता व कराची हीं व्यापाराचीं सोइस्कर बंदरें असल्यामुळें, त्या त्या प्रांताचा आयात निर्यात व्यापार इतर प्रांताच्या मानानें फार मोठा आहे. या सर्व आयात-निर्गत व्यापारापासून हिंदुस्थान सरकारच्या कस्टमचें (जकातीचें) उत्पन्न ५० ते ५५ कोट रुपयांचें आहे ! हें सर्व उत्पन्न सैन्याचा खर्च भागविण्यासाठीं हिंदुस्थान सरकार अलगत उचलतें ! त्यांतील एकही कपर्दिक प्रांतिक सरकारला मिळत नाहीं ! या मालावरील जबर जकाती (एक प्रकारचा कर) पाहिल्यास, या कराच्या पायांत आम्ही प्रत्यहीं किती रकमेस बुडत आहोंत याची कल्पना होते. असें असूनही त्या करांबद्दल आपण कधीं फारसा गाजावाजा करीत नाहीं ! उलट परदेशी मालावर जबर जकाती बसवा, अशी देशांतील कारखान-

दारांची व लोकधुरीणांची ओरड चाललेलीच असते ! त्यांची समजूत अशी कीं, अशा जबर जकाती बसल्या, म्हणजे परकीय कारखानदार बुडून आपले धंदे सावरूं लागतील ! एका अर्थानें त्यांचें हें म्हणणें बरोबर आहे व इष्टही आहे. परंतु जोंपर्यंत असे यांत्रिक कारखाने येथें मोठ्या प्रमाणावर निघाले नाहींत किंवा निघण्याचा पद्धतशीर सरकारी अगर खाजगी प्रयत्न होत नाही, तोंपर्यंत अशा जबर जकाती बसविणें, म्हणजे पक्क्या मालासाठीं आम्ही एक प्रकारचा जबरदस्त भुर्दंड भरणें नाहीं का ? हा जकातीचा पैसा, परदेशी माल मागविणाऱ्या येथील व्यापाऱ्यांकडून किंवा कंपनीकडून सरकार आकारून घेते ! त्याची झळ परकीय कारखानदारांस किंवा व्यापाऱ्यांस बिलकूल नसते ! व्यापारी लोक ह्या जकातीचा पैसा मूळ खरेदींत मिळवून त्यावर नफा घेत असल्यामुळें त्यांच्याही पदरास ह्यांतील बिलकुल खार लागत नाहीं ! जर कोणी खरें बुडत असतील तर असा माल वापरणारेच येथील लाखों लोक होत !

सरकार परस्पर ह्या मालावरील कर—जकाती व्यापाऱ्यांकडून वसूल करीत असल्यामुळें, गिऱ्हाइकांस त्याची दादही नसते ! तो आपला खुशींत गाजरेंच खात असतो ! यंत्रांतून निघालेल्या मोहक व सुंदर मालानें तो इतका मोहित व आनंदित झालेला असतो कीं, त्याला त्या वेळेस दोन बोटें स्वर्ग उरलेला असतो ! जानपेनचा तलम धोतरजोडा वापरणारा नखरेबाज तरुण किंवा ५०-६० हजार रुपयांच्या सुंदर ' रोल्सराइस ' मध्यें बसून पुण्या-मुंबईमधून फिरणारे लक्ष्मीधर, यांनीं कधीं ह्या कराचा विचार केला आहे का ? ' साहेब ' सिगारेट पितो, म्हणून ऐटीनें हत्तीछाप सिगारेटचें सुंदर पाकीट फोडून, त्यांतील सिगारेट तोंडांत धरून हवेंत सोडलेल्या धुराच्या ढगांत, स्वर्गीय आनंद मानणारा देशभक्त तरी, ह्या सिगारेटवर सरकारनें शें. ११२$\frac{१}{२}$ टक्के जकात आकारली आहे व व्यापाऱ्यानें त्यावर आणखी शें. २५ टक्के नफा आकारलेला आहे, याचा कधीं विचार करतो का ? कौन्सिलांतून बजेटांचे वाभाडे काढणारे आमदार—नामदारसाहेब तरी याचा कधीं विचार करतात का ? हे कर अप्रत्यक्ष असल्यामुळें जळूप्रमाणें अर्थशोषण करीत असतां त्याची बहुजनसमाजास दादही नसते ! आपण मोटारीचेंच एक उदाहरण घेऊं. सदर उतारा प्रमोद साप्ताहिकाच्या खास दिवाळी औद्योगिक अंकांतील अगदीं १९३८ चा ताजा आहे.

त्यावरून आपणांस माझ्या म्हणण्यांतील रहस्य कळून येईल—" अमेरिकेंत बनविलेली चार सिलेंडरची व १५ अश्वशक्तीची एक मीडियम पॉवरची मोटार घेऊं व तिला कसकसा खर्च येतो तें पाहूं—

(१) मूळ किंमत (कारखानदाराच्या नफ्यासह)	सुमारें रु.	१२६०
(२) पॅकिंग व फ्रेट	,,	१७६
(३) ओशन फ्रेट	,,	२४६
(४) सी इन्शुअरन्स	,,	११
(५) हिंदुस्थानांतील आयात जकात	,,	६३७
(६) पोर्ट ट्रस्ट चार्ज	,,	५९
(७) विक्रेत्याला स्थूलमानानें $\frac{1}{3}$ फायदा	,,	८००
		रु. ३२००

या गाडीची विक्रीपत्रकांत नमूद केलेली किंमत ३८०० रु. पण हिंदुस्थानांतल्या गिऱ्हाइकांकरितां तूर्त ३२०० रु. भरली असतां मिळते. हीच गाडी अमेरिकेंतील माणसास १७५० रु. ला मिळते, तर आम्हांस मूळ किंमतीच्या अडीच पटीस (शेंकडा २५० टक्क्यांनीं महाग) पडते !"

हिंदुस्थानांत दरसाल ५।७ कोटींच्या मोटारी येतात. तेव्हां वरील हिशोब करितां आमची किती पद्धतशीर पिळवणूक चालली आहे याची कल्पना होईल! पण याची कोणास दाद आहे का ? अमेरिकेंतील मोटारी येथें विक्रीस ठेवणारे येथील परकीय व्यापारी–एजंट, प्रत्येक मोटारीमागें ८०० रु. फायदा लाटीत आहेत, याबद्दल कोणी नक्राश्रू ढाळले आहेत का ? मुंबईच्या श्रीमंत घरमालकांवर शें. १० टक्के कर बसवून १ कोटि रुपयांस त्यांना सरकार लुबाडीत आहे, म्हणून मंत्रिमंडळावर टीका करणारे आमदार महाशय यांनीं कधीं तरी या गोष्टींचा विचार केला आहे का ? सरकारी डयूटी व परकीय व्यापाऱ्यांची नफेबाजी लक्षांत घेतल्यास, या एकाच वस्तूपायीं श्रीमंत व सधन लोक दरसाल तीन कोटि रुपयांस नाहक बुडत आहेत ! ह्याचप्रमाणें परदेशी मालापायीं आम्हांकडून किती जबर जकाती घेतल्या जात आहेत तें आतां पाहूं—

परकीय मालावरील जबर जकाती व आमच्या खिशास ५५ कोटींची कात्री !

या जकातींत पुन्हा ब्रिटिश माल व ब्रिटिशेतर माल असा फरक केला जातो.

जकातीचे शेंकडा दर—

(१) पोलाद शें. २१$\frac{1}{4}$ टक्के, (२) लोखंडी रूळ, ब्रिटिश माल दर टनास २६८४ रु. तर ब्रिटिशेतर मालास टनामागें ४५ रु.; (३) रेल्वेचें सामान टनास ३६८४ तर ब्रिटिशेतर मालास रु. ५१८४; (४) विजेचे दिवे शें. ५० टक्के, (५) यंत्रें १० टक्के, (६) कागद शें. २५ टक्के, (७) रेशमी तयार माल शें. ५० टक्के, (८) बांगड्या ५० टक्के, (९) सोनें चांदी तयार माल शें. ५० टक्के, (१०) सूत २५ टक्के, (११) रत्नें, हस्तिदंत तयार माल शें. ५० टक्के; (१२) घड्याळें, विजेचे दिवे, वाद्यें शें. ५० टक्के, (१३) सिगारेट ११२॥ टक्के, (१४) मसाले ३७॥ टक्के, (१५) स्पिरिट ६० टक्के, (१६) ब्रँडी ३७॥ टक्के, (१७) कापूर ५० टक्के, (१८) सुपारी ३७॥ टक्के, (१९) रबर, टायर्स, साबण शें. २५ टक्के; (२०) फिल्म शें. २५ टक्के, (२१) रासायनिक द्रव्यें-औषधें शें. २५ टक्के...इ० वरील यादी वाचून आम्ही किती भरमसाट कर भरतों याची कल्पना होईल ! पण त्याचा विचार कोणीं केला आहे का ? परदेशी मालावर जबर जकाती बसविल्या असतां येथील उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळतें, त्यांना मालविक्री परवडते वगैरे फायदे होतात, पण असे कारखाने येथें असतील तेव्हांच ना ? बरें हा झाला व्यापारी व सरकार यांचा फायदा.

कच्च्या व पक्क्या मालाच्या किंमतींतील महदंतर

आतां आपण परकीय कारखानदारांच्या फायद्याकडे जरा वळून पाहूं— (१) दोन रुपयांस अच्छेर पोलाद मिळतें. त्याचे घड्याळाचे बारीक स्क्रू केल्यास त्याची किंमत ३००० रु. होते ! (२) चार रुपयांचें कातडें घेऊन तें कमाविल्यास त्याची किंमत ४० रुपये होते ! (३) तर ४ आण्याचा १ शेर कापूस घेऊन त्याचें तलम सूत कातून, धोतरजोडा विणल्यास त्याची किंमत ४

रुपये होते ! तर (४) एक आण्याचे एक पौंड गहूं घेऊन त्याचीं बिस्किटें केल्यास त्यांची किंमत २ रु. होते ! (विलायती) (५) तर तीन आण्याच्या एक पौंड तंबाकूपासून केलेल्या सिगारेटची किंमत ५ रु. होते ! या बाबतींत आपणांस पुढील उतारा तर जास्त उद्बोधक वाटेल.

मट्टीका सोना !

" नैसर्गिक वा कृत्रिम कापसाच्या, रेशमाच्या आणि लोंकरीच्या धंद्यांनीं जगांतील राष्ट्रांचीं भाग्यें पार बदलून टाकिलीं आहेत. या सर्व सुधारणा-संस्कृति-सामर्थ्य-मूल-धंद्यांनीं खरोखर कल्पनातीत संपत्तिसमृद्धि जगांत उत्पन्न केली जात आहे. एक कृत्रिम रेशमाचा धंदा नीट विचारांत घेतला, तरी त्या-पासून मिळणाऱ्या प्रचंड फायद्याची चांगलीच कल्पना येते. खालील आकड्यांचें तरुण, उत्साही व कर्तव्यदक्ष हिंदुस्थाननें अवश्य मनन करावें—

(१) झाडाची किंमत २५ रु.; गवत, चोथा असल्यास फक्त ५ रु. (२) कापलेल्या ठोकळ्याची किंमत ३८ रु. (३) उकळलेल्या रांध्याची किंमत १०० रु. (४) स्वच्छ, शुद्ध रांध्याची किंमत १३७ रु. (५) त्यापासून बनविलेल्या कृत्रिम रेशमाची किंमत १३७०० रु. !

पांच रुपयांचे किंवा २५ रुपयांचे १३७०० रु. होतात ! म्हणजे तीक्ष्ण कर्तबगार मानवी बुद्धि, अक्षरशः ५ पैशाचे ५० रुपये करिते ! 'मट्टीका सोना' म्हणतात तें असें ! अशा प्रकारें बाकीच्या जगांतून खोऱ्यानें पैसा ओढला जात आहे ! म्हणून युरोपियन राष्ट्रांची व अमेरिका, जपान यांची स्वर्गीय राष्ट्रांप्रमाणें केवळ चैन व चंगळ चालली आहे ! असें अप्रतिम संपत्ति-वैभव आपणांस प्राप्त करून घ्यावयास नको का ? '' (श्री. मोहनीराज मुळे, चित्रमय जगत् १९२९).

वरील सर्व उताऱ्यांवरून व विवेचनांवरून आपणांस पुढीलप्रमाणें निष्कर्ष काढतां येईल.

(१) कच्च्या व पक्क्या मालाच्या किंमतींत भयंकर महदंतर असतें.

(२) यामुळें कचा माल देऊन पक्का माल घेणें, म्हणजे बुडणें होय !

(३) देशांत यांत्रिक कारखाने नसले, म्हणजे त्याचा फायदा जबर जकाती व भरमसाट नफा आकारून सरकार, व परदेशी कारखानदार व व्यापारी घेतात.

(४) परकीय मालावर अप्रत्यक्ष कर कितीही वाढविले, तरी ते लोकांच्या गांवींही नसतात !

(५) देशांत नवीन धंदे काढणें झाल्यास, जबर जकातीच्या भिंती उभाणें हिताचें असतें !

या सर्व निष्कर्षांचा उपयोग आपणांस आपलें क्रांतिकारक बजेट (अंदाजपत्रक) तयार करण्यास कसा करून घेतां येईल तें पाहूं.—परकीय मालावर जकाती बसविण्यास किंवा तो पैसा वसूल करण्यास प्रांतिक सरकारास अधिकार नाहीं. म्हणून त्या भानगडींत न पडतां प्रांतिक सरकारनीं परकीय मालावर 'वस्तुविक्रय कर' या नांवाचा नवीन कर बसवावा. हा कर भरमसाट न ठेवतां अगदीं अल्प म्हणजे शें. ३८२ किंवा रुपयास अर्धा आणा इतकाच ठेवावा. हा कर वसूल करण्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें असावें.

विक्रय–कराची योजना.

(१) परदेशांतून माल मागविणाऱ्या सर्व व्यापारी कंपन्या, संस्था, व्यापारी व इतर सधन लोक, यांनीं बंदरांतून अगर इतर खुष्कीच्या मार्गानें माल मागवितांच, जकातीबरोबरच हा 'वस्तुविक्रय कर' निराळा वसूल करावा. हा कर गोळा करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारच्या कस्टम ऑफिसांतच प्रांतिक सरकारचें वसुली ऑफिस उघडावें.

(२) तसेंच खुष्कीनें अगर जलमार्गानें अगर विमानानें परदेशीं माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांकडून अगर कंपन्यांकडून शें. ३८२ प्रमाणें माल–'विक्रय कर' वसूल करावा. (ह्या मालावरील जकात फक्त शें. ५ टक्केच हल्लीं आहे.)

(३) देशांतील सर्व कारखाने, गिरण्या, खाणी, फॅक्टरी, भटारखाने वगैरे उत्पादक धंद्यांवर शेंकडा ८ आ. ४ पै (रुपयास फक्त १ पै) कर बसवावा व तो मालविक्रीच्या वेळेस कारखान्याकडून वसूल करावा.

(४) देशांतील सर्व व्यापाऱ्यांच्या दुकानांतील वार्षिक विक्रीवर शेंकडा ८⅓ आणे (रुपयास एक पै) कर बसवावा व तो वर्ष संपतांच वसूल करावा.

(५) सर्व व्यापाऱ्यांस जमाखर्च ठेवण्याची विशिष्ट पद्धत घालून द्यावी व त्यांच्यावर जमाखर्च ठेवण्याची सक्ति करावी.

(६) २००० वस्तीच्या आंतील गांवच्या व्यापाऱ्यांकडून वार्षिक ३ रुपये विक्रय कर घ्यावा. (अर्थात् व्यापार थोडा म्हणून जमाखर्च ठेवण्याची आवश्यकता नसलेलेच फक्त व्यापारी.)

(७) वरील वस्तीपेक्षां जास्त वस्तीच्या गांवांतून व शहरांतून व्यापार करणाऱ्या लहानसहान व्यापाऱ्यांकडून (जे जमाखर्च ठेवीत नाहींत–जरूरी नसते) वार्षिक ४ रु. ' विक्रय कर ' घेण्यांत यावा.

(८) देशांतील वैद्य व डॉक्टर्स यांच्या दुकानांतून रोग्यांकरितां खर्ची पडलेल्या औषधांच्या किंमतीवरही शेंकडा $८\frac{१}{३}$ आण्यांची करआकारणी व्हावी. त्याकरितां त्यांच्यावर जमाखर्च ठेवण्याचें बंधन ठेवावें.

(९) बाजारांत आपला माल विकीत बसलेल्या कोणत्याही माणसावर याची करआकारणी होऊं नये. दुकान घालून धंदा करणाऱ्याव्यतिरिक्त कोणावरही याची आकारणी होऊं नये.

(१०) फेरीवाल्याचा धंदा करणाऱ्या माणसांची नोंद करावी व त्यांच्याकडून वार्षिक ५ रु. कर घेण्यांत यावा.

याप्रमाणें करआकारणी झाल्यास त्यापासून सर्वांवर कराचा बोजा सारखा बसेल.

विक्रयकरापासून होणारे फायदे.

(१) मुंबई प्रांताचा आयात व निर्गत व्यापार सुमारें २०० कोटि रुपयांचा असल्यामुळें या करापासून प्रांतिक सरकारला दरसाल सुमारें ६ कोटि रुपये मिळतील !

(२) हा आयात–निर्यात माल सामान्यतः तिघांच्या हातून जात असल्यामुळें व्यापाऱ्यांच्या दुकानांतील अंतर्गत घडामोड (विक्री) ६०० कोटि रु. पर्यंत जाईल. त्यावरील शें. $८\frac{१}{३}$ आणे कराचे प्रांतिक सरकारास सुमारें ३ कोटि १२ लक्ष रुपये मिळतील !

(३) विक्रय-करामुळें परदेशी वस्तूंचे भाव रुपयास अर्धा आणा वाढतील. सरकारी जकात रुपयास आठ आणे, किंवा व्यापारी नफा रुपयास दोन आण्यांपासून चार आणे मानिल्यास, जनतेवर हा नवा बोजा आहे, असें वाटणार नाहीं.

(४) अंतर्गत वस्तुविक्रय करानें विक्रीचे दर रुपयास एक पै वाढतील व ही देवघेव २।४ व्यापाऱ्यांच्या हातूनही जरी झाली, तरी रुपयास एक पैशापेक्षां जास्ती भाव वाढला जाणार नाहीं. व्यापारी आपल्या दुकानांतून माल विकतांना जो भरमसाट नफा आकारतो, त्या दृष्टीनें विक्रींतील एक पै किंवा एक पैसा कांहींच नव्हे !

(५) व्यापारी किंवा कारखानदार यांच्या नफ्याशीं ह्या कराचा अर्थाअर्थी कांहीं संबंध येणार नाहीं. जकाती वाढल्या म्हणून ज्याप्रमाणें व्यापारी कधीं तक्रारी करीत बसत नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या कर समजून ते आपल्या विक्रीचे दर शें. ८$\frac{1}{3}$ आण्यानें चढवून सांगतील. त्यामुळें त्यांच्या पदरास बिलकूल खार लागणार नाहीं.

(६) अप्रत्यक्ष कराच्या पद्धतीनें, आपण सरकारचें देणें लागतों, तें आपणांस दिलें पाहिजे, त्याकरितां पेटींतून वा कर्ज काढून पैसा भरावयास पाहिजे वगैरे कोणतेच जाचक निर्बंध प्रजेस वाटणार नाहींत. त्यामुळें अशी जनता सरकारवर रुष्ट होणार नाहीं व मंत्रिमंडळास विरोध करणार नाहीं.

(७) परदेशी वस्तूंचा व्यापार करणारांस ' विक्रय कर ' शें. ३८२ भरावा लागत असल्यामुळें, असा माल त्यांना थोडा महागच विकावा लागेल. त्याचा फायदा देशी कारखानदारांना मिळेल ! त्यांना शें. ३८२ ची ही अप्रत्यक्ष मदतच वाटेल !

(८) हा कर परंपरेनें हिंदी जनतेवर पडत असल्यामुळें परकीय व्यापाऱ्यांस त्यामुळें गडबड करतां येणार नाहीं !

(९) या करामुळें प्रांतिक सरकारच्या बजेटास स्थिरपणा व भरीवपणा येत असल्यामुळें नामदार गव्हर्नरसाहेब किंवा नामदार व्हाइसरायसाहेब यांस त्यांत हस्तक्षेप करतां येणार नाहीं ! उलट अशा कराचें ते समर्थनच करूं लागतील !

(१०) प्रांतिक सरकारास आपल्या प्रांतांत नवीन नवीन धंद्यांची उभारणी करतांना, बाल्यावस्थेंतील धंदे वाढीस लावण्यास या कराचें संरक्षण व मदत मिळूं लागेल.

(११) हा कर बसविल्यामुळें उत्पन्नांत ९ कोटीची वाढ होईल.

(१२) त्यामुळें हल्लींचे ' अन्याय्य व वादग्रस्त कर ' कमी करतां येतील. त्यामुळें काँग्रेसचें बळ वृद्धिंगत होऊन ती एक अत्यंत बलवान संस्था होईल.

(१३) या वाढत्या उत्पन्नांतून वाढलेला शेतसारा शें. ५० टक्के कमी करितां येईल ! त्यामुळें शेतकरी वर्गावर आजपर्यंत झालेला अन्याय दूर करितां येईल. हें एक पापविमोनच होईल ! त्यामुळें नामदार खेर यांनीं शेतकरी मोर्चा-पुढें भाषण करतांना म्हटल्याप्रमाणें ' पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा ' हे बोल सार्थ होतील ! आजचे मंत्री हे शेतकऱ्यास ' देवदूत–माबाप ' वाटतील ! अशा पंढरीरायाचे भक्त सर्व वारकरी जनता झाल्याशिवाय कशी राहील ?

(१४) या उत्पन्नामुळें प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सोडवितां येईल व जनता साक्षर करून कार्यक्षम करितां येईल.

(१५) खेड्यांचें आरोग्य, वैद्यकी मदत, प्रौढ शिक्षण, व वाचनालयें, अनाथालयें यांना मदत मिळून समाजांतील प्रत्येक घटक सुखी व समाधानी होईल व तो काँग्रेसचा निस्सीम भक्त बनेल !

(१६) ग्रामपंचायतींना भरपूर मदत देतां येईल. त्यामुळें त्या संस्था कार्यक्षम व बलिष्ठ बनतील.

(१७) कोर्टबाजीचें उच्चाटण करणें सोपें जाईल. त्यामुळें उत्पन्नांत पडणारी १ कोटीची तूट वरील उत्पन्नामुळें भरून निघेल.

(१८) अबकारी खात्याचें ३,२५,००,००० रु. चें उत्पन्न बुडालें तर बजेटास धक्का बसणार नाहीं. दारूबाजीचें उच्चाटण करण्यास ' तीन वर्षेंच ' काय, पण ' तीन दिवस ' ही लागणार नाहींत !

(१९) औद्योगिक वसाहतीस, सरकारकडून मदत देतां येईल (सुमारें वार्षिक १ कोटीची). त्यामुळें पुढील १० वर्षांतच औद्योगिक क्रांति शें. ७५ टक्के होऊन जनतेची संपन्नता वाढवितां येईल.

(२०) श्रीमंत लोक, जमीनदार, इनामदार व जहागीरदार या वर्गावर करवाढ करण्याची जरूरी राहणार नाहीं ! यामुळें हा वर्ग काँग्रेसचा शत्रु न होतां हितचिंतक बनेल. त्यामुळें काँग्रेसला रावापासून रंकापर्यंत सर्व लोक दुवा

देतील. भावी लढ्यासाठीं लागणारा पैसा व मनुष्यबळ यांची मदत होऊन स्वातंत्र्याचा प्रश्न सुटण्याची वेळ नजीक येईल ! आज तरी परदेशी वस्तूचें गिऱ्हाईक देशांतील सधन व श्रीमंत वर्गच आहे. ह्या वर्गावर प्रत्यक्ष कर बसविल्यास तो वर्ग नाराज होईल. इनामदारावर भर सारा बसविणें किंवा जमीनदारावर पुन्हां इन्कमटॅक्स बसविणें किंवा घरमालकाच्या उत्पन्नावर शें. १० टक्के कर चढविणें, ह्या योजनेनें प्रत्यक्ष त्यांच्या खिशासच चाट बसणार असल्यामुळें हा वर्ग आपल्या संपत्ति–सामर्थ्यानें कॉंग्रेसचे पाय मागें ओढण्यास मागें–पुढें पाहाणार नाहीं. म्हणून हा धोक्याचा मार्ग टाकून त्यांच्या 'क्रयविक्रय' शक्तीवर कर बसविल्यास त्याची त्यांना जाणीवही होणार होणार नाहीं. कारण हा कर त्यांना प्रत्यक्ष भरावा लागणार नाहीं. 'सोनारानें कान टोचला म्हणजे दुखत नाहीं' म्हणतात, त्याप्रमाणें हा कर बसविल्यास संपन्न वर्गाच्या खिशांतूनही ५।७ कोटी रुपये राष्ट्रीय सरकारला काढतां येतील. व एकाच दगडानें 'दोन पक्षी' मारावेत, त्याप्रमाणें ह्या करयोजनेपासून श्रीमंतांकडून धन उकळतां येईल व बहुजनसमाजाचें योग्य धारणपोषण करून दाखवितां येईल. म्हणून मंत्रिमंडळानें ह्या सुवर्णधनांत 'सोनारी वृत्ति' धारण करावी म्हणजे सर्व कांहीं ठीक चालेल !

(२१) देशांत कारखान्यांची वाढ प्रचंड प्रमाणांत झाल्याच्या योगानें परदेशी मालाची कोट्यवधि रुपयांची आयात कमी होईल. तरी लोकांची 'क्रयविक्रय शक्ति' वाढल्यामुळें अंतर्गत 'वस्तु-विकय'–कराचें उत्पन्न वाढूनही तूट भरून निघेल ! यापुढें आयात कमी होऊन पक्क्या मालाची निर्यात वाढूं लागेल. त्यामुळें हा 'विक्रय-कर' भरून निघेल. शिवाय परदेशी पक्क्या मालासाठीं जाणारे वार्षिक २०० कोटि रुपये वांचल्यामुळें पुढील १० वर्षांत राहणीचें मान वाढून वांचलेले हे २००० कोट रुपये खेळते राहूं लागतील. त्यामुळें 'विक्रय–कराचें' उत्पन्न वाढीसच लागलेलें दिसेल !

याप्रमाणें 'विक्रय–करा' पासून अनंत फायदे होणार असल्यामुळें प्रधानमंडळानें एक क्षणहि न दवडतां ह्या बहुलाभदायी योजनेचा स्वीकार करावा.

अशा तऱ्हेचा 'विक्रय कर' सर्व सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतून बसविलेला

आहे. तसेंच आमदार जमनादास मेथासाहेब यांनींही मंत्री असतांना ह्या योजनेची मुक्तकंठानें स्तुति केली होती. हल्लींचे फडणवीस नामदार लठ्ठेसाहेब यांनींहि ह्या कल्पनेचा स्वीकार केला असून, गिरणींतील तयार कापड, रेशमी कापड, नकली माल इत्यादि वस्तूंवर शें. ६$\frac{1}{4}$ टक्के म्हणजे रुपयास १ आणा 'विक्रय–कर' बसविण्याचें जाहीर केलें आहे! मी हा कर रुपयास अर्धा आणा बसवावा म्हणतों, तर ते त्याच्याही पुढें उडी मारीत आहेत! पण त्यांच्या आणि माझ्या विचारसरणींत फरक आहे, तो त्यांनीं लक्षांत घेतल्यास त्यांचें कार्य अधिक सुकर होईल. तो फरक असा—(१) येथील गिरण्यांतील कापडावर ते रुपयास एक आणा कर घ्यावा असें म्हणत आहेत. पण गिरण्यांतील कापड येथील गरीब जनताच प्रामुख्यानें घेत असल्यामुळें हा कर त्यांना जाणवूं लागेल. शिवाय त्या मानानें परकीय कापडास तितकीच सवलत मिळून देशी गिरण्यांचा व्यापार बसेल! खादीच्या कापडास संरक्षण देण्याचा हा खरा उपाय नव्हे! खादी कार्यक्षम करावयाची असेल, तर प्रथम चरख्यांत सुधारणा करून तो बहुकार्यक्षम केला पाहिजे. हाच त्यावरील खरा उपाय होय. मंत्रिमंडळानें त्यासाठीं संशोधक लोक नेमून त्यांना साधनें पुरवून त्यांत बहुविध सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. दररोज शेंकडों प्रकारचीं नवीं नवीं यंत्रें निर्माण होत असतां व जग प्रगतीच्या मार्गानें रोज दश योजनें जात असतां, 'चरख्यांत' सुधारणा होणार नाहींत का? मंत्रिमंडळानें हा प्रश्न या मार्गानें सोडविल्यास महात्माजींची 'दोन तपांची तपश्चर्या' फळास येईल व सर्वत्र आनंदीआनंद होईल!

(२) हा कर येथील कोणत्याही कारखान्यावर–गिरणी–खाणी इत्यादिकांवर बसवूं नये. (मग ते कारखाने परकीय लोकांचे असले तरी चालतील.) तर अशा कारखान्यांवर शें. ८$\frac{1}{3}$ आणे 'वस्तु–विक्रय' करच बसवावा, म्हणजे त्यांच्या उत्पादनशक्तीस धक्का बसणार नाहीं!

(३) हा कर विवक्षित वस्तूंवर जबर न बसवितां सर्व परकीय मालावर रुपयास अर्धा आणा व या देशीं तयार होणाऱ्या मालावर रुपयास फक्त १ पै बसवावा. याशिवाय बाकीचे फरक करयोजनेप्रमाणें करावेत. तेव्हां ह्या कर-

बद्दल आतां कोणाचेंच दुमत नाहीं. आतां आणखी एका काटकसरीच्या योजनेचा विचार करून प्रांतिक सरकारच्या बजेटाचें संकलित स्वरूप लक्षांत घेऊं.

भरमसाट पगार व थैलीभर भत्ते !

सात हजार मैलांवरून साती समुद्र ओलांडून येथें येणाऱ्या इंग्रजांची धन्य होय ! येथें त्यांच्या जातीचें ना गोताचें ! पण व्यापारी हिय्या करून व्यापाराबरोबर येथील राज्यलक्ष्मीहि त्यांनीं हस्तगत केली ! आणि आपल्या नोकरांकडून बिनबोभाट कुशलतेनें राज्यकारभार सुरू ठेवला, म्हणून त्यांची त्रिवार धन्य होय ! हे नोकर इमानी राहावेत व त्यांनीं आपलें काम इमानेंइतबारें करावें, म्हणून त्यांना भरमसाट पगार व थैली भरून भत्ते देण्याची लांलूच दाखविण्यांत आली ! आज सर्व जगांत अत्यंत दरिद्री असा कोणता देश असेल, तर तो हिंदुस्थान ! पण नोकरांच्या पगाराच्या बाबतींत, येथील बड्या नोकरांचें पगारांचें मान पाहून 'वैभवसंपन्न अमेरिकेनेंहि' मान खालीं घालावी !

हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

ठेवायला कोणाचें काय जातें ! ईस्ट इंडिया कंपनीचें धोरणच असें होतें कीं, ज्या मार्गांनीं येथील पैसा नेतां येईल त्या मार्गांनीं न्यावा व लोक दरिद्री–दुर्बल करून सोडावेत, म्हणजे त्यांच्यावर 'यावच्चंद्रदिवाकरौ' राज्य करण्यास मिळेल ! हें कंपनी सरकारचें धोरण किती यशस्वी झालें, तें आपण पाहातच आहोंत ! तसें नसतें तर येथील नोकराना 'ओझेंभर' पगार कां दिला जाता ? ब्रिटिश साम्राज्याच्या मुख्य प्रधानास मासिक पगार ११,००० रुपये आहे, तर एका अंकित वसाहतीमधील हाताखालच्या येथील व्हॉइसरायसाहेबांचा पगार दरमहा २१०००रु. आहे ! शिवाय वार्षिक भत्ता ५ ते ६ लाख रुपये मिळतो ! हिंदुस्थान श्रीमंत म्हणाल, तर येथील माणसाचें वार्षिक उत्पन्न ६० रु., तर इंग्लंडमधील प्रत्येक माणसाचें वार्षिक उत्पन्न ४८ पौंड अथवा ७२० रुपये ! (१२ पट !) इंग्लंडला परदेशीं गुंतविलेल्या भांडवलापासून वार्षिक २५० कोटि रु. व जहाजांच्या वाहतुकीपासून १०० कोट रुपये मिळतात ! तर हिंदुस्थान उलट २२० कोट रुपये गमावून बसतो !

इंग्लंडच्या ३॥ कोटी लोकांपासून तेथील सरकार जेवढें कराचें उत्पन्न गोळा

करतें, त्याच्या ै ही उत्पन्न ३५ कोटि लोकसंख्येच्या ह्या देशांतून जमा होत नाहीं ! इतके आम्ही संपन्न आहों ! हिंदुस्थानांतील इंग्रज माणसांना मिळत असलेला 'गोणीभर' पगार पाहून, अमेरिकेंतील विद्यार्थ्यानें 'हिंदुस्थान ही सुवर्णभूमि आहे,' असें सिद्ध केलें ! ब्रिटिश सरकारच्या दर एकलक्ष रुपये उत्पन्नापैकीं फक्त ९ रुपये ब्रिटिश मुख्य प्रधानाच्या पगाराकरितां खर्ची पडतात, तर हिंदुस्थानांत हेंच प्रमाण दरलक्षास १०० रुपये इतके व्हाइसराय साहेबांच्या पगाराचें पडतें ! इतका पुरावा हातीं असल्यावर त्याचें विधान चुकीचें कसें असेल ? याप्रमाणें पाहिल्यास हा पगार ब्रिटिश प्रधानाच्या दसपट आमच्या व्हाइसराय साहेबांस मिळतो ! ब्रिटिश प्रधानमंडळांतील इतर प्रधानांचे पगार महिना ५५०० रुपये आहेत, तर उलट हिंदी गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सभासदास ६६६७ रु. मिळतात ! बंगालच्या मुख्य मंत्र्याचा पगार ब्रिटिश मंत्र्याच्या पगाराइतका आहे ! पण सरकारी महसुलाशीं या पगाराचें प्रमाण पहातां दरलक्ष उत्पन्नास हें प्रमाण तेथें व येथें ४=२०० असें पडतें ! यावरून सरकारी महसुलाची तुलना करतां, ब्रिटि.ा मंत्र्याच्या पगारापेक्षां बंगाली मंत्र्याचा पगार ५० पट अधिक आहे ! हीच परंपरा उतरत्या भांजणीच्या स्वरूपांत हिंदी नोकरवर्गांत उतरली असून, 'ब्रिटिश राजवट' अत्यंत 'खर्चाळ' होऊन बसली आहे ! त्यांत विशेष तर हें, कीं येवढा 'गोणीभर पगार' असतांही, त्याच्या मदतीस आणखी 'मोटभर भत्ता' दिला जातो ! 'अधिकस्य अधिकं फलं' हेंच खरें ! ह्या भत्त्यापायीं या इलाख्यांतील ६७ लाखाची रक्कम खर्ची पडते ! त्यांपैकीं ७ लक्ष रुपयांवर असेंब्लीची हुकमत नाहीं. राहिलेल्या ६० लक्ष रुपयांपैकीं फारच थोडा भत्ता १०० रु. पगाराच्या खालील नोकरांस मिळतो ! भरपूर पगार असतां आणखी भत्ता कशाला ? अशा साहेबमजकुरांचे 'स्वारींतील' आजचे खर्च कसे, कोठून आणि किती होतात, तें हिंदुस्थानांतील एखादें 'शेंबडें पोरही' सांगेल ! मग हा आणखी भत्ता कशाला ? फडणवीस साहेबास जर ह्या बड्या भाईचे पगार कमी करून 'अप्रियता' संपादन करावयाची नसेल, तर निदान ह्या भत्त्यांतील ५० लक्ष रुपयांची तरी कपात करून दाखवावी ! व कायद्यानेंच वरील किळसवाणें रूप घालवून दाखवावें ! न्याय्य प्रवासखर्च देण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. प्रश्न फक्त पोटगीभत्त्यापुरताच आहे ! हिंदवी स्वराज्याशीं निष्ठेनें

राहून, प्रसंगीं प्राणार्पण करणाऱ्या गरीब पण 'स्वामिभक्त' इनामदार—जमिनदारांच्या वंशजावर 'कराचें हत्यार' उपसण्यापूर्वीं एवढी तरी बचत फडणवीस साहेबांनीं करून दाखवावी ! नाहीं तर आजचे फडणीस ह्या वर्गाच्या दृष्टीनें 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' ठरावयाचे ! किंवा घरच्या 'म्हातारीचे' काळ व्हावयाचे !

आणखी कांहीं नव्या उत्पन्नाच्या बाबी

(१) मुंबई सरकार आपल्या सेवानिवृत्त पेन्शनदारांच्या पगारासाठीं, व पेन्शन-फंडासाठीं मिळून दरसाल १,१६,००,००० रुपये बजेटांतून खर्चीं टाकते ! अशा सर्व नोकरांस झालेल्या नोकरीचें पेन्शन ठरवून देऊन, 'प्रॉव्हिडंट फंडाची' हुकमी योजना सुरू केल्यास एका पिढीनंतर (२५ वर्षांनंतर) अवघे ३०-३५ लाख रुपयेच खर्ची पडून सुमारें ७५।८० लाख रुपये वांचूं लागतील ! कायदा होतांच प्रत्यक्ष बचत वार्षिक ३० ते ३५ लाख रुपयांची होत राहील !

(२) सावकारी व्याजांतील शेंकडा १$\frac{1}{8}$ टक्क्याप्रमाणें प्रांतिक सरकारास दरसाल ३० ते ३५ लाख रुपये मिळतील. सावकारी करणाऱ्या सर्व सावकारांस 'ठेवीदाराचा' दर्जा प्राप्त होत असल्यामुळें, त्यांच्या पदरांत इतर कोणत्याही बँकेंतून न पडणारें शें. ५ टक्के व्याज पडूं लागेल. त्यामुळें हा वर्गही संतुष्ट राहील !

(३) जमीनदारवर्गाचे खंड वसूल करून देण्याच्या कामीं खंडांतून शें. ३ इतकी फी सरकारला मिळेल. हा आंकडा ५० ते ६० लक्ष रुपये इतका होईल ! आणि तसें झाल्यास इनामदारांवर 'भर सारा' बसविणें किंवा जमिनीच्या उत्पन्नावर 'इन्कमटॅक्स' सारखा कर बसविणेची जरूरी राहणार नाहीं ! जमिनदारांना ह्या रकमा विनाकष्ट घरपोंच होऊं लागल्यास, त्यांचा तरी विरोध या गोष्टीस कसा होईल ?

या सर्व विवेचनावरून प्रांतिक सरकारच्या बजेटाचें स्थूल स्वरूप कसें होऊं शकेल, तें आपण पाहूं. ह्यामध्यें फक्त नवीन करवाढ व अन्याय्य करांचें निर्मूलन व लोकोपयोगी खात्यास जादा दिल्या जाणाऱ्या रकमा यांचाच फक्त विचार केला आहे. बाकीचें बजेट पूर्ववत् समजावें.

जमेच्या बाबी.

(१)	आयात निर्यात व्यापारावरील ‘ वस्तुविक्रय ’ कराचें उत्पन्न	६ कोटि रु.
(२)	देशांतील अंतर्गत व्यापारांतील ‘ वस्तुविक्रय ’ कराचें उत्पन्न	३ कोटि रु.
(३)	जमिनदारांच्या खंडांतील फीची रक्कम	५० लाख
(४)	सावकारी व्याजांतील शें. १ १/४ रु. प्रमाणें मिळणारी फी	३० लाख
(५)	पेन्शनफंडांतील बचत (प्रॉव्हिडंट फंडाच्या योजनेनें)	३० लाख
(६)	पगारांतील भत्त्यांत कपात (अनवश्यक खर्च म्हणून)	५० लाख
		१०,६०,००,०००

खर्चाच्या बाबी.

(१)	अबकारीखात्याचें उच्चाटण करून येणारी तूट (खर्च वजा जातां)	३,०५,००,०००
(२)	कोर्टबाजीचें उच्चाटण करणेंसाठीं उत्पन्नांत पडणारी प्रत्यक्ष तूट (खर्च वजा जातां)	१,००,००,०००
(३)	वाढलेला अन्याय्य शेतसारा शें. ५० टक्के कमी करण्यासाठीं पडणारी तूट	१,७०,००,०००
(४)	आठ हजार ग्रामपंचायतीसाठीं बोनसची खर्ची पडणारी रक्कम. (सुमारें प्रत्येकीं ४५० रु.प्रमाणें)	३६,००,०००
(५)	आठ हजार ग्रामपंचायतींला वार्षिक ग्रँट प्रत्येकीं ३०० रु. प्रमाणें	२४,०००००
(६)	८००० खेड्यांना नवीन शाळा देण्यासाठीं प्रत्येकीं २५० रु. प्रमाणें ग्रँट	२०,००,०००
(७)	८००० पंचायतींला वैद्यकीय औषधासाठीं प्रत्येकीं ३०० रु. प्रमाणें ग्रँट.	२४,००,०००
(८)	वैद्यांच्या बोनससाठीं प्रत्येकीं २०० रुपयेप्रमाणें	१६,००,०००

(९) वरिष्ठ पंचायतीच्या खर्चासाठीं वार्षिक २००० रु. प्रमाणें २८० वरिष्ठ पंचायतींचा खर्च	४,००,०००
(१०) पंचायतीचीं बुकें, सादील वगैरेसाठीं प्रत्येकीं ७५ रु. प्रमाणें ८००० पंचायतीचा खर्च.	६,००,०००
(११) दुष्काळ फंडासाठीं	५०,००,०००
(१२) प्रौढ शिक्षण, प्रत्येक पंचायतीस २५० रु. प्रमाणें.	२०,००,०००
(१३) लायब्ऱ्या, वाचनालयें यासाठीं प्रत्येक पंचायतीस १०० रु. प्रमाणें	८,००,०००
(१४) शेतकऱ्यांना जोडधंदे देण्यासाठीं यांतून शें. ६¼ दराचें कर्ज दरसाल रु.	१,००,००,०००
(१५) नवीन प्रत्येक वसाहतीला प्रत्येकीं ५ लक्ष रु. प्रमाणें, वीस वसाहतींस दरसाल कर्ज रु.	१,००,००,०००
(१६) 'साठे-परांजपे' स्कीमप्रमाणें शिक्षकांस पगार देणेसाठीं लागणारी जादा रक्कम	२०,००,०००
(१७) ८००० पंचायतींमधील 'अस्पृश्य वस्तीमधील विद्यार्थ्यांस' शिक्षणासाठीं 'शिष्यवृत्त्या' देण्यासाठीं प्रत्येकीं १०० रु. प्रमाणें.	रु. ८,००,०००
(१८) जनावरांच्या औषधासाठीं प्रत्येकीं १२५ रु. प्रमाणें.	रु. १०,००,०००
(१९) शेतीसुधारणेसाठीं प्रत्येक पंचायतीस बोनस रु. १२५.	रु. १०,००,०००
(२०) खेडेगांवांतील पाणी पुरवठ्यासाठीं	रु. १०,००,०००
(२१) खेडेगांवांतून जंगल वाढविणेसाठीं व गायरानें वाढविण्यासाठीं प्रत्येकीं १२५ रु. प्रमाणें.	रु. १०,००,०००

(२२) भिकारभणंगांच्या वसाहती स्थापून त्यांना कामधंदा देण्यासाठीं.	रु. १०,००,०००
(२३) ८००० पंचायतींना शेतीची यंत्रसामुग्री घेण्यासाठीं मदत.	रु. ४,००,०००
	१०,६०,००,०००

याप्रमाणें बजेटाची उभारणी झाल्यास जनतेची अभिवृद्धि होऊं लागेल !

(१) या इलाख्यांत एकंदर २१६६८ खेडीं आहेत. त्यांतील ९००० खेडीं ४०० वस्तीच्या आंतील आहेत. एक मैलाच्या आंतील सर्व खेडीं एक केल्यास, तसेंच १००० वस्तीपर्यंतच्या अनेक लहान खेड्यांचे गट एकत्र केल्यास, ह्या पंचायतींची संख्या ८००० पेक्षां जास्त जाणार नाहीं असा अंदाज आहे.

(२) वैद्यकी उपचार करणारांस २५ एकर जमीन उपभोगण्यास द्याव-याची असल्यामुळें, वार्षिक २०० रु. बोनस दिला असतां, त्यांचे हातून हें कार्य पार पडूं शकेल.

(३) हल्लींच्या तलाठी वर्गांचीच नेमणूक पंचायतीच्या सेक्रेटरीच्या जागीं होणार असल्यामुळें ' सेक्रेटरी ' करितां जादा खर्च सहसा पडणार नाहीं.

(४) जमीनसारा निम्मा केल्यास कर्जमर्यादा तरम आकाराच्या १० पटीवरून २० पटीवर न्यावी. तसेंच जोडधंद्यांसाठीं द्यावयाचें भांडवल २५ पटीवरून ५० पटीवर नेलें असतां, जोडधंद्यांस लागणाऱ्या पुरेशा भांडवलाचा प्रश्न सुटेल ! जमिनीचें तारण कर्जास पुरेसें असल्यावर जोडधंद्यास भांडवली पुर-वठा करण्यास कोणतीच अडचण भासणार नाहीं.

(५) दरसाल २ कोटि रुपये शें. ६½ टक्के दरानें औद्योगिक धंद्यांत सर-कारचे पडत राहतील. त्यामुळें वार्षिक व्याजांत १२½ लक्ष रुपयांची वाढ होत राहील ! या पद्धतीनें एका पिढींतच (२५ वर्षांत) राष्ट्रीय सरकारचें भांड-वल ५० कोटि रुपये खेळतें राहील. एवढ्या अवाढव्य भांडवलाच्या बळावर राष्ट्रीय प्रांतिक सरकारला आपल्या प्रांतांतील धंदे जगाच्या चढाओढींत टिकवून धरणें भावी काळांत शक्य होईल.

हल्लींच्या मंत्रिमंडळांनीं आपल्या करयोजनेचें स्वरूप वरील स्वरूपांत अमलांत आणतांच, अनंत फायदे होऊं लागतील. श्रीमंत व मध्यम वर्गावर प्रत्यक्ष नवीन करयोजना आकारल्यास, कॉंग्रेसची-राष्ट्रीय सरकारची-शक्ति खची होण्याची साधार भीति वाटते. कॉंग्रेसइतका संघटित व बलवान पक्ष आज देशांत दुसरा नसल्यामुळें लोककल्याण होणें कठीण जाईल म्हणून कॉंग्रेसनें कोणत्याच वर्गाच्या रोषास बळी न पडतां, आपला जनहिताचा कार्यक्रम असाच रेटीत नेल्यास, भाग्यकाल दूर नाहीं, तो अत्यंत समीप येत चालला आहे, असें प्रत्यक्ष अनुभवास येऊं लागेल ! म्हणून ' कॉंग्रेस चिरायु होवो ' असा मंगल आशीर्वाद देण्याची जनतार्जनादनास प्रार्थना करून त्याच्याच सेवेस हें पुस्तक सप्रेम सादर करितों.

॥ वंदे मातरम् ॥

समाप्त

" तुम्हीं सुशिक्षित लोकांनीं जो निष्काळजीपणा चालविला आहे, त्याचे भयंकर परिणाम तुम्हांस केव्हांतरी भोगावे लागतील! तुम्ही आपल्या डोळयांवर कातडें ओढून घ्याल, पण एकंदर प्रजा दारिद्र्याच्या व भुकेच्या भट्टींत पडून जळून निघाली, म्हणजे त्यांस तुमच्या डोळयांवरील कातडें दूर करण्यास एक क्षणभरही वेळ लागणार नाहीं! तुम्हांस वाटत असेल कीं, त्या गरीब प्रजेच्या हातून काय होणार? परंतु दारिद्र्यानें व क्षुधेनें गांजलेल्या लोकांपुढें कोणाचाच टिकाव लागणार नाहीं! करितां वेळींच जागे व्हा व सरकार झोंप घेत असेल तर त्यासही जागें करा!"

" ह्यूमसाहेब "

लोकशक्ति, महाराष्ट्र राष्ट्रसभा, खास अंक १९३६.

मुद्रक:—बाळकृष्ण भाऊ जोशी, ज्ञानविलास प्रेस पुणें.
प्रकाशक—महादेव दत्तात्रेय वाघ,
रा. नांदगिरी, पो. सातारारोड, जि. सातारा.